३४

# थोरले साहेब

प्रा. डॉ. विजय पाथ्रीकर





"रामायण व महाभारत हे भारतीय जीवनशैलीचे दोन ग्रंथ आहेत. या दोन्ही ग्रंथांमध्ये काही उपेक्षित व्यक्तिमत्त्वे आहेत. त्यांना या ग्रंथांनी न्याय देण्याचं नाकारलेलं मला दिसतं. त्या उपेक्षितांत रामायणामधील लक्ष्मणाची पत्नी उर्मिला आहे. लक्ष्मणाचं बंधूप्रेम, आज्ञाधारकपणा आपणास दिसतो. त्यांचं आपण उदात्तीकरण करतो; गुणगान करतो, पण या बदल्यात उर्मिलाच्या भावनेचा झालेला कोंडमारा, तिला जगावं लागणारं क्लेशकारक जीवन, तिच्या मनाचा विचार या ग्रंथात कुठे व्यक्त होताना दिसत नाही. रामायणानं स्त्री जातीवर केलेला हा घोर अन्याय आहे; असं मला वाटतं. माझ्याही जीवनात १९४२ ते १९५२ या दहा वर्षांत मलाही उर्मिलेसारखं जीवन व्यतित करावं लागलं. लौकिकार्थानं त्याग, देशकार्य याची दखल समाजानं घेतली पण झालेला मनस्ताप मला कुठंही व्यक्त करता आला नाही. तो स्त्री जातीला करता येऊ नये म्हणूनच रामायणात उर्मिलेला जन्माला घातली असावी. तिचीच मी प्रतिनिधी आहे असं मला वाटतं. आम्हा दोघींमध्ये फरक तो काय असेल तर मला दहा वर्षे हे जीवन जगावं लागलं तर उर्मिलेला चौदा वर्षे.

# थोरले साहेब

प्रा. डॉ. विजय पाथ्रीकर

कैलाश पब्लिकेशन्स
औरंगपुरा, औरंगाबाद

❖ थोरले साहेब : प्रा. डॉ. विजय पाथ्रीकर, 'कोंडाणा', ८०, व्यंकटेशनगर, छत्रपती शिवाजी महाराज महामार्ग, जालना रोड, औरंगाबाद.
फोन - २३३७७१७, मो. ९४२३३९२७१७

❖ प्रकाशक : के. एस. अतकरे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद. मो. : ९३२५२१४१९१

© लेखकाधीन

❖ अक्षरजुळणी : देवयानी कॉम्प्युटर्स, जी -१५३, बालाजीनगर, औरंगाबाद. मो. ९७६४७९४७५४

❖ मुद्रणस्थळ : अथर्व प्रिंटर्स व बाइंडर्स, पुणे

❖ प्रथमावृत्ती : डिसेंबर २०१०

❖ मुखपृष्ठरचना : सरदार जाधव

किंमत : ३५० रुपये

वंचित समाज आणि शेतकऱ्यांच्या जीवनाला
प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी
मा. ना. शरद पवार साहेब
करीत असलेल्या धडपडीस अर्पण.

# परिचय

| | | |
|---|---|---|
| नाव | | प्रा. डॉ. विजय भीमराव पाथ्रीकर.. |
| जन्म | | १५-७-१९४५, पाथ्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद. |
| शिक्षण | | एम.ए.,एम.पी.एड.,पीएच.डी. |
| पुरस्कार | | शिवछत्रपती पुरस्कार - महाराष्ट्र राज्य, पं. जवाहरलाल नेहरू मेमोरियल फंड पुरस्कार-दिल्ली, क्रीडा किमयागार पुरस्कार - परभणी, स्वामी रामानंद तीर्थ महाराष्ट्र रत्न पुरस्कार - औरंगाबाद. |
| विशेष कार्य | | अधिष्ठाता, शिक्षणशास्त्र अध्यापन विद्याशाखा, डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. अधिष्ठाता शारीरिक शिक्षणशास्त्र अध्यापन विद्याशाखा, डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. |
| | : | कार्यकारिणी सदस्य, डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. |
| | : | झेकोस्लोव्हाकियातील जागतिक शांतता परिषदेत भारताचे प्रतिनिधी म्हणून सहभाग. |
| | : | युक्रेन, रशियाचा अभ्यास दौरा. |
| | : | टी.आय.पी.ई. महाविद्यालय, कांदिवली, मुंबई विद्यार्थी संघाचा अध्यक्ष म्हणून निवड. |
| | : | मराठवाडा प्राध्यापक संघटनेचे सरचिटणीस (मुक्टा). |
| | : | महाराष्ट्र राज्य प्राध्यापक महासंघाचे उपाध्यक्ष (एम. फुक्टो). |

# प्रेरणा

भारतीय राजकारणातील जाणते सत्तार्षी थोरले साहेब (यशवंतराव चव्हाण) हे महात्मा जोतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या लोकशाहीचे धुरंधर मुत्सद्दी. ३८ वर्षे सत्तेत राहून आपल्या दूरदृष्टीच्या कर्तृत्वानं कृषी संस्कृतीला त्यांनी मानाचं स्थान प्राप्त करून दिलं. ऋषी संस्कृतीच्या नेतृत्वाला लाजवील अशा राजकीय मुत्सद्दीपणाचा अवलंब करून जगभर भारतीय राजकारणातील एक धुरंधर नेता म्हणून प्रतिमा निर्माण केली.

आज या लोकशाहीप्रणीत भारत देशात वंचितांची आणि शेतकऱ्यांची मुलं मोठ्या कुशलतेनं आणि आत्मविश्वासानं सत्तेत, प्रशासकीय सेवेत आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात चौफेर यशस्वीपणे वावरत आहेत. साहेबांच्या ध्येयधोरणाला आलेली ही फळं आहेत.

औरंगाबाद येथे स्नेह विकास मंडळाने आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेत आमच्या मित्रसाधना मंडळाने ९० पौंडी वजनी गटात प्रथम क्रमांक मिळविला. मित्रसाधना मंडळाच्या संघाचा मी कर्णधार होतो. या स्पर्धेच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम साहेबांच्या हस्ते १४ नोव्हेंबर १९६० ला पार पडला. प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना मला जो साहेबांचा स्पर्श झाला त्या दिवसापासून माझ्या आयुष्याची यशस्वी वाटचाल सुरू झाली. साहेबांनी जे निर्णय घेतले त्या निर्णयामुळेच आम्ही घडलो. आयुष्यातील यशाचे शिखर गाठू शकलो.

'संकटाचा सूर्य माथ्यावर आला म्हणजे स्वत:ची सावली साथ सोडते' असं म्हणतात. वेणुताईंची वेगळी अशी सावली राहिलीच नाही. साहेबांची सावली हीच वेणुताईंची सावली ४१ वर्षांच्या वाटचालीत ठरली. संकटकाळी आणि नैराश्याच्या प्रसंगी साहेबांची साथसंगत केली.

'सोनहिरा' या ओढ्याच्या परिसरात साहेबांचं संस्कारक्षम बालपण घडलं. संस्कारक्षम वयात जे संस्कार मनावर बिंबतात ते भावी यशस्वी जीवनाचे चिरे ठरतात. 'सोनहिरा' या ओढ्याच्या पाण्यात पोहताना साहेबांनी जे साहस केलं

त्या प्रसंगातून त्यांच्या मित्रांनी साहेबांचे प्राण वाचविले. मित्रत्वाची संगत नवीन जीवन देऊ शकते या संस्काराची जाणीव साहेबांनी जीवनभर ठेवली.

सत्तेच्या वर्तुळात वावरत असताना वंचितांच्या आणि शेतकऱ्यांच्या सुखदु:खाशी साहेब समरस झाले. यशस्वी जीवनाची वाटचाल करीत असताना त्यांना ज्या अडचणींना सामोरं जावं लागलं त्या अडचणी वंचितांच्या आणि शेतकऱ्यांच्या वाट्याला येऊ नयेत म्हणून त्यांनी त्याकरिता जे निर्णय घेतले ते 'सह्याद्री' या निवासस्थानावर. घेतलेल्या या निर्णयामुळं महाराष्ट्र देशात नंबर एकचं राज्य ठरलं. त्यांचं कर्तृत्व उजळून निघालं.

साहेब भारताचे संरक्षणकर्ते झाले. आपल्या कर्तृत्वाची पताका दिल्लीवर फडकविली. जागतिक पातळीवर त्यांचं नेतृत्व तळपू लागलं. भारताच्या जीवनात पाकिस्तानसोबत झालेल्या युद्धात भारताला पहिला विजय मिळवून दिला. भारतीय सैन्यानं पाकिस्तानातील इचोगिल कालव्यापर्यंत मजल मारली. पाकिस्तानी सैन्यानं लाहोरच्या संरक्षणाकरिता इचोगिल कालव्यावरील पूल उडवून दिला. हा पूल उडविला नसता तर भारतीय सैन्याने लाहोर काबीज केलं असतं. लाहोरला लागूनच 'अटक' शहर आहे. इतिहासाची पुनरावृत्ती झाली म्हणून 'अटकेपार' या भारतीय प्रेरणेचा वापर मी केलेला आहे.

मी साहित्याचा वाचक आहे, साहित्यिक नाही. वंचित वर्गाच्या आणि शेतकऱ्यांच्या जीवनासंबंधी जे काही साहित्य लिहिलं गेलं त्याचा मी विद्यार्थी असल्यापासूनचा वाचक आहे. मॅक्झिम गोर्की यांच्या 'आई' कादंबरीपासून ते महात्मा फुलेंच्या 'शेतकऱ्याचा असूड'पर्यंत मी वाचत आलो आहे. 'शेतकऱ्याचा असूड' व देशमुखांच्या 'बारोमास' या कादंबरीतील प्रश्नांशी माझे जीवन निगडित आहे.

मी ज्या ज्या क्षेत्रात काम केले ते शैक्षणिक क्षेत्र असेल, क्रीडा क्षेत्र असेल, सामाजिक कार्याचे क्षेत्र असेल, तिथे माझ्या कार्याची दखल त्या त्या क्षेत्रातील जाणकारांनी घेतलेली आहे.

माझे मित्र सुधीर गव्हाणे (माजी प्रभारी कुलगुरू, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक) यांनी माझ्याबाबतीत लिहिलेल्या एका लेखामध्ये आपलं मत व्यक्त केलं आहे ते असं : 'विजय पाथ्रीकर हे एक अफलातून खेळाडू आहेत. त्यांनी खेळाची मैदाने गाजविलेली आहेत. महाराष्ट्र शासनाचा क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च 'शिवछत्रपती पुरस्कार' त्यांना मिळालेला आहे.

महाराष्ट्र शासनानं त्यांचा यथोचित सन्मान केलेला आहे. विजय पाथ्रीकर यांनी थोरल्या साहेबांच्या कार्याविषयी अनेक लेख लिहिले आहेत. 'मातीचं नातं' नावाची एक प्रभावी कथा लिहिली. ती 'लोकमत' दैनिकात छापूनही आली. त्यावरून मी असं अनुमान काढलं की, विजय पाथ्रीकर हे शब्दाशी अप्रतिमपणे खेळू शकतात.'

शिक्षण, क्रीडा व साहित्यक्षेत्रातील माझे सवंगडी प्रा. सुरेश जाधव (उपप्राचार्य, शिवाजी महाविद्यालय, परभणी) म्हणतात, 'मानवाच्या जीवनाशी हवा, पाणी व आगीचं जे अतूट नातं आहे तेच नातं विजय पाथ्रीकर यांचं मराठवाड्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या जीवनाशी आहे. विजय पाथ्रीकर यांनी मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध केले आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या विकासाच्या बाबतीत आडकाठी निर्माण करणाऱ्यांविरुद्ध विजय पाथ्रीकर यांनी हवा, पाणी व आगीसारखे रुद्ररूप धारण केलेले आहे.'

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे नेते प्रा. उत्तमराव सूर्यवंशी म्हणतात : 'ज्या ज्या क्षेत्रात विजय पाथ्रीकर यांनी कार्य केलं त्या त्या क्षेत्रात ते पहिल्या क्रमांकाचे नेते राहिले. मराठवाड्यातील हे यशस्वी नेतृत्व साहित्यक्षेत्रातही क्रमांक एकवर राहील याबद्दल माझ्या मनात कुठलीच शंका नाही.'

प्रत्येक यशापाठीमागे भक्कम पाठबळ असावं लागतं. तसं भक्कम पाठबळ मला मिळालं. यशाचा कळस सर्वांना भावतो. हा यशाचा कळस ज्या पायावर बिनधास्त उभा असतो त्या पायाचा विसर पडता कामा नये. या पायाचे चिरे जेवढे मजबूत तेवढा यशाचा कळस उंच गगनाला गवसणी घालू शकतो. पांडुरंगराव ऊर्फ आबासाहेब पाथ्रीकर, कै. दगडूजी ऊर्फ काकासाहेब पाथ्रीकर, कै. उत्तमराव ऊर्फ बाबासाहेब पाथ्रीकर, डॉ. भगतसिंग राजूरकर, कै. डॉ. ढोकरट, सुभाष राजूरकर यांनी माझ्या उत्कर्षाचा पाया रचला.

माझ्यासारखेच पण वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी झालेले आमचे बंधू व माझ्या यशामध्ये ज्यांचा सिंहाचा वाटा आहे असे द्वारकादास पाथ्रीकर, दत्ता पाथ्रीकर, कै. गंगाधर पाथ्रीकर, त्र्यंबक पाथ्रीकर. जे पाथ्रीकर नाही, पण पाथ्रीकरांना भाऊ मानून ज्यांनी पाथ्रीकरांची पाठराखण केली असे किशोर पाटील, गुजरकाका, लक्ष्मण उबाळे, छबुराव पाटील, अशोक हजारे, मनोहर पांगारकर, शेख पाशू, कै. कृष्णा जायभाये, रमेश चव्हाण.

प्रतिस्पर्धी असूनही या यशाकरिता सकारात्मक भूमिका पार पाडणारे कै.

नाना बापट, बाबुराव अतकरे, कन्हैयालाल सिद्ध, मधू बक्षी, मधू कदम, कैलास माने, प्रा. बापूराव जगताप, प्रा. विठ्ठल मोरे, प्रा. पंडित मुंडे यांचा नामोल्लेख करणे अनिवार्य आहे.

मी शब्दाशी खेळू शकतो. शब्दाशी खेळण्याचं भान मला ज्यांनी दिलं आणि मला लिहितं केलं ते माझे चाहते कै. बंकट पाटील, कै. मुरलीधर गवळी, प्राचार्य गजमल माळी, विद्याभाऊ सदावर्ते, राम सोनवणे, प्रा. डॉ. दादा गोरे, प्रा. प्रभाकर म्हारोळकर, महावीर जोंधळे, चक्रधर दळवी व अरविंद वैद्य यांना विसरणं मला शक्य नाही.

माझ्या विचाराला मी शब्दांत व्यक्त केलं. माझे हे विचार जनतेपर्यंत पोहोचविण्याचं सत्कार्य दै. अजिंठा, दै. मराठवाडा, सा. कालचक्र, दै. लोकमत, दै. सकाळ यांनी केलं.

'व्यक्तीची यशस्विता तिच्या अवतीभोवती असलेल्या मित्रांवर अवलंबून असते' असं एके ठिकाणी यशस्वितेबद्दल साहेबांनी आपलं मत व्यक्त केलेलं आहे.

शामरावजी अष्टेकर (माजी मंत्री), आ. एम. एम. शेख, प्रा. डॉ. जी. टी. देगावकर, प्रा. डॉ. विजय देशमुख, प्रा. झारगड मामा, प्रा. वसंत पुजारी, डॉ. एम. डी. जहागीरदार, प्राचार्य सखाराम बागल, प्राचार्य आत्माराम टेंगसे, प्राचार्य डॉ. बाबुराव सोळुंके, प्राचार्य डॉ. हिंमतराव नरके, प्रा. एस. आर. बनसोडे, प्राचार्य तिलावत अली, प्रा. डॉ. बी. डी. सुडे, प्रा. डॉ. के. वाय दौड, मा. माधवराव बोरडे, मा. एस. आर. काळे, प्राचार्य सुंदरराव पवार, प्राचार्य भागवत कटारे, प्राचार्य कुरणकर डी. बीं., प्रा. अशोक तेजनकर, प्रा. शुजाद काद्री, प्राचार्य रामेश्वर पवार, कै. प्रा. ओमप्रकाश शिंदे, प्रा. डॉ. संजय गायकवाड, प्रा. डॉ. नामदेव आहेर, अण्णासाहेब जगदाळे, कै. रामपालभाऊ बलदवा, भाऊसाहेब निकम यांची संगत लाभली.

कै. बाबुरावजी काळे (माजी मंत्री) हे गुणपारखी नेते होते. कै. बाबुरावजी ऊर्फ अप्पासाहेब काळे यांनी माझी मुलाखत न घेता पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात माझी अधिव्याख्याता म्हणून नेमणूक केली. मी हे पुस्तक लिहीत असताना मला संदर्भाच्या बाबतीत ज्या अडचणी आल्या त्या प्रभारी प्राचार्य शिवाजी अंभोरे आणि यू. आर. काळे यांनी प्रा. बनसोडे व प्रा. बिरुटे यांचे मार्गदर्शन घेऊन सोडविल्या.

रामसेतू बांधताना खारीनं जी भूमिका पार पाडली तशीच भूमिका यशाचं

शिखर गाठताना विठ्ठल पाथ्रीकर, के. एल. पाथ्रीकर, के. एन. पाथ्रीकर, किशोर पाथ्रीकर, जयराज पाथ्रीकर, दामोदर पाथ्रीकर, डॉ. कैलास पाथ्रीकर, के. बी. पाथ्रीकर यांनी पार पाडली.

माझ्या या लिखाणाचे पहिले वाचक होण्याचा मान प्रा. डॉ. शरद व्यवहारे आणि सोमनाथ आहेर यांना मिळाला. माझं हे लिखाण वाचण्यायोग्य करण्याचं काम जगन्नाथ भोसले यांनी केलं. कुंडलिक अतकरे यांच्या यशवंतरावांप्रती असलेल्या निष्ठेचं फळ म्हणजे या पुस्तकाचं प्रकाशन.

माजी खासदार श्रीनिवास पाटील हे कराडचे खासदार. त्यांची प्रस्तावना या पुस्तकाला मिळाली. यशस्वी प्रशासक, प्रभावी खासदार म्हणून त्यांनी साहेबांच्या विचाराची पाठराखण केली आहे

मा. विनायकराव पाटील (माजी मंत्री) यांनी या पुस्तकाविषयी आपल्या भावना लिहून आम्हास उपकृत केले. मा. विनायकराव पाटील साहित्याचे वारकरी तर आहेच, त्यासोबतच यशवंतरावांच्या आणि त्यांच्या विचारांची नाळ एक आहे.

मा. चेतन चव्हाण (साहेबांचे नातू) व मोहनराव डकरे यांचे या कामी सहकार्य लाभले.

माझ्या कुटुंबाबद्दल लिहिलेच पाहिजे असं काही नाही. कारण निवृत्त झाल्यानंतर मी हे पुस्तक लिहिलं. गेले दीड वर्ष माझ्या स्वतंत्र खोलीत हा संकल्प मी पूर्ण केला. त्यामुळे माझा त्यांना व त्यांचा मला उपद्रव झाला नाही. गेल्या तेहतीस वर्षांत माझी अवेळ हीच वेळ सौ. कल्पना पाथ्रीकर हिच्या अंगवळणी पडल्यामुळे तिच्यासह घरातील सर्वांनी मला समजावून घेतलं. मुले राजेंद्र व समीर पाथ्रीकर तसेच अनिल साखरे यांनी वेळी-अवेळी या पुस्तकाच्या संदर्भात सांगितलेली कामं आज्ञाधारकपणे पार पाडली. तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधी चि. विराज व कु. हर्षदा पाथ्रीकर यांनी कसलाच त्रास दिला नाही. ज्या पुस्तकांचा मी आधार घेतला ती पुस्तकं या लिखाणाचा पाया आहेत.

शेवटी हे शिवधनुष्य पेलण्याची ताकद थोरले साहेब यांच्या ध्येयधोरणामुळे माझ्यात निर्माण झाली. केवळ साहेबांमुळे आणि साहेबांच्या ध्येयधोरणाकरिता माझं हे शब्दशिल्प साकारलं.

दि. १८-७-२०१० प्रा. डॉ. विजय पाथ्रीकर

# थोरल्या साहेबांविषयी दोन शब्द

यशवंतराव चव्हाण यांनी स्वत: लिहिलेल्या, इतरांनी चव्हाण साहेबांविषयी लिहिलेल्या व त्यांच्या भाषणांचे संग्रह असे बरेच साहित्य सध्या उपलब्ध आहे. यातील काही मराठी तर काही इंग्रजी भाषेत आहे. प्रा. विजय पाथ्रीकरांच्या 'थोरले साहेब' या कादंबरीने चव्हाण साहित्यात मोलाची भर पडली आहे.

या कादंबरीच्या सूत्रधार वेणुताई आहेत. वेणुताई १९४२ साली विवाहानंतर चव्हाण कुटुंबीयांत कराडला दाखल झाल्या. वेणुताईंचा मृत्यू १९८३ साली दिल्ली येथे झाला. हा सर्व काळ त्या साहेबांची सावली बनून राहिल्या. ४१ वर्षांचा काळ म्हणजे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर असा आहे. कराड ते दिल्ली व्हाया मुंबई असा चव्हाण कुटुंबीयांचा राजकीय प्रवास आहे. चव्हाण साहेबांच्या भाषेत सांगायचे झाले तर कृष्णाकाठ, सागरतीर ते यमुनाकाठ असा हा प्रवास आहे. स्वातंत्र्यसंग्राम ते सत्ता व्हाया तुरुंगवास अशी ही सफर आहे. टोकाच्या गरिबीपासून ते उपपंतप्रधानपद अशी ही सफर आहे. नुसते कराड मतदारसंघाचे आमदार, नंतर पार्लमेंटरी सेक्रेटरी, मंत्री, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, उपपंतप्रधान असा प्रवास नाही तर महाराष्ट्र राज्य निर्मितीचा मंगल कलश आणणारे मुख्यमंत्री अन् एका अर्थाने महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार! या सगळ्या घटनांकडे इतिहास एका नजरेने पाहतो, पत्रकारिता एका नजरेने.पाहते, चव्हाण साहेबांचे सहकारी एका नजरेने पाहतात तर साहेबांचे विरोधक एका नजरेने पाहतात. सरकारी दफ्तरातल्या नोंदीही या घटनांची नोंद घेत असतात. या सर्व बाबी लिखित स्वरूपात वेगवेगळया रूपाने अभ्यासक व जिज्ञासूंपुढे आलेल्या आहेत. दहा दिशांना पसरलेल्या या माहितीला एक अकरावी दिशा आहे. यशवंतरावांच्या कुटुंबातून दिसणाऱ्या या घटनांची ती दिशा वेणुताईंच्या नजरेतून प्रा. डॉ. विजय पाथ्रीकरांनी पाहण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. हे अवघड काम असले तरी लेखकाला ते साध्य झाले आहे.

घटना-घटनाक्रम काटेकोर मांडले आहेत. वेणुताईंच्या मनात त्या वेळी काय आले असेल, त्यांनी त्याप्रसंगी काय कृती केली असेल याचे यथार्थ, प्रभावी व रसाळ वर्णन प्रा.डॉ. विजय पाथ्रीकरांनी केले आहे. यासाठी त्यांनी

प्रचंड परिश्रम घेतले आहेत याची जाणीव वाचताना सतत होत राहते. थोरांच्या कौटुंबिक जीवनाविषयी सामान्यांना जिज्ञासा असते. महाराष्ट्राच्या या जाणत्या राजाच्या कौटुंबिक आयुष्याबद्दल ती आहेच. ती जिज्ञासा या लिखाणामुळे पूर्ण होते. 'थोरल्या साहेबां'च्या निमित्ताने वेणुताईंच्या नजरेतून महाराष्ट्राचा जो राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व पक्षीय राजकारणाचा इतिहास नजरेसमोर येतो तो सध्याच्या पिढीला उद्‌बोधक ठरेल.

इतिहासाच्या चौकटी न मोडता घटनांशी इमान राखून लिहिलेल्या या रसाळ कादंबरीबद्दल प्रा. डॉ. विजय पाथ्रीकरांचे उभा महाराष्ट्र अभिनंदन आहे.


विनायक पाटील

(माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य)

कदंबवन, नाशिक-४२२ ०१२

# प्रस्तावना

'थोरले साहेब' हे पुस्तक लिहून शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. डॉ. विजय पाथ्रीकरांनी महाराष्ट्रातील साहित्यक्षेत्रात मोलाची भर घातली आहे. देवराष्ट्रे, कराड, मुंबई व दिल्ली हा स्व. यशवंतरावजींच्या जीवनाचा घटनाक्रम त्यांनी अतिशय परिणामकारक आणि इतिहासाशी प्रामाणिक राहून लिहिला आहे. 'कृष्णाकाठ' हे साहेबांचे आत्मचरित्र. यात मुंबईपर्यंतचा घटनाक्रम आहे. त्यांचे 'सागरतट', 'यमुनातीर' लिहायचे राहून गेले. प्रा. डॉ. विजय पाथ्रीकरांनी ते काम पूर्ण केले आहे. स्व. यशवंतरावजींच्या जीवनातील सर्व घटनाक्रम सौ. वेणुताईंच्या मुखातून वदविताना लेखकांनी कमालीची सावधानता बाळगली आहे. विधानसभेची पहिली निवडणूक (१९४६) जिंकल्यावर साहेब वेणुताईंना म्हणाले, 'यशाची खरी मानकरी तूच आहेस.' त्यावर सौ. वैणुताई लगेच म्हणाल्या, 'यशाची अशी वाटणी करायची नसते.' सौ. वेणुताईंच्या मुखातून स्व. यशवंतरावांच्या आयुष्यभराचा संपूर्ण आढावाच लेखकांनी घेतला आहे.

यात 'देवराष्ट्रे' हे साहेबांचे आजोळ, कुलदैवत सागरोबा, मामा दाजीबा घाटगे अशी सर्वसाधारण खाऊनपिऊन सुखी कुटुंबाची माहिती आहे. वडील बळवंतरावांच्या लाघवी बोलण्यातून विट्याच्या न्यायाधीशांनी त्यांना बेलीफची नोकरी दिली. प्रपंच थोडाफार सुराला लागला; परंतु प्लेगच्या साथीने त्यांचा बळी घेतला. चिता बळवंतरावांना जाळून गेली; परंतु विठाईमातेला चिंता जिवंतपणी जाळू लागली. मात्र त्यांच्यात कमालीचा आत्मविश्वास होता, सागरोबावर श्रद्धा होती व शिक्षण ही एक शक्ती आहे यचा त्यांना विश्वास होता. 'नका बाळानू डगमगू, चंद्र-सूर्यावरील जाईल ढगू' असं म्हणून बळवंतरावांच्या मृत्यूनंतर त्यांच्या हितचिंतक मित्रामार्फत सातारच्या जिल्हा न्यायाधीशांना प्रत्यक्ष भेटून मोठा मुलगा ज्ञानोबाला कराड कोर्टात बेलीफची नोकरी मिळवून दिली. आपला भाऊ दाजीबा घाटग्याची मुलगी सून म्हणून विठामातेने करून आणली. त्यांच्या संसारातल्या बारीकसारीक घटनांचा समावेश लेखकाने मोठ्या कौशल्याने या पुस्तकात केला आहे.

स्व. यशवंतरावांचे मधले भाऊ गणपतराव हे सत्यशोधक समाजाचे पक्के समर्थक आणि पहिलवानी थाटाचे रुबाबदार व्यक्तिमत्त्व होते. यशवंतरावांवर त्यांचे निस्सीम प्रेम होते. त्यांच्या बुद्धिमत्तेवर त्यांचा विश्वास होता. पुढे 'मी यशवंतराव होणार' हे वाक्य साहेबांनी खरेच करून दाखवले. शालेय शिक्षण घेत असतानाच यतिंद्रनाथांच्या बलिदानाने त्यांना स्वातंत्र्य चळवळीत खेचून आणलं. एक निर्भय-संयमी विचारवंत, लढाऊ वृत्तीचा स्वातंत्र्यसैनिक म्हणून त्यांची ख्याती झाली. बंधू गणपतराव आणि बाळबुवा मठातले कळंबे गुरुजी यांच्या सत्यशोधक समाजातील कार्याने समाजाला दिशा दिली. यशवंतरावांचा फार मोठा मित्रपरिवार होता. या पुस्तकात अनेक मित्रांचा उल्लेख आला आहे. लेखकमहोदय यातीलच कुणी असावेत असे वाटावे इतका तंतोतंत वृत्तांत या पुस्तकात आला आहे.

टिळक हायस्कूलमध्ये शिक्षण घेत असतानाच त्यांना राष्ट्रीय झेंडा फडकावल्याबद्दल १८ महिन्यांची शिक्षा झाली आणि येरवडा जेलमध्ये पाठविण्यात आले. येरवडा जेल म्हणजे साहेबांच्या बाबतीत 'येरवडा विद्यापीठ' झाले. या जेलमधील कैदी-बंदिवान म्हणजे स्वातंत्र्याच्या तेजस्वी ज्योती होत्या. 'एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या न्यायाने ह. रा. महाजनी, आचार्य भागवत, साथी एस. एम. जोशी, रावसाहेब पटवर्धन आदी महापुरुषांनी समाजातल्या व महाराष्ट्रातून आलेल्या बुद्धिवंत कार्यकर्त्यांना शिक्षण दिले. याचे फार मोठे प्रभावी वर्णन पुस्तकात आले आहे.

'पुनश्च हरिओम' या आचार्य भागवतांच्या उपदेशानुसार पुन्हा शाळेत प्रवेश घेऊन साहेब मॅट्रिक झाले. गणपतरावांच्या इच्छेनुसार एलएल. बी. केली; परंतु स्वातंत्र्य चळवळीशी संबंध कायम ठेवला. प्रस्थापित धनवान अशा सरकारधार्जिण्या कूपरशाहीविरुद्ध लढा पुकारून या देशाचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडून आत्माराम बापूंना तिकीट मिळविले. ही असामान्य बाब होती. हे सर्व पुस्तकच क्रांतिवीरांच्या कामगिरीचा चैतन्यमय इतिहास आहे.

स्व. यशवंतरावजी द्विभाषिकांचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी फार मोठ्या कौशल्याने कॉंग्रेस श्रेष्ठींचे मत महाराष्ट्राला हितकारक करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. हिमालयावर संकट आले त्यावेळी स्व. यशवंतराव संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला धावून गेले. नेहरूंच्या हाकेला होकार देताना सौ. वेणुताईंचा

होकार चव्हाण साहेबांनी मिळवला. दिल्लीचे राजकारण बिनभरवशाचे आहे असे समजून काँग्रेस श्रेष्ठी व मान्यवर विरोधी पक्षनेते, महान उद्योगपती, पत्रकार, लेखक व विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींच्या वर्तुळात आपले स्वतंत्र स्थान निर्माण करण्याचे महान कार्य स्व. यशवंतरावांनीच केले. सौ. वेणुताईंचा सल्ला वेळोवेळी चव्हाण साहेब घेत असत. केंद्रीय मंत्री म्हणून देशाटन केल्यानंतर साहेबांची आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी पणाला लागली. 'घार हिंडते आकाशी, चित्त तिचे पिलापाशी' या उक्तीप्रमाणे परदेशातही कै. चव्हाण साहेबांनी सौ. वेणुताईंची ज्यावेळी आठवण येत असे त्यावेळी ते पत्ररूपाने स्वत:चे मनोगत त्यांना कळवत असत. ती पत्रे मराठी साहित्याचा नमुना आहेत. जागतिक स्तरावरील महान मुत्सद्यांत त्यांची गणना होऊ लागली. यशवंतराव हे सौ. वेणुताईंना कधीही विसरू शकले नाहीत. एवढे मोठे प्रतिभासंपन्न, महाराष्ट्र भूषण, महाराष्ट्राचे शिल्पकार, राजकीय स्तरावरील मुत्सद्दी, परदेशातही आपली वेगळी प्रतिमा उमटविणारे स्व. यशवंतरावजी सौ. वेणुताईंच्या मृत्यूने खचले. ते सैरभैर झाले. प्रा. डॉ. विजय पाध्रीकरांनी सौ. वेणुताईंच्या मुखातून स्व. यशवंतरावजींचा जीवनवृत्तांत कुशलतेने सांगितला आहे.

मराठी साहित्यसंपदेत मोलाची भर प्रा. डॉ. विजय पाध्रीकरांनी घातली त्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद.

**कराड**
११ सप्टेंबर २०१०
गणेश चतुर्थी

**आपला**
श्रीनिवास पाटील
आय.ए.एस. (निवृत्त)
माजी खासदार, कराड लोकसभा मतदारसंघ
विश्वस्त, सौ. वेणुताई चव्हाण प्रतिष्ठान
चॅरिटेबल ट्रस्ट, कराड

# सोनहिरा

१९४६ चा मार्च महिना. चव्हाण घराण्यात इतिहासाने नोंद घ्यावी अशी घटना घडली. कराड विधानसभेची निवडणूक साहेबांनी जिंकली. कार्यकर्त्यांचा जल्लोष, गावकऱ्यांचा आनंद शिगेला पोहोचलेला. घरापर्यंत येण्यास साहेबांना उशीर होऊ लागला. माझं मन सैरावैरा धावू लागलं. कधी साहेबांना ओवाळते आणि त्यांच्या आनंदात सहभागी होते असं झालं मला. एकदाचे साहेब घरासमोर आले. प्रथम आई व बंधूच्या पायाला स्पर्श करून त्यांचं दर्शन घेतलं. अनेक महिलांनी साहेबांना ओवाळलं. तशी मीही ओवाळण्यासाठी पुढं आले. ओवाळते वेळी माझी आणि साहेबांची नजरानजर झाली. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव माझ्या मनात प्रवेशकरते झाले. साहेबांच्या हृदयातून निघालेले बोल माझ्या कानी पडले.

बोल होते - "यशाची खरी मानकरी तूच आहेस."

या वाक्यानं माझ्या काळजाचा ठाव गाठला. माझ्यावर झालेल्या संस्कारांचा सन्मान साहेबांनी केल्याची जाणीव क्षणभर मला झाली.

लगेच मी म्हणाले, "अशी वाटणी करायची नसते."

माझे वडील कै. रघुनाथराव मोरे हे मूळचे फलटणचे. आम्ही मुंबईला राहत असू. वडील बडोदे राजघराण्याच्या खाजगी खात्यामध्ये महत्त्वाचे गृहस्थ. वडिलांची फलटण येथे उत्तम शेती व घर. घरंदाज संस्कार आमच्यावर व्हावेत म्हणून आम्हाला वर्षातून दोन-तीन महिने फलटण येथे राहावे लागे. माझ्या वडलांचे दोन विवाह. पहिली पत्नी वारल्यानंतर त्यांनी दुसरा विवाह केला. पहिल्या पत्नीला दोन कन्या - सोनूबाई व तानूबाई. दुसरी पत्नी माझी आई - लक्ष्मीबाई. मी, चंद्रिका व धाकटा भाऊ बाबासाहेब लक्ष्मीबाईंची अपत्ये. माझा जन्म फलटण येथे २ फेब्रुवारी १९२६ ला झाला. मातापित्याचं छत्र हरपल्यानंतर माझी बहीण सोनूबाईचे यजमान नामदेवराव धस यांनी आमच्या पालकत्वाची भूमिका पार पाडली.

साहेब मला पाहण्यासाठी सातारला आमच्या नातेवाइकाच्या घरी आले. मला पाहण्याचा सोपस्कार रीतिरिवाजाप्रमाणं पार पडला. "वकील असलो तरी प्रथम मी स्वातंत्र्य चळवळीचा कार्यकर्ता आहे. मिळकत म्हणाल तर जेमतेम. एकत्र कुटुंब. आई देवभोळी. तिला समजावून घेणारी घरंदाज सून हवीय." असं त्या वेळी साहेब म्हणाल्याचे मला आजही आठवते. साहेब हे बोलत असताना मी टक लावून त्यांना बघून घेतलं. साहेबांनी मला काही प्रश्न विचारले. मला जसं सुचलं तशी मी उत्तरं दिली. त्यांच्या चेहऱ्याकडे पुन्हा एकदा न्याहाळून बघितलं. त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसले. पाहण्याचा कार्यक्रम संपला. आमच्या घरात चर्चा सुरू झाली. मुलगा स्वातंत्र्य चळवळीतील, घरी जमीनजुमला काही नाही, शिक्षण हे एकमेव भांडवल. घरात ही चर्चा चालू असतानाच कराडहून मुलगी पसंत असल्याचा निरोप आला. माझ्या पसंतीचा प्रश्न नव्हता. त्या काळी मुलीचं मत विचारण्याची रीतच नव्हती. लग्न कराडला करावं लागेल, अशी गळ चव्हाण घराण्याकडून घालण्यात आली. माझं लग्न २ जून १९४२ ला करायचं निश्चित झालं. सर्वसामान्याच्या घरातील लगीनघाई मोऱ्यांच्या घरात सुरू झाली. कराड येथे मराठा बोर्डिंगच्या आवारात यशवंतरावांच्या कीर्तीला साजेल अशा भव्य स्वरूपात विवाह पार पडला. नामदेवराव धस यांनी कन्यादान केलं.

सौभाग्य हा दागिना व संसार हा धर्म मानून मोऱ्यांची लेक मी-वेणू २ जून १९४२ ला चव्हाण घराण्याची सून झाले. संसारसुखाची स्वप्नं

सोबत घेऊन चव्हाण कुटुंबाची झाले. माणुसकी आणि माणसानं भरलेलं घर मला मिळालं. घरात आर्थिक श्रीमंती नाही; पण मनाची श्रीमंती ओथंबून वाहते. साहेबांच्या आईच्या रूपानं मला माझी आईच मिळाल्याचं भाग्य लाभलं. घरातील सर्व कामं उरकून फुरसत मिळाल्यानंतर आई आपल्या संसाराच्या गत आठवणीत रमायच्या. संसार करता करता जीवाची झालेली हेळसांड, साहेबांच्या जडणघडणीतील घटनाप्रसंग सांगायच्या.... साहेबांच्या आईचं माहेर देवराष्ट्र. शके २३० ते ४४० या काळात महाराष्ट्रात अनेक लहान-मोठी राज्ये आणि राजे उदयाला आले. देवराष्ट्राचं राज्य हे त्यापैकीच एक. देवराष्ट्र शके ४७८ मध्ये चालुक्याच्या अधिपत्याखाली आलं. पुढे थोड्याच काळात नामशेषही झालं. आज एका खेड्याच्या रूपानं तग धरून उभं आहे हे देवराष्ट्र. या ऐतिहासिक वारसा असलेल्या गावी साहेबांच्या मातोश्रींचा जन्म घाटगे घराण्यात झाला. या घराण्यातील दाजीबा घाटगे आईचे बंधू. खाऊनपिऊन सुखी. शेतकऱ्याच्या जीवनातील हालअपेष्टा याही घराण्यात होत्याच.

दाजीबा घाटगेची बहीण विठाबाई ढवळेश्वरच्या चव्हाण कुटुंबात दिली. ढवळेश्वर खानापूर तालुक्यात छोटंसं खेडं. ढवळेश्वरातील मानमरातब असलेलं हे कुटुंब. गावातील एका शेतकऱ्याच्या कर्जाला जामीन राहिलं. कर्जदाराकडून अथवा सावकाराकडून दगाफटका झाला असावा. या कुटुंबाची जमीन सावकाराच्या घशात गेली. भूमिहीन कुटुंब पोट भरण्यासाठी भटकंती करीत ढवळेश्वराच्या जवळच असलेल्या विटे या गावी स्थिरावलं. काबाडकष्ट करून पोट भरण्यास पुरेल एवढी जमीन विकत घेतली. त्यावर या कुटुंबाची गुजराण होऊ लागली. साहेबांचे पणजोबा राणोजी चव्हाण यांचे वडील किंवा आजोबाच्या काळात ही घटना घडली असावी. वाघोजी चव्हाण साहेबांचे आजोबा. वाघोजी चव्हाण यांना दोन पुत्र. एक रामचंद्र चव्हाण व दुसरे बळवंतराव चव्हाण. थोरले चार पुस्तकं शिकल्याने शेती सोडून बेलिफ म्हणून सरकारी नोकरी करू लागले. धाकले बळवंतराव विट्याला शेती करू लागले. हेच बळवंतराव साहेबांचे वडील, आईचे पती अन् माझे सासरे...

माझे सासरे खूप मेहनती. त्यांची सहचारिणी विठाआई. जसा विठ्ठल-रुक्मिणीचा जोडा. यांचा संसार बालगोपाळांनी बहरलेला. साहेबांना दोन

वडीलबंधू. ज्ञानोबा व गणपतराव. एक भगिनी - राधाअक्का-माझी नणंद. मला दोन जावा. जावा कसल्या? त्या माझ्या थोरल्या भगिनीच...

घरात कसलीच कुरबूर नाही की धुसफूस नाही... गरिबी हा सर्वांना एकत्र बांधून ठेवणारा समान धागा. माझे सासरे अहोरात्र कष्ट उपसायचे. आहे त्या शेतीव्यतिरिक्त दुसऱ्याकडेही काम करायचे. आई त्यांच्या कष्टात सहभागी व्हायच्या. घरातील सुनांनीदेखील आपल्या माहेरचा तोरा कधी मिरवला नाही. आपापल्या परीनं कुटुंबाला सावरण्याचा प्रयत्न त्या करीत असत. जिद्द, चारित्र्य, संस्कार या त्रिवेणी संगमावर आईचा संसार बहरलेला. आईच्या जीवनात अनेक संकटं आली; परंतु आई डगमगल्या नाहीत.

आई मुलांना सांगायच्या, "अरे, संकटं ही ढगासारखी येतात आणि निघून जातात. आपण धीर सोडायचा नसतो."

आईच्या संसारात संकटांची उतरंड कमी होण्याऐवजी वाढत जायची तरीही आई निभावून न्यायच्या. असंच एक संकट आईच्या जीवावर बेतलं अन् तेही साहेबांच्या जन्माच्या वेळी.

आईची यापूर्वीची बाळंतपणं सुखरूप झालेली. याही वेळी बाळंतपणाला आई माहेरी - देवराष्ट्राला आल्या. गोधुळीची वेळ झालेली. देवराष्ट्राच्या पारावर गावातील कारभाऱ्यांचा फड जमलेला. दिवेलागणीची वेळ झाली तरीही दाजीबा घाटगे पारावर आले नाहीत. कारभाऱ्यांत कुजबूज सुरू झाली. 'भजनाच्या वेळेला येतील' असे गृहित धरून फड उठला. देवराष्ट्रात रात्रीच्या वेळी नियमित भजन होत असे. जेवूनखाऊन भंजनीमंडळी देवळात आली तरीही दाजीबा घाटगे आले नाहीत.

इकडे दाजीबा घाटगे यांच्या वाड्यात वेगळीच चिंता पसरली होती. दाजीबा घाटगे चिंतातुर अवस्थेत वाड्यासमोरील ओट्यावर एकटेच बसलेत. घरात विठाईअक्काच्या जीवाची तगमग सुरू झाली. आडवळणी गाव... गावात कुठल्याच वैद्यकीय सुविधा नाहीत... अनुभवाच्या जोरावर गावातील वयस्कर चार-दोन सुईणी जमलेल्या...त्यांनी आपल्या अनुभवातील सर्व कसब पणाला लावलेले; पण त्यांच्या उपायांना यश येण्याची चिन्हे दिसेनात. इकडे विठाईचा जीव खालीवर होऊ लागला. सर्व आयाबहिणी चिंतेत पडल्या. त्यांना काय करावं काही सुचेना. जेवणवेळ टळून गेली. विठाईच्या जीवघेण्या यातनांनी कहर केला. त्यातच विठाईची शुद्ध हरपली.

माणसाचे प्रयत्न तोकडे पडले की, प्रत्येक माणूस नाइलाजाने का होईना देवाला शरण जातोच. विठाईअक्काची आई मोठी धिराची बाई... त्यांचा गावातील कुलदैवतावर भरवसा. सागरोबा हे घाटग्यांचे कुलदैवत. विठाईअक्काच्या आईनं सागरोबाचा धावा केला, मनोमन नवस बोलल्या. विठाईअक्कावरील संकट टळलं. घाटगे घराण्यात भाचा जन्माला आला. चव्हाण घराण्याचा यशोदीप, सर्वहरा वर्गाचा तारणहार यशवंत दि. १२ मार्च १९१३ ला जन्मला. दाजीबा घाटगे यांनी देवळातील भजनीमंडळीचं गूळ वाटून तोंड गोड केलं.

बळवंतराव विट्यालाच होते. पुत्र जन्माला आल्याचा निरोप मिळाला. आनंद तर झालाच; पण सोबत चिंताही वाढली. आतापर्यंत पाच जणांच्या कुटुंबाची हातातोंडाची गाठ पडण्यासाठी रात्रीचे दिवस करून कष्ट उपसावे लागत. त्यात आणखी एका तोंडाची भर पडली. शेतकऱ्यांचं जीवन म्हणजे तव्यावरची भाकरी. आधी चटके अन् मग मिळते भाकरी. अति अल्प शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना बैलजोडी ठेवणं परवडत नसतं. बळवंतरावांच्या गोठ्यात एक बैल. ते एक बैल असणाऱ्या भाऊबंदासोबत सायड करून शेती करत असत. दररोजच्या तेलामिठाची गरज भागविण्यासाठी शेतीव्यतिरिक्त एखादं दुभतं जनावर आपल्या गोठ्यात असावं, अस बळवंतरावांना वाटलं. पोटाला चिमटा देऊन त्यांनी एका दुभत्या जनावराची तजवीज केली. एक बैल व एक दुभतं जनावर बळवंतरावांच्या दावणीला आलं.

बळवंतरावांच्या संसाराची ओढाताण चालूच होती. योगायोगानं विट्यातील एका जज्ज साहेबांच्या घरी दूध घालण्याचं काम त्यांना मिळालं. त्यातून दररोजच्या खर्चाचा प्रश्न सुटला. रतिबाच्या निमित्तानं जज्ज साहेबांच्या घरी येणंजाणं वाढलं. पुढे बळवंतराव आणि जज्ज साहेबांचा स्नेह वाढला. जज्ज साहेबांना बळवंतरावांच्या काबाडकष्टाची कल्पना आली. बळवंतरावांसाठी काहीतरी करावं असा विचार त्यांच्या डोक्यात घोळू लागला.

जज्ज साहेबांना भेटून आपल्याला ते काही काम देऊ शकतात का ते विचारून पाहावं, असं एक दिवस बळवंतरावांनी ठरवलं. रोज दूध घातल्यानंतर लगेच घराबाहेर पडणारे बळवंतराव आज थोडे घुटमळले. काहीही न बोलता थोडा वेळ उभे राहिले. जज्ज साहेबांनी बळवंतरावांच्या मनाची घालमेल ओळखली नि बळवंतरावांना विचारलं,

"बोला बळवंतराव, काही काम होतं का माझ्याकडं?"

"होय साहेब."

"काय काम होतं?"

बळवंतराव थोडं थांबून म्हणाले, "मला नोकरी दिली तर माझ्या कष्टाला आधार मिळेल."

"बघतो" एवढेच जज्ज साहेब म्हणाले.

बळवंतराव घराबाहेर पडले. यांना नोकरी कुठली द्यायची याबद्दल जज्ज साहेब विचार करू लागले. बळवंतरावांना लिहिता-वाचता तर येत नाही... जज्ज साहेबांच्या प्रयत्नाला यश आलं. बळवंतराव बेलिफ झाले. बळवंतरावांना जज्ज साहेबांनी न्याय दिला.

बळवंतराव न्यायालयात बेलिफ म्हणून रुजू झाले. नोकरीचा पगार आणि शेतीतील तुटपुंजं उत्पन्न यावर सुखाची भाकरी मिळू लागली. सहा जणांचं कुटुंब गोडीगुलाबीनं नांदू लागलं. सुखाचे दिवस बळवंतरावांच्या नशिबी नसावे किंवा नियतीला हे सुख पाहवत नसावं. साहेबांच्या पाठीवर एक बहीण जन्माला आली. ती तशी आल्यापावली काही महिन्यांतच देवाघरी निघून गेली. या संकटातून चव्हाण कुटुंब सावरते न सावरते तोच बळवंतरावांची बदली कराडला झाली. पती-पत्नी विचारात पडले. काय करावे अन् काय नाही काहीच सुचेना. नोकरी सोडावी तर शेतीच्या उत्पन्नावर कुटुंबाचं भरणपोषण अशक्य अन् बदलीच्या गावी जावं तर पगारावर कुटुंबाचं पालनपोषण होणं कठीण. दोघांचा एक विचार झाला - लेकरांना सोबत घेऊन कराडला जावं. शेती भावकीच्या हवाली केली. चव्हाण कुटुंब कराडच्या मार्गी लागलं. रतीब बंद झाला.

कृष्णा-कोयनेच्या संगमावर वसलेलं कराड. बळवंतरावांनी चांगल्या वस्तीत आपलं बिऱ्हाड थाटलं. इथं विट्यापेक्षा खर्च वाढलेला होता. ओढाताण होऊ लागली. विठाई घरची कामं करून इतरांकडे कामं करू लागल्या.

खर्चाचा मेळ घालता घालता दोघेही मेटाकुटीला येऊ लागले. दिवसामागून दिवस जाऊ लागले. निसर्गनियमानुसार मुलं वाढू लागली. गरिबांनी परिस्थितीशी झुंजत झुंजत मरण येत नाही म्हणून जगायचं असतं... त्या काळी राज्यकर्त्यांचं गरिबांकडं दुर्लक्ष होतं. विट्याच्या शेतीतून

येणारी रसद कधीकधीच यायची. भावकीच्या भरवशावर सोडलेली शेती बेभरवशाची झाली. ज्ञानोबा शाळेत जाऊ लागल्यामुळे खर्चात आणखीनच भर पडली.

विठाई व बळवंतराव संसाराचा गाडा नेटानं ओढत होते. विटा येथील शेतीच्या उत्पन्नावर काढलेल्या दिवसाची आठवण आली म्हणजे बळवंतरावांसमोर अंधार पसरायचा. नोकरीच्या निमित्ताने जो संसार उजळला तो सुखकारक आहे यावर समाधान मानून बळवंतराव दिवस काढीत होते. बळवंतराव कराडला डुबल गल्लीत स्थिरस्थावर झाले. राधाअक्काच्या लग्नाचा विचार बळवंतरावांच्या डोक्यात घोळू लागला. त्यांनी एके रात्री विठाईच्या कानावर ही गोष्ट घातली.

विठाईनं विचारलं, "मुलगा बघितला का?"

बळवंतराव म्हणाले, "रामचंद्र कोतवाल हा मुलगा मला आवडला आहे."

"अहो, पण त्याच्या आईवडिलांना विचारलं का?" विठाई.

"होय, माझा एक जीवलग मित्र रहिमतुल्ला मुजावर याच्या घरासमोर कोतवाल कुटुंब राहातं. मुजावरने त्यांच्याशी बोलणी केली." बळवंतराव.

"मग एखादा चांगला मुहूर्त पाहून करू या की लग्न राधाचं." विठाई.

रहिमत मुजावरच्या साहाय्यानं रामचंद्रराव कोतवाल यांच्याशी राधाक्काचा विवाह बळवंतरावांनी पार पाडला. माझी नणंद राधाक्का कोतवाल घराण्याची सून झाली. राधाक्काला बाबुराव, दिनकर व एक मुलगी. रामचंद्रराव कोतवालांचं अकाली निधन झालं. हे कोतवाल कुटुंब चव्हाण कुटुंबाच्या आश्रयानं राहू लागलं.

१९१७ चा काळ असेल. भारतातील जनता प्लेगच्या वरवंट्याखाली भरडली जात होती. गावची गावं ओस पडली. ज्या गावात प्लेगची लागण होई त्या गावातील जनता रानोमाळी राहावयास जात असे. एक दिवस हे प्लेगचं संकट कराडला येऊन पोहोचलं. गाव खाली होऊ लागलं. विठाई-बळवंतरावांनी निर्णय घेतला. कराड सोडून विठाई लेकरांना घेऊन देवराष्ट्रला आल्या.

बळवंतरावांना नोकरीच्या निमित्तानं कराडला थांबणं अनिवार्य होतं.

बळवंतराव अधूनमधून सुटीच्या दिवशी देवराष्ट्राला जात असत. देवराष्ट्र हे लहानसं खेडं. गावातील सर्व मुलं वेशीतील पटांगणात खेळत. बळवंतराव कराडहून देवराष्ट्रला येत तेव्हा गावच्या वेशीलगत आलं की त्यांची लेकरं त्यांना येऊन बिलगत. बळवंतराव त्यांना उचलून घेत व घराकडे घेऊन जात. एक-दोन दिवस मुलाबाळांसोबत घालवीत. देवराष्ट्रहून निघताना विठाईला मुलांची काळजी घेण्याबद्दल जतावीत अन् जड पावलानं कराडला परत येत.

कराड प्लेगच्या वावटळीत सापडलेलं. चोहीकडे हाहाकार माजलेला. कुणी कुणाच्या दुःखावर फुंकर घालायची हा प्रश्न. प्लेगचा बकासुर कुटुंबेच्या कुटुंबे गिळंकृत करायचा. दुःखाला पारावार उरला नाही. जनता धास्तावलेली....उद्याचा दिवस पाहावयास मिळतो की नाही याची शंका असायची. जिवंत राहिलो म्हणून जगायचं यापलीकडे मानवाच्या हाती काहीही राहिलं नव्हतं. असंच क्षणभंगुर जीवन बळवंतराव कंठीत होते.

सवड मिळताच बळवंतराव देवराष्ट्राला जात. देवराष्ट्र तसं आडवळणाचं गाव. देवराष्ट्राला जवळचं रेल्वेस्टेशन ताकारी. एकेदिवशी बळवंतराव कराडहून रेल्वेनं ताकारीला आले. ताकारीला उतरून पायीच देवराष्ट्राला निघाले. खडतर रस्ता... रस्त्यानं चालताना त्यांचं अंग कचकच करू लागलं. थकवा जाणवू लागला. अशाही परिस्थितीत रेटून नेत त्यांनी देवराष्ट्र जवळ केलं. गावात जायला एकच रस्ता. साहेबांनी वडिलाला दुरूनच बघितलं. धुळीनं माखलेल्या साहेबांनी खेळायचं सोडून वडिलाच्या दिशेनं धूम ठोकली. नेहमीप्रमाणं वडिलांच्या पायाला घट्ट पकडलं. बळवंतरावांनी साहेबांना कडेवर घेतलं नाही. त्यांच्या हाताला धरून घराकडे चालू लागले. त्यांना एकदम अशक्तपणा जाणवू लागला. वडिलांना पाहून इतर भावंडंही जवळ आली. बळवंतरावांनी विठाईला आवाज दिला. बळवंतरावांचा आवाज खोल गेलेला. विठाईंनी मुलांना त्यांच्यापासून दूर सारलं. त्यांना प्यायला पाणी दिलं.

पाणी पिऊन झाल्यावर बळवंतराव म्हणाले, "मला थकवा जाणवतो, मी थोडा पडतो. मुलांना माझ्याजवळ येऊ देऊ नको."

विठाईनं त्यांना घोंगडी टाकून दिली. बळवंतरावांनी त्यावर अंग टाकलं. त्यांना सणसणून ताप आला. त्या वेळी ताप आला म्हटलं की

माणसाच्या काळजात चर्र व्हायचं. विठाई चिंतातुर झाल्या. त्यांनी लगेच भावाला बोलावणं पाठवलं. दाजीबा घाटगे लगेच घरी आले. साल्या-मेहुण्यांची भेटी झाली.

बळवंतराव म्हणाले, "ताकारी स्टेशनला उतरताच मला ताप आल्याची जाणीव झाली; पण मी तसाच पायी आलो."

दाजीबा घाटगे आणि विठाईला समजायचे ते समजले. बळवंतरावांनी पाच-सहा दिवस तो ताप तसाच अंगावर काढला.

विठाईअक्काच्या सौभाग्याचा घात करणारा काळ ताकारीपासूनच बळवंतरावांचा पाठलाग करीत होता. बळवंतरावांना कळून चुकलं की हा प्लेगाचच ताप आहे. लेकरं त्यांच्याजवळ जाण्यासाठी धडपडत; पण बळवंतरावांना त्यांना जवळ घेता येत नव्हतं. वडिलांचं काळीज मुलांच्या भवितव्याच्या दृष्टीनं तीळतीळ तुटत होतं. विठाईअक्काचं कशातच मन लागत नव्हतं. त्या सुन्न होऊन बसून राहत. दाजीबा घाटगे विठाईला धीर देत. बळवंतराव विठाईला जगण्याची उभारी देत. यातच पाच-सहा दिवस निघून गेले. शेवटी काळानं विठाईअक्काच्या सौभाग्यावर झडप घातलीच. देवराष्ट्राला पायी आलेले बळवंतराव सर्वांना मागे सोडून निघून गेले. पाच-सहा दिवसांपूर्वी बळवंतरावांना बिलगलेले साहेब पुन्हा वडिलांच्या कडेवर बसू शकले नाहीत. चार वर्षांच्या साहेबांचं पितृछत्र हरपलं. विठाई आणि बळवंतरावांच्या संसारगाड्याचं एक चाक निखळून पडलं. संसाराचा गाडा दु:खाच्या अंधकारात रुतून बसला.

'लाख मरावे, पण लाखाचा पोशिंदा मरू नये' असं म्हटलं जातं. चव्हाण घराण्याचा पोषणकर्ता आधारवडच उन्मळून पडला. या वादळात विठाईची सावली गेली. कुटुंब उघड्यावर पडलं. गरिबीच्या रखरखत्या उन्हात कुटुंब होरपळू लागलं. विठाईला काही सुचेनासं झालं. त्या अबोल झाल्या. ना आसरा ना आधार...आश्रय तेवढा दाजीबा घाटगेंचा... तो काही मुलांच्या जन्माला पुरणार नाही. चिता तर बळवंतरावांना जाळून गेली; पण चिंता मात्र विठाईला जिवंतपणी जाळू लागली. डोळ्यांसमोर अंधाराचं साम्राज्य. यातून कशी वाट शोधायची ही चिंता विठाईला सतावत होती. माहेर जरी खाऊनपिऊन सुखी होतं तरी आपण किती दिवस इथं राहायचं? आशेचा एकच किरण सोबत आहे तो म्हणजे थोरला ज्ञानोबा.

ज्ञानोबा सोळा-सतरा वर्षांचा. त्याला साथीला घेऊन आपल्याला पुन्हा हे घर सावरायचं, असं विठाईअक्कानं ठरवलं.

बळवंतराव जाऊन दोन-तीन महिन्यांचा काळ लोटला. विठाई आणि दाजीबा एकत्र बसले. बहीण-भावाची मुलांच्या भवितव्याविषयी चर्चा झाली. विठाईअक्कानं इथंच राहावं व ज्ञानोबा-गणपतला पुढील शिक्षणाकरिता कराडला पाठवावं, अशी दाजीबांनी विठाईची मनधरणी केली. दाजीबाचा हा निर्णय विठाईच्या मनाला पटत नव्हता. मुलांची अशी वाटणी करण्यास विठाईचं मन धजत नव्हतं. शेवटी मुलाबाळांसोबत कराडला जाण्याचा निर्णय विठाईनं घेतला. देवघरात देव नसलेल्या कराडच्या घरात जाण्याचा दिवस जवळ आला. विठाईला आपलं बालपण आठवलं. या गावानं आपल्यावर केलेली माया आठवली. या गावाला आपण आता पारखे होणार आणि गाव आपल्याला... दाजीबाच्या डोळ्यांच्या धारा खंडता खंडत नव्हत्या. मोठ्या जड अंत:करणानं दाजीबानं विठाईअक्काला निरोप दिला-वाटी लावलं. देवराष्ट्राला सौभाग्याचं लेणं घेऊन विठाई माहेरी आल्या होत्या. कराडला परतताना एकट्याच परतल्या. कराडच्या घरासमोर क्षणभर घुटमळल्या. याच घरात खऱ्या अर्थानं सौभाग्याचं संसारसुख मिळालं होतं. आता त्याच घरात मला दु:ख सहन करीत मुलांचं भवितव्य घडवायचं आहे या विचारातच विठाईनं घराचं कुलूप उघडलं.

दुसरा दिवस उजाडला. विठाईनं मोठ्या उमेदीनं कंबर कसली. सोबत ज्ञानोबा. ज्ञानोबाला कष्टाच्या कामाला धाडताना विठाईच्या मनाला यातना व्हायच्या; पण इलाज नव्हता. कष्ट उपसल्याशिवाय पोटाची आग शमनार नव्हती. ज्ञानोबा चार पुस्तकं शिकलेला. आईची संगत करून धाकट्या भावाला शिकविण्याचं त्यानं ठरवलं. गणपत शाळेत जाऊ लागला. त्याच्या शिक्षणाच्या खर्चाचं तोंड मिळवता मिळवता दोघा मायलेकरांच्या नाकीनऊ येऊ लागले. आता साहेबांचंही शाळेत जाण्याचं वय झालेलं. दोघांच्या शिक्षणाचा खर्च विठाईला झेपणं अशक्य होतं. हस्ते-परहस्ते भावाला सांगावा पाठवला. दाजीबा निरोप मिळताच कराडला पोहोचले.

कराडच्या या घरात साल्या-मेहुण्यांनी एकमेकांची केलेली चेष्टा आठवली. ते घर आज दाजीबाला खायला उठलं. सारखी बळवंतरावांची आठवण येत होती. बहीण-भाऊ, भाचे-भाची सर्वांनी सोबतच जेवणं केली.

ज्ञानोबा आत्मविश्वासाने बोलत होते, "मामा, मी काबाडकष्ट करून गणपत आणि यशवंताचं शिक्षण करू शकतो; पण आईच ऐकायला तयार नाही. सारखी म्हणते, यशवंताला शिक्षणाकरिता देवराष्ट्राला पाठवू म्हणून. मला हे पटत नाही." दाजीबाला भाच्याचा अभिमान वाटला. त्यांनी ज्ञानोबांची समजूत काढली.

म्हणाले, "ज्ञानोबा, विठाई काही वावगं बोलत नाही. भाच्याचा अधिकारच असतो मामावर. मी तर राधालाही यशवंतासोबत घेऊन जावं म्हणतो. मला काही जड होणार नाही हे दोघं. राहतील माझ्या बालगोपाळांसोबत."

यावर विठाई म्हणाली, "नाही भाऊ, राधाला राहू दे इथेच. गणपत शाळेत जातो. मी आणि ज्ञानोबा कामाला गेल्यानंतर घरी कुणीच नसतं. राधा सांभाळते घर. तिला राहू दे येथे. फक्त यशवंतालाच घेऊन जा."

दाजीबा लहानग्या साहेबांना खांद्यावर घेऊन रेल्वेस्टेशनची वाट चालू लागले. या संकटातही बहीण खंबीरपणे उभी राहिली, न डगमगता मुलांचा सांभाळ करू लागली याबद्दल दाजीबाला आपल्या बहिणीचा अभिमान वाटायचा. या विचाराच्या तंद्रीतच दाजीबा कराड रेल्वेस्टेशनवर केव्हा येऊन पोहोचले हे त्यांना कळलंही नाही. बळवंतराव कधीकधी दाजीबांना सोडण्यासाठी रेल्वेस्टेशनवर येत असत. येथील हॉटेलमध्ये चहा घेत असत. आज पहिली वेळ आहे बळवंतराव-दाजीबा सोबत नाहीत. दाजीबा साहेबांना घेऊन त्याच हॉटेलमध्ये गेले. दाजीबांनी चहा घेतला. साहेबांना खाऊ घेऊन दिला. बळवंतरावांच्या आठवणींना कराडच्या रेल्वेस्टेशनवर सोडून दाजीबा साहेबांना घेऊन रेल्वेत बसले. ताकारी रेल्वेस्टेशनवर उतरले. साहेबांना कडेवर घेतलं. ताकारीचा अवघड रस्ता चालू लागले. दाजीबांना पुन्हा बळवंतरावांची आठवण आली. सासुरवाडीला बळवंतराव यायचे ते प्रसन्न चेहऱ्याने. कधी कुणाविषयी कुरबूर नाही की तक्रार नाही. चार दिवस आनंदात सासुरवाडीचा पाहुणचार घ्यायचे आणि तृप्त मनानं कराडला परतायचे.

गाव दिसताच साहेब दाजीबाच्या खांद्यावरून खाली उतरले. रस्ता पायवटीचा असल्याने मामाच्या वाड्याकडे धूम ठोकली. मामा घरी पोहोचेपर्यंत घरातील मंडळींचे झाले.

सकाळी दाजीबा घाटगे साहेबांना सोबत घेऊन शाळेकडे निघाले. वाटेत साहेबांचे बालसवंगडी भेटले. कुठलेही आढेवेढे न घेता साहेब शाळेची वाट चालू लागले. शाळेत साहेबांचे नाव दाखल केले. शाळेतील पटावर गुरुजींनी लिहिलेली तारीख साहेबांची जन्मतारीख ठरली. १२ मार्च १९१३ ही जन्मतारीख सोबत घेऊन साहेब ज्ञानसाधनेच्या वाटेनं निघाले.

विठाई ज्ञानोबांना रोजंदारीच्या कामावर घेऊन जाऊ लागल्या. ज्ञानोबांचं कोवळं वय. कोवळ्या वयात ज्ञानोबांना कष्टाची कामं करावी लागत. या कष्टाच्या कामातून ज्ञानोबांची सुटका कशी करावी हा एकच विचार विठाईला भंडावून सोडत असे. आपलं दु:ख मनाला व आनंद जगाला सांगावा या विचारानं विठाई जीवन जगत होती. सल्लामसलत करावी असं जवळचं कुणीच नाही. आजूबाजूला सर्व तालेवार मराठ्यांची घरं. सत्तेशी लांगूलचालन करून, मिळतंजुळतं घेऊन आपलं मोठेपण मिरवीत. गरिबांची पिळवणूक करण्यात धन्यता मानीत. विठाईला कुठून प्रेरणा मिळाली माहीत नाही. बळवंतरावाच्या जागेवर थोरल्या ज्ञानोबाला नोकरीला लावण्याचं विठाईनं मनावर घेतलं. ज्ञानोबांचे वडील ज्या न्यायाधीशाकडे नोकरी करीत त्यांना भेटण्याचं विठाईनं ठरवलं. कामाच्या रगाड्यातून वेळ काढून विठाई न्यायाधीश साहेबांना भेटल्या. पितृछत्र हरपल्यानंतर मुलांची होणारी आबाळ न्यायाधीशांसमोर मांडली. बळवंतरावांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबाची होणारी कुचंबणा न्यायाधीश साहेबांच्या लक्षात आली. त्यांनी विठाईला मार्ग दाखवला.

विठाई मोठी हिमतीची बाई. त्यांनी मनाचा निश्चय केला. आपल्या कच्च्याबच्च्या पिलांना सोबत घेऊन सातारला जाण्याचं ठरविलं. कराड ते कोरेगाव रेल्वेनं आणि कोरेगाव ते सातारा छकड्यानं प्रवास करून त्या सातारच्या जिल्हा न्यायालयात हजर झाल्या. जिल्हा न्यायाधीशांना भेटण्याचा प्रयत्न करू लागल्या. योगायोग असा की, त्यादिवशी कराडचे न्यायाधीश सातारच्या न्यायालयात हजर होते. त्यांची आणि विठाईची भेट झाली. विठाई मुलाबाळांसह आल्यानं त्याचा चांगला परिणाम न्यायाधीश साहेबांवर होईल असं कराडच्या न्यायाधीशांना वाटलं. त्यांनी थोडा प्रयत्न करून विठाई आणि जिल्हा न्यायाधीश साहेबांची भेट घालून दिली. विठाईनं आपल्यावर कोसळलेल्या संकटानं कुटुंबाची धूळधाण केली याचं चित्र

जिल्हा न्यायाधीश साहेबांसमोर उभं केलं. मुलांची केविलवाणी अवस्था पाहून न्यायाधीशाचं मन हेलावलं. त्यांनी विठाईला आश्वासन दिलं. विठाई कराडला परतल्या.

विठाई कराडला पोहोचून आठ दिवस झाले असतील. दिलेला शब्द न्यायाधीश साहेबांनी पाळला. लगेच ज्ञानोबा बेलिफ म्हणून वडिलांच्या जागेवर रुजू झाले. सुखानं या घरात चंचुप्रवेश केला. साहेबांना कराडला पुढील शिक्षणासाठी घेऊन यावं असा लकडा ज्ञानोबांनी आईकडे लावला. इकडे साहेब सागरोबा व सोनहिराच्या सान्निध्यात हुंदडत होते. चौथीपर्यंतचं शिक्षण पूर्ण करीत असताना या परिसराचा लळा साहेबांना लागला. भविष्याच्या जडणघडणीत या परिसराचा प्रभाव साहेबांच्या पुढील जीवनात आढळून येतो.

ज्ञानोबांच्या हट्टापाई विठाईला साहेबांना कराडला घेऊन येणं भाग पडलं. साहेब चौथी पास झाले. ज्ञानोबा व गणपत या दोन्ही बंधूंची साहेबांनी इंग्रजीमधून शिकावं अशी इच्छा होती; परंतु विठाईला मात्र सातवी पास झाल्यानंतर साहेबानं शिक्षक व्हावं व संसाराला आर्थिक हातभार लावावा असे वाटत होते. विठाईची ही इच्छा मात्र साहेबांनी पूर्ण केली नाही. दोन्ही बंधूंच्या आग्रहाखातर साहेबांना टिळक हायस्कूलमध्ये दाखल करण्यात आलं. दोघा भावांच्या शाळेच्या खर्चाची तोंडमिळवणी करणं ज्ञानोबांना अवघड झालं. त्या काळी शाळेची फीस ती काय? पण गरिबांना ती फीस भरणंही मुश्कील होतं. या मुलांनी गुराढोरांचं शेण काढावं, गुराखी म्हणून त्यांच्याकडे काम करावं. गरिबाच्या मुलांनी शिक्षण घेऊ नये अशी प्रस्थापितांची मानसिकता होती. प्रतिष्ठितांचा दृष्टिकोन गरिबांना हिणवण्याचा होता.

त्याही काळात नादारीसाठी कुणी अर्ज केला तर त्याला फीस माफ होत असे; पण त्याकरिता एक अट होती - समाजातील प्रतिष्ठिताचं शिफारसपत्र. ज्ञानोबा ज्या गल्लीत राहत तेथे अनेक प्रतिष्ठितांची घरं होती. नादारीचा फायदा घ्यावा असा विचार ज्ञानोबांच्या मनात आला. त्यांनी दोन्ही धाकट्या भावंडांना अर्ज करण्यास सांगून गल्लीतील प्रतिष्ठिताकडून शिफारसपत्र घेण्यास सांगितलं. थोरल्या बंधूच्या आज्ञेप्रमाणे दोन्ही बंधू अर्ज घेऊन शिफारसपत्र घेण्यासाठी प्रतिष्ठिताकडे गेले. त्यांना

त्या प्रतिष्ठिताकडून जी वागणूक मिळाली ती स्वाभिमानाला ठेच पोहोचविणारी होती. 'मान सांगावा जगाला, अपमान सांगावा मनाला' ही शिकवण चव्हाण घराण्याला विठाईनं दिली होती. अपमानित होऊन दोन्ही बंधू प्रतिष्ठिताच्या घराबाहेर पडले. साहेबांचा स्वाभिमान जागा झाला. शिक्षणासाठी यापुढे कुणाकडेही याचना करायची नाही ही खूणगाठ मनात बांधून साहेब पुढील शिक्षणाच्या तयारीला लागले.

तथाकथित घराण्यानं जरी गरिबीकडे दुर्लक्ष केलं तरी गरिबांची पाठराखण करणारी सर्वसामान्य घराणी कराडमध्ये जिवंत होती. या घरातील मुलं साहेबांची मित्र झाली होती. साहेबांना शिक्षण घेताना या गरीब मित्रांची मदत झाली. या वयात जी मित्रमंडळी साहेबांनी मिळविली ती शेवटपर्यंत साहेबांच्या पाठीशी उभी राहिली. भाऊबंद दुरून मजा बघत.

थोरल्या जाऊबाई या ज्ञानोबांच्या धर्मपत्नी. राधाक्काचं लग्न झाल्यानंतर आईला घरची कामं करून इतर कामं करावी लागायची. सर्व कामं उरकताना आईची धावपळ व्हायची. ज्ञानोबा नोकरीला लागले. त्यांचं लग्नाचं वय झालं. यावर्षी दोनाचे चार हात करायचे, असं विठाईनं ठरविलं. मुलाचे मामा म्हणजे दाजीबा घाटगे यांच्या कानावर घालावं म्हणून देवराष्ट्राला निरोप धाडला - "जेवत असशील तर हात धुवायला कराडला ये."

निरोप मिळाल्यानंतर दाजीबा बुचकाळ्यात पडले. विचार करू लागले. एवढं काय महत्त्वाचं काम अक्कानं काढलं असावं... त्याकरिता तत्पर येण्याचा निरोपही...

घरात सांगून दाजीबा कराडला पोहोचले. बहीण, भाऊ व भाच्यांनी एकत्रच जेवण केलं. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. मुलं पेंगायला लागली. आईनं अंथरुणं टाकली. मुलं झोपावयास गेली. दोघं बहीण-भाऊ सुखदुःखाच्या आठवणीत गढून गेले. शेवटी दाजीबांनी विठाईला विचारले,

"असं काय महत्त्वाचं काम होतं, त्याकरिता तू मला इथं बोलावलंस?"

"तसं म्हणशील तर महत्त्वाचं असं काही नाही; पण तू मुलांचा मामा आहेस आणि तुझ्याशिवाय मला कोणी दुसरं जवळचं आहे का? मन मोकळं करण्याकरिता बोलावलं." आई.

"असं होय! तर मग सांग पाहू तुझ्या मनात काय आहे ते...!" दाजीबा.

"ज्ञानोबा नोकरीला लागलाय. लग्नाचं वयही झालंय. त्याचं लग्न करावं म्हणते मी औंदा." आई.

"काय माझ्या मनातलं बोललीस तू अक्का! बघितली असशील एखादी मुलगी तर उडवून टाकू ज्ञानोबाच्या लग्नाचा बार." दाजीबा.

"त्याकरिताच मी तुला बोलावलं. माझ्या मनात असा विचार आला की, आपली वहिवाट चालू राहावी. देवराष्ट्राची वाट जुनी-नवी करून टाकावी..." आई.

"मी समजलो नाही." दाजीबा.

"अरं, तुझी मुलगी सोनू आता न्हातीधुती झालीया. मी सून म्हणून तिला पसंत केलंय. तुझा काय विचार आहे ते सांग." आई.

"अक्का, मी काय तुझ्या ऐकण्याच्या बाहेर आहे व्हय? तू सांगावं आणि मी ऐकावं..." दाजीबा.

बहीण-भावांच्या मनात मागील सुखदु:खाच्या आठवणी जाग्या झाल्या. आतापर्यंत एकमेकांनी एकदुसऱ्याला सावरलं, सांभाळून घेतलं. पुढंही असाच घरोबा टिकून राहावा म्हणून दोघांनी ज्ञानोबा-सोनूबाईच्या लग्नाला संमती दिली. सकाळी मामा देवराष्ट्राला जावयास निघाले. भाचेमंडळी मामाभोवती जमा झाली. दाजीबांनी ज्ञानोबाला जवळ घेतलं नि म्हणाले,

"ज्ञानोबा, तू आता माझा भाचा नसून आजपासून माझा जावई झालास!"

ज्ञानोबानं मामाचं दर्शन घेतलं. दाजीबा देवराष्ट्रला परत आले. अक्कासोबत झालेल्या गोष्टींची घरात उजळणी केली. या ठरलेल्या संबंधानं घरात आनंदाचं उधाण आलं. सोनूबाईला आपलं बालपण आठवलं. या सर्व फुईभावासोबत बागडले-खेळले, रुसले-फुगले, त्यांच्याशी अबोला धरला त्यांच्यापैकी ज्ञानोबा माझे पती झाले. तिला ज्ञानोबाच्या खोड्या आठवल्या. 'फुईभाऊ कानकोंडा' असतो असं इतरांकडून सोनूबाई ऐकायच्या. आज तिच्या जीवनात प्रत्यक्ष घटना घडली. गणपतराव आणि यशवंतराव माझे दीर झालेत याचा सोनूबाईला अभिमान वाटू लागला. यशवंतराव तर लहानचे मोठे माझ्यासोबत झाले. आज मी त्यांची वहिनी झाले. चव्हाण घराण्याची सून झाले...

अशा या माझ्या थोरल्या जाऊबाई चव्हाण घराण्याच्या सूनबाई

म्हणून कराडच्या घरात आल्या. साहेबांनी ज्ञानोबांच्या लग्नात करवला म्हणून मिरवण्याची हौस पूर्ण करून घेतली.

१९२७ च्या मागचे किंवा पुढचे वर्ष असेल. सातारा जिल्ह्यातून मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे उमेदवार म्हणून भास्करराव जाधव उभे होते. भास्करराव जाधव हे बहुजनांचे प्रतिनिधी आहेत, अशी बहुजन समाजाची धारणा होती. स्वयंसेवक म्हणून साहेबांनी कराड आणि आजूबाजूच्या खेड्यात प्रचाराचं काम केलं. भास्करराव जाधव निवडून आले. विद्यार्थीदशेत निवडणुकीत भाग घेऊन यश संपादन करण्यात साहेबांनी खारीची भूमिका पार पाडली.

१९२७ ते १९४६ या एकोणावीस वर्षांच्या काळात साहेबांचं जीवन अनुभवसंपन्न झालं. देशाच्या आयुष्यात टिळक चळवळ संपून गांधीवादी चळवळीचा उदय झाला होता. या सर्व घटनांचा परिणाम समाजजीवनावर पडू लागला. तळागाळातील समाज गांधीजींच्या चळवळीकडं आकर्षित झाला. आतापर्यंत पांढरपेशा वर्गच या चळवळीत असायचा. त्यातही स्वत:ला उच्चभ्रू समजणारा वर्ग अधिक होता. कृष्णा-कोयनेच्या संगमानं कराडचा सांस्कृतिक वारसा संपन्न केलेला. गावात शैक्षणिक वातावरण. कृष्णा-कोयनेच्या पंचक्रोशीत स्वातंत्र्याची चळवळ बाळसं धरू लागली. या मातीच्या कुशीतून अन्नधान्याचं जोमदार पीक जसं उपजायचं तसंच चळवळीचं पीक फोफावत होतं. इथल्या विद्यार्थ्यांनी या मातीतलं अन्न खाल्लेलं. त्यांना या मातीचा गुण गप्प बसू देत नव्हता. ज्या आळीत साहेब राहत त्या आळीतील विद्यार्थ्यांनी 'शिवछत्रपती मंडळा'ची स्थापना केली. या मंडळात अठरापगड जातींची वीस-पंचवीस मुलं होती. त्यांचे म्होरके होते साहेब. कृष्णा-कोयनेच्या संगमावर पोहण्यासाठी जाणे, वेगवेगळ्या वक्त्यांची व्याख्याने आयोजित करणे, दिवस-दिवस निसर्गाच्या सान्निध्यात राहणे. विद्यार्थीदशेत जे जे करायला पाहिजे ते ते साहेबांनी केले. सांस्कृतिक, बौद्धिक, मानसिक, शारीरिक जडणघडण याच वयात होते याची जाणीव साहेबांना होती. शिवछत्रपती मंडळाच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम साहेब राबवीत. नाटकापासून ते मेळ्यापर्यंतच्या कार्यक्रमात साहेबांचा सहभाग असायचा. बर्नाड शॉच्या 'डॉक्टर्स डायलेमा' या नाटकातील एका प्रवेशात साहेबांनी काम केलं होतं. चैत्र-वैशाखात गावोगावीच्या

जत्रेत तमाशाचे फड असायचे. त्या तमाशाच्या फडात जाऊन तमाशा पाहण्याचा आनंद साहेबांनी लुटला. भजन-कीर्तनातही साहेब रमायचे. भजनाचा तर छंद साहेबांना होताच. साहेब वादविवाद स्पर्धेत भाग घ्यायचे. त्याकरिता विपुल वाचन करायचे. कथा-कादंबऱ्या तर साहेबांचे आवडते विषय. कुठलाही विषय साहेबांना वर्ज नव्हता. कुस्त्यांच्या आखाड्यात साहेब जास्त रमायचे. चैत्र-वैशाखातील देवराष्ट्रातील कुस्त्यांची दंगल या भागात प्रसिद्ध होती. या पंचक्रोशीतील पंधरा वर्षांच्या वयापासून ते पंचवीस वर्षे वयातील तरणेबांड मल्ल या फडात यायचे. घाटावरील व घाटाखालील अशी मल्लांची विभागणी व्हायची. या दोन्ही मल्लांमध्ये स्पर्धा व्हायची. त्या काळी निदान पन्नास हजार प्रेक्षक या कुस्तीच्या लढती बघायचे. या स्पर्धेमुळं ज्यांचं नाव गाजत होतं ते मल्ल साहेबराव कडेपूरकर पुढे साहेबांच्या सान्निध्यात आले. कुस्ती खेळणं बंद झाल्यानंतर राजकीय आखाड्यात साहेबांसोबत स्नेह जडला. साहेबांच्या कामाला सातारा जिल्ह्यात सदैव पाठिंबा देणारे ते एक सहकारी बनले. त्यांची आठवण साहेबांच्या मनात अखंड तेवत राहिली. साहेबांचे बंधू गणपतराव पट्टीचे पहेलवान. जत्रेत कुस्ती खेळण्यासाठी ते जात तेव्हा साहेबांना सोबत नेत असत. साहेबांनाही गणपतरावांची कुस्ती पाहणे आवडे. गणपतराव आपल्या प्रतिस्पर्ध्याला आखाड्यात चीतपट करून अस्मान दाखवीत. गणपतरावांनी कुस्तीत अनेक बक्षिसं पटकावली होती. त्यांच्या वयाच्या मानानं त्यांची समज परिपक्व होती. ते नेहमी साहेबांना सांगत, "तू व्यायाम करून शरीर कमव. तुला त्याचा भविष्यकाळात उपयोग होईल. कुस्ती नको खेळू; पण पोहण्याचा तरी व्यायाम कर." पोहण्याचे महत्त्व साहेबांना कळले होते.

असेच एक दिवस साहेब आपल्या देवराष्ट्रातील मित्रासाबत सोनहिऱ्याच्या काठी फिरायला गेले. त्यांना पोहण्याची खुमखुमी आली. कृष्णा-कोयनेच्या संगमात मी पट्टीचा पोहणारा आहे, असं दाखवावं म्हणून कपडे काढून सोनहिऱ्याच्या प्रवाहात उडी मारली. पोहण्यास सुरुवात केली; पण साहेबांचे पोहण्याचे कसब सोनहिऱ्याच्या प्रवाहात कमी पडू लागले. पोहता पोहता साहेब सोनहिऱ्याच्या मध्यभागी आले. त्यांच्या हातापायातील बळ नाहीसं झालं. आपण पाण्यात बुडतो की काय असा क्षणभर भास त्यांना झाला.

मित्रांना मदतीसाठी आवाज दिला. मित्र धावून आले. साहेबांना सोनहिऱ्याच्या काठावर सहिसलामत आणलं. साहेब हिरमुसले. कृष्णा-कोयनेच्या संथ प्रवाहात पोहणे वेगळे नि सोनहिरा ओढ्यात पोहणे वेगळे. ओढ्यातील पाण्याच्या प्रवाहाला ओढ असते म्हणून त्याला 'ओढा' म्हणतात याची साहेबांना जाणीव झाली. भविष्यात साहेबांच्या कर्तृत्वानं इतिहास घडणार होता म्हणून साहेबांचा पुनर्जन्म झाला अन् तोही मित्रामुळे. सोनहिऱ्याच्या पाण्याला कृष्णा-कोयनेच्या पाण्यापेक्षा जबरदस्त ओढ आहे याची जाणीव साहेबांना झाली. वेळ मिळाला की साहेब तासन्तास कृष्णा-कोयनेच्या संगमात पोहत असत.

आईची आई - विठाई आणि साहेब पंढरीच्या वारीला निघाले. कराड ते पंढरपूर ८० मैल असावं. कराडहून एक पालखी नियमित पंढरपूरला जात असे. या पालखीसोबत मजल-दरमजल करीत साहेब पंढरीची वाट चालू लागले. या पालखीसोबत बैलगाड्या राहत असत. एका बैलगाडीत आजी, आई आणि साहेब. एका वेळेस एकालाच बैलगाडीत बसावयास मिळत असे. आजीचं वय झालेलं असल्यानं आजी जास्त वेळ गाडीत बसत. साहेब आणि विठाईला जास्त वेळ पायी दिंडीसोबत चालावं लागायचं. मुक्कामाच्या ठिकाणी तीन दगडांची चूल मांडून रस्त्यावरच भाकरी-पिठलं व्हायचं. आजूबाजूच्या रानातून जळतणासाठी साहेब काट्याकुट्या जमा करायचे. आठ-दहा दिवसांचा प्रवास करून साहेब पंढरपुरात पोहोचले. नदीचा पूर अनेक वेळा पाहिलेला; पण माणसाचा पूर साहेब प्रथमच पाहत होते. विठ्ठलाच्या दर्शनासाठी चार-पाच तास रांगेत ताटकळत उभं राहावं लागलं. विठाईचा हात धरून साहेब राऊळात दाखल झाले. वारकऱ्यांची रेटारेटी व बडव्यांची दांडगाई वारकऱ्यांच्या अंगवळणी पडलेली. विठाईनं साहेबांना उचलून विठोबाच्या पायावर साहेबांचं डोकं टेकवलं. तेवढ्यात बडवा वस्कन खेकसला, "चला पुढे."

पुढे अनेक वेळा सत्ताधारी म्हणून साहेबांना विठ्ठलाच्या दर्शनाचा योग आला. त्यांना बुद्धिजीवी लोकांनी अनेकदा देवांच्या अस्तित्वाविषयी प्रश्न विचारले. त्याला साहेबांचं उत्तर असायचं, "देव आहे हे सिद्ध करणं अवघड. देव नाही हे सिद्ध करणं त्याहूनही अवघड. माझ्या मते ती एक अदृश्य शक्ती आहे. तिच्या सान्निध्यात आपण आलो की, आपल्या मनाला

शांती लाभते.'' साहेबांची मानसिक जडणघडण त्यांच्या मातोश्रींच्या आचरणातून तयार होत होती. अनेक घटनांतून, प्रसंगांतून मनाची कसरत साहेबांना करावी लागायची. आई हीच साहेबांची समाजशास्त्र व मानसशास्त्राची पाठशाळा होती.

साहेबांचे बंधू गणपतराव सत्यशोधक चळवळीकडे ओढले गेले. त्यांनी साहेबांना महात्मा फुले यांचे चरित्र वाचावयास दिले. साहेबांना महात्मा फुले यांचे विचार पटले; पण त्यातील ब्राह्मण वर्गाला सरसगट धोपटलेले साहेबांना खटकत होते. टिळकांच्या स्वातंत्र्य चळवळीतील कार्याकडे कानाडोळा करून चालणार नाही. त्या कार्याला कमी लेखता येणार नाही. दोघा भावंडांमध्ये या विषयावर वादविवाद-चर्चा होत. सत्यशोधक समाजाची मुलूखमैदान तोफ म्हणून गाजणारे दिनकरराव जवळकर यांची सभा कराडच्या मैदानावर आयोजित करण्यात आली होती. सोबत केशवराव जेधे हेही होते. सभेचा विषय होता - 'ब्राह्मणाचे भवितव्य'. ब्राह्मण समाजावर दोन्ही वक्त्यांनी सडकून टीका केली. त्यांच्या टीकेच्या असुडातून टिळकही सुटले नाहीत. महाराष्ट्राच्या वैचारिक राजकारणात या दोन्ही वक्त्यांनी रान पेटवलं होतं. श्री. दिनकरराव जवळकरलिखित 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक साहेबांनी मिळवलं. त्याचं वाचन केलं. या सभेला 'तुफान' असं नाव साहेबांनी दिलं होतं.

महात्मा फुले, सावरकर, टिळक यांच्या विचारामधून देश, समाज यांच्या उत्कर्षाकरिता जो विचार उपयोगी पडेल तो विचार साहेब सोबत घेऊन वाटचाल करू लागले. कराड आणि सातारा जिल्ह्यात साहेब 'चळवळे' म्हणून ओळखले जाऊ लागले. स्वातंत्र्य चळवळीतील ज्येष्ठांना भेटून त्यांच्याशी चर्चा करू लागले. प्रत्यक्ष चळवळीत भाग घेण्याची साहेबांच्या मनाची तयार झाली होती. ज्ञानोबा आणि गणपतरावांनी आईची परवानगी घेण्याचा सल्ला साहेबांना दिला. आईसोबत साहेबांनी चर्चा केली. आईचं एकच म्हणणं होतं - ''कुठंही जा, पण शिक्षण पूर्ण कर.''

प्रत्यक्ष कृती करण्याचा दिवस आणि जागा निवडली. शाळेच्या मैदानातील लिंबाच्या झाडावर साहेबांनी तिरंगा फडकवला. वीस-पंचवीस सवंगड्यांसोबत झेंडावंदन केलं. साहेबांच्या अशा कारवाया वाढत चालल्या होत्या. शिक्षण खात्याला जाग आली. चौकशीकरिता शिक्षणाधिकारी शाळेत

आले. मुख्याध्यापकाकडे साहेबांना बोलावून घेतलं. "कुणाच्या सांगण्यावरून तू हे करतोस? या कार्यक्रमाकरिता कुणाची परवानगी घेतलीस?" या आणि अशा अनेक प्रश्नांचा भडिमार शिक्षणाधिकाऱ्यांनी साहेबांवर केला.

"स्वयंस्फूर्तीने करतो." असं सडेतोड उत्तर साहेबांनी त्या शिक्षणाधिकाऱ्याला दिलं. शाळेचे मुख्याध्यापक राष्ट्रीय वृत्तीचे होते. त्यांची या कामाला मूकसंमती होती. मुख्याध्यापकाचं नाव साहेबांच्या तोंडून वदवून घेण्याचा प्रयत्न शिक्षणाधिकाऱ्यांनी केला. त्यात शिक्षणाधिकाऱ्याला यश आलं नाही. साहेब बधले नाहीत. टिळक हायस्कूल व मुख्याध्यापक द्विवेदींवरील संकट टळलं. या घटनेनं साहेब पोलिसांच्या नजरेत आले.

टिळक हायस्कूलमध्ये वक्तृत्व स्पर्धा व्हायच्या. अशी स्पर्धा पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयानं आयोजित केली होती. या स्पर्धेत भाग घेण्याची साहेबांची इच्छा होती. शाळेतर्फे पाठविण्याची प्रथा त्या वेळी नव्हती. स्पर्धकांनी स्वत: खर्च करून स्पर्धेत भाग घ्यायचा. साहेबांना खर्च करणं शक्य नव्हतं. मित्रमंडळीत चर्चा सुरू झाली. मित्रांनी साहेबांना या स्पर्धेत पाठविण्याचा निर्णय घेतला. संपूर्ण खर्चाची जबाबदारी शिवाजीराव बटाणे यांनी स्वीकारली. या स्पर्धेत विषय ऐनवेळी देण्यात येत असत. साहेबांना ऐनवेळी 'ग्रामसुधारणा' हा विषय देण्यात आला. आपलं म्हणणं केवळ दहा मिनिटांत स्पर्धकानं मांडायचं होतं. साहेबांनी विषयाची मांडणी ओघवत्या भाषेत केली. अभ्यासपूर्ण मुद्दे परीक्षकांसमोर मांडले. साहेबांचे अभ्यासपूर्ण मुद्दे व भाषाशैलीवर परीक्षक खूश झाले. परिक्षकांनी साहेबांना दहा मिनिटांचा अधिकचा वेळ दिला. पुण्यासारख्या विद्येच्या माहेरी साहेबांनी स्पर्धा जिंकली. पुणेरी विद्वानांच्या कौतुकास ते पात्र ठरले. रुपये १५० चं बक्षीस त्यांना मिळालं. परीक्षक होते साहित्यसम्राट न. चि. केळकर.

टिळक शाळेतील शिक्षक भिन्न-भिन्न प्रवृत्तीचे होते. 'जैसे थे'वादी विचारांच्या शिक्षकांसोबत साहेबांचे कधी जमले नाही. विद्यार्थ्यांनी नवीन विचार आत्मसात करून भावी वाटचाल ठरवावयास पाहिजे या विचाराचे काही शिक्षक होते. शेणोलीकर या दोन्ही शिक्षकांपेक्षा वेगळे होते. वेळ आणि शिस्तीचे भोक्ते. कामात अत्यंत चोख. त्यामुळं त्यांना नावलौकिक मिळालेला. शिकवण्यात आणि क्रिकेटमध्ये आवड. त्यांनी साहेबांना क्रिकेट खेळात गुंतवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या गळाला साहेब लागले नाहीत.

त्यांनी साहेबांकडं दुर्लक्ष केलं. वर्गात त्यांनी एक वेगळाच प्रयोग केला. विद्यार्थ्यांना त्यांनी सांगितलं, "तुम्हाला प्रत्येकाला काय व्हायचं ते एका छोट्या कागदावर लिहून तो कागद माझ्याकडे द्या." प्रत्येक विद्यार्थ्यानं आतापर्यंत त्यांच्या वाचण्यात आलेल्या आणि ऐकीव माहितीच्या आधारावर एखाद्या थोर नेत्याचं नाव लिहून दिलं असावं. साहेबांनी मात्र वेगळा मार्ग चोखाळला. प्रत्येक व्यक्ती स्वकर्तृत्वावर थोर झालेली असते. आपण त्यांच्याप्रमाणं कर्तृत्व करू शकू का? याबद्दल साहेबांनी विचार केला. कुठल्या थोर नेत्याच्या पायवाटेनं जाण्यापेक्षा साहेबांनी स्वत:च स्वत:ची पायवाट निर्माण करण्याचा विचार केला. त्या कागदाच्या चिठ्ठीवर साहेबांनी लिहिले, "मी यशवंतराव चव्हाण होणार."

शेणोलीकरांनी एक-एक चिठ्ठी उघडून पाहिली. शेवटी साहेबांजवळ आले आणि म्हणाले, "तू आत्मप्रौढी आहेस. सार्वजनिक कार्यात पुढाकार घेतोस ते चांगले आहे. देशातील थोरामोठ्याचा आदर्श तुझ्यासमोर असावयास पाहिजे."

साहेब म्हणाले, "मी आत्मप्रौढी नाही. माझा माझ्या कर्तृत्वावर विश्वास आहे. मला तुमचं म्हणणं पटतं; पण माझ्या मनाला जे पटलं ते लिहिलं."

साहेब हा विषय विसरूनही गेले; पण शेणोलीकरांनी शिक्षक कक्षामध्ये सहकारी शिक्षकांसोबत चर्चा केली असावी. शाळेच्या मुख्याध्यापकांनी साहेबांची विचारपूस केली. साहेबांनी वर्गात जे घडलं ते मुख्याध्यापकांसमोर सत्य कथन केलं.

यावर मुख्याध्यापक म्हणाले, "यात काही गैर नाही." हे मुख्याध्यापक होते पाठक. पाठक आणि द्विवेदी या दोन शिक्षकांचा साहेबांचा जडणघडणीत मोलाचा वाटा असावा.

वाचन, भाषण याचा साहेबांना छंद जडला. साहेब वक्तृत्व स्पर्धेत आणि निबंध स्पर्धेत भाग घेऊ लागले. शाळेत टिळक यांच्यावर निबंध स्पर्धा ठेवली होती. या स्पर्धेत साहेबांनी भाग घेतला आणि प्रथम पारितोषिक मिळवलं. अशा या स्पर्धेमुळं लिहिण्याची सवय साहेबांना लागली. वाचन, लिखाणासोबत तालुक्यातील व जिल्ह्यातील चळवळीत साहेब अग्रभागी राहत. सवड मिळाली की, कार्यकर्त्यांच्या गावी जात असत. त्यांच्याशी विचारविनिमय करीत असत.

याच काळात असहकाराची चळवळ जोमात होती. बंगाली तरुण जतीनदास इंग्रजांच्या डोळ्यात खुपत होता. चौथ्या वेळेस त्याला तुरुंगात डांबण्यात आलं. तिथे त्याचे अतोनात हाल करण्यात आले. छळाचा अतिरेक झाला. जतीनदासच्या बुद्धीवरील ताबा सुटला. त्यानं जेल अधिकाऱ्यावर हल्ला केला. त्याच्यावरील आरोपात अजून एका आरोपाची भर पडली. त्याला अंधारकोठडीची शिक्षा देण्यात आली. या शिक्षेविरोधात त्यानं उपोषण सुरू केलं. तेवीस दिवसांनंतर राज्यकर्त्यांनी या उपोषणाची दखल घेतली. पुढे लाहोर कटात त्यांना गुंतविण्यात आलं. गुन्हेगाराप्रमाणं वागवलं जाऊ लागलं. सरदार भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी राजकीय कैद्यांना काही विशिष्ट सवलती मिळाव्यात म्हणून उपोषण सुरू केलं. राजकीय कैद्यांना गुन्हेगाराप्रमाणं वागणूक देण्याच्या विरोधात जतीनदासनं उपोषण सुरू केलं. काही अटींवर सरकार त्यास जामिनावर सोडण्यास तयार झालं. जामिनाच्या अटी मात्र मानहानीकारक होत्या. जतीनदासनं त्या अटी धुडकावून लावल्या. या कोवळ्या स्वातंत्र्यवीरानं ६२ व्या दिवशी स्वातंत्र्याकरिता आपल्या प्राणाचं बलिदान केलं. हा प्रसंग साहेबांच्या मनाला चटका लावून गेला. या आणि अशा अनेक घटना, प्रसंग साहेबांच्या बालमनावर कोरले जाऊ लागले. जतीनदासच्या जाण्यानं साहेब अस्वस्थ होऊन एकलकोंडेपणानं राहू लागले. चार-आठ दिवस कुणाला भेटले नाहीत. जतीनदासचा मृत्यू साहेबांच्या जिव्हारी लागला. वर्तमानपत्रातील अशा घटनांचा साहेब गांभीर्यानं विचार करू लागले. वरिष्ठांशी चर्चा करू लागले.

अखेर १९३१ साल उजाडलं. साहेब देवराष्ट्राहून सुट्या संपवून मॅट्रिकच्या परीक्षेकरिता कराडला आले. अभ्यासाच्या दृष्टीनं जुळवाजुळव करीत असतानाच अपेक्षितपणे एक काम त्यांच्यासमोर दत्त म्हणून उभं ठाकलं. अभ्यासाचे मनसुबे मनातच राहिले. असहकार चळवळ, मीठ आणि जंगल सत्याग्रहामुळं ग्रामीण भागात कमालीचं वातावरण तापलं होतं. गांधीजीमुळं सर्वहरा वर्ग या चळवळीकडं ओढला गेला. स्वातंत्र्य मिळवणं पांढरपेशा वर्गातील नेतृत्वाचा मुख्य उद्देश होता. हे नेतृत्व आर्थिक व सामाजिक प्रश्नाच्या बाबतीत उदासीन राहत असतं. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या पिळलेला, पिचलेला समाज खेड्यापाड्यात बहुसंख्य

होता. त्यांना सोबत घ्यायचं असेल तर त्यांच्या जीवनमरणाच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी काँग्रेसच्या चळवळीनं पुढाकार घेतला पाहिजे, असं साहेबांचं मत तयार झालं होतं. ग्रामीण भाग हा शेतकऱ्यांचा. त्यांची दुःखं, त्यांचे प्रश्न कुणी समजावून घेत नसत. हा वर्ग या चळवळीकडं तटस्थपणे पाहत होता. मुस्लिम व पददलित समाज या चळवळीसोबत आला पाहिजे, त्याचे प्रश्न समजावून घेतले पाहिजेत याकरिता साहेबांचे बंधू गणपतराव आग्रही असत. साहेब व गणपतराव यावर चर्चा करीत असत. साहेबांचे बंधू गणपतराव लॅण्ड मॉर्गेज बँकेत काम करीत असत. त्यांच्याकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांची माहिती साहेबांना मिळत असे. त्यांचे प्रश्न सरकारी यंत्रणेशी निगडित असत. सरकारविरोधी चळवळीत जाणे त्यांना परवडणारे नव्हते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी साहेबांनी मित्रांना सोबत घेतले. शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्या. त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या.

जिल्हा राजकीय परिषद सातारा जिल्ह्यात कधीमधी घेण्यात येत असे. ही परंपरा टिळकांपासून चालत आलेली. असहकार चळवळीमुळं कार्यकर्त्यांत उत्साह संचारला होता. सातारा जिल्हा या चळवळीत आघाडीवर होता. कराड तालुक्यातील मसूर येथील कार्यकर्त्यांनी ही परिषद येथे घ्यावी, असं निमंत्रण काँग्रेसला दिलं होतं. प्रांतपातळीवरील काँग्रेस समितीनं या निमंत्रणाचा स्वीकार केला. प्रथमच अशी राजकीय परिषद मसूरसारख्या ग्रामीण भागात होणार होती. या राजकीय परिषदेची जबाबदारी मसूरचे तळमळीचे कार्यकर्ते राघूअण्णा लिमये, डॉ. फाटक, विष्णू मास्तर, सीतारामपंत गरुड यांनी स्वीकारली होती. कराड तालुक्यात ही परिषद असल्यानं तालुक्याच्या कार्यकर्त्यांवर नैतिक जबाबदारी येऊन पडली. ही परिषद कार्यकर्त्यांच्या सहकार्यानं यशस्वी करण्याचा चंग साहेबांनी बांधला. या परिषदेला अध्यक्ष म्हणून त्या वेळी तात्पुरते राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष असलेले माधवरावजी अणे यांना निमंत्रित करण्यात आले होते. या परिषदेला जिल्ह्यातील नेतेमंडळी तर होतीच, त्यासोबतच मुंबई-पुणे येथूनही बरीच प्रमुख नेतेमंडळी आली होती. यात प्रामुख्याने सौ. लीलावती मुन्शी हजर होत्या. परिषदेच्या कामकाजाकरिता एक विषय नियामक समिती स्थापन करण्यात आली होती. परिषदेत कुठले विषय प्रामुख्यानं मांडावेत यावर

या बैठकीत खल होणार होता. या विषय नियामक बैठकीला कोल्हापूर येथील प्रजा परिषदेचे नामवंत पुढारी माधवरावजी बागल यांना विशेष निमंत्रित म्हणून बोलावून घेण्यात आलं होतं.

या बैठकीत अनेक प्रश्नांवर सखोल अशी चर्चा चालू होती. मीठ आणि जंगल सत्याग्रहामध्ये ज्यांनी भाग घेतला त्यांच्या अभिनंदनाचा व आभाराचाही ठराव चर्चेला आला. गांधीजी गोलमेज परिषदेला जाणार होते. त्याठिकाणी कुठल्या प्रश्नांना प्राधान्य देऊन मागणी करावी या ठरावाची चर्चा झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी माधवराव अणे होते. एका राजकीय ठरावाला माधवराव बागल यांनी एक उपसूचना मांडली. राजकीय मागण्यांबरोबर आर्थिक व सामाजिक मागण्यांचा समावेश त्या ठरावात करावा, असा मुद्दा बैठकीसमोर मांडला. माधवराव बागलांनी अभ्यासपूर्ण आपले म्हणणे मांडले. सावकारांनी दामदुपटीने व्याज आकारू नये, नऊ टक्क्यांपेक्षा जास्त व्याज घेता कामा नये, शेती कसणाऱ्या कुळांना शेती कसण्याचा हक्क द्यावा, याची तातडीनं अंमलबजावणी व्हावी. या ठरावांमुळे बैठकीचा नूरच बदलला. जिल्ह्यातील आणि प्रांतिकच्या नेत्यांनी तांत्रिक मुद्दे उपस्थित केले. या उपसूचना मान्य करू नये अशा भावना व्यक्त केल्या. माधवराव बागल यांच्या उपसूचनेच्या बाजूने व प्रांतिकच्या नेत्यांनी उपसूचनेला जो विरोध दर्शवला त्याविरोधात जी मंडळी उभी राहिली त्यात साहेबही होते. हे सर्व पाहून जिल्हा व प्रांतिकच्या नेत्यांमध्ये चुळबूळ सुरू झाली. साहेबांना आश्चर्य वाटले. या उपसूचनेत वावगं ते काय होतं? शेतकऱ्यांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांवर जर ही परिषद काहीच मत व्यक्त करीत नसेल तर शेतकऱ्यांनी कशासाठी या चळवळीत भाग घ्यायचा? जे शेतकरी प्रामाणिकपणे जीवाला जीव देऊन हा लढा लढत होते त्यांचा वाली कोण? त्यांच्या त्यागाला वाऱ्यावर सोडणार का? या परिषदेच्या निमित्तानं असे अनेक प्रश्न निर्माण झाले. शहरी नेतृत्वाला फक्त स्वातंत्र्य हवंय. त्यातून निर्माण होणाऱ्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांसंबंधी त्यांना काहीएक देणेघेणे नाही. साहेबांना आपले बंधू गणपतराव यांची आठवण झाली. गणपतरावांचंही हेच मत होतं. माधवराव बागलांचं भाषेवर प्रभुत्व होतं. अभ्यासपूर्ण मुद्दे बैठकीसमोर मांडले. आपल्या परीनं या उपसूचनेचं महत्त्व पटवून दिलं; पण व्यर्थ

गेला प्रयत्न. अध्यक्षांनी या सर्व उपसूचना नियमबाह्य ठरवून त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या. नियामक समितीची बैठक संपली.

माधवराव बागल यांच्याशी परिचय करून घेण्याचं वय साहबांचं नव्हतं. शाळकरी वयातील साहेबांनी परिचय करून घेण्याचा प्रयत्नही केला नाही. या परिषदेचं खुलं अधिवेशन सायंकाळी होणार होतं. खुल्या अधिवेशनाला माधवराव बागल जाताना साहेब मित्रासोबत त्यांना भेटले व म्हणाले,

"जिल्ह्यातील आम्ही सर्व कार्यकर्ते तुमच्या मताशी सहमत आहोत. आपण आपली उपसूचना खुल्या अधिवेशनात उपस्थित करावी अशी विनंती आमची आपणास आहे."

संध्याकाळी खुल्या अधिवेशनाला पंधरा ते वीस हजारांचा जनसमुदाय जमलेला. ग्रामीण भागातील बहुसंख्य शेतकरी होते. या विचारपीठावरील मानसन्मान, हार-तुरे इत्यादी सोपस्कार पार पडल्यानंतर माधवराव बागल बोलावयास उभे राहिले. या सभेला लाऊडस्पीकरची व्यवस्था नव्हती.

माधवराव म्हणाले, "मी शेतकऱ्यांचे प्रश्न प्रथमच या परिषदेसमोर मांडतोय."

माधवरावांचं घणाघाती भाषण शेतकरी कान लावून ऐकू लागले. त्यांचं अर्थपूर्ण वाक्य शेतकऱ्यांच्या अंगावर काटे उभे करीत होतं. हृदयस्पर्शी भाषणानं शेतकऱ्यांची मनं हेलावून गेली. भाषणात सारखा टाळ्यांचा कडकडाट होत होता. माधवराव बागलांनी सभा जिंकली. त्यांनी आपली उपसूचना लोकांच्या मान्यतेसाठी लोकांसमोर मांडली. लोकांनी टाळ्यांच्या कडकडाटांत उपसूचनेला आपली मान्यता दिली. कागदोपत्री या ठरावाचे पुढे काय झाले माहीत नाही. त्याची साहेबांना गरजही वाटली नाही. माधवराव बागल आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांनी ही सभा जिंकली. शेतकऱ्यांच्या प्रश्नाला राजकीय व्यासपीठावर वाचा फोडण्याचे श्रेय माधवराव बागल यांना आणि कार्यकर्त्यांना मिळाले.

या परिषदेनंतर कराड तालुक्यात वैचारिक घुसळण सुरू झाली. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी कार्यकर्ते आपापली मतं सभेच्या कामकाजाविषयी व्यक्त करू लागले. त्यात दोन प्रवाह दिसून आले. एक प्रवाह प्रस्थापितांची री ओढणारा होता, तर दुसरा प्रवाह माधवरावांच्या विचारांनी प्रभावित

झालेला होता. मसूरच्या परिषदेत गरिबांचे कैवारी कोण व विरोधक कोण याचा बोध झाला. आपण स्वातंत्र्य चळवळीत कुठल्या वाटेनं जायचं हे या परिषदेच्या निमित्तानं निश्चित केलं. साहेब माधवराव बागलांच्या विचारांशी सहमत होते. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचा रंग देण्याचा काहींनी प्रयत्न केला. साहेबांनी हा प्रयत्न हाणून पाडला. केवळ माधवराव बागल सत्यशोधक चळवळीतून पुढे आलेले असल्याने त्यांचे विचार प्रस्थापितांच्या गळी उतरणे अवघड होते. साहेबांची या परिषदेत जिल्ह्यातील अनेक प्रभावी कार्यकर्त्यांची ओळख झाली. ते कार्यकर्तेही साहेबांच्याच विचाराचे होते. त्यात किसन वीर, आत्माराम पाटील, पांडुरंग मास्तर, गौरीहर सिंहासने इ. साहेब परिषद आटोपून कराडला परत आले. माधवराव बागलांच्या भाषणांचे पडसाद येथे येऊन पोहोचले होते. साहेबांनी कायकर्त्यांची बैठक घेतली. परिषदेतील कार्याचा इतिवृत्तांत दिला. कार्यकर्त्यांचे समाधान झाले. कराड येथील सर्व कार्यकर्ते साहेबांच्या विचारांशी सहमत होते.

गौरीहर सिंहासने आणि साहेब यांच्या मैत्रीला सुरुंग लावण्याची एक घटना घडवून आणण्यात आली. गांधी-आयर्विन करारानंतर अनेक राष्ट्रीय पातळीवरचे पुढारी देशभर दौरे करू लागले. सातारा जिल्ह्यात पंडित मदनमोहन मालवीय यांचा दौरा आयोजित करण्यात आला होता. पंडित मालवीय वाई, सातारा, कराड या भागात येणार होते. कराडला आल्यानंतर त्यांनी कोयना-कृष्णा संगमाला भेट दिली. गंगाकाठाचे हे पंडित दोन्ही नद्यांचा संगम पाहून हरखून गेले, असा उल्लेख त्यांनी सायंकाळच्या संभेत केला. पंडितजीनं सायंकाळच्या सभेला आपल्या संस्कृतप्रचुर हिंदीमधून मार्गदर्शन केलं. सभा सुरू होण्यापूर्वी पडद्यामागे एक नाट्यपूर्ण प्रसंग घडला. या सभेच्या अध्यक्षपदासाठी पंडितजींसोबत पुण्याहून आलेले न. चि. ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या नावाची घोषणा केली. हा निर्णय कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता घेतला होता. कार्यकर्त्यांनी नुकतेच जेलमधून सुटून आलेले भाऊसाहेब बटाणे यांचे नाव सुचवले. सभेत थोडा वेळ गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. त्यात तडजोड म्हणून या सभेला दोघेही अध्यक्ष राहतील असा मार्ग काढण्यात आला. सभा यथासांग पार पडली. पंडितजीनं आपल्या मधाळ वाणीनं श्रोत्यांची मनं जिंकली.

पुणे येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'ज्ञानप्रकाश' या दैनिकाचे साहेब वार्ताहर

होते. स्वातंत्र्य चळवळीच्या कार्याला प्रसिद्धी मिळावी म्हणून स्वत:च्या हौसेखातर, स्वखर्चाने स्वीकारलेली ही वार्ताहराची जबाबदारी साहेबांना चांगलीच महागात पडणार होती. साहेबांनी वार्ताहर म्हणून या सभेत घडलेला वृत्तांत 'ज्ञानप्रकाश'कडे पाठविला. अध्यक्षपदावरून जी घटना घडली त्याचाही उल्लेख बातमीत होता. तीन दिवसांनंतर 'ज्ञानप्रकाश'चा अंक कराडला पोहोचला. अंक वाचून एकच खळबळ उडाली. कार्यकर्ते गटागटानं एकत्र येऊन चर्चा करू लागले. 'ज्ञानप्रकाश'नं आपल्या वर्तमानपत्रात बातमीला शीर्षक दिलं होतं 'तात्यासाहेब केळकरांना अर्धे अध्यक्षपद.' तोपर्यंत ही बातमी कुणी दिली असावी याची चर्चा सुरू झाली. ज्यांना कुणाला साहेब या दैनिकाला वार्ता पाठवितात याची माहिती होती त्यांनी ही घटना साहेबांवर उलटावी म्हणून गौरीहर सिंहासने यांच्या नावे 'असं काही घडलंच नाही' असं 'ज्ञानप्रकाश'च्या संपादकाला पत्र लिहून कळवलं. 'ज्ञानप्रकाश'मध्ये हे पत्र छापून आलं. साहेबांनी स्वत:हून स्वीकारलेल्या वार्ताहराच्या विश्वासार्हतेलाच आव्हान दिलं गेलं. साहेबांनी याचा छडा लावण्याचं ठरवलं. त्यांनी आपले मित्र गौरीहर सिंहासने यांच्याशी चर्चा केली. सिंहासने असं काही करणं शक्य नाही याबद्दल साहेबांना विश्वास होता. गौरीहर व साहेबांनी पुण्याला जाऊन 'ज्ञानप्रकाश'च्या संपादकाची भेट घेऊन शहानिशा करण्याचं ठरवलं. खर्चाचा प्रश्न आला तेव्हा सिंहासने यांनी खर्चाची व पुणे येथील त्यांच्या पाहुण्याकडे राहण्याची व्यवस्था केली. पुण्याला पोहोचल्यानंतर या दोघांनी 'ज्ञानप्रकाश'चे कार्यालय शोधून काढले. ते लकडी पूल, फर्ग्युसन कॉलेजमार्गे 'ज्ञानप्रकाश'च्या कार्यालयात पोहोचले.

'ज्ञानप्रकाश'च्या कार्यालयात गेल्यानंतर साहेबांनी तेथील कर्मचाऱ्याला आम्ही कोठून व कशाकरिता आलो आणि आम्हाला संपादकांना भेटावयाचे आहे, असं सांगितलं. लहानशा गावातील मुलं संपादकांना भेटायचं म्हणतात, असे म्हणत त्या कर्मचाऱ्यानं या दोघांची उपसंपादकांशी भेट घालून दिली. उपसंपादकांना साहेबांनी आपली ओळख करून दिली.

"अच्छा! तुम्ही आहात का यशवंत चव्हाण?" असं म्हणून तुच्छतेच्या नजरेनं साहेबांकडं बघितलं. मला वाटलं कुणी पोक्त वयाचे वार्ताहर असतील! साहेबांनी गौरीहर सिंहासने यांचा परिचय उपसंपादकांशी करून दिला.

म्हणाले, "ज्याच्या नावानं खोटी बातमी पाठविली ते हेच गौरीहर सिंहासने."

"आम्हाला संपादक साहेबांची भेट घेता येईल का? भेट झाली तर आम्हाला खुलासा करता येईल, खऱ्या-खोट्याची शहानिशा होईल." हे साहेबांचं म्हणणं उपसंपादकांना पटलं.

तेव्हा ते म्हणाले, "थोडा वेळ बसा. प्रत्यक्ष संपादक काकासाहेब लिमये यांच्याशी तुमची भेट घालून देतो."

थेड्या वेळानं उपसंपादक हे गौरीहर सिंहासने व साहेबांना काकासाहेब लिमयेंच्या ऑफिसमध्ये घेऊन गेले. साहेबांनी भेटण्यामागचा उद्देश त्यांच्या लक्षात आणून दिला. त्यांनी साहेब व सिंहासने यांना बसवून घेतलं. सिंहासने यांच्या नावानं आलेलं पत्र मागवून घेतलं. सिंहासनेला एक कोरा कागद दिला. त्यावर मजकूर लिहिण्यास सांगितलं. दोन्ही हस्ताक्षरांची खातरजमा करून घेतली व म्हणाले,

"कुणीतरी गैरसमज निर्माण करण्यासाठी हा उपद्व्याप केला असावा. तुम्ही एक खुलासा करणारं पत्र लिहून द्या. आम्ही त्याला प्रसिद्ध करू."

काकासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे सिंहासने यांनी एका कागदावर खुलासा लिहून दिला. यथावकाश तो खुलासा 'ज्ञानप्रकाश'नं प्रसिद्ध केला. स्वखर्चानं वार्ताहर होण्याच्या हौसेचा शेवट साहेबांनी असा केला. त्या उपसंपादकांनी तुच्छतेच्या नजरेतून साहेबांकडे पाहिलेलं साहेबांना अखेरपर्यंत बोचत राहिलं.

वारणेच्या काठचं बिळाशी हे गाव एकदम स्वातंत्र्य चळवळीच्या प्रकाशझोतात आलं. या भागातील चाळीस गावांतील पाटील मंडळींनी आपल्या पदाचे राजीनामे दिले. सरकारी काम करण्याचे नाकारले. गणपतराव पाटील आणि बाबुराव चरणकर यांच्या नेतृत्वाखाली जंगल संत्याग्रह फार मोठ्या प्रमाणावर पार पडला. या पंचक्रोशीतील ब्रिटिश अंमल संपला. पोलिस यंत्रणेच्या दडपशाहीखाली येथील जनता भरडली जाऊ लागली. ब्रिटिशांनी या सत्याग्रहाला 'बिळाशीचे बंड' असं नाव दिलं. या दडपशाहीच्या वार्ता कराडपर्यंत येऊन थडकल्या. पांडूअण्णा शिराळकर यांच्या माडीवर एक बैठक झाली. त्या लोकांचे मनोधैर्य वाढविण्याकरिता दोन कार्यकर्त्यांना पाठविण्याचं या बैठकीत ठरलं. त्यात साहेब व राघूअण्णा लिमये यांची बिळाशीला पाठविण्यासाठी निवड झाली.

बिळाशीला राजमार्गानं जाणं या दोघांना शक्य नव्हतं म्हणून त्यांनी आडमार्गानं जायचं ठरवलं. सोबत गुप्त ठिकाणांची नावं दिली. बिळाशीच्या देशपांडे यांनी या दोघांची व्यवस्था चोख ठेवली. या भागातील लोक या दोघांना येऊन भेटू लागले. त्यांना धीर देण्याचं काम या दोघांनी केलं. देशपांडे यांनी रात्री पारावर बैठक बोलावली. हळूहळू एका एका घरातून माणसं येऊन पारावर बसू लागली. विनाविघ्न बैठक सुरू झाली. या दोघांनी बिळाशीकरांना भरवसा दिला - तुम्ही एकटे नाहीत, तुमच्या मागे पूर्ण जिल्हा उभा आहे. महाराष्ट्र पातळीवरील नेत्यांनी तुमच्या कार्याची दखल घेतली आहे. चळवळ जोमाने पुढे चालू ठेवा...

सभा संपली. लोक एक-एक करून घरी परतले. देशपांड्याच्या वाड्यात या दोघांना निरोप देण्यात आला. येथे सभा झाल्याची माहिती पोलिसांच्या कानी नव्हती. देशपांडे यांनी सांगितलेल्या मार्गांनी हे दोघे मलकापूरला पोहोचले. मलकापूरहून कोल्हापूरमार्गे कराडला असा या दोघांचा परतीचा मार्ग होता.

राघूअण्णा लिमये हे मूळचे कोकणातले. ते साहेबांना म्हणाले, ‘‘आपण इकडे आलोच आहोत तर कोकणात जाऊन यायचं का?’’

साहेबांना राघूअण्णा लिमये यांचा कोकणात जाण्याबद्दलचा विचार आवडला. साहेबांनी लिमये यांना होकार दिला. त्यापाठीमागे साहेबांचा स्वार्थ होता तो म्हणजे एकतर साहेबांना समुद्र पाहण्याची तीव्र इच्छा आणि दुसरे आकर्षण स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भेटण्याची.

मलकापूरचा घाट ओलांडताच साखरपे गाव लागतं. या साखरपे गावच्या परिसरात लिमयेंच्या पूर्वजांचं गाव असावं. लिमये यांनी आपल्या पूर्वजांपैकी कुणी वंशज येथे आहे का याचा शोध घेतला. शेवटी एका लिमयेचं घर सापडलं. साहेब आणि लिमयेंनी येथे मुक्काम केला. गावाचा परिसर लिमये आणि साहेबांनी तुडवला. लिमयेंना आपल्या पूर्वजांच्या वंशाला भेटल्याचा आनंद झाला. कोकणस्थ असूनही त्यांनी या दोघांची जेवणाची व्यवस्था केली. साहेब मराठा असल्याची कल्पना लिमयांनी त्यांच्या वंशजाला दिली होती. दुपारी जेवतेवेळी साहेबांचं एकट्याचं पात्र सोफ्यात लावण्यात आलं. लिमयांचे वंशज मनूच्या धर्माचे पालन करणारे असावे. लिमयेंना अवघडल्यासारखं झालं. लिमयेंनी आपलं पात्र उचललं

आणि साहेबांचं पात्र जिथं लावलं होतं तिथं ते येऊन बसले. साहेबांसोबतच त्यांनी जेवण केलं. यामुळे लिमयेंचे वंशज खजील झाले.

जेवण संपल्यानंतर या दोघांनी लिमयेंच्या वंशजाचा निरोप घेतला व रत्नागिरीला पोहोचले. रत्नागिरीला सागरदर्शन व सावरकरांची भेट घेतली. सावरकरांनी नाशिकच्या अनंत कान्हेरेची आठवण काढली. या तेजस्वी वीराची भेट घेऊन साहेब व लिमये कराडला परत आले.

साहेबांचा शालेय मित्र अहमद कच्छी अत्यंत तल्लख बुद्धीचा, अभ्यासू होता. त्याची इच्छा साहेबानं प्रथम शिक्षण पूर्ण करावं व नंतर कायदेभंगाच्या चळवळीत भाग घ्यावा अशी होती. त्याचं मुंबईला जाणंयेणं होतं. मुंबईत त्याला जी चांगली पुस्तकं मिळत ती तो घेऊन येत. साहेबांना वाचावयास देत. काही प्रसिद्ध अशा गुजराती साहित्यिकांची पुस्तकंही तो आणायचा. त्याचा मराठीत अर्थ समजून सांगायचा. प्रसिद्ध गुजराती कवी कलापी यांची पुस्तकं तो साहेबांसाठी घेऊन यायचा. साहेबांना गुजराती भाषा शिकवायचा. या गुजराती शिकण्याचा उपयोग पुढे साहेबांना झाला. त्याची इच्छा असूनही त्याला कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेता येत नव्हता; पण चळवळीत भाग घेणाऱ्याबद्दल त्याच्या मनात सहानुभूती होती. त्याला करता येईल तेवढी मदत तो साहेबांना व इतरांना करीत असे.

साहेबांच्या जीवनाला संपूर्ण कलाटणी देणारा दिवस २६ जानेवारी १९३२. २०,२२ जानेवारीला तांबवे येथे प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक काशिनाथपंत देशमुख व राघूअण्णा लिमये यांनी घेतली. कराडहून साहेब या बैठकीला निमंत्रित म्हणून हजर होते. २६ जानेवारी १९३२ रोजी कराड तालुक्यात विविध ठिकाणी झेंडावंदन करून सरकारला कायदेभंग चळवळीची ताकद दाखवायची तसेच तालुक्यातून जास्तीत जास्त कार्यकर्ते कारागृहात गेले पाहिजेत, असं या बैठकीत ठरलं. साहेबानं कराड आणि आजूबाजूच्या प्रमुख गावी झेंडावंदन करून घेण्याची जबाबदारी स्वीकारली. तांबवेची बैठक संपवून साहेब कराडला परतले. सर्व कार्यकर्त्यांची बैठक घेतली. २६ जानेवारीच्या कामाची सर्वांना वाटणी करून दिली. त्यात कायदेभंगासंबंधीची पोस्टर्स रात्री संपूर्ण शहरभर चिकटावयाची, म्युनिसिपल कचेरीवर एका गटानं रात्री झेंडा फडकावयाचा, साहेबांनी शाळेच्या आवारातील

झाडावर झेंडा फडकावयाचा असे ठरले. रात्री ११ वाजेच्या सुमारास म्युनिसिपिल कचेरीवर झेंडा फडकावला. रात्री उशिरापर्यंत ठरल्याप्रमाणे कार्यवाही झाली किंवा नाही याचा आढावा साहेबांनी घेतला. प्रमुख चौकात पोस्टर्स लागले होते. एका चौकात पोस्टर चिकटवत असताना पांडूतात्या डोईफोडे पकडला गेल्याचं कळलं. गावात सन्नाटा पसरून वातावरण तंग झालं होतं. साहेब सकाळीच ८ वाजता ठरल्याप्रमाणे मित्रांना सोबत घेऊन शाळेत गेले. झाडावर झेंडा फडकावला. ध्वजवंदन करून 'वंदे मातरम'च्या घोषणा दिल्या. राष्ट्रगीत गाऊन कार्यक्रम संपविला आणि साहेब घरी परतले.

पांडूतात्याला पकडल्यानंतर साहेबांना पकडण्याची दाट शक्यता निर्माण झाली. पांडूतात्यानं साहेबांचं नाव घेतलं असण्याची शंका साहेबांना आली. साहेब घरातून परत शाळेत जाण्यासाठी निघाले. आज आपण पकडले जाऊ या शंकेची पाल साहेबांच्या मनात चुकचुकली. शाळेत भयाण शांतता पसरलेली. साहेब ११ वाजता वर्गात जाऊन बसले. थोड्याच वेळात साहेबांना मुख्याध्यापकांच्या कार्यालयातून बोलावणं आलं. साहेबांना जे समजायचं ते समजलं. पोलिस अधिकाऱ्यांनी सकाळच्या झेंडावंदनविषयी व पोस्टर्स चिकटविण्याबद्दल माहिती विचारली. त्यास साहेबांनी उत्तर दिलं,

"होय, मी हे सर्व केलं आहे आणि यापुढेही पुनःपुन्हा करीत राहण्याचा माझा संकल्प आहे."

" 'वंदे मातरम' घोषणा कुणाच्या सांगण्यावरून दिल्या?" हे पोलिस अधिकाऱ्यानं जरा दरडावून विचारलं.

"वेदमंत्राहून प्रिय आम्हा वंदे मातरम" असं पाणीदारपणे उत्तर साहेबांनी त्यांना दिलं. या उत्तरानं पोलिस अधिकाऱ्याचं पित्त खवळलं. त्यांनी मुख्याध्यापकांना सांगितलं,

"मी या विद्यार्थ्याला अटक करून घेऊन जातोय हे त्याच्या पालकाला कळवा."

स्वातंत्र्यपंढरीचे वारकरी साहेब सत्याग्रहाच्या दिंडीत स्वातंत्र्याचा झेंडा खांद्यावर घेऊन कारागृहाची वाट चालू लागले.

पोलिस चौकीत साहेबांना दिवसभर बसवून ठेवण्यात आलं. अधूनमधून या सर्व प्रकारामागे कोण आहे याची ते चौकशी करीत. अधिक माहिती

मिळवण्यासाठी पोलिस खाक्याची धमकीही ते देत. साहेब मात्र त्यांच्या धमकीला भीक घालत नव्हते. सायंकाळ होत आली. अंधारानं आपले हातपाय पसरायला सुरुवात केली. शेवटी साहेबांना दहा बाय बाराच्या अंधाऱ्या कोठडीत कोंबलं. त्या कोठडीत अजून कोण आहे कळायला मार्ग नाही... अंथरायला-पांघरायलाही नाही... चार-पाच दिवस झालेली पायपीट... दिवसभर पोटात अन्नाचा कण नाही... त्यामुळे साहेब थकून गेले होते. आपल्यासमोर काय वाढून ठेवलंय याचा अंदाज येईना. आपल्याला अटक झाल्याचं कळल्यानंतर आईची काय अवस्था झाली असेल... या विचाराच्या तंद्रीत साहेबांनी फरशीवर अंग टाकलं. निद्रेनं साहेबांना आपल्या कुशीत घेतलं.

साहेबांना सकाळी जाग आली. प्रथम साहेबांनी खोलीभर नजर फिरवली. हातापायात बेड्या असलेला एक धिप्पाड कैदी त्यांना दिसला. उंचापुरा, गोरागोमटा, दाढी वाढलेली अन् अंगात कैद्याचाच पोशाख.... साहेबांनी चाचरतच विचारपूस केली.

त्याने सांगितलं, "मी तुरचीचा कृष्णा धनगर आहे."

त्या काळी तुरचीचा तात्या आणि कृष्णा ही जोडी गाजत होती. त्यापैकीच हा एक. पुढे कृष्णाची आणि साहेबांची रास जमली. बाहेरील चळवळीबद्दल साहेबांकडं कृष्णा विचारपूस करायचा. साहेब त्याला चळवळीबद्दलची हकीकत सांगायचे. एके दिवशी साहेबांना कराडच्या न्यायाधीशांसमोर उभं करण्यात आलं. सोबत पांडूतात्या डोईफोडे होतेच. दोघांवरील गुन्हे वाचून दाखवण्यात आले. दोघांनी गुन्हे कबूल केले. न्यायाधीशांनी दोघांना अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. कायद्यानं साहेबांना कैदी ठरवलं

विठाई आपल्या लेकाला भेटण्यासाठी घरच्या सर्व मंडळींसह कराडच्या जेलमध्ये आल्या. सोबत शाळेतील एक गुरुजीही आले होते. साहेबांना पोलिस पहाऱ्यातच फौजदार कचेरीत आणण्यात आलं. फौजदारासमक्ष आईची आणि साहेबांची भेट होताच आईच्या मातृप्रेमानं डोळ्यातील आसवांना वाट मोकळी करून दिली. खेळायचं-कुदायचं वय... त्यात अठरा महिन्यांची सक्तमजुरीची सजा यामुळे आईला रडू कोसळलं. गुरुजींनी आईला सावरलं.

गुरुजी म्हणाले, "फौजदार साहेब मायाळू आहेत. साहेबांनी माफी मागितली तर ते सोडून देतील."

"काय बोलता तुम्ही गुरुजी? कुणाची माफी मागायची? काय गुन्हा केला म्हणून माफी मागायची?" आई कडाडल्या.

"माफी मागायची नाही. तब्येतीची काळजी घे" असे सांगून आई निघून आल्या. भेट संपली.

पोलिस पहाऱ्यात साहेबांना घेऊन रेल्वे पुणे मार्गावर धावू लागली. वाटेत सत्याग्रही कैद्यांची संख्या वाढू लागली. पुणे रेल्वेस्टेशनवर उतरतेवेळी सत्याग्रहींची संख्या आठ-दहा झालेली. सत्याग्रहींना मालमोटारीत बसवून मालमोटार येरवड्याकडे निघाली. येरवडा जेलसमोर मालमोटार थांबली. सत्याग्रही खाली उतरले. एक अधिकारी आला. कागदपत्रांची तपासणी केली. बाबुराव गोखले यांना थांबवून घेतलं. बाकीच्यांना मालमोटारीत बसण्याचं सांगण्यात आलं. परत सर्व जण मालमोटारीत जाऊन बसले.

"यांना कॅम्प जेलमध्ये घेऊन जा" त्या अधिकाऱ्यांनी आदेश दिला. कॅम्प जेल, येरवडा तुरुंगाच्या मागच्या मैदानाला तारेचे काटेरी कुंपण घालून त्यात तंबूच्या बराकी तयार करण्यात आलेल्या होत्या. सत्याग्रहींच्या अंगावरील कपडे काढून घेऊन त्यांच्या अंगावर जेलचे कपडे चढवले. तांब्या, वाटी व एक वळकटी त्यांना देण्यात आली.

कॅम्प जेल, बराक नं १२ साहेबांच्या जीवनाला कलाटणी देणारं विचारविद्यापीठ. या बराक नंबर १२ मध्ये साहेबांना प्रवेश मिळाला हे साहेबांचं भाग्य. या बराक नंबर १२ मध्ये महाराष्ट्रातील नामवंत सत्याग्रही होते. शालेय महाविद्यालयीन शिक्षण सोडून जे विद्यार्थी या कॅम्प जेलमध्ये आले होते त्यांना बराक नं. १२ मध्ये ठेवण्यात आलं. असे पाच-सहा विद्यार्थी. त्यापैकी साहेब एक. सोबत पांडूतात्या डोईफोडे होतेच.

निवडक शंभर माणसे राहतील अशी १२ नंबरच्या बराकीत व्यवस्था होती. आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन हेच या बराकीचे प्रमुख होते. रावसाहेबांचं इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होतं. त्यांच्या ज्ञानाचा फायदा घेण्याचं जेल अधिकाऱ्यानं ठरवलं. प्रशासनाला मदत म्हणून पटवर्धन जेल कार्यालयात जाऊ लागले. त्यांच्या या संबंधातून राजबंद्यांना उत्तम अशी सर्व विषयांची व विचाराची पुस्तकं वाचायला मिळू लागली. सक्तमजुरीची शिक्षा ही

कागदावरच होती. कधीतरी पाच-पन्नासच्या गटाला घेऊन ते रस्त्यावर खडी फोडायला लावीत. पुढे पुढे तेही काम बंद पडले. बराकीमध्ये कापडी पट्टे विणण्याचे बैठे काम मिळाले. बराकीमधील सत्याग्रहींच्या एकमेकांशी ओळखी होऊ लागल्या. त्यात पुण्याचे श्री. अंतीलकर, श्री. एस.एम. जोशी, श्री. वि. म. भुस्कुटे, आयुर्वेदतज्ज्ञ मामा गोखले यांचा समावेश होता. समविचारी व खेळाची आवड असणाऱ्यांचे एकत्र येऊन गट निर्माण होऊ लागले.

साहेबांच्या वयाच्या तरुणांचा एक गट एकत्र आला. त्यात सोलापूरचे भोसले, सेनापती बापट यांचे पुत्र वामन बापट, प्रसिद्ध डॉ. लागू यांचे धाकटे बंधू होते. साहेबांचे कराडचे मित्र कोपर्डेकर व पांडूतात्या डोईफोडे होते. पुढे या बराकीमध्ये राघूअण्णा आले. ह. रा. महाजनीसुद्धा बराकीमध्ये होते. ह. रा. महाजनी सातारा जिल्ह्याचे असल्याने साहेबांच्या परिचयाचे होते.

आचार्य भागवतांनी साहेबांना व त्यांच्या वयाच्या विद्यार्थ्यांना एक सल्ला दिला. ''तुम्हाला जेवढे ज्ञान मिळवता येईल तेवढे मिळवा. पुढे तुमचे शिक्षण पूर्ण होईल किंवा नाही काही सांगता येणार नाही. सर्व विचाराच्या ग्रंथांचे वाचन करा, चर्चा करा आणि तुम्हाला पटेल त्या विचाराच्या मार्गानं जा.''

याबाबत साहेबांनी ह. रा. महाजनी यांच्यासोबत चर्चा केली. सात-आठ जणांचा एक गट तयार झाला. ह. रा. महाजनींनी 'शाकुंतल', 'मेघदूत' यांचे वर्ग घेतले. आचार्य भागवतांनी शेक्सपियरचे 'ज्युलियस सिझर' या नाटकातील इतिहासाचे व सौंदर्यस्थळांचे बारकावे उलगडवून दाखविले. या विद्यार्थ्यांना शिक्षणाचा किती फायदा झाला हे सांगता येणार नाही; पण हे विद्यार्थी इंग्रजी ग्रंथाच्या वाचनाकडे वळले. त्यांच्यातील आत्मविश्वास वाढीस लागला. साहेब इंग्रजी ग्रंथाची निवड करून ते वाचू लागले. इतरांनी सुचविलेल्या इंग्रजी ग्रंथांचे वाचनही ते करू लागले. त्यांना इंग्रजी ग्रंथ वाचनाची आवड निर्माण झाली.

गांधीवादाच्या चर्चेसोबतच समाजवाद, मार्क्सवाद याही विचारांची चर्चा होऊ लागली. साहेबांनी आतापर्यंत गांधीवाद संपूर्णपणे स्वीकारला किंवा नाही याचं उत्तर त्यांना देता येत नव्हतं. समाजवाद व मार्क्सवाद

वाचल्यानंतर साहेबांच्या मनात वैचारिक आंदोलन सुरू झालं. ज्या विचाराचा वक्ता वर्ग घ्यायला आला की त्याचे विचार ऐकून साहेबांना आपण या विचारांचा स्वीकार करावा, असं वाटायचं. अशा दोलायमान अवस्थेतून साहेब जात होते. ह. रा. महाजनी व एस. एम. जोशी यांनी गांधीवाद स्वीकारल्याचं जाणवत नव्हतं. वि. म. भुस्कुटे हे मार्क्सवादाचे कट्टर पुरस्कर्ते झाले होते. गांधीवाद, समाजवाद व मार्क्सवाद यापेक्षा वेगळा विचार करणारा एक गट होता. टिळक आणि गांधी यांनी स्वराज्य मिळविण्यासाठी जो मार्ग दाखविला आहे त्या मार्गाचा अवलंब करून गांधीजी देतील त्या आदेशाप्रमाणं कार्य करू हा तो गट होता. गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवाद यावर चर्चा केल्यानं कार्यकर्ते एकमेकांपासून दूर जातात, एकमेकांची मनं कलुषित होतात, असं या गटाचं मत झालं होतं.

साहेब झपाटलेल्या अवस्थेत वाचन करू लागले. इंग्रजी ग्रंथ वाचताना साहेबांना इंग्रजी शब्दकोशाचा आधार घ्यावा लागायचा. आवाक्याबाहेरील ग्रंथ वाचताना अडचण आल्यास साहेब सहकाऱ्यांसोबत चर्चा करू लागले. 'रोडस् टू फ्रिडम' हे बर्ट्रांड रसेलचं पुस्तक एक महिनाभर साहेब वाचत होते. हा ग्रंथ वाचल्यावर साहेबांच्या स्वातंत्र्याच्या बाबतीत विचार करण्याच्या कक्षा रुंदावल्या. स्वातंत्र्य हा भारताचा प्रश्न नसून तो मानवमुक्तीचा प्रश्न आहे, असं साहेबांचं मत झालं होतं. गांधीजी व लेनिनच्या जीवनावरील साहित्य वाचण्यात साहेब दंग झाले. रशियन राज्यक्रांती थक्क करून सोडणारी आहे. साहेबांनी रशियन क्रांतीचं साहित्य वाचून हातावेगळं केलं. लेनिनचं कार्य ऐतिहासिक स्वरूपाचं आहे, असं साहेबांचं मत झालं. राजकीय व आर्थिक स्थितीचं विश्लेषण करताना लेनिनच्या बुद्धीचा कस लागलेला दिसल्याचे त्यांना दिसले. लेनिनची निर्णयशक्ती आश्चर्यकारक होती. लेनिनच्या विचारातून साहेब बाहेर पडतात न पडताच तोच ह. रा. महाजनी यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांची ओळख साहेबांना करून दिली. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या कार्याचा वृत्तांत ऐकून साहेब मानवेंद्रनाथ रॉय यांच्याकडे झुकू लागले. मानवेंद्रनाथ रॉय यांनी रशियन क्रांतीनंतर संघटना बांधणीत लेनिनबरोबर महत्त्वाची भूमिका पार पाडली. या भारतीयाबद्दल साहेबांच्या मनात आदर निर्माण झाला. साहेबांना रॉयच्या विचाराची ओळख डॉ. शेट्टींकडून जेलमध्ये झाली. भुस्कुटे यांनी मार्क्सच्या विचाराची अनेक

पुस्तके साहेबांना जेलमध्ये वाचावयास दिली. पुस्तकं तशी समजावयास कठीण होती. त्यातील 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' या पुस्तकाचा अभ्यास साहेबांनी भुस्कुटे यांच्याजवळ बसून केला. १२ नंबरच्या बराकीत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सत्याग्रहींची साहेबांनी ओळख करून घेतली. सोलापूरचे अनंतराव भोसले नवे सत्याग्रही मित्र मिळाले. राघूअण्णांचा कल पुस्तकं वाचण्यापेक्षा खेळाकडे जास्त होता. त्यांनी 'चला खेळू या' नावाचा क्लब सुरू केला. हुतुतू, आट्यापाट्या, खो-खो खेळामध्ये सत्याग्रही भाग घेऊ लागले. साहेबही या खेळात भाग घेत असत.

या काळात आई आणि गणपतराव दोन-चार वेळा साहेबांना भेटून आले होते. साहेबांची तब्येत पाहून आईला आनंद झाला. गणपतराव बरीच नवनवीन पुस्तकं साहेबांना भेटतेवेळी वाचण्यासाठी देत असत. बराक नं. १२ म्हणजे महाराष्ट्राच्या समाजजीवनाची शाळाच झाली होती. त्यात महाराष्ट्रातील उच्चभ्रू वर्गातील सत्याग्रहींची संख्या अधिक होती. महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाविषयी अनेक गैरसमज या मंडळींच्या मनामध्ये होते. म. फुले यांच्या विचाराच्या बाबतीत ही मंडळी अशिक्षित होती. अपवाद एस. एम. जोशी व ह. रा. महाजनी यांचा. ह. रा. महाजनी स्लेट पाटीच्या दोन्ही बाजूंनी सुविचार लिहित असत. ती पाटी बराकीमधून फिरविण्यात येत असे. त्यांच्या पत्रकारितेचा पाया या बराकीत रचला गेला. या बराकीतील वीर माने हे कोल्हापूरचे सत्याग्रही. त्यांचे वागणे, बोलणे हे ग्रामीण संस्कृतीचे प्रतीक होते. स्वातंत्र्यासाठी मन चेतलेलं, पेटलेलं होतं. बराकीतील शौचालय साफ करण्याचं काम त्यांनी स्वतःहून पत्करलं होतं. त्यांना एस. एम. जोशींचं सहकार्य होतं. माने साहेबांचे जिवलग मित्र झाले. साहेब कोल्हापूरला शिक्षणाला गेले असता दोघांत मैत्रीचे धागे बळकट झाले.

ब्रिटिश सरकारनं भारतीयांच्या मनातील स्वातंत्र्यलढ्याची ऊर्मी कमकुवत करण्याकरिता अनेक कुटिल कारस्थानं आरंभिली. त्यातलंच एक कारस्थान म्हणजे 'कम्युनल अॅवार्ड'. शेड्युल कास्टना स्वतंत्र मतदारसंघ देऊन एका समाजाला दुसऱ्या समाजापासून वेगळं करण्याचा हा कुटिल डाव ब्रिटिशांनी टाकला. यापूर्वीचा अनुभव भारतीयांच्या पदरी होताच. मुस्लिमांना वेगळा मतदारसंघ देऊन देशाच्या समाजजीवनामध्ये दुफळी निर्माण केली

होती. अस्पृश्य ठरविलेल्या समाजाला हिंदू समाजातून वेगळं करण्याच्या या निर्णयाला राष्ट्रीय पातळीवरच्या नेत्यांनी विरोध करण्याचं ठरवलं.

एक दिवस १२ नंबरच्या बराकीत महात्मा गांधी अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याच्या विरोधात उपोषणाला बसल्याची बातमी येऊन धडकली. देशभर या उपोषणाच्या संदर्भात चर्चा सुरू झाली. राष्ट्रीय पातळीवर नेत्यांची धावपळ सुरू झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत चर्चा करावयास पाहिजे, त्यांची आणि महात्मा गांधी यांची भेट घडवून आणावी या आणि अशा अनेक मार्गांचा अवलंब करून महात्मा गांधींचे प्राण वाचविले पाहिजे या मताशी सारा देश एकवटला होता. डॉ. बाबासाहेबांच्या विद्वत्तेबद्दल सर्वांच्या मनात आदर होता; पण काही अतिरेकी विचार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व इंग्रजांचे अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ असावा याबद्दल सूर जुळत आल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महात्मा गांधींसोबत चर्चा करण्यास तयार होतील की नाही याबाबत नाराजी व्यक्त करत होते. १२ नंबरच्या बराकीमध्ये रात्रंदिवस या चर्चेला उधाण आलं होतं. सकाळ-संध्याकाळ बराकीमध्ये गांधीजींचे प्राण वाचावे म्हणून प्रार्थना करण्यात येऊ लागली. बराकीमधील सर्वच गांधीजींचे अनुयायी होते. अधूनमधून मध्यस्थांचे प्रयत्न चालू असल्याचे कानावर यायचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानणारा बहुसंख्य अस्पृश्य समाज स्वातंत्र्य चळवळीकडे तटस्थाच्या भूमिकेतून पाहत होता हे साहेबांना लहानपणापासून जाणवत होतं. त्यांना या प्रवाहात ओढण्याचा कुणी प्रयत्नही केला नाही. आज त्याचे भयंकर परिणाम दिसू लागले. अस्पृश्यांना राष्ट्रीय प्रवाहामध्ये आणण्याकरिता व त्यांच्या मनात राष्ट्रीय भावना पेटविण्यासाठी काही जाणूनबुजून प्रयत्न करावयास पाहिजे, असं बराकीमधील सत्याग्रहींचं मत झालं होतं. शेवटी मध्यस्थींच्या प्रयत्नाला यश आलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनाचा मोठेपणा दाखवून पुणे करारावर सही केली. राष्ट्रीय मनाची फाळणी टळली. डॉ. बावासाहेब आंबेडकरांनी महात्मा गांधींचे प्राण वाचविले. साहेबांच्या मनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दलचा असलेला आदर अधिकच वृद्धिंगत झाला.

महात्मा गांधी येरवडा जेलमध्ये असताना कॅम्प जेल बराकीमधील सत्याग्रहींनी वरिष्ठाकडे मागणी केली की, प्रत्येक बराकीमधून निवडक सत्याग्रहींना महात्मा गांधींना भेटण्याची परवानगी द्यावी. वरिष्ठांनी

जेलप्रमुखासमोर सत्याग्रहींची ही मागणी ठेवली. जेलप्रमुखांनी आपल्या वरिष्ठांशी चर्चा करून प्रत्येक बराकीतील सत्याग्रहींनी आपल्यामधून दोन सत्याग्रही निवडायचे व त्या निवडलेल्या प्रतिनिधींना महात्मा गांधींना भेटता येईल असा निर्णय घेतला. महिन्याला किंवा दोन महिन्यांना निवडलेले प्रतिनिधी महात्मा गांधींना भेटून येत. प्रतिनिधींची महात्मा गांधींसोबत झालेली चर्चा ऐकण्यासाठी बराकीतील सत्याग्रही उत्सुक असत. महात्मा गांधी राजकीय चर्चा करण्याचे टाळीत असत. विधायक कार्य किंवा वैचारिक प्रश्नांसंबंधी विचारविनिमय करीत असत. योगायोग असा की, कॅम्प जेलमध्ये महात्मा ग़ांधीजींचे चिरंजीव रामदास गांधी होते. कॅम्प जेलचे प्रतिनिधी म्हणून तेही महात्मा गांधींना भेटून आले होते. त्यांनी सर्व बराकीमध्ये जाऊन महात्मा गांधींबरोबर झालेल्या चर्चेचा वृत्तांत दिला होता.

साहेबांचे जिवलग मित्र गौरीहर सिंहासने, शेजारच्या १३ नंबरच्या बराकीमध्ये स्थानबद्ध होते. त्यांना दोन वर्षांची कारावासाची शिक्षा झालेली होती. संघटनचातुर्याच्या जोरावर त्यांनी अनेक जिवलग मित्र मिळवले होते व ते बराक नंबर १३ चे प्रमुख झाले होते. बराक नं. तेरामधून गौरीहर यांचा साहेबांना निरोप आला की, "त्यांच्या बराकीतील सत्याग्रहींनी त्यांची गांधीजींना भेटण्यासाठी प्रतिनिधी म्हणून निवड केली." बऱ्याच दिवसांनंतर साहेबांच्या जीवनात आनंदाचा क्षण आला. गौरीहर आणि साहेबांनी गांधीजींच्या आदेशावरून असहकार चळवळीमध्ये भाग घेतला आणि जेलमध्ये आले. गौरीहर यांच्या चळवळीतील निष्ठेला फळ आल्याची जाणीव साहेबांना झाली. आपल्या मित्राला गांधीजीला भेटता आलं यातच आपलं कार्य सत्कारणी लागलं. गौरीहर गांधीजींना भेटून आल्यानंतर त्यांनी साहेबांना सांगितलेली हकीकत अशी :

चळवळीच्या निमित्ताने गौरीहर व त्यांच्या कुटुंबात जो दुरावा निर्माण झाला होता तो गौरीहर यांनी महात्माजींच्या कानावर घातला.

गांधीजी म्हणाले, "तुम्ही जर सत्याग्रहाचा निर्णय स्वत: घेतला असेल तर तुम्ही घरच्यावर अवलंबून राहायचे नाही. आता तुम्हीच तुमचे जीवन घडविण्याचा मार्ग स्वीकारला पाहिजे."

सिंहासने यांचे शिक्षण कमीच होते; पण चळवळीवरील निष्ठा अत्यंत

प्रामाणिक होती. गांधीजींनी दाखवलेल्या वाटेवरून जाण्याचे सिंहासने यांनी ठरविले. जेलमधील गांधीजींची भेट म्हणजे आपण स्वातंत्र्य मिळविले या धुंदीत सिंहासने वावरत होते. सिंहासनेंएवढाच आनंद साहेबांना झाला होता.

१९३१ साल सरून १९३२ साल उजाडलं. बारा नंबरच्या बराकीमध्ये बारा महिने कसे गेले हे सत्याग्रहींना कळलं नाही. चार वर्षे विद्यापीठाच्या जीवनात जे ज्ञान साहेब मिळविणार होते ते एक वर्षाच्या काळात साहेबांना मिळाले. विद्यापीठ परीक्षा पास होण्याचे शिक्षण विद्यार्थ्यांना देते. येथे तर समाजजीवन अभ्यासण्याचे व त्यांचे प्रश्न सोडविण्याचे शिक्षण साहेबांना मिळाले. येथील एक वर्षाची शिक्षा पूर्ण केल्यानंतर सत्याग्रहींना विसापूर जेलमध्ये जावे लागेल अशी चर्चा जेलमध्ये सुरू झाली. कॅम्प जेलमधील आठवणी सोबत घेऊन साहेब जेलच्या दरवाजामधून बाहेर पडले. क्षणभर घुटमळले. मागे फिरून जेलच्या दरवाजाकडं बघितलं. साहेबांना गहिवरून आलं. भाड्याचं घर सोडताना त्या घराबद्दलची जी आत्मीयता निर्माण झालेली असते तशीच काहीशी भावना साहेबांची जेल सोडताना झाली.

विसापूर जेलच्या भयानक कहाण्या सत्याग्रहींना कळल्या होत्या. विसापूर जेल हे दौंड ते मनमाड या रेल्वेमार्गावर विसापूर रेल्वेस्टेशनपासून पाच-सहा किलोमीटर अंतरावर आहे. ओसाड माळरान, पाण्याचे दुर्भिक्ष, कडक जेलर, मरणयातना सत्याग्रहींना सहन कराव्या लागणार होत्या. येथील हवामानही तापदायक होतं. हे तापदायक पाच महिने काढण्याचे साहेबांच्या मनाने ठरवले होते. सर्व सत्याग्रही दुसऱ्या दिवशी विसापूर जेलमध्ये दाखल झाले. या जेलबद्दल जे ऐकलं होतं ते येथे वर्षभर सत्याग्रही म्हणून राहणाऱ्या कैद्यानं पुसून काढलं होतं. गुजरात आणि महाराष्ट्रातील अनेक नामवंत सत्याग्रही या जेलमध्ये होते. येथे प्रत्येक बराकीत एक प्रवक्ता निवडला जायचा. या प्रवक्त्यास बराकीतील सत्याग्रहीच्या गरजांची पूर्तता प्रशासनाकडून करून घ्यावी लागत असे. साहेब ज्या बराकीत होते त्या बराकीचे प्रवक्ते मगनभाई पटेल हे होते. मगनभाई पटेल बडोद्याचे प्रसिद्ध काँग्रेस नेते. ते सुसंस्कृत, विनयशील, मितभाषी होते. सर्व बराकीतील सत्याग्रहींचा त्यांनी विश्वास संपादन केला होता. याच जेलमध्ये मुंबईचे थोर नेते स. का. पाटील असल्याचे साहेबांना

कळले. कॅम्प जेलचं वातावरण सत्याग्रहींनी या जेलमध्ये निर्माण केलं. स. का. पाटील यांनी अद्ययावत वाचनालय येथे सुरू केलं होतं. नवी-जुनी पुस्तकं बाहेरून जेलमध्ये येत व आतून बाहेर पाठविली जात असत. या जेलमध्ये गुजराती कैद्यांचा भरणा जास्त होता. त्यांचा सहवास लाभल्यामुळे साहेबांना गुजराती भाषा समजू लागली व बोलताही येऊ लागली. गुजराती भाषेचा उपयोग पुढे साहेब द्विभाषिकांचे मुख्यमंत्री झाले त्या वेळी झाला. कॅम्पजेल बराक नंबर बारामधील सत्याग्रही डोईफोडे, कोपर्डेकर व ह. रा. महाजनी हे साहेबांसोबत या जेलमध्ये आले. चर्चा, वाचन पुन्हा सुरू झाले. ह. रा. महाजनी साहेबांना एक दिवस म्हणाले,

"आपण वर्ष-सव्वा वर्ष चर्चा, वाचन, प्रबोधन करीत आहोत. अनेक विचारांचा अभ्यास केला. वाचनातून आपले विचार परिपक्व झाले किंवा नाही हे पाहण्यासाठी एका-एका विषयावर एकएकाचे भाषण ठेवू."

साहेबांना ह. रा. महाजनी यांचे म्हणणे आवडले. साहेबांनी बराकीतील कैद्यांसमोर 'गांधीवाद' या विषयावर ३५ ते ४० मिनिटांचं एक व्याख्यान दिलं. गांधीवादाबद्दल साहेब म्हणाले,

"गांधीजींच्या आर्थिक व राजकीय विचारांबद्दल अनेकांची वेगवेगळी मतं असू शकतात; पण गांधीजींना मानवी जीवनाला नित्योपयोगी पडणारी महत्त्वाची देणगी दिली, ती साध्य, साधनशूचिता ही होय. याबद्दल कुणाचे दुमत असण्याचे काहीच कारण नाही."

एखादा विषय घेऊन बोलण्याची ही साहेबांची पहिलीच वेळ. ह. रा. महाजनी आणि निपाणीचे कटकोळ यांनी साहेबांचं अभिनंदन केलं. बराकीतील कैद्यांना साहेबांचं भाषण आवडलं. साहेबांच्या मुद्देसूद मांडणीबद्दल ह. रा. महाजनी भारावून गेले. निपाणीचे अनंतराव कटकोळ गांधीवादी म्हणून मान्यता पावलेले नेते. त्यांनी साहेबांचं तोंडभरून कौतुक केलं. साहेबांच्या कुटुंबाची चौकशी केली. पुढील भावी वाटचालीबद्दल साहेबांना शुभेच्छा दिल्या. साहेबांचा हुरूप वाढविला. वाचन, चर्चा, चिंतनातून आपण विषयाची मांडणी करू शकतो हा आत्मविश्वास साहेबांना आला. यापुढे जे काही वाचू त्यावर आपण आपले मत व्यक्त केले पाहिजे असं साहेबांनी ठरविलं. विसापूर जेलमधील दिवस कसे गेले हे सत्याग्रहींना कळलं नाही. गावाकडून घरची व मित्रांची पत्रं येत असत. त्यात साहेबांचा

शालेय मित्र अहमद कच्छी याची पत्रं असायची. त्याची पत्र अत्यंत भावनाप्रधान असायची. साहेबांच्या शिक्षेची मुदत संपल्याची तारीख जवळ आली होती. केव्हा एकदा या जेलमधून बाहेर पडतो असं साहेबांना झालं होतं.

मे १९३३ ला शिक्षेची मुदत संपली. साहेब आणि डोईफोडे सोबतच जेलमध्ये आलेले. आज सोबतच सुटणार होते. अंगावरील जेलचे कपडे उतरून दीड वर्षापूर्वी जेलमध्ये येताना जे कपडे अंगावर होते ते अंगावर चढवून दोघेही विसापूर जेलच्या बाहेर पडले. थोडं चुकचुकल्यासारखं वाटलं. जेलचे अधिकारी साहेबांना विसापूर रेल्वेस्टेशनवर घेऊन आले. रेल्वेचे तिकीट काढून त्यांनी दौंडहून पुण्याला जाणाऱ्या रेल्वेत साहेबांना बसवून दिलं. दीड वर्षाचा दीर्घ मुदतीचा काळ घालवून घराच्या वाटेनं साहेब डोईफोडेंसोबत निघाले.

आपण सुटून आल्याचा घरच्यांना झालेला आनंद सुखावून गेला. साहेबांच्या थोरल्या वहिनीनं - ज्ञानोबांच्या पत्नीनं आपल्या मुलाला साहेबांच्या जवळ दिलं. चव्हाण घराण्याच्या नव्या पिढीच्या प्रतिनिधीला साहेबांनी मांडीवर घेतलं. त्यानं साहेबांच्या मांडीचा कब्जा घेतला. सर्व घर या मुलाच्या आगमनानं आनंदानं न्हाऊन निघालं होतं. त्याचं घरभर रांगणं, त्याच्या बाललीलांत साहेब रमून गेले असतानाच त्यांना त्यांचा बालपणीचा मित्र अहमद कच्छीची आठवण झाली. त्याला भेटण्यासाठी साहेब त्याच्या घराकडे निघाले. रस्त्यातच त्याच्या वडिलांची आणि साहेबांची गाठ पडली. साहेबांनी अहमदची ख्यालीखुशाली विचारली. त्याच्या वडिलांनी जे सांगितलं त्यावर साहेबांचा विश्वास बसेना.

त्याचे वडील म्हणाले, "तो अतिशय आजारी असून मृत्यूशी झुंजतोय."

हे ऐकताच साहेबांना धक्काच बसला. साहेबांनी त्याच्या वडिलांकडे त्याला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. अहमदचे वडील साहेबांना अहमदच्या खोलीत घेऊन गेले. अहमदच्या शरीराचा सापळा झालेला. त्याचे डोळे तेवढे बोलत होते. तेजस्वी, पाणीदार डोळ्यांतून जे बोलायचे ते तो साहेबांना बोलला. साहेब काहीएक न बोलता खोलीबाहेर पडले. एक अभ्यासू, देशप्रेमी युवकाचा शेवट नियतीनं या तऱ्हेनं करावा याबद्दल साहेबांच्या मनामध्ये नियतीबद्दल तिरस्काराची भावना निर्माण झाली. अहमद आणि साहेबांची ही भेट शेवटचीच ठरली. जन्म-मृत्यूच्या खेळामध्ये

नियती आनंद आणि दु:ख याचा समन्वय घडवून आणते. हा समन्वयच सुखदु:खाच्या भवसागरात मानवाला जगण्याची उमेद देत असतो. जन्माने जीवन जगण्याची प्रेरणा मिळते तर मृत्यूने त्यागमय जीवन जगण्याची ऊर्मी मिळते या संमिश्र भावनेचं तुफान साहेबांच्या मनामध्ये घोळू लागलं.

स्वातंत्र्याच्या संघर्षामध्येही शिक्षण, ज्ञान, विचारशक्ती यांची अनिवार्यता किती आहे याची जाणीव साहेबांना कारागृहात असतानाच झाली होती. वैचारिक बैठक एकदा निश्चित झाली की, तर्कशास्त्राच्या आधारे आपण आपले विचार जनतेच्या गळी उतरवू शकतो याचं भान साहेबांना आलं होतं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या सान्निध्यात साहेब आल्यानंतर शिक्षण पूर्ण केल्याशिवाय आपली धडगत नाही हे मनोमन साहेबांनी ठरविलं. पुढील शिक्षण पूर्ण करण्याच्या तयारीला साहेब लागले.

ज्ञानोबांच्या पोटी चव्हाण घराण्याचा वंश जन्माला आला. त्याचा पायगुण शुभ ठरला. साहेब कारागृहातून सुटून आले. नंतर मॅट्रिक पास झाले. आई नातवाला मांडीवर घेऊन खेळवत होत्या तोच समोरून बाबुराव नरेवाडीकर आणि गणपतराव दोघेही सोबतच येताना दिसले. घरात आल्यानंतर दोघांचं चहापाणी झालं. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यानंतर थोड्या वेळानं बाबुराव नरेवाडीकर आईला म्हणाले,

"आई, तुम्हाला एक विचारू का?"

"विचार की बाबा तुला काय विचारायचे ते.." आई.

"मी गणपतरावांसाठी एक सोयरीक घेऊन आलोय..." बाबुराव.

"लग्न करतो की नाही हे गणपतलाच विचार की! मी तर त्याला बोलून बोलून थकले. सारखा म्हणतो, यशवंताचं शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लग्न करील म्हणून. योग्य वेळी लग्न झालं म्हणजे बरं असतं." आई.

"घरंदाज माणसं आहेत. त्यांनाही गणपतराव आवडले आहेत. त्यांनी कामेरीच्या कुस्तीच्या फडात गणपतरावांची कुस्ती बघितली आणि त्यांनी गणपतरावांविषयी माझ्याकडे विचारपूस केली. त्यांना आपल्या घराण्याशी सोयरीक करावयाची इच्छा आहे." बाबुराव.

"चांगली गोष्ट आहे. पण कामेरीचे कोण हे?" आई.

'पांडुरंग जाधव. माझे मित्र आहेत ते. त्यांची बहीण - भागीरथी तिचं नाव. मुलगी सुंदर आहे. त्यांचे संबंधही चांगले आहेत." बाबुराव.

गणपतरावांनी पुष्कळ आढेवेढे घेतले; पण आईपुढे त्यांची मात्रा काही लागू पडेना.

आईने आदेश दिला, ''चारचौघा मित्रांना सोबत घेऊन मुलगी पाहून या.''

गणपतरावांनी मुलगी पसंत केली; पण त्यासोबत काही अटी घातल्या. मी लग्न सत्यशोधक पद्धतीने करेल. लग्नात हुंडा नाही, भटजी नाही अन् जेवणावळही नाही! कुठले वाजंत्री नाही. अक्षता म्हणून फुलांचा उपयोग करायचा.... समोरच्यांना माझ्या या अटी मान्य असतील तर मी लग्नास तयार आहे.

शेवटी जेवणावर तडजोड करून गणपतराव लग्नास तयार झाले. साहेबांना गणपतरावांचे विचार आवडले; पण आपल्याला करवला म्हणून मिरवण्याच्या आनंदाला मुकावे लागणार या चिंतेने त्यांना ग्रासले. लग्नाच्या दिवशी साहेब बाळानाथ मठ ते घरापर्यंत उगीचच येरझारा घालू लागले.

या विवाहाचे नेतृत्व सत्यशोधक समाजाचे कडवे प्रवर्तक कळंबे गुरुजी यांनी केले. बाळानाथ मठ हे सत्यशोधक समाजाचे पंढरपूर होते. यशवंतराव पाटील (पालकर) भिखूनाना साळुंखे (किसळ) इत्यादी कार्यरत होते.

कामेरीकर मोजके वऱ्हाडी व बेनाडीचे क्षात्रधर्मगुरू यांना शाहू महाराजांच्या मोटारीतून घेऊन आले. लोकांना अचंबा वाटला. गणपतरावांचा भटजीला विरोध होता. कामेरीकरांनी पूर्ण विधिवत विवाह पार पाडण्याचा प्रयत्न केला. मठात अगदी गांधी पद्धतीनं विवाह पार पडला. वधू आणि वरांनी एकमेकाला सुताचे हार घातले. फुलांचा अक्षता म्हणून उपयोग केला. या लग्नाची चर्चा बरेच दिवस कराडकर करीत होते. जाधव घराण्याची लेक भागीरथी चव्हाण घराण्याच्या मधल्या सूनबाई म्हणून घरात आल्या.

साहेब नियमित शाळेत जाऊ लागले. बरोबरीचे मित्र दोन वर्षे पुढे गेले होते. साहेबांपेक्षा वयानं लहान असलेल्या वर्गबंधूबरोबर साहेब शाळेत जाऊ लागले. शाळेत शिक्षक जे शिकवीत असत त्या विषयात आपण कितीतरी पुढे गेलो आहोत. आपली परीक्षा आताच घेतली तर बरं होईल, असं साहेबांना वाटायचं. अभ्यास केल्यानंतर फावल्या वेळेत सर्वहरा वर्गात काम करायचं, असं जेलमध्ये असतानाच सत्याग्रहींनी ठरविलं

होतं. साहेब हरिजन वस्तीत जाऊ लागले, तेथील कार्यकर्त्यांशी चर्चा करू लागले. स्वातंत्र्य चळवळीबद्दल दलित वर्गात आस्था का नाही याची कारणं साहेब शोधू लागले. दलितांना मंदिरप्रवेशाची चळवळ फोफावत होती. महार समाजातील साहेबांच्या मित्रांना मंदिर प्रवेशाबद्दल काडीचीही आत्मीयता वाटत नव्हती. "मंदिर प्रवेशाने आमचे पोट थोडेच भरणार आहे? गावातील लोकांचा रोष कशाकरिता पत्करायचा?" असं मत दलित मंडळी व्यक्त करीत असे. महात्मा गांधींचा मंदिर प्रवेश कार्यक्रम दलित मंडळींच्या पचनी पडला नाही; पण त्यांचं महत्त्व काही कमी होऊ शकत नाही, असं साहेबांना वाटायचं.

जुन्या आणि नव्या मित्रांच्या सहकार्यानं 'हरिजन सेवा' ही चळवळ दलित वस्तीत चालवायची, असं साहेबांनी ठरविलं. कराड तालुक्यातील शणोली गावचे मूलचंदभाई महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडून हरिजन सेवा करण्याकरिता गावी आले होते. साहेबांनी त्यांच्याशी संपर्क साधला. चर्चेअंती एक मंडळ स्थापन करून त्या माध्यमातून कार्य करायचं ठरलं. या कामाकरिता वरिष्ठांचा आशीर्वाद आवश्यक वाटला म्हणून साहेबांनी शहरातील थोर देशभक्त पांडुरंगअण्णा शिराळकर यांची भेट घेतली. हे देशभक्त धनिक असल्यानं त्यांनी साहेबांना प्रोत्साहन दिलं.

सुटीच्या दिवशी कराडच्या पंचक्रोशीतील खेड्यांना साहेबांनी भेटी देण्याचा सपाटा लावला. सोबत मित्रमंडळी असायची. खेड्यातील दलित वस्तीत त्यांचं चांभार व मातंग समाजात स्वागत व्हायचं; पण दलितांतील महार समाज मात्र फटकून राहायचा. साहेबांच्या हे लक्षात आल्यानंतर कराड येथील महार समाजातील कार्यकर्ते मोहिते यांची भेट घेण्याचं साहेबांनी ठरविलं. हे मोहिते कराडच्या नगरपालिकेत नोकरीवर होते. साहेबांनी या मोहितेंची भेट घेतली. माणूस चाणाक्ष वाटला. हरिजन सेवा चळवळीबद्दल त्यांच्या मनात आकस होता. साहेबांनी या चळवळीबद्दलच्या शंका-कुशंकांचं निरसन केलं. मोहितेंनी साहेबांना पूर्णपणे टाळलं तरी साहेबांनी या समाजात काम करण्याचं ठरविलं. प्रथम या समाजाला शिक्षित करू, यांच्यात शिक्षणाचे प्रमाण वाढले म्हणजे हा समाज आपोआपच स्वातंत्र्य चळवळीच्या मुख्य प्रवाहात सामील होईल, असे त्यांना वाटत होते.

दलित कार्यकर्ते मोहिते यांच्या तऱ्हेवाईक वागणुकीमुळं साहेब नाउमेद

न होता जोमाने कामाला लागले. मूलचंदभाई यांनी शणोली येथे व साहेबांनी कराडमध्ये रात्रीची शाळा दलित वस्तीत सुरू करण्याचं ठरविलं. कराडमधील दलित वस्तीतील कार्यकर्त्यांच्या भेटी घेऊन त्यांना साहेबांनी विश्वासात घेतलं. साहेबांच्या कार्याबद्दल ज्यांना माहिती होती अशा एक-दोन कार्यकर्त्यांनी आपल्या वस्तीत सहकार्य करण्याचं साहेबांना आश्वासन दिलं. या कार्यक्रमाच्या शुभारंभाला कुणाला बोलवावं याविषयी साहेब विचार करू लागले. या समाजासाठी ज्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य खर्ची घातलं अशा कर्मयोग्याला आमंत्रित करावं असं साहेबांना मनोमन वाटायचं.

१९३० च्या चळवळीतील हरिभाऊ लाडांची साहेबांना आठवण झाली. हरिभाऊ लाड येरवड्याच्या तुरुंगातून सजा भोगून परत आल्यानंतर त्यांचे जेलमधील अनुभव ऐकण्याकरिता साहेबांसह अनेक कार्यकर्ते हरिभाऊ लाड यांच्या गाठीभेटी घेत असत. हरिभाऊ लाड यांनी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आठवणी साहेबांना सांगितल्या होत्या. हरिभाऊ लाड अपंग असल्यानं जेलमधील सर्वांचे आवडते होते. विठ्ठल रामजी शिंदे हरिभाऊंना जीव लावत असत. या रात्रीच्या शाळेच्या उद्घाटनाला विठ्ठल रामजी शिंदे यांना निमंत्रण देण्याचं साहेबांनी ठरविलं.

रात्रीच्या शाळेच्या उद्घाटनाचं निमंत्रण देण्याची जबाबदारी कायकर्त्यांनी साहेबांवर सोपवली. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे बहुजनांतील आदरणीय व्यक्ती होते. त्यांना कसं आणि कुणामार्फत भेटावं याचा विचार साहेब करू लागले. साहेबांनी आपण स्वत:च त्यांना भेटण्याचा शेवटी निर्णय घेतला. सकाळी सकाळी रेल्वेनं साहेब पुण्याला पोहोचले. रेल्वेस्टेशनवरच तोंड, हातपाय धुऊन तयार झाले. कपडे बदलण्याचा प्रश्न नव्हता. आहे त्या कपड्यांना झटकून ठाकठीक केलं. तोपर्यंत चांगलं उजाडलं होतं. विचारपूस करीत साहेब कर्मवीरांच्या घरी आठ-सव्वा आठला पोहोचले. पुण्यात कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांना 'आदरणीय कर्मवीर अण्णासाहेब शिंदे' म्हणत असत. योगायोगानं कर्मवीर अण्णासाहेब शिंदे घरीच होते. आस्थेवाईकपणानं साहेबांची विचारपूस कर्मवीरांनी केली. एक-दोन तास साहेबांसोबत चर्चा केली. घरात कोण कोण असतं याची चौकशी केली. साहेबांनी आईबद्दल थोडक्यात माहिती कथन केली. साहेबांचं सर्व म्हणणं शांतपणे कर्मवीरांनी ऐकून घेतलं व म्हणाले,

"मी येण्यास तयार आहे; पण माझी एक अट आहे."

हे ऐकताच साहेबांचा चेहरा काहीसा पडल्यासारखा झाला. आशाळभूत नजरेनं साहेब कर्मवीर अण्णासाहेब शिंदेंकडे पाहू लागले.

कर्मवीर अण्णासाहेब पुढे म्हणाले, "तुझ्या घरी हरिजन माझ्यासोबत पंगतीला जेवतील."

साहेबांनी मागचा पुढचा विचार न करता 'चालेल' असा होकार दिला.

कर्मवीर अण्णासाहेबांनी पुढे विचारलं, "घरी विचारून आलास काय?"

साहेब म्हणाले, "नाही."

पुढे त्यांनी सांगितलं, "अठरापगड जातींची माझी मित्रमंडळी माझ्या घरी येतात. त्यात हरिजनही असतात. माझी आई सर्वांना माझ्याच रूपात बघते."

सर्व खात्री पटल्यानंतरच कर्मवीर अण्णासाहेबांनी कराडला येण्याचं मान्य केलं. दिलेल्या तारखेला अण्णासाहेब कराडला आले. शहरभर पायी फिरले. दलित वस्तीत हिंडले. हरिजन वाड्यात रात्रीच्या शाळेचं उद्‌घाटन केलं. त्यांच्यासोबत रमले. साहेबांच्या घरी दलित मंडळींसोबत जेवण घेतलं. या घटनेमुळं साहेबांचा दलित वस्तीत काम करण्याचा हुरूप वाढला.

साहेब महार वस्तीत फळा, खडू व काही पुस्तके घेऊन त्यांच्या एकत्र जमण्याच्या ठिकाणी गेले. पहिल्या दिवशी पाच-सहा मुले जमली. साहेबांनी त्यांना शिकविलं. दुसऱ्या दिवशी साहेबांना कळलं की ही शाळेत जाणारी मुलं आहेत. त्या वस्तीतील एका सद्‌गृहस्थाला साहेबांच्या चिकाटीची दया आली आणि त्यांनी पाच-दहा प्रौढ अशिक्षितांना रात्रीच्या शाळेत येण्याबद्दल सांगितलं. तीन-चार महिन्यांनंतर या शाळेकडे कोणी ढुंकूनही पाहिलं नाही. साक्षरतेचे वर्ग चालविले. प्रौढ शाळा आपोआपच बंद पडली. हायस्कूलमधील दोन-चार हरिजन मुलं आता कॉलेजमध्ये शिकत होती. ती साहेबांच्या परिचयाची होती. त्यांच्याशी साहेबांनी संपर्क साधला. त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या एका टोकाच्या होत्या. "मंदिरप्रवेश, शिक्षणाचा श्रीगणेशा याबद्दल त्यांच्या मनात तिरस्कार जाणवला. अन्याय करणाऱ्यांकडून न्यायाची अपेक्षा करणे म्हणजे मूर्खपणाच ठरेल.

आता आमचे प्रश्न आम्हाला आमच्या ताकदीवर सोडवावे लागतील याबद्दल आमच्या मनामध्ये कुठलीही शंका राहिली नाही. डॉ. आंबेडकर आमचे प्रश्न सोडविण्यासाठी सक्षम आहेत. आम्ही केवळ त्यांचे नेतृत्व मानतो.'' अशा त्या भावना आहेत.

साहेबांनी आपल्या प्रौढ शिक्षण शाळेचा वृत्तांत कर्मवीर अण्णासाहेब शिंदे यांना कळविण्याचं ठरविलं. कारण आपण त्यांची फसगत केली असा त्यांचा समज होऊ नये म्हणून हरिजन सेवा आणि मॅट्रिकचा अभ्यास यात साहेबांनी स्वत:ला वाहून घेतलं. परीक्षा तीन-चार महिन्यांवर येऊन ठेपलेली. साहेबांचा आवडता विषय संस्कृत शाळेत चांगल्या प्रकारे शिकविला गेला नाही. काही मुलांनी बाहेर संस्कृतची शिकवणी लावल्याचं साहेबांच्या कानावर आलं. तशी व्यवस्था साहेबांना करता आली नाही. शहरातील एक शास्त्री विद्यार्थ्यांना बोलावून संस्कृत शिकवीत असत. साहेबांचा एक जिवलग मित्र अनंतराव कुलकर्णी त्या शास्त्रीकडे जात असे. कुलकर्णीला शास्त्रीबुवाकडे चौकशी करण्यास साहेबांनी सांगितलं. तीन-चार दिवस लोटले तरी कुलकर्णी काही बोलेना. शेवटी साहेबांनी त्याला विश्वासात घेऊन विचारलं तेव्हा कुठं कुलकर्णी अपराधी मनानं म्हणाला,

''शास्त्रीबुवा म्हणाले, मी अब्राह्मणाला संस्कृत ही देववाणी शिकविणार नाही.''

हे सांगताना कुलकर्णीचे डोळे पाण्याने डबडबले होते. साहेबांनी कुलकर्णीची समजूत काढली. साहेबांनी संस्कृतचा नाद सोडला व मराठी विषय घेऊन तीन-चार महिन्यांत परीक्षेची तयारी केली.

हरिजन सेवा कार्यात साहेबांना अपयश आलं असलं तरी साहेबांनी मॅट्रिकच्या परीक्षेत यश संपादन केलं. पुढील शिक्षणाबद्दल घरात चर्चा सुरू झाली. आर्थिक ओढाताण घरात होतीच. आई व थोरल्या दोन्ही भावांनी पुढील शिक्षणाबद्दल साहेबांना विचारलं. साहेबांनी पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरला जातो म्हणून सांगितलं. सामाजिक समतेचे जनक राजर्षी शाहू महाराजांनी तळागाळातील विद्यार्थ्यांकरिता मोफत शिक्षण व वसतिगृहाची व्यवस्था केलेली होती. साहेबांनी महाविद्यालयीन शिक्षणाकरिता कोल्हापूरची निवड केली. आई व दोन्ही बंधूंनी साहेबांच्या शिक्षणाचा खर्च त्यांच्या ऐपतीनुसार उचलण्याचं ठरविलं. साहेबांनी त्यांचे मित्र गौरीहर सिंहासने

यांच्याकडे पुढील शिक्षणाचा मनसुबा बोलून दाखविला. खर्चाबद्दलही चर्चा केली. गौरीहर सिंहासने यांनी मित्रमंडळींच्या वतीनं साहेबांना खर्चाबद्दल आम्ही सर्व पाहून घेऊ असं सांगितलं. शेवटी १९३४ च्या जूनमध्ये साहेब कोल्हापूरला पुढील महाविद्यालयीन शिक्षणासाठी निघाले.

आज साहेब कोल्हापूरला जाणार याबद्दल घरात दोघी जावांचं बोलणं चालू होतं. दोघींनी साहेबांची थट्टामस्करी करण्याचं ठरविलं. साहेब बाहेरून घरात आले. त्यांनी पुतण्याला उचलून कडेवर घेतलं.

त्याच्याशी बोलू लागले, "काय लबाडा, चलायचं का कोल्हापूरला?"

तोच दरवाजाआडून सौ. सोनू वहिनींचं बोलणं ऐकू आलं.

त्या म्हणाल्या, "भाऊजी, पुतण्याला घेऊन जाता सोबत; पण तिथं त्याला सांभाळायला काकू हवीय ना?"

"मला नाही कळलं तुमचं म्हणणं." साहेब.

"वेड पांघरुण पेडगावला जाऊ नका..." सौ. भागीरथी वहिनी.

"खरंच मला नाही कळलं. असं कोड्यात का बोलता वहिनी? सरळ ते काय विचारा." साहेब.

"नाही म्हटलं, आम्ही असं ऐकतो की शहरात पोरीपण असतात म्हणे सोबत शिकायला!" सौ. सोनू वाहिनी.

"त्यात काय विशेष!" साहेब.

"पुतण्याला काकू आणू नका म्हणजे झालं!" सौ. भागीरथी वहिनी.

"नाही... नाही.... असं काही होणार नाही." साहेब.

दोघी जावांना दिराची बराच वेळ फिरकी घ्यावयाची होती; पण आई तिथे आल्या आणि साहेबांची सुटका झाली. आईनं साहेबांना शहरात गेल्यानंतर स्वत:ची काळजी घेण्याबद्दल जतावलं. म्हणाल्या - खाण्यापिण्याची आबाळ करू नको, अभ्यास मन लावून कर, तब्येतीला जप, आम्ही तुला काहीएक कमी पडू देणारी नाही...

साहेब कोल्हापूरला शिक्षणाला आल्यानंतर त्यांनी वसतिगृहामध्ये राहायचं नाही असं ठरविलं. येथील सर्व वसतिगृहे जातवार होती. साहेबांच्या मनाला जातवार वसतिगृहांची कल्पनाच मान्य नव्हती. आपल्या मित्राच्या सहकार्यानं साहेब शिवाजी पेठेत राहू लागले. साहेबांसोबत सत्याग्रही म्हणून विसापूरच्या जेलमध्ये असलेले गांधीवादाचे कट्टर पुरस्कर्ते श्री.

अनंतराव कटकोळ या शिवाजी पेठेत राहत असत. त्यांनी साहेबांना स्वतंत्र दोन खोल्या राहण्यासाठी दिल्या होत्या. वीर माने हेही साहेबांना मदत करीत असत.

डॉ. बाळकृष्ण हे राजाराम कॉलेजचे प्राचार्य. कॉलेजचं वातावरण उत्साहवर्धक. स्वत: डॉ. बाळकृष्ण विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. पंजाबमधून इथं आलेले. त्यांना भेटण्याचा प्रयत्न साहेबांनी केला. साहेबांना भेट मिळाली. आपल्या आयुष्याची दोन वर्षे स्वातंत्र्य चळवळीत गेली; पण आता मला शिक्षण पूर्ण करावयाचे आहे, असं त्यांनी मनमोकळेपणानं सांगितलं. डॉ. बाळकृष्ण यांनी तू जोपर्यंत अभ्यासात लक्ष घालशील तोपर्यंत मी तुझ्या पाठीशी राहील. हे संस्थानी राज्य आहे. इथल्या राजकारणात तू अजिबात लक्ष घालू नको, असं बजावलं. साहेबांनी त्यांना येथील अनेक कार्यकर्ते माझ्यासोबत विसापूरच्या जेलमध्ये होते. त्यांचा माझा चांगला घरोबा निर्माण झालेला आहे हेही सांगून टाकलं. सातारा जिल्ह्याच्या राजकारणात मात्र मी अधूनमधून लक्ष घालीत राहील. अर्थात याबद्दल आपली काही हरकत नसेल तर, असे बाळकृष्णांना साहेबांनी सांगितले. डॉ. बाळकृष्ण यांचा विश्वास साहेबांनी संपादन केला. पहिल्या वर्षाचा अभ्यास अगदी सोपा होता. संस्कृत विषय मॅट्रिकला सोडावा लागल्यानं साहेबांनी अर्धमागधी विषय निवडला होता. या विषयाचा मात्र साहेबांना अभ्यास करावा लागला.

त्याकाळात महाराष्ट्रात कादंबरीकार म्हणून गाजत असलेले ना. सी. फडके साहेबांना तर्कशास्त्र शिकवीत असत. त्यांची शिकविण्याची पद्धत साहेबांना तर्कशास्त्राची आवड निर्माण करून गेली. दुसरे शिक्षक माधवराव पटवर्धन. अतिशय विद्वान शिक्षक; पण ना. सी. फडकेंसारखे विद्यार्थ्यांत प्रिय नव्हते. उत्तम कवी म्हणून साहित्यजगतात त्यांचा नावलौकिक झालेला. इंग्रजी विषय प्रभावीपणे शिकवीत. त्यांचं नावही अर्धे मराठी, अर्धे इंग्रजी 'माधव ज्युलियन' या नावाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये चर्चा असायची. दुसरे इंग्रजीचे प्रोफेसर बोस. यांचं शिकविण्याचं कौशल्य साहेबांना हायस्कूलमधील दत्तोपंत पाठक यांच्यामध्ये पाहावयास मिळालं. इंग्रजी कविता शिकवावी ती प्रोफेसर बोसांनीच.

कोल्हापुरात साहेबांना आजाराने घेरलं. चार-दोन दिवस साहेबांनी

ताप अंगावर काढला. साहेबांना फणफणून ताप चढला. अंगातलं सर्व अवसान गळालं. आजाराची गंभीरता साहेबांच्या लक्षात आली. कराडला जाण्याचा निर्णय घेतला. आहे त्या कपड्यानिशी साहेब बसने कराडला निघाले. तीन तासांच्या प्रवासात साहेबांना कसलंच भान राहिलं नव्हतं. हातापायात त्राण उरला नव्हता. कसंतरी करून साहेब बसस्थानकावरून घरी पोहोचले. साहेबांना अचानक आलेलं पाहून घरातील मंडळी आवाक झाली. गणपतरावांनी धावपळ करून डॉक्टरला बोलावलं. डॉक्टरांनी मुदतीचा ताप असल्याचं सांगितलं. या तापाला पथ्यपाणी व विश्रांती हेच औषध असल्यानं साहेबांना एक महिना घरात पडून राहावं लागणार होतं. फळं आणि फळाच्या रसावर एक महिना काढायचा म्हणजे एक संकटच. पण साहेबांनी हा त्रास सहन केला. डॉक्टरांनी तपासून अजून पंधरा दिवस कराडला राहावं लागेल, असं सांगितलं. शिक्षणाचं हेही वर्ष वाया जाणार असं साहेबांना वाटू लागलं. प्राचार्य बाळकृष्ण यांना भेटून या आजाराबद्दल सांगावं अशी विनंती साहेबांनी गणपतरावांना केली. गणपतरावांनी कोल्हापूरला जाऊन प्राचार्य बाळकृष्ण यांची भेट घेतली. साहेबांच्या आजाराबद्दल सविस्तर कल्पना दिली. जवळजवळ दीड महिन्यानंतर साहेब कोल्हापूरला परतले. सर्वप्रथम साहेबांनी प्राचार्यांची भेट घेतली. आजाराची वस्तुस्थिती त्यांच्या कानावर घातली. प्राचार्यांनी साहेबांना टर्म तर दिलीच दिली; पण त्यांचा परीक्षा फॉर्म विद्यापीठाला पाठविला. साहेबांनी या परीक्षेचं मनावर घेतलं. भुसारी यांच्या वाड्यात राहणारे नानासाहेब आयचित, आनंदराव चव्हाण हेही साहेबांसोबत अभ्यासाला होते. एकदाची परीक्षा संपली. परीक्षेच्या निकालाबद्दल मनात धाकधूक होती. कराड ते कोल्हापूर सारखी दगदग सहन करावी लागली. शेवटी परीक्षेचा निकाल लागला. साहेब चांगले गुण घेऊन पास झाले. साहेबांना आपल्यासोबत अभ्यास करणारे आयचित व चव्हाण पास झाल्याचा आनंद झाला. आनंदराव-चव्हाणांनी विद्यापीठात एक हुशार विद्यार्थी म्हणून नाव कमावलं. विद्यार्थीदशेत आनंदरावांबद्दल जो जिव्हाळा निर्माण झाला होता ते शेवटपर्यंत टिकला नाही. पुढे राजकारणात दोघांत मतभेद निर्माण झाले. आनंदरावांविषयीचा विद्यार्थीदशेतला आदर मात्र कायम राहिला. आयचित यांनी शेवटपर्यंत साहेबांना साथ दिली.

१९३५ चा प्रांतिक सरकारे बनविण्याचा कायदा पास झाल्यानं राजकारणानं वेग घेतला. साहेब ज्युनियर बी.ए.ला असताना त्यांना कराडहून मित्रमंडळीचं बोलावणं आलं. १९३७ मध्ये होऊ घातलेल्या निवडणुका सर्व पक्षांनी लढविण्याचा निर्णय घेतला. नाही, होय म्हणता म्हणता काँग्रेस पक्षानं निवडणुकीत उतरायचा निर्णय घेतला. साहेबांनी या निर्णयाचं स्वागत केलं. साहेब कराडला आले. मित्रमंळींची बैठक घेतली. या बैठकीत तरुणासाठी एक तिकीट मागायचं ठरलं. त्याकरिता उमेदवाराची चाचपणी सुरू झाली. जिल्ह्यातील वरिष्ठ मंडळींचा आशीर्वाद असल्याशिवाय हे शक्य नव्हतं. जिल्ह्याचे वरिष्ठ नेते भाऊसाहेब सोमण यांना भेटून त्यांनी तरुणांच्या पाठीशी उभं राहावं अशी त्यांना गळ घालावी असे म्हणत साहेब व मित्रमंडळ भाऊसाहेब सोमण यांना भेटले व म्हणाले,

"ग्रामीण भागातील चळवळीमध्ये अग्रभागी असलेल्या एका तरुणाला उभं करावं असा आमचा विचार आहे. त्याला आपला आशीर्वाद हवा."

सोमण यांनी शांतपणे या तरुणांचं ऐकून घेतलं. घाई न करण्याबद्दल सूचना दिल्या. श्रेष्ठीला ही गोष्ट पचनी पडेल असं मला वाटत नाही, तरीपण मी प्रयत्न करील, असं आश्वासन सोमण यांनी तरुणांना दिलं.

स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये सामान्यांतील सामान्य माणूस व श्रीमंतांतील श्रीमंत माणूस सहभागी होता. काँग्रेसमध्ये शहरी भागातून उच्चभ्रू वर्गातील डॉक्टर, वकील ही मंडळी होती. ग्रामीण भागामध्ये जमीनदार व वतनदार वर्ग हा होता. काँग्रेस पक्ष या दोन वर्गामधूनच उमेदवार ठरवीत असे. सामान्य कार्यकर्त्याला वाव मिळण्याचा प्रश्नच नव्हता. साहेबांनी निवडक मित्रमंडळींची बोरगाव इथे बैठक घेतली. सोमण यांच्या भेटीत काय चर्चा झाली याची माहिती दिली.

"सोमण तेवढे ठामपणानं बोलले नाहीत. आपल्या मागणीला त्यांचा पाठिंबा राहीलच असं काही सांगता येणार नाही."

आपली मागणी श्रेष्ठींपुढे रेटायची असं या बैठकीत ठरलं. सर्वसामान्याला चालेल असा ग्रामीण भागातील उमेदवार निवडण्याची जबाबदारी साहेबांवर सोपविण्यात आली. साहेबांनी असहकार चळवळ, कायदेभंगाच्या चळवळीमध्ये ज्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून सत्याग्रही म्हणून कारागृहाची सजा भोगली होती या निकषावर उमेदवार निवडण्याचं

ठरविलं. राघूअण्णा लिमये आणि साहेबांचं आत्माराम पाटील या नावावर एकमत झालं. आत्माराम पाटील यांचं नाव शेवटपर्यंत लावून धरण्याचं ठरलं.

आत्माराम बापू पाटील जमीनदारही नव्हते आणि लहान शेतकरीही त्यांना म्हणता येणार नाही. ते मध्यम शेतकरी होते. आत्माराम बापू पाटील दोन भावांसोबत उत्तम प्रकारे आपला शेतीव्यवसाय करत. थोरल्या आणि थाकट्या भावांनी शेती सांभाळायची व मधल्या भावानं म्हणजे आत्माराम बापू पाटलानं पूर्णवेळ स्वातंत्र्य चळवळीत काम करायचं असं त्या भावंडांमध्ये ठरलेलं. आत्माराम पाटील पूर्णवेळ चळवळीत सहभागी होते. त्यांच्याबद्दल मतदारसंघात आपुलकीची भावना होती. आत्माराम पाटलांसारखा शेतकऱ्यांचा प्रतिनिधी प्रांतिकला मान्य करावा लागेल; पण आताच जिल्ह्याच्या नेतेमंडळीला दुखवायचे नाही असं साहेबांनी ठरविलं. आत्माराम पाटलांची बाजू मांडण्याचं काम साहेबांवर सोपविण्यात आलं. साहेबांनी आत्माराम पाटील यांच्या कार्याची माहिती जमा केली. १९३० व ३२ च्या दोन्ही आंदोलनांमध्ये ते सहभागी होते. दोन्ही वेळेस त्यांना कारागृहात डांबण्यात आलं होतं. पूर्णवेळ देशसेवेसाठी वाहून घेण्याचं त्यांनी ठरविलं होतं. कोल्हापूर येथे मॅट्रिकपर्यंतच शिक्षण पूर्ण केलं होतं. बोलण्याचालण्यात घरंदाजपणा होता. भाषेवर प्रभुत्व होतं. संघटनचातुर्य त्यांच्याजवळ होतं. उंचीनं कमी पण व्यक्तिमत्त्व आकर्षक होतं.

प्रांतिकच्या पुढाऱ्यांच्या घराचे उंबरठे झिजविण्याचं काम साहेब व कार्यकर्त्यांनी सुरू ठेवलं. आत्माराम पाटील स्वत: सातारला शंकरराव साठे, भाऊसाहेब सोमण यांची भेट घेऊन कार्यकर्त्यांच्या भावना त्यांच्या कानावर घालायचे. साहेबही दर शनिवारी-रविवारी कोल्हापूर, सातारा, कराड असा नियमित प्रवास करून आत्माराम पाटील यांच्या उमेदवारीबद्दल प्रयत्नशील होते. प्रांतिकच्या श्रेष्ठींकडून तीच गुळगुळीत उत्तरं साहेबांना मिळायची. आत्माराम पाटलांच्या उमेदवारीबद्दल बऱ्याच बातम्या वर्तमानपत्रांत येऊ लागल्या. कार्यकर्ते विरुद्ध प्रांतिकचे श्रेष्ठी असा संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली. आत्माराम पाटलांच्या जवळचे बुवासाहेब गोसावी हे प्रांतिकच्या कर्त्या माणसांपैकी एक होते. त्यांना वारंवार भेटून आपली बाजू त्यांच्यासमोर मांडणं हे काम कार्यकर्ते करू लागले. वर्तमानपत्रामधून

ज्या पुढाऱ्यांची नावं उमेदवार म्हणून येत होती त्यांची साहेब भेट घ्यायचे. ते निवडणूक लढविण्यास तेवढे उत्सुक दिसले नाहीत.

आत्माराम पाटील मित्रमंडळीनं सातारला एक बैठक घेतली. त्यात आपली कैफियत सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासमोर मांडावी व ते देतील तो निर्णय मान्य करावा, असं या बैठकीत ठरलं. आत्माराम पाटील यांनी ही जबाबदारी साहेबांवर सोपवली. साहेब यापूर्वी एकदाच मुंबईला गेले होते. मुंबईची काहीच माहिती साहेबांना नव्हती. सातारा जिल्ह्यातील एक प्रसिद्ध कार्यकर्ते बाबुराव गोडसे मुंबईत काम करीत होते. साहेब मुंबईला जाऊन त्यांना भेटले. मुंबईला येण्यामागचं कारण सांगितलं. श्री. बाबुराव गोडसे यांनी सरदार पटेल मुंबईत राहत असलेल्या जागी साहेबांना आणून सोडलं.

सरदार पटेल यांचे चिरंजीव डाह्याभाई पटेल यांच्या भव्य बंगल्यासमोर साहेब उभे राहिले. तिथे कार्यकर्त्यांची रीघ लागलेली. या रांगेत आपला नंबर केव्हा लागेल असे साहेबांना वाटले. तरीही साहेबांनी प्रयत्न तर करून पाहू, असा मनाचा निश्चय केला. रांगेत साहेब शेवटचे होते. तास-दीड तासानंतर रांग संपली. साहेब एकटेच उभे. डाह्याभाई पटेल बाहेर आले.

त्यांनी साहेबांना विचारलं, "तुमचं काय काम आहे?"

साहेबांनी आपण का व कुठून आलो हे डाह्याभाई पटेल यांना सांगितलं. मला भेटीची संधी द्यावी, अशी विनंती डाह्याभाई यांना केली. डाह्याभाईंना साहेबांची दया आली असावी. ते काही न बोलता आत गेले व लगेच बाहेर आले. साहेबांना सोबत घेऊन सरदार पटेल यांच्यासमोर उभं केलं. सरदार पटेल यांची धीरगंभीर मुद्रा पाहून साहेबांचा आवाज घशातून बाहेर पडावयास तयार नव्हता.

जीव एकवटून साहेब म्हणाले, "मी ग्रामीण भागातला एक कार्यकर्ता आहे. सातारा जिल्ह्यातील एका मतदारसंघातून ग्रामीण कार्यकर्त्याला तिकीट मागण्यासाठी आलो आहे. या ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची कैफियत आपल्या कानावर घालण्यासाठी मला पाठविलं आहे. आपल्याकडे न्याय मागायला आलोय. आपण आम्हा ग्रामीण कार्यकर्त्यांना न्याय द्याल असा आम्हा सर्व कार्यकर्त्यांना विश्वास आहे. सरदार पटेल यांनी साहेबांची चौकशी केली.

शेवटी एक प्रश्न विचारला, "ग्रामीण भागातील उमेदवार पडला तर त्याची जबाबदारी कोण घेईल?"

साहेबांच्या तोंडून उत्स्फूर्त वाक्य बाहेर पडलं, "अर्थातच आम्हा सर्व कार्यकर्त्यांची राहील."

भेट संपली. साहेब बंगल्याबाहेर पडले. आपण आपली बाजू व्यवस्थित मांडल्याचा आनंद साहेबांना झाला. कारण दहा-पंधरा मिनिटं सरदार पटेलांनी साहेबांची मुलाखत घेतली. जेव्हा उमेदवारांची यादी जाहीर झाली तेव्हा त्यात आत्माराम पाटील यांचं नाव होतं. ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनी जीवाचं रान करून आत्माराम पाटलांना निवडून आणलं. साहेबांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झालं.

या निवडणुकीनं साहेबांच्या राजकारणाची दिशा निश्चित केली. आतापर्यंत साहेब काँग्रेस, समाजवादी, मानवेंद्रनाथ रॉय आणि साम्यवादी या विचारांच्या तळ्यात-मळ्यात असायचे. ज्या विचारांचे सहकारी भेटायचे त्यासोबतच साहेब जायचे. या निवडणुकीनं साहेबांना गांधी-नेहरू काँग्रेसच्या मार्गानं जाण्यास भाग पाडलं. काँग्रेस व साहेब यांची जीवनगाठ या निवडणुकीत बांधली गेली. ती शेवटपर्यंत टिकली.

अशीच एक सत्त्वपरीक्षा साहेबांना द्यावी लागली. साहेबांचे बंधू गणपतराव हे सत्यशोधकी समाजाच्या विचारानं भारावलेले. कराडच्या सार्वजनिक जीवनात त्यांचा सहभाग असायचा. कराड नगरपालिकेची निवडणूक लढविण्याचं त्यांनी ठरविलं. अत्यंत चाणाक्ष व धूर्त स्वभावाचे हे बंधू. त्यांनी एकदा निर्णय घेतला म्हणजे त्या निर्णयापासून माघार नाही. साहेब व गणपतराव यांचे वैचारिक मार्ग वेगवेगळे होते. साहेबांचा कोल्हापूर ते कराड प्रवास शिक्षणकाळात चालूच होता. गणपतरावांच्या विरोधात काँग्रेसने उमेदवार उभा केला होता. साहेबांना कोल्हापूरला निरोप आला - "निवडणुकीच्या प्रचाराकरिता कराडला यावं लागेल." साहेब कराडला आले. गणपतरावांच्या विरोधात प्रचार कसा करावा हा प्रश्न साहेबांसमोर उभा राहिला. साहेब खिंडीत सापडले. रात्रभर विचार केला. विचाराशी प्रतारणा करायची नाही हा मनाचा कौल साहेबांना मिळाला. दुसऱ्या दिवशी साहेबांनी काँग्रेसचे उमेदवार रामा बाळा कदम यांच्याकरिता गणपतरावांविरोधात सभा घेतली. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला.

गणपतराव निवडणुकीत पडले. काँग्रेसचा उमेदवार रामा बाळा कदम निवडून आला. साहेब दिवसभर घराकडे फिरकले नाहीत. दिवेलागण झाली, जेवणवेळ टळून गेली तरी साहेब घरी आले नाहीत. गणपतरावांनी आईकडे यशवंत दिसत नाही याबद्दल चौकशी केली असता दिवसभर घराकडे आला नसल्याचे आईने सांगितले.

आईच्या या उत्तरानं गणपतरावांच्या मनात कालवाकालव झाली. नाही, नाही ते विचार गणपतरावांच्या डोक्यात थैमान घालू लागले. गणपतराव घराबाहेर पडले. गावात साहेबांच्या जवळच्या मित्राकडे विचारपूस केली. त्या मित्रांनाही आश्चर्य वाटलं. तेही गणपतरावांसोबत साहेबांना शोधू लागले. शेवटी एके ठिकाणी साहेब एकटेच गुडघ्यात मुंडके घालून बसलेले त्यांना आढळले. गणपतरावांनी वडीलकीच्या अधिकारानं साहेबांना झाडलं.

म्हणाले, "वेडा कुठला? अरे पराभव माझा झाला नाही, माझ्या विचारांचा झाला आहे. यशवंत विजयी झाला नसून, यशवंतच्या विचारांचा विजय झाला आहे. ही गणपतराव विरुद्ध यशवंत अशी लढाई नव्हती, तर सत्यशोधक विरुद्ध काँग्रेस या दोन विचारांची ती लढाई होती. चल घरी, आई काळजीत पडली आहे."

साहेब अपराधी मनानं गणपतरावांच्या मागे मागे चालू लागले. घरी आले. दोघा बंधूंनी एकत्र बसून जेवण केलं. आईनं आपल्या हातानं दोघा भावंडांना जेऊ घातलं.

आई म्हणाली, "गणपत, यशवंताला सांभाळ रे बाबा. त्याच्या पाठीशी थोरल्या भावाप्रमाणं उभा राहा."

"आई, काळजी करू नकोस. आता इथून पुढे मी यशवंताच्या विचाराच्या मागे उभा राहील. त्याच्याच विचारानं सामान्य माणसाचं भलं होईल याची खात्री पटलीय मला. यशवंत मोठा झालेला पाहायचं मला!" असं म्हणून गणपतराव आपल्या झोपण्याच्या खोलीकडे निघून गेले.

साहेबांचा रात्रभर डोळा लागला नाही. गणपतराव किती मोठ्या मनाचे आहेत याची त्यांना जाणीव झाली. आपल्या भावाची इच्छा आपण पूर्ण केली पाहिजे ही खूणगाठ साहेबांनी मनाशी बांधली अन् दुसऱ्याच दिवशी साहेब कोल्हापूरला निघून गेले.

१९३८ ला साहेब बी. ए. पास झाले. पदवी तर मिळाली. आता पुढे काय? कायद्याचा अभ्यास करावा असं साहेबांनी ठरविलं. त्याअगोदर सातारला किंवा कराडला एखादं वर्तमानपत्र काढावं व संपादक म्हणून समाजप्रबोधनाचं काम करावं असा साहेबांचा विचार होता. राष्ट्रीय विचारांची एखादी शाळा काढावी व तिथे शिक्षक म्हणून काम करावं असा दुसराही विचार साहेबांच्या मनात घोळत होता. कायद्याचं शिक्षण घेण्यासाठी खर्चाचाही प्रश्न होताच. मित्रमंडळीनं साहेबांनी कायद्याचं शिक्षण घेण्यासंबंधी विचार करावा, खर्चाचं आम्ही पाहून घेऊ, असं त्यांना सांगितलं. शेवटी पुण्याला जाऊन एलएल.बी. करायचं साहेबांनी ठरविलं. राजकारणात राहायचं झाल्यास एलएल.बी.चा उपयोग होऊ शकतो. थोडंफार उत्पन्नही मिळू शकेल. तेवढाच घरच्यांना आधार होईल, असेही विचार त्यांच्या डोक्यात आले.

पुढील शिक्षणाबाबत मित्रमंडळींसोबत विचारविनिमय केल्यानंतर साहेबांनी घरच्यांचा विचार घेतला. थोरल्या दोन्ही बंधूंचं कायद्याचं शिक्षण घेण्याबद्दल एकमत होतं. एवढंच नाही तर खर्चाकरिता विट्याची वडिलोपार्जित जमीन काहीएक उत्पन्न मिळत नसल्याने विकून टाकावी असं ठरलं. तिघे बंधू विट्याला गेले. विक्रीखत करून परत कराडला आले. दोन वर्षांचा खर्च भागेल एवढा पैसा जमीन विक्रीतून मिळाला.

कायद्याचं शिक्षण साहेब पुण्याला घेणार हे साहेबांचे मित्र आमदार आत्माराम पाटील यांना कळलं. आत्माराम पाटील व साहेबांमध्ये वैचारिक दुरावा वाढत चालला होता. आत्माराम पाटील यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्यासोबत जाण्याचा निर्णय पक्का केला होता. साहेबांनी त्यांना सबुरीचा सल्ला दिला. त्यादरम्यान सातारा जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीत आत्माराम पाटील व साहेबांनी गांधीनिष्ठ कार्यकर्ते पांडू मास्तर यांना पाठिंबा दिला. पांडू मास्तरांच्या विरोधात व्यंकटराव पवार उभे होते. व्यंकटराव पवार हे पांडू मास्तरांना पाडून निवडून आले. जिल्हाभर साहेब व आत्माराम पाटील यांचा पराभव झाल्याची चर्चा सुरू झाली. त्यात खोटं काहीही नव्हतं.

आत्माराम पाटलांचा साहेबांना निरोप आला, ''मी पुण्याला घर केलेलं आहे. आपण माझ्याकडेच माझ्या घरी राहून कायद्याचा अभ्यास करावा.''

आत्माराम पाटलांना साहेब नाही म्हणू शकत नव्हते. साहेबांनी होकार कळविला. पुण्याला घर करण्यामागचं कारण आत्माराम पाटील यांचे पुणे जिल्ह्यात तळेगाव येथे राहणारे देशभक्त ब्राह्मण पिंगळे यांची कन्या शांताबाई यांच्यासोबत प्रेमाचे सूत जुळले. त्या काळातील रीतिरिवाजाप्रमाणे दोन्ही घरातून या संबंधाला विरोध होता. आत्माराम पाटील यांनी प्रेमविवाह करण्याचा निर्णय घेतला. साहेबांनी आत्माराम पाटील यांना असा सल्ला दिला की, मुलीला विचार करण्यास वेळ द्यावा. पूर्ण विचारांती तिचा होकार आल्यानंतरच विवाह करण्यासंबंधी विचार करावा. साहेबांचा हा सल्ला आत्माराम पाटलांना पटला. तसा त्यांनी मुलीला भरपूर वेळ दिला. तिनं आत्माराम पाटलांसोबत विवाह करण्याचा निर्णय कळविला. मुलीच्या संमतीनं सातारा येथे रजिस्टर पद्धतीनं हा विवाह पार पडला. या विवाहाचे साक्षीदार साहेब व आठल्ये होते.

विधी महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण पाहून साहेब अवाक् झाले. प्रशस्त इमारत, समृद्ध ग्रंथालय, ज्ञानी शिक्षक. शिक्षकांपैकी भोपटकर ल. ब. हे भाषावरील प्रभुत्वानं लक्षात राहिलेले. सकाळी दोन तास संपल्यानंतर भरपूर वेळ मिळत असे. साहेब इतर वेळी ग्रंथालयात बसत. अधाशासारखे वाचन करीत. त्याकाळी पुण्यात अनेक अभ्यास मंडळं होती. साहेब या अभ्यास मंडळांत जाऊ लागले. वेगवेगळ्या राजकीय विचारांवर चर्चा घडवून आणण्याचे काम ही मंडळं करीत असत. ज्ञानात भर पडून वैचारिक निर्णय घेण्याची क्षमता या चर्चेतून वाढीस लागत असे.

पुण्यातील या एक वर्षाच्या वास्तव्यात साहेबांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले. परीक्षेची तारीख जवळ येऊन ठेपली. अभ्यासाला वेळ अपुरा पडू लागला. अशा अवस्थेत वर्ष वाया जाऊ नये म्हणून साहेबांनी कायद्याच्या पहिल्या वर्षाची परीक्षा दिली. परीक्षेचा निकाल साहेबांच्या विरोधात गेला. साहेब उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. ३८-३९ हे एक वर्षे साहेबांचं वाया गेलं. ही गोष्ट साहेबांच्या मनाला लागली. आत्माराम पाटील यांच्यासोबत न राहता वेगळं राहण्याचा निर्णय साहेबांनी घेतला. डेक्कन जिमखान्यावर साहेबांनी स्वतंत्र खोली घेऊन सहा महिने मन लावून अभ्यास केला व पहिल्या वर्षाची कायद्याची परीक्षा पास केली.

दरम्यान, इंग्लंड-फ्रान्स विरुद्ध जर्मनी युद्धाची ठिणगी पडली. दुसरे महायुद्ध म्हणून इतिहासानं या युद्धाची नोंद घेतली. या महायुद्धात राजकीय जीवनाला कलाटणी देणाऱ्या अनेक घटना घडल्या. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ वैचारिकतेच्या संघर्षातून तावून सुलाखून निघाली. रॉय यांच्या मते, युरोपातील फॅसिझमच्या विरोधात इंग्लंड लढत आहे. फॅसिझमला संपविण्यासाठी आपण इंग्लंडसोबत राहावयास पाहिजे. भारतीयांची मानसिकता मात्र वेगळी होती. भारतीयांना गुलामगिरीत वागविणाऱ्या इंग्रजांची लढाई आमची होऊ शकत नाही अशी होती. हीच भावना काँग्रेस पक्षाची व नेत्यांची होती. १९४१ मध्ये रॉयवाद की काँग्रेस? हा प्रश्न साहेबांसमोर उभा राहिला. आत्माराम पाटील यांनी एका टोकाची भूमिका स्वीकारून रॉय यांच्याबरोबर जाण्याचा निश्चय पक्का केला. साहेबांनी मित्रमंडळींचा सल्ला घेतला. काँग्रेससोबत राहण्याचा सर्वांनी निर्णय घेतला. साहेबांनी आत्माराम पाटलांची मनधरणी केली. भारतीय मानसिकतेची कल्पना दिली. आत्माराम पाटलांना साहेबांचं म्हणणं काही केल्या पटेना.

एके दिवशी आत्माराम पाटलांनी साहेबांना सांगितलं, "साहेब, तुमच्या आणि आमच्या वाटा आता वेगळ्या झाल्या आहेत."

रॉयवादाच्या मानसिक दबावाखाली पाटलांनी साहेबांचं म्हणणं अव्हेरलं. साहेबांचाही नाइलाज झाला. हे केव्हातरी घडणार होतंच याची कल्पना साहेबांना होती. 'यशवंतराव चव्हाण आमचे जवाहरलाल नेहरू आहेत,' असे म्हणणाऱ्या जिवलग मित्राचं वेगळ्या वाटेनं जाण्याच्या निर्णयाचं दु:ख साहेबांनी पचविलं.

कायद्याच्या पदवीचा अभ्यास चालू असतानाच जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष व्यंकटराव पवार यांना सत्याग्रही म्हणून अटक झाली. कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर साहेबांना सातारा जिल्हा काँग्रेसची जबाबदारी सांभाळावी लागली. या काळात जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुका लागल्या. दुसऱ्या महायुद्धाच्या परिस्थितीत काँग्रेस पक्ष निवडणुका लढविण्याच्या मन:स्थितीत नव्हता तरीही साहेबांनी के. डी. पाटील व किसन वीर यांच्या साहाय्यानं चळवळीतील कार्यकर्त्यांचं मनोबल वाढविण्याच्या दृष्टिकोनातून व अप्रत्यक्षपणे स्वातंत्र्याची चळवळ जिवंत राहिली पाहिजे या भावनेतून निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला. सातारा जिल्ह्यात कुपर हे सरकारधार्जिणं

ग्रस्थ आर्थिक, सामाजिक व राजकीय वर्चस्व टिकवून होतं. १९३५ मध्ये मुंबई सरकार बनलं. त्यात ते काही महिने पहिले मुख्यमंत्री होते. काँग्रेसनं सरकार बनविण्याचं ठरविल्यानंतर त्यांना बाजूला सारण्यात आलं. कुपरच्या विरोधात स्वातंत्र्य चळवळीतील ग्रामीण भागातील तरुण मंडळी साहेबांनी सहकाऱ्यांच्या मदतीनं उभी केली. जिल्हाभर मोठ्या संख्येने तरुण मंडळी काँग्रेसच्या अप्रत्यक्ष पाठिंब्याने निवडून आली. याच वेळी कुपर गटात मतभेदही निर्माण झाले. अण्णासाहेब कल्याणी व सरदार पाटणकर हे कुपरपासून अलग झाले. अध्यक्षपदाच्या सारिपाटावर सोंगट्यांचा खेळ सुरू झाला.

जिल्ह्यातील दोन तरुण वकील - एक आनंदराव चव्हाण आणि दुसरे बाळासाहेब देसाई हे निवडणुकीच्या आखाड्यात उतरले. दोघांचा तालुका पाटण. दोघांचंही शिक्षण कोल्हापूरला झालेलं. दोघांचेही पाहुणे कोल्हापुरातील सरदार घराण्यातील. साहेबांचं आणि आनंदराव चव्हाणांचं शिक्षण कोल्हापूरला झालेलं. एकाच खोलीत राहून अभ्यास केलेला. अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध. विद्यार्थी असताना आनंदराव साहेबांना कुंभारगाव या आपल्या गावी घेऊन गेले. आपल्या कुटुंबातील सर्वांच्या ओळखी करून दिल्या. असा आनंदरावांचा आणि साहेबांचा घनिष्ठ संबंध. या प्रेमापोटी आनंदरावांनी आणि बाळासाहेबांनी एकत्र बसून तडजोड करावी असा सल्ला साहेबांनी दिला.

आनंदरावांच्या पाठीशी अप्रत्यक्षपणे कुपरची माणसं उभी राहिल्यानं स्वातंत्र्य चळवळीतील निवडून आलेले तरुण नाराज झाले. याची कल्पना साहेबांनी आनंदरावांना दिली; पण कुपरच्या दबावामुळं आनंदरावांनी साहेबांच्या तडजोडीच्या मनसुब्याकडं दुर्लक्ष केलं. बाळासाहेब देसाई आणि साहेबांचे बंधू गणपतराव सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते. या दोघांचा चांगला घरोबा. गणपतरावांमुळं साहेबांची आणि बाळासाहेब देसाईंची ओळख झालेली. शेवटी निवडणूक झाली. बाळासाहेब देसाई निवडून आले. पाटण तालुक्याच्या आनंदाला उधाण आलं. पाटणला बाळासाहेब देसाईंचा जंगी सत्कार झाला. या सत्कार समारंभाचे अध्यक्ष होते साहेब. के. डी. पाटील, किसन वीर आणि साहेबांनी प्रमुख कार्यकर्त्यांच्या गैरहजेरीत जिल्हा ताब्यात ठेवला. साहेब मात्र आनंदरावांसारख्या प्रांजळ मनाच्या वर्गमित्राला मुकले.

सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीला तेवत ठेवत साहेबांनी वकिलीची सनद मिळविली. आपला मुलगा यशवंत वकील झाल्याचं ऐकून आईला आकाश ठेंगणं झालं. आपल्या भावानं वकिलीची पदवी मिळविल्याचा आनंद ज्ञानोबा व गणपतरावांना आपल्या चेहऱ्यावर लपविता आला नाही. मित्रासोबत मुंबईला जाऊन साहेबांनी वकिलीची सनद आणली. वकिलीचा व्यवसाय सुरू केला. मिळकतही बरी होऊ लागली. स्वातंत्र्य चळवळीचा रेटा वाढतच होता. याचदरम्यान १९४२ मध्ये कराडला दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन झालं. कराडला साहित्याची परंपरा आहे. या संमेलनात साहेबांनी साहित्याचा एक वाचक म्हणून सक्रिय भाग घेतला. या संमेलनात दोन परिसंवाद ठेवण्यात आले होते. एका परिसंवादाचं अध्यक्षपद भाषाशास्त्रज्ञ कृ. पा. कुलकर्णी यांनी भूषविलं होतं. दुसऱ्या परिसंवादाचं अध्यक्षपद खुद्द साहेबांनी भूषविलं. या परिसंवादाचा विषय 'बहुजन समाज व साहित्य' असा होता. साहेबांचं भाषण आवडल्याची कबुली कृ. पा. कुलकर्णी यांनी आपल्या 'कृष्णाकाठची माती' या आत्मचरित्रात दिली आहे.

विठाईचा लग्नाचा लकडा साहेबांच्या पाठीमागे चालूच होता. शेवटी साहेब लग्न करायला तयार झाले. एक-दोन मुली पाहून झाल्या. दोन्ही भावजयाही येणाऱ्या-जाणाऱ्यांचं जेवणखावन-चहापाणी करण्यात दिवसभर मग्न असायच्या.

न राहवून सौ. सोनू वहिनी म्हणाल्या, "वकीलसाहेब, आता आमच्या मदतीला हक्काचं माणूस घेऊन या की!"

"वहिनी, मुलगी पसंत पडली म्हणजे घेऊन येतो तुम्हाला जाऊ." साहेब.

"मुलींना काय काळ पडलाय? पण..." सौ. भागीरथी वहिनी.

"पण म्हणजे काय वहिनी?" साहेब.

"नाही, म्हटलं एखादी पसंत करून ठेवली असेल तर तसं सांगा." सौ. भागीरथी वहिनी.

"तसलं काही मनातही आणू नका. मुलगी पसंत पडली की लग्न करू या." साहेब.

दीर-भावजयांत अशी थट्टामस्करी चालायची. शेवटी साहेबांनी मला

पसंत केलं. बळवंतराव चव्हाणांचं घर सावरता सावरता ज्या घटना घडल्या त्या जशाच्या तशाच कुठलाही आडपडदा न ठेवता विठाईनं मला सांगितल्या.

०००

चव्हाण घराण्यात येऊन मला दीड महिना झाला. गोकुळावाणी नांदणाऱ्या या घरात साहेब क्वचितच थांबत असत. सारखे मित्रमंडळीच्या गराड्यात राहत. साहेब मुंबईला होणाऱ्या कॉंग्रेस महाअधिवेशनाला जाणार अशी घरात कुजबूज सुरू झाली. मला उगीचंच वाटलं, साहेब मुंबईला जाण्याविषयी माझ्याशी बोलतील म्हणून. माझा भ्रमनिरास झाला. के. डी. पाटील, आमदार चंद्रोजीराव पाटील, तात्यासाहेब कोरे व इतर कार्यकर्त्यांसह साहेब मुंबईला गेले. घरातील कामात माझं लक्ष लागेना. मी घरात इकडून तिकडे विनाकारणच येरझारा घालू लागले. आईनं बोलावल्याचा आवाज आला.

"वेणूऽऽ" आई.

"आले हं आई." मी.

"काय गं, काय झालं? बरं नाही वाटत का? की माहेरची आठवण आली?" आई.

"नाही आई, तसं काही नाही." मी.

"जाताना यशवंत भेटला नाही म्हणून नाराज झालीस का? मीच त्याला सांगितलं, सूनबाईला काही सांगू नको म्हणून. तू गेल्यावर मी सांगेल तिला सावकाश." आई.

माझं आईच्या बोलण्याकडं लक्ष नव्हतं. मन जागेवर नव्हतं. सारखे साहेबांविषयीचे नाही नाही ते विचार मनात येऊ लागले. माझा जीव कासावीस होऊ लागला. साहेबांना मुंबईला जाऊन चार-सहा दिवस झाले. ऑगस्टची ९ तारीख जाऊन १२ तारीख उजाडली. मुंबईहून काही निरोप नाही. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीनं गवालिया टॅंकवरील अधिवेशनात 'भारत छोडो'चा ठराव पास केला. वर्तमानपत्रात महात्मा गांधी, नेहरू, पटेल, आझाद यांना ब्रिटिश सरकारनं अटक केल्याच्या बातम्या येऊ लागल्या. मी या सर्व बाबींचा विचार करीत असतानाच साहेबांचा भाचा - माझ्या नणंदेचा मुलगा बाबुराव कोतवाल मामी... मामी... म्हणून ओरडत पोस्टानं आलेलं एक पाकीट हातात घेऊन माझ्याकडे आले. त्यांनी ते

पाकीट माझ्या हातात दिलं. पाकीट माझ्याच नावानं होतं.

"मामाचं दिसतंय?" बाबुराव.

मी काहीएक न बोलता माझ्या खोलीकडे निघाले. बाबुराव थोडे हिरमुसल्यासारखे झाले. कधी एकदा पाकीट फोडून पत्र वाचते असं झालं मला. एकदाचं पाकीट फोडलं. पत्र साहेबांचंच निघालं.

मुंबई

९ ऑगस्ट १९४२

प्रिय सौ. वेणू,

माझ्यावर रागवली नसणार असं गृहित धरून माझ्या मनातील घुसमट या पत्रात लिहून मी माझं मन तुझ्यासमोर मोकळं करीत आहे. आपलं लग्न होऊन दोन महिने लोटले. नववधू अनेक स्वप्नं मनात घेऊन या नव्या विश्वात रमण्यास येते. तरुणपणाच्या भावनेचा उन्मेष व्यक्त करण्याच्या ऊर्मी उरात बाळगून काही स्वप्नं रंगवायची असतात याची मला कल्पना आहे. या भावनांचा विचार न करता, तुला न सांगता-न बोलता मी मुंबईला निघून आलो. अपराधी मनानं मी हा निर्णय घेतला. हा निर्णय घेताना माझ्या मनाला काय यातना झाल्या असतील याची तुला कल्पनाही येणार नाही. तारुण्यातील भावनांनी जर बुद्धीचा ताबा घेतला तर मनुष्य ध्येयापासून दूर जाण्याचा धोका असतो. मला माझ्या ध्येयापासून दूर करण्यास तू कारणीभूत झालीस असा ठपका तुझ्यावर येऊ नये असं मी ठरविलं आणि पुढेही मी प्रयत्न करीत राहीन. त्यातलाच हा तुला न सांगता मुंबईला निघून येण्याचा माझा निर्णय. तू माझं हृदय आहे तर स्वातंत्र्य चळवळ माझा श्वास आहे. श्वास आणि हृदय यांचा समन्वय माणसाला जिवंत ठेवतो. मला जिवंत राहण्यास श्वास आणि हृदय सारखेच महत्त्वाचे आहेत. मी दोघांपासून दूर जाऊ इच्छित नाही.

आता थोडं मुंबईतील काँग्रेस महाअधिवेशनासंबंधी... ७ आणि ८ ऑगस्ट या दोन दिवसांत भारताच्या स्वातंत्र्य चळवळीची दिशा निश्चित झाली. महात्मा गांधी, नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद यांच्या भाषणांनी अधिवेशनाचा नूरच बदलून टाकला. 'छोडो भारत'ची घोषणा नेहरू यांनी करताच सर्व कार्यकर्ते या घोषणेनं भारावून गेले. नेहरू, मौलाना आझाद यांच्या भाषणांनी तरुणांच्या मनाचा ताबा घेतला. सरदार

पटेल यांनी संपूर्ण भारतातून आलेल्या प्रतिनिधींचा विश्वास संपादित केला. अशा या भारावलेल्या नि मंतरलेल्या अवस्थेत मुक्कामाच्या ठिकाणी परतलो. मध्यरात्र टळून गेली होती तरी त्या झपाटलेल्या वातावरणातच आम्ही वावरत होतो. सकाळी सकाळी डोळा लागला.

सकाळी जाग आली ती रस्त्यावरील 'चले जाव', 'करो या मरो' या घोषणांनी. अख्खी मुंबई रस्त्यावर उतरलेली. धावपळ, धरपकड, पोलिस आणि जनतेचा पाठशिवणीचा खेळ सुरू झालेला. वर्तमानपत्र मिळण्याचा दुष्काळ. कशीतरी एक-दोन वर्तमानपत्रं मिळविली. रात्रीच राष्ट्रीय नेत्यांना अटक करून शहराबाहेर हलविल्याबद्दलच्या बातम्यांनी वर्तमानपत्राचे रकानेच्या रकाने भरलेले. ९ ऑगस्टची सकाळ क्रांतीला सोबत घेऊन उगवलेली.

"आम्हाला फॅसिझमच्या विरोधात लढायचे आहे; परंतु ब्रिटिशांचे गुलाम म्हणून आम्ही लढू इच्छित नाहीत. फॅसिझमचा पराभव करण्यासाठी भाग घ्यायची इच्छा आहे; परंतु स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून." नेहरू.

"करू या मरू" महात्मा गांधींचा निर्धार.

"आम्ही सर्वांनी एकमतानं हा ठराव घेतला आहे." सरदार पटेल.

"हा ठराव म्हणजे आमच्या एकजुटीचा आत्मा आहे." मौलाना आझाद.

हा क्रांतीचा मंत्र घेऊन कार्यकर्ते आपापल्या गावाकडे परतू लागले. सातारा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची बैठक ज्याठिकाणी आम्ही उतरलो होतो तिथे घेतली. अधिवेशनाला मिळून आलो; पण जाताना वेगवेगळ्या मार्गांनी परतायचा निर्णय घेतला. मी मात्र एक दिवस थांबून प्रांतीय नेत्यांच्या भेटी घेण्याचं ठरविलं. कुणाचीही भेट झाली नाही. सर्व नेतेमंडळी भूमिगत झालेली. सर्वांना भूमिगत होण्यासंबंधी सूचना दिल्या. मलाही भूमिगत राहून सावधपणे हालचाली कराव्या लागतील... अशा तऱ्हेनं माझं भूमिगत आयुष्य सुरू झालं.

माझ्या कानावर असं आलंय - बाबुरावांनी शाळा सोडून युवक मंडळाची स्थापना करून स्वातंत्र्याच्या चळवळीत उडी घेतलीय. घेतली असेल तर त्याला अडवू नका. त्याचा निर्णय त्याला घेऊ द्या. माझी खबरबात बाबुरावाकडून तुम्हाला कळेलच.

माझ्या या स्वातंत्र्याच्या संग्रामात तुझ्या भविष्यातील स्वप्नांची आहुती

तुला द्यावी लागणार आहे. मनाची तयारी कर. दोन्ही दादांना व आईला सावरण्याची जबाबदारी तुझ्यावर आहे.

तुझा

यशवंतराव

१० ऑगस्टला साहेबांनी मुंबई सोडली. सकाळी पुण्याला पोहोचले. येथेही मुंबईसारखंच वातावरण दिसून आलं. लगेच रेल्वेनं कराडकडे निघाले. चोहीकडे पोलिसांची दडपशाही अवतरलेली. 'भारत छोडो'चा परिणाम ग्रामीण भागापर्यंत पोहोचलेला. सावधगिरी म्हणून कराडऐवजी शिरवडे रेल्वेस्टेशनला उतरले. मसूरला जावं असं साहेबांनी ठरवलं; पण तिथेही पोलिसांनी धरपकड केल्याचं कळलं. वाट वाकडी करून हातात बॅग घेऊन साहेब इंदोलीच्या दिशेने निघाले. इंदोलीला दिनकरराव निकमला निरोप पाठविला. दिनकरराव व साहेब गावाजवळील एका शेतात भेटले. पुढील कार्याची दिशा निश्चित करून साहेब कराडकडे निघाले. चार-पाच दिवस रेल्वे, पायी, मोटारसायकल, सायकलचा प्रवास करून थकलेल्या अवस्थेत साहेब कराडला पोहोचले. कराडचे त्यांचे विश्वासू मित्र नारायणराव घाडगे यांच्याकडे मुक्काम केला. कराडमधील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेऊन मार्गदर्शन केलं. किसन वीरांना भेटण्यासाठी साहेब कवठ्यास जावयास निघाले. मिळेल त्या साधनांनी प्रवास करून साहेब कवठ्यास पोहोचले. रात्री जंगी सभा झाली. पाऊण तास साहेब सभेत बोलले. पोलिस पकडावयास येतील या शंकेने आबांनी साहेबांची गावाबाहेर शेतात राहण्याची व्यवस्था केली. येथील बैठक संपवून साहेब कराडच्या २४ ऑगस्टच्या मोर्चाच्या तयारीला लागले. तरुण सेनेचं नेतृत्व महादेव जाधव यांनी स्वीकारलं. बाळासाहेब उंडाळकरांना या मोर्चात अटक झाली. निधड्या छातीचे खेळाडू महादेव जाधव हे माधवराव जाधव म्हणून उदयास आलेलं तरुण नेतृत्व या मोर्चाचं फलित.

इस्लामपूर व वडूच्या मोर्चानं संपूर्ण जिल्ह्याचं लक्ष वेधून घेतलं. या मोर्चात पोलिस अमानुषपणे वागले. वडूजच्या मोर्चाचं नेतृत्व परशुराम घार्गे यांनी केलं. या तरुणानं ब्रिटिशांच्या गोळ्या आपल्या छातीवर झेलल्या. १९४२ च्या क्रांतीचा सिंह परशुराम घार्गे अजरामर झाला. घार्गेसोबत ज्या क्रांतिवीरांचा ब्रिटिशांनी बळी घेतला ते हुतात्मे बलभीम खटावकर,

बाळकृष्ण खटावकर, आनंदा गायकवाड, शिदू बाळा पवार, खाशाबा शिंदे, श्रीरंग शिंदे, रामचंद्र सुतार, किसन भोसले. इस्लामपूरचा हुतात्मा पंड्या हा तरुण इंजिनियर उत्तर प्रदेशचा. किर्लोस्करवाडीत तो नोकरीला आला. या मोर्चात पत्नीला न सांगता सहभागी झाला. घरी तरुण पत्नी वाट पाहत बसली. ब्रिटिशांच्या गोळीनं इमानेइतबारे आपलं कर्तव्य पार पाडलं. या तरुण परप्रांतीय इंजिनियरचा बळी घेतला. घरी वाट पाहत बसलेल्या तरुण पत्नीचं सौभाग्य स्वातंत्र्यासाठी पणास लागलं. विष्णू वारवाटेच्या मातेची कूस पोरकी झाली. विष्णू वारवाटे हाही या मोर्चात हुतात्मा झाला.

क्रांतिवीर नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालील चळवळीचा ब्रिटिश सरकारनं धसका घेतला. नाना पाटलांच्या नावानं पोलिसांच्या उरात धडकी भरायची. क्रांतिसिंह नाना पाटलांची भेट घेण्याचा प्रयत्न करूनही साहेबांना त्यांची भेट घेता आली नाही. त्यांना भेटणे तसे अवघडच होते.

सांगलीचे वसंतराव पाटील यांचं कार्य व संघटनकौशल्य अप्रतिम होतं. पराक्रमवीर वसंतराव पाटील संघटक म्हणून यशस्वी झाले. त्यांची दखल पुढे महाराष्ट्राने घेतली.

किसन वीर, छन्नू सिंग, पांडू मास्तर यांना अटक झाली. चळवळीचं अतोनात नुकसान झालं. किसन वीराचा साहेबांना निरोप आला, "आम्ही येरवडा जेलमधून लवकरच बाहेर येणार!" आणि हा शब्द या तिघांनी खरा करून दाखविला. तीन महिन्यांच्या आत हे त्रिकूट येरवडा जेल फोडून बाहेर आलं. या धामधुमीच्या काळात साहेब कराडला येत असत. घरी एक दिवस थांबले की लगेच दुसऱ्या दिवशी निघून जात. निवांत असा वेळ त्यांच्याशी बोलण्यास मिळत नव्हता. त्यांच्याकडून चळवळीच्या हकीकती कळत असत. एक दिवस बाबुराव कोतवाल वर्तमानपत्र घेऊन घरी आले. त्या वर्तमानपत्रात बातमी होती, "साहेबांना पकडून देणारास एक हजार रुपयांचे बक्षीस दिले जाईल." माझ्या हातापायातील शक्ती गळून पडली. माझ्या डोळ्यांसमोर काळोख दाटला. कसातरी मी मनावर तांबा मिळविला.

बाबुराव कोतवाल भूमिगत चळवळीशी एकरूप झालेले. इतके एकरूप की, आपल्या मामापेक्षा धूर्त निघाले. कुठल्याही गोष्टीचा थांगपत्ता ते लागू

देत नसत. गेल्या तीन-चार दिवसांपासून घराकडे फिरकलेसुद्धा नाहीत. घरातील आम्ही सर्व जण काळजीत होतो. स्वारी एक दिवस सकाळी सकाळी घरी येऊन धडकली. थोडे उत्साही दिसले.

म्हणाले, 'मामी, ओळखा मी तीन-चार दिवस कुठे होतो ते!''

''आम्हाला कसं कळणार आपण सांगितल्याशिवाय?'' मी.

''ऐका तर मग.''

आणि बाबुराव कोतवाल सांगू लागले -

''तीन दिवसांपूर्वी मामा कराडला मुक्कामाला होते. त्यांना वडूजच्या मोर्चासाठी जायचं होतं. कराड रेल्वेस्टेशनवर पोलिसांचा कडक पहारा होता. मामांनी मला बोलावून घेतलं आणि आणि माझी जाण्याची व्यवस्था कर म्हणाले. मी आणि मामांनी रात्री एकमेकानं विरुद्ध दिशेनं रेल्वे डब्यात जाऊन बसायचं ठरविलं. मी रेल्वेच्या फलाटावरून डाब्यात शिरलो व मामा फलाटाच्या विरुद्ध दिशेनं डब्यात चढले. सरळ बाकड्याच्या खाली जाऊन झोपले. मी मात्र पाळत ठेवत बसून राहिलो. रहमतपूर स्टेशन येताच गाडीतून उतरलो. तांबडं फुटलं नव्हतं. पोलिसांचा कडक पहारा. मामांनी धाडस करून रेनकोट झटकला आणि पोलिस जिथे उभे होते तिथे अंथरला. मी आणि मामानं झोपेचं सोंग केलं. तोपर्यंत पूर्वेला फटफटलं होतं. पोलिसांची नजर चुकवून आम्ही रेल्वेस्टेशनबाहेर पडलो. पोलिसांना वाटलं खेड्यातले प्रवासी असतील. उजाडल्यानंतर उठून जातील निघून आपल्या गावी. झालंही तसंच. मामी, या मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला. त्यात दोन जणांचा बळी गेला.''

बाबुराव कोतवालांच्या अंगात भूमिगत चळवळ संचारली होती. देहभान विसरून स्वत:ला चळवळीत झोकून दिलं. मधूनच तीन-चार दिवस गायब तर एखाद्या रात्री-अपरात्री दत्त म्हणून हजर होत. कधीकधी त्यांच्याकडूनच साहेब कराडला येऊन गेल्याचं कळत असे. सरकारी कचेऱ्या, रेल्वेस्टेशन, तार ऑफिस इत्यादी सरकारी कार्यालयांवर हल्ले होऊ लागले. कराड येथील धाडसी क्रांतिवीर माधवराव जाधव यांनी एके दिवशी भरदुपारी कराडचे पोस्ट ऑफिस लुटले. त्यांच्या धाडसाचं कौतुक संपूर्ण कराड शहर करू लागलं. हे शूरवीर चुकून पोलिसांच्या जाळ्यात अडकले. त्यांना कराडच्या जेलमध्ये बंदिस्त करण्यात आलं. एके दिवशी कराडचा

जेल फोडून ते बाहेर पडले. या आणि अशा चित्तथरारक घटना आमच्या कानावर येत. अंगाचा थरकाप उडायचा. न जाणो, साहेब अशा वेळी अडकले तर?

आज बाबुराव कोतवाल घरी आले ते थेडे चिंताग्रस्त अवस्थेत. त्यांना खोदून खोदून विचारले तरी गडी काही बोलावयास तयार होईना. फक्त मला म्हणाले,

"मामी, मी तीन-चार दिवस बाहेरगावी जाऊन येतो. परत आल्यानंतर तुमच्याशी बोलेन."

एवढं बोलून डोळ्याचं पातं लवतं न लवतं महाशय घरातून गायब! या आठवड्यात साहेबांचा काही ठावठिकाणा कळला नाही. आई मात्र चव्हाण घराण्याच्या घाण्याला जुंपल्यासारखी कार्यात मग्न. आम्हाला कधीकधी त्यांचा हेवा वाटायचा. घरावर एवढी संकटं घोंगावताहेत तरी आई न डगमगता त्या संकटांशी दोन हात करावयास सज्ज! दुपारची वेळ टळून गेलेली. आम्ही तिघी जावा दळणकांडण करण्यात गुंतलेलो. तोच बाबुराव कोतवाल विजयी वीरासारखे आमच्यासमोर उभे.

म्हणाले, "मामी, तुम्ही विचारण्यापूर्वी मीच तुम्हाला एक घटना सांगतो. सदाशिवराव पेंढारकरांचा मला गुप्त संदेश मिळाला. मी त्याठिकाणी पोहोचलो. तिथे पोहोचल्यानंतर मला कळलं, रात्री मामा येथे मुक्कामाला होते. त्यांनी तिथे बैठक घेतली. त्या बैठकीत निवडक तरुणांना घेऊन पेंढराकरांनी शिरवडे रेल्वेस्टेशन जाळायचं ठरलं. बैठक संपवून साहेब पुढच्या मुक्कामी गेले. मी व कुंडलच्या रामूमामा पवारांनी एका बाजूने रेल्वेस्टेशनवर हल्ला करायचा व दुसऱ्या बाजूनं पेंढारकरांनी. ते सावध होण्यापूर्वीच आमच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या बंदुका पळविल्या. एक बंदूक रामूमामा पवारांच्या हाती लागली. अंधारात रामू पवार कुठल्या दिशेनं पळाले आम्हाला कळलं नाही. मी पहाटे कराडला येऊन पोहोचलो. थोडा वेळ आराम केला आणि प्रथम तुम्हाला भेटतोय. आता इकडे निघण्यापूर्वी मला कळलं, रामूमामा पवार रस्ता चुकून रात्री ओगलेवाडीला पोहोचले. मामांची आणि रामू पवारांची भेट ओगलेवाडीला झाली."

एके दिवशी साहेब अचानक घरी अवतरले. सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. योगायोगानं साहेबांचे बंधू आणि आम्ही सर्व जण घरीच

होतो. त्यादिवशी साहेबांसह आम्ही एकत्र जेवण घेतलं. प्रत्येकाची आस्थेवाईकपणे चौकशी केली. सर्वांना बोलले. बाबुरावबद्दल विचारपूस केली. बाबुरावनी आता सावध राहिलं पाहिजे म्हणाले. विठाईला त्याची काळजी घेण्याबद्दल सांगितलं. छोट्या पुतण्यांचा समाचार घेतला. शेवटी माझ्याकडे आले. माझी ख्यालीखुशाली विचारली. माझ्यामुळं तुम्हा सर्वांना त्रास होतोय याची मला कल्पना आहे म्हणाले. बाहेर अंधारून आलं होतं. साहेबांनी सर्वांचा निरोप घेतला. क्षणात नजरेआड झाले. आमच्या घरावर पोलिसांची पाळत असावी. त्यांना साहेब येऊन गेल्याची खबर मिळाली असावी. साहेबांना जाऊन तीन-चार दिवस झाले असतील तोच पोलिसांनी सकाळी सकाळी आमच्या घराला घेरलं. साहेबांचे मधले बंधू गणपतराव यांना अटक केली. आईने प्रतिकार केला; पण पोलिस ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. आम्ही आईला आवरलं. गणपतरावांना विसापूरच्या जेलमध्ये पाठविण्यात आलं.

बऱ्याच दिवसांनी बाबुराव कोतवालाचे आज घराला पाय लागले. नेहमीचा उत्साह त्यांच्यात जाणवला नाही. चेहरा पडलेला होता. मीच पुढे होऊन चौकशी केली,

"कुठे होता इतके दिवस? घरची काही काळजी आहे की नाही?"

बाबुराव सांगू लागले, "मामा घरी येऊन गेल्यानंतर तीन-चार दिवसांत मधल्या मामांना अटक झाल्याची वार्ता मामांना कळली. मामांनी सर्व प्रमुख कार्यकर्त्यांची गुप्त बैठक घेतली. या बैठकीत असा निर्णय झाला की, सर्व प्रमुख कार्यकर्त्यांना केव्हाही अटक होऊ शकते. त्याकरिता सर्वांनी जिल्हा सोडून पुणे, मुंबईकडे जावे. मामांनी तर लगेच जिल्हा सोडावा असं ठरलं. मामांना सुखरूप रेल्वेत बसून देण्याची तयारी आत्माराम बापू पाटील यांनी केली. रात्रीच्या अंधारात रेल्वेस्टेशनजवळील पिकात आत्माराम बापू व मामा जाऊन बसले. एकाला दुसऱ्या वर्गाचे तिकीट काढावयास पाठविले. रेल्वे बेळेवर स्टेशनवर आली. मामा आणि आत्माराम बापू गाडी रेल्वेस्टेशनमध्ये येताच पिकातून निघाले. त्या गोंगाटात प्लॅटफॉर्मवर पोहोचले. मामांनी जोधपुरी कोट व फरची टोपी घातली होती. आत्माराम बापू तिकीट खिडकीकडे गेले. गाडी थांबताच मामा दुसऱ्या वर्गाच्या डब्यात जाऊन बसले. डबा खालीच होता. ते आत्माराम बापूंची वाट पाहू

लागले. आत्माराम बापू घाईगडबडीत डब्याजवळ पोहोचले. तिकीट मिळाले नाही म्हणून साहेबांना सांगू लागले."

मामा आत्माराम बापूला म्हणाले, "काय व्हायचं ते होईल. तुम्ही आता जा."

रेल्वे निघाली. मी मध्येच बाबुराव कोतवालांना बोलायचं थांबून विचारलं, "साहेब सुखरूप पोहोचले की नाही?"

बाबुराव कोतवाल सांगू लागले, "आत्माराम बापूंनी मला सांगितलेली हकीकत मी तुम्हाला सांगतो. रेल्वेस्टेशनमधून गाडी निघून वेग घेते ना घेते तोच ज्या डब्यात मामा होते त्या डब्यात एक पोलिस चढला. त्याला पाहून मामांना आपल्या भूमिगत चळवळीचा शेवट आज होणार असं क्षणभर वाटलं. गाडीनं वेग घेतला. तो पोलिस आत आला आणि मामाची चौकशी करू लागला.

तो म्हणाला, "तुम्ही कुठे निघालात?"

मामा म्हणाले, "पुण्याला."

तो अधिकची चौकशी करू लागला. तिकिटाची हकीकत मामांनी त्याला सांगितली. पुढच्या स्टेशनवर उतरून गार्डला सांगून तिकीट घेणार. मामांना त्याचा अंदाज आला होता. तो काही मामांना पकडायला आला नव्हता. हलक्या आवाजात मामांना तो म्हणाला,

"कशाला काढता तिकीट? मी तुम्हाला सुरक्षित पोहोचवितो पुण्याला. तिकिटाचे पैसे मला द्या."

मामाचा जीव भांड्यात पडला. मामा निवांत झोपले. घोरपडी रेल्वेस्टेशनवर मामांना त्यांनी उठवलं. तुम्ही येथे उतरा म्हणाला. मामांनी तिकिटाचे पैसे त्याच्या हातावर टेकवले. त्याने मामांना सलाम ठोकला. त्याच्या सलामाचा स्वीकार करून मामा सुरक्षित पुण्याला पोहोचले.

१ जानेवारी १९४३ चा दिवस. ब्रिटिशधार्जिण्यांनी नववर्ष म्हणून साजरा केला. माझ्या व कोतवाल कुटुंबाच्या लेखी हे वर्ष काळं वर्ष ठरलं. डिसेंबरमध्ये माझ्या मधल्या दिराला अटक झाली. साहेब परागंदा झालेले. त्यांचा काही ठावठिकाणा नाही. घरात आई हतबल झालेल्या. गणपतराव एकमेव कमवते. तेही जेलमध्ये. घर कोलमडून पडण्याची वेळ आली. अशा अवस्थेत मोठ्या दिरांनी घराला आधार दिला. आईला

हिंमत दिली. आम्ही सर्वांनी कंबर कसून या संकटाला सामोरे जाण्याचा निर्धार केला. शिरवडे रेल्वे जळीतप्रकरणी बाबुराव कोतवालांना अटक झाल्याची वार्ता वाऱ्यासारखी शहरभर पसरली. 'बुडत्याला काडीचा आधार' तसा बाबुराव कोतवालांचा आधार आमच्या घराला होता. तोही आता संपला. बाबुराव कोतवालांचं शाळकरी वय, चव्हाण घराण्याचा वारसा कोतवाल कुटुंबानं पुढे चालविला. साहेबांनाही शाळकरी वयातच अटक झाली होती. स्वातंत्र्याची चळवळ कराड शहरात व पंचक्रोशीत तरुणांच्या माध्यमातून चेतवीत ठेवण्याचं कार्य बाबुराव कोतवाल प्राणपणाने करीत. पोलिसांची करडी नजर त्यांच्यावर होतीच. साहेबांचा ठावठिकाणा बाबुराव कोतवालांना असतो, असा समज पोलिसांचा झालेला. गणपतराव व बाबुरावांना अटक केली म्हणजे साहेब आपोआप शरणागती पत्करतील असा पोलिसांचा कयास. बाबुराव कोतवाल व त्यांच्या सहकाऱ्यांवर शिरवडे रेल्वेस्टेशन जळीतप्रकरणी कोर्टात खटला भरण्यात आला. त्यांना कारावासाची शिक्षा झाली. कारागृहात गणपतराव व बाबुराव कोतवालांच्या छळाच्या कहाण्या कानावर येत. दोघांनाही साहेबांच्या ठावठिकाणाबद्दल विचारणा करण्यात येत होती. बाबुरावांना नरकयातना भोगाव्या लागू लागल्या. त्यांना विवस्त्र करून मारझोड करण्यात येत. बाबुरावांचे अंग फुटले; पण तोंडून शब्द फुटला नाही. १७ दिवस यातना सहन करीत राहिले. शेवटी त्यांना न्यायालयानं दोन वर्षांची शिक्षा ठोठावली. हीच कमी-जास्त हालत गणपतरावांची केली. साहेबांचा पत्ता या दोघांच्या तोंडून वदवून घेण्यात पोलिसांना यश आलं नाही.

१४ जानेवारी भारतीय संस्कृतीतील स्त्रियांच्या जीवनातील अत्यंत जिव्हाळ्याचा दिवस. तिळसंक्रांतीला सुवासिनींना वाण देण्याची परंपरा अनादिकालापासून चालत आलेली. आईनं सकाळपासून आमच्यामागं टुमणं सुरू केलं - 'अगं, लवकर तयार होऊन विठ्ठल-रुखमाईच्या मंदिरात जाऊन वाण वाहून या... सायंकाळी गल्लीतल्या सुहासिनींना हळदी-कुंकवाला बोलवा... वेणूची पहिली संक्रांत असल्यानं तिची खनानारळानं ओटी भरावयाची आहे... सौभाग्यलेण्याचं सामान मी व ज्ञानोबा बाजारात जाऊन घेऊन येतो तोपर्यंत तुम्ही तयारीला लागा... ' आई एकामागून एक सूचना आम्हाला देऊ लागल्या. कोण जाणे, आज मला काही

करावंसं वाटतच नव्हतं. चित्त थाऱ्यावर नव्हतं. मन उदास झालं होतं. सारखी साहेबांची आठवण येऊ लागली. साहेब कुठं असतील, कसे असतील याची चिंता मनाला खाऊ लागली. माझं कशातच मन लागेना. आई आणि ज्ञानोबा बाजारात गेले. माझ्या दोन्ही जावा माझ्याजवळ आल्या व मला म्हणाल्या,

"वेणू, चल आपण विठ्ठल-रुख्माईच्या मंदिरात जाऊन वाण देऊन येऊ."

"नको अक्का. माझं आज कशातच लक्ष लागत नाही." मी.

"असं नको म्हणूस वेणू. तुझी पहिली संक्रांत आहे. स्त्रीच्या जीवनात पहिल्या संक्रांतीला फार महत्त्व असतं." सोनूताई.

"मला माहीत आहे अक्का; पण माझं सौभाग्यच आज माझ्यासोबत नाही." मी.

माझे डोळे पाण्यानं डबडबून आले. मी हुंदका दिला. मला सोनूताईनं पोटाशी धरलं. माझी समजूत काढू लागल्या.

"काही काळजी करू नको. भाऊजी सुरक्षित असतील याबद्दल माझ्या मनात शंका नाही."

मधली जाऊ भागीरथी मला येऊन बिलगली आणि हमसून हमसून रडू लागली. रडत रडतच म्हणाली, 'ही कसली संक्रांत? माझे हे तुरुंगात आणि धाकल्या भावजीचाही पत्ता नाही."

मी तिला जवळ घेतलं. स्वत:ला सावरलं. आम्ही तिघी वाण देण्यासाठी जाण्याची तयारी करीत होतो. सूर्य माथ्यावर आला होता. आमची तयार होण्याची लगबग चालू होती तोच दरवाजासमोर पोलिसांचा जथ्था दिसला. त्यापैकी एक जण माझी चौकशी करू लागला. थोरल्या जाऊबाई त्यांना सामोऱ्या गेल्या.

म्हणाल्या, "काय काम आहे तुमचं? कशासाठी येथे आलात?"

तो पोलिस सावकाश म्हणाला, "आम्ही वेणूबाईला अटक करण्यासाठी आलो आहोत."

थोरल्या जाऊबाई गोंधळून गेल्या. काय करावं त्यांना काही सुचेना. आई घरात नाही. मुलांचे वडील आईसोबत बाजारात गेलेले. त्यांची ही अवस्था पाहून मी समोर आले आणि म्हणाले,

"मी वेणूबाई, मला अटक करायची आहे का?"

"होय, तसा आदेश आहे सरकारचा." पोलिस.

"कोण सरकार? आम्ही मानीत नाही या सरकारला." मी.

"मला तर सरकारच्या आदेशाचं पालन करावं लागेल." पोलिस.

आमच्या घराभोवती पोलिसांचा वेढा पडलेला. बाहेर बघ्याची गर्दी जमलेली. आईपर्यंत ही बातमी पोहोचली. आई धावतच घरी आल्या. बाहेरूनच पोलिसांवर चवताळल्या.

म्हणाल्या, "खबरदार! माझ्या सुनेला हात लावाल तर... तिने तुमचा काय गुन्हा केला? हिंमत असेल तर माझ्या यशवंताला पकडून दाखवा! चालते व्हा माझ्या घरातून!"

तोपर्यंत ज्ञानोबा घरी येऊन पोहोचले. त्यांनी आईची समजूत काढली. मी, आई, माझ्या जावा, भाये व भांबावलेली चार नातवंडं एकमेकांकडं असहाय भावनेनं पाहू लागलो. मी मनाची तयारी केली. सोबत चार कपडे घेतले. आई आणि भायांचं दर्शन घेतलं. भारतमातेच्या मुक्ततेसाठी साहेबांनी जी पाऊलवाट चोखाळली त्या पाऊलवाटेवर मी निघाले. सप्तपदीचा अर्थ हाच असावा. स्त्री दाक्षिण्याला सरकारनं तिलांजली दिली.

मला पाच-सहा दिवस कराडच्या तुरुंगात ठेवलं. हळूहळू शहरभर मला अटक केल्याची वार्ता पसरली. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून माझी रवानगी इस्लामपूरच्या जेलमध्ये झाली. या जेलचे देशमुख नावाचे अधिकारी कधी गोड बोलून तर कधी धमकावून साहेबांचा ठावठिकाणा विचारीत. मधूनमधून दमदाटीही करीत. 'यशवंतराव कुठे आहेत?' हा त्यांचा प्रश्न आणि त्याला माझं 'मला माहीत नाही' हे ठरलेलं उत्तर. आणि हे खरंही होतं. साहेब कुठे आहेत हे मला माहीतच नव्हतं.

माझे थोरले भाया आणि मधले भाया यांचं एकमेकांवर भारी प्रेम. गणपतरावांना पकडल्यानंतर ज्ञानोबांचं घरात लक्षच नव्हतं. सारखे बाहेर बाहेर राहायचे. घरात कुणाशीही मनमोकळं बोलायचे नाहीत. थोरल्या जाऊबाईही सतत चिंतेत असायच्या.

एके दिवशी ज्ञानोबा आईला म्हणाले, "मला असं कळलं की, मी आजारी असल्याचं प्रमाणपत्र जर तुरुंगाधिकाऱ्याला दिलं तर गणपतची सुटका होऊ शकते. माझ्या पाठीवर एक लहानसे आवळू आहे त्याची मी

शस्त्रक्रिया करून घेतो. शस्त्रक्रिया केल्याचं प्रमाणपत्र घेऊन ज़ेलरला देतो व गणपतला जेलमधून सोडून आणतो.''

आई आणि मोठ्या जावेनं याला विरोध केला. ज्ञानोबा ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. त्यांनी आपल्या आवळूचं ऑपरेशन करून घेतलं. आई नाइलाजास्तव दवाखान्यात त्यांच्यासोबत होत्या. डॉक्टरांनी ऑपरेशन करून अर्ध्या-पाऊण तासानंतर जखमेच्या मलमपट्टीच्या सूचना देऊन ज्ञानोबांना घरी पाठवून दिलं. घरी त्यांची घ्यावी तशी काळजी घेण्यात आली नाही. जखम चिघळली. त्यांची प्रकृती खालावली. त्यात त्यांना न्युमोनिया झाला. घरात कुणी कर्ता पुरुष नाही. मी नुकतीच जेलमधून सुटून आले होते. मी सतत त्यांच्या जवळ असायचे. काय हवे ते विचारायचे. आठ दिवस जीवन-मृत्यूचा खेळ मी प्रत्यक्ष डोळ्यांनी बघत होते. औषधपाण्याची आबाळ झाली. आठ-दहा दिवसांत त्यांची जीवनज्योत मालवली. या प्रसंगाचा माझ्या मनावर आघात झाला. मी कित्येक तास बेशुद्ध होते. माझ्या प्रकृतीवर जो परिणाम झाला तो कायमचा. शांतारामबापूंनी पंधरा दिवसांनंतर ज्ञानोबा गेल्याची वार्ता पुणे येथे साहेबांची भेट घेऊन सांगितली. तीर्थस्वरूप बंधूचा असा अंत व्हावा आणि त्या वेळी साहेबांना त्यांच्याजवळ राहता आलं नाही याची रुखरुख साहेबांना आयुष्यभर डाचत होती. माझ्या तब्येतीचीही माहिती शातारामबापूंनी साहेबांना दिली.

वेळ सकाळची असेल. एक कार आमच्या घरासमोर येऊन उभी राहिली. कारमधून उतरले ते माझे एक जवळचे नातेवाईक. ते घरात आले. त्यांचा पाहुणचार झाल्यानंतर ते म्हणाले, ''मला साहेबांनी पाठवलं आहे. आपल्या प्रकृतीची इत्थंभूत माहिती शातारामबापूंनी साहेबांना सांगितली. पुणे येथील तज्ज्ञ डॉक्टरला आपली प्रकृती दाखवून औषधोपचार करण्याचे साहेबांनी ठरविले आहे. त्यासाठी आपण माझ्यासोबत पुण्याला चलावं.''

मी आईसोबत चर्चा केली. आईही म्हणाल्या, ''इथल्या उपचारांनी तुला गुण येत नाही, तर पुण्याला जाऊन चांगल्या डॉक्टरला दाखवून परत कराडला ये.''

मी आईची परवानगी घेतली. माझ्या पाहुण्यासोबत पुण्यास जाण्यास निघाले. साहेब पुण्यात ज्याठिकाणी राहत असत तिथे आम्ही आलो. साहेबांनी शहरातील नामांकित डॉक्टरांना मला दाखविलं. चार-सहा तासांनी

मी बेशुद्ध पडत असे. शुद्धीवर आणण्यासाठी डॉक्टर्सना शर्थीचे प्रयत्न करावे लागत. माझ्या प्रकृतीत तसा काही फरक पडेना. मग साहेबांनी डॉक्टर्सच्या सल्ल्याने मला फलटणला पाठविण्याचा निर्णय घेतला. कराडला पाठविण्याबद्दल मी आग्रह धरला तर साहेब म्हणाले,

"कराड येथे घरात कुणी कर्ता पुरुष नाही. आई एकटीच आहे. घर संपूर्ण दुःखी आहे. अशा परिस्थितीत तू माहेरी गेलेली बरी." मला साहेबांचं म्हणणं पटलं. माझ्या एका नातेवाइकासोबत मी फलटणला आले.

फलटणला आल्यानंतर माझ्या प्रकृतीत काहीएक फरक पडला नाही. अशक्तपणा वाढला. एके दिवशी माझी प्रकृती अचानक बिघडली. मी देवाघरी जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. माझा भाऊ बाबासाहेब मोरे येथेच होता. त्याने माझी तब्येत जास्त असल्याचा निरोप साहेबांना दिला.

साहेब रातोरात गाडी करून फलटणला आले. रात्री थांबून सकाळी लगेच जातो म्हणाले. माझी अवस्था बघून त्यांनी निर्णय बदलला. साहेबांनी फलटण येथील नामांकित डॉक्टर बर्वे यांना घरी बोलावून घेतलं. साहेबांना पाहून डॉक्टरांना आश्चर्याचा धक्का बसला. डॉक्टरांनी माझी काळजी घेतो, असा साहेबांना शब्द दिला. साहेब दिवसभर फलटणला थांबले. मला बरं वाटलं. दुसऱ्या दिवशी सकाळी साहेबांनी माझ्यासोबत नाश्ता केला.

मला म्हणाले, "तुझ्या प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर लगेच कराडला जा. आई तिथे एकटीच आहे."

आमच्या दोघांचं बोलणं बराच वेळ चालू होतं. जास्त दिवस इथं थांबणं साहेबांना धोक्याचं होतं. साहेब निघण्याच्या तयारीला लागले तोच बाहेरून माझा भाऊ - बाबासाहेब मोरे धावतच घरात आला व सांगू लागला,

"बाहेर पोलिसांनी घराला वेढा घातला आहे."

साहेब माझ्याजवळ आले व म्हणाले, "घाबरू नका. मला काहीही होणार नाही. मनानं खंबीर हो, काळजी करू नकोस."

साहेब घराबाहेर पडले. पोलिसांनी त्यांना अटक केली. मी हे सर्व माझ्या डोळ्यांनी पाहत होते. माझी काळजी सोबत घेऊन फलटण संस्थानाने बांधलेल्या नवीन कारागृहात राजबंदी म्हणून साहेब दाखल झाले.

आठ दिवस फलटण जेलमध्ये राहिल्यानंतर साहेबांची रवानगी सातारच्या जेलमध्ये झाली. साहेबांवर खटला भरावा की स्थानबद्ध करावं असा आठ-पंधरा दिवस अधिकाऱ्यांचा घोळ चालू होता. इथे अनेक चळवळीतील कार्यकर्ते साहेबांना भेटले. साहेबांना त्यांच्यासोबत न ठेवता प्रसिद्ध दरोडेखोर म्हातारबा रामोशी कोतवडेकर यांच्या खोलीत डांबलं. पंधरा दिवसांनंतर साहेबांवर खटला भरण्याचा निर्णय झाला.

१९४२ ला तांबवे येथील भाषणाबद्दल साहेबांवर खटला दाखल करण्यात आला. हा खटला कराड येथे चालविण्यात आला. त्याकरिता साहेबांना सातारहून कराडला नेण्यात आलं. साहेबांवर जे आरोप लावण्यात आले ते खरे होते. साहेबांना सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. वकील असल्यामुळं साहेबांना 'ब' वर्ग मिळाला. एक आठवड्याच्या आत साहेबांची रवानगी येरवड्याच्या तुरुंगात करण्यात आली. 'ब' वर्गाकरिता बांधलेल्या राहुटीत साहेब राहू लागले. बाजूच्या राहुट्यांत पहिल्या वर्गातील स्थानबद्धांचा कॅम्प होता. तिकडून चांगली पुस्तके 'ब' वर्गातील कैद्यांना वाचण्यासाठी मिळत असत. त्या वेळी गाजत असलेली ऑथर कोस्लरची 'डार्कनेस ॲटनून' ही कादंबरी साहेबांनी मिळविली. सावकाश वाचली. कम्युनिस्ट राजवटीचे धिंडवडे या कादंबरीत अधोरेखित केले आहेत.

साहेबांचे जेलमधील पाच महिने वाचन आणि चर्चेत कसे संपले हे कळलंही नाही. सरकारनं दिलेलं प्रवासाचं वॉरंट घेऊन साहेब रेल्वेनं कराडला आले. जानेवारी १९४४ च्या सुमारास साहेब घरी आले. वर्षभराच्या ताटातुटीनंतर साहेबांना पाहून घरच्यांना आनंद झाला. गणपतरावही सुटून आले. त्यांनी व्यापारउदीमाकडे लक्ष दिलं. पुढे नगरपालिकेचे अध्यक्षही झाले. सर्व घर आनंदात न्हाऊन निघालं. गणपतरावांना कारागृहात असताना क्षयाचा विकार जडला होता. प्राथमिक अवस्थेत असल्यानं बरा होईल असा डॉक्टरांचा कयास होता. याची आम्ही बाहेर कुठे वाच्यता केली नाही. दोन-तीन आठवडे साहेबांनी घरच्यांसोबत घालविले. कार्यकर्त्यांचा राबता चालूच होता. मीच साहेबांना एक दिवस आपण दोघं फलटणला जाऊन येऊत म्हणून विनंती केली. साहेबांनी माझ्या विनंतीला मान दिला. मी व साहेब दोन दिवसांच्या मुक्कामाकरिता फलटणला पोहोचलो.

फलटण येथील मुक्कामाचे दिवस कसे गेले आम्हाला कळलेही

नाहीत. लग्न झाल्यानंतर पहिल्यांदाच एवढा निवांत वेळ मिळाला मला व साहेबांना. एकमेकाला समजावून घेता आलं या मुक्कामात. कराडला परतायची आमची तयारी चालू होती तोच साताऱ्याचे पोलिस अधिकारी प्रतिबंधक स्थानबद्धतेचं वॉरंट घेऊन साहेबांना पकडण्यासाठी फलटणला हजर झाले.

साहेब त्या पोलिस अधिकाऱ्याशी बोलू लागले, "मी प्रथम माझ्या पत्नीला कराडला घरी सोडून येतो. त्यानंतर मी तुमच्या हवाली होईल. तोपर्यंत तुम्ही माझ्या आजूबाजूला राहण्यास माझी हरकत नाही."

पोलिस अधिकाऱ्यांनी साहेबांचं म्हणणं मान्य केलं. मी तर पोलिसांचा धसकाच घेतला. माझ्या डोळ्यांनी अश्रूंना मार्ग मोकळा करून दिला. साहेब माझी समजूत घालू लागले. मला वाटलं, मी साहेबांना विनाकारणच आग्रह करून फलटणला घेऊन आले. साहेब इथं आले म्हणजे त्यांना अटक होते. या घटनेनं माझं मन खाऊ लागलं. अशा मन:स्थितीत आम्ही उभयतांनी फलटण सोडलं. पोलिस पहाऱ्यात कराड गाठलं. साहेब आमचा निरोप घेऊन येरवड्याच्या प्रवासाला निघाले.

या काळात आंतरराष्ट्रीय घडामोडींचा परिणाम भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत दिसू लागला. अनेक नेत्यांना पॅरोलवर सोडण्यात येऊ लागलं. साहेबांनादेखील कुटुंबाकरिता पॅरोलवर बाहेर येऊन काही करावं असं वाटू लागलं. तीन महिन्यांनंतर साहेब पॅरोलवर सुटून तुरुंगाबाहेर आले. दोन महिन्यांच्या अवधीत कुटुंबाला उभं करण्याचा प्रयत्न साहेबांनी सुरू केला. गणपतरावांचा आजार, त्यांच्यावर होणारा खर्च, पुतण्यांचा शाळेचा खर्च भागविताना साहेबांची दमछाक होऊ लागली.

साहेबांनी किसन वीर आबांना मला घराकडे लक्ष देणं किती आवश्यक आहे याच कल्पना दिली. आबांनी साहेबांना पॅरोलची मुदत वाढून घेण्याची सूचना केली. साहेबांनी तसा प्रयत्न केला. त्यात त्यांना यश आलं. गणपतरावांना मिरजेला माधवनगरमध्ये घर करून डॉक्टरच्या निगराणीखाली ठेवलं. गणपतरावांसोबत त्यांची पत्नी व माझी नणंद राहू लागल्या. खर्चात वाढ झाली. साहेब मन लावून वकिली करू लागले. मिळकतही वाढली. माझा सुखाचा संसार सुरू झाला. १९४५ ते १९४६ खऱ्या अर्थानं संसारसुख उपभोगलं. मला दिवस गेले. माझी मातृत्वाची इच्छा

पूर्ण झाली. आम्ही कन्यारत्नाला जन्म दिला. पण हे सुख जास्त काळ उपभोगता आलं नाही. माझ्या मुलीला काही दिवसांच्या आतच माझ्यापासून काळानं हिरावून घेतलं. चव्हाण घराण्याची दु:खांची उतरंड कमी होण्याऐवजी वाढतच चालली.

चव्हाणांच्या या डुबत्या घराला आधार देण्याचं साहेबांच्या मावस बहिणीचे पुत्र शामराव पवार यांनी मनावर घेतलं. महाविद्यालयीन शिक्षण सोडून नोकरी पत्करली. साहेबांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले. साहेबांच्या मिरज, कराड येरझारा चालूच होत्या. कार्यकर्त्यांच्या प्रश्नांची उकल करण्याचं काम चालूच होतं. गणपतरावांकडे मीही काळजीपूर्वक लक्ष देऊ लागले; पण त्यांच्या तब्येतीत काही फरक पडत नव्हता. भूमिगत चळवळीबद्दल गांधीजींचा गैरसमज करून देण्यात आला होता. या काळात गांधीजी विश्रांतीसाठी पाचगणीला आल्याचं साहेबांना कळलं. भाऊसाहेब सोमण यांना आग्रह करून महात्मा गांधींची भेट घेण्यासंबंधीची विनंती केली. सोमण यांना सोबत घेऊन साहेब महात्मा गांधींच्या भेटीला पाचगणीला गेले. अर्ध्या तासाची भेट ठरली. या भेटीत भूमिगत चळवळीबद्दल सविस्तर माहिती भाऊसाहेब सोमण व साहेबांनी महात्मा गांधींना दिली.

या भेटीत महात्मा गांधी म्हणाले, ''या चळवळीच्या सर्व प्रकाराबद्दल मी माझे मत व्यक्त करणार नाही; पण या चळवळीत काम करणारे सर्व जण देशभक्त आहेत हे मी मान्य करतो. त्यांच्या काम करण्याच्या पद्धती माझ्या पद्धती नाहीत.'' या भेटीत दोघांचे समाधान झाले.

गणपतराव आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू लागले. प्रकृतीत म्हणावा तसा फरक पडताना दिसत नव्हता. एकदा साहेब व त्यांच्यात वाद झाला.

साहेब त्यांना म्हणाले, ''दादा, मी माझे आवडते काम सोडून घराकडे लक्ष केंद्रित केलं. तुम्ही डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे उपचार करून का घेत नाहीत?''

यावेळेला गणपतरावांनी थोडं मनावर घेतलं व ते मिरजेस राहावयास गेले. इकडे १९४६च्या निवडणुकीची चर्चा सुरू झाली. साहेबांचं नाव चर्चेत आघाडीवर होतं; पण साहेब तयार नव्हते. कार्यकर्ते नाराज झाले. कार्यकर्ते गणपतरावांकडे मिरजेला गेले. साहेबांना समजून सांगण्याची जबाबदारी गणपतरावांवर सोपवली. साहेबांना गणपतरावांनी धमकावणीच्या

भाषेत सांगितलं, "तुला उभं राहावयाचं नव्हतं तर घराकडं दुर्लक्ष का केलं? कशाकरता घराची राखरांगोळी केली? ते काही नाही. तू माझं ऐकणार नसशील तर मीही या दवाखान्यात राहणार नाही." गणपतरावांनी साहेबांना निर्वाणीचा इशाराच दिला. साहेब बंधू व कार्यकर्त्यांच्या प्रेमाखातर निवडणूक लढवण्यास तयार झाले. सातारला कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत साहेबांच्या नावाला कार्यकर्त्यांनी पहिल्या पसंतीची मान्यता दिली. साहेबांसोबत के. डी. पाटील, व्यंकटराव पवार, बाबुराव गोखले यांना उमेदवारी मिळाली. प्रचारात गणपतरावांनी हिरीरीने साहेबांचा प्रचार केला. भूमिगत चळवळीचं कार्य व मित्रमंडळीच्या प्रयत्नाला यश आलं. साहेब या निवडणुकीत निवडून आले. गणपतरावांनी देहभान विसरून धाकट्या भावाला निवडून आणलं. या निवडणुकीचा केवळ १५० रुपये खर्च साहेबांना करावा लागला. हीच ती निवडणूक चव्हाण घराण्याची इतिहासाला नोंद घ्यावयास लावणारी ठरली.

■■

# सह्याद्री

काँग्रेस पार्लमेंटरी पार्टीची बैठक मुंबईतील काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात ३० मार्च १९४६ रोजी होणार असल्याचं पत्र साहेबांना मिळालं. जिल्ह्यातील वयोवृद्ध नेते भाऊसाहेब सोमण यांच्यासह सातारा जिल्ह्यातून निवडून आलेले सर्व प्रतिनिधी मुंबईला पोहोचले. मंत्रिमंडळ बनविण्याबद्दल चर्चा सुरू झाली. सोमण यांनी तपासे या मागासवर्गीय उमेदवाराला मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व मिळावं याकरिता प्रयत्न सुरू केले. बाळासाहेब खेर साहेबांना ओळखतही नव्हते. के. डी. पाटील आणि मोरारजी देसाई यांची येरवडा जेलमध्ये ओळख झालेली होती.

के. डी. पाटील साहेबांना म्हणाले, "आपण मोरारजी देसाई यांना भेटू."

साहेबांनी के. डी. पाटलांना नकार दिला.

उलट के. डी. पाटलांना साहेब म्हणाले, "तुम्ही तुमच्यासाठी प्रयत्न करून बघा."

के. डी. पाटलांना मंत्रिमंडळात जाण्याची अजिबात इच्छा नव्हती. प्रयत्न करायचा तो साहेबांसाठी, असं त्यांनी ठरवलं होतं.

माधव आश्रमात साहेब एकटेच वर्तमानपत्र वाचत बसले होते तोच खोलीचा दरवाजा खटखटल्याचा आवाज आला. साहेबांनी खोलीचा दरवाजा उघडला तर समोर आमदार बाबासाहेब शिंदे व त्यांच्यासोबत शिराळा येथील माधवराव देशपांडे. बाबासाहेबांनी साहेबांना बाहेर चालण्याचा आग्रह केला.

साहेब त्यांना म्हणाले, "के. डी. पाटील बाहेर गेलेत. ते आले म्हणजे आपण जाऊत."

त्यांच्यासोबत आलेले देशपांडे म्हणाले, "तुम्हाला एकट्यालाच घेऊन येण्याचा निरोप आहे त्यांचा."

साहेबांनी देशपांड्यांना विचारण्याचा प्रयत्न केला; पण त्यांनी उत्तर देण्याचं टाळलं. साहेब बाबासाहेबांनी सोबत आणलेल्या गाडीत बसले. समोरच्या सीटवर देशपांडे बसलेत. गाडी वेगाने कुठे जातेय हे साहेबांना कळेना.

तेवढ्यात देशपांडे म्हणाले, "बाळासाहेब खेरांनी तुम्हाला घेऊन यावयास सांगितलं आहे. आपण बाळासाहेब खेरांकडे जात आहोत."

गाडी बाळासाहेब खेरांच्या बंगल्यासमोर थांबली. साहेब आणि ते दोघे गाडीतून उतरून बंगल्यात शिरले. खेरांनी साहेबांचं स्वागत केलं.

खेर म्हणाले, "चव्हाण, मी तुम्हाला मंत्रिमंडळात घेऊ शकत नाही; पण पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मी तुमची निवड केलेली आहे. तुम्हाला लवकर कामावर हजर व्हावं लागेल."

"मला लगेच हजर होता येणार नाही. मला थोडा अवधी लागेल हजर व्हायला." साहेब.

बाबासाहेब शिंदे आणि साहेब बंगल्याबाहेर आले. बाबासाहेब शिंदेंचा साहेबांमध्ये जीव होता. त्यांनी साहेबांना ही संधी दवडू नका म्हणून सल्ला दिला. साहेबांनी 'बघू' म्हणत बाबासाहेबांचे आभार मानले व टॅक्सी करून माधव आश्रमात आले.

के. डी. पाटील खोलीवर आलेले होते. साहेबांनी घडलेला वृत्तांत के. डी. पाटलांना सांगितला. के. डी. पाटलांनी आपण बाबासाहेब शिंदेंचा सल्ला स्वीकारूया, असं मत साहेबांकडे व्यक्त केलं. दुसऱ्या दिवशी खेरांनी मंत्रिमंडळाची यादी जाहीर केली. साहेबांचं नाव पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून प्रसिद्ध झालं.

बाळासाहेब खेरांचा हा निर्णय साहेबांना काही पटला नाही. निराशाजनक मन:स्थितीत साहेब कराडला आले.

गणपतराव नाराजी व्यक्त करीत म्हणाले, ''बाळासाहेब खेरांनी तुला राज्यमंत्री तरी करावयास पाहिजे होतं.''

घरातील मंडळींची व कार्यकर्त्यांचीही हीच भावना होती. साहेब मंत्री होणार असा सर्वांचा अंदाज होता; पण तसं घडलं नाही. आई आणि गणपतरावांनी, बाबासाहेबांनी दिलेला सल्ला ऐकावा असं मत व्यक्त केलं. माझं मत साहेबांनी मला विचारलं. आई आणि गणपतरावांच्या मताला मी दुजोरा दिला. आई, गणपतराव व कार्यकर्त्यांच्या भावनांची कदर करून साहेबानी मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला.

साहेबांनी आठ-दहा दिवस सर्व कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेतल्या. 'तुम्हापासून दूर जातोय...' असे म्हणत आपल्या भावना व्यक्त केल्या. पुढेही अशीच सदिच्छा माझ्या पाठीशी राहू द्या, अशी विनंतीही सर्व कार्यकर्त्यांना केली. आई आणि गणपतरावांच्या पायांवर मस्तक टेकवून साहेब घराबाहेर पडले. कराडमधील जनता साहेबांना निरोप देण्यासाठी रेल्वेस्टेशनवर लोटली. सर्वांचा भावपूर्ण निरोप घेऊन साहेब रेल्वेत जाऊन बसले.

सकाळी सकाळी रेल्वे पुण्याला पोहोचली. तेथे मुंबईला जाणारी डेक्कन क्वीन प्लॅटफॉर्मवर लागलेली होती. साहेब या गाडीतून उतरून डेक्कन क्वीनमध्ये जाऊन बसले. प्लॅटफॉर्म सोडून रेल्वेस्टेशनबाहेर पडताच गाडीनं वेग घेतला.

सोनहिराकाठी जन्मलो, लहानपणी मित्रांसोबत खेळलो-हुंदडलो-रागावलो, रुसवाफुगवा केला, राग विसरलो... निसर्गाच्या सान्निध्यात घडत गेलो. कृष्णाकाठी वैचारिक जडणघडण झाली. जीवाभावाचे मित्र मिळविले. त्यांच्या सहकार्यानं यशाची एक एक पायरी चढत गेलो. आता कृष्णाकाठ सोडून सागराकडे निघालो. कृष्णा ही शेवटी सागरालाच मिळते. सागराला मिळाल्यानंतर जसं तिचं अस्तित्व नष्ट होतं तसंच माझं कृष्णाकाठचं कार्य महाराष्ट्राच्या सागरात विलीन होणार... महाराष्ट्ररूपी सागरात मला कृष्णा-कोयनेतील पोहण्याचा अनुभव कामास येईल... सोनहिरा या ओढ्याच्या पाण्यात मी पोहण्यास कमी पडलो होतो. माझा माझ्या मित्रांनी जीव

वाचविला होता. इथे मी कदाचित कमी पडलो तर मला वाचविणारे मित्र असतील का... अशा गतकाळातील आठवणींना उजाळा देत असतानाच सातारा जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचे पुढारी रावसाहेब मधाळे हे साहेबांजवळ आले.

म्हणाले, "कुठे निघालात?"

"मुंबईला निघालो." साहेब.

"काय काम काढलं आज मुंबईला?" मधाळे.

"महाराष्ट्र सरकारनं माझ्यावर नवी जबाबदारी टाकली आहे. ती स्वीकारण्यासाठी मी मुंबईला जात आहे." साहेब.

"फारच नशीबवान आहेत साहेब तुम्ही... आजचा दिवस भाग्याचा आहे." मधाळे.

"पण मी तर काही भविष्य पाहत नाही. भविष्य पाहून आजचा दिवस मी ठरविला नाही." साहेब.

"ते पाहण्याचीदेखील तुम्हाला आवश्यकता नाही साहेब. आज १४ एप्रिल आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिवस. या शुभदिनी आपण नवीन जबाबदारी स्वीकारणार आहात... या कार्यात तुम्हाला निश्चित यश मिळणार आहे." मधाळे.

साहेब म्हणाले, "आजचा योगायोग चांगला आहे."

साहेब परत विचार करू लागले. नियतीला आपल्या हातून वंचितांसाठी काही काम करून घ्यायचं असणार....

गाडी खंडाळ्याच्या घाटातून प्रकाशानंतर अंधार अन् अंधारानंतर प्रकाश असा पाठशिवणीचा खेळ खेळत बोगदे पार करून मुंबईला जवळ करीत होती. साहेबांच्या जीवनातील पुढील वाटचालीचा हा नियतीचा संकेत तर नव्हता?

रेल्वेस्टेशनवर उतरून साहेब सरळ जुन्या सचिवालयात पोहोचले. खेरांचे कार्यालय जुन्या सचिवालयात आहे याची साहेबांना कल्पना होती. विचारपूस करीत साहेब खेरांच्या खोलीजवळ जाऊन पोहोचले. खेर कामात असल्याचं त्यांना कळलं. त्यामुळे खेरांना भेटण्यापूर्वी मोरारजीभाईंना भेटावं असं साहेबांच्या मनात आलं. साहेबांची आणि मोरारजींची ओळख नव्हती तरीही साहेब मोरारजींच्या कार्यालयात गेले. आपली ओळख स्वत:च मोरारजींना करून दिली.

मोरारजी साहेबांना म्हणाले, ''तुम्ही अजून रुजू झाला नाही?''

''खेर साहेब कामात आहेत. तोपर्यंत आपली भेट घ्यावी असं वाटलं म्हणून आपल्या भेटीस आलोय.'' साहेब.

''तुमची काही हरकत नसेल तर तुम्ही गृहविभागात रुजू व्हाल का?'' मोरारजी.

''चालेल.'' साहेब.

मोरारजींनी साहेबांना आपल्या गृहविभागात पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून रुजू करून घेतलं.

गृहखात्यात पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेच्या जिव्हाळ्याच्या कलेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचं काम करण्याचं साहेबांनी ठरविलं. 'तमाशा' या कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन हीनतेचा होता. तसं पाहिलं तर सामान्य माणसापासून ते राजेरजवाड्यापर्यंतची मंडळी या कलेचा आस्वाद घेत; पण तिला समाजमान्यता नव्हती. चोरून लपून सर्व स्तरातील कर्ती मंडळी या कलेत रंगून जायची. मग ती मोगलाई असो की पेशवाई.... प्रकार वेगवेगळे होते हाच काय तो त्यात फरक. लहानपणी यात्रेत अनेक वेळा तमाशाचा आनंद साहेबांनी घेतलेला होता. त्यातील उत्स्फूर्त हजारजबाबीपणा, शृंगार, नृत्यगीत, नैसर्गिक विनोद, वेशभूषा हा या कलेचा आत्मा होता. तमाशा म्हणजे 'शिवी' असा समज जनमानसांत झालेला होता. त्याला प्रतिष्ठा देण्याचं काम साहेबांनी केलं. एक अभ्यासपूर्ण मसुदा साहेबांनी तयार केला. त्यात कलावंतांना प्रतिष्ठा देण्यासंबंधीचा मुद्दा प्रामुख्याने अधोरेखित केला. 'तमाशा'ऐवजी 'लोककला' असं नामकरण केलं. त्याला सरकारनं मान्यता देणं किती अगत्याचं आहे याबाबत मसुद्यात पटवून देण्यात आलं. हा सर्व मसुदा टाईप करण्याचं काम श्रीपाद डोंगरे या टंकलेखकानं केलं. हा मसुदा मोरारजींमार्फत मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेसाठी पाठविला. त्या मसुद्यावर मुख्यमंत्र्यांनी 'अप्रतिम' असा आपला शेरा लिहिला. साहेबांनी या कलेला राजाश्रय मिळवून दिला. टंकलेखन करणारे श्रीपाद डोंगरे हे प्रथम साहेबांच्या सान्निध्यात आले आणि शेवटपर्यंत कुटुंबीयातील एक सदस्य म्हणूनच घरात वावरले.

झपाटल्यासारखे साहेब कामाला लागले. त्यांची जेवणाची आबाळ

होऊ लागली. मी माझ्या मुंबईतील नातेवाइकांना कळविलं, ''साहेबांची जेवण्याची व्यवस्था करा म्हणून.'' साहेबांनी नातेवाइकांकडे जेवावयास जाण्याचं साफ नाकारलं. साहेब आमदार व पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले तरीही आर्थिक चणचणीनं साहेबांचा पिच्छा सोडलेला नव्हता. ते मित्रांसोबत त्यांच्या जेवणाच्या डब्यात वाटेकरी व्हायचे. कधीकधी तर दिवसातून एकदाच जेवायचे. पगारातून स्वत:चा खर्च भागवून आम्हालाही पैसे पाठवायचे. पैसे पाठवण्यास उशीर झाला तर कराडातील त्यांचे मित्र गौरीहर यांच्याकडून पैसे घेण्यास सांगायचे. ही माहिती कुणीतरी नानासाहेब कुंटे यांच्या कानावर घातली. नानासाहेब कुंटे हे त्या वेळी सभापती होते. साहेबांची माहिती ऐकून त्यांना वाईट वाटले. या देशाचा स्वातंत्र्यसैनिक आणि माझा आमदार या अवस्थेत मुंबईत राहतो? त्यांचं मन अस्वस्थ झालं. त्यांनी साहेबांना बोलावून घेतलं.

म्हणाले, ''मी सभापती या नात्यानं तुम्हाला विनंती करीत नसून, तुम्ही व मी एका विचाराचे कार्यकर्ते आहोत. कार्यकर्ता या नात्यानं तुम्ही माझ्याकडे सकाळ-संध्याकाळ जेवायला आलं पाहिजे.''

साहेबांनी होकार देण्यास टाळाटाळ करून पाहिली; पण नानासाहेब कुंटे यांच्या प्रेमाखातर जेवायला येण्यास होकार दिला. सकाळ-संध्याकाळ ते त्यांच्याकडे जेवायला जाऊ लागले.

साहेब जरी मुंबईला राहू लागले तरी त्यांचं सारं लक्ष घर आणि मिरजकडे असे. गणपतरावांचा आजार बळावत चालला होता. मी, आई व गणपतरावांच्या पत्नी सौ. भागीरथीबाई त्यांच्या आजारावर लक्ष ठेवून होतो. त्यांना काही दिवस मिरजेस डॉ. भरुचा यांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आलं. क्षयावरची औषधं अत्यंत महागडी होती तरीही साहेब त्या औषधींची व्यवस्था करीत असत. गणपतरावांच्या प्रकृतीला आराम पडल्यानंतर साहेबांनी कराडमध्ये वेगळं घर करून त्यांची राहण्याची व्यवस्था करून दिली.

तशात कराडच्या राजकारणानं वेगळंच वळण घेतलं होतं. साहेबांनी कुऱ्हाडीच्या राजकारणाला कधी आश्रय दिला नाही. मुंबईत कामात व्यस्त असताना कराडकडे लक्ष देण्यास साहेबांना वेळ मिळेनासा झाला. कुऱ्हाडीच्या राजकारणाने कराडचाही ताबा घेतला. साहेबांचे पाठीराखे चंद्रोजी पाटलांचा

खून झाला. या खुनाचे शिंतोडे के. डी. पाटलांवर उडविण्यात येऊ लागले. या खुनाशी साहेबांचाही संबंध लावण्यात येऊ लागला. या सर्व कुऱ्हाडीच्या राजकारणाचा परिणाम शेवटी के. डी. पाटलांच्या खुनात झाला. या प्रकरणात साहेबांना गुंतवण्याचा प्रयत्न काही हितशत्रू करू लागले.

गणपतरावांना स्टेशनजवळच्या कल्याणी बिल्डिंगमध्ये घर करून देण्यात आलं होतं. त्यांच्या प्रकृतीत सारखे चडउतार व्हायचे. गणपतरावांची तब्येत नाजूक असल्याचं कळताच साहेब गणपतरावांना भेटण्यासाठी दुपारी तीन वाजताच कल्याणी बिल्डिंगमध्ये आले. राधाक्का त्या वेळी गणपतरावांजवळ होत्या. दोघा बंधूंनी दोन तास गप्पा मारल्या. डॉ. भरुचांच्या औषधपाण्याचा म्हणावा तसा परिणाम गणपतरावांच्या प्रकृतीवर दिसून येत नव्हता तरीही त्यांच्या सल्ल्यानं गणपतरावांनी वागावं, असं साहेबांनी गणपतरावांना सांगितलं. राधाक्का आणि साहेब बोलत बोलत बिल्डिंगच्या खिडकीजवळ आले. खिडकीतून रेल्वेस्थानक दिसायचे. क्वचित वेळी साहेब सिगारेट ओढायचे. सिगारेट पेटवून त्यांनी ती ओढण्यास सुरुवात केली तोच त्यांना रेल्वेचा सिग्नल दिसला.

साहेब राधाक्काला म्हणाले, "अक्का, येतो मी."

"अरे यशवंता, गणपतदादांशी धड बोलला नाहीस. त्याला तसंच इथं टाकून निघालास?" राधाक्का.

साहेबांचं राधाक्काच्या बोलण्याकडं लक्ष नव्हतं. भारावलेल्या मन:स्थितीत ते त्या सिग्नलकडे पाहत रेल्वेस्टेशनकडे निघाले. साहेबांना केवळ तो सिग्नल दिसू लागला. त्यांना त्या सिग्नलकडून काय संकेत मिळाला कोण जाणे? साहेब पुण्याला जाणाऱ्या रेल्वेगाडीत जाऊन बसले. रेल्वे पुण्याच्या दिशेनं धावू लागली. राधाक्काला साहेबांचा राग आला. त्या रागाच्या भरातच साहेबांना काहीबाई बोलू लागल्या. गणपतराव राधाक्काची समजूत काढू लागले. दिवेलागणीची वेळ झाली होती. सौ. भागीरथीबाई या गणपतराव आणि राधाक्काचा जेवणाचा डबा घेऊन कल्याण बिल्डिंगमध्ये आल्या. रात्री भाऊ, भावजयी आणि नणंद या तिघांनी मिळून जेवण केलं. जेवताना राधाक्का गप्प गप्प होत्या.

सौ. भागीरथीबाईंनी गणपतरावांना विचारलं, "राधाक्का आज अशा गप्प का आहेत?"

"तूच विचार तिला कसला राग आलाय ते." गणपतराव.

"अहो नणंदबाई, काय झालं असं रुसायला? माझं काही चुकलंय?" सौ. भागीरथीबाई.

"तुझं काय चुकणार! चुकलं ते यशवंताचं." राधाक्का.

"भावजी आले अन् न भेटताच निघून गेले हे आईला कळलं तर किती वाईट वाटेल त्यांना." सौ. भागीरथीबाई.

"तूच बघ तुझा दीर कसा आहे ते... दुपारी आला, दोन तास थांबला अन् काहीही न सांगता, आईला न भेटता निघून गेला एखाद्या वेड्यासारखा." राधाक्का.

गणपतराव समजावण्याच्या सुरात म्हणाले, "अक्का, यशवंता गेला तर जाऊ दे. त्याला आता महाराष्ट्राचं बघावं लागतं. महाराष्ट्र हेच आता त्याचं घर आहे. फार मोठा कारभार असतो महाराष्ट्राचा. तू मनाला काही वाईट वाटून घेऊ नकोस आणि यशवंता येऊन गेला हे आपल्या तिघांशिवाय कुणालाही माहीत होता कामा नये."

बोलण्याच्या भरात रात्रीचे बारा केव्हा वाजले हे त्या तिघांनाही कळलं नाही. गणपतरावांनी औषध-गोळ्या घेतल्या. थोडा वेळ वाचून झाल्यावर दिवा बंद करून ते झोपले. नणंद-भावजयीला केव्हा झोप लागली हे समजलंही नाही. रात्री दारावर कुणीतरी धक्के मारत असल्याच्या आवाजाने गणपतरावांना जाग आली. लगबगीनं पलंगावरून उतरून दरवाजा उघडण्याकरिता निघाले तोच दरवाजा तोडून बंदुका, भाले, कुऱ्हाडी हातात असलेले पाच-सहा तरुण घरात घुसले. सर्व घर त्यांनी धुंडाळलं.

गणपतरावांनी त्यांना विचारलं, "कोण हवंय तुम्हाला?"

"यशवंता आजही वाचला आमच्या तडाख्यातून" असं म्हणून ती मंडळी आल्यापावली घराबाहेर पडली.

कुऱ्हाडीचं राजकारण करणाऱ्यांना साहेब कराडला आल्याचे कळले असावे. त्यांनी वेळ साधली होती; पण काळ आला नव्हता. राधाक्का आणि सौ. भागीरथीबाई भेदरून गेल्या होत्या. त्यांना काय घडतंय हे कळलंच नाही. हां हां म्हणता ही बातमी कराडमध्ये पसरली. पोलिसांची पाचावर धारण बसली. कारण साहेब गृहखात्यामध्ये सचिव होते. साहेबांची शोधाशोध सुरू झाली. साहेब रात्री पुण्याला पोहोचल्यानंतर तेथील पोलिसांना

कळवून पुण्याच्या सर्किट हाऊसवर निवांत झोपी गेले. सातारहून पुण्याच्या पोलिसांकडे विचारणा झाल्यानंतर साहेब पुण्यात सुखरूप आहेत अशी माहिती सातारा पोलिसांना मिळाली. साहेबांच्या जीवावर बेतण्याची ही दुसरी वेळ.

गणपतरावांची प्रकृती डॉ. भरुचांच्या उपचारांनी सुधारू लागली. त्यांना बरं वाटू लागलं. ते हिंडूफिरू लागले. नेहमीच कार्यात मग्न असलेले गणपतराव घरात बसून कंटाळले. त्यांना घर खायला उठायचं. पहिलवान गडी या बिमारीनं खंगून गेले. त्यांची मित्रमंडळी त्यांना घरी बसू देत नसे. मित्रांचा लोंढा सारखा त्यांच्या मागे असायचा. गणपतराव कराडच्या बाजारपेठेत वजन बाळगून होते. ते बाजारपेठेत गेले म्हणजे बाजार हरखून जायचा. व्यापारी गणपतरावांचं आदरातिथ्य करायचे. याच वेळी कराड नगरपालिकेच्या निवडणुका जाहीर झाल्या. आमच्या घराकडे कार्यकर्ते आणि साहेबांच्या मित्रांच्या चकरा वाढल्या. एकेदिवशी गौरीहर सिंहासने, हरिभाऊ लाड, शिवाजीराव बटाणे, शांतारामबापू, माधवराव जाधव, तुकाराम शिंदे, राघूअण्णा लिमये हे गणपतरावांच्या तब्येतीची विचारपूस करायला घरी आले. गणपतरावांशी गप्पागोष्टी केल्यानंतर ही मंडळी आईकडे जाऊन बसली. या सर्वांना पाहून यशवंताच घरी आल्याची क्षणभर जाणीव विठाईंना झाली. आईच्या डोळयांच्या कडा पाणावल्या.

आई म्हणाल्या, "अरे लबाडांनो, आज आठवण झाली का आईची? यशवंता मुंबईला गेल्यापासून तुम्हीपण माया पातळ केली या घरावरची. अरे, तुम्ही मला सर्व जण यशवंताच्या ठिकाणीच आहात. मी कधी फरक केला का तुमच्यात अन् यशवंतात?"

आईच्या या बोलण्यानं सर्वांच्या काळजात कालवाकालव झाली. चळवळीतील आठवणी जाग्या झाल्या. रात्री-बेरात्री आईनं चार घास आग्रहानं खाऊ घातलेले आठवले. कधीही चिडचीड केली नाही की वैतागल्या नाहीत. प्रत्येकाची आई होऊन वागल्या. सर्वांना गहिवरून आलं.

गहिवरलेल्या अवस्थेतच गौरीहर सिंहासने म्हणाले, "आई, चुकलं का काही आमचं?"

"नाही रे, काही चुकलं नाही तुमचं. तुमच्या रूपानं मला आज यशवंता भेटल्याचा आनंद झाला. असेच येत जा बाबांनो... यशवंताला

तर आता वेळ मिळत नाही. तुम्हीतरी वेळ काढून भेटत जा रे लेकरांनो...'' आई.

''आई, आम्हालातरी तुमच्याशिवाय या कराडमध्ये कोण आहे? साहेब तर मुंबईत कामात तल्लीन झालेत. त्यांना कामाशिवाय कुणाचीच आठवण येत नाही.'' शांतारामबापू.

''करू देत त्याला आता काम. त्याचा संसार मोठा झालाय म्हणे. सर्व महाराष्ट्र त्याचं घर झालंय म्हणे. करू देत बिचाऱ्याला महाराष्ट्राची काळजी. बरं, आज सर्व यशवंताचे बालपणाचे भिडू मिळून आलात म्हणजे तसंच काहीतरी महत्त्वाचं काम असणार.'' आई.

''आई, आम्ही गणपतरावांच्या ऋणातून मुक्त होऊ इच्छितो.'' राघूअण्णा लिमये.

''अरे, असं काय काम गणपतने तुमच्यासाठी केलं?'' आई.

''आई, गणपतदादांनी आम्ही केलेला गुन्हा पोटात ठेवून आम्हाला माफ केलं होतं.'' बटाणे.

''अरे, पण गणपतचा असा कोणता गुन्हा तुम्ही केला होता?'' आई.

''आई, फार वर्षांपूर्वी आमच्याकडून एक चूक झाली होती. आम्ही नगरपालिकेच्या निवडणुकीत गणपतदादाच्या विरोधात उमेदवार उभा केला होता. त्या वेळेस साहेबांना आम्ही कोल्हापूरहून प्रचाराकरिता बोलावून घेतलं होतं काँग्रेसच्या. आम्ही सर्वांनी गणपतदादाच्या विरोधात काँग्रेसचा प्रचार केला होता. गणपतदादा त्या निवडणुकीत पडले होते; पण त्यांनी आम्हाला आणि साहेबांना माफ केलं होतं. मनात कुठलाच राग न ठेवता पुढील चळवळीत आम्हाला त्यांनी मार्गदर्शन केलं. लहान भावांप्रमाणं वागवलं आम्हाला. हे ऋणच आहेत आमच्यावर गणपतदादाचे. यातून आम्ही मुक्त होऊ इच्छितो.'' हरिभाऊ लाड.

या सर्व मंडळींनी आईची मनधरणी केली. नगरपालिकेत गणपतरावांना उभं करून निवडून आणतो म्हणाले.

आईंनी गणपतरावांना बोलावलं अन् विचारलं, ''गणपत, या सर्वांचं म्हणणं आहे, तुला निवडणुकीला उभं करायचं. तुझी तब्येत ही अशी तोळामासा झालेली. निवडणुकीची दगदग तुला सोसंल का? विचार करून तूच काय ते सांग या लेकरांना.''

गणपतराव बैठकीत आले. वाघासारखा दिसणारा माणूस; पण शेळी करून टाकला बिमारीनं. बैठकीत बोलताना पूर्वीची बोलण्यातील रग आणि आत्मविश्वास कायम होता. गौरीहर सिंहासने यांनी नगरपालिकेच्या सर्व वॉर्डांतून आपण आपले उमेदवार उभे केले तर आपल्याला कसं यश मिळेल याचा वृत्तांत सांगितला.

यावर गणपतराव म्हणाले, 'चांगली गोष्ट आहे. करा की सर्व वॉर्डांतून उमेदवार उभे. आणू सर्वांना निवडून!''

''आपण त्यांच्या पाठीशी राहावं, असं आम्हाला वाटतं.'' माधवराव जाधव.

''मी आहेच की तुमच्यासोबत.'' गणपतराव.

''सोबत राहून चालणार नाही. गणपतराव, तुम्ही नेतृत्व करावं या निवडणुकीचं, असं आमचं मत आहे.'' माधवराव जाधव.

''नाही, मला जमणार नाही नेतृत्व करायला. माझी तब्येत साथ देणार नाही मला. मी आपला तुमच्यासोबत राहतो.'' गणपतराव.

''आपल्या वॉर्डातून तीन उमेदवार आम्ही निवडले आहेत.'' गौरीहर सिंहासने.

''कोण आहेत हे तिघे? आणि तीन उमेदवार निवडून कसं चालेल? चौथाही उमेदवार निवडला पाहिजे ना?'' गणपतराव.

''होय. गणपतराव, चौथा उमेदवार आमचा तुम्ही आहात. तुम्ही नाही म्हणू नका. तुमच्यामुळं बाकीचे तीन उमेदवार निवडून येतील.'' लिमये.

''तुमच्यासोबत मारुती डांगे, बारटक्के, रावबा कदम हे उमेदवार असतील.'' शांतारामबापू.

''आई, गणपतरावांना आपण जर परवानगी दिली तर गणपतरावांना निवडून आणतो.'' लिमये.

''अरे, यशवंताला तर माझ्यापासून दूर पाठवून दिला. गणपतला तरी माझ्यापासून दूर करू नका.'' आई.

''आई, म्हणताहेत हे लोक तर दे परवानगी मला.'' गणपतराव.

आईने आपल्या काळजावर दगड ठेवून गणपतरावांना निवडणूक लढवण्यास परवानगी दिली. साहेबांच्या सर्व मित्रांना आनंद झाला. सर्वांनी

आईचं दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला. निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली. गणपतराव तहानभूक विसरून कामाला लागले. निवडणूक चुरशीची झाली. साहेबांचं कार्य, मित्रमंडळींची साहेबांपोटी असलेली एकनिष्ठता कामी आली. गणपतरावांनी उभे केलेले सर्व उमेदवार निवडून आले. गणपतराव सर्वात जास्त मते घेऊन निवडून आले. निवडून आल्यानंतर सर्व उमेदवार आईचा आशीर्वाद घेण्यासाठी घरी आले. आईनं सर्वांचं तोंड गोड केलं. 'एकदिलानं राहा, जनतेची कामं करा, माझा आशीर्वाद तुमच्या पाठीशी सदैव राहील असे म्हणत चौघांनाही पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आठ दिवसांनी नगराध्यक्षाची निवडणूक घेण्याचं जाहीर झालं. निवडून आलेल्या सर्व सदस्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्व सदस्यांनी एकमुखानं गणपतरावांची नगराध्यक्ष म्हणून निवड केली. एक-दोन सदस्यांनी एकाच घरात दोन महत्त्वाची पदं कशाकरिता द्यायची, अशी कुजबूज सुरू केली; पण तिला काही प्रतिसाद मिळाला नाही. शिवाजीराव बटाणे, माधवराव घाटगे, गौरीहर सिंहासने, हरिभाऊ लाड, शांतारामबापू, माधवराव जाधव, ज्ञानोबा डुबल, तुकाराम शिंदे, राघूअण्णा लिमये आणि साहेबांच्या असंख्य चाहत्यांनी कष्ट घेतले. हे सर्वजण गणपतदादांच्या ऋणातून मुक्त झाले.

दुसऱ्या जागतिक महायुद्धानं ब्रिटिश राजवट खिळखिळी होत होती. जगावरील त्यांची पकड ढिली होऊ लागली. भारतीय स्वातंत्र्यचळवळीनं उग्ररूप धारण केलं होतं. भारतामधून महात्मा गांधी, नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद लोकचळवळीच्या रेट्यातून शेवटचा प्रहार ब्रिटिश सत्तेवर करीत होते तसेच सुभाषचंद्र बोस बाहेरून स्वतंत्र भारताची 'आझाद हिंद फौज' स्थापन करून ब्रिटिश भारतावर चाल करून येत असल्याचे कळल्यामुळे हैराण झालेलं ब्रिटिश सरकार भारताच्या स्वातंत्र्याविषयी गांभीर्यानं विचार करू लागलं. चळवळीच्या प्रखर माऱ्यानं भारतातील कायदा आणि प्रशासन कोसळून पडलं. शेवटी भारताला स्वातंत्र्य देण्याचा निर्णय ब्रिटिश सरकारला घ्यावा लागला. १५ ऑगस्ट १९४७ हा सोनियाचा दिवस उगवण्यापूर्वी १४ ऑगस्टच्या मध्यरात्री ब्रिटिश ध्वज उतरून भारतीय तिरंगा मोठ्या दिमाखानं दिल्लीच्या लाल किल्ल्यावर फडकू लागला.

साहेब मुंबईतच होते. साहेबांचं वास्तव्य मरीन लाईन्सला होतं. स्वातंत्र्य चळवळीतील साहेबांचे जीवाभावाचे सवंगडी १४ ऑगस्टलाच मुंबईत त्यांच्या निवासस्थानी येऊन पोहोचले. महात्मा गांधींच्या एका हाकेवर अनेकांनी आपल्या प्राणाची आहुती स्वातंत्र्याच्या वेदीवर कुर्बान केली. अनेक मातांनी आपल्या पोटच्या गोळ्याला सुळावर चढताना पाहिलं. फासावर लटकविताना पाहिलं. अनेकांचा वंशबूड झाला तो केवळ आजच्या या एका दिवसाकरिता... साहेबांची नजर भिंतीकडे गेली. महात्मा गांधींचा फोटो भिंतीवर नाही हे साहेबांच्या लक्षात आले. साहेब कुणालाही न सांगता घराबाहेर पडले. मरीन लाईन्सला आले. महात्मा गांधींचा फोटो मिळविला. घरी आले. भिंतीवर त्यांचा फोटो लावला. या वेळी सर्व मित्र साहेबांकडे पाहतच राहिले. कारण साहेबांनी पूर्ण गांधीवाद कधीच स्वीकारला नव्हता; पण आजचे साहेबांचे रूप पाहून सर्व मित्रांना आनंद झाला.

मुंबईच्या जुन्या सचिवालयाच्या इमारतीवर मध्यरात्री मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार होतं. साहेब मित्रांसोबत या कार्यक्रमात सहभागी झाले. साहेबांच्या मन:पटलावर गतकाळातील आठवणी सरकू लागल्या. शाळकरी वयात खांद्यावर राष्ट्रध्वज घेऊन स्वातंत्र्य चळवळीच्या दिंडीत सहभागी झालो, तुरुंगवास भोगला, शिक्षणाकरिता मानहानी पत्करावी लागली, धनदांडग्यांच्या मनोवृत्तीनं गरिबीचे चटके सहन करावे लागले.... कुटुंबानं सोसलेला मनस्ताप आठवला. केवळ 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभून राहो' याकरिता. जुन्या सचिवालयाच्या इमारतीवर मुख्यमंत्री ध्वज फडकावत होते तर इकडे साहेब सुराज्याचा विचार करीत होते. वंचितांसाठी हे राज्य राबवायचं, त्यांच्या जीवनात सुखाचे दिवस यावे याकरिता आपण काम करायचं हा मनसुबा साहेबांनी मनोमन रचविला.

इकडे गणपतराव रात्रंदिवस महानगरपालिकेच्या कामांत लक्ष घालू लागले. त्यांचं तब्येतीकडं दुर्लक्ष होऊ लागलं. वेळेवर पथ्यपाणी पाळण्यास दिरंगाई होऊ लागली. परत त्यांच्या क्षयानं उचल खाल्ली. आर्थिक ओढाताण तर होतीच. साहेब शक्य तितकी आर्थिक मदत पुरवीत होते; पण ती तोकडी पडत होती. आईचे भाचे किसनराव घाटगे मदतीला होते. मुंबईच्या डॉक्टरांनी औषधोपचार केले. त्यांच्या प्रयत्नालाही यश येण्याची चिन्हे दिसेनात. गणपतरावांनी अंथरूण धरलं. शेलाटी बांध्याचा उंचापुरा गडी

पार गळ्हाटून गेला होता. सत्तेचाळीसचा डिसेंबर उजाडला. गणपतरावांनी अन्नपाणी सोडलं. कुणी भेटावयास आले तर डोळे उघडायचे. एक दृष्टिक्षेप त्यांच्याकडे टाकायचे. त्यांना हात जोडायचे आणि परत डोळे मिटवायचे. आवाज खोल गेलेला. 'आईऽ आईऽऽ, यशवंतऽ यशवंतऽऽ' असे पुटपुटायचे. आईनं ओळखलं - गणपत जास्त दिवसांचा सोबती नाही. गौरीहर सिंहासने यांच्यामार्फत साहेबांना निरोप पाठवला. गणपतराव अंतिम सत्याच्या वाटेवर निघाले.

दुसऱ्या दिवशी गणपतरावांनी सर्वांची साथ सोडली. घरात एकच हलकल्लोळ झाला. भागीरथींबाईनं देहभान विसरून हंबरडा फोडला. त्यांना मी आवर घालण्याचा प्रयत्न करू लागले. माझ्या अशक्तपणामुळं मी त्यांना आवरण्यास कमी पडू लागले. त्यामुळे माझ्या मदतीला सोनूबाई धावून आल्या. त्या भागीरथीबाईला पोटाशी धरून त्यांना धीर देऊ लागल्या. मी आईला सावरलं. आई एखाद्या पुतळ्यासारख्या शून्यात पाहू लागल्या. मी त्यांना रडतं केलं. त्यांचा दु:खाचा बांध फुटला. घरात एकच आक्रोश झाला. आई दु:खात बुडाल्या. पती, दोन तरुण मुलं गेली. आईवर हा तिसरा आघात होता. असा काय मी अपराध केला की त्याची सजा मला भोगावी लागत आहे, असे आईला वाटले. तशाही परिस्थितीत आईनं मन खंबीर केलं. अख्खं कामेरी गाव धावून आलं. देवराष्ट्रही खाली झालं. कराडमध्ये त्यांच्या मृत्यूची बातमी वाऱ्यासारखी पसरली. कराडच्या पंचक्रोशीतील जनसमुदाय कराडला लोटला. साहेबांचे सारे मित्र धावून आले. साहेबांची वाट पाहून शेवटी गणपतरावांना अग्निडाव देण्यात आला. दुसऱ्या दिवशी साहेब कराडला पोहोचले. वडिलांसमान भावाला खांदा देऊ शकलो नाही याबद्दल साहेब दु:खीकष्टी झाले. स्वत:ला कमनशिबी समजू लागले. दोन्ही भावांचं शेवटचं मुखदर्शनही आपल्याला होऊ नये ही आपल्या जीवनाची शोकांतिका आहे. ते स्वत:ला अपराधी समजू लागले. स्वत:ला दोष देत हळहळ व्यक्त करू लागले.

ढालीसारखा पाठराखण करणारा भाऊ गेला. के. डी. पाटील, चंद्रोजी पाटील यांच्यासारखे त्यागी मित्र गेले. आता कुणाच्या भरवशावर व कुणासाठी राजकारणात राहायचं? संसार विस्कळीत झालेला... घराला कुणी वाली नाही... घरातील चिमुकल्यांचं भवितव्य वादळात सापडलेलं...

या नियतीच्या संकटाला आई कुठपर्यंत तोंड देणार? त्यांचंही आता वय झालं... या विचारानं साहेब अस्वस्थ झाले. पुढे काय करावं या विचारातच साहेब गढून जायचे. देशकार्य की संसार? यातून त्यांना एकाची निवड करावी लागणार होती. निर्णय होत नव्हता. शेवटी हताश झाले.

एके दिवशी मला विश्वासात घेऊन साहेबांनी विचारलं, "वेणू, मी चक्रव्यूहात सापडलोय. मला मार्ग दिसेनासा झालाय. माझी बुद्धी काम करेनाशी झाली. मी काय करू तूच सांग."

"यापूर्वी तुमच्यावर अनेक संकटं आली तरी तुम्ही डगमगला नाहीस त्या वेळेस. समर्थपणे मुकाबला केला त्या संकटांचा. मग आजच असं काय झालं की, यातून तुम्हाला मार्ग काढता येत नाही?" मी.

"किती दिवस मी तुम्हाला त्रास देऊ? माझी काही जबाबदारी आहे की नाही? का तुम्हाला वाऱ्यावर सोडून देशकार्य करीत राहू? माझ्या मनाला हे पटत नाही. काहीतरी निर्णय घेतलाच पाहिजे." साहेब.

"तुम्हाला आठवत असेल - तुम्ही मला ९ ऑगस्ट ४२ ला मुंबईहून पत्र लिहिलं होतं...त्यात तुम्ही लिहिलं होतं, 'तू माझं हृदय आहे, तर स्वातंत्र्यचळवळ माझा श्वास आहे. श्वास आणि हृदय यांचा समन्वय माणसाला जिवंत ठेवतो. मला जिवंत राहण्यास श्वास आणि हृदय सारखेच महत्त्वाचे आहे. मी दोघांपासून दूर जाऊ इच्छित नाही.' आठवा हे तुमचं पत्र आणि घ्या निर्णय." मी.

साहेब माझ्याकडे आश्चर्यचकित होऊन पाहू लागले. माझ्या या आठवणीनं त्यांच्यातील देशभक्तीचा विचार जागा झाला.

मोठ्या आत्मविश्वासानं ते म्हणाले, "वेणू, तुझ्या या आठवणीनं मी निर्णय घेतला - मला देशातील आपल्यासारखं जीवन जगणाऱ्या हजारो-लाखो कुटुंबांसाठी तरी देशकार्य करायला पाहिजे."

"तुम्ही घराची काळजी करू नका. ज्ञानोबांच्या पत्नी सोनूताई, गणपतरावांच्या पत्नी भागीरथीताई व मी तुमच्या कच्च्याबच्च्यांना आणि आईला सांभाळण्यास समर्थ आहोत. मुलांचे देवराष्ट्रचे घाटगेमामा, कामेरीचे जाधवमामा आमच्या मदतीला आहेतच. आपले भाचे शामराव पवार आणि बाबुराव कोतवाल हे आमची काळजी घेताहेतच की... आपण निःसंकोच मनानं देशसेवा करावी." मी.

आई आणि माझ्यावर घराची जबाबदारी सोपवून साहेब मुंबईला पोहोचले. स्वातंत्र्य मिळून जेमतेम सहा महिने लोटले. खेर मंत्रिमंडळात मुख्यमंत्र्यांच्या काम करण्याच्या पद्धतीबद्दल धुसफूस सुरू झाली. खेरांचा जातीय अहंकार आणि मोरारजींचा नागरी अहंभाव या धुसफुशीला कारणीभूत होता. ग्रामीण भागातून निवडून आलेले प्रतिनिधी आर्थिक आणि सामाजिक प्रश्नासंबंधी उघडउघड बोलू लागले. या सर्व प्रश्नांच्या बाबतीत खेर व मोरारजी उदासीन होते. खेरांच्या आडून धर्मवर्चस्ववादी विचारावाले डोके वर काढू लागले. बहुजन समाजातील सत्यशोधक विचाराची मंडळी या विचाराला ठेचून काढण्यासाठी टपून बसलेली.

अठ्ठेचाळीसचा जानेवारी उगवला. ३० जानेवारीला स्वातंत्र्यावर मोठा आघात झाला. गांधीजी या जगात राहिले नाहीत. माथेफिरू विचारानं गांधीजींची हत्या केली. देश पोरका झाला. हत्या करणारा विचार महाराष्ट्राच्या भूमीत निपजला. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद आता कुठे निवळत चालला होता; पण या दुर्दैवी घटनेनं त्यानं पुन्हा उचल खाल्ली. मंत्रिमंडळाच्या कामकाजाबद्दलची नाराजी ही या घटनेच्या पथ्यावर पडली. घडू नये ती घटना घडली. ब्राह्मण समाजाचं जीवन उद्‌ध्वस्त करण्यात आलं. महाराष्ट्राचं समाजमन दुभंगलं. ग्रामीण भागात जाळपोळ झाली. ब्राह्मणांची घरं लुटण्यात आली. महाराष्ट्र सरकारनं तत्पर या विस्थापित समाजाला संरक्षण दिलं. या विस्थापित समाजाचं पुनर्वसन शहरात केलं. त्यांना अनुदान देण्यात आलं. त्यांचे संसार सरकारनं उभे केले. देशपातळीवरही हिंदू-मुस्लिम दंगे चालूच होते. त्याला आवर घातला जावा याकरिता जनतेला सहभागी करून घेतलं पाहिजे हा विचार साहेबांना सुचला. साहेब या वेळी गृहखात्यात काम करीत होते. गृहमंत्री म्हणून मोरारजी देसाईंना प्रामुख्यानं या प्रसंगाला सामोरं जावं लागलं. जनतेकडूनच जनतेला संरक्षण मिळालं पाहिजे हा विचार गृहखात्यासमोर आला. साहेबांनी या कामात लक्ष घातलं. सखोल असा अभ्यास केला. या कामी साहेबांना न्या. गजेंद्रगडकर यांचे बंधू आणि माणेकशा यांचं साहाय्य लाभलं. संपूर्ण मुंबई राज्यात पोलिसांना साहाय्यभूत ठरेल अशी समांतर होमगार्ड संघटना बांधली. याचा फायदा सामान्य नागरिकांना झाला. समाजातील सर्व स्तरातून या संघटनेला प्रतिसाद मिळू लागला. मोरारजींनी या कामाबद्दल साहेबांचं कौतुक केलं.

गांधीहत्येचे वातावरण निवळते न निवळते तोच राजकीय असंतोषाचे ढग राजकीय पटलावर जमू लागले. एके दिवशी भाऊसाहेब राऊत यांनी आपल्या निवासस्थानी खेर-मोरारजींच्या कार्यपद्धतीवर नाराज असणाऱ्या नेत्यांची बैठक बोलावली. खेर-मोरारजी यांच्या कार्यपद्धतीवर नाराज असणाऱ्यांमध्ये दत्ता देशमुख, भाऊसाहेब राऊत, शंकरराव मोरे, पी. के. सावंत, केशवराव जेधे, र. के. खाडिलकर, तुळशीदास जाधव, आचार्य अत्रे इत्यादी या बैठकीला हजर होते. या बैठकीचं निमंत्रण साहेबांनाही होतं. साहेबांनीही या बैठकीत भाग घेतला.

भाऊसाहेब राऊत यांनी उपस्थितांचं स्वागत केलं. ही बैठक बोलावण्यामागचा हेतू प्रास्ताविकात समजावून सांगितला.

ते म्हणाले, "ग्रामीण भागातील बहुजनांच्या अपेक्षा पूर्ण करण्यास हे सरकार अपयशी ठरलं आहे. आपण सर्व बहुजनांचे प्रतिनिधी आहोत. आपण विचारानं प्रेरित होऊन जनहितासाठी काँग्रेस पक्षात कार्यरत आहोत. याठिकाणी आपला खेर-मोरारजी यांच्याकडून अपेक्षाभंग झाला आहे. जनहितासाठी काही वेगळा विचार आपल्याला करावयाचा आहे. याकरिता आजच्या बैठकीचं प्रयोजन आहे."

"आपण गांधी-नेहरू यांच्या नेतृत्वाखाली सामान्य शेतकरी, कष्टकरी व कामगार यांच्या जीवनात सुखाची पहाट पाहण्यासाठी काँग्रेसमध्ये काम करीत आहोत. ज्या वर्गाचं आपण प्रतिनिधित्व करतो त्या वर्गाचं हित जपणं आपलं कर्तव्य आहे. खेर-मोरारजी सरकारची काम करण्याची गती आणि नीती पाहता सामान्य जनतेला न्याय मिळेल असं मला वाटत नाही. मग मी विचार करतो, आपण या सरकारमध्ये कशाकरिता राहायचं? ज्या उद्देशानं आपण गांधी-नेहरू यांच्या पाठीमागे उभे राहिलो तो उद्देश असफल होत असेल तर त्यांना सोडून आपण वेगळी चूल मांडलेली बरी." केशवराव जेधे.

"बरोबर आहे. बहुजनांसाठी हे सरकार काहीच करत नसेल तर या सरकारला आपण कशाकरिता पाठिंबा द्यायचा? हे सरकार ज्या पक्षाचं आहे त्या पक्षात काय म्हणून राहायचं? आपण जनतेसमोर कुठल्या तोंडानं जाणार आहोत? शेतकरी व कामगारांचे प्रश्न जर आपल्याला सोडता आले नाहीत तर आपला राजकीय बळी शेतकरी व कामगार

घेतल्याशिवाय राहणार नाही. या वर्गाच्या प्रश्नांकरिता आपण त्यांच्याच नावानं 'शेतकरी कामगार पक्षा'ची स्थापना करून त्यांचे प्रश्न मार्गी लावू.'' शंकरराव मोरे.

''आपण याबाबत यशवंतरावांचं मत जाणून घेऊया.'' तुळशीदास जाधव.

अत्यंत समर्पक असं विवेचन साहेबांनी केलं.

सर्वांच्या भावनांचा आदर करीत साहेब म्हणाले, ''आपण सर्वजण इथं एकत्र आलो ते एका उद्देशानं प्रेरित होऊन. तो उद्देश म्हणजे वंचितांचे अश्रू पुसणे. स्वातंत्र्याकरिता आपण जे लढलो ते वंचित शेतकरी, कष्टकरी, कामगार यांच्या जीवनाला अर्थ प्राप्त करण्याकरिता. या जनतेला आपण न्याय देऊ शकलो नाही तर या स्वातंत्र्याला काही अर्थ उरणार नाही. तुमच्या या एका मुद्द्याशी मी सहमत आहे - तो म्हणजे खेर-मोरारजी यांच्या मंत्रिमंडळाकडून गरिबांच्या ज्या अपेक्षा आहेत त्या अपेक्षा हे सरकार पूर्ण करू शकणार नाही. नेहरूंनी समाजवाद स्वीकारला आहे. मला वाटते नेहरूंवर आपण विश्वास ठेवला पाहिजे. बहुजनांचे प्रश्न काँग्रेससोबत राहूनच आपण सोडवले पाहिजेत, असं माझं वैयक्तिक मत आहे. बहुजनांचे जे प्रश्न आहेत ते भारतीय पातळीवरचे आहेत. भारतीय पातळीवरचे प्रश्न सोडविण्यासाठी पक्षही भारतीय पातळीवरचा पाहिजे. केवळ काँग्रेस पक्षच अखिल भारतीय पातळीवरचा आहे. बहुजनांचे प्रश्न सोडविण्यासाठी मला वेगळा पक्ष काढण्याची आवश्यकता वाटत नाही. आपण वेगळा पक्ष काढला तर त्याचं अस्तित्व हे प्रांतिक पातळीपुरतं मर्यादित राहील. वेगळा पक्ष काढण्याच्या आपल्या भूमिकेशी मी सहमत नाही. तिसरा मुद्दा आहे - या पक्षाला जातीचा वास येतोय अशी चर्चा बाहेर ऐकावयास मिळते.''

मध्येच आचार्य अत्रे म्हणाले, ''मी या पक्षात आहे. मग या पक्षाला जातिवादी पक्ष कसं म्हणता येईल?''

''या पक्षात आपलं स्थान काय आहे याची मला कल्पना नाही.'' साहेब.

''यशवंतराव, तुम्ही काँग्रेस पक्षाच्या सत्तेत आहात, मोरारजींच्या सोबत कार्यरत आहात. तुम्हाला त्यांच्याबद्दल आपुलकी राहणारच.'' अत्रेंनी साहेबांवर वार केला.

"अत्रे साहेब, यशवंतराव म्हणतात त्यात काही तथ्य आहे असं मला वाटतं. आपण त्यांना समजावून घेतलं पाहिजे. यशवंतराव सत्तेत आहेत म्हणून कॉंग्रेसची बाजू घेताहेत असा आरोप त्यांच्यावर करणे योग्य नाही. सत्तेची लालसा असती तर त्यांच्या योग्यतेनुसार त्यांना मंत्रीपद मिळावयास पाहिजे होते; पण ते मिळाले नाही. त्यांच्यावर जी जबाबदारी टाकली आहे ती ते यशस्वीपणे हाताळताहेत. यशवंतरावांनी म्हटल्याप्रमाणे आपण सर्वजण नेहरूंवर विश्वास ठेवून कॉंग्रेसबरोबर राहू. वेगळा पक्ष काढण्याचा विषय बाजूला ठेवू." पी. के. सावंत यांनी साहेबांची पाठराखण केली.

या बैठकीत साहेब एकाकी पडले. मोरे-जेधे यांचा एक गट आणि साहेबांचा एक गट अशी कार्यकर्त्यांत व पक्षात विभागणी होऊ लागली. शेवटी जेधे-मोरे गटाची सरशी होऊन त्यांनी 'शेतकरी कामगार पक्षा'ची स्थापना केली. महाराष्ट्रातील स्वत:ला स्वत:च खानदानी समजणारी मराठा मंडळी या पक्षाच्या आश्रयाला गेली. साहेबांच्या गटानं मात्र कॉंग्रेसची साथ सोडायची नाही असा निर्णय घेतला. पक्षात राहिलेल्या दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांची साहेबांनी मोट बांधली. संपूर्ण मुंबई राज्याचा दौरा केला. कार्यकर्त्यांना या फुटीमागचा अर्थ समजावून सांगितला. कॉंग्रेसच्या विचारांना मानणारी नवीन कार्यकर्त्यांची फौज साहेबांनी तयार केली. कॉंग्रेस पक्षातूनच काही मंडळी नवीन जन्माला आलेल्या पक्षाला रसद पुरविण्याचं काम करीत होती. त्यांचं पक्षातलं महत्त्व आपोआप कमी होत गेलं. तेही पक्ष सोडून नवीन पक्षात गेले. मुंबई राज्यात कॉंग्रेसच्या विचारानं भारावलेली एकदिलाची कार्यकर्त्यांची फळी नेहरूजींच्या पाठीमागे साहेबांनी उभी केली.

मुंबईत राहून पक्षाच्या घराला बळकट करण्याच्या प्रयत्नात साहेब गुंतले. वेळ काढून कराडला येऊन जात. काय हवंय त्याची व्यवस्था करीत. कराडच्या घराला दयनीय अवकळा आली. घरात कुणी कर्ता पुरुष नाही. आम्ही तिघी जावा आईला जपू लागलो. आई नातवंडांना सांभाळण्यात वेळ घालवू लागल्या. विस्कळीत झालेल्या घराला सावरण्याचा आटोकाट प्रयत्न करू लागल्या. गणपतरावांपासून क्षयानं या घरात जो मुक्काम केला तो मुक्काम हलण्यास तयार नव्हता. माझा स्वभावही चिडचिडा बनत चालला होता. ज्ञानोबांच्या मृत्यूच्या धक्क्यातून मी आता कुठे

सावरले होते तोच गणपतरावांना मृत्यूनं गाठलं. सोनूताई व भागीरथीताईकडं पाहिलं की मला भडभडून यायचं. त्यांच्या भवितव्याची चिंता खायला उठायची. साहेब भेटायला आले म्हणजे मी अबोल व्हायचे. साहेबांचा दुरावा मला सहन होत नव्हता. मी त्यांच्यावर चिडायचे. स्थितप्रज्ञ आईची मूर्ती मला पाहवत नव्हती. घरातील दु:खाची छाया आणि साहेबांच्या दुराव्याच्या जात्यात मी भरडले जाऊ लागले. साहेब भेटून गेल्यावर त्यांचं एखादं पत्र यायचं. पत्रात माझ्या चिडण्याची त्यांना भीती वाटायची. स्वत:च्या जीवाचं बरंवाईट करण्याचा विचार त्यांच्या मनात यायचा. पत्रात माझी मनधरणी करायचे. अशा पत्रानं माझाही राग मावळायचा. गणपतराव गेले तेव्हा विक्रम दीड वर्षाचा होता. विक्रमला मी 'राजा' म्हणून बोलावते. तो आहेही राजबिंडा. आता तो घरभर धिंगामस्ती करू लागला. माझा त्याला आणि त्याचा मला लळा लागला. तो माझ्याच अंगावर वाढू लागला. मला कामही करू देत नाही. सारखा कडेवर घे म्हणतो. मी त्याचे लाड पुरवू लागले.

या तणावग्रस्त वातावरणाचा माझ्या प्रकृतीवर झालेला परिणाम मला जाणवू लागला. काम करताना मला थकवा येऊ लागला. अशक्तपणा वाढीस लागला. झपाट्यानं माझी प्रकृती खालावू लागली. त्यात भागीरथीताईला क्षयाची लागण झाली. मुलांना त्यांच्यापासून दूर ठेवावं लागायचं. त्यांना मिरजेच्या दवाखान्यात हलविलं. राधाक्का त्यांच्या मदतीला त्यांच्यासोबत असायच्या. घरातील कामं करता करता आणि मुलांना सांभाळता सांभाळता जीव रंजीस यायचा. दिवस कसे निघून जाऊ लागले हे मला कळायचं नाही. या दगदगीनं शेवटी मीही अंथरूण धरलं. मला श्वासोच्छ्वास घेणंही अवघड झालं अशी माझी हालत झाली. खोकल्याची उबळ आली की माझ्या जीवाची घालमेल व्हायची. आता माझं बरंवाईट होतं की काय अशी शंका यायची.

मलाही क्षयाची बाधा झाली. क्षयानं माझ्या हाडामांसात मुक्काम केला. माझी प्रकृती चिंताजनक झाली. मी अंथरुणात वळकटीएवढी दिसू लागले. आई हादरून गेल्या. त्यांना काय करावं काही सुचेना. त्यांनी शामराव पवारांना मुलांच्या हस्ते बोलावून घेतलं. माझी बहीण चंद्रिकाताईला निरोप पाठविला. निरोप मिळताच चंद्रिकाताई कराडला आली. साहेबांचे

जीवलग मित्र तात्यासाहेब कोरे यांच्या कानावर ही वार्ता गेली. ते आईच्या मदतीला धावून आले. ते आणि दादासाहेब जगताप यांनी डॉ. रणभिसे यांच्याशी संपर्क साधून त्यांना माझ्या प्रकृतीविषयी कल्पना दिली.

डॉ. रणभिसे यांनी एका स्वतंत्र इमारतीत माझी राहण्याची व्यवस्था केली. डॉ. वालेनसची वेळ घेऊन ठेवली. मिशन हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉ. जॉन्सन यांना कल्पना दिली. तात्यासाहेब कोरे यांचे मित्र इंजिनियर अडके यांनी गाडीची व्यवस्था केली. घरातून गाडीपर्यंत चालत येण्याइतकंही अवसान माझ्यात नव्हतं. शामराव पवारानं लहान मुलाला उचलावं तसं मला उचलून गाडीत आणून ठेवलं. गाडी मिरजेच्या वाटेला लागली. माझ्यासोबत चंद्रिकाताई आणि शामराव पवार. डॉ. रणभिसे यांनी व्यवस्था केलेल्या इमारतीत आम्ही उतरलो. डॉ. रणभिसे यांनी डॉ. वालनेस आणि डॉ. जॉन्सन यांना बोलावून घेतलं. या तिघांनी माझी काळजीपूर्वक तपासणी केली. क्षयावर नुकताच नवीन महागड्या औषधाचा शोध लागला होता. या औषधानं माझा क्षय बरा होऊ शकतो असा निष्कर्ष या डॉक्टरांनी काढला. माझ्यावर उपचार सुरू झाले. साहेब, तात्यासाहेब कोरे, जगताप मिरजेला आले. डॉक्टर्ससोबत त्यांनी चर्चा केली. मला ठणठणीत बरं करण्याचं आश्वासन डॉक्टरांनी साहेबांना दिलं. नंतर माझ्या खोलीत आले.

चंद्रिकाताईनं मला हलवून जागं केलं व म्हणाली, ''बघ कोण आलंय ते?''

डोळ्यांवरील पापण्या उघडण्याचंही त्राण माझ्यात नव्हतं. शरीराचं सरमाड झालं होतं माझ्या. साहेबांनी माझा हात आपल्या हातात घेतला. एकमेकांच्या स्पर्शानं अंत:करणाच्या माध्यमातून आमचं बोलणं झालं. स्पर्शाची भाषा एकमेकाला उमगली. साहेब आज मिरजेत थांबले. भागीरथीबाईची दवाखान्यात जाऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. त्यांना आणि राधाक्कांना भेटून धीर दिला. त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था केली. दुसऱ्या दिवशी साहेब मुंबईला परतले. डॉक्टर एक दिवस चिंतेत पडले. त्यांच्यासमोर प्रश्न उभा राहिला. मला रक्त द्यावं लागणार असा निष्कर्ष डॉक्टरांनी काढला. मिरजेला रक्त मिळणं अशक्य होतं. मुंबईहून हे रक्त मागवून घेण्याचं डॉक्टरांनी ठरविलं. त्यात एक अडचण निर्माण झाली. रक्तपेढीतून रक्त बाहेर काढल्यानंतर काही तासांतच ते रुग्णाला द्यायला पाहिजे.

त्याकरिता वेगवान वाहनाची गरज होती; पण ते मिळणं अशक्य होतं. त्यामुळे डॉक्टरांनी मिरजेतील आमच्या नातेवाइकांचे रक्त तपासून पाहण्याचा निर्णय घेतला. काय योगायोग पाहा - साहेबांच्या मावसबहिणीचा मुलगा शामराव पवारांचा रक्तगट माझ्या रक्तगटाशी मिळाला. त्या वेळी शामरावचं वय केवळ सोळा वर्षांचं होतं. शामरावच्या रक्तानं मला जीवदान मिळालं.

माझी प्रकृती औषधाला प्रतिसाद देऊ लागली. अधूनमधून मिरजेला येऊन साहेब भेटून जायचे. आम्ही बराच वेळ बोलत बसायचो. मी लवकर बरं व्हावं असं साहेबांना वाटायचं.

मीही साहेबांना म्हणाले, "मलाही आता केव्हा बरी होते आणि तुमच्यासोबत मुंबईला येते असं झालंय."

"आता तुझी तब्येत ठीक झाली की, आपण इथूनच मुंबईला जाऊ. तिथेच तुझ्यावर चांगले उपचार करता येतील." साहेब.

माझी प्रकृती झपाट्यानं सुधारू लागली. मी आणि चंद्रिकाताई मिरजेच्या मोकळ्या हवेत फेरफटका मारून यायचो. माझ्यात उत्साह संचारला. मी आईची व राजाची चौकशी केली. भागीरथीताईंच्या प्रकृतीची माहिती घेतली. आई एक-दोन वेळेस मिरजेला येऊन माझ्या प्रकृतीची चौकशी करून गेल्याचं चंद्रिकाताईनं मला सांगितलं. राजाला मला पाहायचं आहे. मी डॉक्टरांना विचारलं; पण डॉक्टरांनी मला परवानगी दिली नाही. एक दिवस साहेब मुंबईहून मिरजेला मला भेटावयास आले. मी ठणठणीत बरी झालेलं पाहून आनंदी दिसले.

मीच साहेबांना विनंती केली, "आपण आज दूरवर या माळरानावर फिरायला जाऊ या का?"

"तू माझ्या मनातलं बोललीस. चल, जाऊया." साहेब.

आम्ही दोघं मिरजेच्या या माळरानावर दूरवर चालत गेलो. किती लांब चालत आलो याचं भानच राहिलं नाही. सूर्याला मावळतीची घाई झालेली होती. एक चांगलीशी जागा निवडून आम्ही तिथं बसलो.

मी साहेबांना म्हणाले, "आपण लवकरच कराडला जाऊ. मुलं त्रास देत असतील आईला."

"नाही. आता घाई करायची नाही. डॉक्टरांचा सल्ला प्रमाण मानून यापुढं आपण आपला संसार करायचा." साहेब.

"बरं झालं तुम्ही डॉक्टरांच्या सल्ल्याचा विषय काढला. मी माझ्या आजाराविषयी डॉक्टर साहेबांशी सविस्तर चर्चा केली. यापुढे घ्यावयाची काळजी, आहार, पथ्य इत्यादी बाबतीत डॉक्टर साहेबांना विचारून घेतलं. बोलण्याच्या ओघात डॉक्टर साहेब असंही म्हणाले, ...." मी.

माझं बोलणं मी मध्येच थांबवलं. मला साहेबांना जे सांगायचं होतं ते सांगावं की नाही याचा विचार मी करू लागले.

"काय म्हणाले डॉक्टर?"

"काही नाही. सांगेल तुम्हाला कधीतरी." मी.

"मला सांगण्यासारखं नसेल तर मी आग्रह धरणार नाही. आपल्या दोघांच्या संबंधात असेल तर मला सांगायला काही संकोच करू नको." साहेब.

"आपल्या दोघांच्या संबंधातच आहे." मी.

"माझ्यापासून लपवून ठेवण्यासारखं असेल तर नको सांगू. तुझ्या आणि माझ्या संबंधातील तो सल्ला असेल तर डॉक्टर मलाही तो सल्ला सांगतीलच." साहेब.

शेवटी माझा नाइलाज झाला. मला साहेबांना सांगावंच लागलं.

'डॉक्टरांनी सांगितलं.... माझी फुफ्फुसं कमजोर झाली आहेत. त्यामुळे आपल्याला संतती होणार नाही."

साहेब क्षणभर स्तब्ध राहिले. मी त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव निरखू लागले. कुठलाही भाव त्यांच्या चेहऱ्यावर मला दिसला नाही. एखाद्या स्थितप्रज्ञासारखे डुबणाऱ्या सूर्याकडे नजर लावून बसले.

मीच त्यांना म्हणाले, "ऐकलंय ना मी काय म्हटले ते?"

"हो, ऐकलंय." साहेब.

"मला असं वाटतंय, तुम्ही दुसरं लग्न करावं." मी.

"कशाकरिता?" साहेब.

"तुम्ही तरुण आहात. तुमचं नाव झालेलं आहे. पुढेही तुम्ही जीवनात यशस्वी होणार आहात. मग तुमच्या वंशाला दिवा नको का?" मी.

"लौकिकार्थानं तुझं म्हणणं बरोबर आहे. मी तुला पसंत केलं ते वंश वाढविण्याकरिता नाही. मला आणि माझ्या आईला सांभाळणारी सून आमच्या घराण्याला हवी होती. तशी तू आहेस. माझ्या पसंतीत तू उत्तीर्ण झालीय." साहेब.

“आता तुम्हाला माझं म्हणणं पटणार नाही; पण पैपाहुण्यांकडून आणि घरातून तुम्हाला भरीस घालण्यात येईल तेव्हा वेळ निघून गेलेली असेल. आता कुठलाही खानदानी मराठा आपली मुलगी तुम्हास द्यावयास तयार होईल.” मी.

“वेणू, मी तुझी निवड केली ते घरंदाज मुलगी म्हणून. खानदानी मुलीचा प्रश्न काढला म्हणून सांगतो, तुला पाहण्यापूर्वी मी एक खानदानी मुलगी कोकणात मालवणला पाहिली होती. मुलीचे वडील ब्रिटिश सरकारमधील निवृत्त डीवायएसपी होते. साळवी की असंच काही त्यांचं नाव. मुंबईतील स्वातंत्र्यचळवळीतील कार्यकर्ते गोडसे यांनी ते स्थळ सुचविलं होतं. गोडसे हे सातारा जिल्ह्यातील रहिवासी होते. ते आणि माझे दोन-तीन मित्र सोबत घेऊन मी मालवणला मुलगी पाहावयास गेलो. मुलगी आमच्यासमोर आली ती पाश्चिमात्य कपडे घालूनच. आम्ही तिला प्रश्न विचारायच्याऐवजी तीच आम्हाला प्रश्न विचारू लागली. तिच्या वडिलांचाही मला आग्रह होता ‘दोघांना एकांतात काही बोलायचं असेल तर बागेत जाऊन बोलू शकता, एकमेकांना समजावून घेऊ शकता.’ त्यांच्या सूचनेला मी नकार दिला. गोडसे यांनी त्या मुलीला काय प्रश्न विचारले ते मला आज आठवतदेखील नाही. त्या वातावरणात माझा दम घुटू लागला. केव्हा यांच्या तावडीतून सुटका होते याची मी वाट पाहू लागलो. एकदाचं हातावर पाणी पडलं. त्या खानदानी घराण्याचा आम्ही निरोप घेतला. रस्त्यानं गोडसे यांनी माझ्यामागे तगादा लावत शेवटपर्यंत हा विवाह जमावा म्हणून प्रयत्न केले. अर्थातच मी नकार दिला.” साहेब.

साहेबांनी सांगितलेली हकिकत ऐकून मी थक्कच झाले. माझ्यासारख्या कमी शिकलेल्या मुलीसोबत साहेबांनी विवाह का केला या रहस्याचा उलगडा मला आज झाला.

मीच साहेबांना म्हणाले, “निघूया का?”

“वेणू, तू आज विवाहाचा प्रश्न काढला. यापुढे तो काढायचा नाही. राहिला वंशाच्या दिव्याचा प्रश्न. वंशाला दिवा पाहिजे तर ज्ञानोबादादा आणि गणपतदादांची मुलं आता आपलीच आहेत. त्यांना आपल्याशिवाय कोण वाली आहे? त्यांनाच वाढवायचं, त्यांचं चांगलं पालनपोषण करायचं. तू त्यांची आई होऊन त्यांचं जीवन घडवायचं. तेच आपले वंशज. या

संसारात अनेक अशी मुलं आहे की, ज्यांना आईबाप माहीत नाहीत. असले तर त्यांची या मुलांना घडविण्याची ऐपत नाही. त्यांचे आपण मायबाप होऊन आपलं जीवनकार्य सार्थकी लावू. यापुढे तू माझ्यासाठी आणि मी तुझ्यासाठी... विवाहाचा विषय यानंतर काढायचा नाही.'' साहेब.

अंधार दाटून आला होता. मी व साहेब दवाखान्याच्या वाटेला लागलो. दिवेलागणीच्या वेळेस आम्ही दवाखान्यात पोहोचलो. चंद्रिकाताई आमची वाट पाहत दवाखान्यासमोर उभी होती. आम्ही दोघं जोडीनं फिरून आलेलं पाहून तिला आनंद झाला. साहेबांनी आज मिरजेला मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी आमचा निरोप घेऊन साहेब मुंबईला गेले.

खेर-मोरारजी देसाई यांच्या कारभारावर बहुजनवादी मंडळी नाराजी व्यक्त करू लागली. या दोघांकडून ग्रामीण शेतकरी, शेतमजुराला न्याय मिळण्याची सूतराम शक्यता नव्हती. त्यांचे सर्व निर्णय धनदांडग्या आणि उच्चवर्णीयांच्या हिताचे असायचे. यात गुजराती प्रतिनिधी व 'जैसे थे'वादी प्रतिनिधी संतुष्ट असायचे. खेर-मोरारजी मंत्रिमंडळानं शिक्षण धोरण ठरविताना 'इंग्रजी' या विषयाला शिक्षण अभ्यासक्रमातून काढून टाकण्याचा निर्णय घेतला.

प्रतिगामी वृत्तीच्या लोकांच्या आग्रहाखातर शिक्षणाचं माध्यम मातृभाषा असावं, असं एक विधेयक सभागृहासमोर ठेवण्यात आलं. धार्मिक श्रद्धेचं जतन करण्याचा प्रतिगाम्यांचा उद्देश होता. तो त्यांनी या विधेयकाच्या माध्यमातून साध्य केला. यापाठीमागचा हेतू असा की, ग्रामीण भागातील जनता शिकून ज्ञानी झाली तर आपल्या अस्तित्वाला धोका निर्माण होईल. सरकारी नोकरीत एका वर्गाचं वर्चस्व अबाधित राहावं हाही हेतू या विधेयकामागे होता.

शेतकरी कामगार पक्षात बहुजनाचे स्वत:ला कुलवंत म्हणवून घेणारे लोकप्रतिनिधी असल्यानं कॉंग्रेसमधील अनेक तरुण या पक्षाकडे आकर्षित होऊ लागले. साहेबांनी या पक्षस्थापनेबद्दल आपली भूमिका स्पष्ट केल्यामुळं गांधी-नेहरूंच्या विचारांचे बहुजनांतील कार्यकर्ते साहेबांकडे मोठ्या आशेनं पाहू लागले. साहेबांनी या विचाराच्या कार्यकर्त्यांची एक बैठक अध्यक्षाच्या परवानगीनं मुंबईला तांबे यांच्या आरोग्य भवनात आयोजित केली. कॉंग्रेसचे आमदार व कार्यकर्ते मिळून सुमारे ७५ ते ८० निमंत्रित या बैठकीला

उपस्थित होते. या बैठकीत जनतेला व कार्यकर्त्यांना उद्देशून एक आवाहन करणारा धोरणात्मक मसुदा तयार करण्यात आला -

"स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बहुजनांच्या आशा-आकांक्षांना खतपाणी दिलं जातं आणि लोकशाहीला ते अभिप्रेत असतं. या आशा-आकांक्षा फलद्रूप होण्याकरिता सरकारही भरभक्कम व कर्तव्यदक्ष असावं लागतं. असं सरकार काँग्रेस पक्षच देऊ शकतो. आर्थिक उन्नती करायची असेल तर देशाच्या उत्पन्नातही वाढ झाली पाहिजे. उत्पन्नात वाढ झाल्याशिवाय देश स्वावलंबी व स्वयंपूर्ण होऊ शकणार नाही. हे सर्व करण्याकरिता सशक्त सरकारची आवश्यकता असते. सक्षम सरकार देण्यासाठी आपण सर्व कार्यकर्त्यांनी एकसंध राहणे आवश्यक आहे."

या मसुद्यावर साहेब, स्वामी सहजानंद भारती, बाबासाहेब शिंदे, शि. र. राणे, बाबासाहेब घोरपडे, वामनराव पाटील, डॉ. कृ. भि. अत्रोळीकर, अमृतराव रणखांबे यांच्या सह्या होत्या. साहेब मुबईला मरीन लाईनला राहत होते. जे मसुद्यातील विचारांशी सहमत असतील त्यांनी साहेबांच्या पत्त्यावर लेखी सहमती कळवावी, अशी विनंती करण्यात आली होती. संपूर्ण मुंबई राज्यातून ग्रामीण व शहरी कार्यकर्त्यांची हजारो सहमतीपत्रे आली.

या बैठकीनंतर जेधेंचा जळफळाट झाला. त्यांनी रागाच्या भरात काँग्रेस प्रांताध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तांबे यांच्या आरोग्य भवनातील बैठकीनंतर महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसमध्ये मोठे बदल झाले. अध्यक्षपदाची जबाबदारी भाऊसाहेब हिरे यांच्यावर टाकण्यात आली. सचिव म्हणून साहेबांची निवड झाली. पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून काम करीत असताना साहेबांकडे प्रांतीय पातळीवरचं नेतृत्व करणारं पद चालून आलं. भाऊसाहेब हिरे आणि साहेब ग्रामीण भागाचे प्रतिनिधी म्हणून सर्वांसमोर आले. तांबे भवनातील बैठक महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरली. भाऊसाहेब हिरे आणि साहेबांनी संपूर्ण महाराष्ट्र प्रांत पिंजून काढला. स्वत:ला कुलवंत म्हणवून घेणारे पुढारी जरी काँग्रेसला सोडून गेले तरी त्यांची उणीव भरून काढण्याचं काम या जोडगोळीनं केलं.

मिरजेच्या दवाखान्यातून मला घरी जाण्याची परवानगी डॉक्टरांनी दिली. साहेबांनी ठरविल्याप्रमाणं मी काही दिवस पुण्यात आराम केला.

डॉक्टरांच्या निगराणीखाली मी औषधोपचार घेऊ लागले. साहेब त्यांच्या कामाच्या धबडग्यातून वेळ काढून पुण्यास येत असत.

एके दिवशी मीच त्यांना म्हणाले, "अहो, माझी तब्येत आता ठणठणीत झालीय. कराडला जाऊया की."

"आता तू कराडला गेलंच पाहिजे. आई एकटी पडलीय तिथं. भागीरथी वहिनीची तब्येतही चिंताजनक झालीय. सोनू वहिनी आणि राधाक्का सारख्या मिरजेला असतात भागीरथी वहिनीच्या मदतीला. घरात लहान मुलं आईला भंडावून सोडत असतील. त्यांचं करण्यासवरण्यात आईची दमछाक होत असेल. आईच्या मदतीला तुला जायलाच पाहिजे. राजाला सांभाळता सांभाळता आईचा जीव मेटाकुटीला येत असेल." साहेब.

राजाची आठवण साहेबांनी काढली आणि मी केव्हा कराडला जाते अन् राजाला बघते असं मला झालं. माझा राजा माझ्याशिवाय कसा राहिला असेल पाच-सहा महिने? माझी आठवण त्याने काढली असेल का? पण त्याचं वय ते काय माझी आठवण काढायला? भागीरथीबाई या आजारातून बऱ्या झाल्या पाहिजेत. त्यांच्या औषधपाण्याकडं काळजीपूर्वक लक्ष दिलं पाहिजे... या विचारातच मी आणि साहेब कराडला केव्हा येऊन पोहोचलो हे कळलंही नाही.

मला पाहून आईचा जीव भांड्यात पडला. साहेब व मी जोडीनं आईचं दर्शन घेतलं. घरात हजर असलेल्या पुतण्यांनी आम्हा उभयतांचे दर्शन घेतले. छोट्या राजानं थोरल्या भावांचा कित्ता गिरविला. साहेबांनी त्याला कड्यावर उचलून घेतलं. तो माझ्याकडं पाहून माझ्याकडं येण्याचा प्रयत्न करू लागला. मी त्याला साहेबांकडून माझ्या कडेवर घेतलं. तो माझ्याकडं अनोळखी नजरेनं पाहू लागला. साहेबांनी प्रताप, शिवाजी, अशोकदादा यांची हजेरी घेतली. त्यांच्या अभ्यासातील प्रगती विचारली. अभ्यास करण्याबद्दल सूचना दिल्या. सुधा व लीला यांना आईची काळजी घ्यावयास बजावलं. अभ्यासातून वेळ काढून आजीला आणि काकूंना मदत करण्यास सांगितलं.

गणपतराव गेल्यापासून भागीरथीबाई अबोल झाल्या. त्यांच्या आसवांना खंड माहीत नव्हता. कितीही समजूत काढली तरी त्या काहीएक ऐकायला तयार नसत. सोनूताई पाठच्या बहिणीसारख्या त्यांच्या पाठीशी उभ्या

राहिल्या. त्यांच्या माहेरची माणसं त्यांना तळहातावरील फोडासारखी जपू लागली. महागातील महाग औषधं डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली पुरवू लागली. भागीरथीबाईंच्या प्रकृतीमध्ये आशादायक चिन्हे आढळून येत नव्हती. मानसिकदृष्ट्या त्या इतक्या खचल्या होत्या की, औषध घेण्यास नकार देऊ लागल्या. त्यांची समजूत घालावी लागे. आई अधूनमधून मिरजेला जाऊन भागीरथीबाईला उभारी देत. लहान मुलासाठी तुला बरं व्हावं लागेल म्हणून सांगायच्या. अबोल भागीरथीबाईचे डोळे तेवढे बोलत. घळाघळा अश्रू गाळायच्या.

मला जवळ घेऊन म्हणायच्या, "वेणू, राजाला जीव लाव बरं! त्याची आबाळ होऊ देऊ नको. त्याला तुझ्या मायेची ऊब दे. त्याला अंतर देऊ नको."

भागीरथीबाई असं काही बोलल्या की मला भडभडून यायचं. मी त्यांच्याजवळून उठून बाहेर यायचे आणि अश्रूंना वाट मोकळी करून द्यायचे. पुन्हा भागीरथीबाईची भेट घेण्याची माझी हिंमत होत नसे. वर्ष-सहा महिने भागीरथीबाईंनी कधी मिरज, कधी कराड अशी काढली. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावू लागली. मी साहेबांना निरोप पाठविला. निरोप मिळताच साहेब मिरजेला आले. डॉक्टरांना भेटले. त्यांची व डॉक्टरांची काय चर्चा झाली हे आम्हाला कळलं नाही.

आम्हाला केवळ एवढंच म्हणाले, "डॉक्टर देतील त्या सल्ल्याप्रमाणे भागीरथी वहिनींची सेवा करा."

भागीरथी वहिनींच्या खोलीत गेले. स्तब्ध उभे राहिले. त्यांचं दर्शन घेऊन कुणाला काहीएक न बोलता मुबईला निघून गेले.

मुलांच्या मामांना निरोप पाठवला. मोहन जाधव कामेरीहून लगेच मिरजेला पोहोचले. डॉक्टरांनी भागीरथीबाईच्या प्रकृतीविषयी आम्हाला कल्पना दिली.

म्हणाले, "या काही दिवसांच्या आपल्या साथीदार आहेत. त्यांना तुम्ही कामेरीला हवापालट म्हणून घेऊन जात असाल तर आम्ही त्यांना इथून सोडावयास तयार आहोत."

मोहनराव जाधव यांनी भागीरथीबाईला कामेरीला घेऊन जाण्याची तयारी दर्शविली. डॉक्टरांनी त्यांना काही सूचना दिल्या.

म्हणाले, "तुमच्या मळ्यात राहण्याची व्यवस्था असेल तर तिथे मोकळ्या हवेत यांची राहण्याची व्यवस्था केल्यास चांगलं राहील."

माधवराव जाधव यांनी मला कराडला आणून सोडलं. कामेरीला जाऊन व्यवस्था करून येतो म्हणाले. कामेरीहून येताना गाडी घेऊन मिरजेला पोहोचले. भागीरथीबाईला घेऊन निघण्यासाठी त्यांच्या खोलीत गेले. भागीरथीबाई पलंगावर निपचित पडलेल्या होत्या. मोहनराव जाधवांनी डॉक्टरांना बोलावलं. डॉक्टर लगेच भागीरथीबाईंच्या खोलीत आले. वेळ निघून गेली होती. भागीरथीबाईंनी चव्हाण घराण्याला आणि मुलांना पोरकं करून निसर्गाला जवळ केलं. मोहनराव जाधवांना आपल्या बहिणीला माहेरी घेऊन जाण्यासाठी आणलेल्या गाडीत बहिणींचं कलेवर कराडला घेऊन यावं लागलं. नियतीनं त्यांच्यावर ही वेळ आणली. कराडला भागीरथीबाईंवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

घटनेचा स्वीकार केल्यानंतर भारतीय प्रजासत्ताकाची पहिली निवडणूक १९५२ मध्ये जाहीर झाली. निवडणुकीचे नगारे बडविले जाऊ लागले. पक्षापक्षांतील नौबती झडू लागल्या. प्रांतिक काँग्रेसनं निवडणुका लढविण्याचं ठरविलं. साहेब मुंबईहून पक्षाची सर्व सूत्रं हलवू लागले. खेर-मोरारजी यांच्या कारभारावर नाराज असणाऱ्या खानदानी बहुजनांनी शे. का. पक्षाच्या झेंड्याखाली वेगळी चूल मांडली. साहेब काँग्रेस सोडून त्यांच्या कळपात सामील न झाल्याने त्यांचा राग साहेबांवर अधिक होता. ते साहेबांना पाण्यात पाहू लागले. साहेबांना खिंडीत गाठून राजकीय जीवनातून उखडून टाकण्याचा विडा शे. का. पक्षानं उचलला. गांधीजी गेल्यानंतर काँग्रेसमध्ये थोडी पडझड झाली होती. नेहरू-पटेलांनी ती पडझड सावरली. प्रांतिक काँग्रेस विकलांग झालेली. अशा बिकट अवस्थेत साहेबांनी ५२ ची निवडणूक लढविण्याचं ठरविलं. खेर यांना पुढे करून साहेबांचं शिरकाण करण्याचा बेत प्रांतातील ऐतखाऊ वर्ग आखू लागला. भविष्यात बुद्धीच्या जोरावर आपलं खच्चीकरण होईल अशी भीती त्यांना साहेबांच्या नेतृत्वाबद्दल वाटायची. महाराष्ट्रात शे. का. पक्षाची हवा निर्माण झाली होती. शे. का. पक्षाची कर्तीधर्ती मंडळी आपण सत्तेत आलोय अशा तोऱ्यात वावरत होती. भाऊसाहेब हिरे, नानासाहेब कुंटे यांना साथीला घेऊन साहेबांनी महाराष्ट्राच्या जिल्ह्यात दौरे काढले. जनतेसमोर आपली व पक्षाची भूमिका

मांडली. काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या खानदानी मंडळींनी पक्षाचा कसा विश्वासघात केला यासंबंधी सविस्तर चित्र जनतेसमोर रेखाटलं.

म्हणाले, "ग्रामीण जनतेचे प्रश्न घेऊन ते तुमच्यासमोर येणार आहे. ते हे प्रश्न काँग्रेसमध्ये राहूनही सोडवू शकले असते; पण त्यांनी या प्रश्नांकरिता वाममार्ग स्वीकारला, जो बहुजन समाजाच्या हिताचा नाही. तो बहुजनांच्या उन्नतीला मारक आहे. काँग्रेस शेतकरी, शेतमजूर आणि बहुजनांच्या हिताचा कार्यक्रम राबविण्यासाठी बांधलेली आहे. नेहरूजींनी तसा निर्धार केलेला आहे. आर्थिक आणि सामाजिक न्यायासाठी काँग्रेस पक्ष संघर्ष करणार आहे. शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीच्या मावळ्यांना बरोबर घेऊन स्वराज्याची स्थापना केली. गांधी-नेहरूंनी शिवाजी महाराजांप्रमाणे सर्व जाती-धर्मांच्या लोकांना बरोबर घेऊन हे स्वातंत्र्य मिळविलं आहे. या स्वातंत्र्याला सुराज्यात आपल्याला बदलायचं आहे. प्रत्येक भारतीयाला वाटलं पाहिजे, हे राज्य माझं आहे. ग्रामीण भागातील अठरापगड जातीतील लोकांना लोकशाहीच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता काँग्रेस शर्थीचे प्रयत्न करीत आहे. या धनदांडग्या मंडळींच्या भूलथापांना बळी पडू नका."

या दौऱ्याचा परिणाम असा आला की, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जनता काँग्रेसच्या पाठीमागे एकवटली. साहेबांच्या दौऱ्यामुळं बहुजन समाजातील पिचलेला, दबलेला वर्ग जागृत झाला. त्याला आपले प्रश्न कोण सोडवू शकतो याची जाण आली. या धनदांडग्यांनीच सत्तेवर जो कोणी येईल त्यांचे मांडलिकत्व स्वीकारून या वर्गावर अन्याय-अत्याचार केले होते व आपले वर्चस्व अबाधित ठेवले होते. याची जाणीव साहेबांनी सर्वहरा वर्गाला करून दिली. जन्मानं स्वतःला श्रेष्ठ मानणारा वर्ग या धनदांडग्यांच्या विरोधात होताच. हा वर्ग धर्मवर्चस्वाला पुनरुज्जीवित करण्याच्या प्रयत्नात काँग्रेसपासून दूर चालला होता. तो काँग्रेसला पर्याय शोधत होता. काकासाहेब गाडगीळ त्यांना लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात आपण राहिलं पाहिजे असं पटवून देऊ लागले; पण गाडगिळांना म्हणावं तसं यश मिळताना दिसत नव्हतं. तशाही परिस्थितीत ते प्रामाणिकपणे प्रयत्न करीतच होते. महाराष्ट्राच्या राजकीय, वैचारिक घुसळणीतून साहेबांना काँग्रेसचा विजय खेचून आणावयाचा होता.

महाराष्ट्र प्रांतात निवडणुकीचं रूपांतर युद्धभूमीत झालं. विचारांचं तुफान महाराष्ट्र प्रांतावर घोंगावू लागलं. युद्धभूमीत एका बाजूनं शे.का. पक्ष तर दुसऱ्या बाजूनं काँग्रेस पक्ष. या निवडणुकीच्या रणधुमाळीत एकमेकाला पराजित करण्याच्या ईर्षेनं उतरलेले सेनापती आपापली रणनीती आखण्यात दंग झाले होते. अशा या वादळात साहेबांची उमेदवारी कोलमडून पडते की काय असं वातावरण कराड मतदारसंघात निर्माण करण्यात आलं होतं. साहेबांना आपल्या मतदारसंघाच्या चक्रव्यूहात अडकवून ठेवण्यात विरोधकांना यश आलं होतं.

साहेब वेळ काढून कराडला आले. त्यांनी काँग्रेसच्या तरुण व वयोवृद्ध कार्यकर्त्यांची एक बैठक घेतली. या बैठकीत साहेबांना प्रकर्षानं जाणीव झाली ती आत्माराम पाटील यांची. आत्माराम पाटलांसारखा पाठीराखा आज आपल्या पाठीशी नाही. ते आपल्याला सोडून वेगळ्या वाटेनं रॉयसोबत गेले, ज्यांनी मला व माझ्या कुटुंबाला जीवनमरणाच्या खाईतून ओढून काढलं आणि जिल्ह्याचं नेतृत्व माझ्या हवाली केलं ते त्यागमूर्ती कै. के. डी. पाटील, कै. चंद्रोजी पाटील आज आपल्यात नाहीत. त्यांचा कुऱ्हाडीच्या राजकारणानं घात केला. त्यांच्याविना मला हा विरोधकांचा चक्रव्यूह भेदता येईल का? मी यातून सहीसलामत यशस्वी होऊन बाहेर पडेल का? हे प्रश्न साहेबांना सतावू लागले. आशेचा एक किरण तात्यासाहेब कोरे, जगताप, किसनवीर या मंडळींच्या रूपानं साहेबांना दिसला. चळवळीतून मिळविलेले सर्व सवंगडी बैठकीला हजर असल्याचं पाहून साहेबांचा उत्साह वाढला. मनात चाललेल्या नकारात्मक गोंधळाला साहेबांनी झटकून टाकलं. त्यांच्यात निवडणुकीचं वारं संचारलं.

साहेब कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, "माझ्यासाठी संसाराची राखरांगोळी करणाऱ्या माझ्या पाठीराख्यांनो, मी तुम्हाला आतापर्यंत काय दिलं याचा जेव्हा मी विचार करतो तेव्हा दु:ख आणि कष्टाशिवाय मी तुम्हाला अधिक काही देऊ शकलो नाही असे मला वाटते. तरीही तुम्ही माझी पाठराखण करीत आहात. आपले काहीतरी ऋणानुबंध असावेत व ते बंध न तुटणारे आहेत. आजची उपस्थिती हे त्याचं द्योतक आहे असं मला वाटतं. ही निवडणूक नेहरू-पटेल यांच्या बहुजन व सर्वहरा वर्गाच्या उन्नतीच्या विचाराच्या पाईकाविरुद्ध वाट चुकलेल्या खानदानी धनदांडग्यांमध्ये

होत आहे. आपण सर्वजण नेहरू-पटेल यांच्या विचारांचे पाईक आहात. या निवडणुकीत वाट चुकलेल्यांना पराभूत करून आपल्याला आपला विकास साधावयाचा आहे.''

या बैठकीत कार्यकर्त्यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. मनोगत व्यक्त करण्यामध्ये पाटीलभाऊ, हरिभाऊ लाड, पुण्याचे पी. डी. पाटील, शिवाजीराव बटाणे, राघूअण्णा लिमये, माधवराव जाधव, ज्ञानोबा डुबल, सिंहासनेअप्पा, कासेगावकर वैद्य, बाबुराव कोतवाल, शांतारामबापू, बाबुराव काळे, बदियानी, गजानन पावसकर, राजाभाऊ बळवडे, बाबुराव चिवटे, नारायणराव घाडगे, ग्रामीण भागातून - कार्वे गावातून आत्माराम जाधव, पार्लेबनवाडीतून आबासाहेब पाटील, चरेगावचे गांधी बाबा, निगडीचे निगडीकर मास्तर, काशिनाथ देशमुख, व्यंकटराव माने, उरुलचे जयसिंगराव, रेठऱ्याचे विष्णू पाटील होते. या सर्व मंडळींनी साहेबांना निवडून आणण्याच्या आणाभाका घेतल्या.

शे. का. पक्षानं साहेबांची चोहोबाजूंनी नाकेबंदी केली. त्या पक्षानं उमेदवाराची निवड अत्यंत धूर्तपणे केली. कराडमधील साहेबांचे जिवलग मित्र व्यंकटराव पवार यांचे पुतणे केशवराव पवार या उमेदवाराला उमेदवारी देऊन निवडणुकीची पहिली फेरी शे. का. पक्षानं जिंकली. केशवराव पवार हे बहुले या आपल्या गावी राहत असत. व्यंकटराव मूळचे काँग्रेसचे. साहेबांचे कराड़मधील विश्वासू मित्र. त्यांचा कराडच्या राजकारणात दबदबा होता. याचा फायदा केशवराव पवारांना होणार होता. व्यंकटरावांना मानणारे सर्व कार्यकर्ते शे. का. पक्षात गेल्यानं साहेबांनी वार कुणावर करायचा? हे सर्व कार्यकर्ते साहेबांसाठी जीवाची बाजी लावणारे; पण आज विरोधात गेलेले. चळवळीत खांद्याला खांदा लावून एकत्र लढलो, तुरुंगवास भोगला, एका ताटात जेवलो, रक्ताच्या नात्यापेक्षा एकमेकांच्या जवळ आलो, हे नातं प्राणपणानं जपलं; पण आज तेच एकमेकांवर उलटले. एकदुसऱ्यावर शब्दास्त्रांचे वार करू लागले. महाभारतातील अर्जुनाच्या मन:स्थितीत साहेब पोहोचले. कुरुक्षेत्रावर कौरव-पांडव या रक्ताच्या नात्यातील युद्धाला तोंड फुटणार होतं. या युद्धात स्वार्थ होता. कौरवांनी अनीतीनं राज्य बळकावलं होतं. पांडव नीतीनं ते मिळविण्याच्या प्रयत्नात होते. नीती विरुद्ध अनीती असा हा महाभारतातील संघर्ष होता. त्यात दोन्ही बाजूंचा स्वार्थ होता.

साहेबांचा हा संघर्ष स्वार्थासाठी नव्हता. साहेबांना वैयक्तिक कुठलं राज्य मिळवायचं नव्हतं. केवळ वंचितांच्या उत्कर्षासाठी सत्ता मिळवून ती राबवायची होती. कौरव-पांडवांची रक्ताची व पैपाहुण्यांची नाती होती. साहेबांची नाती ध्येयानं प्रेरित झालेल्या अठरापगड जातीतील मित्रत्वाची नाती होती. ती स्वार्थाची नव्हती तर ती त्यागाची होती. हा एक फरक अर्जुन आणि साहेबांच्या मन:स्थितीमध्ये होता.

कराडमधून साहेबांनी उमेदवारी अर्ज भरला. प्रचाराची धुळवड सुरू झाली. साहेबांच्या त्यागाची बाजी पणाला लागली. नि:स्वार्थ स्वातंत्र्य चळवळीतील भाग, त्यात घराची झालेली होरपळ, राजकीय चारित्र्यसंपन्नता, नैतिकतेचं अधिष्ठान, जीवाला जीव देणारी मित्रमंडळी, तळागाळातील समाजाची दु:खं ही आपलीच दु:खं मानून त्यांच्याशी साधलेली जवळीक, नेहरू-गांधींवर असलेली निष्ठा या सर्व साहेबांच्या गुणांचा परिणाम मतदारांवर जाणवत होता.

साहेब नेहमी म्हणत, "माणसाचं मोठेपण त्याच्या कर्तृत्वापेक्षा त्याच्या आजूबाजूला असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वावर अवलंबून असतं."

साहेबांनी अशी कार्यकर्त्यांची पलटण चळवळीतून निर्माण केली होती. गौरीहर सिंहासने यांच्या गांधीजींप्रती असणाऱ्या निष्ठा, बाबुराव कोतवालांचा त्याग, राघूअण्णा लिमये यांचं जातीविरहित कार्य साहेबांना या निवडणुकीतून तारून नेणार याबद्दल साहेबांना विश्वास होता.

विरोधकांनी चाणक्यनीतीचा वापर करून साहेबांच्या विरोधात नानासाहेब बुधकर यांना उभे केले. नानासाहेब बुधकर हे जातीनं ब्राह्मण व प्रसिद्ध वकील. १९४८ ला गांधीहत्या झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये जी ब्राह्मणांची होरपळ झाली ती कराडमध्ये झाली नाही. त्याचं कारण साहेबांचे कार्यकर्ते. साहेबांच्या कार्यकर्त्यांनी संपूर्ण कराड तालुक्यात ब्राह्मणांचे संरक्षण केले. ब्राह्मणांची मते शेकापच्या उमेदवाराला मिळणार नव्हती. ती मते साहेबांना मिळू नयेत म्हणून ब्राह्मण उमेदवार उभा केला. या उमेदवाराच्या उमेदवारी अर्जावर बहुजन समाजातील नामांकित वकील पी. डी. पाटील यांची सूचक म्हणून सही घेतली. हा कुटिल डाव पी. डी. पाटील यांच्या लक्षात आला. पी. डी. पाटील यांनी मोठ्या बुद्धिचातुर्याने नानासाहेबांचा अर्ज काढून घेतला.

मीही या निवडणुकीच्या प्रचारात प्रथम भाग घेतला. डुबल गल्लीतील मला ओळखणाऱ्या सौ. डुबल अक्का, सौ. घाडगे वहिनी, श्रीमती मुजावर भाभी यांना सोबत घेऊन मी कराडच्या गल्लीबोळात फिरले. स्वातंत्र्यचळवळीत मला अटक झाल्याची बातमी घराघरांत पोहोचलेली होती. मी ज्या रस्त्यानं जायचे त्या रस्त्यातील सर्व आयाबहिणी मला पाहण्यासाठी घरासमोर येऊन उभ्या राहायच्या. काही वयस्कर माता माझ्या गालावरून हात फिरवून त्यांच्या कानाजवळ हात लावून बोटं मोडायच्या. या वेळी मला गहिवरून यायचं. काही माझ्या वयाच्या महिला मला पाहून आपले अश्रू पदरानं टिपायच्या. मलाही भडभडून याचचं, कंठ दाटून यायचा; पण बोलू शकत नसे. मी फक्त हात जोडीत पुढे चालायचे. संपूर्ण कराडच्या गल्लीबोळात मी फिरले. मला महिला भगिनींकडून जो प्रतिसाद मिळाला त्यावरून मी अंदाज बांधला की साहेब निवडून येतील.

विरोधी पक्षाकडून साहेबांवर अनेक आरोप झाले. साहेबांनी संयम पाळला. वैयक्तिक कोणावरही आरोप न करता पक्षाची भूमिका सामान्य माणसांपर्यंत पोहोचविली. याचा चांगला परिणाम मतदारांवर झाला. साहेबांनी ही निवडणूक जिंकली. काँग्रेस पक्षाला महाराष्ट्र प्रांतात भरघोस यश मिळालं. शे. का. पक्षाच्या नेत्यांचा भ्रमनिरास झाला. त्यांचं सत्ता काबीज करण्याचं स्वप्नं भंग पावलं. शेवटी काँग्रेसच्या ध्येयधोरणांचाच विजय झाला.

घरात आनंदाचं उधाण आलेलं. गेल्या सहा वर्षांत घराची झालेली धूळधाण साहेबांना आठवली. माझ्या आयुष्याच्या बांधणीत जे पायाचे चिरे झालेत ते माझे दोन्ही बंधू, माझ्या एक वहिनी, माझ्या अक्काचं सौभाग्य, माय आणि मातीनं माझं केलेलं संगोपन मी विसरू शकणार नाही. माझ्या कुटुंबाच्या सुखदु:खाला आपलंसं करून घरातील सर्व सदस्यांची एकत्र माळ गुंफून ती माळ तुटणार नाही याची काळजी वाहणारी माझी पत्नी - वेणू हिचा त्याग, स्वातंत्र्यचळवळीत ज्यांनी आपले प्राण मायभूमीवर निशावर केले ते माझे मित्र के. डी. पाटील, चंद्रोजी पाटील, बालमित्र अहमद कच्छी यांची आठवण झाली. घरात पै-पाहुण्यांची रीघ लागलेली. साहेब सतत कार्यकर्त्यांच्या आणि मित्रांच्या गराड्यात अडकलेले. मुंबईहून सारखे निरोप येत आहेत - 'लवकर मुंबईला निघून या.'

साहेबांनी मुंबईला जाण्याचा बेत आखला. आपल्या दोन चिमण्या आणि सर्व पाखरांना जवळ घेतलं. त्यांच्याशी लाडालाडानं बोलले.

सोनू वहिनीला म्हणाले, "या चिल्ल्यापिल्ल्यांची आई होऊन यांना तुम्हाला घडवायचे आहे. आई आता थकल्या आहेत. वेणू माझ्यासोबत मुंबईला राहील."

"मी एकटी नव्हे, आईपण माझ्यासोबत मुंबईला येतील." मी.

सर्व मुलं साहेबांना बिलगली. साहेबांनी छोट्या राजाला उचलून कडेवर घेतलं. त्याचे गालगुच्चे पकडले. तोही न डगमगता कड्यावरून काकाच्या खांद्यावर चढण्याचा प्रयत्न करू लागला. साहेबांनी राजाला माझ्या हवाली केलं. आईचं दर्शन घेतलं. आईनं तोंडभरून आशीर्वाद दिला - "यशवंत हो."

बाहेर बैठकीत बाबुराव कोतवाल आल्यागेल्याचं चहापाणी पाहत होते. साहेब बैठकीत आले. सर्व मित्रांनी आणि कार्यकर्त्यांनी उरभेट घेतली. सर्वांचे आभार मानले. सर्व कार्यकर्त्यांचा ऊर अभिमानानं भरून आलेला. विजयाचा आनंद कायकर्त्यांच्या चेहऱ्यांवर ओसंडून वाहत होता. साहेब प्रत्येकाच्या हातात हात मिळवून त्यांच्या पाठीवर थाप मारीत होते. बैठकीत आलेल्यांना भेटून त्यांनी सर्वांचा निरोप घेतला.

गौरीहर सिंहासने, राघूअण्णा लिमये, निगडीकर मास्तर, शिवाजीराव बटाणे आणि बाबुराव कोतवालांसह साहेब कराड रेल्वेस्टेशनवर पोहोचले. साहेबांना निरोप देण्यासाठी कराडातील नागरिक रेल्वेस्टेशनवर अगोदरच पोहोचलेले होते. साहेबांनी रेल्वेस्टेशनवर एक छोटेखानी भाषण दिलं.

म्हणाले, "आता निवडणूक संपली आहे. आपापसांतील वैरभाव विसरून जा. ज्यांनी आपल्याविरोधात निवडणुकीत आगळीक काढली असेल त्यांना क्षमा करा. कारण त्यांना आपण काय करीत आहोत याचं भान राहिलेलं नसेल. त्या सर्वांना सोबत घेऊन आपल्याला स्वातंत्र्याचं सुराज्यात रूपांतर करायचं आहे. त्या सर्वांचं सहकार्य या कामी आपल्याला लागणार आहे. तुमच्या शुभेच्छा माझ्या पाठीशी सदैव राहो, ही अपेक्षा."

साहेब सर्वांच्या शुभेच्छा सोबत घेऊन रेल्वेत जाऊन बसले. रेल्वे साहेबांना घेऊन मुंबईच्या दिशेने निघाली.

नेता निवडीकरिता विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावण्यात आली.

खेर यांनी निवडणुकीला उभे न राहण्याचा निर्णय घेतल्यानं त्यांची कारकीर्द संपुष्टात आली. खेर-मोरारजींची जोडी अशा तऱ्हेनं फुटली. साहेब, भाऊसाहेब हिरे, गाडगीळ, कुंटे यांनी महाराष्ट्र प्रांतात काँग्रेसचा गड शाबूत ठेवल्यानं विधिमंडळ पक्षाच्या सदस्यांनी या चौघांचं वैयक्तिक भेटून अभिनंदन केलं. विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदाची निवड बिनविरोध होणार हे निश्चितच होतं. मोरारजी देसाई यांचे पक्षश्रेष्ठींशी असलेले संबंध, मुंबई आणि गुजरातच्या आमदारांचा भरभक्कम पाठिंबा या बाबी लक्षात घेऊन मोरारजी देसाई यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी एकमुखानं निवड करण्यात आली. दुसऱ्याच दिवशी मोरारजी देसाईंनी मंत्रिमंडळातील आपल्या सहकाऱ्यांची नावं जाहीर केली.

भाऊसाहेब हिरे यांच्याकडे महसूल खातं देण्यात आलं. साहेबांकडे नागरी पुरवठा, समाजकल्याण आणि जंगल खात्याची जबाबदारी देण्यात आली. भाऊसाहेब हिरे यांच्याकडे प्रांतिकचं अध्यक्षपदही होतं. इतर जिल्ह्यांतून मंत्रिमंडळात प्रतिनिधी घेताना प्रांताध्यक्षाशी सल्लामसलत करावी असा संकेत असताना मोरारजी देसाईंनी हा संकेत पाळला नाही. सातारा जिल्ह्यातून मालोजीराजे नाईक निंबाळकर व तपासे यांचा मंत्रिमंडळात समावेश केला होता. याबद्दल पक्षाच्या प्रांताध्यक्षांना विश्वासात घेण्यात आलं नव्हतं. भाऊसाहेब हिरे यांना हा आपला अवमान वाटला. त्यांनी हा प्रश्न धसास लावण्याचं ठरविलं. ही कटुता टाळण्यासाठी साहेबांनी हिरे यांची समजूत काढली. म्हणाले, एकदा पक्षनेता निवडल्यानंतर मंत्रिमंडळात कुणाला घ्यायचं तो अधिकार त्या नेत्याचा असतो. साहेबांच्या शिष्टाईनं हा प्रश्न मिटला.

साहेब व हिरे यांना मिळालेली खाती ग्रामीण जनतेच्या जीवनाशी निगडित आहेत. मोरारजी देसाईंनी ग्रामीण व शहरी जनतेच्या आशा-आकांक्षांना न्याय दिला. महसूल खात्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न धसास लावता येतील. नागरी पुरवठा खाते मध्यमवर्ग व मजूर जनतेशी निगडित आहे. समाजकल्याण खाते हे उपेक्षित व वंचितांच्या कल्याणाकरिता राबविता येणार होते. मुख्यमंत्र्यांनी खातेवाटपासोबतच त्या त्या खात्याच्या मंत्र्यांची राहण्याची व्यवस्थाही जाहीर केली. साहेबांना मलबार हिलवर 'ऐरी बंगला' मिळाला. गृहखात्यात पार्लमेंटरी सचिव असताना खाजगी

सचिव म्हणून साहेबांच्या सान्निध्यात आलेले डोंगरे यांना साहेबांनी आपल्याकडे घेतले. त्यांनी ऐरी बंगला ताब्यात घेतला. साहेबांच्या मार्गदर्शनाखाली बंगल्यात साहेबांना पाहिजे तशी व्यवस्था करून दिली.

साहेबांनी सचिवालयात जाऊन आपल्या खात्याची सूत्रे स्वीकारली. त्या खात्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. आपली काम करण्याची पद्धत त्यांना समजावून सांगितली.

म्हणाले, "आम्ही जनतेचे प्रतिनिधी आहोत. त्यांचे प्रश्न सोडविणे हे आमचं आद्यकर्तव्य आहे. आपण जर मला सहकार्य दिलं तर मी जनतेला न्याय देऊ शकेल." साहेबांनी कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन केला.

गेल्या तीन-चार दिवसांपासून कराडहून माधवराव जाधव साहेबांना सारखे फोन करू लागले. त्यांनी कराडला साहेबांचा नागरी सत्कार आयोजित करण्याचं ठरविलं होतं. साहेब पाहू, बघतो, तारीख कळवतो असं म्हणून जाधवांना टाळू लागले. जाधवांनी शेवटी साहेबांना निर्वाणीचा निरोप दिला की, "आम्ही रविवारी नागरी सत्कार आयोजित केला आहे. आपणास येणे अनिवार्य आहे."

कराडमध्ये सत्काराचा ज्वर चढू लागला. बाबुराव कोतवाल सत्कार समितीचे सचिव होते. माधवराव जाधव आणि साहेबांचे चळवळीतील सर्व सहकारी सत्कार भव्य आणि दिव्य व्हावा म्हणून झटू लागले. त्यांनी या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदासाठी वयोवृद्ध आणि साहेबांवर सर्व प्रसंगात प्रेमाची सावली धरणारे दादासाहेब फडके वकील यांची निवड केली. बसस्थानकाजवळील मैदानावर भव्य मंडप उभारण्यात आला. या सत्काराचे निमंत्रण साहेबांच्या पाठीराख्यांना तर दिले; पण काही कारणास्तव साहेबांपासून दुरावलेल्यांनादेखील निमंत्रणपत्रिका दिल्या. निवडणूक संपल्यानंतर काही दिवसांत त्यांना आपली चूक कळून आली होती. बाबुराव कोतवाल, माधवराव जाधव, बाबुराव काळे, डॉ. गजानन पावसकर, मारुती डांगे, राजाराम जिरंगे, रामविलास लाहोटी, यशवंतराव मुळे, अण्णासाहेब रैनाक, हरिभाऊ लाड, सिंहासने यांनी एकत्र येऊन 'न भूतो न भविष्यति' असा हा सत्कार व्हावा असा चंग बांधला.

मंत्री झाल्यानंतर साहेब प्रथमच कराडला येणार होते. डोंगरे यांच्याकडून

कळलं की, साहेब प्रथम घरी येत आहेत. मी, सोनूताई आणि राधाक्कानं साहेबांना ओवाळण्याची तयारी केली. आमच्या चिमण्या चिवचिव करू लागल्या. सुधा आणि लीला यांनी आग्रह धरला - आम्हीच काकांना ओवाळू... आम्ही तुम्हाला ओवाळू देणार नाही. आईनंही त्यांची बाजू घेतली. शेवटी तह करण्यात आला. तहाअंती ठरलं - आमच्या कन्यारत्नांनी काकाला ओवाळावं. ठरलेल्या वेळेला साहेबांची गाडी घरासमोर येऊन उभी राहिली. मागेपुढे पोलिसांच्या गाड्यांचा ताफा. त्या गाड्यांतून उतरलेल्या पोलिसांनी साहेबांच्या गाडीभोवती कडं केलं. साहेब गाडीतून उतरले. साहेबांनी त्यांना 'याची काही गरज नाही' असं सांगितलं. ते बाजूला झाले. साहेब घरात येण्यापूर्वी आमच्या चिमुरड्या कन्यांनी साहेबांना घराच्या उंबरठ्यावर ओवाळलं. आम्ही आश्चर्यानं त्यांच्याकडे पाहतच उभं राहिलो. आई घरात बसल्या होत्या. त्यांच्या अवतीभोवती हरिभाऊ, राघूअण्णा लिमये, सिंहासनेअप्पा उभे होते.

साहेब घरात आले. आईच्या पायावर माथा टेकविला. आईच्या आजूबाजूला उभ्या असलेल्या मित्रांची गळाभेट घेतली. सत्कार समितीचे कार्यकर्ते साहेबांना घेण्यासाठी आले. डुबल गल्लीपासून जुन्या बसस्थानकाच्या मैदानापर्यंत उघड्या जीपमधून साहेबांची मिरवणूक काढली. संपूर्ण कराडची जनता रस्त्याच्या दुतर्फा उभी राहून साहेबांवर फुलांचा वर्षाव करीत होती. साहेब त्यांच्या स्वागताचा हात जोडून स्वीकार करीत होते. साहेब सभास्थानी पोहोचले.

सभामंडप लोकांनी खचाखच भरला होता. पाय ठेवायलाही जागा शिल्लक नव्हती. अनेकजण उभे राहून सत्कार सोहळ्याचा आनंद घेत होते. अनेक वक्त्यांची भाषणे झाली. बाबुराव कोतवालांनी ओजस्वी व भावनात्मक भाषण करून सभा जिंकली. सर्वांचे स्वागत केले. विशेष म्हणजे जे गैरसमजापोटी साहेबांना सोडून गेले होते ते सर्वजण येथे हजर होते. साहेबांच्या दृष्टीनं सर्वात आनंदाची घटना म्हणजे साहेबांचे स्वातंत्र्यचळवळीतील सहकारी पांडुरंग डोईफोडे हजर होते. त्यांनी साहेबांचं बालपण, तुरुंगवास, चळवळीतील घटनांचा साक्षात इतिहास जनतेसमोर उभा केला. साहेबांच्या मनाच्या मोठेपणाचे प्रसंग सांगितले. त्यांना आपल्या भावनांना आवर घालता आला नाही. शेवटी भावनाविवश होऊन बोलण्याचे

थांबवून ते खाली बसले. संपूर्ण सभेत सन्नाटा पसरला. सत्कार समितीचे अध्यक्ष दादासाहेब फडके यांच्या हस्ते साहेबांचा सत्कार केला. सर्व जनता उभी राहून टाळ्यांच्या कडकडाटात साहेबांचा सत्कार करीत होती. सांगली, सातारा पंचक्रोशीतील सर्घ संघटना, संस्था, व्यक्तींनी साहेबांचा पुष्पहार घालून सत्कार केला. हा सत्कार सोहळा पाहून सामान्य जनतेच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

साहेब सत्काराला उत्तर देण्यासाठी उभे राहिले. क्षणभर मंडपात शांततेची लहर पसरली. सर्वजण आपला जीव कानात आणून साहेबांचं भाषण ऐकण्यास उत्सुक होते. साहेबांनी समोर बसलेला जनसागर न्याहाळला. काही क्षण शांत उभे राहिले.

कंठ दाटलेल्या आवाजात म्हणाले, ''माझ्या पाठीराख्या बंधू आणि भगिनींनो, मी येथे आलो ते सत्कार घेण्याकरिता नाही, तर तुमचे आभार मानण्यासाठी. आभार याकरिता की, लोकशाहीमध्ये तुम्ही या देशाचे मालक आहात. आम्हाला निवडून देऊन तुम्ही देशाचा कारभार पाहण्यासाठी नोकर म्हणून पाच वर्षांसाठी आमची नेमणूक केली आहे. नोकराचे काम इमानेइतबारे मालकाच्या हिताचे रक्षण करणे हे आहे. तुमच्या ज्या काही अपेक्षा असतील त्याकरिता जास्तीत जास्त काम करून त्या अपेक्षा पूर्ण कराव्यात. तुम्हाला सुखासमाधानाचे जीवन कसे जगता येईल हे पाहणे आमचे काम आहे. या तुमच्या गरजा जर आम्ही पूर्ण करू शकलो नाहीत तर पाच वर्षांनंतर तुम्ही आम्हाला बदलू शकता. आपण आपापसांतील सर्व मतभेदांना गाडून टाकूया. या देशाच्या भवितव्यासाठी एकदिलाने काम करूया. देशाची उन्नती म्हणजे तुमची-माझी उन्नती. हजारो वर्षांपासून आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या जो वर्ग वंचित आहे, आपल्या बरोबरीनं त्याला उभं करूया. याकरिता तुमचे आशीर्वाद घेण्यासाठी मी इथे आलो आहे.'' आभार मानून सभा संपली. साहेबांनी सभा व जनतेची मनं जिंकली.

साहेबांना सत्कार सभेच्या ठिकाणी पोहोचून डोंगरे घरी आले. त्यांनी आई, सोनूताई व माझं दर्शन घेतलं. आपला परिचय आम्हाला करून दिला. मुंबईच्या घराची कल्पना दिली. साहेबांनी घरामध्ये कुठल्या वस्तू पाहिजे याची यादी आपल्याकडून घेण्याबद्दल सूचना दिल्या. आपण मुंबईला

येण्यापूर्वी मी घरात सर्व वस्तू व्यवस्थित लावून ठेवतो, असेही त्यांनी सांगितले.

मी डोंगरेंना म्हणाले, "मी मुंबईला आल्यानंतर आपण दोघं मिळून गरजेप्रमाणं जे सामान लागेल ते बाजारातून घेऊत. आताच यादी द्यायची गरज नाही."

"ठीक आहे" असे म्हणत डोंगरे सभास्थानाकडे निघून गेले. साहेबांनी सभास्थळाकडूनच कराडवासीयांचा निरोप घेतला व मुंबईच्या वाटेला लागले.

साहेब सचिवालयात जाऊन पुरवठा खात्याच्या कामात बारकाईनं लक्ष घालू लागले. सामान्य जनता अन्नधान्याच्या तुटवड्यामुळं शासनावर नाराज होती. त्रस्त जनतेच्या हिताचे निर्णय केंद्र शासनाच्या धोरणात फेरबदल करून घेण्याची निकड साहेबांच्या लक्षात आली. केंद्रात रफी अहमद किडवाई यांच्याकडे अन्नधान्य पुरवठा खातं होतं. एक चतुर सहकारी म्हणून नेहरूजी त्यांच्याकडं पाहत असत. केंद्रात आणि महाराष्ट्रात जनतेच्या नाडीवर हात असलेले दोघे पुरवठामंत्री असल्यामुळं दोघांचं सूत जमलं. साहेब वयानं तरुण असूनही त्यांच्यातील अभ्यासूवृत्ती व प्रश्न सोडवण्याची मनाची तळमळ पाहून अहमद किडवाई साहेबांवर खूश होते.

साहेबांनी अहमद किडवाई यांचा विश्वास संपादन केला. अन्नधान्य नियंत्रण पद्धतीत काही त्रुटी होत्या. त्यामुळं ग्रामीण जनतेचे हाल होत असत. या अटींचा अभ्यास करून, त्यांचं मिवारण करून ग्रामीण जनतेला दिलासा देण्याचं काम प्रथम साहेबांनी केलं. लहान शहर तसेच खेड्यातून ज्वारी, बाजरी आणि मका यावरील नियंत्रण उठविण्याचं साहेबांनी ठरविलं. यात व्यापाऱ्यांनी साठेबाजी करून किंमत वाढविण्याचा उद्योग करू नये, अशी समज व्यापाऱ्यांना दिली. अन्नधान्य पिकविणारा आणि व्यापारी यांच्या सहकार्यावरच हे धोरण यशस्वी होईल याची जाणीव साहेबांना होती.

दोन्ही वर्गात सद्भावना निर्माण करण्याचं काम साहेबांनी केलं. गहू, साखर, रॉकेल, कापड यावरील नियंत्रण दूर केलं. यामुळं सामान्य जनतेला परवडेल या भावात दैनंदिन गरजेच्या वस्तू मिळू लागल्या. व्यापारीही सहकार्य करू लागले. साहेबांच्या या धोरणाची दखल केंद्राने घेतली.

अन्नधान्याचा प्रश्न मार्गी लागला. शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन त्यांच्याकडून लेव्ही पद्धतीनं अन्नधान्य खरेदीची अंमलबजावणी सुरू केली. पुरवठा खात्याबद्दल जनतेची जी नाराजी होती ती दूर झाली. या यशस्वी कामामुळं मोरारजी देसाई साहेबांना जवळ करू लागले. काम करून घेण्याच्या पद्धतीमध्ये कुठलाही आडमुठेपणा नाही. सहकाऱ्यासोबत काम करीत असता तुसडेपणाची वागणूक नाही. प्रश्न समजून घेण्याची खुबी, चांगले काम करीत असलेल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना शाबासकी देण्यात कद्रूपणा नाही. काम करीत असताना अधिकाऱ्याकडून चूक झाल्यास त्याला शिक्षा करण्याची घाई नाही. त्याला संधी देऊन त्याच्याकडून ते काम व्यवस्थित करून घेण्याची हातोटी... या सर्व काम करण्याच्या पद्धतीनं साहेब अधिकारी व कर्मचाऱ्यांत आत्मविश्वास निर्माण करू लागले. साहेबांच्या या कार्यपद्धतीमुळं त्यांचा नावलौकिक वाढू लागला.

भाऊसाहेब हिरे आणि साहेब ग्रामीण भागाचे प्रतिनिधी तसेच पक्षाचे अध्यक्ष व सेक्रेटरी असल्यानं दोघांची तुलना होऊ लागली. साहजिकच साहेबांचं पारडं भारी भरू लागलं. भाऊसाहेब धडाडीचे नेते. त्यांच्यातील नाही म्हटलं तरी सरंजामी वृत्तीचा अहंकार दैनंदिन कारभारात उफाळून यायचा. या त्यांच्या वागणुकीनं कर्मचारी व कार्यकर्ते नाराज व्हायचे. पुरवठा व महसूल ही दोन खाती शेतकऱ्यांच्या जीवनाशी संबंधित आहेत याची जाणीव या दोन्ही नेत्यांना होती. साहेब आपल्या खात्याचे निर्णय जनसामान्याचे हित लक्षात घेऊन तत्काळ घ्यायचे. हेच निर्णय भाऊसाहेब हिरे दिरंगाईनं घ्यायचे. निर्णय घेण्यास उशीर करणे म्हणजे सामान्य जनतेच्या रोषास कारणीभूत होणे. यामुळे भाऊसाहेब हिरेंच्या काम करण्याच्या पद्धतीबद्दल लोकांत नाराजी पसरायची. मुख्यमंत्री म्हणून मोरारजी देसाई याची दखल घेत असत. गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक व मुंबईच्या एकोप्यानं मुंबई राज्याचा कारभार सुरळीत चालला होता. विकासाच्या कामानं गती घेतली होती. सामान्य जनता सरकारच्या कामावर खूश होती. देशात भाषिक पुनर्रचनेचे वारे वाहू लागले.

वन आणि जंगल विकास खात्याच्या बाबतीत साहेबांनी सुसूत्रता आणली. वन आणि पशूपक्ष्यांचं संरक्षण याकडे साहेबांनी लक्ष केंद्रित केलं. वन आणि शेतीचा संबंध अनन्यसाधारण आहे हे जनतेला पटवून

दिलं. वृक्षाची लागवड करून वनं वाढविली तर पाऊसपाणी चांगला होऊन उत्पन्नात वाढ होते. अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण होण्यासाठी जंगल संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. वनसंपत्तीचे जतन करीत असतानाच वन्य पशूपक्ष्यांचे जतन करणे तेवढेच निकडीचे आहे हे लक्षात घेऊन वन व पशूपक्ष्यांचे संरक्षण करणारा कायदा करणारे मुंबई राज्य हे देशात पहिले राज्य आहे. शिकाऱ्याजवळ शिकार करण्याचा परवाना असल्याशिवाय त्याला शिकार करता येणार नाही असा कायदा केला. भूतलावर असलेले पशूपक्षी व शेती हे एकमेकांना पूरक आहेत. या दोघांमध्ये निसर्गानंच समन्वय निर्माण केलेला आहे. या सर्व प्राण्यांचे जतन करण्याची जाणीव जनतेत व शेतकरी वर्गात निर्माण केली. या आणि अशा कार्यकर्तृत्वानं साहेबांचं नेतृत्व मुंबई राज्यात उठून दिसू लागलं.

'रामायण' व 'महाभारत' हे भारतीय जीवनशैलीचे दोन ग्रंथ आहेत. या दोन्ही ग्रंथांमध्ये काही उपेक्षित व्यक्तिमत्त्वे आहेत. त्यांना या ग्रंथांनी न्याय देण्याचं नाकारलेलं मला दिसतं. त्या उपेक्षितांत रामायणामधील लक्ष्मणाची पत्नी ऊर्मिला आहे. लक्ष्मणाचं बंधूप्रेम, आज्ञाधारकपणा आपणास दिसतो. त्याचं आपण उदात्तीकरण करतो, गुणगान करतो; पण या बदल्यात ऊर्मिलाच्या भावनेचा झालेला कोंडमारा, तिला जगावं लागणारं क्लेशकारक जीवन, तिच्या मनाचा विचार या ग्रंथात कुठे व्यक्त होताना दिसत नाही. रामायणानं स्त्री जातीवर केलेला हा घोर अन्याय आहे असं मला वाटतं. १९४२ ते १९५२ या दहा वर्षांत मलाही ऊर्मिलेसारखं जीवन व्यतीत करावं लागलं. लौकिकार्थानं त्याग, देशकार्य याची दखल समाजानं घेतली; पण झालेला मनस्ताप मला कुठंही व्यक्त करता आला नाही. तो स्त्री जातीला करता येऊ नये म्हणूनच रामायणात ऊर्मिलेला जन्माला घातली असावी. तिचीच मी प्रतिनिधी आहे असं मला वाटतं. आम्हा दोघींमध्ये फरक तो काय असेल तर मला दहा वर्षे हे जीवन जगावं लागलं तर ऊर्मिलेला चौदा वर्षे.

मला व आईला मुंबईला घेऊन जाण्यासाठी डोंगरे कराडला गाडी घेऊन आले. सोनूताईचं आज कामात लक्ष नव्हतं.

त्या सारख्या आईला म्हणू लागल्या, "आई, तुम्ही मला व मुलांना

सोडून मुंबईला जाऊ नका. मला एकटीला या सर्व मुलांचा सांभाळ करता येईल का? माझ्याकडून चुकून भागीरथीच्या मुलाकडं दुर्लक्ष झालं तर माझ्यावर नाही नाही ते आरोप समाज करेल. वेणूला एकटीला जाऊ द्या.''

''नाही सोनूताई, मी आईला सोडून एकटी तिकडे राहूच शकत नाही. आई तिथे मी. हे बघा सोनूताई, तुम्ही असं मनात तरी कसं आणता की, भागीरथीच्या मुलांकडं तुमचं दुर्लक्ष होईल म्हणून? आपण मुलांची अशी कधी वाटणी केलीच नाही. काही दिवसांचाच तर प्रश्न आहे. लवकरच त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था आपल्याला करावी लागणार आहे. राजाला मात्र मी माझ्यासोबत घेऊन जाते.'' मी.

''हे बघ वेणू, तू या घराकरिता खूप काही केलं. तुझी तब्येत ही अशी तोळामासा. आता तू तुझ्या तब्येतीला जप. तुझ्यासाठी नाही, पण यशवंताकरिता तरी तुला धडधाकट व्हावं लागेल.'' आई.

आईचं म्हणणं मला पटलं. राजाला माझ्यासोबत घेऊन जाण्याचा बेत मी रहित केला. आईच्या बाबतीत मात्र मी आग्रही होते.

सोनूताई रडकुंडीला येऊन म्हणाल्या, ''हे बघ वेणू, तू या वेळेस माझं ऐक. मुलं शाळेत जाऊ लागली की, तू राजाला आणि आईला घेऊन जा. मग मी तुला आडकाठी निर्माण करणार नाही.''

''मला वाटतं, वेणू, तू एकटीच या वेळेस मुंबईला जा. तू आणि यशवंता काही दिवस एकत्र राहून एकदा रुळले म्हणजे मी आणि राजा मुंबईला येऊत.''

आई असं बोलल्यानंतर सोनूताईचा चेहरा खुलला. सोनूताई आणि आईचं एकमत झाल्यानं मी एकाकी पडले. मलाही आईचं म्हणणं पटलं. चव्हाण घराण्याचा वारसा व आईला सोनूताईच्या हवाली करून मी मुंबईच्या वाटेनं निघाले.

मुंबई तशी मला नवीन नाही. मलबार हिल हा भाग मात्र मी कधी पाहिला नव्हता. ऐरी बंगला नीटनेटका करण्यात मी गुंतले. सर्वांत प्रथम साहेबांची वाचनालयाची खोली व्यवस्थित केली. त्याला लागूनच साहेबांची झोपण्याची खोली होती. ती डोंगरेंनी साहेबांच्या मनाप्रमाणे सजविलेली होती. मी माझ्या स्वयंपाकघराचा ताबा घेतला. स्वयंपाकघरात आवश्यक तेवढ्या सामानाची यादी करून डोंगरे यांच्याकडे दिली. स्वयंपाकघराला

लागूच छोटेखानी देवघर, त्यात महात्मा गांधींचा फोटो लावून घेतला. शेवटी माझ्या खोलीत गेले. माझ्या मनाप्रमाणे माझ्या खोलीत सामान लावून घेतलं. डायनिंग हॉल आणि बैठक डोंगरे यांनी साहेबांच्या मनाप्रमाणे तयार केली होती. नोकरचाकर हाताखाली होतेच.

महाराष्ट्र आणि दुष्काळ यांचं अतूट नातं. त्रेपन साल उगवलं ते दुष्काळाला सोबत घेऊन. केंद्र शासनाकडून अधिकचा धान्य कोटा वाढवून घेणं आवश्यक होतं. त्याकरिता साहेबांचे प्रयत्न सुरू झाले. केंद्रीय अन्नमंत्री किडवाई यांचा दुष्काळग्रस्त भागात दौरा आयोजित करण्याचं साहेबांनी ठरविलं. त्याच वेळी हैदराबाद येथे कॉंग्रेस अधिवेशन घेण्याचं घाटत होतं. त्या अधिवेशनानंतर तुम्हाला तारीख देतो, असं अन्नमंत्र्यांनी कळविलं. ही चालढकलच जनतेच्या असंतोषाला कारणीभूत ठरते असं साहेबांचं मत झालं. अन्नमंत्र्यांचा दौरा, पाहणीनंतर मदत यात वेळेचा अपव्यय होतो. सामान्य जनतेला उपासमारीच्या खाईत ढकलण्याचा हा प्रकार आहे. महाराष्ट्राला दुष्काळ निवारण्यासाठी केंद्राकडून काही आर्थिक मदत मिळते का म्हणून साहेबांनी प्रयत्न सुरू केले. तिथे चिंतामणराव देशमुखांनी आडवा पाय घातला. अन्नमंत्र्यांच्या दौऱ्यात पंचमहल, विजापूर या भागांचा समावेश करावा असा आदेश मुख्यमंत्र्यांनी साहेबांना दिला. रेशनिंगसाठी अधिकचा अन्न कोटा उपलब्ध करून घेणे व अर्थमंत्र्यांनी निर्माण केलेली अडचण दूर करणे या कामाला साहेबांनी प्राधान्य दिलं.

नगर जिल्ह्यातील कर्जत भागातील दुष्काळी भागास भेट देताना घोगरगाव या ग्रामीण भागातील माणुसकीचा आलेला अनुभव साहेबांनी सांगितला.

म्हणाले, "खायला अन्नधान्य नाही, पिण्याच्या पाण्याची बोंबाबोंब. अशा अवस्थेत घोगरगावच्या ग्रामस्थांनी मला दूध, कॉफी घेऊन जाण्याबद्दल आग्रह केला." या आदरातिथ्याबद्दल मला गहिवरून आलं.

दुष्काळी परिस्थितीची कल्पना साहेबांनी हिरे यांना दिली. हिरे आणि किडवाई यांच्यात धान्याचा कोटा वाढवून देण्याच्या संदर्भात बोलणं झालं, असं हिरे यांनी साहेबांना सांगितलं. काकासाहेब गाडगिळांचा हिरे यांच्या निवासस्थानाहून साहेबांना फोन आला. साहेब त्यांना भेटण्यासाठी हिरे यांच्या बंगल्यावर गेले. गाडगीळदेखील किडवाई यांच्याशी धान्यपुरवठ्याबद्दल

बोलले. हिरे आणि गाडगीळ यांनी जी माहिती दिली त्यात तफावत आढळत होती. साहेबांनी दिल्लीला परिषदेला गेल्यानंतर माहिती पडताळून पाहण्याचं ठरविलं. कारण काकासाहेब गाडगीळ अघळपघळ गप्पा मारण्यात रमून जातात. त्यामध्ये आत्मप्रौढी व थापांची सहज पेरणी करून टाकतात.

८ जानेवारीच्या अन्न परिषदेकरिता दिल्लीला जाण्यापूर्वी साहेबांनी मोरारजी देसाईंची भेट घेतली. मोरारजी देसाई नुकतेच हैदराबाद येथील वर्किंग कमिटीच्या बैठकीला जाऊन आले होते. वर्किंग कमिटीतील हकिगत मोरारजींनी साहेबांना सांगितली.

म्हणाले, ''भाषावार प्रांतरचनेवर चर्चा चालू असताना त्यात हैदराबादचा प्रश्न निघाला त्या वेळी नेहरूजी म्हणाले, ''हैदराबादची विभागणी मी होऊ देणार नाही. प्रसंग आल्यास सर्व सैन्य नेऊन तेथे उभे करील.''

भाषावार प्रांतरचना तत्त्व म्हणून स्वीकारल्यानंतर हैदराबादच्या विभाजनाचा प्रश्न उरत नाही, असं मत मोरारजींसमोर साहेबांनी व्यक्त केलं. नेहरूजींच्या या वक्तव्यावर विचार करीत साहेब मोरारजींच्या खोलीतून बाहेर पडले. आपल्या कार्यालयात येऊन बसल्यानंतर परत साहेब नेहरूंच्या वक्तव्याबद्दल मनातल्या मनात पुटपुटले, 'पंडितजी काश्मिरी ब्राह्मणाच्या कुळात जन्माला येण्याऐवजी जर दक्षिणेतील एखाद्या राज्यात कोणाच्याही पोटी जन्माला आले असते तर त्यांना गेली अनेक शतके अन्यायावर उभे राहिलेले हे राज्य दक्षिणेतील हिंदी मानवतेच्या हृदयात सलणारे एक शल्य आहे याची अनुभूती आली असती.' पण हे कुणाजवळ बोलावं असा साहेब विचार करू लागले. 'जनतेच्या अंतर्मनातील स्पंदने जेव्हा नेत्यांना समजेनाशी होतात तेव्हा जनताच नेतृत्व हाती घेते. भाषिक प्रांतरचनेच्या बाबतीत आमच्या देशात हे घडणार असे स्पष्ट दिसू लागले आहे' ही भावना मनाशी व्यक्त करून साहेबांनी कार्यालय सोडलं.

'अन्न परिषदेला जाण्यापूर्वी मला भेटून जा' असा किडवाईंचा साहेबांना निरोप होता. साहेब प्रथम किडवाईंना भेटले. बैठकीला वेळेत पोहोचले. बैठकीत नेहरूजींनी नेहमीप्रमाणे अन्नधान्याच्या परिस्थितीबद्दल आपलं मत व्यक्त केलं. अन्नधान्य आयातीच्या धोरणावर आपल्याला निर्णय घ्यावा लागणार आहे हे सर्व राज्यांच्या अन्नधान्य मंत्र्यांना मान्य होतं.

साहेब त्यावर मत व्यक्त करत म्हणाले, ''आयातीचा कार्यक्रम हळूहळू

आखडता घेतला पाहिजे. एकदम बंद करून आपण तूट भरून काढू शकू का, हा खरा प्रश्न आहे. कशा प्रकारे अन्नधान्य वितरणाची रचना केली तर हा निर्णय सोयीस्कर ठरेल, हाच खरा प्रश्न आहे. भारत सरकार सर्व राज्यांत समान धोरण राबविण्यास असमर्थ ठरले आहे. त्यामुळे नियंत्रण हे प्रांतांना दिलेला शाप आहे. मुंबई राज्यातील ज्वारी-बाजरीच्या नियंत्रणाचा विचार या पार्श्वभूमीवर केला पाहिजे.''

साहेबांनंतर अर्थमंत्री बोलले. त्यांनी साहेबांची उलटतपासणी घेतली. दुसऱ्या दिवशी बैठकीत किडवाई यांनी साहेबांचे सर्व मुद्दे मान्य केले. सायंकाळी अन्नमंत्र्यांकडे जेवणास सर्व राज्यांचे अन्नमंत्री हजर होते. देशमुखांना साहेबांनी सुनावल्याबद्दल मंत्र्यांनी साहेबांचे अभिनंदन केले. साहेब मुंबईला परत आले.

हैदराबाद येथील अ. भा. काँग्रेस कमिटीच्या बैठकीत प्रांताच्या पुनर्रचनेच्या संदर्भात एक ठराव काकासाहेब गाडगीळ यांनी मांडला. आंध्र प्रदेश निर्मितीच्या प्रयोगाच्या स्टॅबिलायझेशननंतर इतर प्रांतांचा विचार करावा, असे ठरावात नमूद करण्यात आले होते. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रश्नाला बस्त्यात गुंडाळून ठेवण्याचा हा प्रकार होता. या ठरावावर साहेबांना बोलायचं आहे का? असे काकासाहेब गाडगिळांनी साहेबांना विचारले.

''मी बोलणार नाही; पण एक अमेंडमेंट पाठविणार आहे. 'स्टॅबिलायझेशन'ऐवजी 'फॉर्मेशन' असा शब्द ठरावात असायला पाहिजे.'' साहेब.

''चालेल, मला मान्य आहे; पण पंडितजी ही उपसूचना मान्य करतील का?'' गाडगीळ.

उपसूचना उशिरा आली म्हणून पंडितजी ती मांडण्यास परवानगी देणार नाहीत असं साहेबांना कळलं. साहेबांनी हिरेंमार्फत पंडितजींना विनंती केली. पंडितजींनी ही उपसूचना मांडण्यासाठी साहेबांना तीन मिनिटांचा अवधी दिला. साहेबांनी प्रभावीपणे ही उपसूचना मांडली. ही उपसूचना मतास टाकण्यात आली. ४१ मते उपसूचनेच्या बाजूनं पडली. उपसूचनेच्या विरोधात १०० मते पडली. उपसूचना फेटाळण्यात आली. महाराष्ट्राच्या प्रतिनिधींमध्ये या उपसूचनेला प्रतिसाद मिळाला. हैदराबादचे देविसिंग चौहान (पुनर्वसनमंत्री) साहेबांना येऊन भेटले. त्यांनी साहेबांजवळ संयुक्त

महाराष्ट्राची तयारी दर्शवली. साहेबांची संयुक्त महाराष्ट्र निर्मितीमागची भूमिका ही उपसूचना मांडण्यावरून सुस्पष्ट होते. एवढेच नाही तर ही उपसूचना मांडून त्यांनी केंद्रीय नेत्यांना उघडं पाडलं. आंध्र प्रदेशच्या निर्मितीचं सूत्र इतर राज्यांच्या निर्मितीसाठी लागू करावं असा आग्रह साहेबांनी शेवटपर्यंत लावून धरला; पण साहेबांचा मार्ग वेगळा होता हे विरोधकांच्या लक्षात आलं नाही, हेच साहेबांचं दुर्दैव म्हणावं लागेल.

किडवाई यांनी साहेबांना दिलेला शब्द पाळला. काँग्रेस कमिटीचं अधिवेशन संपवून १९ जानेवारीला महाराष्ट्रातील दुष्काळी भागास भेट देण्याकरिता ते आले. महाराष्ट्रात येण्यापूर्वी विजापूर येथे त्यांची जाहीर सभा झाली. सभेत किडवाई यांची सुस्पष्ट शब्दफेक, शांतपणे बोलण्याची तऱ्हा साहेबांना आवडली. या सभेत साहेबांनीही किडवाईंच्या उपस्थितीत चक्क हिंदीतून २० मिनिटे भाषण केलं. साहेबांची काय अवस्था झाली असेल कल्पना करवत नाही; पण साहेब बोलले. भीमा ओलांडून किडवाईंसोबत साहेब निंबर्गी गावी पोहोचले. शेतकी खात्यातील शेळके यांनी बरीच वर्षे नालाबंडिंगचे काम करून त्याचे होणारे परिणाम किडवाई व साहेबांना दाखविले. लहानसा ओढा अडवून नालाबंडिंगच्या होणाऱ्या परिणामांचे प्रात्यक्षिक करून दाखविले. सात-आठ फूट खोल खोदून त्यावर इंजीन बसविले. खडकाळ जमिनीवर वीस एकरात पीक उभे होते. छोटे बंधारे बंदिस्त आणि नालाबंडिंग करून दुष्काळी परिस्थितीवर मात करण्याचा कायम उपाय निघू शकतो, असा विश्वास साहेबांमध्ये निर्माण झाला. दुष्काळावर कायमचा उपाय शोधण्याचे सोडून केंद्र शासनाचे अर्थमंत्री पुण्यात बसून त्यांच्या पुस्तकी ज्ञानाची मुक्ताफळे उधळण्यात मग्न होते.

'दुष्काळ ही राज्याची जबाबदारी आहे आणि त्याच्यासाठी शिक्षण उपाशी राहू द्या.' बहुजन समाज आताच कुठे डोळे किलकिले करून इकडेतिकडे पाहू लागलेला तोच हे विद्वान आम्हाला सांगणार की, 'पोट उपाशी नको असेल तर डोके उपाशी ठेवा आणि डोके उपाशी नको असेल तर राहूद्यात पोट उपाशी.' या देशातील ग्रंथपंडितांची ही अशी मुक्ताफळे वाचून साहेब बेचैन होत असत.

साहेब सारखे दौऱ्यात-बैठकीत गर्क राहायचे. महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटकातील जनतेचे प्रश्न धसास लावण्याकरिता दौऱ्यावर असायचे.

नेहरूंजींचा सामाजिक, आर्थिक विचार वंचित समाजाच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करायचे. बारा बलुतेदार व धनगर, माळी, तेली, तांबोळी या समाजाला कॉंग्रेसच्या पाठीशी उभं करण्याचं काम साहेब करू लागले. बहुसंख्य प्रस्थापित शेतकरी वर्ग हा शे. का. पक्षाकडे आकृष्ट झालेला होता. या वर्गाला कॉंग्रेसच्या बाजूनं वळविण्याचं काम साहेब करू लागले. काही शे. का. पक्षातील नेतेमंडळी आतून साहेबांसोबत संधान बांधून होती. एके दिवशी साहेबांना निवांत वेळ होता.

मीच त्यांना विचारलं, "अहो, आपण एकदा फलटण आणि करडला जाऊन येऊत. आईचे आणि चंद्रिकाताईचे सारखे निरोप येत आहेत एकदा येऊन जा म्हणून."

"हे बघ वेणू, तू बघतीच आहे माझी धावपळ. घडीची फुरसत नाही. तुझ्याकडे लक्ष द्यायलाही सवड मिळेना मला. तू असं कर - एकटी जाऊन ये." साहेब.

"मी गेले असते हो एकटी, पण..." मी.

"पण काय? मला सांगण्यासारखं नाही का?" साहेब.

"तसं नाही काही. तुम्ही घरातील कर्ते आहात. तुम्हीच ही जबाबदारी पार पाडावयास पाहिजे." मी.

"कुठली जबाबदारी म्हणतेस तू?" साहेब.

"अहो, माझा भाऊ बाबासाहेब. त्याचं लग्नाचं वय झालंय. त्याचं लग्न नको का करायला? तुम्ही लक्ष नको का घालायला?" मी.

"वेणू, तू, चंद्रिकाताई आणि दादासाहेब जगताप यांनी बाबासाहेबच्या लग्नाबद्दल काय निर्णय घ्यायचा तो घ्या. माझी संमती राहील." साहेब.

"हे झालं बाबासाहेबांच्या बाबतीत. आपल्याही लेकी आता उपवर झाल्या म्हटलं... त्यांचं नको का बघायला? आई सारख्या निरोप पाठवताहेत मला - एकदाचं या मुलींना उजवून टाका म्हणून." मी.

"अरे हो, माझ्या लक्षातच नाही. बरं झालं तू आठवण करून दिली. तू असं कर, फलटणला जाऊन बाबासाहेबांचं लग्न जमवून ते पार पडलं की, लगेच कराडला जा. आईच्या मनासारखी स्थळं बघ. तुला व आईला मुलं पसंत पडल्यानंतर माझ्या पसंतीचा प्रश्न येतोच कुठे? दोघींचंही लग्न करून टाकू." साहेब.

साहेबांची परवानगी घेऊन मी फलटणला पोहोचले. आम्ही चौघी बहिणी, चंद्रिकाताईचे यजमान दादासाहेब जगताप एकत्र बसून चार-पाच स्थळांच्या बाबतीत विचारविनिमय केला. त्यापैकी एक मुलगी बाबासाहेबला पसंत पडली. कराडहून आई, सोनूताई आणि सर्व पुतण्या-पुतणे लग्नाला आले. चव्हाण आणि मोरे कुटुंबांनी घर कसं भरल्यासारखं वाटत होतं. आम्ही लग्नाची काढलेली तारीख साहेबांना सोयीची नव्हती. बाबासाहेबाचं लग्न मोरे घराण्याच्या इभ्रतीला शोभेल असं पारं पडलं. आई, सोनूताई व मुलं चार दिवस फलटणला राहून कराडला परतली. मी आल्यागेल्या सर्व पाहुण्यांचा पाहुणचार पार पाडून त्यांना वाटी लावत होते. सर्वांचे मानपान येथोचित केले.

चंद्रिकाताई व दादासाहेब यांचा निरोप घेऊन मी कराडला आले. कराडला पोहोचल्यावर घाटगे आणि कामेरीचे जाधव यांना निरोप पाठवून बोलावून घेतले. त्यांच्या साहाय्यानं वर संशोधन सुरू केलं. आई सांगायच्या - अमुक अमुक गावचे पाहुणे सोईरपणासाठी चांगले आहेत. तिथे वर असेल तर त्या ठिकाणी मुलगी द्यावयास हरकत नाही. सुधा आणि लीला सारख्या माझ्या आजूबाजूला काकी.. काकी.. करत घुटमळत. मी, आई व मुलींच्या मामांनी मिळून ज्ञानोबा व गणपतरावांच्या लेकी सुधा आणि लीला यांचे विवाह जमविले. दोघी लेकींचं कन्यादान साहेबांनी केलं. दोन्ही लेकींचे विवाह पार पाडल्यानंतर शामराव पवार व दिनकरराव कोतवाल यांच्या विवाहासंबंधी घरात चर्चा सुरू झाली. साहेबांनी या दोघांच्या विवाहाबाबत एक-दोन ठिकाणी बोलणी केली. साहेबांच्या प्रयत्नाला यश आलं.

चार-पाच महिन्यांच्या अंतरानं या दोघांचे विवाह पार पडले. दादा आणि राजाला सोबत घेऊन साहेब पुण्याला गेले. त्यांची पुणे इथे मॉडर्न हायस्कूलच्या वसतिगृहात राहण्याची व्यवस्था केली. दोघंही या शाळेत मजेत शिक्षण घेऊ लागले. अशोकला मात्र साहेबांनी ठाण्यातील आचार्य भिसे यांच्या शारदा आश्रमात दाखल केलं. मुलांची शिक्षणाची व्यवस्था झाल्यानंतर मी चार-सहा दिवस कराडला राहिले. आईला मुंबईला घेऊन जावं असा मी विचार केला; पण आईच्या मनाची तयारी होत नव्हती. सोनूताईही आईला पाठवावयास तयार नव्हत्या. माझ्यापेक्षा त्यांचा अधिकार

आईवर जास्त होता. सोनूताई या आईची भाची. साहेबांवरील जबाबदारी त्यांच्या सहकार्यानं पार पाडून मी मुंबईला परतले.

साहेब इकडे भाषावार प्रांतरचनेच्या कार्यात गुंतले होते. आंध्र प्रांत निर्माण झाल्यानं भाषावर प्रांतरचनेच्या मागणीचा जोर वाढू लागला. दिल्लीतील श्रेष्ठींच्या हे लक्षात आलं की, भारत एकसंध राहण्याच्या व विकासाच्या दृष्टीनं भाषावर प्रांतरचना करणं अनिवार्य आहे. त्यादृष्टीनं केंद्रानं पहिलं पाऊल उचललं ते १९५३ च्या डिसेंबरमध्ये - राज्य पुनर्रचना कमिशन नेमून. या कमिशनची रचना त्रिसदस्यीय होती. त्यात उच्च न्यायालयाचे न्यायाधीश फाजल अली, डॉ. हृदयनाथ कुंझरू आणि डॉ. के. एम. पण्णीकर यांचा समावेश होता. राज्य पुनर्रचना कमिशन मार्च ५४ मध्ये महाराष्ट्राला भेट देणार होतं. या राज्य पुनर्रचना कमिशनसमोर आपली बाजू एकमुखानं मांडावी याकरिता महाराष्ट्रातील सर्वपक्षीय नेत्यांची संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यात आली. या संयुक्त महाराष्ट्र परिषदेत मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळातील साहेब व हिरे यांचा समावेश होता. राज्याच्या प्रश्नांचा निपटारा करण्यासाठी मोरारजी देसाईंनी साहेबांना विश्वासात घेतलं होतं. साहेबांनी आपल्या कार्यकुशलतेनं सरकारची व पक्षाची घडी व्यवस्थित सावरली होती. हिरे यांच्या धरसोडवृत्तीमुळं मोरारजी हिरे यांना नकळत डावलण्याच्या प्रयत्नात असत. १९५४ ते १९५६ हा काळ साहेबांच्या राजकीय आयुष्यातील अग्निपरीक्षेचा काळ म्हणून मी त्याची नोंद करील. या संघर्षात साहेबांनी जी भूमिका घेतली तिनं साहेबांचं भविष्य घडविलं. राजकीय जीवनातून उखडून टाकण्याच्या प्रयत्नात काही असंतुष्ट मंडळी कामास लागली. साहेबांचं राजकीय नेतृत्व जन्माला येण्यापूर्वी गर्भातच खुडून टाकावं याकरिता स्वपक्षीय विरोधकांचं एकमत झालं.

संयुक्त महाराष्ट्र परिषदेवर काँग्रेसतर्फे शंकरराव देव, साहेब, हिरे, गाडगीळ, डॉ. नरवणे हे काम पाहत होते. त्यांना विधानसभेचे सभापती कुंटे येऊन मिळाले. काँग्रेसच्या ध्येयधोरणाला धक्का न लागू देता ते या परिषदेवर काम करीत होते. विरोधी पक्षातर्फे डांगे, जेधे, द. रा. घारपुरे, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी, रिपब्लिकन पक्ष, शे. का. पक्ष इत्यादी या समितीत काम करू लागले. मोरारजी देसाईंनी या समितीला अपशकुन दाखविला. काकासाहेब गाडगीळ वगैरे मंडळी या कामात लक्ष घालू

लागल्यानं मोरारजींचं पित्त खवळलं. देवकीनंदन नारायण महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांना या पदावरून हटवून मोरारजी देसाईंनी दिल्लीतील काँग्रेस श्रेष्ठींकडून देवगिरीकरांची अध्यक्षपदी नेमणूक करून घेतली. देवगिरीकर महाराष्ट्र परिषदेवर होतेच. राज्य पुनर्रचना समितीला देण्यासाठी प्रभावी व सर्वस्पर्शी असा मसुदा तयार करण्याचं काम डॉ. धनंजय गाडगीळ यांच्याकडं देण्यात आलं. डॉ. गाडगिळांनी आपलं बुद्धिकौशल्य पणाला लावून निवेदनाचा मसुदा तयार केला. या निवेदनाच्या मसुद्यावर संयुक्त महाराष्ट्र परिषदेत सखोल अशी चर्चा झाली. सर्व सदस्यांनी डॉ. गाडगिळांची स्तुती केली. सर्वानुमते हा मसुदा मान्य करण्यात आला.

मार्च १९५४ ला राज्य पुनर्रचना समितीनं राज्यातील सर्व थरातील जनतेच्या भेटी घेतल्या. त्यांनी कामगार प्रतिनिधी, शेतकरी, व्यापारी, उद्योगपती, विचारवंत, बुद्धिजीवी, साहित्यिक, मध्यमवर्गाचं मनोगत ऐकून घेतलं. हजारो लोकांच्या मुलाखती घेतल्या. संयुक्त महाराष्ट्र परिषदेनं निवेदन देण्याचा दिवस ठरविला. परिषदेचे अध्यक्ष शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्याकरिता सर्व तयारी झाली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे नवे अध्यक्ष देवगिरीकरांनी आपली भूमिकी बदलली. त्यांचं म्हणणं होतं काँग्रेस पक्षातर्फे स्वतंत्र निवेदन द्यावं. समितीतील काँग्रेस पक्षाच्या सदस्यांनी मसुद्याला मान्यता दिलेली होती. काकासाहेब गाडगीळ, देव यांनी डॉ. धनंजय गाडगीळ यांची तळी उचलून धरली. देवगिरीकरांच्या या भूमिकेबद्दल काँग्रेस सदस्य संभ्रमात पडले. देवगिरीकरांनी निवेदन देण्यासाठी जाणाऱ्या प्रतिनिधी मंडळात सहभागी होण्याचं नाकारलं. हा दुसरा अपशकुन संयुक्त महाराष्ट्र परिषदेला देवगिरीकरांनी दाखविला. देवगिरीकरांनी स्वतंत्र चूल मांडून एक स्वतंत्र निवेदन तयार केलं. स्वतंत्र निवेदन देण्याचा ठराव प्रांतिक काँग्रेसमध्ये पास करून घेतला. बापूसाहेब गुप्ते, व्यंकटराव पवार, मोरोपंत जोशी यांना आपल्यासोबत घेऊन राज्य पुनर्रचना समितीला स्वतंत्र निवेदन दिलं. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत दुहीचं बीज पेरण्याचं काम देवगिरीकरांनी केलं. पुढे संयुक्त महाराष्ट्र परिषदेत जे मतभेद निर्माण झाले त्याला देवगिरीकरांची ही खेळी कारणीभूत ठरली.

राज्य पुनर्रचना समिती २० ऑगस्ट १९५४ ला पुण्यात आली असताना त्यांच्या निमंत्रणावरून देव, डॉ. गाडगीळ आणि हिरे यांनी

त्यांची भेट घेतली व चर्चा केली. फजल अली यांचा कल मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूनं असल्याचं मत देव, डॉ. गाडगीळ आणि हिरे यांचं झालं होतं. राज्य पुनर्रचना समितीचा अहवाल जेव्हा हळूहळू बाहेर येऊ लागला तो आश्चर्यजनक असा होता. फजल अली यांनी महाराष्ट्राच्या त्रिकुटाला जी टिप्पणी वाचून दाखविली होती ती वैयक्तिक टिप्पणी होती. समिती सदस्य अंतिम अहवाल लिहावयास बसले असतील तेव्हा फजल अली यांचं वैयक्तिक मत मान्य करण्यात आलं नसेल. हिरे यांनी अकांडतांडव करून नेहरूजींपर्यंत आपली कैफियत मांडली. गुजराथी नेत्यांच्या दबावाला बळी पडून राज्य पुनर्रचना समितीनं आपला अहवाल फिरविला, असं नेहरूंजींना सांगण्यात आलं. अंतिम अहवाल प्रत्यक्षात जाहीर झाला तेव्हा नेहरूजींनाही आश्चर्याचा धक्का बसला. राज्य पुनर्रचना समितीनं मुंबई तर महाराष्ट्रापासून वेगळी केलीच; परंतु त्याबरोबर महाविदर्भ स्वतंत्र राज्याचीही सूचना केली. राज्य पुनर्रचना समितीनं महाराष्ट्राच्या त्रिकुटाला तोंडघशी पाडलं. महाराष्ट्राच्या नेत्यांच्या दिल्लीला खेट्या सुरू झाल्या. राज्य पुनर्रचना समितीच्या व अहवालाच्या विरोधात मुंबईत वातावरण तापू लागलं. याच वेळेस १३,१४ ऑक्टोबर १९५५ ला कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक या अहवालावर चर्चा करण्यासाठी बोलावण्यात आली. या बैठकीत नेहरू, पंत, आझाद आणि ढेबर यांची समिती नेमण्यात आली. मुंबई व मुंबईसारखे जिथे कुठे वाद असतील त्याचा अभ्यास करून त्यावर तोडगा काढून हा वाद मिटविण्याचं काम या समितीवर सोपवण्यात आलं. या बैठकीत असाही ठराव पास करण्यात आला की, कॉंग्रेसजनांनी राज्य पुनर्रचनेच्या आंदोलनापासून स्वत:ला दूर ठेवावं, इतर कुठल्या पक्षाशी किंवा गटाशी कॉंग्रेसजनांनी हातमिळवणी करता कामा नये, असा दंडक घालण्यात आला. महाराष्ट्रातील कॉंग्रेस नेते संयुक्त महाराष्ट्र परिषदेत कार्यरत होते. त्यांच्यावर या ठरावानं बंधन घालण्यात आलं. संयुक्त महाराष्ट्र परिषदेतून बाहेर पडावं, असा अर्थ या ठरावातून सूचित होत होता.

साहेब, कुंटे, देव, देवगिरीकर व काकासाहेब गाडगीळ यांना चर्चेसाठी श्रेष्ठींचं दिल्लीहून बोलावणं आलं. १७ ऑक्टोबरला नेहरूंसोबत या प्रतिनिधींची चर्चा झाली. या शिष्टमंडळात डॉ. नरवणे व हरिभाऊ पाटसकर सामील झाले. शिष्टमंडळानं फजल अली अहवालाबद्दल महाराष्ट्राची नाराजी

व्यक्त केली. महाराष्ट्रावर कसा अन्याय झाला हे नेहरूजींच्या निदर्शनास आणून दिलं. नेहरूजींनी या अहवालाकडं व्यापकतेच्या दृष्टीनं पाहावं असं सूचित केलं. या अहवालामुळं आपण सर्वजण कसे अडचणीत सापडलो आहोत याबद्दल माहिती दिली. 'आताच तुमच्या मनात जो विचार आहे तो मला मान्य करता येणार नाही. वातावरण निवळल्यावर यावर विचार करता येऊ शकतो' असे नेहरू म्हणाले.

नेहरूजींच्या या वक्तव्यानं देव हुरळून गेले. आझाद हे त्रिराज्य म्हणजे मुंबई, महाराष्ट्र व महाविदर्भाच्या बाजूचे होते. मुंबईचं स्वतंत्र राज्य करण्याच्या विरोधात नेहरूजी होते. नेहरूजींच्या मनात बदल झाल्याचा अंदाज महाराष्ट्राच्या शिष्टमंडळानं काढला. पंत यांच्या निवासस्थानी दि. १८ ऑक्टोबरला बैठक झाली. महाविदर्भानं महाराष्ट्रात विलीन व्हावं याकरिता त्यांचं मन वळविण्यात यावं यावर बैठकीत चर्चा झाली. ठोस असा कुठलाही निर्णय झाला नाही. दुसऱ्या दिवशी पंत यांच्या निवासस्थानी जाताना देव आणि गाडगीळ हे एकमेकांच्या कानाला लागले. या दोघांची आपापसांत काही कुजबूज चालू होती. हा दिवस होता १९ ऑक्टोबरचा. डावपेचात कमकुवत असलेल्या या दोन्ही नेत्यांनी द्वैभाषिक राज्याचा पर्याय स्वीकारण्याचं ठरविलं होतं. प्रथम ही कल्पना देवांनी बोलून दाखविली. काकासाहेबांनी आपल्या खिशातून चिठ्ठी काढून देवांना दाखविली. त्या चिठ्ठीत द्वैभाषिक स्वीकारण्याबद्दलची कल्पना लिहिलेली होती. देव यांनी हिरे यांना बोलावून घेतले. हिरे देवांचे आदेश शिरसावंद्य मानत. देव, हिरे, गाडगीळ व कुंटे यांची एक बैठक झाली. या बैठकीत द्वैभाषिकाबद्दल चर्चा झाली. कुंटे यांनी असला कुठलाही पर्याय आपण सुचवू नये असं मत व्यक्त केलं; पण हिरे यांनी आपलं मत बदललं. ते देवांच्या मताशी सहमत झाले. आपण संयुक्त महाराष्ट्र या मताशीं प्रामाणिक राहावं, असं मत कुंटे यांनी व्यक्त केलं. शेवटी काय निर्णय घ्यायचा तो सर्व प्रतिनिधींना विश्वासात घेऊन घ्यावा, आपण चौघांनी घेऊ नये असं ठरलं.

दिल्लीत श्रेष्ठींशी चर्चा करण्याकरिता आलेल्या प्रतिनिधींची हरिभाऊ पाटसकर यांच्या निवासस्थानी बैठक घेण्यात आली. या बैठकीस चिंतामणराव देशमुख आले. देव आणि गाडगीळ या जोडगोळीनं द्वैभाषिक राज्याची योजना या प्रतिनिधीसमोर मांडली. या जोडगोळीचा प्रस्ताव ऐकून साहेब

व देवगिरीकर चक्रावून गेले. साहेबांचा राग अनावर झाला. साहेब गोंधळून गेले. त्यांना काहीच सुचेना. रागाच्या भरात साहेबांनी देव यांना सुनविण्यास सुरुवात केली.

म्हणाले, "तुम्ही आमचा विश्वासघात करीत आहात. आम्हाला व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीला अंधारात ठेवून हा पर्याय तुम्ही श्रेष्ठींसमोर कसा मांडता? तुम्ही जर या पर्यायावर ठाम असाल तर मी शिष्टमंडळात न येता मुंबईला जाणं पसंत करील."

मौलाना आझाद यांच्या निवासस्थानी द्वैभाषिकाच्या पर्यायावर बोलणार नाही, असा शब्द देवांनी साहेबांना दिला. तो त्यांनी पाळला नाही. तो प्रश्न आझादांसमोर देवांनी मांडला. देवगिरीकर आणि गाडगिळांनी साहेबांना आवरलं. आपल्यात मतभेद आहेत हे श्रेष्ठींच्या लक्षात येऊ नये म्हणून साहेबांनी स्वत:वर ताबा ठेवला. नेहरूजी या चर्चेच्या वेळी उपस्थित नव्हते. काही महत्त्वाच्या कामासाठी बाहेर निघून गेले. काँग्रेस कार्यकारिणीच्या उपसमितीनं चर्चा केली. स्वत:ला बांधून घेण्याचं टाळलं. चर्चा निष्फळ ठरली. महाराष्ट्राच्या शिष्टमंडळाची दिल्लीनं बोळवण केली. महाराष्ट्राच्या जनतेला उत्तर काय देणार? या विवंचनेतच नेतेमंडळी मुंबईला परतली.

त्रिराज्य योजना अमलात आणल्यास सर्वांचं समाधान होईल, असं नेहरूजींना वाटायचं. काँग्रेस कार्यकारिणीही या मताशी सहमत होती; पण गुजरात मुंबईवरील हक्क सोडावयास तयार नव्हता. स्वतंत्र महाविदर्भ महाराष्ट्रास मान्य नव्हता. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र काँग्रेस श्रेष्ठींना मान्य नव्हता. नेहरूजींची अनुकूलता होती; पण काही वेळ जाऊ द्यावा लागेल असं त्यांचं मत होतं. यातून एकच अर्थ महाराष्ट्र नेत्यांनी काढला - नेहरूजी कुणाच्याही दबावाला बळी पडले नाहीत. द्वैभाषिक राज्याची वासलात दिल्लीतच लागली होती.

देव यांना आपल्या द्वैभाषिक राज्याच्या प्रस्तावाच्या बाजूने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची ताकद आहे हे दाखवायचं होतं. त्यांच्या आग्रहाखातर ऑक्टोबरच्या २० व २१ तारखेला पुणे येथे बैठक व सभा झाली. द्वैभाषिक राज्याचा मूळ ठराव काकासाहेब गाडगिळांनी काँग्रेस कार्यकारिणीसमोर मांडला. या ठरावास पाठिंबा देण्याचे काम साहेबांनी पार पाडले. याबाबतीत साहेबांचे मतपरिवर्तन कसे झाले याबद्दल अनेकांनी शंकाकुशंका व्यक्त

केल्या. ठरावाला उपसूचना मांडण्याचा उद्योग काहींनी करून पाहिला; पण त्या फेटाळण्यात आल्या. मूळ ठराव कार्यकारिणीनं पास केला. या बैठकीला विदर्भातून रामराव देशमुख व मराठवाड्यातून रामानंद तीर्थ हजर होते. सर्वसाधारण सभेत ठरावाच्या समर्थनार्थ देव, हिरे आणि स्वामी रामानंद तीर्थ यांची भाषणं झाली.

साहेबांनी या ठरावाला पाठिंबा देण्यामागची आपली प्रांजळ भूमिका समोर मांडली. संयुक्त महाराष्ट्राबद्दलची तळमळ साहेबांच्या भाषणातून व्यतीत होत होती. हे भाषण करतेवेळी साहेब मोरारजी देसाईंच्या मंत्रिमंडळात एक जबाबदार मंत्रीही होते. सत्तेची लालसा बाळगणाऱ्यांपैकी साहेब नव्हते. साहेबांनी प्रथम तोफ डागली ती गुजराथी मनोवृत्तीवर.

म्हणाले, "मुंबईवरचा हक्क गुजरात सोडत नसेल तर तो त्यांचा स्वातंत्र्यावरील नवा वसाहतवाद ठरेल. ब्रिटिशांचा वसाहतवाद आम्ही मोडून काढला. गुजरातच्या दबावाला आम्ही बळी पडलो तर हा नवीन वसाहतवाद आम्ही स्वीकारला असा अर्थ आमची भावी पिढी काढेल. ती आम्हाला माफ करणार नाही. आम्हाला हा वसाहतवाद झुगारून द्यावयाचा आहे; पण शांततेच्या मार्गानं, समजुतीच्या मार्गानं. नेहरूजींचं मनपरिवर्तन करून आम्ही संयुक्त महाराष्ट्र मिळविणार आहोत."

साहेबांच्या या घणाघाती भाषणानं सभेतील साहेबांचे पाठीराखे आणि छुपे विरोधक अचंबित झाले. साहेबांवर करण्यात येत असलेल्या प्रत्येक आरोपाचा समाचार साहेब शब्दास्त्राने घेत होते. साहेबांनी सत्तेला चिकटून न राहता राजीनामा देऊन मंत्रिमंडळातून बाहेर पडलं पाहिजे असा मानभावी सल्ला रँ. परांजपे यांनी दिला. त्यांचं नाव न घेता साहेबांनी मर्मभेदक शब्दास्त्रांनी त्यांना घायाळ केले.

म्हणाले, "महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीनं सदसद्विवेकबुद्धीला अनुसरून मला राजीनामा देण्याचा आदेश द्यावा. मी क्षणाचाही उशीर करणार नाही. कारण मी काँग्रेसचा शिपाई आहे. माझा काही त्याग यापाठीमागे आहे. पण कुणाच्या सांगण्यावरून जर मला राजीनाम्याचा आदेश देत असतील तर मी या आदेशाला कचऱ्याच्या टोपलीचा रस्ता दाखवील. आम्ही छातीवर गोळ्या झेलून इथपर्यंत आलो आहोत. घरावर तुळशीपत्र ठेवून रानोमाळ भटकलो, उपाशीतापाशी रात्र-रात्र जागून काढल्या, जनतेच्या

संकटकाळी जीवाची पर्वा न करता त्यांच्या मदतीला धावून गेलो. घरात बसलो नाही. विरोधी सत्तेशी लागेबांधे असलेल्यांनी तरी आम्हाला असा सल्ला देण्याच्या भानगडीत पडू नये व तसा त्यांना अधिकार नाही.''

रँ. परांजपेंच्या पिलावळीत चुळबूळ सुरू झाली. काहींनी सभेतून काढता पाय घेतला. साहेब भाषण संपवून आपल्या जागेवर बसले. साहेबांच्या विचारानं भारावलेल्या तरुण मंडळीनं साहेबांच्या भोवती गर्दी केली. साहेब सर्वांना भेटू लागले. त्यांची ख्यालीखुशाली विचारू लागले. आठ तासांच्या चर्चेनंतर सभेनं द्वैभाषिक राज्याचा ठराव संमत केला.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीनं जरी द्वैभाषिक राज्याच्या मान्यतेचा ठराव घेतला असला तरी गुजरात प्रदेश काँग्रेसनं मुंबई राज्यातील गुजराती भाग, कच्छ, सौराष्ट्र यांचं मिळून एक राज्य करावं असा ठराव पास केला. आंध्र राज्य झाल्यानं मराठवाड्यातील जनतेनं महाराष्ट्रसोबत राहण्याचा ठराव पास केला. नागपूर प्रदेश काँग्रेसनं महाविदर्भाचं स्वागत केलं. उलट मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांचा समावेश महाविदर्भात करावा असा ठराव पास केला. मुंबई प्रदेश आणि कॉर्पोरेशनच्या बाबतीत स. का. पाटील यांनी वेगळीच भूमिका घेतली. महाराष्ट्र काँग्रेसचा ठराव लोकशाहीविरोधी आहे, असे आपल्या अकलेचे तारे त्यांनी तोडले. मुंबई महानगरपालिकेत संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या बाजूचं बहुमत होतं. महानगरपालिकेनं संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेसाठी ठराव पास करून घेतला. स. का. पाटील यांची बोलती बंद केली. अशा तऱ्हेनं महाराष्ट्राचे लचके तोडण्यात येत होते.

महाराष्ट्रात अदूरदर्शीपणा ज्या नेतृत्वात ठासून भरलेला होता त्यांच्या हाती पक्षाची व सत्तेची सूत्रं होती. महाराष्ट्रात देव, देवगिरीकर पक्षसूत्रं सांभाळत होते तर गाडगीळ, देशमुख दिल्लीत सत्तेत होते. काँग्रेस श्रेष्ठी यांना खेळवत होती. यांना खेळवत असताना आपण महाराष्ट्रातील जनतेच्या भावनेशी खेळतोय याचं भान दिल्लीतील श्रेष्ठींना राहिलं नाही. महाराष्ट्र काँग्रेसनं आपली शक्ती द्वैभाषिक योजनेच्या पाठीशी उभी केली असली तरी त्यात एकवाक्यता नव्हती. देव द्वैभाषिकाचं चोंडकं वाजवीत होते तर देवगिरीकर त्रिराज्य योजना खिशात घेऊन मिरवत होते. काँग्रेस नेते संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर दुभंगलेल्या अवस्थेत चाचपडत वावरताना

दिसत असले तरी संयुक्त महाराष्ट्र परिषद हातावर हात ठेवून बसली नव्हती. विशाल द्वैभाषिकाच्या पर्यायाबद्दल त्यांच्या मनात साशंकता होती. ९० कामगार संघटनांचा मेळावा एस. एम. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली ५ नोव्हेंबर १९५५ ला आयोजित केला. या मेळाव्याचे उद्घाटन डांगे यांनी केले. या मेळाव्यात द्वैभाषिक राज्य संयुक्त महाराष्ट्रावर लादले गेल्यास मुंबईतील सर्व कामगार रस्त्यावर उतरतील, असा गर्भित इशारा देण्यात आला. १९ नोव्हेंबरला मुंबई विधानसभेत राज्य पुनर्रचनेचा अहवाल चर्चेला येणार होता. मिरवणुकीवर घातलेली बंदी मागे घ्यावी असं परिषदेनं सरकारला ठणकावून सांगितलं. कमगारांची मनं चेतविली गेली.

याच दिवशी मुंबई चौपाटीवर देव यांनी कामगारांची सभा घेतली. त्यांनी पंतप्रधानांचा लवाद मान्य करावा म्हणून कामगारांची मनधरणी केली. द्वैभाषिक राज्याच्या संदर्भात विवेचन केलं. देव आणि परिषदेत दुरावा निर्माण होत असतानाच परिषद सामान्य माणसाच्या भावना शिलगवण्यात यशस्वी होऊ लागली. सभा, मेळावे घेऊन जनमत परिषदेच्या पाठीशी उभं करण्यात परिषदेला यश येऊ लागलं. उलट काँग्रेसच्याच डॉ. नरवणे यांनी हजारो काँग्रेस कार्यकर्त्यांचा मोर्चा काढून काँग्रेसमधील फुटीला खतपाणी घातलं. दिल्लीची महाराष्ट्रावर खपा मर्जी झाली. नेहरूजींचा वर्किंग कमिटीतील रुद्रावतार पाहून महाराष्ट्राच्या धुरिणांची पाचावर धारण बसली. देवगिरीकरांचा आवाज कुणाला ऐकायला फुरसतच नव्हती. वर्किंग कमिटीनं त्रिराज्याचा ठराव पास केला. विरोधात मत नोंदविण्याची तरतूद नसल्यानं देवगिरीकरांना गप्प बसावं लागलं. परिषदेतील विरोधी पक्षातील सदस्यांनी या निर्णयाची चिरफाड केली. हरताळ पाळण्याचा घाट परिषदेच्या नेत्यांनी घातला. याची कुणकुण देवांना लागली. त्यांनी परिषदेच्या सदस्यांची मनधरणी केली.

परिषदेच्या सदस्यांनी देवांना सुनावलं, ''मोरारजींना बंदीहुकूम उठवण्याचं सांगा.''

नरे पार्कवर देवांनी कामगारांची सभा घेतली. त्यांच्या जीवनातील ही शेवटची सभा ठरली.

मामा देवगिरीकर त्रिराज्य योजनेच्या ठरावाचं चिठोरं खिशात घेऊन दिल्लीहून परतले. वर्किंग कमिटीचा निर्णय प्रदेश काँग्रेससमोर ठेवून पास

करून घेणं त्यांना क्रमप्राप्त होतं. १६ नोव्हेंबरला पुण्यात ही बैठक झाली. अपयशी मनोवृत्तीनं हा ठराव पास करून घेतला. तसेच मुंबई विधानसभेच्या बैठकीत काँग्रेस पक्षाच्या आमदाराचं धोरण काय राहील हेही ठरवणं निकडीचं होतं. या सभेत वर्किंग कमिटीनं मुंबई महाराष्ट्राला देण्याचा पुनर्विचार करावा असं सुचविलं. मुंबई, मध्य प्रदेश आणि आंध्रातील मराठी भाषिकांना एकत्र ठेवण्याच्या निर्णयाचं अभिनंदन केलं. मुंबई राज्य स्वतंत्र ठेवल्याबद्दल खेद व्यक्त केला. हे ठराव काकासाहेब गाडगीळ यांनी मांडले व या ठरावाला साहेबांनी अनुमोदन दिलं.

अनुमोदन देतानां साहेब म्हणाले, ''वर्किंग कमिटीचा निर्णय आम्ही पक्षशिस्त म्हणून स्वीकारत आहोत. मुंबईवरील आमचा हक्क आम्ही अबाधित ठेवला आहे. या निर्णयाचा पुनर्विचार करण्याकरिता आम्ही मोर्चे, बंद हा मार्ग न स्वीकारता 'हृदयपरिवर्तना'चा मार्ग स्वीकारणार आहोत. आम्ही स्वातंत्र्यप्राप्तीसाठी काँग्रेस विचाराच्या चौकटीत राहून झुंज दिली. त्यात आम्हाला यश मिळालं. संयुक्त महाराष्ट्राचा विचार फक्त तात्त्विक अंगानं करू नये. त्यामागील महाराष्ट्राच्या भावनांचा, त्यागाचा, बलिदानाचा विचार करणे आवश्यक आहे. आपल्यातील एकजूट आणि सहनशीलता पणाला लावून संयुक्त महाराष्ट्राचा लढा हृदयपरिवर्तनाच्या मार्गानं लढवू.'' साहेबांनी केलेलं विवेचन अनेकांना भावलं.

या ठरावानं विरोधी पक्षाचं समाधान झालं नाही. काँग्रेसच्या हृदयपरिवर्तनाच्या कार्यक्रमाला अव्यवहार्य ठरवून १८ नोव्हेंबरला बंदीहुकूम मोडून प्रचंड मोर्चा असेंब्लीवर धडकणार असल्याचं जाहीर केलं. या मोर्चाचं नेतृत्व सेनापती बापट यांनी स्वीकारलं. शेकडो सत्याग्रहींचा मोर्चा मुंबई असेंब्लीवर सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली येऊन धडकला. अत्रे, मिरजकर, सेनापती बापट यांनी बंदीहुकूम मोडीत काढून त्याचा भंग केला. मोरारजी देसाईंच्या आदेशाचं पालन पोलिसांनी केलं. पोलिसांनी या नेत्यांना अटक केली. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे रणशिंग फुंकले गेले.

मोरारजींनी १८ नोव्हेंबरला कायदेमंडळातील काँग्रेस पक्षाच्या सदस्यांची बैठक बोलावली. वर्किंग कमिटीनं त्रिराज्य निर्मितीचा घेतलेला निर्णय या बैठकीत सदस्यांसमोर मांडून पास करून घ्यायचा होता. वर्किंग कमिटीनं ठराव पास करताना मार्गदर्शक आदेशाचं पालन करण्याची तंबी दिल्यानं

ठरावाच्या बाजूनं किंवा विरोधात सदस्यांना मत व्यक्त करता आलं नाही. हिरेंनी एक निवेदन तयार करून ते वाचण्याची परवानगी मोरारजी देसाईंकडे मागितली. मोरारजींनी त्यांची मागणी फेटाळली. काँग्रेस १४३, गुजरात ९८, कर्नाटक ४७, मुंबई २७ असे बलाबल होते; पण बहुसंख्य सदस्य महाराष्ट्राच्या विरोधात होते. याच दिवशी मंत्रिमंडळाची बैठक झाली. बैठकीत ठराव फक्त वाचून दाखवण्यात आला. यावर चर्चा झाली नाही. चर्चा न झाल्यानं काही मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. हा ठराव मंत्रिमंडळाचा ठराव म्हणून मानण्यास काही मंत्र्यांची हरकत होती.

हिरे यांनी १९ नोव्हेंबरलां आपल्या निवासस्थानी एक बैठक बोलावली. या बैठकीत ठरावावर मत नोंदविण्यास बंदी घातल्यामुळं नाराज आमदारांनी राजीनामे देण्याचा विचार व्यक्त केला. या बैठकीला देव हजर होते. देव आणि डॉ. नरवणे यांनी हिरे यांची री ओढली. या बैठकीत राजीनामा देण्याच्या विचाराला साहेबांनी विरोध दर्शविला व त्यामागील आपली भूमिका स्पष्ट केली.

म्हणाले, "राजीनाम्याचा मार्ग आपण अवलंबू नये. यातून आपल्यातील बेबनाव श्रेष्ठीच्या निदर्शनास येईल व पक्ष कमकुवत होईल."

देवगिरीकरांना साहेबांचं म्हणणं पटलं. त्यांनी साहेबांना साथ दिली. त्यांची माहिती होती की, काँग्रेसमधील एक गट तटस्थ किंवा विरोधात जाण्याची शक्यता आहे. देरगिरीकरांच्या या विचारला नाईक-निंबाळकर, गणपतराव तपासे, साठे, बी. डी. देशमुख, मुस्तफा यांचा पाठिंबा होता. साहेबांनी पक्षातील दुफळीबद्दल मोरारजींना कल्पना दिली. पक्षाच्या एकजुटीकरिता काही मार्ग काढण्याकरिता प्रयत्न करण्याची गरज असल्याचं प्रतिपादन केलं. यादरम्यान दिल्लीहून पक्षात फूट टाळण्याकरिता ठरावावरील चर्चा पुढे ढकलावी असा आदेश दिला. मोरारजींनी या आदेशाचं पालन केलं.

कायमची तहकुबी मागताना मोरारजींनी श्रेष्ठीकडे मुंबईसंबंधी फेरविचार करण्याकरिता स्थगिती मागावी असं देव यांचं मत होतं. मोरारजी राजकारणातले दुधखुळे निश्चित नव्हते. साहेब, देवगिरीकर, हिरे यांनी याबाबत मोरारजींचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. याचदरम्यान श्रेष्ठींकडून मोरारजींना संदेश आला की, सदस्यांना या ठरावावर मत व्यक्त करू द्यावं; पण

विरोधात मतदान करता येणार नाही. काँग्रेसमधील गोंधळाच्या वातावरणात मोरारजींनी स. का. पाटील यांना हाताशी धरून चौपाटीवर सभेचं आयोजन केलं.

१८ नोव्हेंबरच्या घटनेनं मुंबईचं वातावरण तापलेलं होतं. सेनापती बापट, अत्रे, मिरजकर यांना झालेली अटक याचा निषेध म्हणून एस. एम. जोशी यांनी २१ नोव्हेंबरला संपूर्ण हरताळ पाळण्याचं आवाहन जनतेला केलं होतं. संयुक्त महाराष्ट्र परिषदेनं जनतेच्या मनावर अधिराज्य निर्माण केलं होतं. काँग्रेसमध्ये एकवाक्यता आढळून येत नव्हती. जनतेचं समाधान करणारी उत्तरं काँग्रेसकडे नव्हती. हिरे, देव यांची मुंबई, दिल्ली वारी निष्फळ ठरत होती. देवगिरीकर-गाडगीळ जोडी दिल्लीत श्रेष्ठींचं मतपरिवर्तन करण्यात गढून गेली होती. मोरारजी आणि स. का. पाटील यांची चौपाटीवरील सभा २० नोव्हेंबरला झाली. या सभेत मुंबईतील व मुंबईवर जीवापाड प्रेम करणारी जनता बहुसंख्येनं हजर होती. जनतेतून अनेक जिव्हाळ्याच्या प्रश्नांचा मारा होऊ लागला. या प्रश्नांच्या माऱ्यांनी मोरारजी हैराण झाले. जनतेच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं देण्यास हे दोन्ही नेते कमी पडू लागले. सभेचं वातावरण तापू लागलं. सभेत गडबड-गोंधळास सुरुवात झाली तरीही मोरारजींनी आपलं भाषण सुरूच ठेवलं.

म्हणाले, "सभेत धुडगूस घालून व गुंडगिरी करून तुम्ही माझं भाषण बंद करू शकाल; पण गुंडगिरीच्या दबावाला मी बळी पडणार नाही. या मार्गानं मी तुम्हाला मुंबई मिळू देणार नाही."

यावरून सभेत दगडफेक सुरू झाली. एका दगडानं मोरारजींचा कपाळमोक्ष केला. स. का. पाटील यांनी सभेत आगीत तेल ओतण्याचं काम केलं. त्यांनी 'मुंबई ५ हजार वर्षे महाराष्ट्राला मिळणार नाही' अशी मोहम्मद तुघलकी घोषणा आपल्या भाषणात केली. जनता पेटून उठली. आक्रमक होऊन व्यासपीठाच्या दिशेने धावली. पोलिसांच्या सुरक्षा कवचाच्या साहाय्यानं दोघांना मोटारीत बसविण्यात आलं. जनतेनं या दोघांच्या गाड्यांवर दगड, चपला व बुटांचा मारा केला.

संयुक्त महाराष्ट्र कृती समितीनं २१ नोव्हेंबरला हरताळ पाळण्याचा आदेश दिला होता. आदल्या दिवशीच्या सभेत मोरारजी देसाई व स. का. पाटील यांनी महाराष्ट्र जनतेच्या स्वाभिमानाला डिवचलं होतं. मुंबईतील

स्वाभिमानी जनतेनं स्वयंस्फूर्तीनं हरताळ पाळण्याचं ठरविलं. सकाळी हजारो लोकांच्या झुंडीच्या झुंडी असेंब्लीच्या दिशेनं निघाल्या. कुणी मार्गदर्शक नाही, कुणी नेता नाही. या जनसमुदायानं 'फ्लोराफाऊंटन' इथं जनसागराचं रूप धारण केलं. मोरारजी आणि स. का. पाटील यांनी काल केलेल्या वक्तव्याचा राग मनात होता. मोरारजींनी पोलिसांना मोर्चेकऱ्यांना अडविण्याचे व सर्वसामान्य जनतेला त्रास होणार नाही याची काळजी घेण्याचे आदेश दिले होते. शांततेचा भंग करणाऱ्यांना सक्तीनं निपटून काढा, असे अधिकारही पोलिसांना दिले.

पोलिस मोठ्या संख्येने फ्लोराफाऊंटन येथे हजर होते. त्यांच्या मदतीला होमगार्डची नेमणूक केली होती. जनतेचा रेटा वाढतच गेला. पोलिसांनी त्यांना थोपविण्याचा प्रयत्न केला. जनतेचा असंतोष, क्रोध अनावर झाला. त्यांनी पोलिसांवर चाल केली. पोलिसांना अश्रुधूर, लाठीचार्ज इत्यादी मार्गांचा अवलंब करावा लागला. गोळीबारानं एकएकाला टिपलं जाऊ लागलं. गोळीबारानं जनतेचे बळी घेतले जात आहेत अशी वार्ता असेंब्लीमध्ये पोहोचली. एस. एम. जोशी, नौशेद भरुचा, अमुल देसाई हे जनतेला सामोरे गेले. त्यांनी जनतेला थोपवलं. त्यांनी जनतेला 'तुम्ही चौपाटीवर चला, आम्ही तिथे येऊन सभा घेतो' असं आवाहन केलं. जनता चौपाटीकडं वळली. सभा शांततेत पार पडली. संयुक्त महाराष्ट्राचे नेते बनलेले देव किंवा हिरे जनतेला सामोरे जाऊ शकले नाहीत.

बाहेर मुंबई अशांत बनलेली असता कायदेमंडळात बसून चर्चा करणं साहेब, बाळासाहेब देसाई, देवगिरीकर आणि हिरे यांना चांगलं वाटलं नाही. त्यांनी मोरारजींना विनंती केली की, दिल्लीहून चर्चेला तहकुबी मिळवा. मोरारजींनी लगेच दिल्लीला मुंबईच्या परिस्थितीची कल्पना दिली. दिल्लीनं चर्चा तहकुबीला मान्यता दिली. २२ नोव्हेंबरला २४२ विरुद्ध २८ या फरकानं चर्चा तहकुबी मंजूर झाली. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १० जणांचा बळी घेतला. ३०० च्या वर लोक जखमी झाले. बंदुकीच्या ८० फैरी झाडण्यात आल्या. या घटनेचं आयतं कोलीत विरोधकांच्या हाती पडलं. त्यांनी जनतेला या अन्यायाच्या विरोधात पेटून उठण्याचं आवाहन केलं. चिथावणीखोर भाषा वापरून जनतेच्या भावनेला आव्हान दिलं.

द्विधा मन:स्थितीत काँग्रेसजन हिरे यांच्या निवासस्थानी एकत्र आले. श्रेष्ठींवर दबावतंत्राचा वापर कसा करावा याचा विचार करू लागले. कुंटे सभापती असूनही त्यांनी सर्व संकेत झुगारून या चर्चेत भाग घेतला. आपण महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या आदेशाप्रमाणे चालायचे की वर्किंग कमिटीच्या आज्ञा पाळायच्या याचा सोक्षमोक्ष लागला पाहिजे. हिरे यांनी आपल्याकडे ११६ राजीनामे आल्याची माहिती दिली. कुंटे यांनी हे राजीनामे सभापतींकडे पाठविण्याची सूचना मांडली. या सूचनेला देव आणि हिरे यांनी विरोध केला. 'सभापती आपल्याकडे आलेले राजीनामे स्वीकारून मंजूर करू शकतो' या सर्व वांझोट्या चर्चेचा सर्वांना उबग आला. त्यात साहेबांनी आपलं मत व्यक्त केलं.

म्हणाले, "मी राजीनामा देण्याच्या विरोधात आहे. आपण राजीनामे दिले तरी आपला उद्देश साध्य होऊ शकत नाही. कारण आपल्या बाजूनं बहुमत नाही. संयुक्त महाराष्ट्राला विरोध करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. राजीनामा देऊन हात दाखवत अवलक्षण करून घेऊ नये. मी असं ठरविलं आहे की, यापुढे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या काही पदाधिकाऱ्यांच्या मताप्रमाणे मला वागता येणार नाही. मी वर्किंग कमिटीच्या निर्णयाशी बांधील राहण्याचं ठरविलं आहे."

साहेबांच्या या भूमिकेनं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या वर्तुळात खळबळ उडाली. काहींनी साहेबांच्या वक्तव्याचं भांडवल करून आपल्या मनात साहेबांबद्दल जी असूया होती त्यांनी गरळ ओकण्यास सुरुवात केली. देवांचा स्वत:वरील ताबा सुटला. ते खासगीत साहेबांच्या विरोधात तिरस्कारानं बोलू लागले. तोल गेल्यानं तुच्छतापूर्वक वक्तव्ये करू लागले. देवगिरीकरांकडून ही माहिती साहेबांना समजताच साहेबांनी देवांना यापुढे कुठल्याच चर्चेच्या वेळी बोलवायचं नाही असं ठरवून टाकलं. देव आणि साहेब यांच्यात तेढ वाढत गेली. काँग्रेस अध्यक्षांचा लेखी आदेश नसताना केवळ भावनेच्या आहारी जाऊन राजीनामा देणे साहेबांना पटत नव्हते. साहेबांच्या या विचाराचा एक गट तयार झाला व भावनेच्या लाटेवर स्वार होऊन राजीनामा देणारा एक गट असं चित्र काँग्रेस पक्षात निर्माण झालं.

देवांनी आत्मशुद्धीसाठी केलेले ५ दिवसांचे उपोषण संपवून ते पंत यांच्याशी चर्चा करावयास हिरेंसोबत दिल्लीला गेले. सातारा जिल्हा काँग्रेस

समितीची बैठक फलटण येथील नाईक-निंबाळकर यांच्या मनमोहन राजवाड्यात १ डिसेंबरला आयोजित करण्यात आली. या बैठकीला साहेब, नाईक-निंबाळकर आणि तपासे हे मोरारजींच्या मंत्रिमंडळातील तीन मंत्री हजर होते. राजीनामा न देण्यामागची आपली भूमिका साहेब या बैठकीत मांडणार होते. झाडून सातारा जिल्ह्यातील पक्ष कार्यकर्ते या बैठकीस हजर होते. या बैठकीतील साहेबांचं भाषण साहेबांच्या भावी वाटचालीला दिशा देणारं ठरलं. त्यांनी या सभेत केलेल्या वक्तव्यामुळं हितसंबंधी लोकांनी साहेबांच्या विरोधात टीकेचं मोहोळ उठविलं. साहेबांच्या बोलण्याचा अर्थ आपल्या सोयीचा काढून साहेबांनां टीकेचं लक्ष्य बनविलं.

साहेब या सभेत म्हणाले, ''मी देव यांचे नेतृत्व मानीत नाही. मी आजपासून त्यांचं नेतृत्व झुगारून लावीत आहे. यापाठीमागे माझे काही वैयक्तिक विचार आहेत. एकतर देव हे या वेळी काँग्रेसचे साधे सभासद नाहीत. काँग्रेस पक्षाच्या आमदारांचे राजीनामे मागण्याचा त्यांना तसा अधिकार पोहोचत नाही. प्रदेश काँग्रेसचा राजीनामा द्या, म्हणून आदेश नाही. ही वस्तुस्थिती असताना त्यांचं नेतृत्व कशासाठी स्वीकारायचं हा माझ्यासमोर प्रश्न आहे. उपोषण, मोर्चे, हिंसाचार या मार्गांचा अवलंब करणे हे पक्षाच्या ध्येयधोरणात बसत नाही व तसा आदेशही नाही. देव यांच्या निर्णयामुळं राज्यात अस्थिरता निर्माण होत आहे. या अस्थिरतेचा फायदा विरोधी पक्षावाले उचलीत आहेत. आपण आपल्याच श्रेष्ठींच्या विरोधात काम करीत आहोत, असा याचा अर्थ निघतो. म्हणून मी म्हटले, मी वर्किंग कमिटीचे आदेश पाळेल. मी राजीनामा दिला नाही म्हणजे मी संयुक्त महाराष्ट्र या मागणीच्या विरोधात आहे असा अर्थ कुणी काढू नये. संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे; पण तो तुटक-तुटक नको. सर्व मराठी बांधव एका छताखाली यावयास पाहिजे ही माझी भूमिका आहे. हे मिळविण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत राहील. त्याकरिता हिंसेचा मार्ग मी पत्करणार नाही. श्रेष्ठींचं हृदयपरिवर्तन करूनच आपण आपल्याला पाहिजे तो महाराष्ट्र मिळवू शकतो. माझ्यावर असाही आरोप करण्यात येतो की, मला सत्तेची लालसा आहे. मला जर प्रदेश काँग्रेसनं राजीनामा मागितला तर तो मी तत्काळ द्यावयास तयार आहे. मी आतापर्यंत माझ्या आयुष्यात पक्षासाठी त्यागच करीत आलो आहे. यापुढेही करीत राहणार...

आज या सभेत जे मी बोलत आहे त्याची लेखी कल्पना हिरे आणि देव यांना दिली आहे. त्यांनी माझ्या या विचारांकडे कानाडोळा केला आणि दिल्लीला निघून गेले..''

याच सभेत साहेबांनी संयुक्त महाराष्ट्र व नेहरूजी यांच्यासंदर्भात आपलं वैयक्तिक मत व्यक्त केलं. त्याचं भांडवल स्वकीय व विरोधकांनी करून साहेबांना राजकीय जीवनातून उठविण्याचा आटापिटा केला. या वक्तव्यानंतर महाराष्ट्रात वादळ उठेल याची कल्पना साहेबांना होती. वक्तव्य करण्यापूर्वीच आपल्या भाषणात त्यांनी त्या वक्तव्याचं विश्लेषण केलं होतं.

साहेब संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतीत आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले, ''संयुक्त महाराष्ट्र की नेहरूजी? असा पेच माझ्यापुढे आला तर मी नेहरूजींनाच कौल देईल. हे वक्तव्य मी विचारपूर्वक करत आहे. यातून अनेकजण वेगवेगळे अर्थ काढतील; पण या पाठीमागची माझी भावना काय आहे ती आपल्यासमोर मांडणं माझं कर्तव्य समजतो. यातून एक अर्थ असा लावला जाईल की, मी नेहरूजींना महाराष्ट्रापेक्षा मोठा समजतो. म्हणजेच मी संयुक्त महाराष्ट्राच्या विरोधात आहे. या म्हणण्यामागचा माझा असा उद्देश आहे की, नेहरूजी हे भारताचे प्रतीक आहेत. महाराष्ट्र हा भारताचा एक भाग आहे. भारत राहिला तर महाराष्ट्र राहील. भारताचं अस्तित्व अमान्य केलं तर महाराष्ट्राला नाकारण्यासारखं होईल. महाराष्ट्र हा देश नाही तर भारत हा देश आहे. भारताच्या हितातच महाराष्ट्राचं हित सामावलेलं आहे. संयुक्त महाराष्ट्राबद्दल माझं मत यापूर्वीच मी व्यक्त केलं आहे. त्या वक्तव्याशी मी बांधलेला आहे. या महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या संदर्भात अनेक अंतर्गत प्रवाह कार्यरत आहेत. त्यांच्यापैकी काहींच्या कार्याबद्दल मला शंका येते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या आडून राज्यात अस्थिरता निर्माण करून वर्णवर्चस्वाचा हेतू साध्य करण्याच्या ध्येयानं ही मंडळी कार्यरत आहे. त्यापासून आपण सावध राहिलं पाहिजे असं मला वाटतं.''

फलटणच्या या सभेत साहेबांनी व्यक्त केलेल्या मताशी सहमती दर्शवीत लक्ष्मणशास्त्री जोशी, बाळासाहेब देसाई आणि किसनवीर यांनी साहेबांची पाठराखण करीत देव यांच्यावर हल्ला चढविला.

साहेबांच्या विरोधात पक्षातील विरोधकांना टीकेचं रान उठविण्यास संधी मिळाली. 'देशी वसाहतवाद' या वक्तव्यामुळं गुजराती नेत्यांच्या मनामध्ये साहेबांबद्दल अढी निर्माण झाली होती. ती दूर व्हावी म्हणून साहेबांनी असं सारवासारवीचं वक्तव्य केलं. र. के. खाडिलकर यांनी पत्रक काढून साहेबांनी महाराष्ट्राच्या पाठीत खंजीर खुपसला आहे, अशी साहेबांवर आगपाखड केली. साहेबांनी देवांचं नेतृत्व झुगारण्यापेक्षा हिरे यांच्या नेतृत्वाला धक्का दिल्याचं दु:ख भाई माधवराव बागल यांना झालं. साहेब हे स्वत:चेच हितसंबंध जोपासत आहेत, असा ठपका बागलांनी साहेबांवर ठेवला. काँग्रेसमधील बंडाळीला खतपाणी घालणाऱ्या मोरारजींना साहेब मदत करीत आहेत, अशी अफवा फलटणच्या बैठकीनंतर पसरविण्यात आली. त्यातूनच साहेबांना सूर्याजी पिसाळ-विश्वासघातकी म्हणून संबोधलं जाऊ लागलं. मोरारजी आपल्या मुख्यमंत्रीपदाचा गैरवापर करून मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना काँग्रेसमध्ये बेदिली माजविण्याकरिता वेठीस धरीत आहेत तसेच देव आणि हिरे यांचं नेतृत्व न मानण्यापाठीमागे मोरारजींचा हात आहे, अशी शंका निर्माण करण्यात येऊ लागली. त्यात स. का. पाटील यांनी साहेबांची भेट घेऊन अभिनंदन करण्याच्या आततायीपणानं साहेबांवर होत असलेल्या आरोपाला पुष्टी मिळाली.

देवगिरीकरांनी साहेबांच्या विधानाबद्दल प्रतिक्रिया देताना म्हटले, "देव यांच्याबद्दल चव्हाण यांचं मत बरोबर आहे; पण बोलण्याची ही वेळ नव्हे."

देवगिरीकर प्रांताध्यक्ष असताना त्यांना डावलून देव आणि हिरे यांनी श्रेष्ठींशी चर्चेची सूत्रं आपल्या हाती घेतली होती. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न प्रदेश काँग्रेसनं स्वतंत्रपणे हाताळावा या साहेबांच्या मताशी देवगिरीकर सहमत असावेत. महाराष्ट्रात एकजूट राहिली नाही असं श्रेष्ठींच्या लक्षात आलं. ते देव आणि हिरे यांना खेळवीत असल्याचा संशय पसरू लागला. देवगिरीकरांनी एक पत्रक काढून महाराष्ट्राच्या मागणीपाठीमागे प्रदेश काँग्रेस भक्कमपणे उभी आहे असं भासवलं.

राज्य पुनर्रचना समितीच्या अहवालावर १५ डिसेंबर ५५ ला लोकसभेत चर्चा झाली. देवगिरीकर आणि गाडगीळ या अहवालावर तुटून पडले. या दोघांचा अहवालावरील युक्तिवाद अभूतपूर्व ठरला. या युक्तिवादाचा परिणाम

लोकसभेवर दिसून आला नाही. अभ्यासपूर्ण युक्तिवाद करताना अनवधानानं 'हा प्रश्न लोक रस्त्यावर येऊन सोडतील' या वाक्यानं लोकसभेतील महाराष्ट्र विरोधी सदस्यांनी लोकसभेत गदारोळ माजविला. स. का. पाटील यांनी थयथयाट केला. तीच त्यांची जुनी मागणी उगळली - मुबई महाराष्ट्राला देता कामा नये. लोकसभेत राज्य पुनर्रचना समितीच्या अहवालावर फक्त चर्चा झाली. निर्णय काही झाला नाही. पं. पंत यांनी थातुरमातुर एक मार्ग काढला. देव, गाडगीळ व मोरारजींनी एकत्र बसून या प्रश्नावर निर्णय घ्यावा, असं उत्तराच्या भाषणात सांगितलं.

२२ डिसेंबर १९५५ ला मुंबई महानगरपालिकेत 'मुंबईचा समावेश महाराष्ट्रात करावा' असा ठराव पास करण्यात आला. हा ठराव राम जोशी यांनी मांडला आणि अनुमोदन दिलं आर. डी. भंडारे यांनी. ६३ मतांनी हा ठराव पास झाला. मुंबई काँग्रेसचा आदेश सदस्यांनी पायदळी तुडविला. स. का. पाटील यांच्या शिस्तभंगाच्या कारवाईला कुणी भीक घातली नाही. या सर्व घटनेमागे डॉ. नरवणे आहेत असं मोरारजींच्या मनात भरविण्यात आलं. डॉ. नरवणे यांनी दोन हजार कामगारांचा मोर्चा काढला होता तेव्हापासून ते मोरारजींच्या मनात सलत होते. डॉ. नरवणे यांना पेचात पकडण्याचं मोरारजींनी ठरविलं. डॉ. नरवणे यांनी यापुढे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात भाग घेणार नाही असं लेखी आश्वासन द्यावं किंवा मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा. डॉ. नरवणे यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा मोरारजींकडं दिला. त्यांनी तो मंजुरीकरिता राज्यपालांकडे पाठविला. राज्यपालांनी तो मंजूर केला. येथेच डॉ. नरवणे यांचा राजकीय बळी मोरारजींनी घेतला.

मुंबईच्या प्रश्नावर देव, गाडगीळ आणि मोरारजी या त्रिकुटानं एकत्र बसून मार्ग काढावा असं पंतांनी सुचविल्याप्रमाणे गाडगिळांना डावलून देव कामाला लागले. मोरारजी आणि देव यांची चर्चा मुंबईत २८ डिसेंबरला झाली. दोन-तीन बैठकांनंतर मोरारजींनी द्वैभाषिकांच्या पर्यायास मान्यता दिली. त्यात ५ वर्षांनंतर विभक्त होण्याच्या आटीस मान्यता दिली नाही. द्वैभाषिक राज्य मोरारजी मान्य करीत असतील तर या द्वैभाषिकाचं मुख्यमंत्रीपद मोरारजींकडे ठेवण्याचं या चर्चेत देवांनी मोरारजीस आमिष दाखविलं होतं. मुख्यमंत्रीपदाचा आडाखा मनात ठेवून मोरारजींनी द्वैभाषिक राज्यास

मान्यता दिली. बंगलोरहून दिल्लीला परत जाताना नेहरूंनी २९ डिसेंबरला दोन तास मुंबईत थांबून जी चर्चा केली त्या चर्चेतील सुगावा मोरारजींना लागला असावा. यासंदर्भात देवांनी हिरेंच्या निवासस्थानी काँग्रेसची बैठक घेतली. या बैठकीला डॉ. नरवणे, घारपुरे, देवगिरीकर, कुंटे, रामराव देशमुख, रा. कृ. पाटील व खुद्द साहेब हजर होते. देवांनी आपली योजना सर्वांसमोर मांडली. देवांच्या या योजनेबद्दल कुणीही राजी नव्हतं. गुजरात काँग्रेसमध्येही वेगळी अवस्था नव्हती.

संयुक्त महाराष्ट्र परिषदेलाही फुटीची लागण झाली. प्रजासमाजवादी आणि कम्युनिस्टांनी अलग-अलग चुली मांडल्या. एस. एम. जोशी यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कार्यकारिणीची बैठक तत्पर बोलवावी असा तगादा देवगिरीकर यांच्यामागे लावला. मुंबई अशांततेच्या ज्वालामुखीवर उभी होती. जनतेच्या रोषाचा उद्रेक केव्हा होईल याचा नेम नव्हता. देवगिरीकरांना बैठक बोलावण्यास वेळच मिळाला नाही. जानेवारी महिना मुंबईच्या जीवनात काळ म्हणून ठरला. अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख अडचणीत सापडले. हिरेंच्या उतावळ्या स्वभावामुळं दिल्लीत महाराष्ट्राचं हसं होऊ लागलं. मुंबईचं स्वतंत्र राज्य असावं की केंद्रशासित याबद्दलचा निर्णय होत नव्हता. हिरेंनी दिल्लीत चिंतामण देशमुखांची भेट घेतली. या भेटीत मुंबई हे स्वतंत्र राज्य करावं याबद्दल शब्द देऊन आले. चिंतामणराव देशमुखांनी ७ जानेवारीला पं. पंत यांची भेट घेतली. महाराष्ट्रातील हिरे यांची मुंबईबद्दलची भावना त्यांच्या कानावर घातली. पंतांचा यावर विश्वास बसेना. चिंतामण देशमुख सांगताहेत त्याअर्थी हिरेंचा निर्णय सत्य असावा. तरीही पंतांनी चिंतामण देशमुखांना महाराष्ट्रातील प्रतिनिधीचं मत वेगळं आहे याची कल्पना दिली. हिरे हे देवगिरीकरांसोबत जेव्हा दिल्लीला गेले तेव्हा देशमुखांना भेटले. मुंबईबद्दल मी असं म्हटलोच नाही, असं म्हणाले.

देशमुख चिडले व म्हणाले, "मला तुम्ही तोंडघशी पाडता आहात."

मुंबई केंद्र सरकार ताब्यात घेणार याची पुसटशी कल्पना विरोधी पक्षांना आली होती. त्याविरोधात जनआंदोलन उभं करण्याच्या कामात ते गुंतले होते. इकडे प्रदेश काँग्रेसनं १५ जानेवारीला एक बैठक बोलावली. हिरे या बैठकीला हजर होते; पण त्यांनी भाषण केलं नाही. या सभेत बऱ्याच वक्त्यांनी गाडगिळांकडे राजीनाम्याची मागणी केली. मोरारजी या

घटनेकडे बारीक लक्ष ठेवून होते. कायदा आणि सुव्यवस्था हाताबाहेर जाऊ नये म्हणून कडक पोलिस बंदोवस्त ठेवला. नेहरूजींनी मुंबईबद्दलची अधिकृत घोषणा आकाशवाणीवरून १६ जानेवारीला केली. त्याअगोदर काही तास मोरारजींनी धरपकड सुरू केली. घोषणा झाली त्या वेळी ४३५ लोकांना प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याखाली अटक केली. १२ नेत्यांना ते झोपेत असतानाच अटक करून त्यांची रवानगी नाशिकच्या तुरुंगात केली.

मुंबईबाबतचा निर्णय नेहरूजींनी जाहीर करताच मुंबईतील जनता रस्त्यावर उतरली. कुणी नेता नाही, कुणाचा आदेश नाही. मुंबईच्या प्रेमापोटी आपल्या सर्वस्वाची आहुती देण्याचा निर्णय घेऊन मुंबईतील जनता पेटून उठली. मुंबईत दंगल उसळली. लोकांनी कायदा हातात घेतला. गिरगाव, ठाकूरद्वार भागात जनतेच्या रागात ट्रॅम, बसगाड्या भस्मसात झाल्या. जनतेच्या या रागाला आवर घालण्यासाठी पोलिसांना पहिला गोळीबार या भागात करावा लागला. जमावावर हकनाक लाठीहल्ला, गोळीबार करून जनतेच्या भावना चिथविल्या. आठ दिवस दंगल सुरूच होती. मुंबई धुमसत होती. धरपकड, गोळीबार, लाठीहल्ले यांचा धुमाकूळ शहरभर पोलिस घालीत होते. पोलिसांनी शहरात दहशत निर्माण केली. हे आंदोलन शहरापुरतं मर्यादित न राहता त्याचे पडसाद पुणे, कोल्हापूरपर्यंत पोहोचले. दंगलीचे पडसाद मुंबईच्या गल्लीबोळात उमटताना दिसत होते. १७ जानेवारीला हरताळ पुकारला. या दिवशी मुंबईला युद्धभूमीचं स्वरूप आलं होतं. लोक पोलिसांच्या अंगावर ॲसिडबल्ब फेकत होते. पोलिसांचा गोळीबार सुरूच होता. काही भागात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली. मोरारजींनी मुंबईच्या परिस्थितीची कल्पना नेहरूजींना दिली. नेहरूजींनी असामाजिक उपद्रवी लोकांच्या तावडीतून मुंबई वाचविण्यासाठी सैन्याची मदत घेण्याचे आदेश दिले. मोरारजींनी सैन्याचा वापर केला नाही. या धगधगत्या मुंबईत कुणीही पुढारी जनतेसोबत नव्हता. लोक पोलिसांच्या गोळ्या छातीवर झेलीत होते. 'संयुक्त महाराष्ट्र' म्हणत दम तोडीत होते. बळींची संख्या वाढू नये म्हणून एस. एम. जोशी जनतेत घुसले. जनतेला शांत राहण्याची विनवणी करू लागले. चवताळलेल्या जनतेनं एका पोलिस अधिकाऱ्याला घेरलं. कदाचित जोशींनी त्या अधिकाऱ्यांची जनतेच्या तावडीतून

सुटका केली नसती तर जनतेनं त्या अधिकाऱ्याचा जीव घेतला असता. त्याचे प्राण वाचविले. प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांनी जनतेला वाऱ्यावर सोडून दिलं होतं. त्यांनी फक्त गुंडगिरीचा निषेध म्हणून एक पत्रक काढलं होतं.

कांगावेखोर मोरारजींनी या दंगलीचा संबंध स्त्रियांच्या अब्रूशी जोडला. गुजराती स्त्रियांवर गुंडांनी अत्याचार केले, गुजराती स्त्रियांची नग्न धिंड काढण्यात आली, असे त्यांच्यासारख्या नेत्याला न शोभणारे आरोप त्यांनी केले. हे सर्व आरोप खोटे होते. कारण कुठल्याच पोलिस स्टेशनला तशी तक्रार नोंदवलेली आढळली नाही. कुणी तक्रार करायला पुढे आले नाही. त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेली कपोलकल्पित घटना सांगितली. तीन महिलांना गुंडांनी विवस्त्र करून रस्त्यावर फरपटत ओढून नेलं. ही घटना मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली. यात सत्यता किती आणि असत्यता किती हे संयुक्त महाराष्ट्र समितीच्या महिलांनी संपूर्ण भागात फिरून गुजराती महिलांच्या भेटी घेतल्या. त्यांना एकाही महिलेनं अशी घटना घडल्याचं सांगितलं नाही. मुख्यमंत्री व गृहमंत्री ही दोन्ही पदे उपभोगणाऱ्या मोरारजींना या अन्यायाचा छडा का लावता आला नाही? म्हणजेच त्यांच्या म्हणण्यात सत्यता नव्हती. स्त्रियांच्या अब्रूला चव्हाट्यावर मांडून त्याआड लपण्याचा केविलवाणा प्रयत्न मोरारजी देसाईंनी केला. संयुक्त महाराष्ट्र समितीचं म्हणणं पोलिसांनी १०५ लोक ठार मारले. लालजी पेंडसे यांनी नावानिशी वर्तमानपत्रात यादी प्रसिद्ध केली. शासनातर्फे आकड्यांचा घोळ चालूच होता. कधी ६७ तर कधी ७५ लोक ठार झाले असं शासन सांगत होते. आकड्याचा घोळ काही जरी असला तरी शासनाने मराठी जनतेचे बळी घेतले होते हे सत्य आहे.

मोरारजींवर असेंब्लीत प्रतिनिधींनी आरोप केला की, तुम्ही आम्हाला विश्वासात न घेता गोळीबाराचा आदेश कसा दिला?

त्यावर मोरारजींनी उत्तर दिलं, "हा माझा आदेश नव्हता. तो पोलिस कमिशनरचा आदेश होता."

स्वतःच्या जबाबदारीवर पोलीस कमिशनर असा आदेश देऊ शकतो हे न समजण्याएवढी मराठी जनता दुधखुळी नव्हती. या सर्व घटनांची जाहीर चौकशी व्हावी, अशी मागणी केशवराव जेधे व काकासाहेब गाडगिळांनी केली. रावसाहेब पटवर्धनांनी उपोषणाचा मार्ग अवलंबिला तर देवगिरीकरांनी

चौकशीला विरोध केला. देवांनी नेहरूजींकडे नाराजी व्यक्त केली व आत्मशुद्धीसाठी ११ दिवसांचे उपोषण आरंभिले या उपोषणाबद्दल कुणालाच आस्था उरली नव्हती.

प्रथमच महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसनं केंद्र सरकाने घेतलेल्या मुंबईच्या निर्णयाच्या विरोधात ताठ कण्यानं उभं राहून राजीनामे देण्याची धमकी दिली. प्रदेश कॉंग्रेस कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीला लागूनच सर्वसाधारण सभा झाली. या बैठकीत मराठी मंत्र्यांनी राजीनामे दिले. सर्वांचे डोळे साहेबांच्या भूमिकेकडे लागले.

साहेब राजीनामा देताना म्हणाले, "आम्हाला अंधारात ठेवून महाराष्ट्राच्या काही धरसोडवृत्तीच्या प्रतिनिधींनी श्रेष्ठींना चुकीची माहिती दिली आणि मुंबईचा हा निर्णय आमच्यावर लादला. आम्हाला मुंबई पाहिजे आहे; पण मनं दुभंगलेली, उद्ध्वस्त झालेली मुंबई आम्हाला नको आहे. एकसंध मुंबई आम्हाला हवीय."

कुंटे यांची साहेबांबाबतची शंका दूर झाली. सर्व मराठी मंत्र्यांनी मोरारजी देसाईंकडे राजीनामे पाठवून दिले. मोरारजींनी राजीनामे मंजूर करण्याची तयारी केली होती. राजीनामे मंजूर केले तर महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी शिफारस केंद्राकडे करावी लागेल हे राज्यपाल हरेकृष्ण मेहताब यांनी मोरारजींच्या लक्षात आणून दिलं. वर्किंग कमिटीने २३ जानेवारीच्या बैठकीत असा निर्णय घेतला की, निवडणूक मंडळ व वर्किंग कमिटी यांच्या संमतीशिवाय कुणालाही राजीनामे देता येणार नाहीत. मोरारजींनी या निर्णयाचा आधार घेऊन कुणाचेच राजीनामे स्वीकारले नाहीत.

महाराष्ट्रातील नेते नेहरूजींची मनधरणी करण्यात व्यस्त होते. नेहरूजींनी या नेत्यांना सुनावले की, आम्ही हिंसेला आणि दहशतीला शरण जाणार नाही. चिंतामण देशमुखांनी अर्थमंत्रीपदाचा राजीनामा दिला. प्रदेश कॉंग्रेसच्या दुटप्पीपणामुळे महाराष्ट्र कॉंग्रेस लोकांच्या मनातून उतरली. मुंबईतील घटनेनं दिल्ली हादरली होती. पं. पंतांच्या मनात द्वैभाषिक राज्याचा विचार पुन्हा डोकावू लागला. ही योजना महाराष्ट्राला मान्य होती. गुजरातचा तेवढा विरोध होता. संयुक्त महाराष्ट्र परिषदेतून कॉंग्रेस बाहेर पडली. संयुक्त महाराष्ट्र परिषद संपुष्टात येऊन ६ फेब्रुवारी १९५६ ला संयुक्त महाराष्ट्र

समिती अस्तित्वात आली. ही बैठक टिळक स्मारक मंडळ, पुणे येथे झाली. काँग्रेसवाले अमृतसर येथे होणाऱ्या अ. भा. काँग्रेस अधिवेशनाकडे डोळे लावून बसले.

अमृतसरला जाऊन साहेबांना तीन-चार दिवस लोटले. त्यांचं पत्र कसं आलं नाही या विवंचनेत मी होते. फलटण येथील भाषणामुळं साहेबांच्या सुरक्षेबद्दल मला काळजी वाटू लागली. साहेबांना काही दगाफटका तर होणार नाही? अशी शंकाही मनात घर करू लागली. मी या विचारात असतानाच शिपाई एक पत्र माझ्या हातात देऊन गेला. मी उत्सुकतेनं ते पत्र उघडलं आणि वाचू लागले.

"माझा प्रवास सुखरूप झाला. सोबत वसंतदादा व बॅ. जी. डी. पाटील आहेत. देवगिरीकरही आमच्या डब्यातच होते. गप्पाटप्पा-चर्चेत वेळ कसा गेला हे कळलं नाही. मध्येच पत्त्याचा खेळ व्हायचा. दि. ८ ला काँग्रेस अध्यक्ष ढेबर यांना भेटून आमच्या राजीनाम्यामागील परिस्थिती स्पष्ट करून सांगितली. मंत्रीपदाचा राजीनामा देऊन आम्ही काँग्रेसच्या कामाला जास्त वेळ देऊ शकतो, जनतेची सेवा करू शकतो, असंही त्यांना सांगितलं; पण उपयोग झाला नाही. त्यांनी वर्किंग कमिटीचा निर्णय आमच्यासमोर मांडला. या प्रश्नामागील नेहरूजींच्या भावना सांगितल्या. काँग्रेसचा आदेश मानण्याखेरीज दुसरा मार्ग नाही, असे सुचविले.

राज्य पुनर्रचना प्रश्नामुळं वातावरणात गंभीरता अधिक भासली. मुंबईतील दंगलीमुळे कडक टीका करणारे अधिक भेटतात. आमच्या प्रांतासंबंधीचे हे गैरसमज सर्व देशात फार खोलवर रुजले. ते दूर करण्याचे प्रयत्न करणे फार अगत्याचे व महत्त्वाचे आहेत. चहाच्या वेळी नेहरूजींची भेट घेतली. दहा-पंधरा मिनिटे मला बाजूला घेऊन ते माझ्याशी आत्मीयतेने बोलले. माझ्या राजीनाम्यामुळे त्यांचा गैरसमज झाला नाही, असं वाटलं. उलट ते म्हणाले, 'तुमची मन:स्थिती आणि अडचण मी समजू शकतो.' मुंबईबद्दल कष्टी होऊन बोलले. मुंबई शहर राज्य का म्हणून नाकारलं हे त्यांच्या बुद्धीला अजूनही पटत नाही, असेही ते म्हणाले. वादग्रस्त प्रश्न थोड्या सावकाशीने सोडावे लागतील. या पद्धतीने मुंबईचा प्रश्न सुटेल, असे ते म्हणाले. मुंबई महाराष्ट्रात जाऊ नये अशी माझी भावना नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. या त्यांच्या बोलण्यावरून वर्ष-दोन वर्षांत योग्य

वातावरण आणि संधी पाहून ते मुंबईचा निर्णय महाराष्ट्राच्या बाजूनं देतील, असा मी अंदाज काढला आहे. द्वैषिक राज्ये व्हावीत ही त्यांची प्रामाणिक इच्छा आहे.

मी त्यांना सर्व पुढारी आणि पक्ष वगळून प्रत्यक्ष महाराष्ट्रीय जनतेला आवाहन करायची विनंती केली तेव्हा ते गहिवरून म्हणाले. "हां, जरूर मी तसे करीन. दंगे गुंड करतात. सर्व जनतेला कोण दोष देईल? महाराष्ट्रीय जनता शूर आहे. माझं त्यांच्यावर प्रेम आहे."

साहेबांचं पत्र वाचून माझ्या मनाचं समाधान झालं. साहेब आणि नेहरूजींची भेट होऊन साहेबांनी आपलं मन त्यांच्याकडं मोकळं केलं तेही बरं झालं. विरोधक साहेबांविषयी नेहरूजींचं मन कलुषित करण्याच्या प्रयत्नात असणारच. अमृतसरच्या अधिवेशनावर राज्य पुनर्रचना योजनेची छाया सर्वत्र पसरली होती. शिखांचा लाखोंचा मोर्चा पंजाबी सुभ्यासाठी येऊन धडकला होता. साहेब आणि गाडगीळ यांनी महाराष्ट्राची बाजू प्रभावीपणे श्रेष्ठींसमोर मांडली. या सर्व वातावरणात नेहरूजींचं भाषण हृदयस्पर्शी व भावनात्मक झालं. देशाविषयीची तळमळ त्यांच्या वक्तव्यातून जाणवत होती. निराशेचा कुठलाही सूर त्यांच्या भाषणात आढळला नाही; परंतु देशाविषयीची चिंता मात्र जाणवली.

अमृतसरच्या अधिवेशनातून विचाराची ऊर्जा घेऊन प्रांतीय नेतेमंडळी परतली. महाराष्ट्राच्या भवितव्याच्या संदर्भात नेहरूजींनी काढलेल्या उद्गाराचा अर्थ साहेबांनी सकारात्मक काढला. आज ना उद्या नेहरूजी महाराष्ट्राला न्याय देणार याची खात्री साहेबांना पटली. समितीची वळवळ महाराष्ट्रभर सुरूच होती. जनता काँग्रेसच्या पुढाऱ्यांवर रोष व्यक्त करू लागली. त्यातही साहेब हे त्यांचं प्रमुख लक्ष्य होतं. हारतुऱ्यांनी साहेबांचं होणारं स्वागत आता शाप, शिव्या, गद्दार म्हणून होऊ लागलं. फुलांऐवजी दगडधोंड्यांचा वर्षाव होऊ लागला. या सर्व प्रसंगाला तोंड देण्याचं साहेबांनी ठरवलं. 'लोकप्रतिनिधीवर रागावण्याचा अधिकार जनतेला लोकशाहीमध्ये असतोच' हे तत्त्व मान्य करून साहेब काँग्रेसच्या विचाराची शिदोरी सोबत घेऊन मुंबईबाहेर पडले.

प. महाराष्ट्रात सांगलीच्या पंचक्रोशीत विरोधक आपला प्रभाव पाडू शकले नव्हते. वसंतदादांनी सांगलीला साहेबांची सभा आयोजित केली.

साहेबांनी त्या सभेला 'अमृतसर काँग्रेसचा संदेश' असं नाव दिलं. विरोधक सांगलीत काही गडबड करू शकत नव्हते. वसंतदादांच्या कार्यकर्त्यांची फौज कुठल्याही प्रसंगाला तोंड देण्यास सज्ज होती.

साहेब सांगलीला पोहोचले. साहेबांचं भाषण ऐकण्यासाठी सातारा, कोल्हापूरच्या जनतेची रीघ सांगलीकडे लागली. वसंतदादांनी सभेची जय्यत तयारी केली होती. या सभेतील साहेबांचं भाषण महाराष्ट्राच्या राजकारणाला नवी दिशा देणार याची खात्री कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली होती. तळागाळातील सर्वहरा वर्ग मिळेल त्या साधनांनी सांगलीची वाट धरून सांगली जवळ करीत होता. सांगलीचे सर्व रस्ते जनतेनं भरून सभास्थानाकडे वाहू लागले. सभा निर्विघ्न पार पडणार असं वातावरण सांगलीत तयार झालं. विरोधकांनीदेखील साहेबांचे विचार ऐकण्याचं ठरविलं असावं. या सभेत कुठलाच अडथळा विरोधकांनी आणला नाही. साहेबांनीही खुल्या मनानं भावना व्यक्त केल्या. महाराष्ट्राच्या राजकारणात आपली प्रतिमा एक फितूर, विश्वासघातकी म्हणून विरोधकांनी निर्माण केली आहे. त्या विधानाचा समाचार साहेबांनी मनसोक्त घेतला. आपल्या प्रत्येक कृतीमागे राष्ट्रभावना कशी ओतप्रोत भरलेली आहे असं ठणकावून सांगितलं.

म्हणाले, ''माझ्या कुठल्याही भाषणात मी मुंबई महाराष्ट्राला नको, असं कधीही आणि कुठंही म्हटलेलं नाही. मुंबईसाठी रक्तपात नको, एवढंच मी म्हणतो. मुंबई न मिळाल्याची जखम माझ्याही काळजात झाली आहे. ही जखम भरून काढण्यासाठी मी शांततेच्या मार्गाचा अवलंब करणार आहे. काँग्रेसमधून बाहेर पडून रस्त्यावर उतरण्याची भाषा विरोधक करीत आहेत. रस्त्यावर उतरून आमच्याच हातानं आमच्या बांधवांची घरं जाळायची आहेत का? यासाठीच आम्ही स्वातंत्र्य मिळविलं का? हा खरा प्रश्न माझ्यासमोर आहे. मला मुंबईसह महाराष्ट्र हवाय. त्याकरिता आयुष्याची आहुती द्यायला मी तयार आहे. ज्या शक्तीच्या जोरावर आम्ही स्वातंत्र्य मिळविलं त्या मार्गानं आम्हाला मुंबई मिळविणं अवघड नाही. त्या साधनाचा उपयोग करून आपलं ध्येय आपण साध्य करू, असं मी जनतेला सांगतो; पण जनता विरोधकांच्या भावनात्मक आवाहनाला बळी पडत आहे, फसत आहे. मी सत्तेत आलो ते सेवेचे व्रत घेऊन. याकरिता मी आयुष्यातील चाळीस वर्षे पणाला लावली आहेत. माझ्या राजकारणाची पाळमुळं जनतेच्या

हृदयात खोलवर रुतलेली आहेत. कुठलंही राजकीय वादळ मला उखडून टाकू शकत नाही. पालापाचोळ्यासारखा मी वादळात उडून जाणार नाही. कारण माझ्या राजकारणाचं झाड कृष्णा-कोयनेच्या भूमीत त्याग, श्रम, देशसेवेचं समर्पित जीवनाचं सिंचन करून वाढविलं आहे. त्याला कुठलाही सोसाट्याचा वारा हलवू शकत नाही. मी माझ्या मूळ मुद्द्याकडे वळतो. मी फलटणच्या सभेत काय म्हणालो? ज्या महामानवांनी आम्हाला स्वातंत्र्य मिळवून दिलं त्यांच्या प्रती मी माझ्या निष्ठा वाहिल्या तर माझ्यावर नाही नाही ते आरोप करून मला इतिहासातील खलपुरुष ठरविण्याचा उद्योग या मंडळींनी आरंभिला आहे. नेहरू की महाराष्ट्र? यात मी नेहंरूजींना पसंती देईल, असं म्हणालो तर मला 'सूर्याजी पिसाळ' म्हणून हिनविण्यात येत आहे. नेहरू म्हणजे भारत आणि भारताला स्वातंत्र्य मिळाले ते नेहरू-गांधींमुळे. भारत स्वतंत्र झाला म्हणजे महाराष्ट्र स्वतंत्र झाला. भारताच्या प्रती माझ्या जशा निष्ठा आहेत तशाच निष्ठा महाराष्ट्राच्या प्रती माझ्या मनात आहेत. शिवाजी महाराजांनी स्वराज्याकरिता आपल्या कर्तृत्वाची बाजी पणाला लावली व स्वराज्य मिळविलं. उभा देश त्यांच्या चरणी आपल्या निष्ठा अर्पण करतो, नतमस्तक होतो. शिवाजी महाराजांनंतर या देशाला नेहरू-गांधींनी आपल्या त्यागाची, कर्तृत्वाची बाजी पणाला लावून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं. त्यांच्या प्रती निष्ठा वाहू नको तर काय मग स्वातंत्र्याच्या दिवशी आपल्या घरावर काळे झेंडे फडकावणाऱ्यांच्या प्रती निष्ठा वाहू? शिवाजी महाराजांनी जे स्वातंत्र्य मिळविलं तेच स्वराज्य ज्यांनी आपल्या विलासीवृत्ती व रयतेवर अन्यायकारक जाती-धर्माचा बडगा उगारून मातीत मिळविलं त्यांच्या प्रती मी माझ्या निष्ठा वाहू? संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीत काळे झेंडे हातात घेणाऱ्यांना तुम्ही शिवाजी महाराज म्हणणार का? या माझ्या भूमिकेत कुठे सूर्याजी पिसाळ दिसतो हे तुम्हाला ठरवायचे आहे. मी या संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेत सूर्याजी पिसाळ आहे असं ज्यांना म्हणायचं आहे त्यांना माझा प्रश्न आहे - यात काळे झेंडे हातात घेणारे औरंगजेब कोण आहे हे सांगावं. माझं राजकीय जीवन जनतेपुढं खुलं आहे. माझं कार्य जर जनतेला पसंत नसेल तर ते मला घरी बसवतील; पण विरोधकांना तो अधिकार नाही... शेवटी आपल्याला एकात्म महाराष्ट्र हवा असेल तर महाराष्ट्राबाहेरील

आपल्या पक्षातील लोकांचं मतपरिवर्तन आपल्याला करावं लाग़ेल. त्यांच्या मतपरिवर्तनावर मुंबईचं भवितव्य अवलंबून आहे. संयुक्त महाराष्ट्र भारतीय नकाशात चार ठिकाणी विखुरला होता. नागपूर हिंदी भाषिक राज्यात, मराठवाडा हैदराबाद संस्थानात अडकला होता. मुंबईवरील गुजरात आपला हक्का सोडायला तयार नाही. शेवटी महाराष्ट्र शिल्लक राहतो तो कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राच्या रूपानं. आम्हाला संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश मिळवायचा आहे. आपल्या सनदशीर मार्गानं संयुक्त महाराष्ट्र मिळवायचा आहे. विरोधकांच्या भूलथापांना बळी पडू नका, अशी विनंती मी तुम्हास करीत आहे. माझी चिंता तुम्ही करू नका. माझी वाली नियती आहे. तिच्यावर माझा विश्वास आहे. 'कावळ्याच्या शापानं ढोर मरत नाही' ही आपल्या पूर्वजांची म्हण आपल्याला ठावुक आहे. तशातला प्रकार माझ्यात आणि विरोधकांत आहे. मुंबईचा माझा हट्ट मी सोडणार नाही. नेहरूजींकडून तो मी मिळविणारच. सामान्य जनता आता कुठे डोळे उघडून भवितव्याकडे पाहत आहे तोच त्यांना रस्त्यावर उतरविण्याची भाषा बोलली जात आहे. तुम्हाला फसविण्याचा डाव या मंडळीनं टाकला आहे. त्यात तुम्ही अडकू नये म्हणून तुम्हाला सावध करायला मी आलो आहे.''

साहेबांचं म्हणणं पटतंय. धोका पत्करून साहेब जनतेच्या मनातील किल्मिष, जळमटं काढून टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. देव आणि हिरे यांच्याबद्दलच्या विश्वासार्हतेला उतरती कळा लागली होती. ते दिल्लीत एक बोलत व महाराष्ट्रात आले की वेगळेच बोलत. साहेबांच्या स्पष्ट भूमिकेमुळं साहेबांचं नेतृत्व तळागाळापर्यंत रुजू लागलं. साहेबांची वेगळीच प्रतिमा निर्माण होऊ लागली. देव आणि हिरे हे साहेबांना टाळू लागले. साहेबांच्या हे लक्षात आल्यानंतर हिरेंना प्रेमानं याची जाणीव साहेबांनी करून दिली.

दरम्यान, मोरारजींनी २७ मार्च ते ७ एप्रिलपर्यंत असेंब्लीत राज्य पुनर्रचना समितीच्या अहवालावर चर्चा घडवून आणली. त्रिराज्य योजनाचा ठराव मतास टाकला. कॉंग्रेसच्या सदस्यांनी विरोधात मतदान करायचं नाही असा पक्षाचा आदेश होता. पी. के. सावंत आणि कोकणातल्या प्रतिनिधींनी मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करावी अशी उपसूचना मांडण्याचा प्रयत्न केला. मोरारजींनी पी. के. सावंत यांची उपसूचना फेटाळून लावली.

ठराव बहुमतानं पास झाला. उपसूचना मांडणाऱ्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी अशी चर्चा सुरू झाली. या कार्यवाहीमुळं पक्ष कमकुवत होईल अशी भूमिका साहेब आणि हिरेंनी घेतली. साहेब आणि हिरेंनी मध्यस्थी करून शिस्तभंगाची कार्यवाही टाळली.

अखिल भारतीय काँग्रेसचं अधिवेशन मुंबईला घ्यायचं घाटत होतं. नेहरूजींकडे महाराष्ट्राची मागणी तत्त्वत: मान्य करण्याचं साकडं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसनं घातलं. ती मागणी मान्य करून या अधिवेशनात जाहीर करावी असा आग्रह धरला. २ जून १९५६ ला मुंबईत अधिवेशनाला सुरुवात झाली. अधिवेशनाच्या ठिकाणी वातावरणात तणाव जाणवत होता. संयुक्त महाराष्ट्र समितीनं आक्रमकपणे अधिवेशनाच्या ठिकाणी घोषणांनी वातावरण दणाणून सोडलं. नेहरूजींसाठी हे सर्व नवीनच होतं. नेहरूजी जेथे जातील तेथे त्यांचं स्वागत उत्साहवर्धक व्हायचं. प्रथमच निषेधाच्या घोषणांनी त्यांचं स्वागत होऊ लागलं. चौपाटीवरील भाषणाच्या वेळेस या घोषणांची प्रखरता जास्तच वाढली होती. अधिवेशनस्थळापासून ते राजभवनाच्या रस्त्यावर हजारो मुंबईकरांनी काळे झेंडे दाखवून नेहरूंच्या विरोधी घोषणा दिल्या. 'मराठी भाषिक प्रदेशासह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' अशा घोषणांनी संपूर्ण मुंबई दुमदुमली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसनं अधिवेशनाला जोडून प्रदेश काँग्रेसची बैठक आयोजित केली. या बैठकीला नेहरूजींना आमंत्रित करण्यात आलं. त्यांनी तसं येण्याचं कबूलही केलं; पण त्यांनी ऐनवेळी कार्यक्रमात बदल करून महाराष्ट्राच्या निवडक नेत्यांना राजभवनावर चर्चेकरिता येण्याचं सांगितलं. हिरे आणि गाडगीळ यांनी राजभवनावर जाण्यास नकार दिला. साहेब, देवगिरीकर आणि भारदे हे नेहरूजींच्या भेटीकरिता राजभवनावर गेले. या भेटीत नेहरूजी तणावग्रस्त दिसले. नेहरूजींनी या तिघांसोबत मनमोकळ्यापणानं चर्चा केली. शांतपणे या तिघांचं म्हणणं ऐकून घेतलं. 'गुजरात वेगळा होऊ द्या, नंतर मुंबईबद्दल विचार करू' असं नेहरूजी या तिघांजवळ बोलले. महाराष्ट्राची मागणी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीसमोर ठेवावी, अशी विनवणी साहेबांनी नेहरूजींना केली. साहेबांची ही मागणी त्यांनी मान्य केली. सायंकाळच्या चौपाटीवरील जाहीर सभेतही सांगतो, असं या तिघांजवळ कबूल केलं.

निदर्शनं, दगडफेक, घोषणाबाजी, अधिवेशनाला येणाऱ्या काँग्रेस प्रतिनिधींची अडवणूक करणे, अपमानास्पद वागणूक देणे इत्यादी घटनांनी नेहरूजी चिडले होते. यापूर्वीच्या सभेत नेहरूजी अत्यंत शांत व धीरगंभीरपणे मुद्दे मांडायचे. त्यांचं भाषण ऐकवत राहावं असं वाटायचं; पण आजच्या सभेत ते संतापलेल्या अवस्थेत होते.

म्हणाले, "दगडफेक, निदर्शने, घोषणाबाजी या कृत्यानं सरकार दबावाला बळी पडेल असं कुणाला वाटत असेल तर हा त्यांचा भ्रम आहे. दगडांच्या वर्षावानं हे सरकार कोसळेल असं कुणाला वाटत असेल तर ते मूर्खांच्या नंदनवनात वावरत आहेत असं मला खेदानं म्हणावं वाटतं. दगडांच्या माऱ्यानं निष्पाप लोकांचा कपाळमोक्ष होत आहे. तुम्हाला जर माझ्यावर हल्ला करावयाचा असेल तर मी हा तुमच्यासमोर उभा आहे. माझं डोकं हवं असेल तर घेऊ द्या त्यांना माझं डोकं; पण लक्षात ठेवा, हे सरकार अशा भ्याड हल्ल्यासमोर नमणार नाही आणि कोसळणारही नाही."

अधिवेशनातून परत जात असलेल्या काँग्रेस नेत्यांच्या गाड्यांवर निदर्शकांनी दगडफेक केली. शहा, संघवी, वाडीलाल यांच्या मोटारी चर्नी रोडजवळ अडविण्यात आल्या. वाडीलाल यांनी गर्दीच्या दिशेनं पिस्तूल झाडलं. सीताराम घाडीगावकर धारातीर्थी पडला. जनतेचा क्रोध अनावर झाला. जनतेनं संघवी व पांचाळ यांना मोटारीतून ओढून बाहेर काढलं आणि चांगला चोप दिला. वाडीलाल यांनी स्वसंरक्षणार्थ गोळी झाडली असल्याचं समर्थन मोरारजींनी केलं. मुंबई प्रदेश काँग्रेस व मोरारजींचा डाव हाणून पाडण्यात मुंबईकर यशस्वी झाले. मुंबईत अधिवेशन घेऊन मुंबईतील जनता मुंबईच्या निर्णयाच्या बाजूनं आहे हे नेहरूजींच्या निदर्शनास मोरारजींना आणून द्यायचं होतं. जनतेनं सभामंडपाची मोडतोड, जाळपोळ व पुढाऱ्यांना धक्काबुक्की करून अधिवेशनाचे तीनतेरा वाजविले. मोरारजींची दादागिरी मुंबईकरांनी मोडून काढली. मुंबईकरांच्या जखमेवर मीठ चोळण्याची कुठलीच संधी मोरारजी सोडत नसत.

महाराष्ट्राच्या प्रश्नाचा काँग्रेस श्रेष्ठींनी पुनर्विचार करावा याकरिता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची बैठक १५ जून १९५६ ला सुरू झाली. काँग्रेस श्रेष्ठींनी महाराष्ट्राच्या प्रश्नावर जो निर्णय घेतला त्याबद्दल नापसंती दर्शवून

प्रदेश काँग्रेस समितीच्या सदस्यांनी आणि असेंब्लीच्या सदस्यांनी राजीनामे द्यावेत असं सुचविण्यात आलं. पश्चिम महाराष्ट्र व पूर्व खान्देशाच्या प्रतिनिधींनी काँग्रेस श्रेष्ठींचा निर्णय आपल्यावर बंधनकारक आहे असं मत व्यक्त केलं. कार्यकारी मंडळात प्रथमच साहेब विरुद्ध हिरे असं वातावरण निर्माण झालं. हे दोघे एकमेकांच्या समोर आले. कोकणचे नेते, पी. के. सावंत, भास्कर दिघे, भाऊसाहेब वर्तक आणि हिरे एका बाजूला तर देवकीनंदन नारायण, रत्नाप्पा कुंभार, छत्रुसिंग चंदीले आणि साहेब दुसऱ्या बाजूला अशी फाळणी प्रदेश काँग्रेसची झाली. गोपाळराव खेडकर, तुमपल्लीवार बैठकीस हजर नव्हते; पण ते श्रेष्ठींच्या निर्णयाशी बांधील राहावं या विचाराचे होते.

महाराष्ट्राच्या प्रश्नावर श्रेष्ठींनी फेरविचार करावा या मताचे दोन्ही गट होते. राजीनामे देऊन श्रेष्ठींवर दबाव आणून हा प्रश्न आपण सोडवू या विचाराचा हिरेंचा गट होता तर राजीनामे देऊन हा प्रश्न सुटणार नाही अशा विचाराचा साहेबांचा गट होता. 'या कमिटीला असे वाटते की, काँग्रेसच्या नेत्यांनी सत्तात्याग करून जनतेत काम करावं व ते यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावे' असा एक ठराव हिरेंनी काँग्रेस समितीसमोर ठेवला. साहेब आणि त्यांच्या पाठीराख्यांना हा परिच्छेद मान्य नव्हता. त्यावर वामनराव यार्दी यांनी एक उपसूचना सुचविली. 'जरूर तर' अशी ही उपसूचना होती. उपसूचना मतास टाकली असता समान मते पडली. देवगिरीकरांनी आपलं अध्यक्षीय मत उपसूचनेच्या बाजूनं दिलं. उपसूचना मंजूर करण्यात आली. मूळ ठरावावरही मतदान झालं. पुन्हा समान मतं पडली. यावेळेस देवगिरीकरांनी मात्र ठरावाच्या बाजूनं आपलं अध्यक्षीय मत दिलं. ठराव पास झाला. सर्वसाधारण सभेत हा ठराव हिरेंनी जिंकला. साहेबांचा पराभव झाला. ठरावावर मतदान होण्यापूर्वी साहेबांनी आपलं मत व्यक्त केलं.

म्हणाले, "जे राजीनामा देणार नाहीत तेही तितकेच तळमळीचे व एकनिष्ठ कार्यकर्ते आहेत असं ठरावात नमूद करण्यात यावं. हे मान्य असेल तर ठराव एकमतानं मान्य करू. या राजीनाम्यानं आपला हेतू साध्य होणार नाही. उलट पक्ष कमजोर होईल व आपल्या फुटीचा विरोधक फायदा उठवतील. यापूर्वी आपण दोन वेळा राजीनामे दिले होते. त्याची

दखलही श्रेष्ठींनी घेतली नाही. यातून काहींना सवंग प्रसिद्धी मिळेल एवढाच काय तो फायदा.''

हिरे यांची समजूत घालण्याचा प्रयत्न साहेबांनी करून बघितला; पण साहेबांना न जुमानता हिरेंनी आपला हट्ट पूर्ण केला. १२६ काँग्रेस प्रतिनिधींच्या सभागृहात दहा मतांनी साहेबांच्या विचाराचा पराभव झाला. विजयीवीराच्या आविर्भावात हिरे, कुंटे आणि देवगिरीकर दिल्लीला पोहोचले. ढेबरभाईंना हिरेंनी राजीनाम्याचा मनोदय सांगितला. नेहरूजींनाही ही मंडळी भेटली. नेहरूजींनी हिरेंच्या खांद्यावर हात टाकला व त्यांना बाजूला घेऊन प्रेमानं 'असं काहीं करू नका' म्हणून समजावलं. हिरे हे नेहरूजींच्या कृतीनं हुरळून गेले व मुंबईला परतले. राजीनामा नाटकाच्या तिसऱ्या अंकावर पडदा पडला. आजपर्यंत साहेब महाराष्ट्राच्या आंदोलनात हिरेंचं नेतृत्व मानत होते. राजीनाम्याच्या या घटनेपासून साहेबांनी हिरेंना 'तुमचे आणि माझे मार्ग वेगळे आहेत' अशी स्पष्ट कल्पना दिली. तिसऱ्या वेळीही राजीनामा देण्यासाठी आग्रही असलेले हिरे यांनी राजीनामा दिला नाही. त्यांच्या या उतावळ्या स्वभावामुळं साहेबांनी हिरेंचं नेतृत्व नाकारलं.

पं. पंत अमृतसर काँग्रेसच्या बैठकीपासून द्वैभाषिक राज्याच्या निर्मितीचे पुरस्कर्ते होते. त्यादृष्टीनं त्यांनी महाराष्ट्रीयन नेत्यांच्या मनाची चाचपणी करावयास सुरुवात केली होती. देव आणि हिरे यांनी प्रदेश काँग्रेसला अंधारात ठेवून दिल्लीत परस्पर विचारविनिमय सुरू केला होता. सर्वोदयवादी नेतेही पं. पंतांच्या गळाला लागले होते. या सर्व प्रकरणात सी. डी. देशमुख मात्र अनभिज्ञ होते. त्यांनी तिसऱ्यांदा आपला राजीनामा नेहरूजींकडे दिला. देशमुखांचा राजीनामा समितीच्या पथ्यावर पडला. त्यांनी राजीनाम्याचं भांडवल करून महाराष्ट्रात श्रेष्ठींच्या विरोधात वातावरण कलुषित करण्यास सुरुवात केली.

टिळकांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने १ ऑगस्ट रोजी पुण्यातील रेसकोर्स मैदानावर नेहरूजींच्या सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्याच दिवशी शनिवारवाड्यासमोर समितीनं आपली सभा ठेवून नेहरूजींच्या सभेला अपशकुन दाखविण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाला जनतेनं हाणून पाडलं. पुणेकरांनी लाखोंच्या उपस्थितीनं नेहरूजींचं स्वागत केलं. शनिवारवाड्यासमोरही सभेला जनसागर लोटला होता. दोन्ही सभेची तुलना

करण्यात काही मंडळी गुंतली होती. नेहरूजी १ ऑगस्टला पुण्यातील सभेत महाराष्ट्राबद्दल काही मत व्यक्त करतील असा समज काही मंडळींचा होता; परंतु महाराष्ट्राबद्दल नेहरूजींनी या सभेत एक चकार शब्दही काढला नाही.

इकडे दिल्लीत मात्र स. का. पाटील द्वैभाषिकासंदर्भाच्या हालचालीत गुंतले होते. नेहरूजी २ ऑगस्टला दिल्लीत परतले. द्वैभाषिकाच्या हालचालींनी वेग घेतला. ५ ऑगस्टला दिल्लीत वर्किंग कमिटीची बैठक झाली. या बैठकीसमोर अनपेक्षित २८२ खासदारांच्या सह्यांचा एक मसुदा ठेवण्यात आला. यामध्ये त्रिराज्य निर्मितीला फाटा देऊन द्वैभाषिक राज्य निर्माण करावं असं सूचित करण्यात आलं होतं. या द्वैभाषिकात गुजरात, सौराष्ट्र, कच्छ, मुंबई, महाराष्ट्र, महाविदर्भ व मराठवाडा या प्रदेशांचा समावेश करण्यात आला होता. देवगिरीकरांनी या ठरावाला विरोध दर्शविला. स. का. पाटील यांनी ही योजना हिरे आणि कुंटे यांनी सुचविल्याची माहिती वर्किंग कमिटीला दिली. यामुळे देवगिरीकरांची बोलती बंद झाली. डॉ. हिरानंदानी यांच्या घरी ही योजना हिरे आणि कुंटे यांनी मान्य केली होती. साहेब आणि देवगिरीकरांना अंधारात ठेवण्यात आलं होतं. देवगिरीकरांनी हिरे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी होकार दिला; पण ही योजना तुम्ही हाणून पाडा म्हणून सांगितलं. देवगिरीकरांना हे शक्य झालं नाही. महाराष्ट्रातील नेतेमंडळी एकमेकांना अंधारात ठेवून पडद्याआड निर्णय घेऊ लागली. विश्वासाचं वातावरण राहिलं नाही. वर्किंग कमिटीत हा ठराव पास झाला.

वर्किंग कमिटीच्या बैठकीनंतर लगेच दुसऱ्या दिवशी ६ ऑगस्टला महाराष्ट्राच्या प्रतिनिधींना चर्चेकरिता तातडीनं दिल्लीला बोलावण्यात आलं. हरिभाऊ पाटसकर यांच्याकडे साहेब, हिरे, कुंटे आणि बाळासाहेब देसाई पोहोचले. हरिभाऊ पाटसकरांनी वर्किंग कमिटीचा निर्णय यांच्यासमोर ठेवला. देवगिरीकरांनी जुनाच मुद्दा उगळला. वर्किंग कमिटीनं हा ठराव पास केलेला असल्यानं त्याला आपल्याला मान्यता द्यावी लागेल असं हरिभाऊ पाटसकरांनी सांगितलं. पुढं असाही खुलासा केला की, नेहरूजी स्वतः महाराष्ट्राच्या प्रतिनिधी व खासदारांची भेट घेऊन या विषयावर चर्चा करणार आहेत. श्रेष्ठींनी निर्णय घेतला आहे. लोकसभेत यावर मोहोर

उठवण्याचं तेवढं बाकी असताना महाराष्ट्राच्या प्रतिनिधींना चर्चेकरिता बोलावण्यात आलं. याचं साहेबांना आश्चर्य वाटलं. देवगिरीकरांनी पाटसकरांच्या निवासस्थानी साहेबांचं याबद्दल मत विचारलं.

साहेब म्हणाले, "महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी व सभासदांना या योजनेची काहीएक माहिती न देता परस्पर निर्णय घेऊन आपल्याला अंधारात ठेवण्यात आलं आहे. याला जबाबदार हिरे आहेत. त्यांनी आपल्याला विश्वासात न घेता परस्पर आपली संमती कळविली. यात वर्किंग कमिटीला दोष देता येणार नाही. मी व्यक्तिश: द्वैभाषिकच्या निर्मितीच्या बाजूनं नाही. वर्किंग कमिटीनं घेतलेला निर्णय आपल्याला बंधनकारक आहे, असं माझं मत आहे."

नेहरूजींनी महाराष्ट्राच्या प्रतिनिधींची भेट घेतली. देवगिरीकरांनी परत आपलं मत रेटण्याचा प्रयत्न केला; पण त्यात त्यांना यश आलं नाही. वर्किंग कमिटीचा निर्णय सध्याच्या परिस्थितीत मान्य करणं एवढंच महाराष्ट्र प्रतिनिधींच्या हाती होतं.

काँग्रेस पक्षाच्या खासदारांची नेहरूजींनी बैठक बोलावली. या बैठकीला ३०० खासदार हजर होते. मोरारजी आणि ढेबर यांना विशेष निमंत्रित म्हणून बोलावण्यात आलं. नेहरूजींनी द्वैभाषिकाचा पर्याय बैठकीसमोर ठेवला. या बैठकीत या द्वैभाषिकावर चर्चा झाली नाही. ज्यांना हा पर्याय मान्य आहे त्यांनी हात वर करून संमती दर्शवावी असं नेहरूजींनी सांगताच सर्वांनी आपली संमती दर्शविली. अपवाद मात्र काकासाहेब गाडगीळ यांचा होता. चर्चा न होताच बैठक संपली. या पर्यायाला खासदारांनी मान्यता दिल्यानंतर पंतांनी समाधान व्यक्त केलं. अमृतसरच्या अधिवेशनापासून हा पर्याय गळी उतरविण्याचं काम पंत करीत होते. मोरारजींना हा पर्याय मान्य नव्हता. मुंबई ही महाराष्ट्राला मिळाली नाही यात ते समाधानी होते. तसेच प्रजासमाजवादी विचाराचे नेते अशोक मेहता यांनी या द्वैभाषिकाला मान्यता दिली. त्याचं कारण मुंबई एकट्या महाराष्ट्राला मिळू नये या मताचे ते होते. लोकसभेत हे विधेयक ७ ऑगस्टला चर्चेला आलं. पंतांनी द्वैभाषिकाची दुरुस्ती सुचवून हे विधेयक लोकसभेसमोर मान्यतेसाठी ठेवलं. यावर मतदान घ्यावं लागलं. हे विधेयक मतदानाला टाकलं असता विधेयकाच्या बाजूनं २४१ व विरोधात ४० अशा फरकानं हे विधेयक

लोकसभेनं मंजूर केलं. द्वैभाषिक राज्याचा पर्याय महाराष्ट्र व गुजरातच्या माथी मारण्यात काँग्रेस श्रेष्ठींना यश मिळालं.

लोकसभेत द्वैभाषिकाचं विधेयक मंजूर होताच महाराष्ट्राप्रमाणेच गुजरात पेटून उठला. मोरारजींनी महाराष्ट्रात जसे आंदोलनाचे बळी घेतले त्याचप्रमाणे गुजरातच्या आंदोलनावरही गोळीबार करून जनतेचे बळी घेतले. महाराष्ट्रात मोरारजी अप्रिय नेते म्हणून गणले जाऊ लागले. तसेच गुजरातमध्येही त्यांच्या नेतृत्वाला ग्रहण लागले. १९ ऑगस्टला गुजरात काँग्रेसची बैठक सुरू झाली. तणावपूर्ण वातावरणात या बैठकीत द्वैभाषिक राज्याचा निर्णय मान्य करण्यात आला. मोरारजी हट्टी स्वभावाचे असल्याने जनमत त्यांच्याविरोधात जाऊ लागले. मोरारजींच्या सभेवर बहिष्कार घालून 'जनता कर्फ्यू' पुकारण्यात आला. जाळपोळ, मोर्चे याला गुजरातमध्ये ऊत आला. मोरारजींना गुजरातचे राजे म्हणून संबोधण्यात येत असे. जनतेनं हे त्यांचं राजेपद झुगारून लावलं. नेहरूजींनी महाराष्ट्राच्या जनतेचा राग अनुभवला होता. त्याहीपेक्षा गुजरातची जनता आक्रमक झाली होती. महाराष्ट्राच्या जनतेप्रमाणे गुजरातच्या जनतेला नेहरूजींनी दोष दिला नाही. नेहरूजी मूग गिळून गप्प बसले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीनं ३० ऑगस्टला द्वैभाषिक राज्य विधेयकाला मान्यता दिली. देव, हिरे यांना नेतृत्व करण्याची घाई झाल्याचं त्यांच्या हालचालींवरून देवगिरीकर आणि साहेबांच्या लक्षात आलं. देवकीनंदन नारायण आणि देवगिरीकर यांनी नेतृत्वाच्या बाबतीत चाचपणी करण्यास सुरुवात केली. मराठवाडा, विदर्भ, मुंबई आणि गुजरात या भागातील लोकप्रतिनिधींचा कानोसा घेण्याचं काम या दोघांनी आरंभिलं. द्वैभाषिकाच्या नेतृत्वाबद्दल दिल्लीतील श्रेष्ठींच्या मनात काय शिजतंय यावर भावी नेतृत्वाची दिशा ठरणार होती.

त्रिराज्य योजना संपुष्टात येऊन द्वैभाषिक राज्य अस्तित्वात आलं. १६ ऑक्टोबर १९५६ ला द्वैभाषिक राज्याचा निर्णय झाला. काँग्रेसमधील द्वैभाषिक पर्यायाला पूर्णविराम मिळाला. काँग्रेसअंतर्गत आता वेगळीच धावपळ नेत्यांमध्ये सुरू झाली. या नवीन राज्याच्या नेतृत्वाची जबाबदारी श्रेष्ठी कुणावर सोपविणार याबद्दल तर्कवितर्क लावले जाऊ लागले. पडद्यामागील हालचालींना वेग आला. देव, हिरे आणि गाडगीळ यांनी

तिरक्या चालीनं चालावयास सुरुवात केली. साहेब मात्र तटस्थपणे या शर्यतीत आपण उतरायचे किंवा नाही याचा गांभीर्यानं विचार करू लागले. श्रेष्ठींच्या मनाचा थांगपत्ता लागत नव्हता. केंद्रशासित मुंबई, त्रिराज्य योजना मागे पडून अमृतसर येथे द्वैभाषिक राज्य योजना पुढे आली त्या वेळी श्रेष्ठींनी मोरारजींना या नवीन राज्याची धुरा सांभाळण्याची गळ घातली होती. मोरारजींनी त्या वेळी श्रेष्ठींच्या मताला दुजोरा दिलेला नव्हता. पंत आणि ढेबरभाई यांची इच्छा मोरारजींनी ही जबाबदारी स्वीकारावी अशी होती. मोरारजींनी या दोघांची इच्छाही नाकारली. मोरारजींना नेतृत्व स्वीकारण्याच्या सूचना श्रेष्ठींकडून मिळाल्या. साहेबांच्या नेतृत्वाबद्दलं महाराष्ट्रातच चर्चा होऊ लागली. विदर्भाचे पी. के. देशमुख यांनी दिल्ली गाठली. मोरारजींनाच मुख्यमंत्रीपदासाठी तयार करावं अशी श्रेष्ठींची मनधरणी त्यांनी केली. मोरारजी जर मुख्यमंत्री होण्यास तयार असतील तर हिरेंना आम्ही माघार घ्यावयास लावू, असं आश्वासन पी. के. देशमुख यांनी श्रेष्ठींना परस्पर दिलं. दिल्लीचे हेलपाटे मारून पी. के देशमुख आणि गो. ह. देशपांडे मुंबईला आले. साहेबांना डावलण्यासाठी मोरारजींना आपण पुढं करून बिनविरोध मुख्यमंत्री करू, असं हिरेंना या जोडगोळीनं सांगताच हिरे भडकले. हिरेंना मोरारजी बिनविरोध मुख्यमंत्री होऊ देणं मान्य नव्हतं.

त्रिराज्य योजना मान्य करून मुख्यमंत्रीपद आपल्या पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न यापूर्वी हिरेंनी केला होता. एकमतानं निवड होत असेल तर नेतृत्वाची जबाबदारी मोरारजी स्वीकारतील असं त्यांच्या बाजूनं असणाऱ्यांकडून ऐकायला मिळू लागलं. मोरारजींऐवजी स. का. पाटलांच्या नावाचा खडा श्रेष्ठींनी टाकून बघितला. स. का. पाटील हे कोकणातले सारस्वत. निवडून येण्याची सूतराम शक्यता नाही. महाराष्ट्रातील बहुजन समाजातील मंडळी त्यांचं नेतृत्व मान्य करावयास तयार नव्हती. मोरारजी दुरावलेले आणि मुंबईत बंडाळी होऊन फाटाफूट झालेली. अशा अवस्थेत स. का. पाटलांचा निभाव लागणे शक्य नव्हते हे श्रेष्ठींच्या लक्षात आलं. हिरेंच्या नेतृत्वाची सूत्रं देवांनी आपल्या हाती घेतली. साहेबांच्या नेतृत्वाला शह देण्यासाठी अनेक क्लृप्त्या देवांनी लढविल्या. मोरारजींना भेटून आपण मुख्यमंत्री व्हावं अशी विनवणी केली. बिनविरोध निवड होत असेल तर आपण नेतृत्व स्वीकारू, असं मत मोरारजींनी व्यक्त केलं.

इथेही देवांची फसगत झाली. साहेब आणि हिरे यांच्यात नेतृत्वासाठी लढत झाली तर मोरारजींनी आपल्या बाजूचे आमदार तटस्थ ठेवावे हाही पर्याय देवांनी मोरारजींसमोर ठेवला. या पर्यायालाही मोरारजी तयार झाले नाहीत. शेवटी साहेब नको म्हणून हिरेंचा बळी देण्यासही देव तयार झाले. मोरारजींनी वैकुंठलाल मेहता किंवा सी. डी. देशमुख या दोघांपैकी एकाला मुख्यमंत्रीपदासाठी पाठिंबा द्यावा अशी चाल खेळली. वैकुंठलाल मेहता स्वत:च या वादात पडावयास तयार नव्हते. सी. डी. देशमुखांना कोण मतदान करेल, असा प्रश्न समोर होता. या पर्यायातही काही तथ्य नाही असं मोरारजींनी देवांना कळविलं. देव चोहीकडून तोंडघशी पडू लागले. देव भ्रमिष्ठ होऊन हिरेंच्या पाठीशी उभे राहिले. नेतानिवडीची तारीख जवळ येऊ लागली. प्रदेश काँग्रेस समितीची बैठक बोलावून त्यात हिरे आणि साहेब यांच्या संमतीनं एक निवड समिती निवडण्यात आली. या समितीत गणपतराव तपासे, हरिभाऊ पाटसकर, बापूसाहेब गुप्ते व देवकीनंदन नारायण यांची निवड करण्यात आली. या निवड समितीचा तसा काही उपयोग होईल, असं सभासदांना वाटत नव्हतं. रामानंद तीर्थ आणि धर्माधिकारी यांनी मोरारजींची भेट घेतली. तटस्थ राहण्याचा मनोदय मोरारजींकडं व्यक्त केला. मोरारजींनी आपली नेतृत्व स्वीकारण्याची इच्छा या दोघांकडं व्यक्त केली; पण एका अटीवर बिनविरोध होत असेल तर. नेतृत्व स्वीकारल्यानंतर माझं नेतृत्व न मानणाऱ्यांना मला मंत्रिमंडळात स्थान देता येणार नाही हेही स्पष्ट केलं. श्रेष्ठींनी मला माझा वारस निवडण्याचे अधिकार दिले तर संपूर्ण महाराष्ट्रभर ज्यांनी धुडगूस घातला त्यांची निवड करणं मला शक्य होणार नाही ही कल्पना मोरारजींनी या दोघांना दिली. स्वामींनी आपला मोर्चा दिल्लीला वळविला. दिल्लीनं प्रांताच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याचं नाकारून आपले हात झटकले. स्वामी, देव, धर्माधिकारी, गाडगीळ हताश होऊन हिरेंच्या पाठीशी उभे राहिले.

साहेब, देवगिरीकर, बाळासाहेब देसाई आणि देवकीनंदन नारायण यांनी मराठवाड्यातून बाबासाहेब सवणेकर आणि भगवंतराव गाढे या स्वामी विरोधकांना जवळ केलं. विदर्भातून गोपाळराव खेडकर, कन्नमवार यांना हाताशी धरलं. ब्रिजलाल बियाणी आणि देविसिंग चौहान यांनी

साहेबांशी जवळीक निर्माण केली. श्रेष्ठींनी मोरारजींच्या नावाला संमती दर्शविली. साहेबांनी मोरारजींच्या पाठीशी उभं राहायचं ठरविलं. १६ ऑक्टोबरला असेंब्ली काँग्रेस पक्षाची बैठक झाली. या बैठकीत साहेबांनी नेतेपदासाठी मोरारजी देसाईंचं नाव सुचविलं व आपण नेतेपदाच्या शर्यतीतून माघार घेत आहोत असं सांगितलं. कारण काँग्रेस श्रेष्ठींनी मोरारजींच्या नावाला मान्यता दिली आहे, असं मत व्यक्त केलं. हिरेंनी नाव मागे घेण्यास नकार दिला. हिरे माझ्याविरोधात निवडणूक लढवीत नसतील तर अजूनही मी माझं नाव मागे घेईल, असं साहेबांनी जाहीर केलं. हिरेंनी निवडणूक घेण्याचा आग्रह धरला. निवडणूक बिनविरोध होत नाही हे निश्चित झाल्यानंतर मोरारजींनी नेतृत्वाच्या शर्यतीतून माघार घेतली. रीतसर निवडणूक घेण्याचं जाहीर झालं. बाळासाहेब देसाईंनी साहेबांचं नाव नेतेपदासाठी सुचविलं. हिरे आणि साहेब यांच्यात नेतृत्वासाठी निवडणूक झाली. या निवडणुकीत मराठवाड्यात व पश्चिम महाराष्ट्रात मतांची फाटाफूट झाली. हिरेंनी पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातून आघाडी मिळविली. साहेबांनी ही तूट विदर्भातून भरून काढली. मुंबई, कच्छ, गुजरात, सौराष्ट्र साहेबांच्या पाठीमागे उभे राहिले. मोरारजींनी आपली सर्व शक्ती साहेबांच्या पाठीमागे उभी केली. साहेबांना ३३३ मते पडली तर हिरेंना १११ मते मिळाली. साहेब २२२ मतांनी द्वैभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रीपदी आरूढ झाले.

आज माझं चित्त ठिकाणावर नव्हतं. मन बेचैन होतं. याक्षणी मला साहेबांच्या जीवनातील संकटांचे प्रसंग आठवू लागले. एक-एक संकट निवारताना साहेबांच्या मनाची झालेली कुचंबणा आठवते. आजही तसंच काहीसं संकट साहेबांवर बेतलेलं आहे. या संकटातून साहेब सहीसलामत बाहेर पडतील का? साहेबांनी मागे मला लिहिलेल्या पत्राची आठवण झाली.

त्यात त्यांनी लिहिलं होतं, "१९५२ ते १९५५ च्या कठीण राजकीय काळातही तू माझी सोबतीण म्हणून साथ केलीस. कितीतरी कठीण काळात माझ्या सल्लागाराचे व जीवाभावाच्या मित्राचे कार्य केलेस. तुझी साथ नसेल तर मी एकटा काही करू शकेन अशी माझी मन:स्थिती नाही. तुझ्या निरागस सोबतीशिवाय मी निरर्थ व्यक्ती ठरण्याचा संभव आहे. माझ्या वाढत्या जबाबदारीबरोबर तुझी वाढती साथ नसेल तर माझे आयुष्य अर्थशून्य गोष्ट बनेल असा धाक मनात निर्माण झाला आहे."

आजचा प्रसंग त्यांच्या राजकीय जीवनाचं भविष्य ठरविणारा आहे. राजकीय विरोधक साहेबांना खिंडीत पकडून त्यांना नामोहरम तर करणार नाही? कारण एका बाजूनं देवांचा कावेबाजपणा व दुसऱ्या बाजूनं हिरेंचा राजकीय धसमुसळेपणा साहेबांचा घात तर करणार नाही? या कावेबाज व राजकीय धसमुसळेपणाला आजवरची साहेबांची राजकीय पुण्याई पुरून उरेल का? १६ ऑक्टोबर १९५६ हा दिवस साहेबांच्या आतापर्यंतच्या कार्याचं मूल्यमापन करणारा दिवस ठरणार. डोंगरेंच्या निरोपाकडे मी डोळे लावून बसलेय. जसजसा वेळ जाऊ लागला तसतशी माझी काळजी वाढू लागली. विरोधकांकडून साहेबांना काही दगाफटका तर होणार नाही? माझ्या मनाची अवस्था 'वैरी न चिंती ते मन चिंती' अशी झालीय. माझ्या कानावर जे आलं ते माझ्या जिव्हारी लागलं. मनाला झोंबलं. साहेबांनी त्याचा कशाप्रकारे प्रतिकार केला असेल... त्यांची मानसिक अवस्था कशी असेल... साहेब भावनावश झाल्यास त्यांना सावरण्यासाठी त्यांचे जीवाभावाचे मित्रही जवळ नाही. नियती याहीवेळेस साहेबांच्या पाठीशी उभी राहील का, साथ देईल का? माझं मन सारखं भरकटतंय. नाही नाही ते विचार मनात थैमान घालताहेत. सकाळपासून मी घरात चिंतामग्न वावरत असताना पाहून नोकरचाकरही माझ्यापासून दूरदूर राहू लागले. सर्व घटना घडत असताना साहेब थोडेही चलबिचल न होता आपल्या सहकाऱ्यांच्या साथीनं या प्रसंगाला तोंड देत असतील का? देवगिरीकर आणि बाळासाहेब देसाई हे साहेबांची पाठराखण करीत असतीलच. श्रेष्ठींचा विश्वास साहेबांनी आपल्या कार्यातून मिळविला आहे. या सर्वांच्या सद्‌भावनेच्या पाठिंब्यावर साहेब यशस्वी होतील असं माझं मन मला ग्वाही देत आहे. कराडची माती, माय आणि वंचितांचे आशीर्वाद साहेबांच्या पाठीशी आहेत. या पुण्याईच्या जोरावर साहेब यश संपादन करतील, अशी माझ्या मनाची समजूत मीच घालीत आहे.

आणि घडलंही तसंच. गाड्यांचा लोंढा बंगल्याच्या दिशेनं येताना मला दिसला. साहेब गाडीतून उतरण्याअगोदर डोंगरे गाडीतून उतरून धावतच बंगल्यात शिरले. साहेब विजयी झाल्याचे त्यांनी मला सांगितले. माझी एकच तारांबळ उडाली. मी साहेबांना ओवाळण्याची तयारी करू लागले. तयारी करून ओवाळण्यासाठी बंगल्याबाहेर आले. साहेबांना

ओवाळलं. माझी आणि साहेबांची दृष्टादृष्ट झाली. दृष्टीची भाषा एकमेकांना कळली. मी साहेबांच्या आनंदात विलीन झाले. साहेब कार्यकर्त्यांच्या गराड्यात सामील झाले.

रात्रीचे ११ वाजत आले तरी साहेबांभोवतालची गर्दी कमी होण्याची चिन्हे दिसेनात. स्वागतासाठी आलेल्या थोरामोठ्यांची साहेब आस्थेवाईकपणे चौकशी करू लागले. बगंल्यासमोरच्या हिरवळीवरच साहेबांनी आपली बैठक मांडली. कार्यकर्त्यांना साहेब आपल्या जवळ बसून घेऊन ख्यालीखुशाली विचारू लागले. आल्यागेल्यांसाठी चहापाणी करण्यावर डोंगरे लक्ष ठेवून होते. साहेबांचं आम्हाला सांगणं असायचं, 'घरी आलेला कार्यकर्ता असो की, ग्रामीण भागातील नागरिक...त्याचं स्वागत आपल्या घरी झालंच पाहिजे. त्यांच्याच पुण्याईनं आपल्याला हे दिवस आलेत.'

आम्ही सर्वांची काळजी घेत होतोच. रात्री १२ वाजल्यानंतर साहेबांना उसंत मिळाली. सर्वांचा निरोप घेऊन साहेब बंगल्यात आले. बंगल्यात आल्या आल्या मी आणि साहेब देवघरात गेलो. साहेबांनी गांधीजींच्या फोटोला नमस्कार केला. नोकरांनी जेवण तयार असल्याची वर्दी दिली. साहेब, मी आणि आमच्यासोबत डोंगरेंनी जेवण घेतलं. साहेब दिवाणखान्यात जाऊन बसले. डोंगरे यांना उद्याच्या कामाची कल्पना दिली. डोंगरे आपल्या क्वार्टरवर निघून गेले. साहेबांच्या चेहऱ्यावर दिवसभराचा शीण जाणवत होता; पण मन मात्र उल्हसित होतं. द्वैभाषिक राज्य निर्मितीच्या वेळी खेळण्यात आलेल्या खेळीचा आणि डावपेचाचा साहेब विचार करू लागले. ज्या काही वेगवेगळ्या प्रवाहांनी जे कार्य केलं आणि ते पुढंही करीत राहणाऱ्या अशा प्रवाहांना खंडित कसं करावं याचा विचार साहेब करू लागले. त्या अडथळ्यांना दूर केल्याशिवाय संयुक्त महाराष्ट्र मिळणे दुरापास्त आहे याची जुळवाजुळव साहेब मनात करीत असावेत.

मीच साहेबांना म्हणाले, "चला, मध्यरात्र उलटून गेलीय. दिवसभराच्या दगदगीनं तुम्ही थकला असाल."

"आता दमूनभागून कसं चालेल? ज्यांच्यासाठी आपण जगतोय त्यांच्या जीवनात सुखाचा सूर्योदय झालेला पाहायचाय आपल्याला." साहेब.

"ते खरं आहे; पण त्याकरिता तब्येतही ठणठणीत हवीय ना? त्यांच्यासाठी तरी आपण तब्येतीला जपलं पाहिजे." मी.

चहाचा ट्रे स्वत: घेऊन मी बाहेर आले. साहेबांसोबत हिरवळीवर बसले. चहा घेताना इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. नंतर मला राहावलं नाही म्हणून मी त्यांना सहज विचारलं.

म्हणाले, "९६ कुळी काय प्रकार आहे?"

साहेब मोकळे हसले व म्हणाले, "तुम्ही बायका आपल्या नवऱ्याविषयी कुणी उणंदुणं बोललं की फार मनाला लावून घेता. राजकारणात असे प्रसंग घडतच असतात. त्याकडं दुर्लक्ष करायचं असतं."

"पण विरोधकांनी तरी असा खोटा प्रचार का करावा? असं खोटं बोलूनं कुठं राजकारण करायचं असतं का?" मी.

"अगं, तुला नाही कळायचं यातलं राजकारण. याला राजकारणात 'गोबेल नीती' म्हणून संबोधलं जातं. या गोबेलनं खोट्यानाट्या अफवा पसरून युद्धात विजय मिळविला होता. " साहेब.

"मला काय करायचं त्या गोबेलशी? पण मी म्हणते, त्यांनी असा खोटा व हीन पातळीचा प्रचार का करावा तुमच्याविरोधात?" मी.

"विरोधकांनी केलेल्या प्रचारात काही तथ्य नाही. त्यांना ९६ कुळीचा इतिहासही माहीत नसावा असं मला वाटतं. त्यांना जर इतिहासकालीन सत्य माहीत असतं तर त्यांनी असा प्रचार केलाच नसता माझ्याविरोधात." साहेब.

"मग सत्य इतिहास काय आहे ते मला समजून सांगा. तुम्हाला कमी लेखणं माझ्या मनात सलतंय. माझ्या जिव्हारी लागलीय ही गोष्ट." मी.

"ऐक तर...महाराष्ट्राच्या इतिहासात यापूर्वी दोन वेळेस असे प्रसंग निर्माण करण्यात आले. पहिला प्रसंग शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी आणि दुसरा शाहू महाराजांच्या पुरोहितांनी निर्माण केलेला. महाराष्ट्रातील ऐतखाऊ वर्गांनी आपल्या उपजीविकेचा संबंध धर्मशास्त्रांशी जोडला आणि त्यातून हे प्रश्न निर्माण झाले. धर्मशास्त्रे ही या वर्गांनी आपल्या उपजीविकेकरिता निर्माण केलेली आहेत. त्या धर्मशास्त्रांना कुठलाही वैज्ञानिक आधार नाही. या वर्गांनी महाराजांचा राज्याभिषेक करण्याचं नाकारलं. कारण काय तर म्हणे महाराज क्षत्रिय नाहीत. राजा होण्याचा अधिकार हा क्षत्रियांनाच आहे असं या वर्गाचं धर्मशास्त्र सांगतं. क्षत्रियांना गोत्र असतं. हे गोत्र या

वर्गातील ऋषीमुनींच्या नावानं आहे. या गोत्रांचे ग्रंथ या वर्गांनी लिहिलेले आहेत. या गोत्राच्या ग्रंथात असं लिहून ठेवलेलं आहे की, वशिष्ठ ऋषीचा जन्म वेश्येच्या पोटी झालेला आहे, व्यास ऋषीचा जन्म केवट कन्येच्या पोटी झाला, पाराशर ऋषीचा जन्म चांडाळ-मांगणीच्या पोटी झाला. (संदर्भ : स. ना. सूर्यवंशी लिखित 'हे राष्ट्रा... महाराष्ट्रा', राजर्षी शाहू जन्मशताब्दी सामाजिक कृतज्ञता अंक, पान क्र. ३९.) ही गोत्रं ९६ कुळी मराठ्यांना देण्यात आली आहेत. ज्या ९६ कुळातील मराठ्यांचे गोत्र, वशिष्ठ, व्यास, पाराशर आहे मग या सर्व ९६ कुळी मराठ्यांचे पूर्वज वेश्या, केवट, मांगणींच्या पोटी जन्माला आले आहे. या तीन ऋषींच्या नावांचे गोत्र असलेले सर्व मराठे हे शूद्र आहेत असे हे ग्रंथ सांगतात. याबाबत माझं असं मत आहे की, गोत्र हे ब्राह्मणांना असतात, असं या धर्मग्रंथात सांगितलेलं आहे. क्षत्रियांना आणि मराठ्यांना ब्राह्मणांनी आपल्या स्वार्थापोटी ही गोत्रं दिलेली आहेत.

ऐतखाऊ वर्गाचं उपजीविकेचं साधन धर्म. या धर्मावर अतिक्रमणं होऊ लागली. इस्लाम व ख्रिश्चन धर्मीय लोक भारतात सत्ता काबीज करून सत्तेच्या जोरावर धर्माचा प्रचार आणि प्रसार करू लागले. हा वर्ग आपलं स्वत:चं व धर्माचं रक्षण करण्यास असमर्थ होता. त्यांनी आपलं व आपल्या पोटार्थी धर्माचं संरक्षण करण्याकरिता बहुजनांची पायधरणी केली. त्या बदल्यात आम्ही तुम्हाला गोत्र व क्षत्रिय म्हणून मान्यता देतो. बहुजनांतील लढवय्या जमातीनं पोटार्थी धर्माचं आणि या वर्गाचं परकीयांच्या आक्रमणापासून रक्षण केलं. लढवय्या जमातीतील लोकांची गोत्रं त्यांच्या भागातील या वर्गाची जी गोत्रं आहेत तीच गोत्रं या क्षत्रिय जमातीची आहेत. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक नाकारणाऱ्या या वर्गाला महाराजांनी पैशाचे आमिष दाखवताच राज्याभिषेक केला. तीच गत राजर्षी शाहू महाराजांच्या पुरोहितांची. पुरोहितांचे तनखे बंद करताच त्यांच्याच जातीबंधूच्या शाहू महाराजांकडे रांगा लागल्या - आम्ही तुमचे पौरोहित्य करावयास तयार आहोत. आम्हाला तनखे द्या. असाच प्रकार खानदान याबाबतीत आहे. स्वत:ला उच्चकुलीन म्हणवून घेणाऱ्यांच्या बाबतीत आहे. सत्ताधाऱ्यांशी कौटुंबिक नाते निर्माण करून जहागीरदार, देशमुख, देशपांडे, कुलकर्णी, पाटील, चौधरी ही पदं व वतनदारी मिळवायची आणि या जोरावर जी

घरंदाज घराणी होती त्यांच्यावर सत्ता गाजवायची. या वतनदारांनी जी पदं मिळविली त्याच नावानं ते समाजात वावरू लागले. यांनी आपलं घरंदाज आडनाव लावणं सोडून दिलं.

या सर्व वतनदारांना त्यांची त्यांची आडनावे असतात म्हणूनच देशमुख-देशमुख, देशपांडे-देशपांडे यांच्यात विवाह होतात. सत्ता बदलली की येणाऱ्या सत्ताधाऱ्यांशी लागेबांधे निर्माण करून आपली वतनदारी टिकवून ठेवावयाची. त्या काळी सर्व मुस्लिम सत्ताधारी असल्यानं कुठल्यातरी खानाची सत्ता असायची. त्या खानांनी दिलेल्या दानावर निर्माण झालेला समाजातील एक वर्ग स्वत:ला खांनदानी समजू लागला. महाराजांनी या वर्गाची मानसिकता ओळखली होती. वतनाकरिता ही मंडळी फितूर व्हायची. या फितुरीचा धोका स्वराज्यास व्हायचा. महाराजांनी आपल्या स्वराज्यात वतनदारी पद्धत नष्ट केली. असा हा ९६ कुळी, खानदानी व कुलवंताचा इतिहास आहे. घरंदाज घराणी स्वराज्याशी इमान राखून राहिली. तीच खरी घरंदाज घराणी स्वातंत्र्य चळवळीत सामील झाली. स्वातंत्र्य मिळताच या घरंदाज घराण्यातील सामान्य व्यक्ती बहुजनांच्या पाठिंब्यावर सत्तेत येत आहेत.'' साहेब.

''महाराजांच्या काळातील जी घरंदाज घराणी आहेत ती आजही महाराजांच्या वंशाशी संबंधित आहेत. देवाणघेवाण करून ज्यांनी खानदानपण मिळविलं ती घराणी सामान्य जनतेतून बाहेर फेकली जात आहेत. त्यांचा एक समूह म्हणून ते आपलं वेगळेपण टिकविण्याच्या प्रयत्नात असतात. त्या मानसिकतेतून इतरांकडे पाहतात.'' मी.

''तुला आठवतं? जेव्हा तुला पाहावयास आलो होतो तेव्हा मी काय म्हणालो होतो ते? नाही आठवणार तुला...'' साहेब.

''नाही कसं आठवणार मला! चांगलं लक्षात आहे माझ्या. माझी आई देवभोळी आहे. तिला समजून घेणारी घरंदाज सून हवीय, असं तुम्ही म्हणाला होता. असं आहे व्हय माझ्या निवडीमागचं तुमचं रहस्य! मला आता कुठे घरंदाज आणि खानदानी याचा अर्थ उमगला.'' मी.

जगातील सामाजिक व्यवस्थेनं नाकारलेल्या तमाम वंचित नागरिकांच्या जीवनातील १ नोव्हेंबर १९५६ सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असा आजचा दिवस. भूमीचा मालक असून समाजव्यवस्थेनं भूमिहीन ठरवून ज्यांच्या

कुटुंबाला रस्त्यावर आणून सोडलं, ज्यांच्या पूर्वजांना पोटाची खळगी भरण्याकरिता भटकंती करावी लागली, क्षत्रिय शेतकरी कुळात जन्मून ज्यांना समाजव्यवस्थेनं नाकारून मानसिक यातना दिल्या तो बळवंतरावांचा पराक्रमी पुत्र यशवंत बुद्धी आणि कर्तृत्वाच्या जोरावर द्वैभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर आज विराजमान झाला आहे. वय केवळ बेचाळीस वर्षे. ज़गातील सर्वात मोठ्या लोकशाहीप्रधान देशातील प्रगत आणि पुरोगामी अशा राज्याचा एकमेव तरुण मुख्यमंत्री. घराण्यात जमीनदारकी नाही, घराण्याला ऐतिहासिक वारसा नाही, घराण्याला राजकारणाचा गंध नाही. 'करा सही' म्हटलं तर अंगठा पुढं करून 'लावा शाई' म्हणणाऱ्या संस्कृतीचा वारस. अमुक एका कुळात जन्माला आलो नाही म्हणून पुढे जाता येत नाही असं नियतीला दोष देत मुळमुळत व कुढत बसणाऱ्या तरुणांना आपल्या कर्तृत्वानं प्रोत्साहन देणारा हा भूमिपुत्र. तरुणांचा आदर्श. आपल्या बुद्धीची शिक्षणाद्वारे मशागत करून बुद्धीच्या संघर्षात अनेकांना पाणी पाजून त्यांना त्यांची जागा दाखवून दिली. राजमार्गावरील काटे दूर सारून कष्टकऱ्यांच्या पुत्रांना राजसत्तेचा मार्ग दाखवणारे वाटाडे झाले साहेब. शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची दुःखं आपली मानणारा मुख्यमंत्री, गरिबांचा कैवारी, गरिबांच्या जीवनात सुखाची स्वप्नं पाहणारा मुख्यमंत्री प्रथमच साहेबांच्या रूपानं महाराष्ट्राला मिळत आहे. आतापर्यंत 'गरिबी' या शब्दाच्या अर्थाशिवाय गरिबीशी संबंध न आलेले मुख्यमंत्री या राज्याने पाहिले. कुपर, खेर, मोरारजी देसाई यांची आणि गरिबीची भेटच झालेली नव्हती. जन्माबरोबर गरिबीची सोबत लाभलेले साहेब या मंडळींचे वारस झाले. जनतेच्या मनात आपोआप साहेबांबद्दल आपुलकी निर्माण झाली. अनेक अपशकुनी मंडळी साहेबांना अपशकुन दाखवण्याच्या कार्यात मग्न होती. त्यांच्या अपशकुनाला न जुमानता साहेब बुद्धीच्या जोरावर एक एक गड चढून आपल्या कार्याचा, कर्तृत्वाचा ध्वज गडावर फडकावत होते. द्वैभाषिकातील तमाम मावळे साहेबांच्या पाठीमागे आपलं बळ उभं करू लागले. 'ज्यांना औताचा कासरा धरता येत नाही अशाच्या हाती राज्याची बागडोर सोपविण्यात कुठलं शहाणपण आहे?' अशी कोल्हेकुई बुद्धिजीवी मंडळींनी सुरू केली. शिक्षणाकरिता गरिबीचे चटके सोसणारे, तत्त्वासाठी भावाचा विरोध पत्करणारे, स्वातंत्र्यासाठी घरावर तुळशीपत्र ठेवून गावोगाव

भटकणारे, गांधी-नेहरूंना निष्ठा अर्पण करणारे साहेब आज सर्वोच्चपदी विराजमान झाले. माती, माय व बंधू यांच्याशी नाळ न तोडणारे, कार्यकर्त्यांच्या त्यागाची जाणीव ठेवणारे, मैत्रीला जागणारे साहेब आज द्वैभाषिकाचा काटेरी मुकुट स्वीकारीत आहेत. या मुकुटातील काटे काढून त्या ठिकाणी विश्वासाची फुले कशी फुलविता येतील याचा विचार साहेब करू लागले. शपथविधी पार पडल्यानंतर जनतेला उद्देशून त्यांनी भाषण केले.

म्हणाले, ''मी मुख्यमंत्री झालो म्हणजे हा लोकशाहीचा विजय आहे. माझ्यासारखा सामान्य घरातील मुलगा कर्तृत्वाच्या बळावर इथपर्यंत येऊन पोहोचतो ही लोकशाहीची देण आहे. नेहरूजींच्या समाजवादी विचाराचा हा विजय आहे. ज्यांच्यासाठी आपण स्वातंत्र्य मिळवलं त्यांच्या जीवनात स्वराज्य निर्माण करायचं आहे. स्वराज्य म्हणजे त्यांना असं वाटायला पाहिजे की, हे माझंच राज्य आहे. मी माझ्या उन्नतीसाठी अधिक काम करावयास पाहिजे. माझी उन्नती झाली म्हणजे माझ्या राज्याची उन्नती होईल ही भावना सामान्य नागरिकाच्या मनात फुलवायची आहे. हे त्यांच्या कष्टाला व घामाला प्रतिष्ठा मिळेल तेव्हाच शक्य आहे. त्यांच्या पदरात कष्टाचं उचित मूल्य पडलं म्हणजे ते आपलं जीवन सुखासमाधानानं जगतील. सर्वात शेवटचा माणूस सुखी झाला म्हणजे लोकशाहीचा उद्देश सफल होईल. हे करणं तेव्हाच शक्य आहे जेव्हा येथे शांतता नांदेल.

भारत सरकारनं आतापर्यंत चौदा प्रादेशिक भाषांना राजमान्यता दिली आहे. या चौदा भाषा भारतामध्ये आपापला विकास साध्य करीत आहेत. देशाच्या प्रगतीमध्ये कुठे त्यांचा अडथळा निर्माण होताना दिसत नाही. आपल्या प्रांतात दोन भाषा आहेत. या दोन भाषा एकदुसऱ्याच्या भगिनी आहेत, आमच्या कन्या आहेत. त्यांच्या विकासाकरिता समान धोरण आखलं जाईल. देशहिताचा विशाल दृष्टिकोन समोर ठेवून मुंबई राज्य द्वैभाषिकाच्या रूपानं मराठी-गुजराथी बांधवांच्या हाती मोठ्या विश्वासानं सुपूर्द केलं आहे. कुठलाही किंतु मनात न ठेवता आपल्याला या द्वैभाषिकाचा विकास साधावयाचा आहे. एक नवीन इतिहास निर्माण करावयाचा आहे. भारतीय लोकशाहीनं समाजवादी समाजरचनेचं ध्येय अंगीकारलेलं आहे. हे साध्य करण्याकरिता वेगवेगळे मार्ग अवलंबिले जाऊ शकतात. विचार वेगवेगळे असू शकतात. या वेगळ्या विचाराचं स्वागतही करण्यात येईल;

पण ते विचार देशहिताचे व सकारात्मक विचार असावयास पाहिजे. सामान्यांचं भलं करणारे असावेत.

या राज्याची धुरा माझ्यावर सोपवलेली आहे. ही धुरा यशस्वीपणे सांभाळण्याची जबाबदारी माझी आहे. त्यात मी कुठलीही कुचराई करणार नाही. या राज्यात जात, धर्म, पंथ व भाषा या भेदांना आश्रय मिळणार नाही. सर्वांना समान वागणूक मिळेल. राज्य उदयाला आलं त्या दिवशी भाषिकवाद संपला. हे राज्य महात्मा गांधी, लोकमान्य टिळकांची कर्मभूमी आहे. सरदार पटेल, विनोबा भावे यांचं कर्तृत्व देशानं मान्य केलं आहे. त्यांच्या कर्तृत्वाला कुठे कमीपणा येईल अशी वर्तणूक आपल्या हांतून होता कामा नये याची दखल आम्हाला घ्यावी लागेल. वंचितांच्या जीवनात सुखाची प्रभा फाकताना मला पाहावयाची आहे. याकरिता वडीलधाऱ्यांच्या अनुभवाची शिदोरी माझ्या पाठीशी हवीय. तरुणांचं सहकार्य माझ्या बरोबरीनं हातात हात घालून चाललं तरच सामान्य माणसाचं भलं या राज्यात होईल.''

कराड, सांगली, सातारा, कोल्हापूर येथील साहेबांच्या चाहत्यांची रीघ घरी लागलेली. कराडला केव्हा येणार? सांगलीला सत्कार आयोजित करायचा आहे. निरोपावर निरोप येताहेत. मुंबईतील कारखानदार, उद्योगपती, भांडवलदार साहेबांना अजमावून पाहताहेत. या राज्यात आपल्याला संरक्षण मिळेल किंवा नाही याची चाचपणी करताहेत. साहेब प्रत्येकाचं समाधान करण्यात गुंतलेले. भविष्यात मुंबईत गुंतवणूक करावी किंवा नाही या विचारानं भांबावलेले हे भांडवलदार साहेबांना बैठकांना बोलावू लागले. साहेब त्यांच्या पंचतारांकित बैठकांना जाऊन सहज, लीलया त्यांच्या प्रश्नांची उत्तरं देऊन त्यांचं समाधान करू लागले. त्यांच्यात विश्वास निर्माण करू लागले. भांडवलदार आपापसांत कुजबुजू लागले, 'ए मराठी छोरा कुछ और है.' साहेब त्यांच्याशी बोलताना मधूनच गुजराती साहित्यातील सुभाषितांची पेरणी करू लागले. साहेबांनी या भांडवलदार मंडळींचा विश्वास संपादन केला.

कार्यकर्तृत्वामुळं अनेकांची थाप कर्तृत्ववान माणसाच्या पाठीवर पडत असते; पण मायेची थाप ही काही और असते. तिची तुलनाच होऊ शकत नाही. ही थाप माता आणि मातीची असते. जी माता आपल्या

रक्तामांसाच्या बाळाला कुशीत नऊ महिने नऊ दिवस वाढवीत असताना आपल्या तान्हुल्याची गर्भात सुरक्षित वाढ व्हावी, त्याला लोह मिळावं म्हणून काळ्या मातीच्या ढेकळातील एक कवडीभार माती दररोज खात असते. ती कूस आणि ती माती आपल्याकडे कधीही, काहीही मागत नाही. नेहमी आपल्या उत्कर्षाचा विचार करीत असते. तिची थाप पाठीवर झेलण्यासाठी साहेबांनी १४ नोव्हेंबर ही तारीख कराडला जाण्याकरिता निश्चित केली. ज्या मातीनं साहेबांना अंगाखांद्यावर खेळविलं, तिच्यातील खनिजांनी रक्ताचा पिंड घडविला त्या मातीची धूळ मस्तकी लावण्यासाठी साहेब कराडला निघाले. मी आणि साहेब दोघेच गाडीत होतो. आमच्या गाडीच्या मागेपुढे गाड्यांचा ताफा होता. गाडी वेगानं पुणेमार्गे कराडला जवळ करू लागली. गाडीचा वेग काय असतो तो मी प्रथमच अनुभवत होते. या वेगावरून मला आठवण झाली ती वेगवान वाहनांची. केवळ वेगवान वाहन मिळालं नाही म्हणून मला देण्यासाठी मुंबईहून रक्तपेढीतून रक्त आणता आलं नाही. कदाचित शामरावांचा रक्तगट माझ्या रक्तगटाशी मिळाला नसता तर मला आजचा दिवस आणि या गाडीचा वेग पाहावयास मिळाला नसता. मी मनानं कराडला केव्हाच पोहोचले. मला घरात आई चातकाप्रमाणे साहेबांच्या वाटेकडे नजर लावून वाट पाहताहेत. घर पाहुण्यारावळ्यानं गजबजून गेलंय. नेहमीप्रमाणं बाबुराव कोतवाल पाहुण्यारावळ्यांची सरबराई करताहेत. साहेबांचे मित्र आईच्या अवतीभोवती जमा झाले. घरातील बालगोपाळ एखाद्या सणाच्या दिवसासारखे नटूनथटून इकडेतिकडे फिरताहेत. सोनूताई आल्यागेल्यांना काही कमी पडू नये याची काळजी घेताहेत हे दिसू लागलं.

साहेबांची गाडी कराडच्या गावकुसाजवळ आली. साहेबांनी चालकाला गाडी थांबवण्याचा इशारा केला. गाड्यांचा ताफा थबकला. साहेब गाडीतून उतरताच मागील आणि पुढील गाडीतून अंगरक्षक साहेबांच्या आजूबाजूला उभे राहिले. साहेबांनी त्यांना इथंच थांबण्याचा इशारा करून रस्त्यालगतच्या शेतात चालत गेले. त्या काळ्या आईची मूठभर माती उचलली आणि आपल्या मस्तकी लावली आणि परत गाडीत येऊन बसले.

सर्व कराड आज सजूनधजून साहेबांच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहतंय. साहेबांची गाडी कराडच्या गल्लीबोळातून वाट काढीत साहेबांच्या

घरासमोर जाऊन थांबली. साहेब गाडीतून उतरले. मला उतरायला थोडा वेळ लागला. साहेब माझी चौकशी करू लागले. तेवढ्यात मी त्यांच्याजवळ येऊन पोहोचले.

साहेब मला म्हणाले, ''असं मागे राहायचं नाही. माझ्यासोबत राहायचं. तुझ्यामुळं आजचा दिवस या घराला पाहायला मिळाला.''

मी समाधानानं साहेबांच्या चेहऱ्याकडं पाहून हसले. माझ्या सुना आणि भाचेसुनांनी आम्हा उभयतांना ओवाळलं. साहेब आणि मी सोबतच घराचा उंबरठा ओलांडून घरात प्रवेश केला. आई बसल्या होत्या त्या ठिकाणी जाऊन आईच्या पायावर दोघांनी माथे टेकविले.

आई म्हणाल्या, ''शाब्बास माझ्या छाव्या, माझ्या यशवंता! तू माझ्या गणपतचा शब्द खरा करून दाखविलास... तुझ्या दोन्ही थोरल्या भावांची इच्छा पूर्ण केलीस... तू चव्हाण घराण्याचे पांग फेडलेस... माझ्या उदरात जन्मास आला अन् माझी कूस धन्य झाली... असाच मोठा होत राहा... देशाची आणि गरिबांची सेवा करीत राहा... माय आणि मातीला विसरू नको... तुझ्या मातेचा आशीर्वाद सतत तुझी पाठराखण करीत राहील...''

आईचा आशीर्वाद घेऊन साहेब घरातून बैठकीत आले. सर्व मित्र साहेबांपासून अंतर ठेवून उभे राहू लागले. ते साहेबांजवळ येण्यास कचरायला लागले. साहेबांना त्यांच्या या वागण्याचं आश्चर्य वाटू लागलं. शेवटी साहेबांनी सर्वांच्या हातात हात मिळविले. सर्वांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू घळघळा गालावरून ओघळू लागले. साहेबांनाही गहिवरून आलं.

साहेबांच्या गाड्यांनी सत्कार स्थळाकडं कूच केली. साहेबांसोबत मी गाडीत होते. रस्त्याच्या दुतर्फा उभं राहून कराडची जनता साहेबांचं स्वागत करू लागली. रस्त्यावर कमानीची रेलचेल दिसली. प्रत्येक व्यावसायिकानं आपल्या दुकानासमोर सडा टाकून रांगोळ्या काढलेल्या दिसल्या. आपापल्या दुकानाच्या नावानं कमानी सजवलेल्या दिसल्या. भांड्याच्या दुकानदारांनी भांड्यांच्या कमानी उभारलेल्या दिसल्या. रस्त्यावर वनराई अवतरलेली दिसली. घरांवर पताका लावून घरं सजवण्यात आली होती. सभास्थळी पोहोचताच गगनभेदी तोफांचे बार उडवून सलामी देण्यात आली. फटाक्यांची आतषबाजी सुरू झाली. तुताऱ्याधारक मावळ्यांनी तुताऱ्यांचा आवाज

अस्मानात निनादिला. डफ, ढोल-ताशांचे आवाज युद्धभूमीची आठवण जागी करू लागले. साहेब गाडीतून उतरले. अंगरक्षकांची धावपळ सुरू झाली. स्वागतपीठ ऐतिहासिक पार्श्वभूमीवर सजविलं होतं. क्षणभर मला कराडात शिवशाही अवतरल्याचा भास झाला. साहेब स्वागतपीठावर विराजमान झाले. मी साहेबांच्या डाव्या बाजूला बसले. नजर पोहोचेल तिथपर्यंत साहेबांवर प्रेम करणारी जनता साहेबांच्या स्वागताला आलेली. घराच्या छतावर, झाडावर ज्याला जिथे जागा मिळेल तिथे माणसंच माणसं बसलेली दिसत होती. स्वागत मैदानाला जनसागराचं रूप प्राप्त झालं होतं. सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांतून जनता या स्वागत सोहळ्याला मोठ्या संख्येनं हजर होती. मावळ्याच्या वेशातील कार्यकर्त्यांची लगबग डोळ्यात भरत होती. स्वागत समिती सूत्रबद्ध पद्धतीनं स्वागतपीठावरील कार्यक्रम पार पाडत होती. सुवासिनीच्या हस्ते माझी साडी-खनानारळानं ओटी भरण्यात आली. साहेबांचा कोल्हापुरी फेटा बांधून व चांदीची तलवार भेट देऊन सत्कार करण्यात आला. व्यक्ती, संस्थाच्या हारांचे ढीग स्वागतपीठावर जमा होऊ लागले. हारांचा ढीग हटविला की दुसरा लगेच तयार व्हायचा. हारांचे ढीग हटविता हटविता कार्यकर्त्यांची दमछाक होऊ लागली. या भागातील आमदार, नामदार, मंत्री, प्रतिष्ठित, जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष, सदस्य यांनी हजेरी लावलेली. अनेक वक्त्यांनी आपल्या भाषणात साहेबांच्या जीवनावर प्रकाशझोत टाकला. साहेबांची कामं करण्याची पद्धत, कार्यकर्त्यांना जीव लावून त्यांना संधी उपलब्ध करून देणं, संकटकाळी मित्रांच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती, साहेबांच्या स्वभावातील अनेक जीवनपैलू वक्त्यांनी उलगडून सांगितले.

साहेब सत्काराला उत्तर देताना म्हणाले, "तुम्ही माझा दुसऱ्यांदा सत्कार करीत आहात. पहिला सत्कार मी या राज्याचा मंत्री झालो तेव्हा स्वीकारला होता. आता मुख्यमंत्री म्हणून हा सत्कार मी स्वीकारत आहे. मी पहिल्यांदा मंत्री म्हणून या कराडात आलो त्या वेळी माझे जिवलग मित्र माझ्या घरी मला भेटले. आम्ही एकमेकांची गळाभेट घेतली. आजही मी मुख्यमंत्री झाल्यानंतर प्रथम मातेच्या दर्शनाकरिता घरी गेलो तर तेच माझे जिवलग मित्र घरी होते. ते मला भेटण्याऐवजी माझ्यापासून दूरदूर उभे राहू लागले. मला वाटलं माझं काही चुकलं तर नाही? मी विचार

करू लागलो. माझ्यात असा काय बदल झाला? माझ्यावर प्रेम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना व मित्रांना माझं सांगणं आहे - मी आज कोण झालो यापेक्षा मी कोण होतो याची मला जाणीव आहे. ही माझ्या मातेची शिकवण मला आहे. मी तुमचा तोच यशवंता आहे. तुमचा लंगोटी यार आहे. या मातीत तुम्ही आणि मी चैत्राच्या महिन्यात गावोगावच्या यात्रेत रेवड्या व नारळावर कुस्त्या खेळलो. तोच तुमचा यशवंता आजही तोच आहे. माझ्यात काहीही बदल झालेला नाही. मी मागच्या सत्काराला उत्तर देताना म्हणालो होतो, 'जनतेनं आमची पाच वर्षांकरिता गडी म्हणून नेमणूक केली आहे.' आता गड्याचा मी मुकादम झालो आहे. मला बढती मिळाली आहे हाच तो काय माझ्यात फरक झाला आहे. मला जनतेला आणि माझ्या जिवलग मित्रांना, कार्यकर्त्यांना विनंती करायची आहे की, मला तुमच्यापासून दूर करू नका. मी माणूसवेडा माणूस आहे. केव्हाही माझ्याकडे या, तो तुमचा यशवंता म्हणून मी तुमचं स्वागतच करील.

आज मी तुमच्याकडे आलो आहे ती माझी कैफियत घेऊन. मी जनतेच्या दरबारात, जनतेच्या भल्याकरिता जनतेचा प्रमुख म्हणून न्याय मागत आहे. माझं काही चुकत असेल तर माझी चूक लक्षात आणून द्या. मी ती चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न करील. लोकशाहीत जनता ही सार्वभौम असते असे मी मानतो. जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी लोकसभेत बसलेले आहेत. त्या प्रतिनिधींनी द्वैभाषिक राज्य राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ही लोकसभा सार्वभौम आहे. तिचा निर्णय बदलवण्याचा अधिकार आम्हाला नाही. विरोधी मित्रांना माझी विनंती आहे की, तुम्हाला आणि मला एकाच ठिकाणी पोहोचायचे. रस्ते, मार्ग वेगवेगळे आहेत. आडमार्गानं जाऊ नका. आडमार्गाचा रस्ता विचारता विचारता ज्या गावी तुम्हाला जावयाचे आहे ते गाव बाजूला राहून जाईल. मग तुम्ही पुन्हा म्हणणार, 'आम्हाला चकवा झाला.' जनता यावर विश्वास ठेवणार नाही. आपण राजमार्गानं हातात हात घालून जाऊया आणि द्वैभाषिक राज्याचा विकास करूया. राज्याच्या सीमा वाढविण्याच्या लढ्यात आपण एकमेकांची डोकी फोडीत बसलो तर डोकीच शिल्लक राहणार नाहीत. मग त्या राज्याच्या सीमा कुणासाठी वाढवायच्या? माझ्या निष्ठा या मी पूर्वीच व्यक्त केल्या आहेत. त्यावरून मोठा गदारोळ माजविण्यात आला. भारताप्रती माझं

डोकं मी अर्पण केलेलं आहे. आता दुसरं डोकं अर्पण करण्यासाठी मी ते आणू कुठून? म्हणून म्हणतो, सामाजिक आणि आर्थिक बदल झपाट्याने होत आहेत. त्यात आपण मिळून सामील होऊ आणि आपला विकास करून घेऊ. निजाम राजवटीत खितपत पडलेला मराठवाड्यातील भाऊ आपल्यात आला आहे. विदर्भातील भाऊ हिंदी भाषिक प्रदेशात 'ना घर का ना घाट का' अशा अवस्थेत जीवन कंठीत होता. तो मराठी भाषिक प्रदेशात येऊन मोकळा श्वास घेत आहे. काठेवाडचा सोमनाथला मानणारा आपला एक भाऊ आपल्याबरोबर नांदायला तयार आहे. त्याला सोबत घेऊन द्वैभाषिक राज्याची जबाबदारी पार पाडूया. अज्ञान आणि दारिद्र्याच्या कचाट्यातून जनतेला सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करूया. गुजराती आणि मराठी हे सख्खे भाऊ आहेत असं मी म्हणणार नाही, तर ते जुळे भाऊ आहेत असे मी म्हणेल. आपण सर्वजण एकत्र येऊन बुरसटलेल्या विचाराच्या अंधकारात अडकलेला विकासाचा रथ ओढून काढूया. सामान्यांच्या जीवनात विकासाचा प्रकाश उजळूया.

प्रजासत्ताक लोकशाही आपण ज्या दिवशी मान्य केली त्या दिवसापासून पुरोगामी विचाराचं वारं भारतात वाहू लागलं. मी मुख्यमंत्री होणं म्हणजेच जन्म, जात, धर्म, वंश या कुठल्याची बाबींचा विचार न करता फक्त तो या भारताचा नागरिक आहे या एका तत्त्वावर तो कुठल्याही पदावर जाऊ शकतो. या महाराष्ट्रात शिक्षणाची दारं वंचितांसाठी महात्मा फुलेंनी खुली केली नसती, शाहू महाराजांनी शिक्षण तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत नेलं नसतं, स्वातंत्र्य मिळविताना या मातीचं सोनं करण्याची किमया महात्मा गांधींनी केली नसती, समाजवादाचा साक्षात्कार घडविणारे नेहरूजी नसते तर मी देवराष्ट्र या गावचा यशवंत गुराखी म्हणून कुण्या धनदांडग्याकडे आयुष्य व्यतीत केलं असतं. मी मुख्यमंत्री झालो हा भारतातील दबलेल्या समाजाचा हुंकार आहे. या हुंकाराचं रक्षण करणं आपलं आद्य कर्तव्य आहे. हा हुंकार दबता कामा नये. लोकशाही मार्गांनी आपण आपला संयुक्त महाराष्ट्र मिळविणार आहोत; पण तो अहिंसेच्या मार्गानं. हिंसेच्या मार्गानं आपल्याला जावयाचे नाही. त्या मार्गानं आपले प्रश्न सुटणार नाहीत.''

साहेबांनी आपलं मन जनतेसमोर उघडं केलं. साहेबांनी सारखं

बोलत राहावं असं मला आणि समोरच्या श्रोत्यांना वाटत होतं. कारण साहेबांच्या संपूर्ण भाषणाच्या वेळेत एकही श्रोता सभेतून उठून गेला नाही. साहेब आले, त्यांनी पाहिले आणि ते जिंकले. मोठ्या दिमाखात सत्कार सोहळा पार पडला.

देशात भाषावर प्रांतरचना करून भाषिक राज्ये निर्माण करण्यात येऊ लागली. कानडी, तामिळी जनतेला न्याय मिळाला होता. मग मराठी आणि गुजराती जनतेनं असं काय काँग्रेस श्रेष्ठींचं घोडं मारलं आहे की, त्यांना भाषिक राज्य मिळत नाही? अशी भावना या दोन्ही भाषिकांच्या मनामध्ये खदखदत होती. गुजरात आंणि महाराष्ट्राची जनता साहेबांना अशा प्रकारचे प्रश्न विचारून भंडावून सोडत होती. साहेब आपल्या परीनं जनतेची मनधरणी करीत होते.

गुजरातमध्ये गेले तर साहेब जनतेला सांगायचे, "गुजरात आणि महाराष्ट्र हे दोन भाऊ आहेत. स्वातंत्र्यलढ्यात या दोन भावांनी खांद्याला खांदा लावून लढा दिलेला आहे. लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात जन्म घेऊन 'स्वातंत्र्य मिळविणे माझा हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' असा दृढनिश्चय केला. गुजराती मातीत गांधीजींचा जन्म झाला. या भूमीला स्वातंत्र्य मिळवून दिलं, तिचं सोनं केलं ते महात्मा गांधी भारताला वंदनीय आहेत. गुजरात आणि महाराष्ट्र भाऊ-भाऊ म्हणून गुण्यागोविंदाने नांदले आणि द्वैभाषिकाच्या विकास झाला तर देशात एक आदर्श निर्माण केल्याचं श्रेय आपल्याला मिळेल. भाऊ-भाऊ म्हणून एकत्र न राहण्याची भावना ज्यादिवशी निर्माण होईल तेव्हापासून या देशाच्या उत्कर्षाला ग्रहण लागण्याची भीती मला वाटते. टिळक, गांधी या दोन्ही भूमिपुत्रांनी देशासाठी केलेला त्याग, बलिदान व्यर्थ जाऊ द्यावयाचे नसेल तर देशाने आपल्यावर टाकलेली ही द्वैभाषिकाची जबाबदारी आपल्याला यशस्वीपणे पार पडावी लागेल."

ऐतिहासिक, पौराणिक दाखले देऊन साहेब जनतेच्या भावनेला हात घालायचे; पण महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समिती आणि गुजरातमध्ये महागुजरात परिषद यांनी जनतेची मनं द्वैभाषिकाच्या विरोधात चेतविली होती. ती चेतविलेली मनं विझविण्यासाठी आपल्या तत्त्वज्ञानाचा, बुद्धिचातुर्याचा शिडकावा जनतेच्या मनावर साहेब करीत होते. दुसऱ्या सार्वजनिक निवडणुकीचे

वारे देशात वाहू लागले. साहेबांना मुख्यमंत्री होऊन तीन-चार महिने लोटले. विरोधकांच्या डावपेचांना साहेब पुरून उरू लागले. वेळ कमी पडू लागला तरी साहेब पायाला भिंगरी लावून कधी विदर्भात, कधी कोकणात, कधी काठेवाडात तर कधी मराठवाड्यात जाऊन रात्रीचे दिवस करू लागले. मुंबईतील कामगारांचा आणि कारखानदारांचा विश्वास संपादन करण्यात साहेब आपल्या बुद्धिकौशल्याचा पुरेपूर उपयोग करू लागले. कारखानदार, कामगार, शेतकरी यांना साहेब आपले वाटू लागले. संयुक्त महाराष्ट्र समितीचं नेतृत्व करणारे साहेबांच्या सुदैवानं सर्व पांढरपेशा वर्गातील होतें. शेतकऱ्यांचं पोर मुख्यमंत्री झालं म्हणून महाराष्ट्रातीलं ही पांढरपेशी मंडळी साहेबांच्या विरोधात आहे हा विचार हळूहळू सामान्य माणसापर्यंत झिरपू लागला. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या जाहीरनाम्यात साहेबांचा पराभव करणं हा एकमेव विषय होता. 'साहेबांचा पराभव म्हणजे काँग्रेसचा पराभव' असं समीकरण विरोधकांनी मांडण्यास सुरुवात केली.

दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीचे रणशिंग फुंकले गेले. महाराष्ट्रात २ मार्च ते १७ मार्च १९५७ च्या दरम्यान मतदान घेण्याचे जाहीर केले. साहेबांनी १ नोव्हेंबर १९५६ ला मुख्यमंत्रीपदाची सूत्रं स्वीकारून पाच महिने लोटले होते. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या झेंड्याखाली एकवटलेला प्रबळ विरोधक आणि विस्कळीत काँग्रेस या दोघांमध्ये महाराष्ट्राच्या भूमीवर युद्ध होण्याची चिन्हं दिसू लागली. ही निवडणूक भारत विरुद्ध इंडिया या दोन विचारांचा संघर्ष ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. बहुजन समाज आणि उपेक्षितांचं प्रतिनिधित्व काँग्रेस पक्ष करीत आहे तर इंडियाचं प्रतिनिधित्व विरोधी पक्ष करीत आहे. शेतकरी व कामगारांना काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधी जवळचे वाटतात. पांढरपेशा व उच्चवर्णीयांना विरोधी पक्षाचे प्रतिनिधी आपले वाटतात, असं चित्र जनतेमध्ये १९५७च्या निवडणुकीत निर्माण झालं. लोकशाहीतील युद्धात वर्तमानपत्र अत्यंत प्रभावशाली शस्त्र मानण्यात येतं. अत्रेंसारख्यांचं 'मराठा' वर्तमानपत्र आग ओकत होतं. अत्रेंची ही मुलूखमैदान तोफ काँग्रेसचे धिंडवडे उडवीत होती. वर्तमानपत्राच्या आणि निवडणुकीच्या आचारसंहितेचं श्राद्ध घालून त्या श्राद्धाच्या जेवणावर ताव मारून ताजेतवाने झालेले विरोधक काँग्रेसची भंबेरी उडवीत होते. हिंसक मार्गांचा अवलंब करून काँग्रेसविरोधी वातावरण

निर्माण करण्यात यशस्वी होताना दिसत होते. बुद्धिभेद करणारा एक वर्ग साहेबांच्या पाठीमागे हात धुऊन लागला. या निवडणुकीत साहेबांचा पराभव करण्याचा विडा त्यांनी उचलला. विरोधकांच्या या तुफान माऱ्याला आपल्या बुद्धीच्या जोरावर अहिंसक मार्गाने परतावून लावण्याचा प्रयत्न साहेब करताहेत. विरोधकांनी साहेबांना क्रमांक एकचा शत्रू मानलं आणि काँग्रेसला दुसरा क्रमांक दिला. या युद्धाचं 'साहेब विरुद्ध समिती' असं चित्र रंगविण्यात येऊ लागलं. साहेबांचा पराभव म्हणजे काँग्रेसचा पराभव हे ध्येय उराशी बाळगून विरोधकांनी साहेबांना सळो की पळो करून सोडलं. युद्धात तसेच निवडणुकीत तत्त्व आणि नैतिकतेला पायदळी तुडविलं जातं याचं जितंजागतं उदाहरण म्हणजे १९५७ ची निवडणूक. प्रचाराला कुठला धरबंध उरला नाही. अत्रेंचं 'मराठा' दैनिक द्वेषाचं विष पेरण्यात पटाईत होतं.

खेर आणि मोरारजी या दोघांनी आपल्या कारकीर्दीत सत्ता राबविताना जे निर्णय घेतले ते बहुजनांच्या विरोधातले होते. त्याचे परिणाम या निवडणुकीत काँग्रेसला भोगावे लागत आहेत. खेर यांचा इंग्रजी विषयासंबंधीचा निर्णय, मोरारजी देसाईंनी केलेला गोळीबार, स. का. पाटलांनी मुंबईबद्दल केलेली दर्पोक्ती या सर्व घटनांच्या संदर्भात विरोधकांनी उठवलेलं वादळ या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मुळासकट उखडून टाकणार असं वातावरण निर्माण करण्यात आलं. साहेबांच्या नेहरूंप्रती असलेल्या निष्ठेच्या अर्थाचा अनर्थ करून साहेबांची प्रतिमा खलपुरुषाची ठरवून त्यांना नेतस्तनाबूत करण्याचा विरोधकांनी आखलेला डाव हाणून पाडणे साहेबांना अवघड जाऊ लागले. 'मराठा' वर्तमानपत्रानं प्रचाराचं सोडलेलं तारतम्य, जनतेच्या काळजाला भिडणारं लिखाण, हुतात्म्याची छायाचित्रे छापून जनतेच्या भावनेला पेटविण्याचा उद्योग 'मराठा' वर्तमानपत्र करू लागलं. खेर वगळता आचार्य अत्रेंनी आपल्या घणाघाती भाषणात मोरारजी, स. का. पाटील, साहेब, नेहरूजींना लक्ष्य बनविलं. मोरारजी देसाईंचा उल्लेख अत्रे आपल्या भाषणात नेहमी 'कसाई' म्हणूनच करायचे, तर स. का. पाटलांना 'नासका पाटील' म्हणून हिणवायचे (ना. स. का. पाटील). साहेबांना 'विश्वासघातकी' म्हणत 'सूर्याजी पिसाळ' ठरवायचे. कधीकधी नेहरूंना 'औरंगजेबाची' उपमा द्यायचे. जनता अत्रेंच्या भाषणाची मजा लुटायचे.

काँग्रेसमधील दुसऱ्या फळीच्या नेत्यांनी प्रचाराचा मार्ग बदलून टाकला.

या नेत्यांनी जनतेत जाऊन मराठी भाषा नसलेल्या विविध जाती-जमातींना द्वैभाषिक राज्यामध्येच तुम्हाला कसे संरक्षण मिळेल हे पटवून देऊ लागले. बिगरमराठी भाषिकांना कार्यकर्त्यांचा हा विचार पटायचा. ग्रामीण भागात वेगळीच शक्कल कार्यकर्त्यांनी लढविली. 'काँग्रेसला मत म्हणजे यशवंतराव चव्हाणांना मत' अशा घोषणांनी ग्रामीण भाग दणाणून सोडला. साहेबांचं कुटुंब शेतकरी वर्गातलं. शेतकऱ्यांचा मुलगा मुख्यमंत्री झाला हे उच्चवर्णीयांच्या मनाला खटकतंय. ही मात्रा ग्रामीण भागात लागू पडली. साहेबांना सत्तेवरून पायउतार करण्याचा उच्चवर्णीयांचा मनसुबा उधळून लावा, असा प्रचार कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागात सुरू केला. साहेब या निवडणुकीत प्रमुख उमेदवार असल्यानं दिल्लीचे डोळे या निवडणुकीकडे लागले. महाराष्ट्र तर साहेबांकडे आपला प्रतिनिधी म्हणून पाहू लागला. या निवडणुकीत साहेबांना बदनाम करण्याची एकही संधी विरोधकांनी सोडली नाही. ही निवडणूक 'साहेब विरुद्ध विरोधी पक्ष' अशीच झाली. साहेब निवडून आले तर हा द्वैभाषिक राज्यनिर्मितीचा विजय होईल, मुंबई हातची जाईल याप्रमाणे विरोधकांनी जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. कराड मतदारसंघाकडं देशाचं आणि महाराष्ट्राचं लक्ष लागून होतं. साहेबांचा विजय म्हणजे महाराष्ट्राचा विजय असं सर्वांनी गृहीत धरलं होतं.

कराडचा निकाल लागला. साहेब सहाशे मतांनी विजयी झाल्याचं घोषित करण्यात आलं. साहेबांच्या विजयाचा निष्कर्ष काढण्यात बुद्धिजीवी वर्गात चढाओढ लागली. कुणी म्हणू लागले, 'साहेबांचा विजय म्हणजे द्वैभाषिकाचा विजय.' काहींच्या मते 'अहिंसेनं हिंसेवर मिळविलेला हा विजय.' वर्तमानपत्रांच्या मते, 'यशवंतरावांचा विजय हा हिंसक आंदोलनावर लोकशाहीनं मिळविलेला विजय.' साहेबांनी आपल्या विजयाबद्दल 'माझा विजय हा द्वैभाषिकाला मिळालेला कौल आहे' असं मत व्यक्त केलं. विदर्भ आणि मराठवाड्यानं समितीकडं दुर्लक्ष केलं. गुजरातेत एक-दोन जिल्हे सोडता महागुजरात समितीची डाळ शिजली नाही. शेवटी द्वैभाषिक राज्य नेहरूजी व साहेबांच्या पाठीशी भरभक्कमपणे उभं राहिलं. पश्चिम महाराष्ट्र व मुंबईत काहीअंशी भारताला पराभवाला सामोरं जावं लागलं. इथे इंडियाला यश मिळालं. उर्वरित महाराष्ट्रात मात्र इंडियाचं पानिपत झालं.

संयुक्त महाराष्ट्राची मागणी हा बुद्धिजीवी वर्गांनी पांघरलेला बुरखा होता. त्यांचा व्यक्तिद्वेष हा छुपा कार्यक्रम होता. समाजात व्यक्तिद्वेष पेरण्यासाठी राज्य पुनर्रचनेचा आश्रय घेऊन पद्धतशीर व्यक्तिद्वेषाची पाठराखण करण्यात बुद्धिजीवी मंडळी मश्गुल होती. त्यांना ग्रामीण जनतेच्या मनाचा अंदाज बांधता आला नाही. काँग्रेसला गुंड व पुंड म्हणणाऱ्या विरोधकांनी साधनशुचितेचीही निवडणुकीत हत्या केली होती. साहेबांना विश्वासघातकी म्हणणारे स्वत: जनतेचा विश्वासघात करीत होते. शंभर वर्षांपूर्वी याच वर्षी स्वातंत्र्याकरिता बंड करण्यात आलं होतं, असं बुद्धिजीवी सांगतात. त्या बंडातून प्रेरणा घेऊन मिळविलेल्या स्वातंत्र्याला लोकशाहीत सुरुंग लावण्याचं काम इंडियाप्रवृत्तीच्या लोकांनी आरंभिलं होतं. त्यांच्या या आत्मघातकी वृत्तीला चिरडून टाकण्याचं काम लोकशाहीत जनतेनं केलं. १९५७ची निवडणूक अटीतटीची झाली. काँग्रेस पक्षाला विजय मिळाला.

या विजयाचं स्वागत करताना साहेब म्हणाले, "हे यश माझं व्यक्तिगत नसून काँग्रेसच्या विचाराचं आहे. स्थानिक प्रश्नाला किती महत्त्व द्यायचं हे आमचा मतदार जाणून आहे. त्यांना देशहित महत्त्वाचे आहे. मी नेहमीच देशहिताचा विचार घेऊन राजकारण करीत आलो आहे. माझ्या देशहिताच्या विचारांना मतदारांनी कौल दिलेला आहे. द्वेष, तिरस्कार करून देशाचा गाडा चालविता येणार नाही याचा विरोधकांनी विचार करावा. निवडणुकीत झालंगेलं गंगेला मिळालं. आपण सर्व विसरून जाऊ आणि एकदिलानं देशाचं व वंचित नागरिकांचं भवितव्य घडविण्याकरिता एकत्र काम करूया." एवढे बोलून साहेबांनी शेवटी मतदारांचे आभार मानले.

नव्या विधानसभेच्या नेतेपदी साहेबांची फेरनिवड झाली. साहेबांनी मुख्यमंत्री म्हणून दुसऱ्यांदा शपथ घेतली. साहेबांनी सहकारी मंत्र्यांची निवड करताना विभागवार विचार करून प्रतिनिधित्व दिलं. विदर्भ आणि मराठवाड्याला झुकतं माप दिलं. विधानसभेत विरोधक प्रबळ असताना त्यांना त्याच तोडीचे सडेतोड उत्तर देणारे सहकारी निवडले. त्यांच्या आक्रमक वृत्तीला पायबंद घालण्याची आखणी केली. विधानसभेत विरोधकांनी कितीही अकांडतांडव केलं तरी शांतता भंगू द्यायची नाही, असं सत्ताधाऱ्यांनी ठरविलं. राज्यपालाच्या अभिभाषणामध्ये संयुक्त महाराष्ट्राचा उल्लेख नसल्याने सत्ताधाऱ्यांना विरोधकांनी धारेवर धरलं. सत्ताधाऱ्यांच्या दबावामुळेच राज्यपालांनी

आपल्या भाषणात संयुक्त महाराष्ट्राचा उल्लेख टाळला, असा आरोप विरोधक सत्ताधाऱ्यांवर करू लागले. विधानसभा वेठीस धरली. सभागृहामध्ये शक्यतो कटुता टाळून कामकाज सुरळीत पार पाडण्याची भूमिका सत्ताधाऱ्यांनी घेतली. साहेबांनी मनाची विचलता ढळू न देता शांतपणे विरोधकांना उत्तरं दिली.

म्हणाले, "देशाचे हित लक्षात घेऊन देशपातळीवर निर्णय घेण्यात येतात. द्वैभाषिक राज्याचा निर्णय देश आणि मुंबई राज्यातील जनतेचं हित लक्षात घेऊन घेतलेला आहे. जनतेच्या हिताचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिकोनातून द्वैभाषिक आपल्याला राबवावे लागणार आहे. यात विरोधकांनी विरोधासाठी विरोध करण्याचं टाळून विधायक आणि लोकहितासाठी सरकारला सहकार्य करण्याची भूमिका पार पाडावी."

'महाराष्ट्र म्हणजे सह्याद्री आणि सह्याद्री म्हणजे महाराष्ट्र' अशी सह्याद्रीची ख्याती देशभर पसरलेली आहे. सह्याद्रीच्या अंगाखांद्यांवर अभेद्य असे गडकोट, किल्ले निर्माण करून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात शत्रूंची दमछाक करून मावळ्यांनी स्वराज्याचं रक्षण केलं. आजही घोड्यांच्या टापांचा, मावळ्यांच्या 'हर हर महादेव'च्या ललकाऱ्यांचा आवाज सह्याद्रीच्या कडेकपारीत घुमत आहे. या कर्तृत्वाचं स्मरण कायम होत राहावं म्हणून साहेबांनी आपल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत एक निर्णय घेतला. मंत्रिमंडळातील सहकारी राहत असलेल्या निवासस्थानाला इंग्रजांनी दिलेली नावे स्वातंत्र्यानंतरही तशीच होती. पारतंत्र्यातील हे नावाचं जोखड काढून टाकून महाराष्ट्र संस्कृतीची जी प्रतीकं आहेत ती नावं या बंगल्यांना देण्याचा निर्णय बैठकीत घेतला. साहेबांना मुख्यमंत्री म्हणून जो बंगला निवडला होता त्या बंगल्याला साहेबांनी महाराष्ट्राचा मानबिंदू, महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या सह्याद्रीचे नाव दिले. साहेबांनी आपल्या मातेसोबत मलबार हिलवरील सह्याद्री निवासस्थानी जाण्याचा दिवस निवडला.

सह्याद्रीवर राहण्यास जायची तयारी मी करू लागले. प्रथम मी सह्याद्रीवर जाऊन आले. सह्याद्री निवासस्थान मलबार हिलचा मानबिंदू. 'सह्याद्री' नावाला शोभेल असा ऐसपैस पसरलेला. बंगल्याच्या चोहोबाजूंनी विस्तीर्ण मोकळी जागा. परत त्यावर हिरवळीचा हिरवागार गालिचा.

आल्हाददायक वातावरण. मी राहत असलेल्या बंगल्यावर परत आले. साहेबही घरी आले होते. मी वेळ काढून माझ्या मनात असलेले विचार त्यांना विचारण्याचे ठरवले.

म्हणाले, "अहो, तुम्हाला एक विचारू का?"

"काय विचारायचे ते विचार की!" साहेब.

"आईला इथं घेऊन यावं म्हणते मी. आपण सह्याद्रीमध्ये जातेवेळी आईसोबत असलेल्या बऱ्या. कराडलाही आता सर्वकाही ठिकठाक चाललंय. सोनूताईही तयार होतील आईला इकडे पाठवायला." मी.

"चांगला विचार आहे तुझा. ज्या आईनं सह्याद्रीच्या रूपानं माझं पालनपोषण केलं तिच्या उपस्थितीत आपण सह्याद्रीवर राहावयास जाऊ. डोंगरेंना सांगून तुझी कराडला जाण्याची व्यवस्था करतो. तू जाऊन आईला घेऊन ये इथं." साहेब.

दुसऱ्या दिवशी मी गाडी घेऊन कराडला पोहोचले. रात्री मुक्कामाला थांबले. रात्री बऱ्याच उशिरापर्यंत आम्ही दोघी जावा संसाराच्या गत आठवणीत डुंबून गेलो. भागीरथीताईंची आठवण झाली. आमच्या लेकीचा संसार चांगला चालला होता. मुलांची शिक्षणात प्रगती चांगली होती. चव्हाण कुटुंबावर घाटगे आणि जाधव ही माहेरची मंडळी लक्ष ठेवून होती. सोनूताईच्या पाठीमागे आता कुठलीच चिंता उरलेली नव्हती. रात्री उशिरा आम्ही दोघी झोपलो.

सकाळीच उठून सोनूताई आणि मी घरातील सर्व कामं आवरली. आईच्या सामानाची बांधाबांध केली. सोनूताईनं आईचं दर्शन घेऊन आम्हा सासू-सुनेला निरोप दिला. आई व मी उंबरठा ओलांडून घराबाहेर पडलो. क्षणभर घराकडे पाहून घराला डोळ्यात साठवून घेतलं. आईचा कंठ दाटून आला. सोनूताईला जवळ घेतलं. त्यांच्या डोक्या-तोंडावरून हात फिरविला. जड पावलानं गाडीकडे निघालो. गाडीत बसून आम्ही दोघी सासू-सुना सह्याद्रीच्या पंचक्रोशीतील भूतकाळातील आठवणींना मागे सोडत मुंबईतील सह्याद्री बंगल्याच्या वाटेला लागलो.

पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेसचं अपयश धुऊन काढण्यासाठी साहेबांनी प्रदेश काँग्रेसमधील मरगळ दूर करण्याचं ठरविलं. मोठेपणाच्या नावाखाली पद अडवून बसलेल्या बुजुर्ग मंडळींना विश्रांती देण्याचं ठरविलं. नव्या

दमाची, नव्या उमेदीची, नव्या जिद्दीच्या कार्यकर्त्यांची फौज उभी करण्याचं साहेबांनी मनावर घेतलं. साहेबांनी मराठवाड्यातील विभागीय अध्यक्ष देविसिंग चौहान यांच्या जागी बाबासाहेब सवणेकरांची अध्यक्षपदी नेमणूक केली. महाराष्ट्र प्रांतिकचे अध्यक्ष देवगिरीकर यांचं नेतृत्व निवडणुकीत जनतेनं नाकारलं होतं. त्यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचा पराभव होऊन मानहानी स्वीकारावी लागली होती. फलटणचे राजेनाईक-निंबाळकर यांच्याकडे प्रदेश काँग्रेसची सूत्रं दिली. महाराष्ट्रभर पक्षामध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचा कार्यक्रम साहेबांनी आखला. पक्षीय पातळीवर बदल घडवून आणीत असतानाच प्रशासकीय कारभार गतिमान करण्यासाठी द्वैभाषिकातील प्रत्येक विभागाचा समतोल विकास घडवून आणण्याकरिता साहेबांनी 'विकास परिषद' साहेबांनी निर्माण केली. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, अहमदाबाद आणि राजकोट या ठिकाणी विकास परिषदेची विभागीय कार्यालये थाटली. सर्वसामान्यांचे प्रश्न तत्काळ सुटावेत, शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी याकरिता साहेबांनी हे निर्णय घेतले.

मुंबईचे राज्यपाल हरेकृष्ण मेहताब यांनी प्रतापगडाला भेट दिली असताना त्यांना एक कल्पना सुचली. या गडावर छत्रपती शिवाजी महाराजांचं भव्य स्मारक उभारून या राष्ट्रपुरुषाचं स्मरण करावं. या राष्ट्रपुरुषाच्या शूरत्वाची प्रेरणा नव्या पिढीला मिळत राहील. त्यांनी नाईक निंबाळकर, साहेब व हिरे यांच्याकडे ही भावना व्यक्त केली. साहेब, राजेनाईक-निंबाळकर आणि हिरे यांनी पुढाकार घेऊन सातारच्या छत्रपती सुमित्राराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली. या स्मारकाचं अनावरण नेहरूजींच्या हस्ते व्हावं ही इच्छाही राज्यपालांनी व्यक्त केली होती. एक वर्षापूर्वी या समारंभाचं निमंत्रण नेहरूजींना देण्यात आलं होतं; पण या ना त्या कारणास्तव ते प्रलंबित राहिलं होतं. निवडणुकीचा आणि या स्मारकाच्या उद्‌घाटनाचा संबंध जोडला जाऊ नये ही एक भूमिका त्यामागे होती. निवडणूक पार पडल्यानंतर या कार्याला चालना मिळाली. समितीनं या स्मारकाच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाला अपशकुन दाखवून खोडा घातला. समितीला वाटलं पश्चिम महाराष्ट्रात निवडणुकीत काँग्रेसची झालेली बेअब्रू नेहरूजींना बोलावून परत मिळविण्याचा हा काँग्रेसचा खटाटोप आहे. समितीनं स्मारकाच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम नेहरूजींच्या

हस्ते होऊ नये याकरिता विरोध दर्शविला. नेहरूजींनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आक्षेपार्ह लिखाण आपल्या पुस्तकात केले आहे, असा प्रचार समितीनं सुरू केला.

इंग्रजी ग्रंथाच्या आधारे नेहरूजींनी आपल्या ग्रंथात 'छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाला कपटानं मारलं' असा उल्लेख केला होता. वस्तुस्थिती नेहरूजींच्या लक्षात आणून देताच त्यांनी दुसऱ्या आवृत्तीत चुकीची दुरुस्ती करून आपला ग्रंथ प्रकाशित केला. मामा देवगिरीकर यांना २६ मार्चला पत्र लिहून छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आदर व्यक्त केला होता. या पत्राचा मजकूर देवगिरीकरांनी वर्तमानपत्रात छापूनही आणला होता. मोरारजी देसाईंनीही छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अनादर करणारं वक्तव्य केलं होतं. नेहरूजींचे लिखाण आणि मोरारजींच्या वक्तव्याचं भांडवल करून समितीच्या नेत्यांनी नेहरूजी प्रतापगडावर ज्या वाटेनं जाणार आहे त्या मार्गाची नाकेबंदी करण्याचं जाहीर केलं. या समितीच्या नेत्यांची मजल इथपर्यंत गेली की, 'नेहरूजींना प्रतापगडावर आमच्या प्रेतावरून जावं लागेल' असं माथेफिरू विधान करून महाराष्ट्रात खळबळ उडवून दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या युगकर्त्या महान राष्ट्रपुरुषाला वंदन करण्याकरिता लोकशाहीतील एक राष्ट्रपुरुष येत असताना त्यांना विरोध करण्यात कुठलं शहाणपण आहे हे सामान्य माणसाच्या आकलनाच्या बाहेरचं होतं. बुद्धिजीवी वर्गाच्या पूर्वजांनी 'गो-ब्राह्मण प्रतिपालक' ही बिरुदावली देऊन महाराजांना 'गो-ब्राह्मण प्रतिपालक' म्हणून मर्यादित केलं होतं. त्यावर खरे महाराजप्रेमी विचार करू लागले. महाराजांनी फक्त गाई आणि ब्राह्मणांचं प्रतिपालन केलं होतं का? महाराज तर रयतेचे राजे होते. प्रजाहित रक्षक होते. अठरापगड जातींच्या मावळ्यांचे जीव की प्राण होते. खरे महाराजप्रेमी इतिहासात डोकावू लागले. सत्य इतिहास वेगळाच आहे. तो आम्हाला एका वर्गानं कळू दिलाच नाही. महाराजांना हिंदूधर्मरक्षक ठरवून इतर धर्मीयांच्या मनामध्ये महाराजांबद्दल सूडाची भावना निर्माण केली. महाराजांच्या नि:पक्षपाती इतिहासाला काळं फासविण्याचं महापातक या वर्गानं केलं. महाराजांवर जीव ओवाळून टाकणाऱ्या शिवभक्तांना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सत्य इतिहास कळू लागला. महाराज हे गो-ब्राह्मण प्रतिपालक

नसून 'प्रजाप्रतिपालक' होते हा खरा इतिहास आहे याची जाणीव बहुजन समाजाला झाली. गो-ब्राह्मण प्रतिपालक महाराजांच्या स्मारकाच्या उद्‌घाटन कार्यक्रमास या पुणेरी बुद्धिजीवीचा विरोध का?

समितीच्या बेताल वक्तव्यांनी महाराष्ट्राचं राजकीय वातावरण परत जातीयवादाकडं वळण घेऊ लागलं. समाजजीवनामध्ये तेढ निर्माण होऊ लागली. 'समिती विरुद्ध काँग्रेस' या प्रचाराला जातीयतेचा रंग चढू लागला. महाराजांबद्दल पूज्यभाव असणाऱ्या अठरापगड जातीतील तरुण समितीच्या विरोधात बाहू सरसावून उभे राहण्याच्या तयारीला लागले. समिती ज्या मार्गाचा अवलंब करून जनतेची दिशाभूल करीत होती त्याच मार्गाचा अवलंब समितीविरोधक करू लागले. १९२०-२१ मध्ये पुण्यात छत्रपतींच्या पुतळ्याचं अनावरण प्रिन्स ऑफ वेल्सच्या हस्ते होणार होतं. त्याला काही बुद्धिजीवींनी पत्रक काढून विरोध दर्शविला होता. त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. त्यावेळचा विरोध हा इंग्रज सत्ताधारी होते व आपण स्वातंत्र्यासाठी त्यांच्याशी लढत होतो म्हणून तो विरोध होता. त्या वेळी विरोध करणारे ब्राह्मणच होते व आताही विरोध करणारे ब्राह्मणच आहेत.

समितीला ब्राह्मणाचा टिळा लावून राजकीय मंडळींनी प्रतापगडावरच्या कार्यक्रमाची सांगड ब्राह्मणांचा विरोध म्हणून घातली. 'ब्राह्मण विरुद्ध इतर' असं वातावरण या कार्यक्रमाच्या निमित्तानं निर्माण होऊ लागलं. सत्यशोधक विचाराची बहुसंख्य मंडळी काँग्रेस पक्षात कार्यरत होती. काँग्रेस पक्षांतर्गत जेधे-मोरे त्यांचं नेतृत्व करीत होते. जातीय तेढ वाढविण्याचं कार्य समिती व काँग्रेसतर्फे होऊ लागलं. समितीचा द्वैभाषिक आणि नेहरूजींना जर विरोध होता, तर ज्या वेळी नेहरूजी टिळकांच्या जन्मशताब्दी सोहळ्याला आले असताना समितीनं त्या वेळी नेहरूजींना काळे झेंडे का दाखविले नाहीत? या कार्यक्रमाच्या वेळेसच समिती का विरोध करीत आहे? हा प्रश्न जनतेसमोर मांडू लागले. टिळक हे ब्राह्मण होते व छत्रपती शिवाजी महाराज मराठा आहेत म्हणून समितीचा कार्यक्रमाला विरोध आहे, असं जनतेच्या गळी उतरविण्याचं कार्य काही मंडळी करू लागली. उच्चभ्रू मंडळींनी नेहरूजींना ठार मारण्याचा कट केला आहे, अशी एक अफवा जनतेत पसरविण्यात आली. नेहरूजींच्या संरक्षणाकरिता बहुजनांनी बंदोबस्तासह तयार राहावं, असं जनतेला सांगण्यात येऊ लागलं. या संघर्षाला जातीयतेचं

खतपाणी घालण्याचं काम समिती व समितीला विरोध करणाऱ्यांकडून होऊ लागलं.

साहेबांवर राज्याचा प्रमुख म्हणून दुहेरी जबाबदारी येऊन पडली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचं उद्‌घाटन नेहरूजींच्या हस्ते शांततेत पार पडावयास पाहिजे आणि समाजजीवनात जातीयतेची तेढही निर्माण होता कामा नये. राज्याचा प्रमुख म्हणून साहेबांना हा प्रसंग हाताळावयाचा होता. कटुता आणि द्वेष टाळायचा होता. प्रथम साहेबांनी दोन्ही जातींमधील तेढ कमी कशी करता येईल यादृष्टीनं प्रयत्न सुरू केले. पुण्यातील टिळक जन्मशताब्दी महोत्सव व प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारक उद्‌घाटन समारंभाकडे जातीय भावनेतून पाहणे योग्य नाही. या दोन्ही घटना वेगवेगळ्या आहेत. या घटनांकडं जातीच्या पलीकडे जाऊन केवळ राष्ट्रीय पुरुषांच्या सन्मानाचे हे कार्यक्रम आहेत या दृष्टिकोनातून या कार्यक्रमांकडे पाहावं लागेल. या कार्यक्रमांना जातीय स्वरूप कुणी देत असेल तर ते मला मान्य नाही असा खुलासा साहेबांनी असेंब्लीमध्ये केला.

निदर्शनामुळं जातीयवाद फैलावून महाराष्ट्रात यादवीचं वातावरण निर्माण होण्याची चिन्हं पुण्यातील काही विचारवंतांना दिसू लागली. त्यांना खडबडून जाग आली. त्यांनी समितीनं निदर्शनं करण्याचा पुनर्विचार करावा व कटुता टाळावी, असं सांगितलं. या बुद्धिजीवींमध्ये रँ. र. पू. परांजपे, प्राचार्य दांडेकर, बाबुराव जगताप, वि. द. घाटे असे अपक्ष पुढारी, सामाजिक नेते, शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत यांचा समावेश होता. त्यांनी संयुक्त पत्रक काढलं. समितीच्या विधानपक्षानं निदर्शनाचा पुनर्विचार करावा. या कार्यक्रमाला निदर्शने करून गालबोट लावता कामा नये. महाराष्ट्रातील जनतेच्या उत्साहावर विरजण घालू नये. मन मोठं करून हा मंगलमय कार्यक्रम यशस्वी करावा, असं आवाहन या मंडळींनी समिती नेत्यांना केलं.

समितीच्या नेत्यांनी महाराष्ट्रातील समाजजीवनाला संघर्षाच्या एका टोकाला नेलं. महाराष्ट्रातील सर्व जाती-जमातींचं जीवन विस्कळीत केलं. एकसंध महाराष्ट्राची मनं कलुषित केली. रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी 'संयुक्त महाराष्ट्र समितीनं छत्रपती शिवाजी महाराजांना आपल्या आंदोलनात ओढू नये' असं पत्रक काढलं. पुण्याचे प्रथम नागरिक बाबुराव

सनस यांनी आंदोलकांना तंबी देणारं पत्रक काढलं. पत्रकात 'तुम्ही जर या कार्यक्रमाच्या निमित्तानं अराजक माजविण्याचा प्रयत्न केला तर अराजक माजविणाऱ्यांची गय केली जाणार नाही' अशी तंबी दिली. निदर्शने करणाऱ्यांचा निषेध करणारं पत्रक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी काढलं. त्यांनी समितीची निंदा करून निदर्शने करणाऱ्यांच्या निष्ठेवरच शंका व्यक्त केली. 'अफजलखानाच्या कबरीशेजारी विरोधकांच्या कबरी बांधण्याची आमची तयारी आहे' असे धमकीवजा पत्रक शंकरराव मोरे यांनी काढलं. थोर पुरुषांच्या कर्तृत्वाचा सन्मान होत असताना महाराष्ट्रात यादवी माजवणे योग्य नाही, अशा भावना रावसाहेब पटवर्धन यांनी व्यक्तिगत पत्रक काढून व्यक्त केली. समितीच्या नेत्यांच्या वक्तव्याबद्दलही त्यांनी खेद व्यक्त केला. एस. एम. जोशी यांनी नेहरूंना प्रतापगडावरील शिवछत्रपतींच्या स्मारकाचं उद्घाटन करण्याचा काय हक्क आहे? असा सवाल पुणे नगरपालिकेच्या निवडणुकीत उपस्थित केला. या वक्तव्यानं पटवर्धन अस्वस्थ झाले होते. समितीच्या नेत्यांची प्रक्षोभक वक्तव्ये लोकशाहीला शोभणारी नाहीत. लोकशाहीमध्ये आपल्या भावना व्यक्त करण्याचा अधिकार आहे; पण त्याला काही मर्यादा असतात. समितीच्या नेत्यांनी आपल्या मर्यादेचं उल्लंघन करून देवाणघेवाण, मतपरिवर्तनाची प्रक्रिया, तडजोड, वाटाघाटी या लोकशाही मार्गाला हरताळ फासलेला दिसतो. निदर्शने करणे हा तुमचा अधिकार लोकशाहीनं मान्य केलेला आहे; पण ती निदर्शने शांततेच्या मार्गाने व्हावीत. समितीचा रोष हा सरकारवर आहे. शिवछत्रपती स्मारकाचा कार्यक्रम हा शिवस्मारक समितीच्या वतीनं होत आहे. हा सरकारचा कार्यक्रम नाही. शिवस्मारक समितीच्या कार्यक्रमाच्या वेळी रक्तपात घडून आणण्याचा अधिकार तुम्हाला दिला कुणी? रक्तपाताची भाषा लोकशाहीत कुणाच्याही तोंडी शोभा देत नाही. प्रतापगडाच्या पायथ्याशी 'तीन कोटी वाघनखे एकत्र येऊन रक्ताचे पूर वाहतील' अशी भाषा अराजकाला आमंत्रण देणारी ठरणार आहे. ती लोकशाहीला काळिमा फासणारी आहे.

नेहरूजींनी माफी मागावी आणि मगच महाराष्ट्रात पाय ठेवावा, अशी धमकी समितीनं दिली. वि. स. पागे यांनी पत्रक काढून या धमकीचा पुनर्विचार समितीनं करावा, असं कळकळीचं आवाहन समितीला केलं. पुणेरी बुद्धिजीवींचं महाराष्ट्रावरील सावट फार काळ टिकेल, असे आता

वाटत नाही, असंही मत पागे यांनी व्यक्त केलं. दक्षिण साताऱ्यातील जनता या पुणेरी बुद्धिजीवींची सोय पाहण्याकरिता सज्ज झाली आहे. समितीच्या नेत्यांनी आमच्या खाजगी कार्यक्रमात अडथळा निर्माण केला तर त्यांचा समाचार घेण्याची आमची तयारी आहे. आमच्या छातीचा कोट करून हा कार्यक्रम आम्ही यशस्वी करून दाखवू, असं ठणकावून सांगितलं. राष्ट्रीय समारंभात घुसून घोषणाबाजी आदी थेर केल्यास त्याचा मुकाबला आम्ही आमच्या परीनं करू, असं पागे यांनी दक्षिण सातारावासीयांच्या वतीनं आपल्या एका भाषणात समितीच्या नेत्यांना सांगितलं.

वर्तमानपत्रातही दोन गट पडले. एक गट निदर्शने झालीच पाहिजेत या मताचा तर दुसरा गट निदर्शने ठेचून काढलीच पाहिजेत या मताचा होता. काही वर्तमानपत्रे तटस्थपणे परिस्थितीचं अवलोकन करून समितीला व समितीच्या विरोधकांना सबुरीचा सल्ला देत होती. जनता मात्र गोंधळून गेली होती. जनतेचा दबाव वाढतच होता. या सर्व गोंधळाचा परिणाम समितीत दोन प्रवाह निर्माण झाले. रक्तपाताची अतिरेकी भाषा करणारा एक गट तर दुसरा गट निदर्शनाच्या विरोधात दबक्या आवाजात बोलू लागला. काहींनी हा प्रश्न प्रतिष्ठेचा बनविला. महाराष्ट्रातील जनजीवन अस्थिरतेच्या भोवऱ्यात अडकले होते.

महाराष्ट्रातील या वैरभावाच्या वातावरणात काय करावे, यातून मार्ग कसा काढावा या विचारात साहेब गढून गेले. शिवगनिमी युद्धनीतीची आठवण साहेबांना झाली. 'शत्रूला जाळ्यात अडकविण्याकरिता दोन पावले मागे सरावे लागले तरी चालेल' ही ती रणनीती होती. साहेबांनी समन्वयकाची भूमिका घेऊन समितीतील दबक्या आवाजात निदर्शनाला विरोध करणाऱ्यांशी संधान साधलं. प्रतापगडावरील कार्यक्रम यशस्वी करून दाखवायचाच, असा विडा साहेबांनी उचलला होता. साहेबांच्या कारकीर्दीतील हा कार्यक्रम मैलाचा दगड ठरणार होता. प्रतापगडावर कार्यक्रमाची जय्यत तयारी चालू होती. नेहरूजींना प्रतापगडावर जाण्याकरिता रस्ता तयार करून पूर्ण झाला होता. युगपुरुष शिवछत्रपतींचा ३८ फूट उंचीचा अश्वारूढ पुतळा प्रतापगडावर पोहोचला होता. जगाच्या इतिहासात या कार्यक्रमाची नोंद व्हावी, महाराष्ट्राच्या इभ्रतीत भर पडावी, शिवछत्रपतींच्या नावलौकिकाची जगाच्या इतिहासानं दखल घ्यावी, असा हा कार्यक्रम व्हावा ही साहेबांची इच्छा होती.

मुंबईतील एका सत्कार समारंभात प्रतापगडावरील शिवछत्रपती स्मारकाच्या संदर्भात बोलताना साहेब म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराज भारताचा मानबिंदू आहेत. चाळीस कोटी जनतेच्या भावनेचा हा प्रश्न बनला आहे. जनतेच्या भावनेशी कुणी खेळण्याचा प्रयत्न करू नये. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला विरोध करणाऱ्यांची मानसिकता मला कळत नाही. ज्यांनी हे राज्य निर्माण केलं त्या जन्मदात्यालाच यांचा विरोध का? महाराजांच्या छत्रछायेखाली यांना संरक्षण मिळालं त्या संरक्षणकर्त्यालाच तुमचा विरोध का? मी विरोधकांना सावध करीत आहे. तुम्ही विस्तवाशी खेळू नका. हा निखारा का एकदा पेटला तर तुमच्या विरोधाची राखरांगोळी केल्याशिवाय राहणार नाही. खरे बुद्धिवादी जागे झाले आहेत. त्यांनी पोटभरू बुद्धिजीवींच्या विरोधात पत्रकबाजी सुरू केली आहे. ते बुद्धिवादी आहे आणि तुम्ही बुद्धिजीवी आहात. बुद्धीवर तुम्ही पोट भरीत आहात याची जनतेला जाणीव होत आहे. या बुद्धिजीवींना या महाष्ट्रात काय पाहिजे हे कळायला मार्ग नाही. जेव्हा जेव्हा या महाराष्ट्रात 'बहुजनसुखाय बहुजनहिताय'चे निर्णय घेण्यात आले तेव्हा तेव्हा या बुद्धीवर पोट भरणाऱ्या वर्गांनी विरोध दर्शविला. संत ज्ञानेश्वर घ्या, संत तुकाराम घ्या, जोतीबा फुले घ्या, शाहू महाराज घ्या आणि आता लोकशाहीमध्ये मी मुख्यमंत्री झालो तर मलाही विरोध! यांना शेवटी या महाराष्ट्राचं काय करायचं आहे हे तरी कळू द्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या कार्यक्रमात गोंधळ घालण्याचा जाणूनबुजून प्रयत्न कुणी करणार असतील तर शासनाचा प्रमुख म्हणून मलाही काही कटू निर्णय घ्यावे लागतील. ते निर्णय घेण्याची वेळ माझ्यावर येऊ देऊ नका. छत्रपती शिवाजी महाराज इतिहासाने आपल्याला दिलेली एक देण आहे. जगातील इतिहासकारांनी, विद्वानांनी म्हटलंय, 'हा महापुरुष आमच्या देशात जन्माला आला असता तर आम्ही जगावर राज्य केलं असतं.'

आमच्या देशात महाराज जन्माला आले हे आमचं भाग्य आहे. महाराष्ट्र तर त्यांची जन्मभूमी. त्यांच्या जन्मभूमीत त्यांच्या स्मारकाला विरोध करून आम्ही आमचा करंटेपणा जगासमोर दाखवीत आहोत. मी विरोधकांना सावध करतो, आपण आपल्या निदर्शनाचा पुनर्विचार करावा, तुम्हाला जनतेनं एका निवडणुकीत निवडून दिलंय. त्याचा उपयोग विधायक

कामासाठी करा, असं मी तुम्हाला आवाहन करीत आहे. निदर्शकांच्या प्रेतांवरून जाण्याची भाषा आता बदलली आहे, असं मला कळलंय. आता फक्त घोषणा देण्याचं ठरविण्यात आलं आहे. मी म्हणतो, घोषणा तरी कशासाठी? संयुक्त महाराष्ट्र मागण्याचा तुम्हाला हक्क आहे. त्याच्यासाठी आवश्यक घोषणा द्या; पण त्या प्रतापगडाच्या परिसरातच का? घोषणा देण्यासाठी भारताची भूमी तुम्हाला मोकळी आहे. माझं काम तुम्हाला सावध करण्याचं आहे. ते मी केलं आहे.''

संपूर्ण सातारा जिल्हा समितीच्या विरोधात पेटून उठला. ३० नोव्हेंबर ही तारीख जवळ येऊ लागली. वर्तमानपत्रात पत्रकबाजी, दम-प्रतिदमांनी महाराष्ट्रातील वातावरण ढवळून निघालं. सातारा जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील मावळे शिवशाहीच्या काळात पोहोचले. त्यांच्या अंगात शिवशाही संचारली. प्रतापगडाच्या पायथ्याशी पुन्हा युद्ध होणार असं बोललं जाऊ लागलं. शिवभक्त आणि समितीप्रेमी लाखोंच्या संख्येने प्रतापगडाच्या पायथ्याशी जमा झाल्यानंतर तिथं उद्‌भवणारी परिस्थिती नियंत्रणात ठेवणे शासनाला कठीण जाईल. अफजलखानाच्या सैन्याची जी लांडगेतोड अवस्था निर्माण झाली होती तशी समितीच्या कार्यकर्त्यांची होऊ नये, असा विचार करणारी मंडळी अस्वस्थ झाली. त्यांनी तहाची बोलणी सुरू केली. मवाळ धोरण स्वीकारणाऱ्या समितीच्या प्रतिनिधींनी साहेबांशी संपर्क साधला. कार्यक्रम हा दोन महापुरुषांच्या इभ्रतीचा झाला आहे. कार्यक्रम पार पाडीत असताना त्याला कुठलंही गालबोट लागता कामा नये याची काळजी दोन्ही बाजूंनी घेतली पाहिजे. त्याकरिता आपल्याला मार्ग काढावा लागेल, असं आपलं मत साहेबांनी समितीतील मवाळ प्रतिनिधींसमोर ठेवलं. चर्चेअंती समितीच्या देशावरील निदर्शकांनी वाईच्या पुढे आणि कोकणातील समितीच्या भक्तांनी पोलदपूरच्या पुढे चाल करून यायचं नाही, असं ठरलं. या दोन्ही ठिकाणी समितीच्या चेल्याचपाट्यांनी घोषणा द्याव्यात, सभा घ्याव्यात व आपला विरोध दर्शवावा. दोन्ही ठिकाणी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त राहील. पोलिसांनी परिस्थिती हाताळताना पोलिस बळाचा वापर समयसूचकतेनं करावा अशा सूचना साहेबांनी पोलिस अधिकाऱ्यांना दिल्या.

३० नोव्हेंबर १९५७ ला प्रतापगडावर शिवशाही अवतरली. गडाच्या

अंगाखांद्यावर मावळे दिसू लागले. संपूर्ण शिवप्रेमी मावळा प्रतापगडाच्या पायथ्याशी जमा झाला. प्रत्येकाच्या अंगात वीरश्री संचारलेली. मिळेल त्या गाड्यांनी, पायी, सायकलवर हातात भगवा ध्वज घेऊन मावळ्या वेशातील शिवभक्त प्रतापगडाच्या पंचक्रोशीत येऊन पोहोचला. जिकडे नजर पोहोचेल तिकडे दऱ्याखोऱ्यातून मावळे गड चढताना दिसताहेत. शिवप्रेमी व समितीचे कार्यकर्ते प्रत्यक्ष कुठेच आमने-सामने येणार नाहीत अशी वाहनव्यवस्था व रस्ते तयार करण्यात आले होते. नेहरूजी पुण्याहून वाईमार्गे प्रतापगडावर पोहोचणार होते. ठरल्याप्रमाणे वाई येथे समितीचा मोठा जनसमुदाय जमा झालेला होता. नेहरूजींची गाडी याच रस्त्यानं प्रस्थान करणार होती. नेहरूजी ठरलेल्या वेळेस वाईमार्गे प्रतापगडावर जाण्यास निघाले. नेहरूजींसमवेत साहेब गाडीत होते. रस्त्याच्या दुतर्फा नेहरूजींच्या स्वागतासाठी जनता उभी होती. रस्त्यात जागोजागी कमानी उभारलेल्या होत्या. गाव आणि कमानीजवळ नेहरूजींच्या गाडीचा वेग कमी करण्यात येत असे. नेहरूजींना लोक डोळे भरून पाहत आणि गाडीवर फुले उधळून स्वागत करीत. नेहरूजी या स्वागतानं भारावून गेले.

वाईजवळ मात्र घोषणाचं युद्ध पाहून नेहरूजींनी साहेबांना विचारलं, "हा एवढा मोठा एकत्र आलेला जनसमुदाय काय म्हणतोय?"

"लोक तुम्हाला दीर्घायुष्य चिंतित आहेत. त्याचबरोबर मुंबई महाराष्ट्राला मिळाली पाहिजे अशा घोषणा देत आहेत." साहेब.

"ते घोषणा का देत आहेत? ते माझ्यावर नाराज आहेत काय?" नेहरूजी.

"नाही. ते आपल्यावर नाराज नाहीत, ते द्वैभाषिक राज्यनिर्मितीवर नाराज आहेत." साहेब.

"मग त्यांना द्वैभाषिक राज्य नको का?" नेहरूजी.

"त्यांना मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र हवाय. तो तुम्ही त्यांना द्यावा म्हणून घोषणा देत आहेत ते." साहेब.

"त्यांच्यापासून मुंबई कोण हिरावून घेत आहे?" नेहरूजी.

या चर्चेच्या ओघात नेहरूजींची गाडी वाईच्या पुढे कुठलाही अनुचित प्रकार न घडता सुखरूप महाबळेश्वरमार्गे प्रतापगडाकडे निघाली. समितीचा उद्देश सफल झाला होता. साहेबांनी या घोषणांचा फायदा घेऊन जनतेची

नाराजी नेहरूजींच्या कानावर घातली. यानिमित्तानं साहेबांनाही आपलं मन नेहरूजींकडं मोकळं करता आलं.

प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण नेहरूजींनी करताच लाखो शिवभक्त आणि मावळ्यांनी जल्लोष केला. गगनभेदी तोफांचे कानठळ्या बसविणारे आवाज दणाणले. डफ, तुताऱ्या, चौघड्यांच्या आवाजाने व 'हर हर महादेव'च्या ललकाऱ्यांनी प्रतापगड शहारला. प्रतापगडाला पूर्वेतिहास आठवला. नेहरूजींनी महाराष्ट्रातील जनतेच्या शिवाजी महाराजांवरील प्रेमाची प्रचीती अनुभवली. शिवरायांनी या पराक्रमी वीरांच्या जीवावर स्वराज्य स्थापन केलं. या पराक्रमाची नोंद जगाने घेतली. या महान युगपुरुषाच्या कार्याचा गौरव करण्याची संधी आपल्याला मिळाली याबद्दल स्वत: नेहरू धन्य झाले. 'महाराष्ट्राची जनता बहादूर व शूरवीर आहे' असे गौरवोद्गार त्यांनी काढले. 'न भूतो न भविष्यति' असा हा कार्यक्रम साहेबांनी यशस्वीपणे पार पाडला. याचं समाधान साहेबांना लाभलं. प्रतापगडावरून वाईमार्गे परत येत असताना पायी, सायकलवरून शिवप्रेमी व समितीचे कार्यकर्ते परतीच्या वाटेवर नेहरूजींचं स्वागत करत घोषणाही देत होते. नेहरूजी उत्साही दिसत होते.

ते साहेबांना म्हणाले, "पंजाबी रागवतात लवकर आणि विसरतातही लवकर; परंतु तुम्ही मराठी लोक मोठे विलक्षण आहात. तुम्हाला लवकर राग येत नाही व आल्यानंतर तुम्ही तो लवकर विसरत नाहीत."

प्रतापगडावरील कार्यक्रम यशस्वी पार पाडल्याबद्दल साहेबांनी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांचे आणि जनतेचे आभार मानले, धन्यवाद दिले. सातारा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची फलटण येथे एक बैठक घेण्यात आली.

त्या बैठकीत साहेब म्हणाले, "शिवछत्रपतींनी राष्ट्राला इतिहास व नीतिमान संस्कृती दिली. महाराजांच्या या पुण्याईला अव्हेरून पुढे जाण्याचा प्रयत्न समितीनं केला. त्यांचा अहंकार हा कार्यक्रम पाहून आपोआप गळून पडला. छत्रपती शेवटी जगात मान्यता पावलेले महान द्रष्टे पुरुष होते. त्यांचं नाव, कार्य अजरामर आहे व ते अजरामर राहणार आहे. या कार्यक्रमानं राष्ट्रनिष्ठाशी महाराष्ट्राच्या निष्ठा निगडित आहेत, त्या वेगळ्या नाहीत हे सिद्ध केलं हे आपल्याला भूषणावह आहे." समितीनं सहकार्य केल्याबद्दल समितीलाही त्यांनी धन्यवाद दिले.

साहेबांनी प्रतापगडावरील कार्यक्रम यशस्वीपणे हाताळून महाराष्ट्रात होणारी यादवी टाळली. या कार्यक्रमाविषयी प्रसिद्धीमाध्यमानं अग्रलेख लिहून साहेबांच्या चातुर्याला दाद दिली. बुद्धिवादी, विचारवंत, डोळस समाजसेवक यांना महाराष्ट्र राज्याची सूत्रं साहेबांच्या हाती सुरक्षित आहेत याची जाणीव झाली. साहेबांच्या नेतृत्वाचे गुणगान गाण्यास डोळस मध्यमवर्गीयांनी सुरुवात केली. बुद्धिजीवी मात्र पूर्वग्रहदूषित हेतू मनात ठेवून साहेबांना अडचणीत गाठण्यासाठी अधिक जोमाने कामास लागले.

'त्यांच्यापासून मुंबई कोण हिरावून घेत आहे?' या पंडितजींच्या उद्गाराने साहेबांच्या मनात संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या आशा पल्लवित झाल्या. नेहरूजींचं मतपरिवर्तन करून आपण मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळवू शकतो हा आत्मविश्वास साहेबांमध्ये वाढीस लागला. या उत्साहाच्या भरात साहेब राज्यातील जास्तीत जास्त लोकोपयोगी कार्यक्रम आखून राबवू लागले. सामान्य जनतेला न्याय देण्याच्या कामास लागले. साहेबांच्या कामाच्या पद्धतीवर केंद्र सरकार समाधानी होतं. देशातील दोन कार्यक्षम राज्यांपैकी द्वैभाषिक राज्य हे एक असल्याचा अभिप्राय दस्तुरखुद्द नेहरूजींनी दिला. चव्हाण हे सर्वोत्तम मुख्यमंत्री असल्याचे जयप्रकाश नारायण यांनी प्रमाणित केले. अल्पकाळात एवढी भक्कम कामगिरी करणारा एकमेवाद्वितीय मुख्यमंत्री चव्हाण असल्याचं प्रशस्तिपत्र के. एम. मुन्शी यांनी दिलं. वर्तमानपत्रांनी समिती ब्राह्मण्यग्रस्त असल्याचा मार्मिक प्रचार केल्यानं बहुजनांच्या मनात समितीविरोधी वातावरण निर्माण करण्यात वर्तमानपत्रे यशस्वी झाली. याचा फायदा साहेबांची प्रतिमा उजळून निघण्यात झाला.

शेतमजुराच्या आणि प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणणारा कूळ कायदा साहेबांनी महाराष्ट्रात राबविण्याचं ठरविलं. मध्यमवर्गीय जमीन मालकांची नाराजी साहेबांनी ओढवून घेतली; पण 'कसेल त्यांची जमीन' हे तत्त्व एकदा मान्य केल्यानंतर त्यासंदर्भात तडजोड नाही. कूळ कसवत असलेली जमीन १ एप्रिल १९५७ या तारखेला त्यांनी खरेदी केल्याचं ठरविण्यात आलं. कसणाऱ्यांचा दिवस म्हणून तो जाहीर करण्यात आला. कब्जे, हक्क कुळांना देण्यात आले. हा कूळ कायदा १९५६ मध्ये पास करण्यात आला होता. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी १ एप्रिल १९५७ला करून साहेबांनी भूमिहिनांना व

प्रत्यक्ष राबणाऱ्यांना न्याय मिळवून दिला. असाच एक तुकडेजोड कायदा अस्तित्वात होता; पण त्याची अंमलबजावणी करण्यात आली नव्हती. १ एप्रिल १९५९ पासून नवीन तुकडेजोड, तुकडेबंदी हा नवा कायदा पास करून त्याची प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात आली. खास जमीनधारा पद्धती नाहीशी करण्याबाबतचे कायदे अमलात आणून महाराष्ट्रातील जहागीरदारीचा अंत करण्यात आला.

गुलामगिरीची पद्धत कुठल्या का कारणांनी असो, ती दलित समाजावर लादली गेली आहे. ती नष्ट केली पाहिजे या विचाराचे साहेब होते. गुलामगिरीच्या प्रथेतून समाज आत्मभान व स्वाभिमान गमावून बसतो. ही गुलामगिरी समाज व मानव विकासाच्या आड अडथळा निर्माण करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार वतनदारी नष्ट करण्याचा सतत प्रयत्न केला; पण त्यांच्या हयातीत त्यांना यश आलं नाही. महार वतनदारीमुळं दलितांच्या मनात गुलामगिरीची पाळंमुळं एवढी खोलवर रुजलेली आहेत की, ती उखडून टाकण्याची दलित वर्गाची मानसिक तयारीच नाही. गुलामगिरी मनोवृत्तीचा नायनाट करण्याकरिता महार वतनदारी कायदा रद्द करणे दलितांच्या हिताकरिता आवश्यक आहे. डॉ. आंबेडकरांनी १९२२ व १९३७ मध्ये अटीतटीचे प्रयत्न करून पाहिले; पण त्यात त्यांना यश मिळालं नाही. १९२२ ते १९५२ पर्यंत मुंबई असेंब्लीमध्ये वर्णवाद्यांचे वर्चस्व होते. प्रथमच १९३७ मध्ये काही प्रमाणात बहुजन समाजाला असेंब्लीमध्ये प्रतिनिधित्व मिळाले. साहेबांनी आपले जिवलग मित्र आत्माराम पाटील यांना १९३७ च्या निवडणुकीत उभं करून निवडून आणलं. आमदार आत्माराम पाटील पुण्यात घर करून राहू लागले. साहेब वकिलीचं शिक्षण पुण्यात घेत असताना आत्माराम पाटील यांच्याकडे राहायचे. आत्माराम पाटलांच्या माध्यमातून १९३७ मध्ये महार वतन कायदा रद्द करण्याचे प्रयत्न केले.

साहेब आत्माराम पाटलांना म्हणाले, "या महार वतनानं दलितांवर बरेच अन्याय-अत्याचार केले. या वतनापायी संपूर्ण हयातभर गावकीची कामं दलितांना करावी लागतात. कामाच्या बदल्यात कुठलाच मोबदला त्यांना मिळत नाही. ऊन, पाऊस, थंडी या निसर्गनिर्मित संकटात त्यांना आपला जीव धोक्यात घालून कामं करावी लागतात. या अमानवीय

परिस्थितीतून या वर्गाची सुटका करण्याकरिता असेंब्लीत आवाज उठविला पाहिजे.''

''साहेब, मी माझ्या परीनं महार वतन कायदा रद्द कसा करता येईल याकरिता प्रयत्न करतो. असेंब्लीमध्ये खेरांचे वर्चस्व आहे. आम्ही पुरोगामी विचारांचे लोकप्रतिनिधी अल्पमतात आहोत.'' आ. पाटील

''मानवेंद्रनाथ रॉय हे श्रेष्ठीला सांगून मुख्यमंत्री खेर यांच्यावर दबाव आणून हा कायदा रद्द करावयास लावू शकतात.'' साहेब.

आ. आत्माराम पाटील यांनी सर्व मार्गांचा अवलंब करूनही त्यांना यश आलं नाही. त्यांनी साहेबांकडे असमर्थता व्यक्त केली. असेंब्लीमध्ये बहुजनांच्या उत्कर्षाच्या बाबतीत कुठलाच विचार होत नसे. वर्णवर्चस्ववाद्यांची मजबूत पकड असेंब्लीवर होती. या प्रतिगाम्यांचं वर्चस्व मोडून काढण्यासाठीच पुढे महाराष्ट्राच्या राजकारणात शे. का. पक्षाचा उदय झाला. साहेबांनी विद्यार्थिदशेत महार वतनदारी कायदा रद्द करण्याचा प्रयत्न करून पाहिला; पण त्यात त्यांना यश आलं नव्हतं.

महार वतनदारी कायदा विद्यार्थिदशेत प्रयत्न करूनही साहेबांना रद्द करता आला नव्हता. ही खंत साहेबांच्या मनाला लागून होती. योगायोग असेल किंवा नियतीच्या मनात असेल, आपल्या राजकीय जीवनातील सत्तासूत्रे साहेबांनी १४ एप्रिल या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मदिनी पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून स्वीकारली. साहेबांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रं हाती घेताच वंचित वर्गाच्या हिताचे व सुखाचे दिवस कसे आणता येतील त्याकरिता पूरक धोरण आखून साहेबांनी निर्णय घेण्यास सुरुवात केली. कूळ कायदा, जमीन तुकडेबंदी असे दीनदुबळ्यांच्या हिताचे निर्णय साहेबांनी घेतले. साहेबांनी दलितांची मानसिक गुलामगिरीतून सुटका करणारा निर्णय घेतला. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या हयातीत पंचवीस-तीस वर्षे संघर्ष करूनही महार वतन कायदा रद्द करण्यात त्यांना यश आलं नाही. साहेबांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रं स्वीकारल्यानंतर १९५८ ला असेंब्लीमध्ये 'बॉम्बे इन्फिरिअर व्हिलेज बॉन्टस अॅक्ट १९५८' हा कायदा संमत करून घेतला. हजारो वर्षांपासून महार वतनाच्या जोखडात अडकून पडलेल्या महार बांधवांची मुक्तता केली. मुक्ततेच्या संदर्भात साहेबांनी फार बोलकी प्रतिक्रिया व्यक्त केली.

म्हणाले, "डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या हयातीत हा प्रश्न सुटला असता तर मला अधिक समाधान मिळालं असतं. डॉ. बाबासाहेबांचं अधुरं राहिलेलं स्वप्न मी पूर्ण करू शकलो याचं मला समाधान आहे."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर त्यांचे अनुयायी बौद्ध धर्माकडे आकृष्ट झाले. बहुसंख्य अस्पृश्य समाजानं बौद्ध धर्म स्वीकारला. अस्पृश्यांना देण्यात येत असलेल्या सवलती नवबौद्धांना देण्याचं नाकारावं असा दबाव शासनावर येऊ लागला. अस्पृश्यांना मिळत असलेले हक्कही नाकारण्यात यावे यावरून देशात आणि महाराष्ट्रात वादंग निर्माण झाले. समाजात उलटसुलट चर्चा सुरू झाली. वर्णाभिमानी पडद्याआडून सूत्र हलवून छुपा विरोध करू लागले. देशभरात खलबतं होऊ लागली. धर्मांतर केल्यानंतर सोयीसवलती व हक्क देता येतात का यावर देशभर खल सुरू झाला. साहेब भारतातील एकमेव मुख्यमंत्री निघाले, ज्यांनी नवबौद्धांना सवलती व हक्क देण्याचे मान्य केले.

या सवलती आणि हक्क देण्यामागची भूमिका स्पष्ट करताना साहेब म्हणाले, "अस्पृश्यांना सवलती का दिल्या ते आपण तपासून बघितले पाहिजे. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यानं त्यांना या सवलती देण्यात आल्या आहेत. ते कुठल्या धर्माचे आहेत म्हणून या सवलती दिल्या नाहीत. धर्म बदलून कुठल्याही समाजाची आर्थिक उन्नती होत नाही. धर्म हा आत्मसन्मानाचं समाधान देतो. जिथे आत्मसन्मान मिळतो त्या धर्माकडे लोक आकृष्ट होतात. बुद्ध धर्मामध्ये अस्पृश्यांना आत्मसन्मान मिळाला म्हणून त्यांनी बुद्ध धर्म स्वीकारला. त्यांनी धर्म बदलला म्हणून त्यांना सवलती आणि हक्क आपल्याला नाकारता येत नाहीत. उलट त्यांचं दारिद्र्य जलदगतीनं नष्ट करण्याकरिता आपल्याला काय उपाययोजना कराव्या लागतील त्या आपण केल्या पाहिजेत."

साहेबांचा हा निर्णय ऐतिहासिक ठरला. महाराष्ट्र हे एकमेव राज्य ठरलं की, ज्याने नवबौद्धांच्या सवलती व हक्क अबाधित ठेवले. समाजपरिवर्तनासाठी उचललेलं हे एक पाऊल होतं.

शिक्षण माणसाला आत्मभान मिळवून देतं यावर साहेबांचा विश्वास होता. साहेबांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रं हाती घेताच खेरांनी इंग्रजी विषयाच्या संदर्भात जो निर्णय घेतला होता तो रद्दबातल ठरवून इंग्रजी विषयाचं

शिक्षण पूर्ववत सुरू केलं. उच्च शिक्षणाच्या बाबतीतही साहेब सतर्क होते. उच्च शिक्षणाच्या सोयीसुविधा ज्या भागात सामान्य जनतेपर्यंत पोहोचल्या नव्हत्या त्या सुविधा उपलब्ध करून देण्याचं धोरण साहेबांनी आखलं. मराठवाडा निजाम राजवटीत असताना उच्च शिक्षणाकरिता मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना हैदराबादला जावं लागायचं. ऐपत असणारेच उच्च शिक्षण घेऊ शकत होते. गोरगरिबांची मुलं हुशार असूनही त्यांना आर्थिक परिस्थितीमुळं उच्च शिक्षणाला मुकावं लागे. मराठवाडा विभागाकरिता एक विद्यापीठ असावं ही निकड लक्षात घेऊन साहेबांनी जस्टिस एस. एम. पळणीटकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्यात सेतुमाधवराव पगडी, डॉ. वि. भि. कोलते, एफ. बी. तय्यबजी, शामराव कदम, डोंगरकेरी, वैशंपायन, शेंदारकर, एम. बी. चिटणीस यांची सदस्य म्हणून नियुक्ती केली. या समितीनं डिसेंबर १९५७ पर्यंत आपला अहवाल सरकारला सादर केला. साहेबांनी या अहवालास मंत्रिमंडळाची मंजुरी घेतली. मराठवाड्यातील महाविद्यालये उस्मानिया विद्यापीठाशी संलग्न होती. त्याची मुदत संपत आली होती. जून ५८ पासून या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाची स्थापना करणे आवश्यक होते.

मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेचा दिवस जवळ येऊन ठेपला. या विद्यापीठ स्थापनेच्या उद्‌घाटनाकरिता साहेबांनी नेहरूजींना आमंत्रित केलं. नेहरूजींनी साहेबांच्या निमंत्रणाचा स्वीकार केला. २३ ऑगस्ट १९५८ या दिवशी नेहरूजींच्या शुभहस्ते मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. साहेबांनी स्वागतपर भाषणात मराठवाड्याचा इतिहास उभा केला.

"याच मराठवाड्यात छत्रपती शिवाजी महराजांचे पूर्वज नांदले, बुद्धकालीन वेरूळ, अजिंठा लेण्यांच्या साक्षीनं प्राचीन संस्कृतीचा वारसा मराठवाड्याला मिळाला. मराठीचे आद्यकवी मुकुंदराज याच भूमीत जन्माला आले. यादवांचा अभेद्य देवगिरी किल्ला आजही अभिमानाने ताठ उभा आहे. या शहरात दक्षिणेतील ताजमहाल 'बीबी का मकबरा' प्रेमाची साक्ष देत उभा आहे. नांदेडमध्ये गुरुगोविंदसिंगजीचं कर्तृत्व मोठ्या अभिमानानं जतन करण्यात आलं आहे. दक्षिण गंगा जिला संबोधण्यात येतं ती गोदावरी नदी या भागातील जमिनीची तहान भागवून शेतकऱ्यांचं जीवन फुलवीत आहे. मराठवाडा विभागातील जनतेनं संघटितपणे रझाकाराच्या

विरोधात सशस्त्र लढा उभारून जनतेचं संरक्षण केलं. अन्याय, अत्याचारापासून जनतेला वाचवलं. अनेक ज्ञात-अज्ञात वीरांनी मराठवाड्याच्या मुक्तीसाठी आपल्या प्राणाची आहुती दिली. वानगीदाखल म्हणून मी काही नावांचा नामोल्लेख करतो, ज्यांची नावं मला आठवणार नाहीत त्यांच्याही बलिदानाची दखल शासन घेणार आहे. वसमत तालुक्यातील वापटीचे बहिर्जी शिंदे, बीडचे बलभीमराव कदम, नांदेड जिल्ह्यातील अर्धापूरचे पानसरे यांचं बलिदान मराठवाड्याच्या कायम स्मरणात राहील. यांच्या बलिदानानं मुक्त झालेला मराठवाडा महाराष्ट्रात लहान भाऊ म्हणून सामील झाला. तो मोठ्या अपेक्षेनं मोठ्या भावाकडे पाहतोय. या लहान भावाचं संगोपन करणं हे मोठ्या भावाचं कर्तव्य आहे. त्याच भावनेतून शिक्षणाची मुहूर्तमेढ देशाच्या भाग्यविधात्याच्या हस्ते आज आपण रोवली आहे. उच्च शिक्षणाची दारं तुमच्याकरिता आज उघडी झाली आहेत. या संधीचा लाभ दलित, वंचित, उपेक्षित वर्गांनी घ्यावा. आपला विकास करून घ्यावा. शासन तुम्हाला कुठलीच कमतरता पडू देणार नाही अशी मी तुम्हाला ग्वाही देतो.'' नेहरूजींनी महाराष्ट्राच्या विकासाची आणि साहेबांची मुक्तकंठाने स्तुती केली.

नेहरू म्हणाले, ''मी मोठ्या आत्मविश्वासानं द्वैभाषिक राज्याची सूत्रं चव्हाण यांच्या हाती सोपविली. माझा हा निर्णय माझ्या काही सहकाऱ्यांना आवडला नाही. महाराष्ट्रात अनेक दिग्गज नेते असताना त्यांना डावलून एका सामान्य किसान पुत्र चव्हाणांच्या हाती महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि जागृत प्रदेशाची सूत्रं काय म्हणून नेहरूजींनी दिली? असा सूर निघत हाता; पण या किसानपुत्र चव्हाणांनी माझा विश्वास सार्थ करून दाखविला. मला त्यांच्या कर्तृत्वाचा अभिमान वाटतो. चव्हाणांसारखे इतर राज्यातील कर्तृत्ववान मुख्यमंत्री मला मिळाले तर मी भारताला सुजलाम सुफलाम करून दाखवील. देशाचं भविष्य उज्ज्वल करण्याचं माझं स्वप्न चव्हाण महाराष्ट्रात साकार करीत आहेत. मराठवाड्यातील जनतेवर अन्याय-अत्याचार झाले याची मला जाणीव आहे. तुम्हाला शिक्षणापासून वंचित राहावं लागलं त्यामुळं तुमचा विकास होऊ शकला नाही. आता या संधीचा फायदा घेऊन तुम्ही स्वत:चा विकास करून घ्याल अशी मी अपेक्षा बाळगतो.''

शिक्षणापासून कुणी वंचित राहू नये म्हणून साहेबांनी शासनाची तिजोरी गोरगरिबांच्या शिक्षणासाठी उघडी केली. उच्च शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी खुले केले. या निर्णयावर शिक्षणक्षेत्रात खळबळ उडाली. 'मास एज्युकेशन की क्लास एज्युकेशन?' असा वाद शिक्षणक्षेत्रातील मक्तेदारांनी निर्माण केला. साहेबांना आपले बंधू गणपतरावांची आठवण झाली. हे सर्व निर्णय घेण्यामागची प्रेरणा गणपतरावांची आहे. नादारीच्या अर्जावर धनदांडग्याची शिफारस घेण्यासाठी बंधू गणपतरावांसोबत धनदांडग्यांच्या घरी गेले असता तिथं या दोन्ही बंधूंना त्यांच्याकडून मिळालेली मानहानीकारक वागणूक साहेबांना आठवली. अशी मानहानीकारक वेळ वंचितांवर येऊ नये म्हणून साहेबांनी शिक्षणक्षेत्रातील मूठभर मक्तेदारांच्या कोल्हेकुईकडे दुर्लक्ष केलं. गणपतरावांनी आपल्याला वाचावयास दिलेले महात्मा जोतीबा फुले यांचे साहित्य आणि त्यात त्यांनी शिक्षणाबद्दल व्यक्त केलेले विचार साहेबांना आठवले.

"विद्येविना मति गेली,
मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली,
गतिविना वित्त गेले,
वित्तविना शूद्र खचले,
इतके अनर्थ
एका अविद्येने केले."

साहेब विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने ग्रामीण भागात जात असत. त्यांच्या दयनीय अवस्थेची चौकशी करीत असत. यातून साहेबांच्या हे लक्षात आलं की, शाळेचे शुल्क भरण्याची ऐपत या वर्गाची नाही. शेतकरी, शेतमजूर व बाराबलुतेदारांची मुलं शिक्षणापासून वंचित राहत आहेत. देशाच्या राज्यघटनेनं १४ वर्षांखालील सर्वांना शिक्षण मोफत व सक्तीचं देण्याची हमी दिलेली आहे. याचा आधार घेऊन साहेबांनी ई.बी.सी. (इकॉनॉमिकली बॅकवर्ड क्लास) ची सवलत दिली. ज्याचं वार्षिक उत्पन्न रु. ९०० च्या आत आहे अशांच्या सर्व पाल्यांना शुल्कमाफीचा आदेश काढला. या सर्व विद्यार्थ्यांचे शुल्क शासन भरू लागलं. या निर्णयानं शिक्षणक्षेत्रात क्रांती घडवून आणली. यावर बुद्धीचा ठेका बाळगणाऱ्यांनी

कडवट प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली. त्यात प्रामुख्याने रँ. परांजपे यांचा उल्लेख करावा लागेल.

त्याचं म्हणणं होतं, "उच्चशिक्षणाचा चांगला उपयोग करण्याची लायकी नसतानाही त्यांना असल्या अभ्यासक्रमाचे दरवाजे खुले ठेवणे म्हणजे राज्याच्या संपत्तीचा दुरूपयोग करणे व शिक्षणाचा दर्जा उतरविणे होय, असे माझे स्पष्ट मत आहे."

साहेबांनी या आणि अशा अनेकांच्या प्रतिक्रियांकडे दुर्लक्ष करून सामान्य माणसाला सुशिक्षित करून सोडायचं हा ध्यास घेतला. साहेबांच्या शिक्षणाच्या धोरणाबद्दल शहरी उच्चवर्णीयांच्या प्रतिक्रियेच्या उलट ग्रामीण भागातील एका सामान्य शेतकऱ्याची प्रतिक्रिया होती. जनरल थोरातांचे वडील पी. सी. पाटील यांनी शिक्षणाच्या बाबतीत बोलकी प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे.

ते म्हणतात, "पाटलांना जेव्हा तलवारीचा मान होता तेव्हा पाटील तलवार घेऊन पुढे जायचा आणि कुलकर्णी, तलाठी त्याच्या मागे जायचे. पुढे कुलकर्णी शिकला. त्याच्या पाठीमागे पाटील दप्तर घेऊन जाऊ लागला."

या शिक्षणाने सुशिक्षितांचे लोंढेच्या लोंढे बाहेर पडतील. त्यांच्या पोटापाण्याचा आणि नोकरीचा विचार करणे आवश्यक होते. कृषी व औद्योगिक क्षेत्राची आणि शिक्षणाची सांगड घातल्यास या सुशिक्षित बेकारांचा प्रश्न मार्गी लागेल असा साहेबांना आत्मविश्वास होता. अनेक शिक्षणतज्ज्ञ भविष्यात हे सुशिक्षित तरुण बंड करून उठतील अशी भीती व्यक्त करीत असत.

त्यावर साहेबांनी "अडाण्याच्या बेकारीऐवजी उद्या सुशिक्षित बेकार बंड करून उठणार असतील तर त्याचे मी स्वागत करील. हे सुशिक्षित बेकारच महाराष्ट्राचे औद्योगिक विश्व भावी काळात फुलवतील हा माझा विश्वास आहे" अस मत व्यक्त केलं.

महाराष्ट्रात नवीन औद्योगिक धोरण येऊ घातले आहे. त्याला कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे याचं भान साहेबांना होतं.

साहेब नेहमी म्हणत, "उच्च शिक्षण घेतल्यावर मराठी तरुणांनी उद्योगधंद्यात पडावे. दुसऱ्यांचे उद्योग व कारखाने न चालविता स्वतःचे

कारखाने चालवावेत. अशा प्रकारे शिक्षणाचा उद्देश व शिक्षण घेतलेल्यांची दृष्टी बदलली की, महाराष्ट्रात सामाजिक व आर्थिक विषमता नाहीशी होईल.''

या मनोभूमीची योग्य मशागत करून कर्तृत्वाचे भरघोस पीक काढण्यासाठी साहेब उत्सुक आणि अधीरही आहेत. साहेब द्वैभाषिक राज्यात जे शिक्षण धोरण राबवीत आहेत त्याची भारतीय पातळीवर चर्चा होऊ लागली. या सर्व शैक्षणिक कार्याची दखल अलिगढ मुस्लिम विद्यापीठानं घेतली. अलिगढ मुस्लिम विद्यापीठानं साहेबांना 'ऑनररी डिग्री ऑफ एल.एल.डी.' ही पदवी प्रदान करून साहेबांच्या शिक्षणक्षेत्रांतील कार्याचा गौरव केला. या दीक्षांत समारंभात साहेबांनी शिक्षणाबद्दल जे परिवर्तनवादी विचार व्यक्त केले त्याची दखल राष्ट्रीय पातळीवरच्या शिक्षण धोरणात घ्यावी लागली.

साहेब म्हणाले, ''समाजाचे जे घटक अनेक शतके दडपले गेले होते आणि शिक्षणाचे फायदे ज्यांना मिळू दिले नाहीत त्या घटकांना आपली उन्नती करून घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली आहे. विद्यापीठ व महाविद्यालये यात होणाऱ्या गर्दीला ही इच्छाही अंशतः कारणीभूत आहे. सामाजिकदृष्ट्या वरच्या पायरीवर जाण्याचे साधन एवढीच काहींची शिक्षणाबद्दल दृष्टी असेल; पण जातीनिष्ठ व श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या कल्पनांवर आधारलेल्या समाजातही निकोप व नैसर्गिक दृष्टी आहे असे म्हणावे लागेल. ज्या तरुण मुलामुलींच्या आईवडिलांना व आजोबा-आजींना शिक्षणाचा लाभ घेता आला नसेल त्यांना शिक्षणामुळे आपली परिस्थिती सुधारेल म्हणून यावेसे वाटले तर त्याविरुद्ध काय आक्षेप असणार आहे? एवढेच नव्हे तर दूरदृष्टीने बोलावयाचे तर शिक्षणाच्या प्रसारात त्यांची गुणवत्ताही सुधारण्याची शक्यता आहे. आपल्या विद्यापीठात जितके अधिक विद्यार्थी येतील ते गुणवत्तेच्या दृष्टीने निवड करण्यास उपयुक्त ठरतील. शिक्षणाचा दर्जा सांभाळण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे ते आपले सर्व लक्ष यावरच केंद्रित करतील. शिक्षणाच्या दर्जातही सुधारणा होणे अशक्य आहे असे मला वाटत नाही.

उच्च शिक्षणाचा प्रसार ही माझ्या मते आपल्या देशातील एक प्रभावी लोकशाही शक्ती आहे. जोपर्यंत हे शिक्षण समाजातील मूठभर

लोकांना मिळत होते तोपर्यंत आपल्या समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात सर्वोत्कृष्ट उच्च विद्याविभूषित अशा लोकांची संख्या अल्प असेल आणि या स्थितीत या मूठभर लोकांची प्रगती खुंटली, त्यांचा अध:पात झाला की समाजाचाही अध:पात होण्याचा धोका असतो. अज्ञान व अशिक्षितता या परिस्थितीत वाढलेल्यांची बौद्धिक पातळी वाढली, बौद्धिक क्षितिजे रुंदावत गेली, त्यांच्यातील सुप्त गुणांचा उपयोग करण्याची त्यांना शक्य तितकी अधिक संधी मिळाली तर फक्त गुणवत्तेच्या जोरावर आपण आपले नेतृत्व मिळवू शकू. असे झाले की सामाजिक दर्जा, जात, कौटुंबिक परंपरा इत्यादी घटक बाजूला पडतील. आपल्या राजकीय जीवनांच्या दृष्टीने पाहता हे असे होणे इष्ट ठरणार आहे. उच्च शिक्षणाकरिता होत असलेली गर्दी व त्यातून निर्माण होत असलेले बेशिस्तीचे वातावरण शिक्षणक्षेत्रात चिंताजनक आहे. विद्यार्थ्यांच्या या बेशिस्तीतून निर्माण होणारे प्रश्न माझ्या मते मुख्यत: विद्यापीठांनीच हाताळले पाहिजेत. मला फक्त एवढेच सांगावयाचे आहे की, आपले उच्च शिक्षण आणि देश यांच्या भवितव्याबद्दल चिंता करणाऱ्या सर्वांनाच आपल्या विद्यापीठातील ही परिस्थिती चिंत्य वाटते.''

द्वैभाषिक राज्याच्या प्रगतीबरोबर भावनिक एकात्मता वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न साहेब करीत आहेत. मराठीभाषिक प्रांताबरोबर गुजरात प्रांताच्या भागातही साहेब जनतेची मनं सांधण्याचा प्रयत्न करू लागले. महागुजरात समितीनं गुजरातमधील जनतेला द्वैभाषिकाच्या विरोधात भडकाविण्याचे उद्योग चालूच ठेवले होते. गुजराती मंत्र्यांनाही गुजरातमध्ये फिरणे मुश्कील करून टाकले. साहेब मात्र आत्मविश्वासाने गुजरातमध्ये हिंडू-फिरू लागले. साहेबांनाही जनतेच्या रोषाचा प्रतिकार सहन करावा लागत होता. कधीकधी तर हिंसक प्रकाराला तोंड द्यावं लागे. एकदा गोळीबारही करावा लागला. संरक्षणाचं कवच भोवती असल्यानं कुठला अनुचित प्रसंग घडला नव्हता. विदर्भातही अधूनमधून धुसफूस डोकं वर काढायची. गुजराती आणि मराठी भावांनी एकत्र राहावं असा निर्णय लोकसभेनं घेतला; पण या दोन्ही भावांनी सुखासमाधानानं नांदावं अशी काही मंडळींची इच्छा दिसत नव्हती. कुरापत काढून भांडण लावण्यात आपल्यातील काही मंडळी बुद्धी आणि शक्ती खर्च करण्यात गुंतली होती.

गुजरात आणि विदर्भाच्या दौऱ्यावर असताना साहेब एक लोककथा सांगायचे - दोन भाऊ गुण्यागोविंदानं एका खेड्यात नांदत होते. त्यांच्यात कसलाच वाद नव्हता. एकदिलानं व एकजुटीनं राहत असल्यानं त्यांच्या कुटुंबाची भरभराट होऊ लागली. ही भरभराट गावातील टवाळखोर व कुरापतखोर वृत्तीनं पछाडलेल्या कंपूच्या डोळ्यात खुपू लागली. या दोघा भावांमध्ये भांडण लावण्याचा उद्योग या मंडळींनी सुरू केला. घरात कारभारणींमध्ये धुसफूस सुरू झाली. याचा फायदा उचापतीखोर मंडळींनी उचलला. शेवटी दोघा भावांनी वेगळं राहण्याचा निर्णय घेतला. वेगळं निघायचं म्हणजे जमीनजुमला, भांडीकुंडी, ढोरंवासरं, जनावरं, कर्ज सर्व वाटून झालं. गाय एकाच्या वाट्याला तर वासरू दुसऱ्याच्या वाट्याला. मायलेकराची ताटातूट केली. एका दाराची दोन दारं झाली. दोघं भाऊ समजदार होते. पुढे कसलाच वाद व्हायला नको म्हणून आईच्या समक्ष लिखापढी करून घेऊ म्हणून ते दोघे आपल्या आईकडे गेले. आई दूरदर्शी होती.

आईनं विचारलं, "घेतलं का सर्वकाही वाटून?"

"हो, आम्ही आपापसात सर्वकाही वाटून घेतलं." मुलं.

"घरदार, शेतीपोती सगळं काही वाटून झालं?" आई.

"हो, झालं वाटून." मुलं.

"अरेपण, मी राहिले की! माझी वाटणी कशी करणार?" असा प्रश्न त्या मातेनं आपल्या लेकरांना विचारला: दोन्ही मुलं एकमेकांच्या तोंडांकडे पाहू लागली. गप्प झाली. त्यांनी वेगळं होण्याचा बेतच रद्द केला..."

मला यातून तुम्हाला एकच सांगायचं आहे की, या मातृभूमीची वाटणी करू नका. आपण गुण्यागोविंदानं नांदूया. आपला विकास करून घेऊया. या उचापतीखोरांपासून सावध राहा हेच सांगण्यासाठी मी आपल्याकडे आलो आहे.

द्वैभाषिक राज्य विकासाच्या बाबतीत भारतात अग्रेसर म्हणून गणलं जाऊ लागलं. भावनिक एकात्मता निर्माण करण्यात म्हणावं तसं यश राज्यकर्त्यांच्या पदरी पडत नव्हतं. ८० टक्के जनता ग्रामीण भागात शेतीत काबाडकष्ट करून आपलं जीवन जगत होती. शेती ही संपूर्णत:

निसर्गाच्या भरवशावर अवलंबून होती. निसर्गाच्या लहरीपणामुळं शेतकरी नेहमी संकटात सापडत. कधी अतिवृष्टी तर कधी अवर्षण. त्यातून दुष्काळ. या दुष्टचक्रातून शेतकरी पिळून निघायचा. शेती व उद्योगक्षेत्राची सांगड घालून शेतकऱ्यांचं व त्यावर अवलंबून असणाऱ्यांचं जीवन सुखी-समाधानी व्हावं याकरिता साहेब रात्रंदिवस धडपडताहेत. अवर्षणाच्या तावडीतून शेतकऱ्यांची सुटका करण्याकरिता पाटबंधारे योजना युद्धपातळीवर राबविली पाहिजे असा विचार साहेब करू लागले. उद्योगांच्या वाढीसाठी वीज ही मूलभूत गरज आहे. जलविद्युतनिर्मिती ही धरणाच्या माध्यमातून करता येईल. थर्मल पावर स्टेशनची उभारणीही यासोबत करून घेण्याचं साहेबांनी ठरवलं.

कोयना जलविद्युत योजनेचा २०७ फूट उंचीच्या धरणाचा कॉंक्रिट बांध बांधण्याचे काम १९५८ ला साहेबांच्या हस्ते सुरू करण्यात आले. या योजनेनं महाराष्ट्राच्या जीवनात प्रकाश निर्माण केला. सामान्य जनतेचं भाग्य उजळून निघालं. कोयना धरणातून निर्माण होणाऱ्या विजेमुळं महाराष्ट्राचं औद्योगिक चक्र गतिमान झालं. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर पाच लक्ष किलोवॅट वीज महाराष्ट्राला व देशाला मिळू लागली. हा प्रकल्प स्वतंत्र भारताच्या भविष्याचा मानबिंदू ठरला.

मराठवाड्याच्या जीवनात क्रांती घडवून आणणारा पूर्णा प्रकल्प साहेबांच्या दूरदृष्टीचं प्रतीक आहे. सिद्धेश्वर,येलदरी हे त्याचं फलित आहे. नीरा नदीवरील वीर येथील वीर धरण बांधण्याची धाडसी योजना साहेबांच्या धाडसाची साक्षी आहे. या धरणामुळं नीरा खोऱ्याचा कायापालट झाला.

विदर्भातील पारस वीजनिर्मिती योजना साहेबांनी १९५६ मध्ये आखली. १९५७ मध्ये विद्युत केंद्राच्या इमारतीचा कोनशिला समारंभ पार पडला. १९५९ मध्ये यंत्राची पायाभरणी झाली. प्रत्यक्षात १९६१ ला विदर्भाला वीज मिळू लागली. या आणि अशा योजना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात राबवून निसर्गाला मानवाच्या उत्कर्षासाठी वापरून त्यांचं जीवनमान उंचविण्याची धोरणं साहेबांनी राबविली. मोठमोठे उद्योग उभे राहू लागले. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे हजारो सुशिक्षित तरुण या कारखान्यात रोजीरोटी मिळवू लागले. शिक्षण, शेती, उद्योग यांची सांगड घालून द्वैभाषिक राज्याला साहेबांनी देशपातळीवर पहिल्या क्रमांकावर नेऊन उभं केलं.

म्हैसूर आणि मुंबई राज्याच्या सीमाप्रश्न प्रकरणी १९५९ साली राज्य पुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाला. सीमाभागातील मराठी भाषिकांनी उचल खाल्ली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसोबत सीमावादही तापू लागला. याबाबतीत साहेबांनी म्हैसूर राज्याचे मुख्यमंत्री निजलिंगप्पा यांच्याशी संपर्क साधून चर्चेचा मार्ग मोकळा केला. या दोन्ही राज्यांनी विभागीय मंडळे तयार केली होती. या मंडळांनी आपापसांत चर्चा करून हा सीमावादाचा प्रश्न मार्गी लावावा असे ठरले. मुंबई राज्याच्या वतीनं एक मसुदा तयार करून या मसुद्याला विधानसभेची मंजुरी घेतली. हा मसुदा विभागीय मंडळासमोर सादर केला. म्हैसूर राज्याचे मुख्यमंत्री निजलिंगप्पा यांच्याशी पत्रव्यवहार सुरू झाला. निजलिंगप्पा यांनी सीमावादाच्या संदर्भातील पत्रव्यवहाराला जे उत्तर दिलं ते महाराष्ट्राच्या भावनेला ठेच पोहोचविणारं होतं. त्यांनी अशी सूचना केली की, कारवार, बेळगाव, निपाणी यांना वगळून आपण राहिलेल्या प्रश्नांसंबंधी लोकवस्तीचे ६० टक्के प्रमाण गृहीत धरून चर्चा करू.

निजलिंगप्पांच्या सूचनेचा स्वीकार करणं साहेबांना शक्य नव्हतं. चर्चा बंद करूनही चालणार नाही. चर्चा चालूच ठेवली पाहिजे. कारण हा प्रश्न मराठी भाषिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न होता. म्हैसूर सरकारला या प्रश्नात स्वारस्य नव्हतं. कारण राज्य पुनर्रचनेला समितीनं त्यांच्या झोळीत त्यांच्या अपेक्षेपेक्षा जास्त दान टाकलं होतं. त्यांची मागणी होती १०० टक्के तर राज्य पुनर्रचना समितीनं त्यांना दिले ११० टक्के. म्हैसूर सरकार या प्रश्नाकडे फारशा गांभीर्यानं पाहत नव्हतं. हा प्रश्न समझोत्याच्या मार्गानं व विधायक प्रयत्नानं सुटावा अशी साहेबांची इच्छा होती. साहेब व निजलिंगप्पा यांची मुंबईत या प्रश्नासंबंधी बैठक झाली. निजलिंगप्पा आपला हेका सोडावयास तयार नव्हते. साहेबांनी त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. कारण प्रश्न तर सुटला पाहिजे. साहेब आणि निजलिंगप्पा यांनी दोन्ही राज्यांच्या मुख्य सचिवांनी एकत्र येऊन प्रश्न सोडविण्यासाठी चर्चा करावी व यातून मार्ग काढून दोन्ही शासनास चर्चेचा अहवाल सादर करावा असं ठरविलं.

१९५८ ला म्हैसूर सरकारमध्ये फेरबदल होऊन निजलिंगप्पांच्या जागी जत्ती मुख्यमंत्री झाले. नव्यानं साहेबांनी जत्तींसोबत चर्चा सुरू केली.

जत्ती या सीमाप्रश्नाकडे अत्यंत क्षुल्लक बाब म्हणून पाहत होते. सीमावाद हा जत्ती यांच्या मते अत्यंत किरकोळ व गौण प्रश्न आहे. अशा परिस्थितीत साहेबांनी ८ जुलै १९५८ रोजी म्हैसूरचे मुख्यमंत्री जत्ती यांच्यासोबतच चर्चा केली.

चर्चेच्या सुरुवातीलाच जत्ती म्हणाले, "तुम्ही निपाणी घेऊन टाका आणि हा वाद मिटवून टाका." साहेबांना जत्तींचं म्हणणं काही पटलं नाही.

साहेब जत्तींना म्हणाले, "मी माझ्या सरकारतर्फे आपल्याकडे काही गावांची भीक मागायला आलो आहे असं कृपाकरून समजू नका. प्रथम आपल्या मनातून हे काढून टाका. भाषावार पुनर्रचनेवर आधारित जो भाग मुंबई राज्यात यावयास पाहिजे तो तुम्ही आम्हाला द्यावा व त्याच आधारावर जो भाग म्हैसूर राज्यात असावयास पाहिजे तो भाग आम्ही सोडावयास तयार आहोत."

ही चर्चा इथेच थांबली. चर्चा इथं थांबून चालणार नाही. साहेबांनी हा प्रश्न धसास लावण्याच्या दृष्टीनं प्रयत्न सुरू ठेवले. एखादा लवाद नेमून हा प्रश्न सोडवावा अशी चर्चा सुरू झाली. लवादाचा निर्णय बंधनकारक राहील हा धोका पत्करून साहेबांनी लवाद मान्य केला. म्हैसूर सरकारनंही लवादास मान्यता दिली. पाटसकर निवाड्याप्रमाणे हा प्रश्न लवादाने सोडवावा असा आग्रह साहेबांनी धरला; पण म्हैसूर सरकारला हे मान्य नव्हतं. सीमाप्रश्नाच्या संदर्भात साहेबांनी विधानसभेत आपलं मत व्यक्त केलं.

म्हणाले, "मुंबई व म्हैसूर राज्यांतील सीमा प्रामुख्यानं भाषिक तत्त्वावर आधारलेल्या आहेत. तेव्हा सीमेलगतच्या प्रदेशाची पुनर्रचना करताना भाषिक संघपणा हे मार्गदर्शक तत्त्व मानण्यात यावं. सीमा निश्चित करण्याचा योग्य अधिकार ज्यांना दिला असेल त्यांनी भाषिक अल्पसंख्याकांचा प्रश्न हा अत्यंत मामुली स्वरूपाचा राहील अशा प्रकारे सोडविणे हे त्यांचे उघडच कर्तव्य राहील."

विधानसभेतील एक सदस्य देशपांडे यांनी "तुम्ही असे मख्ख का बसून राहिलात?" असे साहेबांना विचारले होते.

साहेबांना असा प्रश्न विचारल्याबद्दल त्यांना आता पश्चात्ताप होत

आहे, असं त्यांनी स्वत:च कबूल केलं होतं. साहेबांनी त्या सदस्याचे आभार मानले. एका वयोवृद्ध गृहस्थाने सांगितलेली गोष्ट साहेबांनी देशपांडे यांना सांगितली. ती गोष्ट अशी -

खूप भांडकुदळ आणि तोंडाळ बायको आणि शांतपणे तिचे म्हणणे ऐकून घेणारा नवरा या कुटुंबातील ही गोष्ट आहे.

ती भांडकुदळ बायको आपल्या नवऱ्याला म्हणते, "मी तुम्हाला एवढ्या मोठ्याने ओरडून सांगते आहे आणि तुम्ही असे मख्ख काय बसून राहिला आहात? या कानाने ऐकता आणि त्या कानाने सोडून देता!"

नवऱ्याने उत्तर दिलं, "कमीतकमी मी एका कानाने ऐकतो आणि दुसऱ्या कानाने सोडून तरी देतो. तू दोन्ही कानांनी ऐकूनही तुझ्या तोंडातून बाहेर येत आहे."

जोराने आणि ओरडून बोलण्याने प्रश्न सुटत नसतात याची जाणीव साहेबांना होती.

शेवटी साहेब म्हणाले, "म्हैसूर आणि मुंबई राज्यातील जनतेमध्ये कटुतेची भावना न येऊ देता जनतेचं हित लक्षात घेऊन यातून मार्ग काढला पाहिजे."

१९५८ च्या सप्टेंबरमध्ये साहेबांची अखिल भारतीय कार्यकारिणीवर निवड झाली. दिल्लीच्या चकरा वाढल्या.

कामानिमित्तानं साहेब दिल्लीला गेले असताना नेहरूजींनी साहेबांना सांगितलं, "मला आता सवड नाही. तुम्ही मला हैदराबादला काँग्रेस महासमितीची बैठक होईल त्या वेळी गाजावाजा न करता एकटं भेटा."

नेहरूजींना काही महत्त्वाचं साहेबांशी बोलायचं होतं. ते बोलणं गुप्तही राहावं असा संकेत त्यांच्याकडून साहेबांना मिळाला. साहेबांचं विचारचक्र सुरू झालं. प्रतापगडावरील कार्यक्रम संपवून नेहरूजी आणि साहेब परतीच्या मार्गावर असताना नेहरूजींनी विचारलेला प्रश्न साहेबांना आठवला.

"मुंबई त्यांच्यापासून कोण हिरावून घेत आहे?" हे नेहरूजींचं वाक्य साहेबांनी हृदयात साठून ठेवलं होतं. या वाक्याचा अर्थ लावून साहेबांनी आपल्या मनाची तयारी केली. हैदराबाद येथे होणाऱ्या बैठकीत

नेहरूजींची भेट घ्यायची अन् द्वैभाषिकांबद्दल आपलं मत स्पष्ट व्यक्त करायचं.

हैदराबाद येथील अधिवेशनाच्या वेळी पाकिस्तानात सत्तांतर होऊन मिर्झा यांनी सत्ता काबीज केली होती. त्यावर नेहरूजी बोलत असताना मध्येच बोलणे थांबवून त्यांनी साहेबांना बोलावून घेतले व भेटीसंदर्भात बोलले. दुसऱ्या दिवशी दुपारच्या भोजनाअगोदर बाहेर पडून जेवण करू, जेवणानंतर थोडी विश्रांती घेऊ आणि ठीक अडीच वाजता आपण भेटू, असं साहेबांना नेहरूजींनी सांगितलं. दुसऱ्या दिवशी ठीक अडीच वाजता साहेब नेहरूजींच्या भेटीस गेले. साहेब आल्याचा निरोप मिळताच नेहरूजींनी विश्रांतीच्या खोलीत साहेबांना बोलावून घेतलं. साहेबांना विश्वासात घेऊन नेहरूजींनी काही प्रश्न विचारले.

महाराष्ट्रातील परिस्थितीविषयी प्रामुख्यानं नेहरूजींनी साहेबांचं प्रांजळ मत विचारलं. विदर्भ व गुजरातमधील मंत्र्यांशी साहेबांचे संबंध कसे आहेत, कारभार यंत्रणा कशाप्रकारे चालू आहे, अधिकाऱ्यांचा प्रतिसाद कसा आहे असे अनेक प्रश्न त्यांनी साहेबांना विचारले. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची साहेबांनी सविस्तर माहिती दिली.

म्हणाले, "महाराष्ट्रातील परिस्थिती स्फोटक; पण नियंत्रणात आहे. जनतेच्या हिताची कामे प्रगतिपथावर आहेत. अधिकारी व प्रशासनातील कर्मचारीवर्ग सहकार्य करीत आहे. विदर्भातील मंत्री प्रामाणिकपणे सहकार्य करीत आहेत. त्यांचं मतपरिवर्तन झाल्याचं त्यांच्या सहकार्य करण्याच्या भावनेतून व्यक्त होतं. गुजरातमधील मंत्री हातचं ठेवून वागतात. आपली नाराजी खाजगीत व्यक्त करतात. कदाचित मी मुख्यमंत्री असल्यानं माझ्याकडे स्पष्ट मत व्यक्त करण्यास ते कचरत असतील. आपण माझ्या अपरोक्ष त्यांना त्यांचं मत विचारावं? द्वैभाषिकाचा विकासरथ विनाअडथळा चालत आहे. पण..."

"पण काय?" नेहरूजी.

"पण जनता समाधानी नाही." साहेब.

"लोक समाधानी का नाहीत?" नेहरूजी.

"लोक असंतुष्ट आहेत. त्याचं कारण द्वैभाषिक. विकास तर होणारच आहे. विकास करणं सरकारचं कामच आहे. त्याकरिता द्वैभाषिकाची गरज

काय? या प्रश्नाचं उत्तर आम्ही जनतेला समाधानकारक देऊ शकत नाही हे माझं मत आहे. आपण इतर मंत्र्यांनाही बोलावून त्यांचं मत अजमावून बघा. त्यांच्या इतर काही कल्पना असतील ते त्या आपल्याकडे व्यक्त करतील.'' साहेब.

साहेबांच्या या विश्लेषणावर नेहरूजींनी स्मितहास्य केलं आणि म्हणाले, ''तुमचं विश्लेषण बरोबर आहे. मी इतरांची मतं याअगोदरच अजमावली आहेत. शासकीयदृष्ट्या द्वैभाषिक यशस्वी आहे; पण राजकीयदृष्ट्या जनतेच्या मनात असंतोष खदखदतोय असाच तुमचा निष्कर्ष आहे ना? तुम्ही हे मत मंनातून व्यक्त केलं आहे ना?'' साहेबांनी नेहरूजींच्या या प्रश्नाला होकार दिला.

नेहरूजी त्यावर साहेबांना म्हणाले, ''तुम्ही तुमचं मत स्पष्ट व्यक्त केलं हे फार बरं केलं. आपल्या या संभाषणाबद्दलची बातमी या कानाची त्या कानाला कळता कामा नये.''

''या संभाषणाची कुठेही वाच्यता करणार नाही'' असा शब्द साहेबांनी नेहरूजींना दिला आणि तो शेवटपर्यंत पाळला. ही चर्चा १९५८ च्या मध्यास झाली.

नेहरूजींचे डिसेंबर १९५८ ला मुंबई उपनगरात कार्यक्रम होते. साहेबांनी नेहरूजींची राजभवनाऐवजी आरे वसाहतीत थांबण्याची व जेवणाची व्यवस्था केली होती. दुपारचे जेवण संपवून मी थोडी वामकुक्षी घेतो आणि तुम्हाला बोलावतो, असे नेहरूजींनी साहेबांना सांगितले. जेवण संपल्यानंतर नेहरूजी आराम करावयास त्यांच्या विश्रांतीगृहात गेले. साहेब थोडे तणावमुक्त मूडमध्ये आपल्या कक्षात थांबले. लगेच नेहरूजींचे साहेबांना बोलावणे आले. साहेब तातडीनं नेहरूजींच्या आराम कक्षाकडे जावयास निघाले. कक्षाबाहेर नयनतारा सहगल-नेहरूजींची भाची हिनं साहेबांना अडवलं.

म्हणाली, ''या वेळेस तुम्ही पंडितजींची झोपमोड कशासाठी करीत आहात?''

''मला पंडितजींनी भेटण्यास बोलावलं आहे म्हणून मी आलोय.'' साहेब.

''तुम्हाला तसा निरोप आला का?'' नयनतारा सहगल.

"होय." साहेब.

नयनतारा सहगल साहेबांना नेहरूजी ज्या कक्षात आराम करीत होते तिथे घेऊन गेल्या. पंडितजी आपल्या पलंगावर आडवे झालेले होते. पंडितजींनी साहेबांना बसायचं सांगितलं. नयनतारा सहगल कक्षाबाहेर गेल्या.

हैदराबादच्या चर्चेची आठवण देऊन लगेच पंडितजींनी साहेबांना विचारलं, "द्वैभाषिक राज्याची विभागणी करून दोन स्वतंत्र राज्ये निर्माण केली तर जनतेचं समाधान होईल का?"

"निश्चितचं जनतेचं समाधान होईल." साहेब.

"दोन्ही राज्यांत काँग्रेसला बहुमत मिळेल का? काँग्रेसला १९५७ च्या निवडणुकीत कमी जागा मिळाल्या होत्या." पंडितजी.

"याबाबतीत मी विचार केला नाही; पण मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला तर महाराष्ट्रात हमखास काँग्रेसला यश मिळेल. याबाबत मी माझ्या सहकाऱ्यांशी चर्चा करून पुढील बैठकीत आपणास वस्तुस्थिती सांगू शकेल." साहेब.

पुढील बैठकीत माहिती घेण्याचं नेहरूजींनी मान्य केलं. भेट संपली. नेहरूजींना काँग्रेसच्या बहुमताची हमी हवी होती.

जानेवारी १९५९ ला काँग्रेसचं अधिवेशन नागपूरला घेण्यात आलं. साहेबांकडे या अधिवेशनाचं यजमानपद होतं. नेहरूजींचा मुक्काम राजभवनावर होता. नेहरूजी अधिवेशनसमयी त्या भागातील जनतेच्या आवर्जून भेटी घेत असत. त्यांच्या प्रश्नांसंबंधी चर्चा करीत असत. नागपूर आणि विदर्भातील जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करीत असताना साहेबांना हजर राहावं लागे. साहेबांची आणि नेहरूजींची वारंवार भेट होऊ लागली. अधिवेशन संपण्याच्या एक दिवस अगोदर संध्याकाळी नेहरूजींचे साहेबांना बोलावणे आले. या भेटीच्या वेळेसही साहेब आणि नेहरूजी दोघेच होते.

नेहरूजींनी साहेबांना विचारले, "द्वैभाषिक राज्याची विभागणी केल्यावर काँग्रेसला बहुमत मिळेल का? यावर विचार करून आलात का?"

"होय, मी विचारविनिमय करून आलो आहे. आपल्याला बहुमत मिळेल असा मला विश्वास आहे." साहेब.

"बहुमत कसं मिळेल हे मला पटवून द्या." नेहरूजी.

"तांत्रिक दृष्टिकोनातून आपण अल्पमतात आहोत. विधानसभेतील पंधरा सदस्य हे केवळ संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर विरोधात आहेत." साहेब.

"ते आपल्या पक्षात येतील का?" नेहरूजी.

"ते आपल्या पक्षात येतील की नाही हे मला सांगता येणार नाही; पण द्वैभाषिकाची विभागणी होत आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात येत आहे हे कळताच ते आपल्याला पाठिंबा देतील. कदाचित पक्षातही येतील." साहेब.

"मला त्यांची नावे कळण्याची आवश्यकता नाही; पण ते पाठिंबा देतील हे निश्चित आहे का? त्यांचा तुमच्यावर विश्वास आहे का?" नेहरूजी.

"होय, ते माझ्या संपर्कात आहेत." साहेब.

मार्च किंवा मेमध्ये मोरारजींसोबत एक बैठक घ्यावी लागेल, असं मत नेहरूजींनी व्यक्त केलं. साहेबांनी या बैठकीस संमती दिली. मोरारजींसोबत विचारविनिमय करून पुढे धोरण निश्चित करण्याचे ठरवून ही भेट संपली.

द्वैभाषिकाच्या प्रश्नासंबंधीची एप्रिल-मेच्या दरम्यान घ्यावयाची बैठक साहेबांच्या आजारपणामुळे पुढे ढकलली. साहेबांना किडनीच्या आजारानं घेरलं होतं. शस्त्रक्रिया करून घेणं साहेबांना भाग पडलं. या शस्त्रक्रियेतून धडधाकट व्हायला साहेबांना दोन-तीन महिने जावे लागले. यादरम्यान नेहरूजींनी साहेबांच्या तब्येतीची चौकशी केली.

म्हणाले, "आता तब्येत कशी आहे? कामकाजात लक्ष घालता आहात का?"

"हो, मी नियमितप्रमाणे कामाला सुरुवात केली आहे." साहेब.

"मग आता आपण द्वैभाषिकाबद्दल चर्चा करावयास तुमची काही हरकत नसल्यास तारीख निश्चित करूया का?" नेहरूजी.

"माझी काहीच हरकत नाही. तुमच्या सोयीनुसार तारीख ठरवा." साहेब.

"ऑगस्टमध्ये घेऊया? १९ किंवा २०ला तुम्ही यावे. बैठकीपूर्वी एक-दोन प्रमुख व्यक्तींसोबत चर्चा केलेली बरी, असं मला वांटतं." नेहरूजी.

ठरलेल्या तारखेस साहेब दिल्लीला जावयास निघाले. निघण्यापूर्वी

मोरारजी यांना दिल्लीला येत असल्याचे साहेबांनी कळविले. साहेब दिल्लीत मोरारजींकडे उतरत. नेहरूजींना भेटायला जाण्यापूर्वी मला भेटून जावे, असा निरोप मोरारजींनी साहेबांना दिला होता. मोरारजींना सवड मिळाल्यानंतर त्यांनी साहेबांना चार वाजता बोलावून घेतले. मोरारजी अस्वस्थ असल्याचे साहेबांना जाणवले.

मोरारजींनी साहेबांना विचारले, "द्वैभाषिकाची परिस्थिती कशी आहे?"

साहेबांनी महाराष्ट्र व गुजरातमधील जनमानसांचा कानोसा मोरारजींच्या कानावर टाकला. मोरारजींनी साहेबांचं म्हणणं शांतचित्तानं ऐकून घेतलं. कुठलीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही व रागही व्यक्त केला नाही.

साहेबांचं ऐकून घेतल्यावर मोरारजी म्हणाले, "चव्हाण, हे तुमचं प्रामाणिक मत असेल तर मला काही म्हणावयाचं नाही; पण ही घटना अत्यंत दुर्दैवी व क्लेशकारक आहे हे मात्र खरं."

या चर्चेनंतर साहेबांनी व मोरारजींनी एकत्र भोजन केलं. इकडच्या तिकडच्या विषयांवर गप्पा मारल्यानंतर दोघेही एकाच गाडीनं गोविंद वल्लभ पंत यांच्या निवासस्थानी पोहोचले. नेहरूजी आणि पंत आपापसांत बोलत बसले होते.

हे दोघे त्यांच्यात जाऊन बसताच नेहरूजी म्हणाले, "चव्हाण, तुमचा द्वैभाषिक राज्याच्या संदर्भातला काय अनुभव आहे तो सांगा पाहू..."

द्वैभाषिक राज्याचा राज्यकारभार चालविताना आलेला अनुभव साहेबांनी सविस्तर कथन केला.

म्हणाले, "गुजराती आणि मराठी बांधवांचे एकमेकांशी संबंध सलोख्याचे आहेत. राज्यकारभारही चोख चालू आहे. विकासकामांनी गती घेतलेली आहे. दोन्ही समाजातील ताणतणाव कमी झाल्याचा प्रत्यय येत आहे; पण दोन्ही समाजाच्या मनात कुठेतरी असमाधानाची भावना खदखदत असल्याची शंका येते. द्वैभाषिकाचा प्रयोग राबविण्यास मी समर्थ आहे. हे धोरण राबविताना मला समाधान मिळत नाही. कारण दोन्ही समाज द्वैभाषिक धोरणावर खूश नाहीत. आपण त्यांच्या मनाच्या विरोधात त्यांच्यावर हे धोरण लादीत आहोत, अशी भावना जनतेत निर्माण झाली आहे."

"मराठी जनतेचं आम्ही समजू शकतो; पण गुजरातीही समाधानी नाहीत हे तुम्ही कशाच्या आधारे म्हणता?" पंत.

साहेब उत्तर देताना म्हणाले, "मी माझ्या दररोजच्या अनुभवावरून हे सांगत आहे. मी मुख्यमंत्री या नात्यानं दोन्ही प्रांतांतील जनतेचे प्रश्न समजून घेण्यासाठी, त्यांच्याशी चर्चा करण्याकरिता त्यांच्या भागात जातो. त्यांच्या भावना समजावून घेतो. १९५७ साली मी अहमदाबादला गेलो होतो. तिथे जनतेने हिंसक निदर्शने केली. त्यांना काबूत आणण्यासाठी गोळीबार करावा लागला. पुढे या गोळीबाराची मी न्यायालयीन चौकशी केली. न्या. कौतवाल यांची चौकशीसाठी नेमणूक केली. मी स्वत: चौकशीला सामोरा गेलो. सर्व जबाबदारी माझ्यावर घेतली. या चौकशी समितीनं अहवालातं माझी स्तुती केली. गुजरातमधील काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांची सहकार्य करण्याची इच्छा आहे; पण जनता बिथरलेली आहे. त्यांच्या भावनांचा उद्रेक झाला तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मी माझं प्रामाणिक मत आपल्यासमोर व्यक्त केलंय."

मोरारजींच्या चर्चेचा रागरंग लक्षात आला. गोविंद वल्लभ पंत यांना विचारण्यात आलं, "पुढे काय?"

"चव्हाण, यांचे हे अनुभव असतील तर आपल्याला काहीतरी निर्णय घ्यावा लागेल." पंत.

मोरारजींना त्यांचं मत विचारण्यात आलं त्या वेळी मोरारजी म्हणाले, "द्वैभाषिक राज्याचा फेरविचार करण्याच्या मी विरोधात आहे. माझ्या मनाला ते पटत नाही. द्वैभाषिक राज्याचा फेरविचार करा, असं मी सांगणार नाही. चव्हाणांचे मत वेगळे आहे. त्याचा विचार मात्र आपल्याला अवश्य करावा लागेल. जगात अनेक द्वैभाषिक राज्ये आहेत आणि राजकीयदृष्ट्या ती यशस्वीपणे चालली आहेत."

"मोरारजीभाईंच्या मताशी मी सहमत आहे; परंतु द्वैभाषिक राज्य राबविण्याची कल्पना आमच्याच माथी का मारण्यात आली? असं लोक विचारतात. यासाठी आमचीच निवड का करण्यात आली? या प्रश्नांना आमच्याजवळ समाधानकारक उत्तर नाही. ही गोष्ट त्यांच्या मनाला डाचते. इतरांचा हक्क तुम्ही मान्य करता; परंतु आमचा हक्क मात्र तुम्ही डावलता... हे कुठंतरी मनाला बोचतंय. मराठी जनता याबद्दल जागृत आहे. त्यांच्या भावना अधिक तीव्र आहेत. त्यांच्यातील आपल्यावर अन्याय झाल्याची भावना उफाळून येते. त्यांना पटवून देणे अवघड होऊन बसते." साहेब.

यावर मोरारजी मत व्यक्त करताना म्हणाले, "इतर राज्यांत ही कल्पना राबविण्याचा विचार होता. केरळ आणि तामिळनाडू एकत्र ठेवून तेथे द्वैभाषिक राबवायचे ठरले होते; पण ही कल्पना कामराज यांनी मानली नाही. त्यांनी ती फेटाळून लावली."

मोरारजींनंतर साहेब म्हणाले, "द्वैभाषिकाच्या विरोधात मी नाही. जनतेच्या मनाचा विचार केल्यास राजकीयदृष्ट्या हा प्रयोग फसलेला आहे, असं माझं स्पष्ट मत आहे."

या बैठकीला चौघेच हजर होते. या चर्चेनंतर ही बैठक संपली. ही बैठक निर्णायक ठरली.

या बैठकीचा वृत्तांत दिल्ली, मुंबई व अहमदाबाद इत्यादी ठिकाणच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाला. नेहरूजींच्या वर्तुळातून तो वृत्तांत पसरविण्यात आला असावा. साहेब दिल्लीहून मुंबईला येताच भेटणाऱ्यांची रीघ लागली. विधानसभेचं अधिवेशन चालू होतं. साहेबांच्या मंत्रिमंडळातील एक सहकारी जीवराज मेहता यांना हा विधिमंडळाचा विश्वासभंग झाला असं वाटलं. त्यांचा गैरसमज साहेबांनी दूर केला. द्वैभाषिकाची फेरपुनर्रचना दृष्टिक्षेपात आली असताना ढेबर यांचा फेरपुनर्रचनेला विरोध होता. ढेबर हे या वेळी काँग्रेसचे अध्यक्ष होते.

त्यांनी नेहरूजींना प्रश्न केला, "गुजरात जनतेची समजूत कशी काढणार? त्यांना ही बदललेली भूमिका कशी पटवून सांगणार?"

नेहरूजींच्या स्वभावातले एक वैशिष्ट्य होते. अशाप्रसंगी ते आपल्या कोशात जाऊन बसत. तसे ते बसले.

साहेबांनी नेहरूजींना विचारले, "फेरविचाराचे पाऊल कसे टाकायचे?"

त्यांनी मोरारजी आणि ढेबर यांचे म्हणणे ऐकविले. साहेबांनी या दोघांच्या शंकेचे निरसन करावे असे नेहरूजींनी सांगितले. ही प्रक्रिया येथेच थांबली तर जनतेच्या रेट्याला कसे तोंड द्यायचे हा प्रश्न साहेबांसमोर उभा ठाकला. साहेब बेचैन झाले.

विदर्भात अणे यांच्या उचापतीनं जोर धरला. जनता अणे यांच्या चिथावणीला बळी पडून असंतोष व्यक्त करू लागली. ढेबर, मोरारजी आणि विदर्भाच्या असंतोषाला तोंड देण्यासाठी साहेब सज्ज झाले. नेहरूजींनी हे अडथळे कसे दूर करावयाचे याची जबाबदारी साहेबांवर टाकली. साहेबांनी

वसंतराव नाईक, शेषराव वानखेडे, नासिकराव तिरपुडे, काझी यांना बोलावून नेहरूजींची भूमिका समजावून सांगितली. या मंत्र्यांनी साहेबांच्या पाठीशी भक्कमपणे उभं राहण्याचं आश्वासन दिलं. त्यांच्या परीनं ते दिल्लीतील श्रेष्ठींशी विचारविनिमय करू लागले.

"विदर्भाच्या संदर्भात मी जाहीर वक्तव्य केलेलं आहे. ते मला बदलता येणार नाही; पण मी तुमच्याविरोधात जाणार नाही" अशी कन्नमवारांची भूमिका वेगळी होती.

साहेबांनी कन्नमवारांना विचारले, "हा तिढा कसा सोडवायचा?"

कन्नमवार म्हणाले, "दोन्ही भागातीलं दोन-दोन, तीन-तीन काँग्रेसजनांची एक समिती नेमावी. त्यांच्या सल्ल्याप्रमाणं निर्णय घ्यावा."

फक्त विदर्भ-महाराष्ट्राशी निगडित हा प्रश्न नव्हता तर गुजरातच्या. बाबतीतही विचार करावा लागणार होता. मोरारजी मुंबईला आले असताना साहेबांनी त्यांची भेट घेतली.

म्हणाले, "द्वैभाषिकाचा फेरविचार करणं अत्यंत गरजेचं आहे. आता आपण काही न करता गप्प बसलो तर परिस्थिती गंभीर होईल, कदाचित हाताबाहेर जाईल."

मोरारजींच्या निदर्शनास ही बाब आणून दिली असता त्यांनी विचारलं, "तुम्हाला याबाबत काय करावं असं वाटतं?"

साहेब म्हणाले, "तुम्हाला द्वैभाषिकांची विभागणी मान्य नाही. तुमच्यावर अविश्वास दाखवला असं तुम्हाला वाटतं; पण आपण दोघांनी एकत्र बसून यावर मार्ग काढण्याची योग्य वेळ आलेली आहे. शांततेच्या मार्गाने आणि कुठलीही कटुता निर्माण न होता दोन स्वतंत्र राज्ये निर्माण करूया."

साहेबांच्या या तोडग्याला मोरारजींनी मान्यता दिली.

"दिल्लीच्या नेत्यांचं मत अजमावलं आहे का?" असा प्रतिप्रश्न साहेबांना मोरारजींनी विचारला.

त्यावर साहेब म्हणाले, "नेहरूजींच्या सल्लामसलतीची गरज नाही."

मोरारजी साहेबांना म्हणाले, "तुम्ही दिल्लीच्या नेत्यांशी चर्चा करा. त्यांच्याकडे आग्रह धरा. आपण दोघं गुजराती नेत्यांना बोलू."

मोरारजींसोबत चर्चा केल्यानंतर साहेब दिल्लीला गेले. तिथे गोविंद वल्लभ पंतांना विदर्भाविषयी व मोरारजींबरोबर झालेला चर्चेचा वृत्तांत

सांगितला. त्यांनी साहेबांना 'आगे बढो' असं म्हणून प्रोत्साहन दिलं. नेहरूजींना नंतर सांगू म्हणाले. मुंबईला परत आल्यानंतर साहेब कामात गुंतले. आठ दिवसांनंतर दिल्लीहून मोरारजींचे साहेबांना बोलावणे आले. साहेब लगेच मोरारजींना भेटण्यासाठी दिल्लीला गेले.

मोरारजींनी साहेबांना विचारलं, ''गुजरातची राजधानी व डांगच्या भविष्याबद्दल तुम्ही काही विचार केला आहे का?''

साहेब म्हणाले, ''याबाबत आपण जो मार्ग मला सुचवाल त्याप्रमाणे मी माझ्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून आपणास कळवितो.''

साहेब मुंबईला परत आले. साहेबांनी प्रथम भाऊसाहेब हिरेंना बोलावलं. त्यांना दिल्ली येथे मोरारजींशी झालेल्या चर्चेचा तपशील सांगितला. राजधानीकरिता आपल्याला पैशाची तरतूद करावी लागेल, असे सांगताच भाऊसाहेब हिरेंनी असमर्थता दर्शविली. इतर सहकाऱ्यांशी चर्चा केली तर त्यांचाही सूर हिरेंसारखाच निघाला. साहेबांनी आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी काही अधिकाऱ्यांना कामास लावले.

द्वैभाषिक राज्यात महाराष्ट्र व गुजरातमधील विरोधी पक्ष एकत्र येऊन द्वैभाषिक राज्य हाणून पाडण्याच्या प्रयत्नात असत. दोन राज्ये निर्माण झाल्यास आपण सीमा कशा ठरवायच्या याबाबत ते आपापसांत चर्चा करीत असत. एका चर्चेत डांग्यांनी डांग भाग गुजरातला देण्याचं मान्य केल्याचं ऐकिवात होतं तो धागा पकडून साहेबांनी आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा केली.

म्हणाले, ''व्यक्तिशः माझा डांग भाग गुजरातला देण्यास विरोध आहे; पण या एका विषयावर दोन राज्यनिर्मितीची प्रक्रिया फिसकटू द्यायची का? शेवटी आपल्याला दोन पावले मागे यावेच लागेल. विरोधी पक्ष डांग गुजरातला द्यावयास तयार आहे. मला असं वाटतं की या प्रश्नावर आपण बोलणी फिसकटू देऊ नये.''

साहेबांच्या सहकाऱ्यांनी, ''मुंबई जर महाराष्ट्राला मिळत असेल तर डांगवर आपण तडजोड करावयास काही हरकत नाही. तुम्ही ठरवाल ते आम्हाला व महाराष्ट्राला मान्य राहील'' असा शब्द दिला.

आंध्र आणि मद्रासच्या धर्तीवर महाराष्ट्र व गुजरातची विभागणी ग्राह्य धरून आर्थिक नुकसानभरपाई किती द्यावी लागेल याचा अंदाज

घेण्याचं काम साहेबांनी अधिकाऱ्यांना सांगितलं होतं. त्यांचा अंदाज तीस कोटीपर्यंत पैसे द्यावे लागतील असा होता. मराठी समाजाची एवढा पैसा देण्याची मानसिकता नव्हती याची कल्पना साहेबांना होती.

"दरवर्षी २५-३० कोटींच्या घरात एकट्या मुंबईतील विक्रीकर जातो. दोन वर्षांत आपल्याला ही रक्कम मुंबईतून मिळेल" असं सहकाऱ्यांना साहेबांनी पटवून दिलं.

"काय रक्कम द्यावयाची असेल ती तुम्ही ठरवा आणि देऊन टाका. या प्रश्नाचा एकदाचा सोक्षमोक्ष लावा. आम्ही तुमच्यासोबत आहोत" असं सहकाऱ्यांनी साहेबांना सांगितलं.

विदर्भ व महाराष्ट्रातील सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन साहेब दिल्लीला मोरारजींना भेटण्याकरिता गेले. दोघांच्या भेटीत राजधानी बांधण्याच्या खर्चाला मान्यता देण्यात आली.

मोरारजींनी लगेच विचारलं, "डांगबद्दल काय ठरविलं?"

साहेब म्हणाले, "डांग गुजरातला देण्याची महाराष्ट्राची तयारी आहे. राजधानी खर्चाचा प्रश्न लगेच ठरवून घेऊ. इतर खर्चाचा तपशील ठरविण्याकरिता एक समिती नेमू. त्या समितीत महाराष्ट्राचे दोन प्रतिनिधी व गुजरातचे दोन प्रतिनिधी राहतील. या समितीचे अध्यक्ष रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर राहतील. या वेळी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर भट्टाचार्य होते. महाराष्ट्रातर्फे साहेबांनी बर्वे व यार्दी यांची नावे सुचविली. या पाच समितीच्या सदस्यांनी इतर खर्चाचा तपशील ठरवावा असे ठरले.

ही समिती ठरल्यानंतर साहेब आणि मोरारजी यांच्यात राजधानी बांधण्याच्या खर्चासंबंधी चर्चा झाली. आंध्र आणि मद्रास यांच्या धर्तीवर खर्च देण्यास साहेबांनी संमती दर्शवली. तो खर्च सात कोटींचा होता. मोरारजींनी दहा कोटींची मागणी केली. साहेबांनी दहा कोटी देण्याचे मान्य केले. साहेबांनी ही रक्कम द्वैभाषिकाच्या अर्थसंकल्पातून देण्यात येईल, असं मोरारजींच्या लक्षात आणून दिलं. मोरारजींनी साहेबांच्या या प्रस्तावाला मान्यता दिली.

साहेब आणि मोरारजी यांच्यात झालेल्या चर्चेचा व अटींचा तपशील साहेबांनी गोविंद वल्लभ पंतांच्या कानावर घातला. विदर्भाबाबत एक समिती नेमावी. त्या समितीनं मार्ग काढावा. तो मार्ग आम्हाला मान्य

राहील, असं साहेबांनी पंत यांना सुचविलं. वर्किंग कमिटीनं गोविंद वल्लभ पंत यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्यात विदर्भ, महाराष्ट्र व मराठवाड्याचे प्रतिनिधी घेण्यात आले. या समितीनं तत्काळ निर्णय घ्यावा. तो निर्णय महाराष्ट्राला मान्य राहील. या समितीच्या दोन-तीन बैठका झाल्या. विदर्भानं काही अटींवर महाराष्ट्रात राहण्याचं मान्य केलं. मराठवाडा बिनशर्त महाराष्ट्रात विलीन झाला. अशा तऱ्हेनं महाराष्ट्र राज्य स्थापनेचा प्रश्न मार्गी लागला.

काँग्रेस श्रेष्ठी व भारत सरकारचं द्वैभाषिक राज्याचं विभाजन करण्याबद्दल समाधान झाल्यानंतर द्वैभाषिक राज्याचं विभाजन करून महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये जन्माला घालण्याची प्रक्रिया सुरू झाली. ९ डिसेंबर १९५९ रोजी काँग्रेस कार्यकारिणीनं द्वैभाषिक राज्य विभाजनावर शिक्कामोर्तब केलं. या विभाजनाला विधानसभेत मांडून विधानसभेची मान्यता घेणं आवश्यक होतं. साहेबांनी विधानसभेच्या पटलावर हा विषय दिनांक ८ मार्च १९६० रोजी विधानसभेच्या मान्यतेसाठी ठेवला. या विभाजनाच्या ठरावावर साधकबाधक चर्चा झाली. दिनांक १८ मार्च १९६० रोजी विधानसभेनं या ठरावाला मान्यता दिली. कायदेशीर बाबींची पूर्तता करून हा ठराव साहेबांनी केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठवून दिला. एप्रिल १९६० मध्ये लोकसभेनं या विभाजनाला मान्यता देऊन 'महाराष्ट्र' व 'गुजरात' अशी दोन स्वतंत्र राज्ये निर्माण केली. महाराष्ट्र व गुजरातच्या भूमीत जो असंतोष धुमसत होता त्याला कायमची मूठमाती दिली. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदी साहेबांची व गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी डॉ. जीवराज मेहता यांची निवड करून या दोघांच्या हाती या दोन्ही राज्यांची सूत्रं सुपूर्द केली.

लोकसभेत द्वैभाषिकाच्या विभाजनावर शिक्कामोर्तब होताच दिल्लीतील दै 'केसरी'चे प्रतिनिधी द्वा. भ. कर्णिक यांनी जयवंतराव टिळक यांना तारेनं या विभाजनाची बातमी कळविली. द्वैभाषिक राज्याचं विधानसभेचं अधिवेशन मुंबईत चालू होतं. जयवंतराव त्या वेळेस विधान परिषदेत हजर होते. त्यांनी आलेल्या तारेवरच्या त्या कागदावर १९४८च्या गांधी हत्येच्या वेळी ज्या ब्राह्मणांची कुटुंबं उद्ध्वस्त झाली होती, ज्यांची स्थावर मालमत्ता जाळण्यात आली होती व दंगलीत ज्यांना आर्थिक झळ पोहोचली होती अशा ब्राह्मण कुटुंबांना शासनाने पुनर्वसनाकरिता जी कर्जे दिली

होती त्या कर्जमाफीची घोषणा या शुभवार्तादिनी करावी, अशी विनंती लिहून ती तार साहेबांपर्यंत पोहोचती केली.

साहेबांनी तारेतील मजकूर व त्यावर जयवंतराव टिळक यांनी लिहिलेली विनंती वाचली. साहेब आपल्या आसनावरून उठून सभागृहाबाहेर आले. त्यांच्या कक्षात जाऊन प्रशासकीय यंत्रणेद्वारे आलेल्या तारेतील मजकुराबद्दल खातरजमा करून घेतली. थोड्या वेळात सभागृहात परत आले. मध्येच हस्तक्षेप करून साहेबांनी मुंबईसह महाराष्ट्र व गुजरात राज्य स्थापनेस केंद्र सरकारने मंजुरी दिली. ही दोन राज्ये अस्तित्वात आल्याची घोषणा केली. गांधी हत्याप्रकरणी ज्या ब्राह्मणांची सामाजिक व आर्थिक हानी झाली होती अशा दंगलपीडित ब्राह्मणांना शासनानं कर्जस्वरूपात जी आर्थिक मदत केली होती ती सर्व कर्जे माफ केल्याची घोषणा साहेबांनी विधानसभेत केली.

आज सत्तावीस एप्रिल. स्वराज्य जन्मदात्याचा जन्मदिवस. तीनशे वर्षांपूर्वी नियतीला स्वप्न पडलं. सह्याद्रीच्या शिवनेरी गडावर राजमाता जिजाऊंची कूस उजवली. जाणता राजा या भूमंडलावर अवतरला. दाहीदिशा उजळून निघाल्या. गडकरी आणि मावळे हर्षोल्हासात न्हाऊन निघाले तो आजचा दिवस.

साहेब आज सकाळी लवकर उठून तयार झाले. सह्याद्री बंगल्यावर भेटणाऱ्यांची रीघ लागलेली. आकाशवाणीवर जगद्‌गुरू तुकोबारायांचा अभंग लागलेला -

'जे का रंजले गांजले,
त्यासी म्हणे जो आपुले'

रंजल्या-गांजल्यांना आपलं म्हणणारे, रयतेचं दुःख आपलं दुःख मानणारे, रयतेचं दुःख निवारण करणारे, राजे शहाजीपुत्र छत्रपती शिवाजी महाराज जन्माला आले. आजच्या दिवशी शिवनेरीवर स्वराज्यनिर्मितीचा जन्मदाता जन्माला आला. तीनशे वर्षांनंतर महाराष्ट्र राज्य जन्माला आलं. २७ एप्रिल हा दिवस महाराष्ट्र राज्य निर्मिती दिवस म्हणून पाळण्यात यावा अशी साहेबांची इच्छा होती; पण लोकशाहीतील तडजोडीच्या राजकारणात समितीच्या नेत्यांच्या आग्रहाखातर १ मे हा महाराष्ट्र राज्य निर्मिती दिवस पाळवयाचं ठरलं. साहेबांनी मात्र शिवनेरीवर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा आजचा जन्मदिवस महाराष्ट्र राज्य निर्मितीचा जन्मदिवस

म्हणून पाळण्याचं ठरविलं. साहेबांसोबत शिवनेरीवर मलाही जावं लागणार होतं. मी माझ्या तयारीला लागले. साहेब सर्व भेटी हातावेगळ्या करून आत आले. आई घरात आपल्या खोलीत तुकाराम गाथा वाचून बसल्या होत्या. साहेब आणि मी आईसमोर नतमस्तक झालो. आईनं आम्हा दोघांना आशीर्वाद दिला.

म्हणाल्या, "यशवंत व्हा, कीर्तिवंत व्हा."

साहेब आणि मी सह्याद्री बंगल्यावरून शिवनेरीच्या दिशेनं निघालो. वाटेत साहेबांनी सर्व धर्मांच्या धर्मगुरूंचे आशीर्वाद घेतले.

सह्याद्रीच्या अंगाखांद्यांवर विसावलेला शिवनेरी आज मोठ्या दिमाखानं उभा आहे. शिवनेरीला आपल्या अस्तित्वाचा अभिमान आहे. शककर्त्या युगपुरुषानं या भूमीवर जन्म घेतला. राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या पवित्र पदस्पर्शानं ही भूमी धन्य झाली. शिवनेरीच्या कड्याकपारीत बाळराजे शिवबा बागडले. अशा या पुण्यवंत, कीर्तिवंत घराण्याचा उदय शिवनेरीवर झाला. तीनशे वर्षांपूर्वी जो जल्लोष, जो उन्मेष शिवनेरीने अनुभवला होता तोच उन्मेष, जल्लोष शिवनेरी आज पाहत आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शिवप्रेमी व मावळ्यांची रीघ गडावर लागलेली. ढोल, ताशे, लेझीम, तुताऱ्यांचा आवाज गडावर घुमतोय. चोहोबाजूंनी मावळे गडावर चढताहेत. मावळ्यांच्या गर्जना, 'हर हर महादेव'च्या ललकाऱ्यांनी गड दणाणून गेला आहे. गड गुलालानं माखून, न्हाऊन निघाला आहे.

या पवित्र आणि मंगलदिनी साहेबांनी शिवनेरीवर बसविण्याकरिता राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि बाळराजे शिवबांचा आसनस्थ पुतळा तयार करून घेतला. साहेबांच्या हस्ते या पुतळ्याचं अनावरण आज होणार आहे. ठरलेल्या वेळेला साहेब आणि मी शिवनेरीवर पोहोचले. चौघडा व सनईच्या मंगलमय सुरांनी गडावरील वातावरण भारावून गेलं होतं. साहेबांनी विधिवत पुतळ्याचं अनावरण केलं. या वेळी शिवप्रेमी आणि मावळ्यांनी एकच जल्लोष केला. साहेबांनी नवनिर्मित महाराष्ट्राच्या भविष्यातील वाटचालीचं सूतोवाच याचप्रसंगी केलं.

म्हणाले, "महाराष्ट्रातील तमाम तीन कोटी जनतेच्या भावना सोबत घेऊन महाराष्ट्राच्या भाग्यविधात्याला दंडवत घालण्यासाठी आज या मंगल आणि पवित्र दिनी मी इथे आलो आहे. तुमच्यासोबत मीही या भाग्यविधात्याचे

आशीर्वाद घेण्यासाठी इथे आलो आहे. युगकर्त्या छत्रपतींच्या जन्मस्थळी स्वतंत्र भारताचे निशाण मोठ्या दिमाखाने फडकत व डौलत आहे. नवमहाराष्ट्राच्या निर्मितीदिनी स्वतंत्र भारताने छत्रपतींना मानाचा मुजरा केला आहे. शिवनेरीने स्वराज्य निर्मितीचा इतिहास घडविला नव्हे, तर इतिहास निर्मात्यास जन्म दिला. छत्रपतींच्या जन्माने महाराष्ट्राच्या इतिहासाचा जन्म झाला. छत्रपतींनी भारताच्या इतिहासात स्वराज्य स्थापन करून एक नवीन परंपरा निर्माण केली. विसाव्या शतकात स्वतंत्र महाराष्ट्राचा जन्मही या सुवर्णदिनी होत आहे हा एक योगायोग आहे.

स्वराज्यं स्थापनेसाठी छत्रपतींच्या काळात मराठ्यांनी हातात तलवारी घेऊन चालवल्या. लोकशाहीत नवमहाराष्ट्र मिळविताना बुद्धीचे कसब दाखवून कर्तृत्व गाजवावं लागलं. महाराष्ट्रीयन मन महाराजांना परमेश्वर मानणारं आहे. महाराजांना परमेश्वर मानणारा महाराष्ट्रीयन असे मानतो की, आमच्यात जी शौर्याची, कर्तृत्वाची चांगली व उदात्त भावना आहे ती देशासाठीच आहे. प्रथम आम्ही भारतीय आहोत व नंतर महाराष्ट्रीयन.

महाराष्ट्रातील मराठी माणसानं नवमहाराष्ट्राच्या निर्मितीकरिता जो लढा दिला तो लढा अविस्मरणीय आहे. मी वेगवेगळ्या मार्गांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या चूक की बरोबर होत्या या वादात मी जाणार नाही; पण त्या भावना प्रामाणिक होत्या. महाराष्ट्राशी इमान राखणाऱ्या होत्या. या लढ्याचे दोन कालखंड मी मानतो. एक प्रतापगडावरील शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरण समारंभापूर्वीचा कालखंड आणि दुसरा प्रतापगडावरील समारंभ ते शिवनेरीपर्यंतचा. छत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याच्या उद्घाटनाकरिता स्वतंत्र भारताचे पंतप्रधान प्रतापगडावर आले. त्यांनी महाराष्ट्रीयन जनतेच्या रुद्रावताराचे रूप बघितले आणि महाराष्ट्रनिर्मितीच्या आड ज्या निगरगाठी होत्या त्या सैल होण्यास सुरुवात झाली.

महाराष्ट्राची चार प्रेरणास्थानं आहेत असे मी मानतो. ज्ञानदेव-तुकाराम यांची संत प्रेरणा, छत्रपती शिवाजी महाराजांची पराक्रमी कर्तृत्वाची प्रेरणा, महात्मा फुले याच्या रूपानं स्वार्थत्यागाची प्रेरणा आणि लोकमान्यांच्या विद्वत्तेची प्रेरणा. या चार प्रेरणांनी महाराष्ट्राच्या जीवनाची जडणघडण केलेली आहे.

शिवनेरी महाराष्ट्रातील तीन कोटी रयतेच्या हृदयात ठाण मांडून

बसलेला आहे. शिवजन्मोत्सवाकरिता आपण काही लोक शिवनेरीवर आलेलो आहोत. ज्या हृदयात आज शिवनेरी नाही असं हृदय शोधून सापडणे कठीण आहे. आपल्याला नवमहाराष्ट्र घडवायचा आहे. त्याकरिता एकदिलानं व एकसंध राहूनच आपण हे करू शकतो. लोकशाहीत अनेक विचारांचे पक्ष असू शकतात आणि ते लोकशाहीत अभिप्रेतही आहे; पण मला वाटतं तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपर्यंत आपण पक्षीय विचार बाजूला ठेवून नवमहाराष्ट्र घडवूया. महाराष्ट्राचं स्वतंत्र असं राजकारण निर्माण करूया. महाराष्ट्रासमोर दोन मूलभूत समस्या आहेत. एक सामाजिक व दुसरी आर्थिक. या समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी आपण राजकारण करूया. महाराष्ट्राला बुद्धीची आणि निसर्गाची देण मिळालेली आहे. आतापर्यंत आपण पारतंत्र्यात होतो. तिथे आपल्याला कर्तृत्व दाखवण्याची संधी मिळत नव्हती. आता आपण आपल्या बुद्धीचा वापर करून निसर्गाच्या साहाय्यानं नवीन महाराष्ट्र घडविला पाहिजे. आपल्याला विकासाचे अनेक गड सर करावयाचे आहेत. एकदा का आपण गडावर चढून आलो की, जोपर्यंत तो विकासाचा गड आपल्याला जिंकता येत नाही तोपर्यंत आपल्याला माघारी फिरता येणार नाही. माघारी फिरलोच तर माघारी फिरणाऱ्यांना सांगावेसे वाटते, माघारी कुठे जाल? दोर केव्हाच कापून काढले आहेत.

सामान्यांच्या प्रश्नाला प्राधान्य देऊन ते सोडवूयात. महाराष्ट्र म्हणजे सामान्यांचं राज्य होय. राज्याचा कर्णधार म्हणून माझ्याकडून तुमच्या अनेक अपेक्षा असणार. त्या मी पूर्ण शरू शकेलच असं काही नाही. तक्रार करू नका. त्या गरजा, त्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीनं आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करू. सामान्य जनतेच्या प्रश्नांचे रामायण-महाभारत आमच्यापुढे उभे आहे. या समस्यांची उकल करण्याकरिता प्रत्येकाने आपापल्या कार्यक्षेत्रात जबाबदारीने काम केले पाहिजे.''

शिवाजी महाराजांनी आदर्श राज्यकारभाराकरिता ज्या गुणांची जोपासना केली ते गुण राज्यकर्त्यांच्या अंगी असावेत, असं साहेबांना वाटायचं. छत्रपती शिवजयंतीचा शिवनेरीवरील कार्यक्रम पार पाडून साहेब मलबार हिलवरील सह्याद्रीच्या दिशेने निघाले. महाराजांचं कर्तृत्व, राजनीती, कारभार, त्यांचं शौर्य, धैर्य आणि चारित्र्य या गुणांची प्रत्येक महाराष्ट्रीयन माणसाने पूजा बांधली पाहिजे. त्यांनी शेतकऱ्यांच्या हातातून रुमणं काढून तलवार

दिली, बारा बलुतेदारांना मावळे बनवून स्वराज्य स्थापनेत सहभागी करून घेतलं. शेतकऱ्यांना- कष्टकऱ्यांच्या जगण्याला सन्मान मिळवून दिला. राज्यकर्ती जमात म्हणून त्यांच्यात विश्वास निर्माण केला. त्यांना वैभव प्राप्त करून दिलं. याच मार्गांनी आपल्याला नवमहाराष्ट्राची उभारणी करावी लागेल, असं साहेबांनी मनोमन ठरविलं. २७ एप्रिल १९६० या शिवजयंतीदिनी नवमहाराष्ट्र राज्य निर्मिती दिवस ठरला असता तर महाराजांचं अधुरं राहिलेलं कार्य पूर्ण करण्याचं भाग्य मराठी माणसाला मिळालं असतं. साहेबांनी आपलं लक्ष ३० एप्रिल रोजी मध्यरात्री व १ मेच्या पहिल्या प्रहरी होणाऱ्या कार्यक्रमावर केंद्रित केलं.

नवमहाराष्ट्र राज्य निर्मितीचा उद्‌घाटन सोहळा मलबार हिलवरील राजभवनावर आयोजित केलेला. राजभवन इंग्रजांच्या राजवटीतील विलासी जीवनाचं प्रतीक. या राजभवनावर नेहरूजींच्या हस्ते ३० एप्रिलच्या मध्यरात्री ठीक १२:०१ मिनिटांनी १ मे १९६० रोजी भारताच्या नकाशावर महाराष्ट्र राज्याच्या सीमा निश्चित होऊन मराठी जनतेचं एक राज्य अस्तित्वात येणार आहे. मराठी जनतेच्या जीवनातील सोनियाचा दिवस म्हणून १ मे १९६० या दिवसाची नोंद होणार आहे. याच वेळी शिवतीर्थावर (शिवाजी मैदान) तमाम मराठी माणसांच्या भावनेच्या लाटा धडकू लागल्या. अख्खी मुंबई शिवतीर्थावर अवतरली. समुद्राच्या लाटांना उधाण आलेलं. समुद्रदेखील उसळ्या घेऊन शिवतीर्थाजवळील चौपाटीवर आनंद व्यक्त करू लागला. राजभवन आणि शिवतीर्थावरील विद्युत रोषणाई नभातील चांदण्याशी स्पर्धा करू लागली. नभातील चांदण्यांना हेवा वाटावा अशी विद्युत रोषणाई या दोन ठिकाणी करण्यात आली. अख्खी मुंबई व महाराष्ट्रातील जनता सजूनधजून या कार्यक्रमात सहभागी झालेली.

रात्री ठीक अकरा वाजून पंधरा मिनिटांनी साहेबांसोबत मी सह्याद्रीवरून राजभवनाकडे निघाले. निघण्यापूर्वी आम्ही दोघांनी आईच्या पायावर माथा टेकविला. आईनं भरभरून आम्हाला आशीर्वाद दिला. मी आज माझ्या माहेरची - फलटणच्या मोरे घराण्याची घरंदाज वस्त्रे परिधान केली. नऊवारी काठपदराचं पातळ, त्याच रंगसंगतीचं ब्लाऊज. महाराष्ट्रीयन पद्धतीनं नेसलेलं पातळ, कपाळावर ठसठशीत सौभाग्याचं कुंकू अन् अंगावर महाराष्ट्रीयन दागिने. साहबांनी पांढरंशुभ्र धोतर, त्यावर पढराशुभ्र नेहरू शर्ट आणि

नेहरू शर्टवर त्यांचं आवडतं पांढरंशुभ्र जाकीट अन् डोईवर पांढरीशुभ्र गांधी टोपी त्यांच्या खास पद्धतीनं घातलेली. हा वेश परिधान करून साहेब प्रसन्न चित्तानं कार्यक्रमाला निघाले. ५६ ते ६० या चार वर्षांत आजच्या दिवसासाठी करावी लागलेली बौद्धिक कसरत... जनतेकडून गैरसमजातून झालेला मानापमान.. सर्व आजच्या दिवसासाठी सहन करीत त्यातून आजचा सोनियाचा दिवस उगवला. ठीक ११.३०ला आम्ही राजभवनावर पोहोचलो.

राजभवनावर राजभवनाला शोभेल असा भव्य शामियाना उभारलेला. दरबारी थाटात अधिकारी लक्ष ठेवून वावरताहेत. कार्यक्रमात कुठलीच उणीव राहता कामा नये याची काळजी घेताना प्रशासन दिसतंय. महाराष्ट्रीयन शुभमंगल वाद्य हळुवारपणे कानाची साथसंगत करतंय. शामियाना महाराष्ट्रातील मराठीजनांनी व्यापलेला. बुद्धिवादी, बुद्धिजीवी, उद्योगपती, शिक्षणतज्ज्ञ, कामगार प्रतिनिधी, लोकप्रतिनिधींच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहतोय. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी पंधरा मिनिटे अगोदर राज्यपाल जयप्रकाश यांचं आगमन झालं. साहेबांनी आणि मी त्यांचं स्वागत केलं. नवमहाराष्ट्राच्या जन्माची वेळ जसजशी जवळ येऊ लागली तसतशी कार्यक्रमास हजर असलेल्यांची उत्सुकता वाढीस लागू लागली. बाराला दहा मिनिटं कमी असताना भारताचे विधाते नेहरूजी आपल्या कन्या इंदिरा गांधींसह शामियान्यात हजर झाले. मी इंदिरा गांधींच्या स्वागतास सामोरे गेले. जयप्रकाश आणि साहेबांनी नेहरूजींचं स्वागत केलं. तरुणाईला लाजवील या चपळाईनं व्यासपीठावर चढून नेहरूजी विराजमान झाले. त्यांच्यामागोमाग राज्यपाल, साहेब, इंदिराजी आणि मी व्यासपीठावर स्थानापन्न झालो.

समुद्रावरून वाहणारा गार वारा राजभवनावरील कार्यक्रमास उल्हसित करीत आहे. त्यातच सनईवादक बिस्मिल्लाखाँ यांच्या सनईचे सूर कानाशी लगट करू लागले. नेहरूजींचं मन वेधून घेणारा मंजूळ स्वर शामियान्यात घुमला तो भूपाळी गात असलेल्या महाराष्ट्रकन्या लता मंगेशकर यांचा. ज्ञानोबा माउलीचं पसायदान गाऊन या महाराष्ट्रकन्येनं महाराष्ट्राचं मन उलगडून दाखविलं. महाराष्ट्रगीतानं हजर असलेल्यांच्या अंगावर शहारे उभे केले. वीररसातील या गीतानं महाराष्ट्राच्या शौर्याची, सळसळत्या रक्ताच्या शूरवीरांच्या पराक्रमाची गाथा गायिली. अशा या मंतरलेल्या

वातावरणात नेहरूजींनी बारा वाजून एक मिनिटाने आपल्या शुभहस्ते केसरी रंगाचा मलनली कपडा दूर सारताच रोषणाईच्या रेशांनी नवमहाराष्ट्राच्या सीमा अधोरेखित केलेल्या नकाशाच्या रूपानं नवमहाराष्ट्राचा जन्म झाला. विद्युत रोषणाईचा प्रकाश नभातील चांदण्यांच्या प्रकाशात विलीन झाला. समुद्राच्या लाटा राजभवनाच्या किनाऱ्याला स्पर्शून नवमहाराष्ट्राला मुजरा करू लागल्या.

कार्यक्रमाचे यजमान म्हणून साहेब आपली जबाबदारी अत्यंत चोखपणे सांभाळताहेत. श्रीमती इंदिरा गांधींचं मी महाराष्ट्रीयन पद्धतीनं साडीचोळी देऊन स्वागतं केलं. साहेबांनी नेहरूजी व जयप्रकाश यांचं स्वागत केलं. जयप्रकाश यांनी राष्ट्रपतींचा शुभेच्छांचा आलेला संदेश वाचून दाखविला.

श्रीमती इंदिरा गांधी नवमहाराष्ट्राला शुभेच्छा देताना म्हणाल्या, ''भविष्यात महाराष्ट्र राज्य हे देशात स्वकर्तृत्वानं महान ठरेल.''

नेहरूजींनी आपल्या उद्घाटनपर भाषणात महाराष्ट्राकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या.

नेहरू म्हणाले, ''महाराष्ट्र ही पराक्रमी शूरवीरांची भूमी आहे. या भूमीच्या त्यागाची नोंद इतिहासानं घेतलेली आहे. स्वातंत्र्याची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यनिर्मितीतून भारताला मिळाली आहे. स्वतंत्र भारत या भूमीकडून काही अपेक्षा ठेवून आहे. देशाच्या हिताकरिता महाराष्ट्र झटताना मला पाहावयाचा आहे. आपल्या विकासासोबत देशाच्या विकासाला महाराष्ट्राने हातभार लावला पाहिजे. संरक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्र देशाच्या संरक्षणाकरिता आघाडीवर राहील असा मला आत्मविश्वास आहे. महाराष्ट्राची जनता आधुनिक भारताच्या जडणघडणीत आपला मोलाचा वाटा उचलेल. या महाराष्ट्राला माझा सदैव आशीर्वाद राहील.''

भावनोत्कटतेच्या परिसीमा गाठलेल्या या कार्यक्रमात भावनावश होऊन साहेब म्हणाले, ''महाराष्ट्रभगिनी लताजी यांनी ज्ञानदेवांनी नियतीकडे केलेली विनवणी या ठिकाणी व्यक्त केली - 'दुरिताचे तिमिर जावो', तीनशे वर्षांपूर्वी दीनदुबळ्यांच्या जीवनातील अंधकार दूर करणारे महान युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म या महाराष्ट्रभूमीवर झाला. तीन दिवसांपूर्वी २७ एप्रिल हा त्यांचा जन्मदिवस आम्ही शिवनेरीवर साजरा केला. स्वराज्य जन्माला घालणाऱ्या या महान श्रीमानयोगीचा जन्मदिवस

महाराष्ट्र राज्याचा जन्मदिवस म्हणून राहावा अशी आमची इच्छा होती; पण लोकशाहीचा आदर बाळगून आपण तो १ मे हा नवमहाराष्ट्राचा जन्मदिवस निश्चित केला. महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील संत तुकाराम महाराजांनी आम्हाला समानतेचा मंत्र दिला. जे जे मंगल त्याकरिता द्यावी लागणारी किंमत देण्याची मनोभूमिका महाराष्ट्राची आहे. याच संतांनी नाठाळा माथी काठी मारण्याचं सामर्थ्य आमच्यात निर्माण केलेलं आहे. अमंगल घालविण्यासाठी नाठाळांना वठणीवर आणण्याची शिकवण संतांनी आम्हाला दिली आहे. दीनदुबळ्या, वंचितांच्या कल्याणासाठी महाराष्ट्राची निर्मिती झाली. मराठी जनतेच्या उत्कर्षासाठी आम्ही अहोरात्र काम करू. महाराष्ट्राच्या जीवनात जे उदात्त आहे, विकसनशील विचार आहे त्याचा उपयोग भारताच्या उभारणीसाठी आम्ही प्रथम करू. महाराष्ट्र भारताशी एकरूप झाला आहे. भारताची भरभराट म्हणजे महाराष्ट्राची भरभराट असे मानणाऱ्यांपैकी आम्ही आहोत. भारत मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल हा विचार आमच्या रक्तात भिनलेला आहे. भारताच्या मोठेपणात महाराष्ट्राचं मोठेपण दडलेलं आहे. भारताचा केंद्रबिंदू बर्फाच्छादित हिमालय आहे तर महाराष्ट्राचे प्रतीक काळ्या फत्तराचा सह्याद्री आहे. हा सह्याद्री दोन-दोनशे, तीन-तीनशे इंच पावसाचा मारा आपल्या माथ्यावर झेलतोय. निसर्गाच्या माऱ्याचा मुकाबला करतोय. भारताचा मानबिंदू असलेल्या हिमालयावर जर भविष्यकाळात संकट कोसळलं तर हा काळ्या फत्तराचा सह्याद्री छातीचा कोट तयार करून ढाल बनून हिमालयाचं रक्षण करील, असं मी याप्रसंगी आपणास वचन देतो.''

साहेबांनी उत्स्फूर्तपणे महाराष्ट्राच्या भारताप्रती असलेल्या भावना व्यक्त केल्या. क्षणभर राजभवनाच्या किनाऱ्यावर आदळणाऱ्या लाटा थबकल्या राजभवनावरील सभामंडपानं श्वास रोखला असा भास निर्माण झाला. सभामंडपातील मराठी आणि अमराठी माणसं साहेबांच्या विचारांनी भारावून गेली. महाराष्ट्राला साहेबांच्या रूपानं महाराष्ट्राचा भाग्यविधाता मिळाला, अशा भावना व्यक्त करू लागले. शिवतीर्थ आणि राजभवनावरील कार्यक्रम एकाच वेळी पार पडताहेत. सनईभीष्म बिस्मिल्लाखाँ व गानकन्या लताजींनी राजभवन जिंकलं तर शिवतीर्थावर 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' या महाराष्ट्र गीतानं शाहीर शेख व शाहीर साबळे महाराष्ट्राच्या

पराक्रमाचा ज्वलंत इतिहास १० लाख महाराष्ट्रीयन जनतेच्या समोर उभा करून शिवतीर्थ जिंकताहेत. समुद्राला उधाण आलेलं आहे. सागर आणि जनसागर शिवतीर्थावर देहभान विसरून एक झाले आहेत. एकशे पाच हुतात्म्यांच्या बलिदानाचं स्मरण शाहीर करताहेत. त्या हुतात्म्यांना मुजरा करण्यासाठी १० लाख महाराष्ट्रीयन एकत्र आलेत. त्यांच्या बलिदानाच्या आठवणी चिरंतन आपल्या हृदयात साठवून घेत आहेत. 'व्यर्थ न जावो बलिदान' या वीररसातील काव्यानं मराठी मनं उत्साहित होताहेत.

या भारावलेल्या वातावरणातच नेहरूजींनी रात्री १ वाजता परदेशगमनासाठी विमानतळावरून उड्डाण केलं. महाराष्ट्र दर्शन नेहरूजींना विमानातून व्हावं याकरिता समुद्रात लाँचेसची रचना महाराष्ट्राच्या नकाशाप्रमाणे करण्यात आली. त्या लाँचेसवर विद्युतदिव्यांची व्यवस्था करण्यात आली. नवमहाराष्ट्राचा नकाशा विद्युत रोषणाईनं समुद्रात तयार करण्यात आला. १ मे १९६० रोजी नवमहाराष्ट्र राज्याचा जन्म झाला. जन्मकुंडली मांडणाऱ्यांनी याची नोंद घेऊन महाराष्ट्र राज्याच्या भविष्याची मांडणी करण्यास सुरुवात केली असावी.

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा कार्यक्रम आटोपून साहेबांना व मला सह्याद्रीवर यायला पहाटेचे ४ वाजले. थोडी विश्रांती घेऊन सकाळी राजभवनावर मुख्यमंत्रीपदाच्या शपथ कार्यक्रमास आम्हा दोघांना जावयाचे आहे. सकाळच्या कामाच्या सूचना नोकरांना देऊन मी माझ्या खोलीत गेले. मला सकाळी जाग आली ती 'घनश्याम सुंदरा' या अमरभूपाळीच्या मंगलस्वरानं. त्वरित तयार झाले. स्वयंपाकघरात जाऊन चहा तयार केला. चहाचा ट्रे घेऊन साहेबांच्या खोलीत गेले. साहेब तयार होऊन वर्तमानपत्र चाळत होते. साहेबांनी मला जवळ बसवून घेतलं.

चहाचे एक-एक घोट घेत म्हणाले, "माझ्या व आपल्या घराण्याच्या जीवनातील आजचा सुवर्णदिन आहे, असं मी मानतो. या दिवसासाठी माझं राजकीय जीवन पणाला लागलं होतं. महाराष्ट्राच्या इतिहासात मला खलपुरुष ठरविण्याचा विडा काही मंडळींनी उचलला होता. मी त्यांची मनोकामना धुळीस मिळविली. जनताजनर्दनाच्या दरबारात मला न्याय मिळाला."

"तुमच्या त्यागाला आणि प्रामाणिक प्रयत्नाला आलेलं हे फळ

आहे. गणपतराव भावजीनं जे स्वप्न पाहिलं होतं ते तुम्ही पूर्ण करून दाखविलं यातच तुमचं मोठेपण आहे. त्यांच्या ऋणातूनही मुक्त झालात. गोरगरिबांच्या उन्नतीकरिता गणपतराव जी तळमळ व्यक्त करीत असत ती पूर्ण करणे हे तुमचं आद्यकर्तव्य आहे.'' मी.

''इथून पुढे जे काही निर्णय घ्यावयाचे आहेत त्या निर्णयात वंचित माणसाच्या कल्याणाचं आणि उन्नतीचं प्रतिबिंब दिसलं पाहिजे. गोरगरिबांना सुखकारक आणि सन्मानाचं जीवन जगता आलं पाहिजे.'' साहेब.

आमचं बोलणं चालू असताना डोंगरे आत आले. ते आणि साहेब आजच्या दिवसभराच्या कार्यक्रमाची आखणी करण्यातं गढून गेले. डोंगरेंनी कार्यक्रमाची टिपणं घेतली. १२:३१ मिनिटांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याची वेळ निश्चित केली. साहेबांना शुभेच्छा देण्याकरिता आलेल्यांची गर्दी उसळली होती. साहेब तयार होऊन जनतेच्या घोळक्यात जाऊन त्यांचे झाले. डोंगरे आलेल्यांच्या चहापाण्याच्या व्यवस्थेवर लक्ष ठेवून होते. सर्वांचं आदरातिथ्य करून साहेब आपल्या खास सहकाऱ्यांसोबत आपल्या अभ्यासिकेत जाऊन बसले. सहकाऱ्यांसोबत अर्धा-पाऊण तास खलबतं चालू होती. सहकारी गेल्यानंतर साहेब न्याहरी करण्याकरिता स्वयंपाकघरात आले. साहेबांनी आणि मी सोबत न्याहारी केली. मला तयार राहायचं सांगून परत आपल्या सह्याद्रीतील कार्यालयात अधिकाऱ्यांसोबत कामाचा आढावा घेऊन त्यांना पुढील कामाबद्दल मार्गदर्शन करण्यात ते मग्न झाले.

साडेअकरा वाजता डोंगरे यांनी वाहनचालकाला गाडी पोर्चमध्ये लावण्यास सांगितलं. साहेबांना वेळेची आठवण करून दिली. मीही माझ्या तयारीस लागले. साहेब आपल्या खोलीत जाऊन तयार झाले. मला आवाज दिला. मी तयार होऊन बाहेर आले. साहेब व मी आईच्या खोलीत गेलो. आई पंढरीच्या विठोबाची तुळशीची माळ जपत बसल्या होत्या. आम्ही दोघांनी आईचं दर्शन घेतलं. नेहमीप्रमाणं 'यशवंत, कीर्तिवंत' होण्याचा आशीर्वाद दिला. साहेब आणि मी गाडीत जाऊन बसलो. गाडी सह्याद्रीहून राजभवनाच्या दिशेने निघाली.

१२:३१ मिनिटांनी राज्यपाल जयप्रकाश यांनी साहेबांना महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ दिली. साहेबांनंतर त्यांच्या

मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांचा शपथविधी पार पडला. ४ वर्षांच्या कारकीर्दीत साहेबांना तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घ्यावी लागली. शपथविधी झाल्यानंतर साहेबांनी आपल्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन करताना महाराष्ट्राच्या भावी जडणघडणीबद्दल कल्पना दिली.

साहेब म्हणाले, "आपल्याला महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधावयाचा आहे. सामाजिक आणि आर्थिक विकास साधण्यासाठी समतेवर व न्यायावर आधारित निर्णयाची कास आपल्याला धरावी लागेल. शिक्षण, उद्योग आणि शेती हे एकमेकांचे स्पर्धक न ठरता ते विकासाचे समांतर केंद्रबिंदू ठरले पाहिजेत. एकमेकाला पूरक असं धोरण आखावं लागणार आहे. शेतीच्या विकासाकरिता शेती उत्पन्नावर आधारित उद्योग उभारावे लागतील. तरुणाच्या हाताला आणि बुद्धीला महाराष्ट्राच्या विकासप्रवाहात सामील करून घ्यावं लागणार आहे. हे हात आणि बुद्धी विध्वंसक मार्गाला जाणार नाही याची काळजी घ्यावी लागणार आहे. हे राज्य 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' याकरिता झटलं पाहिजे. जे काही निर्णय शासन घेईल त्याची नीट अंमलबजावणी अधिकारीवर्ग करतो किंवा नाही याच्यावर देखरेख ठेवावी लागणार आहे. उपेक्षित घटकाला त्वरित न्याय मिळाला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या आज्ञापत्रात शासनकर्त्या जमातीकडून रयतेस त्रास होता कामा नये, असे आदेश दिले होते. रयतेला त्रास झाल्यास ती रयत म्हणेल, 'मोगल काय वाईट होते?' लोकशाहीत त्यांना न्याय मिळाला नाही तर ते म्हणतील, 'इंग्रज काय वाईट होते?' हे ऐकण्याची वेळ आपल्यावर येऊ नये याकरिता आपल्याला अधिक काम करावे लागणार आहे. ज्ञानोबा-तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, जोतीबा फुले, लोकमान्य टिळक यांच्या विचारांचा धागा धरून आपल्याला पुरोगामी महाराष्ट्र निर्माण करावयाचा आहे. समाजवादाची मुहूर्तमेढ आपण महाराष्ट्रात प्रथम रोवूया. समाजवाद म्हटल्यानंतर काही मंडळींचं पित्त खवळेल. त्यांच्या बुरसटलेल्या विचारांकडे कानाडोळा करून आपल्याला बहुजनांचे हित साधावयाचे आहे. ते हित साधण्याकरिता आपण कटिबद्ध होऊ या."

साहेबांना अपेक्षित असलेला महाराष्ट्र घडविण्यासाठी जे धोरण जाहीर केलं त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीनं पावले उचलण्यास सुरुवात

केली. साहेब जिथे जिथे कार्यक्रमाच्या निमित्तानं जात तिथे तिथे आपल्या ध्येयधोरणाचा ऊहापोह करीत. महाराष्ट्राच्या उत्कर्षाच्या निमित्तानं परिसंवाद, शेतीविषयक मेळावे, सहकाराची ध्येयधोरणं, बँकांचे पतपुरवठ्याचे धोरण, साहित्य संमेलनं, सिंचनाचे प्रश्न, शाळा-महाविद्यालय-विद्यापीठाची निर्मिती ... जातील तिथं महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करू लागले. बहुजनांच्या हिताचे निर्णय घेऊन राबविण्यास प्राधान्य देऊ लागले. घेतलेल्या निर्णयाची विनाविलंब कार्यवाही करू लागले. कामगार आणि कारखानदार यांच्यात समन्वयाचे वातावरण निर्माण करण्यास प्रोत्साहन देऊ लागले. महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रात व वर्गात साहेबांविषयी आत्मीयता निर्माण होऊ लागली. साहेब सर्वांचा विश्वास संपादन करू लागले.

महाराष्ट्रभर सामान्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी व त्या प्रश्नांची उकल करण्याच्या प्रयत्नात साहेब गुंतले. साहेब जातील तिथे बहुजनांच्या हिताच्या निर्णयाची चर्चा करू लागले. त्यातून बुद्धिजीवी वर्गाच्या डोक्यातील विकृत प्रवृत्ती पुन्हा डोकं वर काढू लागली. बहुजन समाज म्हणजे एक विशिष्ट वर्ग म्हणजेच मराठा, असा अपप्रचार सुरू झाला. बहुजन समाज म्हणजे मराठा काय? अशी विचारणा होऊ लागली. ही गोष्ट साहेबांच्या कानापर्यंत पोहोचली. एका सभेत साहेबांनी या विकृत मनोवृत्तीची दखल घेतली आणि त्यांना बहुजन समाजाची व्याख्या समजून सांगितली. म्हणाले, 'ज्यांची सुखदु:खे समान आहेत तो बहुजन समाज.' जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही हेच खरं.

जळीत प्रकरणातील लाभार्थी ब्राह्मण वर्गानं साहेबांचा जाहीर सत्कार सांगलीत आयोजित केला होता. या सत्काराला उत्तर देताना कर्जमाफी आणि ब्राह्मण वर्गाविषयी आपले विचार व्यक्त केले.

म्हणाले, "१९४८ला जी घटना घडली ती दुर्दैवी होती. एका माथेफिरू तरुणाच्या कृत्याची सजा सर्व समाजाला भोगावी लागली. जळीत घटनेकडे आपण मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहिलं पाहिजे. शासन जळीत कर्जे माफ करीत आहे त्यापाठीमागे उपकाराची भावना नाही. देणारा राजा आहे आणि घेणारी प्रजा आहे अशी भावना मुळीच नाही. प्रजेचं रक्षण करणं हे शासनाचं कर्तव्यच आहे. या एका भावनेतूनच हे कर्ज माफ करण्यात आलं आहे. हे कर्ज माफ केल्याची घोषणा केल्यानंतर बऱ्याच

लोकांनी मला पत्रे लिहिली की, 'तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे गोब्राह्मण प्रतिपालक होऊ इच्छिता. ब्राह्मणाचे प्रतिपालन करीत असताना गाईला विसरू नका.' मी त्यांना सांगू इच्छितो की, हे नवे राज्य गोब्राह्मण प्रतिपालक नसून प्रजापतिपालक आहे. प्रजेचं हित जपणं हे नवमहाराष्ट्राचं धोरण आहे. ब्राह्मण नवमहाराष्ट्राची प्रजा आहे. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातून येणारा युवक कार्यकर्ता ध्येयानं प्रेरित झाला आहे. समाजासाठी काहीतरी काम करून दाखविण्याची त्यांची इच्छा आहे. त्यांची भाषा रांगडी आहे; पण त्यामागची भावना प्रामाणिक आहे. त्याला ब्राह्मणवर्गाने समजावून घेतलं पाहिजे. त्याला मार्गदर्शन करून त्यांच्यात सुधारणा केली पाहिजे. या कर्जमाफीनंतर अनेक कर्जमाफीच्या मागण्या येत आहेत. जळीत कर्जमाफीमागील व इतर कर्जमाफीमागील हेतू वेगळे आहेत. १९४८ला झालेल्या प्रसंगांनी सामाजिक मनात खोल जखम झालेली आहे. ती जखम भरून निघावी हा या कर्जमाफीमागील उद्देश आहे. हा समाज ४८ पासून राष्ट्रीय प्रवाहापासून फटकून वागतोय. तो समाज मुख्य प्रवाहात यावा ही आमची प्रामाणिक इच्छा आहे. ब्राह्मण वर्गाचं बौद्धिक विकासाचं कार्य नोंद घेणारं आहे. त्यांच्या बुद्धीचा उपयोग विकासकामात करून महाराष्ट्र व भारताला प्रगतिपथावर नेता येईल. ब्राह्मणांनीदेखील आपल्या मनातून अपराधीपणाची भावना झटकून टाकावी. देशाच्या विकासाकरिता आपल्या बुद्धीचं योगदान द्यावं.

हे राज्य मराठा नाही तर मराठीचं राज्य आहे. इतिहासात जेव्हा जेव्हा सर्व मराठी समाज एकसंध झाला त्या त्या वेळी या मराठी माणसाने अटकेपार झेंडे फडकविलेले आहेत. मला नव्या महाराष्ट्रात तेच करावयाचे आहे. ती काळाची गरज आहे. सामाजिक एकसंधता बळकट झाल्यावर आपापसांत मतभेद झाले तरी चालतील. हे मतभेद बुद्धीवर आधारित असतील. प्रथम आपण सर्व समाज एकसंध होऊन एकजुटीनं महाराष्ट्राच्या विकासाची पायाभरणी करूया.''

सुसंस्कृत नागरिक घडविण्यात साहित्य, नाट्य, चित्रपट, लोककला यांचा सिंहाचा वाटा असतो याची साहेबांना जाणीव आहे. साहेबांना स्वत:ला कला, साहित्य यांचं आकर्षण आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचं धोरण सरकारनं ठरविलं. विदर्भासोबत झालेल्या करारानुसार

पहिल्यांदा महाराष्ट्र राज्य विधानसभेचं अधिवेशन नोव्हेंबर १९६०ला साहेबांनी नागपूरला घेतलं. या अधिवेशनात साहेबांनी 'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ' स्थापन करण्याची मान्यता घेतली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक केली. नागपूर येथेच या मंडळाचं उद्‌घाटन साहेबांनी केलं.

कलावंत म्हणून साहेब ज्यांना दैवत मानत ते नारायण राजहंस ऊर्फ बालगंधर्व विकलांग अवस्थेत जीवन जगताहेत असं पु. लं. देशपांडे यांनी साहेबांच्या निदर्शनास आणून दिलं. साहेबांनी बालगंधर्वांना मासिक ३०० रुपये मानधन सुरू केलं. बडोदे दरबाराचे राजकवी यशवंत (यशवंत दिनकर पेंढारकर) हे कराडच्या शंकरराव करंबळेकरांचे परिचित. त्यांचा महाराष्ट्रानं यथोचित सन्मान करावा असं करंबळेकरांनी साहेबांना सुचविलं. साहेबांनी राजकवी यशवंतांचा 'महाराष्ट्रकवी' म्हणून सन्मान केला. महाराष्ट्रकवी यशवंतांना तहहयात ४०० रुपये मासिक मानधन मंजूर केलं. १९६० पासून हे मानधन महाराष्ट्रकवी यशवंतांना मिळू लागलं. विश्वकोश, डायरेक्टोरेट ऑफ लँग्वेजेस अशी नवीन खाती निर्माण करून त्याची अंमलबजावणी साहेबांनी केली.

नागपूर येथील ज्या भूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो बांधवांसोबत बुद्ध धर्माची दीक्षा घेतली त्या भूमीवर डॉ. आंबेडकरांचं भव्य आणि दिव्य स्मारक उभं राहावं असं नवबौद्धांचं स्वप्न आहे. हे स्वप्न साकारण्याचं साहेबांनी मान्य केलं. त्याचसोबत १४ एप्रिल या डॉ. आंबेडकर जयंतीदिनाची सार्वजनिक सुटी जाहीर केली. या आदरापोटी दीक्षाभूमीवर नवबौद्धांनी साहेबांचा भव्य सत्कार १९६० साली घडवून आणला.

या सत्काराला उत्तर देताना साहेब म्हणाले, "अस्पृश्यता भारतीय संस्कृतीला लागलेला एक काळा डाग आहे. तो धुऊन काढण्याचं कार्य डॉ. आंबेडकरांनी केलं आहे. आम्ही नवबौद्धांना सवलती देऊन त्यांच्यावर उपकार करीत नाही. तो त्यांचा हक्क आहे, अधिकार आहे. तो आम्ही मान्य केला आहे. नवबौद्ध शिकून बुद्धीच्या जोरावर झपाट्यानं प्रगती साधत आहेत. नवबौद्धांनी आपल्या बुद्धीचा उपयोग राष्ट्रउभारणीसाठी करावा. बौद्धिक पातळीवर भारताचं नाव जगात तळपत राहील याकरिता

आपल्या बुद्धीचं योगदान द्यावं. महाराष्ट्र बहुजनहिताय, बहुजनसुखाय याकरिता निर्माण केलाय.'' साहेबांनी नवबौद्ध बांधवांची मनं जिंकून घेतली. रिपब्लिकन पक्षाचे नेते दादासाहेब गायकवाड यांना सोबत घेऊन सत्तेची दारं नवबौद्धांना उघडी करून दिली.

लोकसाहित्य साहेबांच्या जिव्हाळ्याचा विषय. ग्रामीण भागात जी लोककला आहे ती नष्ट होण्याच्या मार्गाला लागली होती. तिचं जतन केलं पाहिजे, तिला पुनरुज्जीवित करण्याचं साहेबांनी ठरविलं. लोकसाहित्य हा वेगळा विभाग स्थापन करून शुभारंभ केला. या लोकासहित्य विभागाची सूत्रं डॉ. सरोजिनी बाबर यांच्या हाती सुपूर्द केली.

सहकारी चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या पिचलेला माणूस ताठ मानेनं उभा राहावा याकरिता साहेबांनी २८ ऑक्टोबर १९६०ला एक सहकारी कायदा पास करून घेतला. या कायद्यामुळं सहकारी बँका, भूविकास बँका अस्तित्वात आल्या. सहकारी क्षेत्रात कारखानदारी उभी करीत असताना सामान्य शेतकऱ्याला त्या कारखान्याचं सभासद होता येईल याची तरतूद केली. त्या शेतकऱ्याला भागभांडवल सरकारनं पुरविलं. सहकारी कारखान्याचा सामान्य शेतकरी मालक केला. शेतीवर आधारित सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका, सहकारी सूतगिरण्या, सहकारी कुक्कुटपालन, सहकारी दूध डेअरी इत्यादी शेतीला पूरक कारखाने उभे राहिले.

सामान्य शेतकरी या कारखान्याचा सभासद व मालक झाला. त्याच्या संसारात सहकारानं चांगले दिवस आणले. खाजगी सावकाराच्या तावडीतून या शेतकऱ्यांची सुटका केली. सुरुवातीला महाराष्ट्रात अठरा सहकारी साखर कारखाने उभे राहिले. शेतकऱ्यांच्या आर्थिक भांडवलाची अडचण लक्षात घेऊन सरकारनं जास्तीत जास्त भांडवलाची गुंतवणूक केली. शेतकरी राजा सुखासमाधानानं जीवन जगू लागला. साहेबांच्या काळात पन्नास सहकारी साखर कारखाने उभे राहिले.

दिवा-दासगाव या रेल्वेमार्गावर रेल्वे सुरू करून कोकणवासीयांना मुंबईशी जोडलं. दिवा-पनवेल रेल्वे लाईनची केंद्राकडून मंजुरी मिळविली. काम आपल्या कारकीर्दीत सुरू केलं. कोकण रेल्वेचे जनक साहेब आहेत. मराठवाड्यात कला व क्रीडागुणांना उत्तेजन देण्याकरिता साहेबांनी मराठवाडा

सांस्कृतिक मंडळाची स्थापना केली. डोक्यावरून मैला वाहून नेण्यास बंदी घालणारा कायदा केला.

पुरोगामी आणि समाजवादी महाराष्ट्र घडविण्याची जबाबदारी स्वीकारून साहेबांनी महाराष्ट्र राज्याचा कारभार हाती घेतला. असाच एक निर्णय शेतीच्या संदर्भात महाराष्ट्र सरकारनं घेतला. कमाल आणि किमान जमीन किती असावी याचं एक धोरण ठरविलं. जिरायती जमिनीसाठी ८४ ते १५६ एकर कमाल मर्यादा निश्चित केली. बागायती जमिनीकरिता १६ एकर, दुबार पिकाची हंगामी बागायत जमीन २४ एकर, एका पिकाची हंगामी पाणी असलेली ४८ एकर जमीन निश्चित केली. सिलिंग ॲक्ट करण्यात आला. नियोजन मंडळानं खाजगी कारखान्याकडे असलेल्या जमिनीला हा कायदा लागू करू नये असं मत व्यक्त केलं. खाजगी क्षेत्रातील कुठलाही कारखाना असो, तो सहकारी साखर कारखाना असला तरी त्याला हा कायदा लागू केला पाहिजे या मताचे साहेब होते. खाजगी साखर कारखान्याला हा सिलिंग ॲक्ट लागू करू नये असं मत नियोजन मंडळाचं होतं. नंदाजी नियोजनमंत्री होते. खाजगी साखर कारखान्याच्या जमिनीला जर हा सिलिंग ॲक्ट लागू करायचा नसेल तर गरीब शेतकऱ्यांच्या जमिनीला हा कायदा लागू करू नये या मताचे साहेब होते. शेवटचा प्रयत्न म्हणून साहेबांनी नेहरूजींची भेट घेऊन त्यांच्या कानावर हा प्रश्न घातला. नेहरूजींना सिलिंग ॲक्टचं स्वरूप समजावून सांगितलं. नेहरूजींना साहेबांचं म्हणणं पटलं. नेहरूजींनी साहेबांना एक सविस्तर पत्र पाठवून देण्याचं सांगितलं. साहेब मुंबईला परत आल्यानंतर सिलिंग ॲक्ट कायद्याचं स्वरूप एका पत्राद्वारे नेहरूजींना कळविलं. लगेच नेहरूजींनी साहेबांना नियोजन मंडळासोबत चर्चेस बोलावलं. नियोजन मंडळासोबत केवळ दीड मिनिट चर्चा होऊन या कायद्याला मान्यता मिळाली. नियोजन मंडळानं दीड वर्ष चर्चेचा घोळ घातला होता. साहेबांनी हा कायदा राबवून महाराष्ट्र हे समाजवादी राज्य आहे याची प्रचीती देशाला दिली.

लोकशाहीत सत्तेचे विकेंद्रीकरण अपेक्षित आहे. हे राज्य माझं आहे. हे राज्य मी चालवीत आहे ही भावना लोकांच्या मनात रुजवली पाहिजे. लोकांना सत्तेत सहभागी करून घेतलं पाहिजे. निर्णयप्रक्रियेत सहभागी केलं पाहिजे ही साहेबांची इच्छा होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या

रयतेला वाटायचं, हे स्वराज्य माझं आहे. त्याचं रक्षण करणं माझं कर्तव्य आहे. हीच भावना लोकशाहीबद्दल जनतेच्या मनात रुजवायला पाहिजे. हे ध्येय समोर ठेवून साहेबांनी २१ जुलै १९६०ला समिती स्थापन केल्याचं जाहीर केलं. सहा-सात महिन्यांच्या अवधीत या समितीनं आपला अहवाल सरकारला सादर केला. ७ एप्रिल १९६१ रोजी हा अहवाल साहेबांनी विधानसभेत चर्चेला ठेवला.

अहवाल विधानसभेसमोर ठेवताना साहेब म्हणाले, "सामाजिक व आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अनेक जनहिताचे निर्णय घेऊन ते यशस्वीपणे आपण राबविले. त्याची फळं आज आपल्या जनतेला चाखायला मिळत आहेत. सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचा निर्णय आपल्याला घ्यावयाचा आहे. सत्ता आणि निर्णय घेण्याची प्रक्रिया ग्रामपातळीपर्यंत पोहोचली पाहिजे. त्यांचे प्रश्न त्यांना सोडू देत. मंत्रिमंडळ आणि विधानसभेचे काही अधिकार कमी होतील याची मला कल्पना आहे. ते अधिकार कमी झाले तरी चालतील; पण मला ग्रामीण भागातला कार्यकर्ता हा राज्यकर्ता झालेला पाहायचा आहे. तोही कार्यक्षमतेनं निर्णय घेऊ शकतो हे मला पाहावयाचे आहे."

या विधेयकावर काही मंडळींनी खळखळ करून पाहिली. या विधेयकाचं स्वागत अत्यंत थंडपणे झालं. विरोधी आमदार एस. एम. जोशी यांनी मात्र या विधेयकाचं स्वागत केलं. मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी खाजगीत या विधेयकाबद्दल नाराजी व्यक्त केली. साहेबांनी त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. ते आपलं मत बदलायला तयार नव्हते. शेवटी साहेबांनी आपले अधिकार वापरण्याचे ठरविले.

साहेब म्हणाले, "ज्यांना हे विधेयक मान्य नाही त्यांना बाहेरचा रस्ता मोकळा आहे. त्यांनी मंत्रिमंडळातून बाहेर पडावं."

चर्चेनंतर हे विधेयक प्रवर समितीकडे सोपवावं असं ठरलं. या समितीनं सखोल अभ्यास करून आपलं मत व्यक्त केलं. या समितीच्या टिप्पणीसह परत हा अहवाल विधानसभेसमोर मांडण्यात आला. ८ डिसेंबर १९६१ला हे विधेयक संमत झालं. १ मे १९६२ला जिल्हा परिषद, पंचायत समिती राज्याची योजना प्रत्यक्षात अमलात आली. महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य ठरलं की, ज्याने ग्रामीण जनतेला सत्तेत सहभागी

करून घेतलं. साहेबांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा विचार व्यक्त केला होता. उक्ती आणि कृती यांचा प्रत्यक्ष मेळ घालून कार्यवाही करणारे पहिले मुख्यमंत्री म्हणून साहेबांचा देश गौरव करू लागला. साहेबांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती राज निर्माण करून ग्रामीण भागातील जनतेला राज्यकर्ती जमात म्हणून हक्क मिळवून दिला. गांधीजींची ग्रामस्वराज्याची कल्पना प्रत्यक्षात अमलात आणली.

सचिवालयात मुख्यमंत्र्यांच्या दालनात साहेबांची भेट घेण्याची वर्दळ, फायली हातात घेऊन सचिवांच्या येरझारा, दूरध्वनींना एका सेकंदाची उसंत नाही. भेटायला आलेल्यांचे प्रश्न ऐकून घेण्यात व सोडविण्यात साहेब मग्र. सर्वांच्या भेटीगाठी संपल्यानंतर मुख्य सचिव व सचिवासमवेत बैठक. कामासंबंधी काही अडचणी सचिवांनी सांगितल्यास त्या अडचणींचं तत्काळ निवारण साहेब करताहेत. प्रत्येक सचिव आपापल्या खात्याच्या फाईलवर साहेबांची सही घेऊन कामाची मंजुरी घेत आहे. कामाच्या रगाड्यात दुपार केव्हा झाली हे कळलंदेखील नाही साहेबांना. खाजगी सचिव लगबगीनं खोलीत येऊन साहेबांच्या कानाशी लागतात. साहेब सर्व अधिकाऱ्यांचा निरोप घेऊन आपल्या अंटीचेंबरमध्ये घाईघाईनं जातात. लगेच दूरध्वनीची घंटा निनादते. दूरध्वनी उचलून साहेब कानाशी लावतात.

तिकडून आवाज आला, ''मी जवाहरलाल नेहरू बोलतोय. एकटेच आहात ना, की कुणी बसलंय तुमच्यासोबत? बसलेले असतील तर त्यांना बाहेर जायला सांगा. मला तुमच्याशी काही गोपनीय बोलायचंय.''

''नाही, कुणी नाही माझ्यासोबत. मी एकटाच आहे खोलीत.'' साहेब.

''मी तुमच्याशी जे बोलणार आहे ते अत्यंत महत्त्वाचे आहे. मी जे विचारणार आहे ते गोपनीय ठेवा. याची गंधवार्ताही कुणाला लागता कामा नये.'' पंडितजी.

''माझ्यावर आपला विश्वास आहे याची मला कल्पना आहे. यापूर्वीही आपण माझ्यावर असाच विश्वास टाकला होता. त्या आपल्या विश्वासास मी पात्र ठरलो.'' साहेब.

''तुमच्यावर माझा विश्वास आहे म्हणूनच मी तुमची निवड केलेली आहे. मला तुमचं उत्तर 'हो' किंवा 'नाही' या दोन शब्दांत पाहिजे.'' पंडितजी.

"आपणास मी हमी देतो, आपल्या संभाषणाची मी कुठेही वाच्यता करणार नाही." साहेब.

"माझा विश्वासू सहकारी म्हणून मी तुमच्यावर संरक्षणमंत्र्याची जबाबदारी टाकू इच्छितो. तुम्ही दिल्लीला माझ्या मदतीकरिता आलं पाहिजे." पंडितजी.

"मला संरक्षण खात्याचा अनुभव नाही. मी ही जबाबदारी पार पाडू शकेल की नाही याचा विचार करायला मला थोडा अवधी दिला तर बरं होईल." साहेब.

"मी तुम्हाला दोन दिवसांचा अवधी देतो; पण हे लक्षात असू द्या की, ही गोष्ट यां कानाची त्या कानाला कळता कामा नये. उत्तर 'हो' किंवा 'नाही'." पंडितजी.

"मला एका व्यक्तीशी विचारविनिमय करण्याची परवानगी हवीय आपली." साहेब.

"अशी कोण व्यक्ती आहे की, ज्या व्यक्तीशी तुम्हाला विचारविनिमय करणं आवश्यक आहे?"

पंडितजींचा आवाज किंचितसा चढलेला साहेबांना जाणवला.

"आहे अशी एक व्यक्ती, त्यांचं नाव आहे सौ. वेणुताई चव्हाण-माझी धर्मपत्नी. आतापर्यंत मी संघर्षसमयी जे निर्णय घेतले ते सौ. चव्हाण यांच्याशी विचारविनिमय करूनच. त्यात मला यशही आलेलं आहे." साहेब.

पंडितजी फोनवर खळखळून हसले व म्हणाले, "सौ. वेणुताई चव्हाण यांच्याशी तुम्ही विचारविनिमय करायला माझी काहीच हरकत नाही. मला दोन दिवसांनी तुमचा निर्णय कळवा. मी तुमच्या होकारार्थी निर्णयाची वाट पाहतो."

६ नोव्हेंबर १९६२ला दुपारी साहेब आणि नेहरूजी यांच्यात हा संवाद झाला.

■■

# अटकेपार

आज सकाळी मला ५ वाजता जाग आली. साहेब उठले की काय म्हणून मी त्यांच्या खोलीत डोकावून बघितलं. साहेब खोलीत नव्हते. मी वाचनालयात जाऊन बघितलं. तिथेही साहेब मला दिसले नाहीत. मी हॉलमध्ये आले तर हॉलचा मुख्य दरवाजा मला उघडा दिसला. मी बंगल्याबाहेर आले तर साहेब बाहेरील हिरवळीवर फिरताना मला दिसले. मी त्यांच्या जवळ गेले. त्यांच्यासोबत चालू लागले. काल सह्याद्रीवर आल्यापासून मी पाहते, साहेब थोडे विचारमग्न दिसताहेत. त्यांच्या मनात काहीतरी शिजतंय. त्यांच्यासोबत चालता चालता मी साहेबांना विचारलं. म्हणाले, "आज इतक्या लवकर उठून वाचनालयात जाऊन वाचत बसण्याऐवजी तुम्ही बाहेर फिरताहेत हे पाहून मला आश्चर्य वाटलं. बरं वाटत नाही का तुम्हाला? मी कालपासून बघते तुम्ही अबोल झालात ते. मला नं सांगण्यासारखं काही घडलं का?"

"कालपासून मी तोच विचार करतोय की तुला कसं सांगावं." साहेब.

"त्यात काय एवढं विचार करण्यासारखं. आतापर्यंत जसं अधिकारवाणीनं सांगत आलात तसंच आताही सांगायचं." मी.

"खरं आहे तुझं म्हणणं. मी अधिकारवाणीनं तुला सांगत आलो आणि तू माझ्या 'हो'मध्ये 'हो' मिळवत गेली; पण आताच्या निर्णयात तू मला साथ देशील किंवा नाही याबद्दल मला विश्वास वाटत नाही. कारण माझा हा निर्णय आपल्या भावी आयुष्याच्या वाटचालीत अत्यंत जिकिरीचा ठरणार आहे." साहेब.

"हा विचार तरी तुमच्या मनाला कसा शिवला की, मी तुम्हाला साथ देणार नाही म्हणून? आता दुसरा विचार नाही. जे काही करायचं, जगायचं ते केवळ एकमेकांच्या संगतीत. जी काही वाटचाल करायची ती साथ साथ." मी.

मी असं म्हटल्यानंतर साहेबांनी माझ्या नजरेस नजर मिळविली. माझ्या नजरेत त्यांना विश्वास दिसला असावा.

ते म्हणाले, "काल दिल्लीहून नेहरूजींचा दूरध्वनी आला होता. म्हणत होते, तुम्हाला माझ्या मदतीकरिता दिल्लीला यावं लागेल." साहेब.

"तुम्ही काय सांगितलं नेहरूजींना?" मी.

"मी काहोएक सांगितलं नाही. नेहमीप्रमाणं त्यांनी ही गोष्ट कोणाला कळता कामा नये, असा शब्द घेतला माझ्याकडून. पण मी त्यांना सांगितलं, मला एका व्यक्तीला सांगावं लागेल."

त्यावर नेहरूजींनी थोड्या नाराजीच्या सुरात विचारलं, "कोण आहे ही व्यक्ती?

मी त्यांना म्हणालो, "माझी पत्नी सौ. वेणू."

तिकडून नेहरूजी मनमोकळे हसले व म्हणाले, "सौ. वेणुताईला सांगण्यास माझी हरकत नाही." साहेब.

"त्यांच्या मदतीला दिल्लीला जायचं म्हणजे काय करावं लागणार तुम्हाला?" मी.

"चीननं उत्तर सीमेकडून भारताच्या भूमीवर आक्रमण केलं. ते आक्रमण परतावून लावण्याचे आदेश नेहरूंनी सैन्याला दिले. चीनचे आक्रमण थोपवण्यास व परतावून लावण्यास आपलं सैन्य कमी पडू लागलं. हिमालय संकटात सापडलाय. दिवसेंदिवस आपल्या सैन्याला माघार घ्यावी लागत आहे. एकामागून एक आपली ठाणी चीन हस्तगत करीत आहे. सैन्याला जी शस्त्रास्त्रांची व युद्धसामुग्रीची रसद पुरवावयास पाहिजे त्यात कुठेतरी गफलत होऊ लागली.

संरक्षणमंत्री कमी पडू लागले. भारतीय जनता व लोकसभा नेहरूजींवर आरोप-प्रत्यारोप करू लागली. संरक्षणमंत्र्याच्या धोरणावर लोकसभेत स्वपक्षीय व विरोधक सडकून टीका करू लागले. सीमेवर चीनच्या सैन्याला पाठ दाखवण्याची नामुष्की आपल्या सैन्याला स्वीकारावी लागत आहे. तिन्ही सैन्यदलांचे सेनापती हतबल झालेत. तिन्ही दलांत समन्वयाचा अभाव असल्याचा प्रत्यय येऊ लागला. संरक्षणमंत्र्याच्या राजीनाम्याची मागणी वाढू लागली. संरक्षणमंत्री कृष्ण मेनन नेहरूजींच्या जीवलगांपैकी एक. कृष्ण मेनन यांना नेहरू दुखवू इच्छित नव्हते. अनेक अधिकारी संरक्षणमंत्र्याचा विश्वास संपादन करून मोक्याच्या पदावर जाऊन बसले. त्यांची निष्काळजी सीमेवरील सैनिकांना भोगावी लागत आहे. शेवटी नेहरूजींचा नाइलाज झाला. त्यांनी कृष्ण मेननचा राजीनामा मागितला. कृष्ण मेनन यांनीही आपल्या धोरणामुळं नेहरूजी अडचणीत येऊ नयेत म्हणून राजीनामा दिला. नेहरूजींनी तो स्वीकारला. संरक्षणमंत्र्याचा कारभार स्वत: नेहरूजींनी आपल्याकडे घेतला. नेहरूजी मला केंद्रात संरक्षणमंत्री करू इच्छितात. या संकटकाळी माझी मदत त्यांना हवी.'' साहेब.

बोलत बोलत मी व साहेब बंगल्यातील मुख्य बैठकीत आलो. मी साहेबांना चूळ भरून येण्याची विनंती केली. साहेब वॉशबेसीनकडे गेले. मी स्वयंपाकघरात जाऊन दोन कप चहा ट्रेमध्ये घेऊन मुख्य बैठकीत आले. तोपर्यंत साहेब चूळ भरून बैठकीत येऊन बसले. आम्ही दोघे सोबत चहा घेऊ लागलो. चहा घेता घेता मी साहेबांना विचारलं.

म्हणाले, ''तुम्ही काय ठरवलं मग?''

''मी काय ठरवणार? ठरवायचं आहे तू, मी आणि आईंनी. आपल्या तिघांचा एक विचार झाला की कळवू आपला निर्णय नेहरूजींना. त्याकरिता दोन दिवसांचा अवधी मागवून घेतला मी नेहरूजींकडून. तुझा विचार, सल्ला माझ्याकरिता लाखमोलाचा आहे.'' साहेब.

''मी काय सल्ला देणार तुम्हाला! तुम्ही निर्णय घ्यायचा आणि मी तुम्हाला साथ द्यायची हे आपलं ठरलेलं आहे. तरीपण मला वाटतं महाराष्ट्रात वंचितांकरिता अजून बरंच काही करायचं बाकी आहे. आपण आताच कुठे आईला इथे घेऊन आलो. त्यांना दिल्लीचं हवामान सोसलं का? त्यांचं आता वय झालं आहे. या सर्व बाबींचा विचार करून आपण निर्णय घेऊया.'' मी.

"तुझं म्हणणं पटतंय मला. महाराष्ट्रातील जनतेकरिता खूपकाही करण्याची माझी इच्छा आहे. आधुनिक महाराष्ट्र निर्माण करून वंचितांचं जीवन सुजलाम् सुफलाम् करायचं मला. त्याकरिता मला महाराष्ट्रात थांबावयास पाहिजे. पण मी नेहरूजींना दिलेला शब्द आणि वंचितांच्या उन्नतीची घेतलेली शपथ या दोन्हीपैकी मला एकाची निवड करावी लागणार. कुणाची निवड करावी या द्विधा मनःस्थितीत अडकलोय मी." साहेब.

"यापैकी तुम्हाला एकाची निवड करावीच लागणार. आई आपल्यासोबत राहतील असा मला विश्वास आहे. त्यांचा आशीर्वाद सदैव आपल्या पाठीशी आहे." मी.

"आशीर्वादावरून मला आठवण झाली. जेव्हा मी द्वैभाषिक राज्याची सूत्रं स्वीकारली तेव्हा मी नेहरूजींना आशीर्वाद मागितला. 'तुमचा आशीर्वाद मला असू द्या' असे मी म्हणालो होतो. त्यावर 'माझा आशीर्वाद सहज कुणाला मिळत नाही' असे नेहरूजी म्हणाले होते. यावेळेस त्यांचा आशीर्वाद मला मिळेल का? तसेच दिल्ली ही अनाकलनीय आहे. गूढ वातावरण, आपल्या मोहपाशात कुणाला केव्हा गुंडाळेल याचा थांगपत्ताही नाही. दिल्लीकरांच्या मनाचा ठाव लागणं कठीण. अत्यंत आतल्या गाठीतले. बुद्धीच्या चाली अत्यंत किचकट. या चालीला शह देण्याचा विचार करेपर्यंत दुसरीच तिरकस चाल चालून प्रतिस्पर्ध्याला नामोहरम केलेलं असतं. येथील राजकीय जीवनाला अत्यंत वेग आहे. या वेगाशी, गतीशी आपण स्वतःला गतिमान ठेवू शकलो नाही तर राजकारणाच्या धावपट्टीबाहेर आपण फेकले जातो. फंदफितुरीचं बाळकडू प्यायलेलं वातावरण, अविश्वास, येथील स्थायिभाव या सर्व वातावरणात आपल्यासारख्या सरळमार्गी माणसाचा दम घुटतो. निष्ठुर मनानं निर्णय घेऊन आपल्याला केव्हा हुलकावणी देतील याचा नेम नाही. इतिहासात मराठी माणसाचं पानिपत करणारी ही दिल्ली. इथे आपला निभाव लागेल का? या सर्व अडथळ्यांना दूर सारण्याचं सामर्थ्य आपल्यात आहे का? याचा विचारही आपल्याला करावा लागेल." साहेब.

"आपण ही गोष्ट आईच्या कानावर घालावी असं मला वाटतं. त्यांचं काय म्हणणं आहे ते ऐकून घेतल्यानंतरच निर्णय घेऊ." मी.

मी आणि साहेब आईकडे गेलो. आई सकाळी स्नानसंध्या उरकून

आपल्या विठ्ठलाच्या नामस्मरणात तल्लीन झालेल्या. हातात तुळशीची जपमाळ. सकाळीच आम्ही त्यांच्याकडे आलेलं पाहून त्यांना आश्चर्य वाटलं असावं. मी व साहेबांनी आईचं दर्शन घेतलं. आईच्या पायाशी बसलो.

"कसंकाय येणं केलं दोघांनी? आनंदात तर आहात ना?" आई.

"आपला आशीर्वाद घ्यायला आलो आहे आम्ही." साहेब.

"माझा आशीर्वाद सदैव तुमच्या पाठीशी आहे." आई.

मी आईला विचारावं असं साहेबांनी मला नजरेनं खुणावलं. मग हळूच आईला मी विचारलं.

म्हणाले, "आई, देशावर संकट आलं आहे. नेहरूजी संकटात सापडलेत. नेहरूजी साहेबांना मदतीकरिता दिल्लीला बोलावताहेत."

"नेहरूंवर असं काय संकट आलं आणि यशवंता दिल्लीला गेला म्हणजे ते संकट टळू शकेल?" आई.

"होय आई, नेहरूजींचा तसा विश्वास आहे. हिमालयाच्या बाजूनं चीन भारतात घुसखोरी करीत आहे. लढाईला तोंड फुटलंय. आपल्या सैन्याचं मनोधैर्य खचलं आहे. देशाची जनता नेहरूजींवर नाराज झाली आहे. आपल्या सैनिकांना प्राणाला मुकावं लागत आहे. भारताच्या संरक्षणमंत्र्यावर जनता नाराज आहे. त्यांना दूर सारून साहेबांना संरक्षणमंत्री करताहेत नेहरूजी." मी.

"नेहरूजी संकटात सापडले, हिमालयावर शत्रू चाल करून येतोय, आपले सैनिक धारातीर्थी पडत आहेत. त्यांच्या संरक्षणाकरिता तू जात असशील तर नाही कशी म्हणू मी. उलट मला न विचारता तू गेला असता तर मला तुझा अभिमान वाटला असता. वेळ दवडू नको." आई.

"आई, तुला विचारण्याचा आमचा हेतू वेगळा होता. तू नाही म्हणणार नाही याची खात्री होती आम्हाला; पण आई, तुझं वय झालंय. तुझी सेवा करण्याची इच्छा आहे आमची." साहेब.

"अरे यशवंता, मातेची सेवा करण्याची तुझी इच्छा आहे ना, मग भारत तुझी माता आहे. तिची सेवा म्हणजे माझी सेवा समज. आईला आणि मातीला विसरू नको. आई आणि माती एकच आहे. भारतमातेची सेवा कर. अरे, घार आकाशी जरी फिरत असली तरी तिचं चित्त तिच्या पिलाकडं असतंच. तसं तू कुठंही जा, माझं चित्त तुझ्यापाशी राहील.

माझा आशीर्वाद सदैव तुझी पाठराखण करीत राहील. यशवंत हो.'' आई.

आम्ही दोघं आईचा आशीर्वाद घेऊन पुढील आमच्या कामाला लागलो. आईसोबत विचारविनिमय करून साहेब तयार होऊन त्यांच्या दैनंदिन कामास लागले. आज ८ नोव्हेंबर. दोन दिवसांत साहेबांना आपला निर्णय श्रेष्ठींना कळवायचा आहे. दिल्लीमध्ये नेहरूजी आणि लालबहादूर शास्त्री यांचं साहेबांच्या बाबतीत बोलणं झालं असावं. नेहरूजी जे काही संघर्षकालीन निर्णय घेत त्या वेळी शास्त्रीजी त्यांच्यासोबत असत. ९ नोव्हेंबरला साहेबांना शास्त्रीजींचा फोन आला. नेहरूजींच्या बोलण्याची उजळणी शास्त्रीजींनी साहेबांशी बोलताना केली. साहेबांनी नेहरूजींसोबत जे बोलणं झालं त्याची कल्पना शास्त्रीजींना दिली. शास्त्रीजीदेखील नेहरूजींप्रमाणे माझा विचार साहेब घेणार यावर खूश झाले. १० नोव्हेंबरला साहेबांचा कार्यालयामधून मला घरी फोन आला, 'मला ४ वाजता दिल्लीला पोहोचायचं आहे. नेहरूजींचा फोन होता.' मी साहेबांची बॅग भरून ठेवली. त्यांना प्रवासात वाचण्याकरिता एक पुस्तकही बॅगमध्ये ठेवलं. साहेब कार्यालयातून घरी आले. मातेचं दर्शन घेतलं. माझ्याकडं आत्मविश्वासानं चित्त भरून बघितलं. मी नेहमीप्रमाणं हसतमुखानं भावी वाटचालीबद्दल शुभेच्छा दिल्या. साहेब दिल्लीच्या रोखाने निघाले.

दिल्ली विमानतळावरून थेट 'तीनमूर्ती भवन' या नेहरूंच्या निवासस्थानी पोहोचले. साहेब आल्याचा निरोप नेहरूजींना पाठविला. तत्काळ नेहरूजींनी साहेबांना आत बोलावलं. नेहरूजींसोबत शास्त्रीजी तिथे हजर होते. नेहरूजी जरा कष्टी दिसले. आपली एक एक ठाणी पडल्याच्या वार्ता येऊन धडकताहेत. स्वातंत्र्यावरील या संकटाचा मुकाबला कसा करावा याची खलबतं सारखी तीनमूर्तीवर चालू आहेत. नेहरूजींना क्षणाची उसंत नाही. त्यांनी लगेच साहेबांना विचारलं.

म्हणाले, "घेतला का तुम्ही निर्णय येथे येण्याचा?''

"मला अजूनही असं वाटतं, माझं इथं येणं खरंच आवश्यक आहे का? तुम्हाला जर आवश्यक वाटत असेल तर माझी येथे येण्याची तयारी आहे.'' साहेब.

"आता विचार करायला आपल्याला वेळ नाही. तुम्ही इथं आलंच पाहिजे.'' नेहरूजी.

'यशवंतजी, आम्ही विचारपूर्वक हा निर्णय घेतला आहे. या संकटकाळी तुम्ही नेहरूजींची पाठराखण केली पाहिजे. तुमच्यासारखा सक्षम मुख्यमंत्री दुसरा कुणी नाही. परत तुम्ही लढवय्या प्रांताचे प्रतिनिधी आहात.'' शास्त्रीजी.

''तरीपण अजूनही मला असं वाटतं, तुम्ही या निर्णयाचा पुनर्विचार करावा. वाटल्यास मी आज दिल्लीत थांबतो. सकाळी परत मुंबईला जाईल.'' साहेब.

''त्यात पुनर्विचार करण्यासारखे काही नाही. तुम्हाला माझ्या अडचणीची कल्पना नाही. टी. टी. कृष्णम्माचारी व बिजू पटनाईक यांना वाटतं मी त्यांना संरक्षणमंत्री करावं. मी तुमची निवड विचारपूर्वक केली आहे.'' नेहरूजी.

''आपल्या इच्छेचा मी अनादर करणार नाही. मी सकाळी आपणास भेटून मुंबईस जाईल.'' साहेब.

दुसऱ्या दिवशी साहेबांनी नेहरूजींची भेट घेतली.

नेहरूजी वैतागलेल्या भाषेत साहेबांना म्हणाले, ''अहो चव्हाण, तुम्ही अजून इथेच आहात. मुंबईला गेला नाहीत. लवकर मुंबईला जाऊन तुमच्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून तुमचा वारस ठरवा आणि लवकर दिल्लीत परत पोहोचा.'' नेहरूजी.

साहेब नेहरूजींचा निरोप घेऊन मुंबईला निघाले. महाराष्ट्र राज्याची सूत्रे कुणाकडे सोपवावी याचा विचार साहेब करू लागले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या वेळी विदर्भ, मराठवाडा यांना दिलेली आश्वासनं पाळली पाहिजेत असं साहेबांनी मनोमन ठरवलं. संरक्षण निधीला मदत करणाऱ्यांच्या रांगा मुख्यमंत्र्याच्या कक्षासमोर लागलेल्या. उद्योगपती, सिनेसृष्टीतील दिग्गज, मराठी सिनेसृष्टीही त्यात मागे नाही. सी. रामचंद्र, ग. दि. माडगूळकर, मराठी मनाला भुरळ घालणाऱ्या सुलोचनाबाई यांनी आपल्या दिवंगत वहिनीचे दागिने संरक्षण निधीला साहेबांकडे सुपूर्द केले. अखखा महाराष्ट्र भारावून भारताच्या संरक्षणाकरिता सर्वस्वाचा त्याग करण्यास तयार झाला.

साहेबांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत चर्चा केली. मला दिल्लीला जाणे कसे आवश्यक आहे याची कल्पना दिली. माझ्यानंतर तुम्हाला महाराष्ट्र घडवायचा आहे. पुरोगामी महाराष्ट्राची प्रतिमा सांभाळायची आहे.

एकसंध राहून काम करावयाचे आहे. ज्येष्ठ सहकाऱ्यांसोबत विधिमंडळ नेतेपदाची निवड करण्याची चाचपणी केली. बाळासाहेब देसाई, कन्नमवार, आबासाहेब खेडकर यांची प्रबळ महत्त्वाकांक्षा दिसली. बर्वे व पी. के. सावंत या कार्यक्षम मंत्र्यांचाही विचार साहेब करीत होते. संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी कन्नमवार यांनी जो त्याग केला त्यांच्या त्यागाचा विचार करणे साहेबांना क्रमप्राप्त आहे. साहेबांचा कल एकसंध महाराष्ट्र ठेवून प्रगतिपथावर घेऊन जाणाऱ्या सक्षम सहकाऱ्याच्या हाती सत्ता सोपविण्याचा आहे. महाराष्ट्राला सांभाळू शकणारं नाव साहेबांना कन्नमवार हेच दिसू लागलं. साहेबांनी नेहरूजींशी चर्चा करून वरील नावांपैकी एक नाव निश्चित करण्याचं ठरविलं. या सर्व नावांबद्दल नेहरूजींनी साहेबांसोबत साधकबाधक चर्चा केली. कन्नमवारांच्या शिक्षणाबद्दल चर्चा केली. शिक्षण कमी असले तरी प्रशासनाचा अनुभव असून माझ्या मंत्रिमंडळात दुसऱ्या क्रमांकाचे मंत्री आहेत अशी पुस्ती साहेबांनी कन्नमवार यांच्याबाबतीत जोडली. नेहरूजींनी तुम्हाला जे योग्य वाटेल ते करा, त्यातून नवीन प्रश्न निर्माण होऊ नये याची काळजी घ्या, असं साहेबांना सांगितलं. साहेबांनी नेहरूजींच्या सल्ल्यानं कन्नमवार यांचं नाव महाराष्ट्र विधिमंडळाच्या नेतेपदासाठी निश्चित केलं.

मुंबईला येऊन तीन-चार दिवस लोटत नाहीत तोच १४ नोव्हेंबरला दिल्लीत नेहरूजी साहेबांना देशाचे संरक्षणमंत्री म्हणून जाहीर करतात आणि महाराष्ट्रात १४ नोव्हेंबरला पुण्यातील ऐतिहासिक दिल्ली दरवाजासमोर साहेबांचा ऐतिहासिक सत्कार आयोजित केलेला. याच दिल्ली दरवाजाच्या समोरील मैदानातून छत्रपतींचे पेशवे, मराठ्यांची फौज घेऊन दिल्लीच्या दिशेने आगेकूच करीत असत.

या निरोप समारंभात बोलताना साहेब म्हणाले, "सह्याद्री प्राण नसलेला काळा पाषाण नाही. महाराष्ट्राच्या शौर्याचे व परंपरेचे प्रेरणास्थान आहे. या सह्याद्रीपासून आम्ही स्फूर्ती घेऊन महाराष्ट्राची निर्मिती केली. या स्फूर्तीच्या जोरावर सह्याद्रीचे पुत्र लढता लढता मरण पत्करतील; पण कुणाचीही गुलामगिरी स्वीकारणार नाही. सह्याद्री आपल्या काळ्या पत्थराचा कोट तयार करून शत्रूला नामोहरम करील."

साहेबांच्या या भाषणाने प्रभावित होऊन संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील विरोधक साहेबांचा जयजयकार करीत होते. दिलदार पुणेकरांनी साहेबांना

भावी यशस्वितेसाठी शुभेच्छा दिल्या. दुसऱ्या दिवशीच्या सर्व मराठी वर्तमानपत्रांत 'हिमालयाच्या रक्षणासाठी सह्याद्री निघाला' अशा अर्थाचे मथळे झळकले.

देशाच्या स्वातंत्र्यावर प्रथमच चीनने घाला घातला. देशात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. या संकटकाळी महाराष्ट्राच्या भूमिपुत्राची देश संरक्षणमंत्री म्हणून निवड करतो याचा थेट संबंध इतिहासातील शौर्याच्या भावनांशी घातला जाऊ लागला. देशातील सामान्यांतील सामान्य माणसाला हे स्वातंत्र्य आमचं आहे, हा स्वतंत्र देश माझा आहे ही भावना जागृत झाली. इतिहासात एका कवीनं स्वराज्याशी सामान्य शेतकरी किती एकरूप झाला याबद्दल निर्भीडपणे एक वर्णन केलं आहे.

१०-१२ वर्षांचा शेतकऱ्याचा पोरगा बांधावरून जाणाऱ्या घोडेस्वाराला अडवितो. घोडेस्वार शस्त्रसज्ज असतो. त्याच्या घोड्याचा लगाम हातात धरून हे चिमुरडं पोर त्या घोडेस्वाराला जाब विचारतं.

म्हणतं, "खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे चिंधड्या
उडवील राई राई एवढ्या..."

हे घोडेस्वार दस्तुरखुद्द शिवाजी महाराज होते. शिवाजी महाराज माझे आहेत. महाराजांचं राज्य माझं राज्य आहे. मी या राज्याच्या संरक्षणाकरिता सज्ज आहे ही भावना यातून व्यक्त होते.

साहेब संरक्षणमंत्री झाल्याचे जाहीर होताच महाराष्ट्रात व देशात एक पराक्रमाची, शौर्याची लहर पसरली. वीररसात काव्य निर्माण होऊ लागलं. देश ईर्षेनं पेटून उठला. ज्याला जे जमेल ते करण्याची ऊर्मी उफाळून आली. अशीच ऊर्मी एका आदिवासी कवयित्रीने साहेबांवर काव्य करून व्यक्त केली. स्वातंत्र्यातील स्त्रीलादेखील वाटू लागलं की, हे स्वातंत्र्य माझं आहे. स्वातंत्र्यावर आलेल्या संकटाला साहेब आपल्या कर्तृत्वाने दूर सारतील असा आत्मविश्वास या आदिवासी स्त्रीने व्यक्त केला.

ही आदिवासी स्त्री लिहिते -

'संरक्षणपद भूषव यशवंता!'
'सह्याद्री'च्या कड्या कड्यातून जयध्वनी घुमला ।
विशाल भारत वर्षामाजी, क्षणात तो उठला ।।१।।
'यशवंता'च्या यशकीर्तीची वार्ता जै आली ।

महाराष्ट्राची भोळी जनता हर्षान्वित झाली ।।२।।
संरक्षणमंत्र्यांचा देऊन तुम्हा श्रेष्ठ मान ।
'पंडितजीं'नी महाराष्ट्राचा केला बहुमान ।।३।।
महाराष्ट्राचे स्फूर्तिप्रद तू निर्मल जल प्याला ।
'शिवरायांच्या' पावनभूवर अखंड वावरला ।।४।।
मोगलशाहीस धडकी दिधली मर्द मराठ्यांनी ।
जरिपटका तो अटकेवरती नाचविला ज्यांनी ।।५।।
त्या वीरांची उत्स्फूर्ती तव अंतरात भरली ।
महाराष्ट्राच्या कणांकणांतील देशभक्ति शिरली ।।६।।
'जिजाबाईं'चे, 'छत्रपतीं'चे अनेक संतांचे ।
आशीर्वाद तूज द्याया आले वारे दख्खनचे ।।७।।
धन्य जन्म-भू । धन्य । 'माय' तव धन्य 'वेणुताई'।
तुझ्याच रूप, फळा पावली, त्यांची पुण्याई ।।८।।
'हर हर' गर्जून 'संरक्षणपद भूषव' यशवंता ।
महाराष्ट्राचा मानाचा घे मुजरा गुणवंता ।।९।।

- शांतादेवी तडवी,जळगाव

१९ नोव्हेंबर देशाच्या राजकारणाचा धामधुमीचा दिवस. महाराष्ट्रात साहेब १९४६ पासून ज्या सभागृहाचे सभासद झाले त्या सभागृहाचा निरोप आज घेणार आहेत तर दिल्लीमध्ये संरक्षण खात्यामध्ये खळबळजनक घटना घडत आहेत. साहेबांनी विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदाचा राजीनामा दिला. विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी साहेबांचे वारस म्हणून मारोतराव कन्नमवार यांची निवड झाली. दिल्लीत याच तारखेला सरसेनापती थापर तेजपूरहून राजधानीत पोहोचले. त्यांनी आपला राजीनामा नेहरूजींना सादर केला. नेहरूजींनी राष्ट्रपती राधाकृष्णन यांची भेट घेऊन त्यांच्या सल्ल्याने सरसेनापतीपदी जनरल चौधरी यांची नेमणूक केली. प्रकृतीच्या कारणास्तव थापर यांना दीर्घ रजेवर पाठविलं. ले. ज. कौल राजीनाना देऊन मोकळे झाले. विधिमंडळाच्या सभागृहात साहेब सभागृहातील सदस्यांचा निरोप स्वीकारीत आहेत. विरोधी पक्षनेते कृष्णराव धुळप यांनी साहेबांच्या अभिनंदनाचा ठराव मांडताना आपले विचार व्यक्त केले.

म्हणाले, 'यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कार्यकुशलतेनं या

सभागृहाला उच्चतम पातळीवर नेऊन पोहोचविलं त्याबद्दल त्यांचे हे सभागृह अभिनंदन करीत आहे. या सभागृहाचे कर्णधार आणि राज्याचे प्रमुख म्हणून त्यांनी वंचितासाठी आणि महाराष्ट्राच्या उत्कर्षाकरिता जी धोरणं राबविली त्याची दखल इतिहास तर घेईलच; पण हे सभागृह त्यांचे चिरकाल ऋणी राहील. राज्याचे हित सांभाळताना या सभागृहात त्यांना बुद्धीची जी कसरत करावी लागली, कामकाज करताना बौद्धिक चातुर्य वापरून एक आदर्श लोकशाहीचा पायंडा या सभागृहात निर्माण केला त्यामुळे त्यांना या सभागृहाचं व जनतेचं प्रेम मिळालं व ते आदरास पात्र ठरले आहेत.''

एकामागून एक वक्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. साहेब हे एका पक्षाचे नेते म्हणून दिल्लीस जात आहेत असे नाही. तमाम मराठी माणसांचे व महाराष्ट्राच्या शूरत्वाचे प्रतिनिधी म्हणून दिल्लीत जात आहेत. मराठी जनता मन, तन, धन आणि जात, भेद, पंथ विसरून एकसंध होऊन एकदिलाने साहेबांच्या पाठीशी उभी आहे. सभागृहाचे वातावरण मंत्रमुग्ध झालेलं. साहेबांप्रती भारावलेलं. अशा वातावरणात आचार्य अत्रे बोलावयास उभे राहिले. साहेबांप्रती आपल्या भावना व्यक्त करताना अत्रे साहेबांना 'माझे प्रिय मित्र' म्हणताच सभागृहात हशा पिकला.

अत्रे पुढे म्हणाले, ''मी यशवंतरावांना परमप्रिय मित्र म्हणणार त्या वेळी सभागृहातील प्रत्येक सदस्य खळखळून हसणार याची मला कल्पना होती. १९४६ साली त्यांची माझी मैत्री झाली. मध्यंतरीच्या काळात म्हणजे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीकरिता आम्ही वैचारिक लढाई लढलो. मी ज्या समाजाचे प्रतिनिधित्व करतो तो समाज कावेबाज समाज म्हणून ओळखला जातो तर यशवंतराव ज्या समाजाचे प्रतिनिधित्व करतात त्या समाजाची दंडेलशाही समाज म्हणून ओळख आहे. पण मी यशवंतरावांना विरोध करताना कधी कावेबाजपणा केला नाही आणि त्यांनीही कधी दंडेलशाही केली नाही. आम्ही दोघेही बुद्धीच्या पातळीवर लढलो. बुद्धीच्या पातळीवर बुद्धीच्या डावपेचानं या माणसानं आम्हाला लोळवलं. समाजजीवनात मनुष्य कायमचा कन्सिस्टंट राहू शकत नाही व राजकारणात तर शक्यच नाही. ज्याला हृदय आहे तो नेहमी बदलत राहील. दगडच काय तो जसाच्या तसा राहू शकेल.''

साहेबांच्या कर्तृत्वाविषयी बोलताना अत्रे म्हणाले, "देशावरील संकटाचं शिवधनुष्य यशवंतरावांनी पेललं आहे. मराठी जनता आपल्या शरीरातील रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत साथ देण्यास मागे हटणार नाही. महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीनं मी त्यांना शब्द देत आहे."

साहेब सत्काराला उत्तर देण्यासाठी उभे राहिले. सभागृहभर एक नजर फिरविली. सभागृह डोळ्यात साठवून घेतलं. क्षणभर कंठ दाटून आला.

दाटलेल्या कंठानेच बोलताना म्हणाले, "कराडसारख्या ग्रामीण भागातील स्वातंत्र्यसैनिक म्हणून १९४६ मध्ये मी या सभागृहात प्रवेश केला. माझ्यांत आत्मविश्वास ठासून भरलेला होता तरीपण लाजरीबुजरी वृत्ती माझ्यात होती. त्या लाजऱ्याबुजऱ्या वृत्तीला या सभागृहानं घालविलं. आत्मविश्वास आणि निधडेपणाची वृत्ती सोबत घेऊन मी हे सभागृह सोडत आहे. संकटकाळावर मात करण्याकरिता मला हा आत्मविश्वास आणि निधडेपणाची वृत्ती कामास येईल. मी ज्या सामर्थ्याच्या जोरावर जात आहे ते सामर्थ्य मला या मातीतून मिळालेले आहे. या मातीत मी लहानचा मोठा झालो. या मातीनं माझ्यात जी रग निर्माण केलेली आहे ती रग समोरच्या शत्रूला पळताभुई थोडी केल्याशिवाय राहणार नाही. या आत्मविश्वासाने मी आपला निरोप घेत आहे."

मुंबईच्या जनतेनं आजच्या दिवशीच चौपाटीवर साहेबांचा भव्य असा निरोप समारंभ घडवून आणला.

मुंबईच्या जनतेचा निरोप घेताना सांहेब म्हणाले, "मुंबई आणि महाराष्ट्राच्या जनतेला संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या वेळी मी जे वचन दिलेलं आहे त्याची पूर्तता करण्याचा माझा प्रयत्न राहील. मी तुम्हाला वाऱ्यावर सोडणार नाही. भारत संकटात सापडला आहे. त्याने महाराष्ट्राला संरक्षणाकरिता हाक दिलेली आहे. देशाचं संरक्षण करणं महाराष्ट्राचं कर्तव्य आहे. ती महाराष्ट्राची परंपरा आहे. हिमालयाच्या संरक्षणाकरिता सह्याद्री एक वेळ आपले प्राण अर्पण करील; पण मागे हटणार नाही. महाराष्ट्राचा इतिहास आपणास हे शिकवितो."

मुंबई सोडण्यापूर्वी आकाशवाणीवर भाषण करताना साहेब म्हणाले,

"या मातीतच मी प्रथम रांगलो आणि रंगलो पुढे<br>हीच, गड्यांनो, माती माझ्या रक्तात चढे...."

"स्वातंत्र्य धोक्यात सापडलेलं असताना कुणीही महाराष्ट्रीयन आपल्या सर्वस्वाचा त्याग करून आपल्या प्राणाचे बलिदान करण्यास मागेपुढे पाहणार नाही. इतिहास याला साक्षी आहे. महाराष्ट्राची ही वृत्ती आहे. कर्तव्यपालन करीत असताना माझ्यासोबत सह्याद्रीचा बेडरपणा, कृष्णा-कोयनेचा संथपणा, गोदावरी-नर्मदेची नितळता, वैनगंगेची भव्यता, कोकणाचा करारीपणा आणि पैठणची भाविकता राहणार आहे."

राजेरजवाड्यांना हेवा वाटावा असा निरोप लोकशाहीमध्ये मुंबईकरांनी साहेबांना दिला. सह्याद्री बंगल्यापासून थेट विमानतळापर्यंत दुतर्फा रस्त्यावर मुंबई जनता मानवी साखळी करून चौकाचौकात साहेबांच्या जयजयकाराच्या घोषणा देत आहे. मुंबईतील पोलिसांना जनतेला आवर घालता घालता नाकीनऊ येऊ लागले. बळवंतरावांचा हा कृषिपुत्र भारतमातेच्या संरक्षणाकरिता, आपल्या मातेच्या आशीर्वादाच्या शिदोरीवर शत्रूशी दोन हात करण्याकरिता दिल्लीला निघाला. भारताच्या क्षितिजावरील एक उगवता सूर्य व देशाच्या भावी पिढीचा नेता म्हणून देशानं साहेबांची दखल घेतली.

२० नोव्हेंबरला सायंकाळी साहेब दिल्ली विमानतळावर उतरले. दिल्लीनं आपलं धक्कातंत्र सुरू केलं. साहेबांच्या स्वागताला सरसेनापती थापरऐवजी सरसेनापती म्हणून जनरल चौधरी हजर होते. साहेब विमानतळावरून 'तीनमूर्ती' या नेहरूजींच्या निवासस्थानी पोहोचले. नेहरूजी आत्मविश्वासानं साहेबांसोबत बोलले. दिल्लीत अतिवेगानं घडणाऱ्या घटनांची कल्पना साहेबांना दिली. थापर यांचा राजीनामा, त्यांच्या जागी जनरल चौधरी यांची नेमणूक, नेफामधील आताच्या घडीला काय परिस्थिती आहे, चीनचे सैन्य कुठल्याही क्षणी हिमालय ओलांडून भारतभूमीवर पाय ठेवेल याची कल्पना साहेबांना दिली. नेहरूजींशी चर्चा करतानाच साहेबांना कळलं की, इंदिरा गांधी यांनी आसाम सीमेचा दौरा निश्चित केलेला आहे. साहेबांनी इंदिरा गांधींसोबतही चर्चा केली. काळ, काम आणि वेग यांचा ताळमेळ घालता घालता मध्यरात्र केव्हा उलटून गेली हे साहेबांना कळलंही नाही. दिल्लीत मोरारजींच्या घरी साहेबांचा मुक्काम असायचा. रात्री साहेब मोरारजींच्या निवासस्थानी पोहोचले. मोरारजींशी विचारविनिमय झाला. नेहमीच्या थांबायच्या खोलीत साहेब पोहोचत असतानाच दूरध्वनी खणखणू लागला. एवढ्या रात्री कुणाचा फोन असेल, चीनकडून अधिकची कागाळी

तर झाली नसेल? या मन:स्थितीत साहेबांनी दूरध्वनी उचलला. तिकडून 'मी बिजू पटनाईक बोलतोय. आपल्याला वेळ असेल तर मला तुमच्याशी काही महत्त्वाचे बोलायचे आहे. मी आपल्याकडे यावयास निघालो आहे.'' साहेबांच्या उत्तराची वाट न पाहता त्यांनी फोन ठेवून दिला.

बिजू पटनाईक नेहरूजींचे अतिविश्वासू सहकारी. त्यांना नकार देणं साहेबांना अशक्य होतं. साहेब आणि बिजू पटनाईक यांची संरक्षण खात्यासंबंधी चर्चा झाली. पटनाईक यांनी संरक्षण खात्यातील समस्या, लष्करी डावपेच इत्यादींचा ऊहापोह केला. पटनाईक एकटेच बोलत होते. साहेब ऐकण्याची भूमिका आत्मीयतेनं पार पाडीत होते. मध्येच साहेबांच्या अस्मितेला धक्का पोहोचेल असा प्रश्न पटनाईक यांनी केला.

पटनाईक म्हणाले, ''तुम्ही दिल्लीत अशा संकटसमयी कशाला आलात?''

साहेब या प्रश्नानं अचंब्यात पडले. या प्रश्नाच्या धक्क्यातून सावरतानाच दुसरा धक्का पटनाईकांनी साहेबांना दिला.

पटनाईक म्हणाले, ''चीनचं सैन्य वेगानं भारताच्या भूमीत मुसंडी मारण्याची शक्यता आहे. ही शक्यता नाकारता येत नाही की, मुंबई ही युद्धक्षेत्र बनू शकेल. अशावेळी तुम्ही मुंबईत असलेलं बरं.''

या धक्कातंत्रानं साहेब आपला विचार बदलतील आणि संरक्षणमंत्रीपदाची जबाबदारी न स्वीकारता मुंबईला परत जातील अशी समजूत पटनाईक यांनी करून घेतली असावी. पटनाईकांच्या मनात आपल्याविषयी आस्था निर्माण व्हावी म्हणून त्यांच्या म्हणण्याला साहेबांनी पुस्ती दिली.

साहेब म्हणाले, ''नेहरूजी आणि देशाच्या प्रेमाखातर मी या संकटाला सामोरे जाण्याचा निर्धार केलेला आहे. देशाच्या स्वातंत्र्यावर घाला घातला जात असताना, घाला घालणाऱ्या शत्रूचा नायनाट करण्याचा विडा मी उचललेला आहे. महाराष्ट्राचा जन्मच केवळ देशाच्या रक्षणाकरिता झालेला आहे. महाराष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून मी ही जबाबदारी स्वीकारलेली आहे.''

साहेबांच्या या चपराकीनं पटनाईकांच्या डोळ्यांवरील झापडं किलकिली झाली. महाराष्ट्राचं हे पाणी काही वेगळं आहे अशी मनाची समजूत घालून पटनाईक हे साहेबांनी दिलेला झटका सोबत घेऊन आपल्या निवासस्थानाकडे निघाले.

दिल्लीत पाय ठेवल्यापासून एकामागून एक आघात झेलत साहेब निद्रेच्या हवाली होण्याकरिता मनाची तयारी करीत असतानाच पुन्हा दूरध्वनी खणखणू लागला. शंकेची पाल साहेबांच्या मनात चुकचुकली. चीनकडून एखादी नवीन खेळी खेळली की काय, असा विचार करीत असताना साहेबांनी फोन उचलला. तिकडून परिचित आवाज कानावर आदळला,

"मी पीटीआयचा प्रतिनिधी बोलतोय."

तो प्रतिनिधी आत्मविश्वासानं सांगत होता, "चीननं युद्धसमाप्ती जाहीर केली आहे अन् तीही एकतर्फी."

दिल्लीत पाय ठेवल्यापासून जे धंक्के बसत होते त्यात हा धक्का उत्साहवर्धक होता. साहेबांना क्षणभर असं वाटलं यावर आपण काही हालचाली कराव्या का? पण आपण घोषित संरक्षणमंत्री आहोत. अजून आपला शपथविधी व्हायचा आहे. साहेबांचं संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीत येणं संरक्षणाच्या दृष्टीनं सुचिन्ह ठरलं. या आनंदात साहेबांनी स्वत:ला निद्रेच्या स्वाधीन केलं.

साहेब सकाळी उठले ते एक संकल्प मनात ठरवून. संरक्षणाच्या क्षेत्रात देशाची जी मानहानी झाली ती मानहानी आपल्याला भरून काढावयाची आहे या इराद्याने. कॅबिनेट सचिव खेरा साहेबांना शपथविधीकरिता राष्ट्रपती भवनाकडे घेऊन जाण्याकरिता ठीक नऊ वाजता हजर झाले. नेहरूजी, त्यांचे मंत्रिमंडळातील सर्व मंत्री राष्ट्रपती भवनात हजर आहेत. राष्ट्रपती राधाकृष्णन प्रफुल्लित दिसताहेत. राष्ट्रपती भवनाच्या रिवाजाप्रमाणे शपथविधी पार पडला. शपथविधी पार पडल्यानंतर नेहरूजी व साहेब साऊथ ब्लॉकमधील संरक्षणमंत्र्याच्या कार्यालयाकडे निघाले. नेहरूजी साहेबांसोबत संरक्षणमंत्र्याच्या कार्यालयात आले. या घडीला नेहरूजी संरक्षणमंत्री म्हणून कारभार पाहत होते. साहेबांना संरक्षणमंत्र्याच्या खुर्चीवर स्वत: नेहरूजींनी बसवलं. संरक्षणमंत्र्याची सूत्रं विधिवत नेहरूजींनी साहेबांच्या हवाली केली. या वेळी लष्करप्रमुख जनरल जे. एन. जौधरी, नौदलप्रमुख व्हाईस ॲडमिरल सोमण, वायुसेनाप्रमुख एअर मार्शल ए. एम. इंजिनियर हे लष्करी गणवेशात हजर आहेत. नेहरूजींनी साहेबांचा सर्वांशी परिचय करून दिला. ११ वाजता आपल्याला संसदेत जावयाचे आहे याची आठवण देऊन नेहरूजी आपल्या कार्यालयात गेले.

साहेबांना सोबत घेऊन ठीक ११ वाजता नेहरूजींनी संसदेच्या सभागृहात प्रवेश केला. सभागृह व प्रेक्षक गॅलऱ्या खच्चून भरलेल्या होत्या. नवीन संरक्षणमंत्री सर्वांच्या कुतूहलाचा विषय होता. नेहरूजींसोबत साहेबांनी सभागृहात प्रवेश करताच स्वपक्षीय व विरोधी पक्षांच्या सदस्यांनी साहेबांचे हर्षोल्हासात स्वागत केले. सभापती सरदार हुकूमसिंग जागेवर येऊन बसले. कामकाज सुरू करण्याचा इशारा करताच नेहरूजी उठले.

म्हणाले, ''सभापतीजी, माझे व या देशाचे नवीन संरक्षणमंत्री यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांची मी सभागृहास ओळख करून देत आहे.''

साहेब उठले आणि सभापतीच्या आसनाकडे गेले. साहेब सभापतीच्या आसनाकडे जात असताना उत्स्फूर्तपणे सर्व सभागृह टाळ्या वाजवून साहेबांचे स्वागत करत होते. सभापती सरदार हुकूमसिंग उठून उभे राहिले. त्यांनी साहेबांच्या हातात हात मिळवला.

हुकूमसिंग म्हणाले, ''या सभागृहानं मोठ्या अभिमानानं मनापासून आपलं स्वागत केलं आहे. मी स्वत: माझ्या वतीनं तुमचं अंत:करणपूर्वक स्वागत करतो.''

साहेब आपल्या जागेवर येऊन बसताच माजी संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्ण मेनन यांनी साहेबांजवळ येऊन त्यांचं अभिनंदन केलं.

साहेब आपल्या कार्यालयात संसदभवनातून आले तेव्हा तीन वाजायला काही मिनिटे बाकी होती. साहेब खोलीत येऊन आपल्या खुर्चीवर बसले. खोलीची टापटीप पाहून खूश झाले. श्रीपाद डोंगरे आणि जोशींनी प्रधानाच्या मदतीने ही स्वच्छता केली असावी. घड्याळाच्या काट्यानं तीन वाजल्याचा ठोका देताच तीनही सेनाप्रमुख साहेबांच्या खोलीत प्रवेशकरते झाले. संरक्षण खात्याचे सचिव राज साहेबांना अहवाल देण्यासाठी आले. तासभर गोपनीय बैठक होऊन सर्व अधिकारी व सेनाप्रमुख कार्यालयातून बाहेर पडले.

दिल्लीत साहेबांचा मुक्काम तात्पुरता '१८, अकबर रोड' या कोठीत होता. १, रेसकोर्स रोडवरचा बंगला तयार होईपर्यंत साहेबांनी १८, अकबर रोड येथे राहणे पसंत केले.

पी. व्ही. आर. राव यांनी साहेबांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. साहेबांनी राव यांना तत्काळ वेळ दिली. दोघांशिवाय त्यांच्या खोलीत कुणीच नव्हते.

पी. व्ही. आर. राव साहेबांना म्हणाले, "सर, मला टी. टी. के.च्या अर्थसमन्वय खात्यातून संरक्षण खात्यात बदललं आहे. आपली याला मान्यता न घेता हा निर्णय घेण्यात आला याची मला कल्पना आहे. संरक्षण खात्यातील आजची आणीबाणीची परिस्थिती पाहता संरक्षणमंत्र्यांना त्यांनी निवडलेल्या सचिवाची आवश्यकता असते असं माझं मत आहे. आपल्या मनात असा कुणी दुसरा अधिकारी असल्यास आपण त्यांची निवड करावी. मी माझी व्यवस्था दुसरीकडे करून घेण्याचा प्रयत्न करील."

साहेब पी. व्ही. आर. रावकडे पाहून हसले.

म्हणाले, "मी तुमच्या मताशी सहमत आहे. मी माझ्या पसंतीच्या अधिकाऱ्याची निवड केली आहे आणि तो अधिकारी आहे पी. व्ही. आर. राव."

साहेबांनी टाकलेला विश्वास पी. व्ही. आर. राव यांनी सार्थ करून दाखवला. युद्धबंदीच्या बातम्या सीमेवरून येऊन धडकत होत्या. या एकतर्फी युद्धबंदीबद्दल, चीनच्या नवीन चालीबद्दल अर्थ लावण्यात सर्व संरक्षण खातं मग्न होतं. साहेबांचा सकाळी ९ वाजता सुरू झालेला दिवस ताणतणावात गेला. संपूर्ण दिवस चीनच्या नव्या खेळीच्या कारवाईभोवती फिरत होता. उत्तर सापडत नव्हतं. साहेब रात्री हा विचार डोक्यात घेऊन १, रेसकोर्स रोडवरच्या बंगल्यावर पोहोचले.

१, रेसकोर्स रोडवरचा बंगला देशाच्या राजकारणाचा केंद्रबिंदू ठरला. पुढे २२ वर्षे या बंगल्याकडे देश मोठ्या आशेनं पाहतोय. साहेब या बंगल्यात राहावयास आले.

साहेबांना ५ डिसेंबर १९६२ ला पहाटे पहाटे पालम विमानतळावर पोहोचायचे. डोंगरे यांना याची कल्पना होती. त्यांनी साहेबांच्या प्रवासाची सारी तयारी केली. संरक्षणमंत्री म्हणून साहेब प्रथमच नेहरूजींसोबत आसाम सीमेलगतच्या भागाला भेट देण्यासाठी जाताहेत. पराभवानंतर प्रथमच पंतप्रधान व संरक्षणमंत्री सीमेवरील सैनिकांना भेटणार आहेत. साहेब ठरलेल्या वेळेला पालम विमानतळावर पोहोचले. थोड्याच वेळात नेहरूजी व त्यांच्यासोबत इंदिराजी विमानतळावर पोहोचल्या.

गुवाहाटीहून तेजपूरला जाण्यासाठी नेहरूजी आणि साहेब निघाले. त्यांच्यासोबत इंदिराजी आहेत. तेजपूर हे ब्रह्मपुत्रेच्या तटावर वसलेलं

गाव. सीमेलगत संरक्षणदृष्ट्या ते अतिमहत्त्वाचं ठाणं. तेजपूरला उतरताच लेफ्ट. जनरल माणेकशा या उमद्या अधिकाऱ्यानं नेहरूजी व साहेबांचं स्वागत केलं. माणेकशांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वानं, आत्मविश्वासानं साहेबांना प्रभावित केलं. लष्कराची शिस्त असावी ती माणेकशांसारखी. जनरल चौधरी व लेफ्ट. जनरल एल. पी. सेन हे दोघे या वेळी तेजपूरला जातीनं हजर होते.

नेहरूजी व साहेब यांनी मिसामारी येथील लष्करी इस्पितळाला भेट देण्याचं ठरवलं. लढता लढता जखमी झालेले सैनिक, बर्फाच्या थंडीत थिजलेल्या जखमांवर उपचार घेत असलेले सैनिक यांना प्रत्यक्ष देशाचे पंतप्रधान व संरक्षणमंत्री भेटावयास येत आहेत यावर त्यांचा विश्वासच बसेना. नेहरूजी व साहेब प्रत्येक जखमी जवानाची जातीनं विचारपूस करू लागले. येथे एक हृदयद्रावक घटना घडली. एका जखमी सैनिकाजवळ जाऊन हे दोघे विचारपूस करीत असताना त्या सैनिकांनी आपली हतबलता व्यक्त केली.

तो सैनिक म्हणाला, "मी किती कमनशिबी आहे... माझे पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री मला भेटायला आले असताना मी त्यांना सॅल्युट करू शकत नाही...."

तो सैनिक अश्रू ढाळू लागला. कारण त्याचा एक हात युद्धात कामी आला होता. पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री क्षणभर भावनावश झाले; पण राजानं आपल्या डोळ्यात अश्रू आणायचे नसतात याची जाण या लोकशाहीतील राजांना होती. टेकड्याजवळील सैनिकांना भेटताना त्यांच्यातील ईर्षा, जिद्द आणि आत्मविश्वास उचंबळून वाहत होता. शत्रूला मुहतोड जवाब देण्याची त्यांची तयारी होती. आपले नवीन संरक्षणमंत्री शिवाजी महाराजांच्या वंशाचे आहेत याची कल्पना सैनिकांना आली होती. ते 'हर हर महादेव' व 'छत्रपती शिवाजी महाराजां'चा जयजयकार करताहेत. साहेबांचा ऊर भरून येतोय. माणेकशांच्या प्रभावानं ही भेट भारावलेली होती.

दिवस मावळतीकडे झुकलेला. चौथ्या कोअर छावणीत अतिमहत्त्वाच्या नकाशा खोलीजवळ नेहरूजी आणि साहेब पोहोचले. सोबत लष्करी अधिकारी आणि इंदिराजी. मुलकी अधिकारी आपली आब राखून त्या खोलीपर्यंत

पोहोचले. नेहरूजी आणि साहेब लष्करी अधिकाऱ्यासोबत खोलीत शिरले. त्यामागोमाग इंदिराजी जाऊ लागल्या. माणेकशा खोलीच्या दरवाजावर उभे होते. इंदिराजी खोलीत प्रवेश करणार तोच माणेकशांनी इंदिराजींना अडवले.

म्हणाले, "मॅडम, मला अतिखेदानं तुम्हाला सांगावं लागतंय... तुम्हाला या खोलीत जाता येणार नाही. कारण आपण गुप्ततेची शपथ घेतलेली नाही."

साहेबांच्या हे लक्षात आलं. त्यांनी आपले सचिव प्रधान यांना मॅडमसोबत राहण्याची खूण केली. इंदिराजींचा अहंकार जागा झाला. त्या रागानं फणफण करत जवळच्या एका खोलीत इकडून तिकडे आणि तिकडून इकडे येरझारा घालू लागल्या. खिडकीजवळ हात बांधून उभ्या राहून दूरवर पाहताहेत. प्रधानांनी त्यांना एक तिथं असलेलं मासिक दिलं. त्या मासिकाकडे त्यांनी तिरस्कारानं पाहिलं आणि जवळ असलेल्या टेबलावर फेकून दिलं. इंदिराजींचा राग त्यांच्या चेहऱ्यावर दिसतोय. दीड-दोन तास नकाशाच्या खोलीत गुप्त बैठक चालली. बाहेर इंदिराजी दीड ते दोन तास ताटकळत उभ्याच राहिल्या. त्यांनी अवमानित अवस्थेत वेळ घालविला. या घटनेचे पडसाद देशाच्या पुढील वाटचालीत आपणास पाहावयास मिळतात.

दुसऱ्या दिवशी नेहरूजी सैनिकांसमोर आपलं मन मोकळं करणार होते. छोटेखानी व्यासपीठ तयार करण्यात आलं. सैनिकी शिस्तीत जवान समोर बसले. सर्व अधिकारी आणि नेहरूजी, साहेब, इंदिराजी व्यासपीठावर स्थानापन्न झाले. नेहरूजींनी सैनिकांचा उत्साह वाढावा म्हणून आपलं मनोगत व्यक्त केलं. मागे काहीतरी चुळबूळ झाल्याची शंका इंदिराजींना आली. त्या व्यासपीठावरून उतरून तिकडे गेल्या. त्यांच्यासोबत आसामचे मुख्यमंत्री चालीहा होते. त्या सैनिकाचं म्हणणं एका अधिकाऱ्याला ऐकून घेण्यास सांगून त्या परत आल्या. सैनिकांच्या अडचणी कुणी ऐकून घेण्यास तयार नाही असा त्या सैनिकांचा आरोप होता. सैनिकांत असंतोष असल्याची पुसटशी कल्पना साहेबांना आली.

डिसेंबर महिन्यात लेह आघाडीला भेट देण्याचं निश्चित झालं. नेहरूजी आणि साहेब हे दोघेच भेट देणार आहेत. या भेटीची अत्यंत गुप्तता पाळण्यात आली. पंतप्रधानांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला. साहेबांनी

मलादेखील या भेटीची कल्पना दिली नव्हती. ही भेट निरुत्साही झाली. नेहरूजींना कुठल्यातरी चिंतेनं घेरलं असावं. त्यांचा पूर्वीचा सळसळता उत्साह त्यांच्या बोलण्यातून व वागण्यातून आढळत नव्हता. निस्तेज अवस्थेत ते बोलायचे. सैनिक मात्र नेहरूजींना पाहण्यास व ऐकण्यास उत्सुक असत.

साहेबांनी ज्या ज्या वेळी सैनिक छावण्याला भेटी दिल्या त्या भेटीत त्यांना सैनिकांमधील आत्मविश्वास प्रखरतेनं जाणवला. साहेबांचं स्वागत सैनिक जल्लोषात करीत. मराठा संरक्षणमंत्र्याबद्दल सैनिकांना आत्मीयता वाटे. शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातला नवा संरक्षणमंत्री लाभल्याचा त्यांना अभिमान वाटायचा. यामुळं साहेबांचा आत्मविश्वास द्विगुणित व्हायचा.

साहेबांच्या कर्तृत्वाचा गरुडपक्षी राजकारणाच्या क्षितिजावर गरुडझेप घेण्याच्या तयारीत असतानाच त्याचे पंख छाटण्याचा घाट घालण्यात आला. हे पंख छाटण्याचं काम एकीकडून टी. टी. के.मार्फत चालू झालं. दुसऱ्या बाजूनं बिजू पटनाईक. युद्धसामुग्री मिळविण्याकरिता टी.टी.के. अमेरिकेला जाणार याबद्दल साहेबांना कल्पना होती. त्यांचा परदेशाशी व्यवहार करण्याचा अनुभव लक्षात घेता साहेबांनी सहमती दिली. दोन प्रभावी मंत्र्यांच्या समजुतीनं हे घडत आहे असं वातावरण निर्माण झालं; पण फेब्रुवारी १९६३ ला ठिणगी पडली. नेहरूजींनी साहेबांना कार्यालयात बोलावून घेतलं. पाऊण तास दोघांत चर्चा झाली. टी.टी.के.नी नेहरूजींना पत्र लिहून अडचणीत आणलं.

त्यांनी पत्रात म्हटलं होतं, लष्करी साहित्यनिर्मितीचं खातं माझ्याकडं दिलं नाही तर मी मंत्रीपदाचा राजीनामा देणार....

ही चर्चा होत असताना लालबहादूर शास्त्री तिथे उपस्थित होते. टी.टी.के.च्या पत्राला नेहरूजींनी उत्तर देण्याऐवजी साहेबांनी उत्तर द्यावं असं नेहरूजींनी साहेबांना सुचविलं. याबद्दल साहेबांनी नेहरूजींना स्पष्ट सांगितलं की, याबद्दल आपल्याला जो काय निर्णय घ्यायचा आहे तो घ्या. मला तो मान्य राहील. दिल्लीत साहेब आले आणि नेहरूजींनी जे खातं दिलं ते घेतलं. मग आता त्यात कपात करण्याचं कारण काय? साहेबांनीही ठाम निर्णय मनाशी घेतला. लष्करी साहित्य निर्मितीचा विभाग टी.टी.के. यांना देण्याचा निर्णय ते घेऊ शकतात. त्या बदल्यात

त्यांना नवा संरक्षणमंत्री शोधावा लागेल. नेहरूजींनी तातडीनं टी.टी.के.शी बोलण्यास साहेबांना सुचविलं. ८ फेब्रुवारीला त्यांच्या घरी भेट घ्यावी. साहेबांनी नेहरूजींना पत्र लिहून कळवावं की, युद्धसामुग्री निर्मितीचं खातं टी.टी.के.कडं सोपवावं. जनरल बी. एम. कौल यांचा राजीनामा साहेबांनी मंजूर केल्यापासून नेहरूजी साहेबांसोबत मनात अढी ठेवून वागतात असं साहेबांना वारंवार जाणवू लागलं.

साहेब ५ फेब्रुवारीला राष्ट्रपती राधाकृष्णन यांना भेटले. राधाकृष्णन यांनी आस्थेवाईकपणानं साहेबांची विचारपूस केली. कौल यांच्या निवृत्तीच्या आज्ञा झाल्यानंतर नेहरूजी राष्ट्रपतींना भेटले. कौल यांनी परत लष्करात येण्याची इच्छा व्यक्त केली तर त्यांची विनंती आपण मान्य कराल का? लेफ्टनंट गव्हर्नरच्या जागी कौल यांना नेमाल का?

राष्ट्रपतींनी एका शब्दात उत्तर दिलं, "नाही."

"साहेबांच्या निर्णयाला आपण मान्यता का दिली?" असा प्रतिप्रश्न राष्ट्रपतींनी नेहरूंना विचारला.

त्यावर नेहरूजी म्हणाले, "संरक्षणमंत्र्याची कुचंबणा होऊ नये म्हणून."

राष्ट्रपतींचा निरोप घेऊन साहेब बाहेर पडले व मनात विचार करू लागले. देश ज्या पद्धतीनं माझ्या कार्याची प्रशंसा करीत आहे, माझ्या उत्कर्षाचा आलेख ज्या पद्धतीने चढतोय, कदाचित सत्तास्पर्धेच्या वर्तुळात मी अडथळा तर ठरणार नाही ना याचा विचार सुरू झाल्याचा अंदाज साहेबांना येऊ लागला. आपल्या कार्याला कुठेतरी लगाम लावण्याचं कार्य सुरू झाल्याची शंका साहेबांना येऊ लागली. नेहरूजींनादेखील साहेबांना देशातून मिळत असलेल्या प्रतिसादाचा हेवा वाटत असावा अशी पुसटशी शंका साहेबांच्या मनाला चाटून गेली.

८ फेब्रुवारीला ठरलेल्या वेळी साहेब आणि टी.टी.के.ची बैठक झाली. नेहरूजींसोबत झालेल्या चर्चेचा वृत्तांत साहेबांनी टी.टी.के. यांना दिला. माझं आणि नेहरूजींचं यावर एकमत आहे की, संरक्षणमंत्र्याला परिणामकारक आणि सैन्याच्या यशस्वितेकरिता लष्कर साहित्यनिर्मिती खातं संरक्षणमंत्र्याकडं असावं. यावर टी.टी.के. यांनी अत्यंत भावनावश होऊन साहेबांसमोर आपलं मन मोकळं केलं.

टी.टी.के. म्हणाले, "मला पत्नी नाही; पण माझ्या एकुलत्या एक

मुलाची शपथ घेऊन सांगतो...तुम्हाला अडचणीत टाकण्याचा माझा कुठलाच हेतू नाही. उलट माझा राग नेहरूजींवर आहे. त्यांनी मला शब्द दिला होता- युद्धसामुग्री निर्मिती खातं माझ्याकडे सोपवितो म्हणून. पण त्यांनी तो शब्द पाळला नाही. माझ्या पत्रात मी राजीनामा देण्याचा इशारा दिला आहे हे खरं आहे.''

टी.टी.के.च्या भावनात्मक बोलण्याला साहेब बळी न पडता त्यांना साहेबांनी स्पष्टच बजावले.

म्हणाले, ''देशहिताच्या आणि संरक्षणमंत्र्याच्या यशस्वितेकरिता लष्कर साहित्यनिर्मिती खाते संरक्षणमंत्र्यांकडेच असले पाहिजे. हे मी संरक्षणमंत्री आहे म्हणून सांगतो असे नाही. उद्या मी संरक्षणमंत्री असेल किंवा नसेल. माझं म्हणणं आपल्याला मान्य असेल तर ठीक, नाही तर मी संरक्षणमंत्रीपदी राहावयाचं किंवा नाही ठरवीन. यातून आपल्याला काही मार्ग सुचवायचा असेल तर आपण सुचवू शकता.''

साहेबांच्या या सूचक बोलण्यावर टी.टी.के. म्हणाले, ''मला आपला अतिरिक्त संरक्षणमंत्री म्हणून नेमण्याचा विचार करावा.''

साहेबांना या बोलण्याचं आश्चर्य वाटलं.

'भटाला दिली ओसरी अन् भट हळूहळू पाय पसरी' या म्हणीची साहेबांना आठवण झाली.

''तुमचा इरादा एवढा ठाम असेल तर आपण संरक्षणमंत्री का होत नाही?''

या साहेबांच्या बोलण्यानं टी.टी.के. नरमले आणि त्यांनी तडजोड म्हणून समिती असावी. त्या द्विसदस्यीय समितीत साहेब आणि ते स्वत: राहतील, असे सांगितले.

साहेबांनी त्यात दुरुस्ती सुचविली. ही समिती त्रिसदस्यीय राहील. तिसरे सदस्य लालबहादूर शास्त्री राहतील. हे तीनही सदस्य समान अधिकाराचे असतील. यात कुणीही अध्यक्ष राहणार नाही.

यावर टी.टी.के.नी होकार देताच साहेब लालबहादूर शास्त्रींना भेटले. या बैठकीचा वृत्तांत दिला. लालबहादूर शास्त्री यांनी नेहरूजींच्या कानावर हा वृत्तांत घालावा अशी विनंती केली. नेहरूजींना माझी काही अडचण वाटत असेल तर मी परत कराडला जाण्यास तयार आहे. १३ तारखेपर्यंत

या प्रकरणाचा निकाल लागला पाहिजे, नसता मी १४ फेब्रुवारीला सातारा मतदारसंघातून अर्ज दाखल करणार नाही. मी परत जावयास तयार आहे. माझ्या परत जाण्यानं महाराष्ट्रात काहीएक वादळ उठणार नाही. मला पुन्हा मुख्यमंत्री होण्याची इच्छा नाही. काँग्रेस पक्षाची सेवा करीत राहील...

शास्त्रीजींनी नेहरूजींची भेट घेऊन या त्रिसदस्यीय समितीची निर्मिती केली तरीपण दुर्दैवानं पुढे अडथळ्याच्या उचापती चालूच राहिल्या.

लोकसभेच्या संसदीय वर्तुळातून असंतोषाला कारणीभूत ठरणारी एक घटना घडली. त्या घटनेचं नायकत्व पटनाईक यांनी स्वीकारलेलं होतं. पटनाईक ओरिसाचे तरुण मुख्यमंत्री. नेहरूजींच्या वर्तुळात बऱ्यापैकी स्थान प्राप्त केलेलं. नेहरूजींचा एक कमकुवत दुवा. यांचा एक पाय कटकमध्ये तर दुसरा पाय दिल्लीत. नेहरूजींच्या कार्यालयालगत यांना उठण्याबसण्याकरिता परराष्ट्र खात्याची एक खोली मिळालेली.

साहेबांनी टी.टी.के.च्या लुडबुडीला आताच कुठं पायबंद घातला होता तरीपण संरक्षण साहित्यनिर्मितीच्या कामात जरा कुठे ढिलाई झाली की लगेच आकाश कोसळल्याच्या आविर्भावात नेहरूजींकडं ते कागाळी करीत असत. यांच्याबाबतीत नेहरूजींची भूमिका अजूनही डळमळीत होती. नेहरूजींचा रोष साहेबांनी दोन कार्यवाही केल्यानं ओढवून घेतला होता. जनरल कौल यांच्या राजीनाम्याचा स्वीकार आणि नेफाच्या पराभवाची सुरू केलेली चौकशी.

"नेहरूजींचे खास दूत म्हणून परराष्ट्र व संरक्षण खात्यासंबंधी अधिकाऱ्यांशी चर्चा करणार, अशा आशयाची मुलाखत पटनाईक यांनी अमेरिकेतील वर्तमानपत्राला दिली. तसेच ते अमेरिकेकडून शस्त्रास्त्रे व क्षेपणास्त्रे मिळतील काय याची चाचपणी करणार आहेत. युद्धाच्या बाबतीत अमेरिकेनं लष्कराच्या अनुभवाचा फायदा भारत घेण्यास उत्सुक आहे. तसेच भारतीय लष्कराच्या पुढील हालचाली काय राहतील याची वाच्यता या नेहरूजींच्या बगलबच्चाने जाहीर केली. या उतावळ्या राजकारण्याची मजल इथपर्यंत गेली की, मेमध्ये नेहरूजी आपल्या मंत्रिमंडळाची पुनर्रचना करणार आहेत. त्यात संरक्षण खाते पटनाईक यांच्याकडे दिले जाईल आणि साहेबांना आपल्या राज्यात पाठविले जाईल.... हा सर्व गदारोळ मार्च महिन्यातील.

सैन्यातील भावी हालचाली, बेत, शक्ती याबद्दल हा माणूस बेधडक वक्तव्ये करू लागला. संसदीय वर्तुळात खळबळ माजली. काँग्रेसचे ज्येष्ठ खासदार महावीर त्यागी यांनी पटनाईक यांच्या वर्तनावर पहिली तोफ डागली.

त्यागी म्हणाले, "पटनाईक यांनी संरक्षण खात्याबद्दल अमेरिकेत केलेलं वक्तव्य अत्यंत बालिशपणाचं आहे. केंद्रीय मंत्रिमंडळात येण्याचा त्यांचा केविलवाणा प्रयत्न पाहून मला वाटतं ते मूर्खाच्या नंदनवनात वावरत आहेत."

पटनाईक यांच्या वक्तव्यानं साहेबांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. साहेब फक्त संरक्षण खात्याचे कुंकवाचे धनी आहेत. नामधारी संरक्षणमंत्री म्हणून साहेबांकडे पाहिलं जाऊ लागलं. या सर्व घडामोडींचा परिणाम असह्य झाला. साहेबांनी ही बाब तत्काळ नेहरूजींच्या निदर्शनास आणून दिली. आपली कडवट प्रतिक्रिया साहेबांनी नेहरूजींकडं व्यक्त केली. साहेबांची नाराजी नेहरूजींच्या लक्षात आली.

नेहरू म्हणाले, "पटनाईक यांच्या वक्तव्यानं मीही व्यथित झालो. आपण दोघेही एकाच नावेतून प्रवास करीत आहोत. पटनाईक दिल्लीत परत येईपर्यंत आपण कसल्याच प्रकारची प्रतिक्रिया देऊ नये. काँग्रेस पार्लमेंटरी वर्तुळात जो नाराजीचा सूर उमटला याची मला कल्पना आहे."

हे उपद्व्यापी पटनाईक २४ मार्चला अमेरिकेची वारी संपवून आपल्या कामगिरीचा अहवाल देण्याकरिता नेहरूजींना भेटले. नेहरूजींनी त्यांना साहेबांना भेटण्यास सांगितले असावे. ते साहेबांना भेटले. साहेबांनी भेटीचा सोपस्कार पार पाडून त्यांची बोळवण केली.

२५ तारखेला काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस रघुनाथ सिंग व विविध पक्षांचे दहा सभासद मिळून १ लक्षवेधी सूचना दिली.

या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना नेहरू म्हणाले, "पटनाईक यांनी अमेरिकेत वर्तमानपत्रात दिलेल्या मुलाखतीमुळे देशातील जनतेच्या मनाला ठेच पोहोचली आहे व मनात गोंधळही निर्माण झाला आहे. मीही दुःखी व आश्चर्यचकित झालो. आपल्या संरक्षणमंत्र्याविषयी जे काही वक्तव्य छापून आलं त्याबद्दल मला अतिव यातना झाल्या आहेत. मी दुःखी आहे. पटनाईक कालच मला भेटले. वर्तमानपत्रातील मुलाखतीबद्दल मी

त्यांना विचारणा केली असता ते म्हणाले, 'वार्ता अहवालामुळे मलाही धक्का बसला. वर्तमानपत्रात चुकीचे वार्तांकन झाले आहे. चव्हाण माझे चांगले मित्र आहेत. त्यांच्याएवढेच दु:ख मलाही झाले आहे.' ''

लोकसभेत नेहरूजी एकप्रकारे पटनाईक यांची पाठराखण करीत होते. पटनाईक यांनी चव्हाण यांची भेट घेतली आहे... त्यांचा चव्हाणांना दुखविण्याचा उद्देश नव्हता... या सर्व स्पष्टीकरणाने खासदार हेमबरुआ, एच. व्ही. कामत, प्रकाशवीर शास्त्री, कपूरसिंग यांचे समाधान झाले नाही. नेहरूजींच्या खुलाशाने सभासद शांत झाले नाहीत. भारतीय संसदेला जी माहिती नाही ती पटनाईक बाहेर खुलेआम त्याची वाच्यता करीत आहेत. आमच्या लष्करी सामर्थ्याची कल्पना विदेशात दिली जाते आणि संसदेला दिली जात नाही... नेहरूजी पटनाईक यांच्या अविवेकी वक्तव्यावर पांघरूण घालीत आहेत.

सभापती सरदार हुकूमसिंग या प्रकरणावर नाराजी व्यक्त करताना म्हणाले, ''अमेरिकेत पटनाईक यांनी जे सांगितले ते संसदेच्या सभागृहात उघड केले नसल्याने ही गोष्ट लाजिरवाणी आहे.''

सभापतींच्या या टोल्यानं काँग्रेस व विरोधी सदस्यांनी बाकडे वाजवून सभापतींचं अभिनंदन केलं.

या सर्व गदारोळातून एक निष्पन्न झालं की, पटनाईक हे उघडे पडले. त्याचसोबत साहेबांच्या भवितव्याबद्दल जो संशयाचा अंधार दाटून आला होता तो दूर झाला. या सर्व मानसिक त्रासातून सावरण्यासाठी साहेबांना बराच काळ जावा लागला.

संरक्षण खात्याची विस्कटलेली घडी सावरण्याच्या कामाला साहेबांनी हात घातला. खोलात गेल्यानंतर अनेक धक्कादायक बाबी साहेबांच्या निदर्शनास आल्या. ८०० कोटींपैकी ६०० कोटी रुपयेच विकासकामाच्या खर्ची पडले. सरहद्दीवरील सैनिकांना ज्या सुविधा पुरवायला पाहिजे होत्या त्या कागदावरच आढळून आल्या. बर्फाच्या माऱ्यात थंडीत सैनिक जीवाला मुकताहेत. सैनिकांत कमालीची बेदिली... या आणि अशा अनेक गोष्टी साहेबांच्या निदर्शनास आल्या. साहेबांनी संरक्षण मंत्रालयाची ५ हजार कोटी रुपये खर्चाची एक पंचवार्षिक योजना आखली. २३ मार्च १९६४ ला साहेबांनी ही योजना लोकसभेसमोर ठेवली. ज्या आत्मविश्वासानं साहेबांनी

संरक्षणमंत्रीपद स्वीकारलं तो आत्मविश्वास साहेबांच्या दैनंदिन वागणुकीतून आढळत नव्हता.

या मन:स्थितीत साहेबांना लष्करी सेनानींसमोर भाषण करावयाचं होतं. खचलेल्या मनानं त्यांच्यासमोर जावं किंवा नाही याचा विचार साहेब करू लागले. न जावं तर आपलं संरक्षणमंत्रीपद नामधारी आहे याला पुष्टी मिळेल. साहेबांनी या द्विधा मन:स्थितीत लष्करप्रमुखासमोर आपले विचार व्यक्त केले. आपल्या दिनचर्येवर या सर्व घटनांचा कुठलाही परिणाम होणार नाही याची काळजी साहेबांनी घेतली. नेहरूजींनी स्पष्टीकरण दिल्यानंतर पटनाईक यांची लुडबूड कमी होईल असं साहेबांना वाटलं होतं; पण प्रत्यक्षात मात्र पटनाईकांच्या वागणुकीत फरक जाणवत नव्हता. मंत्रिमंडळाच्या बैठकीला, आणीबाणीविषयक उपसमितीच्या बैठकीला साहेबांनी हजेरी लावली. २८ मार्चला दुपारी राष्ट्रपतींची भेट घेतली. आपली होत असलेली घुसमट व राजीनाम्यासंबंधी चर्चा केली असावी. मी आणि साहेबांनी राजीनाम्याबद्दल सविस्तर चर्चा केली. स्वाभिमान गहाण टाकून काम करण्यात काही स्वारस्य नाही, असा निष्कर्ष आम्ही काढला. शेवटी सर्व व्यथा नेहरूजींच्या कानावर टाकाव्यात व त्यानंतर राजीनाम्याचा मनोदय व्यक्त करावा, असं आम्हा दोघांचं ठरलं.

अनेक मित्र व सहानुभूतीदार साहेबांना भेटत. साहेब त्यांच्याजवळ आपल्या व्यथा व्यक्त करत. अशोक मेहता साहेबांना भेटून गेले. त्यांनी पटनाईक यांनी रशियन वकिलाबरोबर चर्चा केल्याची माहिती साहेबांना दिली. पत्र लिहू नये असा सल्ला दिला. घट्ट पाय रोवून वातावरण तापतं ठेवावं. त्यांनी इतिहासातील एक प्रसंग सांगितला - दुसऱ्या जॉर्जचा.

'जॉर्ज, राजासारखं वाग' असं जॉर्जच्या आईनं जॉर्जला सांगितलं. पण साहेबांची ती मानसिकता नव्हती. साहेब येथे आले ते नेहरूजींच्या मदतीकरिता. त्यांना अडचणीत टाकण्यासाठी नाही...

त्यांनी एक पत्र लिहिले. त्या पत्रात लिहिले होते, "पटनाईक यांच्या भूमिकेमुळं संरक्षण खात्यात दोन सत्ताकेंद्रे निर्माण झाली. लष्करी अधिकारी व सैनिकांत संरक्षणमंत्र्याचा जो दबदबा पाहिजे त्या प्रतिमेला तडा जातो. देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीनं अत्यंत धोकादायक व गंभीर प्रसंग उभा राहू शकतो. संसदेला मी बांधील आहे. तिला खोटीनाटी माहिती पुरविणं

माझ्या मनाला पटत नाही. दैनंदिन व्यवहारात तिन्ही सेनापती अडचणीत येत आहेत. अंतिम निर्णय कुणाकडून घ्यावा हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहतो. या सर्व प्रक्रियेतून देशासमोर कठीण प्रसंग उभे राहतील. संरक्षण मंत्रालयाची जबाबदारी एकाहाती असल्यास निर्णयप्रक्रिया प्रभावी राहील. धोरणात्मक निर्णयाला बळ प्राप्त होईल. सैनिकांत एकसंध भावना निर्माण होईल. संसदेत संरक्षणमंत्री हाच सर्व निर्णयप्रक्रियेस जबाबदार धरला जाईल. आपणास जो काय निर्णय घ्यायचा तो कुणाचाही मुलाहिजा न ठेवता घ्यावा. व्यक्तिगत माझाही विचार करण्याचे कारण नाही. या गोंधळात देशाच्या हिताचा विचार करणे आवश्यक आहे.'' या पत्रात शेवटी साहेबांनी आपण राजीनामा देत असल्याचा उल्लेखही केला.

हे पत्र नेहरूजींचे खाजगी चिटणीस खन्ना यांच्या हवाली करण्यात आले.

'तीनमूर्ती भवन'मधून खन्ना यांचा साहेबांना निरोप आला. १ एप्रिल ६३ ला ७.३० वाजता नेहरूजींची भेट ठरली आहे. ठीक साडेसात वाजता साहेब 'तीनमूर्ती' येथे पोहोचले. नेहरूजी व साहेबांची बैठक जवळजवळ एक तास चालली. साहेबांनी लिहिलेल्या पत्राबद्दल नेहरूजींनी नाराजी व्यक्त केली.

म्हणाले, ''तुमच्या माझ्याबद्दल काय भावना झाल्या आहेत मला माहीत नाही. तुम्ही या पद्धतीनं पत्र का लिहिलंस? तुमच्यावर माझा विश्वास नसता तर अशा कठीण प्रसंगी मी तुम्हाला बोलावून संरक्षणमंत्रीपदाची जबाबदारी सोपविली असती का?''

आपल्या भावना व्यक्त करताना साहेब म्हणाले, ''तुमच्या माझ्या विश्वासाचा प्रश्न नाही तर प्रश्न आहे देशातील जनतेच्या विश्वासाचा. संरक्षणमंत्रीपदावर पंतप्रधानांचा विश्वास नाही अशी भावना निर्माण झाली तर देशाची सुरक्षितता धोक्यात सापडेल. आपला एकमेकांवर विश्वास असल्याशिवाय देश एकदिलानं शत्रूला सामोरा जाऊ शकणार नाही. आज संरक्षण खात्यात जे बेदिलीचं वातावरण आहे ते देशाच्या दृष्टीनं घातक आहे.''

''टी.टी.के. आणि पटनाईक यांना पायबंद घातला जाईल तसेच संरक्षणमंत्री म्हणून तुमची जी प्रतिष्ठा आहे तिला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी घेण्यात येईल'' असा विश्वास नेहरूजींनी साहेबांना

दिला आणि लगेच साहेबांनी घेतलेल्या निर्णयाविषयी विचारपूस करण्यास सुरुवात केली.

हेंडरसन-ब्रुक्स कमिटीची कार्यप्रणाली, "नेफा चौकशीचे खापर लष्करी अधिकारी दिल्लीतील राजकारण्यावर फोडतील."

यावर साहेब म्हणाले, "तसे काही होणार नाही, असं मला लष्करी अधिकाऱ्यांनी आश्वासन दिलं आहे."

कौल यांच्या राजीनाम्याबद्दलही दोघांत चर्चा झाली. शेवटी निघतेवेळी नेहरूजींनी सद्गतीत होऊन साहेबांचा हात हातात घेतला व म्हणाले,

"तुमच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे आणि मी सदैव तुमच्या पाठीशी राहील. त्याबद्दल आपण नि:शंक असावे. आणि हे विसरून जा की, तुम्ही मला पत्र लिहिले आहे."

नेहरूजींच्या आश्वासनानंतर साहेबांनी आपल्या कामाला गती दिली. लष्करी साहित्यनिर्मिती, परदेशातून आधुनिक शस्त्रास्त्रांची आयात, भारतीय सरहद्दींना भेटी देऊन सैनिकांचे मनोधैर्य वाढविणे, त्यांच्या अडचणींची सोडवणूक करणे इत्यादी कामानिमित्तानं साहेबांचा प्रवास वाढला. साहेब १३ जूनला नाशिकला पोहोचले. सोबत डोंगरे होतेच. तेथे पोहोचताच साहेबांना अस्वस्थ वाटू लागलं. लगेच डॉक्टरांनी तपासलं. हृदयाशी संबंधित ही अस्वस्थता असावी, असा प्रथम निष्कर्ष काढण्यात आला. मी डोंगरे यांच्या संपर्कात होतेच. ही वार्ता नेहरूजींच्या कानावर गेली. त्यांनी कॅबिनेट सेक्रेटरी खेरांना आज्ञा दिली की, तुम्ही जातीनं लक्ष घाला. मुंबईच्या तज्ज्ञ डॉक्टरांना बोलवा आणि मला लगेच यशवंतरावांच्या तब्येतीबद्दल कळवा. खेरांनी सरीन या आपल्या अधिकाऱ्याला नाशिकला पाठवलं. साहेबांना ४८ तास डॉक्टरांच्या निगराणीखाली ठेवण्याचा निर्णय डॉक्टरांनी घेतला. नेहरूजींनी लगेच साहेबांना एक पत्र लिहिलं.

त्या पत्रात नेहरू म्हणतात, "आपणास हृदयाचा त्रास होत असल्याचे ऐकून मला धक्काच बसला. तुमच्या या बातमीवर माझा विश्वासच बसला नाही. प्रकृतीनं धडधाकट आहात अशीच माझी भावना आहे. सुदैवानं तुम्हाला हृदयाचा त्रास नाही या डॉक्टरांच्या निष्कर्षानं माझी काळजी मिटली. आपण पूर्ण बरे होईपर्यंत प्रवास करावा किंवा नाही याबद्दल डॉक्टरांचा सल्ला घेऊनच निर्णय घ्यावा."

साहेबांनी नेहरूजींना आभाराचे पत्र लिहिले. त्यात १७ तारखेच्या कॅबिनेटसमोर जे महत्त्वाचे विषय आहेत ते पुढच्या बैठकीत घ्यावेत अशी विनंती केली. नेहरूजींनी साहेबांची विनंती मान्य केली.

दुसरं पत्र साहेबांना आलं ते विजयालक्ष्मी पंडित यांचं. त्या महाराष्ट्राच्या राज्यपाल होत्या.

त्या आपल्या हृदयस्पर्शी पत्रात म्हणतात, "आपल्या प्रवासाच्या बातम्या वर्तमानपत्रातून वाचून आपण किती भटकंती करता याची चिंता वाटतेय. आपल्या आजाराची बातमी वाचून मी अस्वस्थ झाले. नेहरूजींच्या नंतर भटकंती करणारे आपण आहात. त्यांना नियतीचं वरदान आहे. आपण त्यांची बरोबरी करू शकत नाहीत. आपण आज अत्यंत जिकरीचे काम करीत आहात. आपली देशाला गरज आहे. डॉक्टर देतील तो सल्ला अवश्य अमलात आणा. मी हे पत्र लिहिण्याचे कारण मी आपणास माझा धाकटा भाऊ मानते. हे लिहिण्यास मला खंत वाटत नाही."

नाशिकहून साहेब मुंबईला आले. मीही दिल्लीहून मुंबईला पोहोचले. आम्ही आईच्या सान्निध्यात आठ दिवस घालविले. वर्तमानपत्रात अनेक अंदाज साहेबांच्या प्रकृतीबद्दल वर्तविले जाऊ लागले. शेवटी डॉक्टरांनी आपला निष्कर्ष वर्तमानपत्रात प्रसिद्ध केला. केवळ अजीर्ण झाल्याने हा त्रास झाला. हृदयाला कुठलाही धक्का नाही. अनेकांनी डॉक्टरांचे आभार मानले तर काहींची निराशा झाली.

आपल्या कार्यकुशलतेनं साहेबांनी संपूर्ण संरक्षण मंत्रालय आपलंसं करून टाकलं. सनदी अधिकारी आणि लष्करी अधिकाऱ्यांत समन्वय निर्माण केला. संरक्षण मंत्रालयात विश्वासाचं वातावरण खेळू लागलं. ब्रिटिश राजवटीत अंदाजपत्रातील खर्चाचं प्रमाण हे शेपूट ते दात असं होतं. ते साहेबांनी बदलून दात ते शेपूट असं केलं. आघाडीवरील सैनिकांत यामुळं आत्मविश्वास निर्माण झाला. चीनच्या आक्रमणाबद्दल साहेबांनी माओच्या नेतृत्वाचा अभ्यास केला. माओच्या युद्धनीतीचे तीन निष्कर्ष साहेबांनी काढले. एक - सैन्याच्या हालचालीचा वेग विद्युतवेगाला मागे टाकणारा असावा व धक्का तंत्राचा वापर करावा. दोन - युद्धातील सर्व सूत्रे आपल्याकडे राहावीत आणि त्याची कार्यवाही आपल्या मर्जीप्रमाणे करता आली पाहिजे. तीन - अपुऱ्या तयारीविना हल्ला करू नये. आपल्याला

विजयाबद्दल शंका असल्यास तिथे युद्धात गुंतून पडू नये. पुढील पाकिस्तानच्या युद्धात साहेबांनी दोन क्रमांकाच्या युद्धतीनीचा अवलंब केला.

संरक्षण खात्याच्या मागण्यांमध्ये साहेबांनी एक कल्पना मांडली. पर्वतीय क्षेत्राच्या संरक्षणाकरिता एक स्वतंत्र विभाग असावा. या क्षेत्रातील सैनिकांना सक्षम असं शिक्षण द्यावं. पर्वतीय क्षेत्रातील वातावरणाशी हे सैनिक समरस झाले पाहिजेत. अद्ययावत युद्धसाहित्य निर्माण करून त्यांना सुसज्ज सैनिक केलं पाहिजे. यासोबत वायुदलाचाही विस्तार केला पाहिजे. परदेशाच्या युद्धसामुग्रीवर अवलंबून न राहता आपणच युद्धासाहित्य निर्मिती मोठ्या प्रमाणात करावी. या सर्व मागण्या साहेबांनी लोकसभेत मंजूर करून घेतल्या. संरक्षण व परराष्ट्र धोरणाची सांगड घालून तातडीचे नियोजन आणि लांब पल्ल्याचे नियोजन याचा तपशील संसदेसमोर मांडला. या विवेचनाचं लोकसभेनं तोंडभरून कौतुक केलं. सेनादल व मंत्रालयातील कारभार गुप्ततेच्या नावाखाली संसदेत सादर करण्यात येत नव्हता. साहेबांनी ती प्रथा मोडून संपूर्ण संरक्षण खात्याची माहिती संसदेसमोर ठेवली. कुठल्या बाबतीत गुप्तता पाळायची ते संरक्षणमंत्री ठरवतील असं धोरण ठरविलं. साहेबांच्या या धोरणाची संसदेनं प्रशंसा केली. साहेबांनी संसदेचा विश्वास संपादन केला.

नेफा आघाडीवरील अभ्यास करताना साहेबांच्या असं लक्षात आलं की, थोडकेच कार्यक्षम अधिकारी या युद्धात लढले; पण संरक्षणमंत्र्याच्या आशीर्वादानं अधिकारपदावर चढलेले अधिकारी पुळचट निघाले.

८ एप्रिल १९६३ ला संसदेत बोलताना साहेब म्हणाले, "वरिष्ठ अधिकारी आणि प्रत्यक्ष आघाडीवर लढणारा सैनिक यांचे संबंध कसे आहेत यावर युद्धाचे यश अवलंबून असते. युद्धनीतीमध्ये या संबंधाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. एक शूर सेनानी म्हणतो, शूर सैन्य आणि नेभळट सैन्य असा भेदभाव असूच शकत नाही. भेदभाव असतो तो कर्तबगार अधिकारी- अकार्यक्षम अधिकारी. यशस्वी अधिकारी सैनिकांमध्ये विश्वास निर्माण करतो व योग्य नेतृत्व देतो. या नेतृत्वावर सैनिकांचा विश्वास बसला की यश दूर राहत नाही. ही परस्परांमधील विश्वासाची भावना आपल्या सैन्यामध्ये वाढीस लागत आहे. हे देशाच्या दृष्टीनं सुचिन्ह आहे."

साहेबांनी लष्करी छावण्यांना भेटी देण्याचं ठरविलं. राजस्थानातील झुनझुनू गावी हजारो माजी सैनिक संरक्षणमंत्र्याचा परिचय व स्वागतासाठी एकत्र आलेले. साहेबांसोबत मुख्यमंत्री सुखाडीया. या परिसराची ओळख लष्करी जवान पुरविणारा परिसर म्हणून होती. हजारो निवृत्त सैनिक पराक्रमाची पदके आपल्या छातीवर लटकवून साहेबांच्या स्वागताकरिता हजर होते. कमरेला तलवारी लटकवलेल्या तरुण जवानांचा त्यात भरणा होता. या गावचं वातावरण शौर्याची परंपरा सांगणारं होतं. साहेबांची गाडी कार्यक्रमस्थळी पोहोचताच 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' या ललकाऱ्यांनी सर्व परिसर दुमदुमून गेला.

एक सेवानिवृत्त लष्करी जवान पुढे आला. त्याने साहेबांना लष्करी पद्धतीनं सॅल्युट ठोकला.

तो जवान सांगू लागला, "माझे दोन पुत्र नुकत्याच झालेल्या युद्धात मारले गेले व तिसरा लापता आहे. माझ्या दोन पुत्रांनी माझ्या घराण्याची इज्जत व परंपरा आपल्या शौर्यानं वाढविली व ते धारातीर्थी पडले. माझा असा विश्वास आहे की, माझ्या तिसऱ्या पुत्रानं असाच पराक्रम करून देशासाठी बलिदान केलं असावं."

या वेळी साहेबांना आपल्या जिल्ह्यातील अपशिंगे या गावाची आठवण झाली. या गावातील व परिसरातील अनेक पुत्र भारतमातेच्या संरक्षणाकरिता कामी आलेले आहेत. साहेबांच्या डोळ्यांत अश्रू तरारले. भरलेल्या डोळ्यांनी साहेब दोन पावले पुढं आले.

"चिन्यांच्या कैदेत मृत्यू येण्यापेक्षा लढता लढता माझा मुलगा धारातीर्थी पडला हे ऐकण्यासाठी मी उत्सुक आहे" असं म्हणणारा वृद्ध लष्करी जवान जे.सी.ओ.ला साहेबांनी गळ्याशी लावलं. त्याला मिठी मारली. पुन्हा एकदा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकारांनी परिसर दणाणून गेला. साहेबांचा फेटा बांधून व तलवार भेट देऊन गावकऱ्यांनी सन्मान केला.

तवांग, सिक्कीम, नथुलाखिंड येथील लष्करी तळांना साहेबांनी भेटी दिल्या. नथुलाखिंडीपासून दुर्बिणीनं पाहिल्यास चीनच्या सैनिकांच्या हालचाली टिपता येतात. साहेब शिवाजी महाराजांच्या प्रांतातील मराठा संरक्षणमंत्री आहेत याची कल्पना येथील सैनिकांना होती. येथील सैनिकांनी

साहेबांचे स्वागत 'शिवाजी महाराज की जय' या घोषणांनी केलं. साहेब सीमेलगतच्या लष्करी तळावरील सैनिकांत मिसळत. त्यांचे सुखदुःख समजावून घेत. त्यांच्या अडीअडचणी तत्काळ दूर करीत.

परदेशी शस्त्रास्त्रांवर अवलंबून न राहता देश शस्त्रास्त्र निर्मितीच्या बाबतीत स्वयंभू झाला पाहिजे या विचारानं साहबांचं मन पेटलं होतं. लष्करी साहित्यनिर्मितीमध्ये जास्तीत जास्त संशोधन करून आधुनिक शस्त्रे लष्कराच्या हाती द्यायला पाहिजेत. नेफामध्ये लढताना शत्रूसैन्याजवळ ऑटोमॅटिक रायफल्स होत्या. आमचे वीर शिपाई शंभर वर्षांपूर्वीच्या '३०३ एन्फिल्ड' या रायफलीनं शत्रूसैन्याचा मुकाबला करीत होते. सेमी ऑटोमॅटिक रायफल्स निर्मितीच्या बाजूचे कृष्ण मेनन होते; पण लष्कर आणि संशोधन खात्यातील वजनदार अधिकारी परदेशी निर्मात्याबरोबर सहकार्याच्या मताचे होते. नेहरूजींनी लोकसभेला माहिती दिली. आम्ही सेमी ऑटोमॅटिक बंदुकांचे उत्पन्न सुरू केले आहे. लवकरच आम्ही ऑटोमॅटिक बंदुका लष्कराच्या हाती सोपवू. साहेबांनी कलकत्ता येथील ऑटोमॅटिक रायफल्स बनविण्याच्या कामाचा आढावा घेतला असता त्यांच्या असे निदर्शनास आले की, अद्याप या निर्मितीला सुरुवातच झाली नाही. ही निर्मिती बेल्जियममधील एफ.एन. या रायफल्स निर्मितीच्या बाजूनं असलेल्या प्रशासकीय अधिकारी व भारतीय रायफल्स बनविणाऱ्या अधिकाऱ्याच्या वादात अडकून पडलेली आहे. नेहरूजींना चुकीची माहिती देऊन त्यांनी संसदेची दिशाभूल केली होती. शस्त्रविषयक संशोधन व निर्मितीमधील काही अधिकारी अशा मताचे होते की, परदेशी रायफल्स बनावटीची हुबेहूब नक्कल आपण करीत आहोत. कोर्टकचेऱ्याच्या फेऱ्यात ही रायफल अडकून पडेल. या सर्व अधिकाऱ्यांच्या मतांच्या विरोधात ठामपणे एक अधिकारी होते. त्यांचं नाव होतं एस. जे. सहानी.

सहानी हे ऑर्डनन्स फॅक्टरीचे डायरेक्टर जनरल या हुद्द्यावर कार्यरत होते. अत्यंत तल्लख बुद्धीचा अधिकारी. त्यांचा आत्मविश्वास व चिकाटी वाखाणण्यासारखी होती. त्यांनी साहेबांची भेट घेतली. साहेबांनी शस्त्र संशोधन विभागातील व कॅबिनेट सेक्रेटरीमध्ये अभ्यासगटाचे उमदे अधिकारी सुभाष मुखर्जी आणि सहानींची भेट घालून दिली. सहानी, मुखर्जी यांनी श्रमपूर्वक एक अहवाल तयार केला. कॅबिनेट सेक्रेटरी एस. एस. खेरा

यांची मान्यता घेऊन साहेबांकडे पाठविला. या अहवालावर साहेबांनी एफ. एन. गटाला विचारण्यासाठी सहानी व मुखर्जींच्या साहाय्यानं एक प्रश्नावली तयार केली. संरक्षणमंत्री म्हणून साहेबांनी एफ. एन.धार्जिण्या अधिकाऱ्यावर एकामागून एक प्रश्नांचा मारा केला. एफ. एन.धार्जिणे अधिकारी निरुत्तर झाले. कलकत्त्याच्या इशापूर ऑर्डनन्स फॅक्टरीमध्ये सहानी यांच्या नेतृत्वाखाली दोन महिन्यांच्या आत ऑटोमॅटिक रायफल्स निर्मितीला सुरुवात झाली. साहेबांनी हा घेतलेला निर्णय लष्कराच्या सक्षमतेला हातभार लावणारा ठरला. सहानींसारखे प्रामाणिक अधिकारी जोपर्यंत लष्करात आहेत तोपर्यंत भारत सुरक्षित राहील असं मत साहेबांनी व्यक्त केलं.

सप्टेंबर १९६३ उजाडला. सप्टेंबर हा महिना साहेबांच्या बुद्धिकौशल्याची चुणूक दाखविणारा ठरला. संपूर्ण भारताला नेफा पराभवानं ग्रासलं होतं. त्या पराभवाची चिकित्सा लोकसभेत होणार, संसदेत विरोधक या अहवालावरून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरणार याची कल्पना साहेबांना होती. या अहवालाबाबत नेहरूजींनी साहेबांना दिलेली कल्पना. कौल यांना न्याय मिळाला पाहिजे अशी नेहरूजींची सुप्त इच्छा. देशाच्या नेतृत्वावर पराभवाचे शिंतोडे येऊ नये याची घ्यावयाची काळजी या सर्वांच्या इच्छेच्या दबावाखाली व विरोधकांच्या माऱ्याला तोंड देण्याच्या इराद्याने साहेब लोकसभेकडे निघाले. लोकसभेत सभासदांची इच्छा लक्षात घेता संरक्षणमंत्र्यांनी हे निवेदन न वाचता संसदेला सादर करावं. नंतर चर्चा होईल, असा आदेश सभापतींनी दिला. अहवालाविषयी सर्वांची कुतूहलता शिगेला पोहोचली. १९ व २० सप्टेंबरला लोकसभा आणि राज्यसभेत या निवेदनावर चर्चा झाली. साहेबांनी अहवालासंबंधी आपले विचार मनमोकळेपणाने संसदेसमोर मांडले. आत्मविश्वासाने साहेब संसदेला सामोरे गेले.

चर्चेनंतर खा. मणी चर्चेस सुरुवात करताना म्हणाले, "मी संरक्षणमंत्र्यांचे आभार मानतो." त्यांचं भाषण तोलूनमापून होतं.

सभासदांनी आपल्या भावना व्यक्त करताना, "साहेब सभागृहाचे खरे नेते आहेत. त्यांनी सभागृहाला विश्वासात घेऊन प्रांजळ मनानं जे वक्तव्य केलं त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत."

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांनी साहेबांच्या निवेदनाची दखल घेतली

आणि साहेबांनी ज्या खुल्या दिलानं संसदेला विश्वासात घेतलं त्याबद्दल साहेबांना दाद मिळाली. लोकसभा आणि राज्यसभा आपण जिंकू शकतो असा विश्वास साहेबांमध्ये निर्माण झाला.

दासप्पा आणि बळीराम भगत या मंत्र्यांच्या शपथविधीला साहेब राष्ट्रपती भवनात हजर होते. शपथविधी संपल्यानंतर राष्ट्रपती राधाकृष्णन साहेबांच्या जवळ आले. साहेबांच्या खांद्यावर हात ठेवून नेहरूजींसमक्ष म्हणाले,

"चव्हाण, मी तुमचं हृदयातून स्वागत करतो व अभिनंदनही करतो. राज्यसभेतील तुमचं भाषण अप्रतिम झालं."

साहेबांच्या खांद्यावर हात तसाच ठेवून इतर मंत्र्यांना राष्ट्रपती राधाकृष्णन विचारू लागले, "चव्हाण यांचं भाषण आपण ऐकलंत का?"

राष्ट्रपतींकडून साहेबांची झालेली स्तुती नेहरूजींना कितपत भावली असेल हा विचार साहेबांच्या मनात घोळू लागला.

नेहरूजींनी साहेबांना बाजूला घेतलं. विश्वासात घेऊन विचारलं, "या चर्चेत मी भाग घेतला तर योग्य राहील का?"

साहेबांनी स्पष्टपणे नकार दिला व म्हणाले, "माझं व्यक्तिगत मत असं आहे. आपण चर्चेत भाग न घेतलेला बरा. हा देशाच्या भावनेचा प्रश्न बनला आहे. एखाद्या सदस्यानं भावनेच्या आहारी जाऊन तुमच्यावर काही आरोप केले तर त्या आरोपाचं खंडन करण्यास मी समर्थ आहे."

नेहरूजींना साहेबांचं म्हणणं पटलं.

या अहवालात देशाला राजकीय नेतृत्व देण्यास कमी पडल्याचा मथितार्थ निघू शकतो व त्यात नेहरूजींवर विरोधक हल्ला करू शकतात याची कल्पना साहेबांना आलेली होती. विरोधकांची धार बोथट करण्याचा प्रयत्न साहेबांनी लोकसभेत बोलताना केला होता.

साहेब म्हणाले, "नेफामध्ये आपल्याकडून काही चुका झाल्या तर त्या विसरून त्यावर काय मार्ग काढायचा आहे याचा विचार आपण केला पाहिजे. भविष्यात त्या चुका होणार नाहीत याची काळजी आपण घेतली पाहिजे. या घटनांना सामोरं जाण्यासाठी आपण एकजुटीनं प्रयत्न करावयास नको का? घडून गेलेल्या चुकांचा परिणाम भविष्यावर होऊ नये यासाठी आपण जपायला पाहिजे. इतिहासातील चुकांची दखल वर्तमानकाळात

घेऊन त्या दुरुस्त केल्या नाही तर भविष्यकाळ तुमचं नेतृत्व झुगारू शकतो. माझ्या समोर कुणी एक व्यक्ती नाही. देशहित लक्षात घेऊन मी हे विधान करीत आहे.''

हेमबरुआ तत्काळ मध्येच उठून म्हणाले, ''तुमच्या पूर्वीच्या संरक्षणमंत्र्याची आठवण झालेली दिसते.''

साहेबांनीही त्याच समयसूचकेतनं उत्तर दिलं. म्हणाले, ''मला कल्पना आहे. मीही एके दिवशी माजी मंत्री होईन.''

लोकसभेत नाथ पै, अॅन्थनी यांच्या धगधगत्या तोफा आग ओकताहेत. संपूर्ण सभागृह सुन्न झालेलं. नाथ पै अहवालातील सरकारच्या नाकर्तेपणाचे वाभाडे काढीत आहेत.

नाथ पै म्हणतात, ''ज्या लष्कराला शौर्याचा इतिहास आहे त्या सैन्याला सीमेवर नामुष्की पत्करावी लागली ही देशाच्या दृष्टीनं शरमेची बाब आहे. संरक्षणमंत्री चव्हाण या काळ्या कृत्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. देश या हल्ल्याने घायाळ झालेला आहे. नेतृत्वाच्या नाकर्तेपणाला पाठीशी घालण्याचा प्रयत्न चव्हाणांनी करू नये. त्यांनी भारतीय जनतेला अंधारात ठेवू नये. रणभूमीवर शस्त्रास्त्रांचा अभाव, रस्ते नाहीत, वाहतुकीची संपूर्ण यंत्रणा कोलमडून पडलेली, नेतृत्वहीन लष्कर सीमेवर कसं लढणार? सीमेवर गलथानपणाचं साम्राज्य पसरलेलं. नेतृत्व नामर्दपणानं हतबल झालेलं. नेतृत्वाअभावी सैन्य निष्क्रिय झालेलं. करमसिंग व त्यांच्यासोबतच्या जवानांची हत्या झाली तेव्हा प्रत्येक भारतीयाची मानसिकता काय झाली? प्रत्येक भारतीयाची मान शरमेनं खाली झुकली. त्याला या अपमानाचा बदला घ्यावा वाटतोय. त्याचा राग अनावर झाला. तो त्वेषाने म्हणतो, 'उत्तुंग आमची उत्तर सीमा इंच इंच लढवू.' ''

नाथ पै यांच्या घणाघाती भाषणाने लोकसभा अचंबित झाली. त्यांच्या उपहासगर्भ वक्तव्यानं अनेक अकार्यक्षम लष्करी अधिकारी व वातानुकूलित कक्षात बसून कागदावर युद्धाचे मनसुबे आखून यशाच्या अपेक्षा ठेवणाऱ्या माजी संरक्षणमंत्र्याची भंबेरी उडविली.

साहेबांना इशारा देताना नाथ पै म्हणाले, ''या सार्वभौम देशाच्या नव्या संरक्षणमंत्र्यांनी या अपमानित घटनेची दखल घेऊन कुणाचाही मुलाहिजा न ठेवता निर्भयपणे देशहिताचे निर्णय घ्यावेत. या सार्वभौम

भारताला अपयशाचा लागलेला कलंक धुऊन काढावा. सारा देश तुमच्याकडे वेगळ्या भावनेतून पाहत आहे. 'मराठा गडी यशाचा धनी' मराठ्यांच्या इतिहासातील या ब्रीदवाक्याचं विस्मरण नव्या संरक्षणमंत्र्यांना होता कामा नये. हे ब्रीद त्यांनी आपल्या कर्तृत्वानं सिद्ध करून दाखवावं. सच्चा भारतीय माणूस त्यागाच्या कुठल्याही सीमेपर्यंत जाण्यास तत्पर झालेला आहे. या देशाच्या भावनेशी खेळणाऱ्या कुठल्याही व्यक्तीच्या अकार्यक्षमतेवर मेहरबानी करण्याची गरज नाही. काळाची ती हाक तुम्हाला आहे. तुम्ही मागाल ते देण्यास हा देश तयार आहे. या देशाची माता आपला पुत्र व लेकी देशाच्या संरक्षणाकरिता समर्पित करण्यास तयार आहे.''

संसद नाथ पै यांच्या भाषणानं बधिर अवस्थेत पोहोचली होती. फ्रॅंक ॲन्थनी यांच्या मर्मभेदी माऱ्यानं संसद घायाळ झाली. ॲन्थनी यांनी आपली तोफ कृष्ण मेनन व नेहरूजींवर डागली.

ॲन्थनी म्हणाले, ''कृष्ण मेनन यांनी लष्करात एक वेगळा पायंडा पाडला. कर्तव्यदक्ष लष्करी अधिकाऱ्यांना बाजूला सारून लष्करात हुजऱ्यांची फौज निर्माण केली. या फौजेला 'आग्रा ब्रिगेडियर्स' म्हणून संबोधण्यात येते. ही भरती बहुसंख्य उत्तर प्रदेशातून होत आहे. कोअर कमांडर लेप्ट. जनरल कौल या आग्रा ब्रिगेडियर्सचे जनक आहेत. माजी संरक्षणमंत्री कृष्ण मेनन हे खरे या देशाचे गुन्हेगार आहेत. हे सर्व काही लष्करात घडत होते ते मेनन यांच्या आशीवार्दानेच. नेफा आघाडीवरील अपयश हे लष्कराचं नाही. स्वाभिमानी आणि लढवय्या जनरल्सना घरी बसवून त्यांच्या जागी अकार्यक्षम जनरल्सची नेमणूक केली गेली. त्यामुळं आपल्या लष्काराला हे अपयश स्वीकारावं लागलं. तरी अशा जनरल्सना दोषी न धरता त्यांची पाठराखण केली जात आहे. हा राजकीय नेतृत्वाचा पराभव आहे. मला खेदानं सांगावं लागत आहे की, लष्करानं या जनरल्सला 'खच्चर कोअर कमांडर' ही पदवी दिलेली आहे.''

संसदेत स्मशानशांतता पसरलेली. ॲन्थनी यांच्या बोचऱ्या उपहासगर्भ भाषणानं संसद हसायच्या ऐवजी अधिक धीरगंभीर झाली. प्रत्येक सदस्याच्या काळजाला जाऊन भिडणारं वक्तव्य संसदेला चिंतामग्न करीत आहे. अशा या वातावरणात कृष्ण चंद्र पंत यांनी परदेशातील युद्धाच्या अपयशाचे दाखले दिले व त्यापासून आपण शिकले पाहिजे, पराजयाची कारणमीमांसा

करत असताना त्यातील उणिवांचा शोध घेऊन वर्तमानकाळात त्या उणिवा दूर करून सैन्याचे मनोबल वाढविले पाहिजे. या पराजयावर केवळ चर्चा करून काहीही निष्पन्न होणार नाही. केवळ वेळेचा अपव्यय होईल.

साहेबांच्या हे लक्षात आले की, दोन्ही सभागृहाच्या सदस्यांसमोर आपण प्रांजळ आणि निर्मळ आपली भूमिका मांडली तर आपणास या दोन्ही सभागृहांचा पाठिंबा मिळू शकतो. विरोधी सदस्यांच्या वक्तव्यातून हे निदर्शनास आले की, त्यांचा रोख नेहरूजी, कृष्ण मेनन, कौल यांच्या दिशेने आहे.

राज्यसभेत आणि लोकसंभेत बोलताना साहेब म्हणाले, ''ही चौकशी समिती नसून सत्यशोधन समिती आहे. कुणा एक्स किंवा वायला दोषी ठरविण्यासाठी ही समिती नसून पराभवाच्या मुळाशी जाऊन त्यामागील सत्य शोधण्याकरिता हा सर्व खटाटोप आम्ही केला आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा आदर ठेवून सत्य काय आहे हे मी आपल्यासमोर निर्मळ आणि प्रांजळपणे ठेवीत आहे. मला कुणाची वकिली करायची गरज नाही. मी वकिली करीत आहे देशाच्या संरक्षणाची. भविष्यात माझ्या देशावर असा प्रसंग आला तर त्याला प्रत्युत्तर कसे द्यावयाचे या चिंतेत मी आहे. पराभवाच्या या सत्यशोधनातून जे काय आमच्या निदर्शनास आले ते मी आपल्यासमोर ठेवत आहे. सर्वप्रथम आम्ही हे मान्य केलं पाहिजे की, आम्ही गाफील राहिलो. भौगोलिक परिस्थितीचा फायदा शत्रूपक्षाला मिळाला. गेल्या दहावीस वर्षांपासून सैन्याचं सबलीकरण या शत्रूपक्षानं केलं. लष्कराची संख्या आपली आणि त्यांची तुलना केली असता त्यांच्या लष्करी संख्येच्या तुलनेत आपण पासंगालाही नव्हतो. लष्करी अधिकारी आणि जवान यांच्यातील परस्परांवरील विश्वासाचा अभाव. लष्करी अधिकारी आणि जवान खांद्याला खांदा लावून शत्रूपक्षाच्या गोळ्यांना सामोरे जात असतील तर सैनिकांचा ऊर भरून येतो. तो अधिक ईर्षेनं शत्रूच्या सैन्यावर तुटून पडतो. विजयासाठी ज्या युद्धसामुग्रीची आवश्यकता असते ती रसद, ती कुमक वेळेवर पोहोचत नसेल तर सैनिक हतबल होतो. आपले सैनिक तुटपुंज्या शस्त्रास्त्रांच्या साहाय्यानं मृत्यूशी झुंज देत होते. आपल्याकडं कमतरता होती आधुनिक साधनसामुग्रीची. यातही आपण कमी पडलो. हे सर्व आमचे कमकुवत दुवे आमच्या लक्षात आले. या सर्व उणिवा दूर

करण्याचा प्रयत्न युद्धपातळीवर चालू आहे. अकार्यक्षम लष्करी अधिकाऱ्यांनी संरक्षण मंत्रालयाला अंधारात ठेवलं. संरक्षणमंत्र्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला ही त्यांची चूक झाली. मग त्यांनी कुणावर विश्वास ठेवावयाचा हा प्रश्न निर्माण होतो. लष्करप्रमुखांच्या बाबतीत सैन्याच्या ज्या काही प्रतिक्रिया आहेत त्या याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या आहेत. त्यात सत्यताही असेल हे मी अमान्य करणार नाही. पण याच सेनानीनं वालांग विभागात ज्या चकमकी झाल्या त्याचं यशस्वी नेतृत्व केलेलं आहे. त्यांचा पराक्रम आपल्याला विसरता येणार नाही. देशाच्या राजकीय नेतृत्वावर अनेक आरोप येथे करण्यात आले. या देशाच्यां नेतृत्वांनी योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन लष्करास आदेश दिले. 'शत्रूसैन्याला आपल्या भूमीवरून परतून लावा' हेच योग्य मार्गदर्शन होतं असं मला वाटतं. संपूर्ण देश आपल्या पाठीशी आहे ही भावना सैन्यामध्ये निर्माण झाली. राजकीय नेतृत्वानं आपली जबाबदारी आत्मविश्वासाने पार पाडलेली आहे. लष्कराचं मनोधैर्य वाढविण्याचं काम राजकीय नेतृत्वानं केलं. संरक्षण मंत्रालय तिथं कमी पडलं त्याला राजकीय नेतृत्व काय करणार? शेवटी मला आपणास असं सूचित करावंसं वाटतं की, भूतकाळातील चुकांचा मागोवा घेऊन वर्तमानकाळात त्या चुकांचा नायनाट करून भविष्यकाळातील विजयाचा मार्ग सुखकारक करावा लागतो. तो आपणा सर्वांच्या सहकार्यानं यशस्वी करूया.''

नेफा पराभवाच्या भुताला कायमचे गाडून टाकण्यात साहेब यशस्वी झाले. संसदेच्या दोन्ही सभागृहांचा विश्वास संपादन करण्यात साहेबांना विजय मिळाला. प्रसिद्धीमाध्यमांनी साहेबांना उचलून धरलं. संरक्षणमंत्र्याच्या पायवाटेवर पेरून ठेवलेले सुरुंग आपल्या चाणाक्ष नजरेनं हेरून ते निकामी करण्यात साहेबांना यश मिळालं. संसदेला जिंकून साहेब संरक्षणाच्या सबलीकरणाकरिता परदेशाच्या कामगिरीवर निघाले.

अमेरिकेला निघण्यापूर्वी साहेबांनी बंगलोरच्या हिंदुस्थान एरोनॉटिक कारखान्यास भेट दिली. या कारखान्यात एच.एफ.२४ हे अत्यंत प्रभावशाली, गतिमान बॉम्बफेकी विमान हवाईदलात सामील करण्यात आलं. या शक्तिमान विमान बनावटीच्या तांत्रिक कौशल्याबद्दल साहेबांनी अभिमान व्यक्त केला. स्वदेशी तंत्रज्ञान जागतिक तंत्रज्ञानाच्या तोडीस तोड असल्याबद्दल कौतुक

केलं. जर्मन तंत्रज्ञ डॉ. कुर्ट यांच्या नेतृत्वाखाली आपल्या तंत्रज्ञांनी हे विमान निर्माण केलं.

साहेब आमेरिकेला पोहोचले. तेथील संरक्षणविषयक धोरण हाताळणाऱ्या मॅकन्मारांबरोबर चर्चा झाली. 'वॉशिंग्टन पोस्ट'सारख्या वर्तमानपत्रांनी साहेबांच्या या भेटीची दखल घेतली. पेंटागॉनमध्ये लष्करी मानवंदना स्वीकारत असल्याचे छायाचित्र प्रथम पानावर छापून आले.

त्या बातमीत पुढे म्हटले, "भारताचे वरच्या श्रेणीतील राजकीय मुत्सद्दी संरक्षणमंत्री वाय. बी. चव्हाण अमेरिकेची लष्करी मदत मिळविण्याच्या प्रयत्नात आहेत. या दोन्ही देशांत दीर्घमुदतीचा लष्करी मदतीचा करार व्हावा असा हेतू ते बाळगून आहेत."

'भारताचे संरक्षण' या मथळ्याखाली संपादकीय लिहिताना त्यात म्हटले, 'भारताचे संरक्षणमंत्री अतिमहत्त्वाच्या कामगिरीवर आले आहेत. भारतीय लष्करी योजना मजबूत करण्याच्या दृष्टीने ते प्रयत्न करणार आहेत. भारत आणि अमेरिका यांच्या राजकीय संबंधांवर याचे परिणाम होणार आहेत."

ते पुढे म्हणतात, "रशिया भारताला मदत करीत आहे याची नोंद अमेरिकेला घ्यावी लागेल. भारताला रशिया आणि अमेरिका एकाच वेळी लष्करी साहित्य पुरविणार. इतर देशांच्या बाबतीत ही परिस्थिती नाही. चीन आणि रशिया यांच्यातील तणाव संपल्यानंतर भारत रशियाच्या बाजूने झुकेल काय? याचा विचार अमेरिकेला करावा लागेल."

मिग-२१ जातीच्या विमानाच्या निर्मितीत रशियाची मदत घेऊन भारतानं या विमानाच्या निर्मितीला सुरुवात केली. याबद्दल अमेरिकेची नाराजी होती. एफ-१०४ जातीची विमानं भारताच्या पदरात पाडून घेण्याचा आटोकाट प्रयत्न साहेबांनी केला. यात साहेबांना यश आलं नाही. या जातीची विमानं अमेरिकेनं पाकिस्तानला दिली होती. अमेरिकेच्या वतीनं टालबोट मध्यस्थी करीत होते. त्यांच्या मध्यस्थीला फारसं यश येण्याची चिन्हं साहेबांना दिसेनात. पंधरा दिवस वाटाघाटीचा घोळ चालूनही काही निष्पन्न होत नाही हे साहेबांना कळून चुकलं. साहेबांनी डीन रस्क यांच्याकडे तीव्र नाराजी व्यक्त केली. शेवटी राष्ट्राध्यक्ष प्रे. जॉन्सन यांच्याशी बोलण्याचे ठरले. २८ मे ही तारीख निश्चित करण्यात आली.

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन यांची भेट वॉशिंग्टनला घेण्याचं निश्चित झाल्यानंतर साहेब लॉस एंजिल्समध्ये थांबले. कॉलोरॅडो येथील अमेरिकेची हवाई अकादमी पाहण्यासाठी गेले. हवाई अकादमीची पाहणी करून साहेबांनी तिथं मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी वॉशिंग्टनला पोहोचून प्रे. जॉन्सन यांची भेट घ्यायची ठरलेली. रात्री साहेब गाढ झोपेत असताना खोलीतील फोन खणखणू लागला. कोलोरॅडोसारख्या अनोळखी शहरात मध्यरात्री कुणाचा फोन असणार या विचारात साहेबांनी फोन उचलला आणि ती भारताच्या भविष्याची काळरात्र ठरली. फोनवरून साहेबांच्या कानावर 'पंतप्रधान नेहरूजी यांचं देहावसान झालं' असे घणाघाती प्रहार व्हावेत त्याप्रमाणे वाक्य आदळू लागले. वॉशिंग्टनहून फोनवर बोलत होते फिलिप्स टालबोट. साहेबांच्या डोळ्यांतील झोप उडून तिची जागा अश्रूंनी घेतली.

साहेबांनी स्वत:ला सावरलं. साहेबांनी टालबोट यांना सांगितलं, "मला कुठल्याही परिस्थितीत दिल्लीला पोहोचायला पाहिजे. तुम्ही युद्धपातळीवर प्रयत्न करा."

टालबोट यांनी साहेब अंत्यविधीसाठी कसे पोहोचतील याच्या हालचाली रात्रीच सुरू केल्या आणि टालबोट यांच्या प्रयत्नामुळं साहेबांना नेहरूजींच्या अंत्यविधीला हजर राहता आलं.

पंतप्रधानांचा अंत्यविधी कुठलीही अप्रिय घटना न घडता पार पडावा यासाठी संरक्षण खातं प्रयत्नशील होतं. जगातील विविध देशांचे प्रतिनिधी, राष्ट्रप्रमुख, भारतातील मान्यवर यांची व्यवस्था चोख राहावी यासाठी पोलिस यंत्रणा आणि त्यांच्या मदतीला लष्करी जवान तैनात करण्यात आलेले. गांधीजींच्या अंत्यविधीच्या वेळेस जो विस्कळीतपणा आला होता त्याची पुनरावृत्ती होऊ नये याची काळजी घेण्याच्या सूचना साहेबांनी लष्करी अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. याचवेळी एका अफवेचं वादळ दिल्लीवर घोंगावू लागलं. एक लष्करी अधिकारी साहेबांच्या कानाशी लागला आणि लगेच निघून गेला. हंगामी पंतप्रधान गुलझारीलाल नंदा यांच्या देखरेखीखाली अंत्यविधी पार पडला. ती अफवा शेवटी अफवाच ठरली. नेहरूजींचा उत्तराधिकारी म्हणून शास्त्रीजींची निवड झाली. लोकशाही मार्गानं सत्तांतर झालं. त्या अफवेची शहानिशा साहेबांनी केली असता त्यात काही तथ्य आढळून आलं नाही. जनरल चौधरी यांनी राष्ट्रपतींची मान्यता घेऊन

काही गडबड गोंधळ होऊ नये म्हणून ६ हजार सैनिक दिल्लीत आणले होते. चौधरी यांनी कॅबिनेट सेक्रेटरीला याची कल्पना दिली होती.

त्यांनी राष्ट्रपतींच्या कानावर सैन्य दिल्लीत आणण्याची गोष्टी जशी घातली होती तशी याची कल्पना काळजीवाहू पंतप्रधान गुलझारीलाल नंदा यांना द्यावयास पाहिजे होती. ते त्यांच्याकडून राहून गेलं. त्यातून या अफवेचं वादळ दिल्लीत उठलं असावं. साहेब आणि जनरल चौधरी यांच्यात चर्चा झाल्यानंतर या अफवेला पूर्णविराम मिळाला. 'सैनिक उठाव करून सत्ता हस्तगत करणार' अशी ती अफवा होती.

पंतप्रधानांची निवड एकमताने व्हावी ही साहेबांची प्रांजळ भूमिका. शास्त्रीजी, मोरारजी आणि साहेब यांची नावं राजकीय वर्तुळात चर्चिली जाऊ लागली. पंतप्रधानाच्या निवडीच्या प्रक्रियेबद्दल साहेबांनी आपले विचार व्यक्त केले.

म्हणाले, "भारताच्या भवितव्याकडे सारं जग आशेनं बघतंय. नेत्याची निवड एकदिलानं आपण कशी करतो हे जगाला पाहावयाचे आहे. मतभेद न होता बहुमताचा कौल घेऊन नेता निवडला पाहिजे." मत साधारणतेचा कौल (कॉन्सेन्सस्) म्हणून पुढे भारताच्या राजकीय इतिहासात याची नोंद झाली. याचे प्रवर्तक साहेब ठरले. शास्त्रीजींची पंतप्रधान म्हणून एकमतानं निवड झाली.

शास्त्रीजी आणि साहेबांचे विचार एकजीव झाले होते. कुठल्याही कठीण प्रसंगी नेहरूजींसोबत शास्त्रीजी हजर असत. साहेबांची संरक्षणमंत्री म्हणून झालेली निवड शास्त्रीजींच्या सहमतीनं झालेली होती. शास्त्रीजी पंतप्रधान झाल्यानं साहेबांचा हुरूप वाढीस लागला.

साहेबांसोबत रशियाच्या दौऱ्यावर जाण्यास शेवटी मी होकार दिला. आम्हाला २८ ऑगस्ट ६४ ला निघायचं होतं. शेवटपर्यंत परदेश दौरा टाळण्यासाठी प्रयत्न करून बघितले; पण मला यश मिळालं नाही. भाषा, हवामान, तेथील अन्नपाणी हे सर्वकाही माझ्यासाठी अनोखं होतं. शेवटी साहेबांची सावली म्हणून आपण वावरायचं. शेवटी श्रीपाद डोंगरे आहेच साथीला. केव्हातरी साहेबांच्या वाचनालयातून मी मॅक्झिम गोर्की यांची 'आई' नावाची मराठीत भाषांतरित केलेली कादंबरी मिळविली होती. ती वाचल्यानंतर मला रशिया पाहण्याची इच्छा झाली होतीच. तो योग आता

आला. मॉस्कोंच्या विमानतळावर उतरताच उत्साहवर्धक हवामान, निर्मळ सूर्यप्रकाश, वेळ तिसऱ्या प्रहराची, नजर पोहोचेल तिथपर्यंत वनश्रीची हिरवळ. आल्हाददायक वातावरणात रशियाचे संरक्षणमंत्री मेलिनोव्हस्की व त्यांच्या पत्नी आमच्या स्वागताला जातीनं उपस्थित होते. त्रिलोकनाथ कौल रशियातील भारताचे वकील आणि त्यांच्या अधिकाऱ्यानं आमचं स्वागत केलं. साहेबांनी लष्करी मानवंदना स्वीकारली. आमची राहण्याची व्यवस्था मॉस्को विद्यापीठाच्या परिसराच्या मागे जंगलवजा निवांतस्थळी केली होती. टुमदार बंगल्याच्या प्रांगणात आमच्या गाड्या पोहोचल्या.

कौल आणि साहेब बंगल्यासमोरील हिरवळीवर पोहोचले.

कौल साहेबांना म्हणाले, "आपल्याला धोरणात्मक काही बोलायचे असल्यास खुल्या मैदानातच बोललं पाहिजे. आपल्याकडे म्हणतात ना 'भिंतीला कान असतात' तसे येथे खोल्यांमध्ये श्रवणयंत्रे बसविलेली असतात. आपण इथे सावधगिरी बाळगावयाची असते." कौल यांचा सल्ला साहेबांना पटला. नेहमीच हे दोघे एकत्र आले म्हणजे बागेत जाऊन बोलत असत.

लाल चौकातील लेनिनच्या समाधीला प्रथम आम्ही भेट दिली. क्रेमलीनच्या भिंतीला लागून लेनिन चिरनिद्रेत विसावलेले. त्यांचं शव पाहिल्यानंतर ते शांतपणे विश्रांती घेत आहेत असा भास आपणास होतो. साहेबांनी या साम्यवाद्याला भारताचे प्रतिनिधी म्हणून पुष्पचक्र वाहिलं. तीन-तीन, चार-चार किमीच्या रांगा या महात्म्याच्या दर्शनाकरिता लागलेल्या होत्या. या वेळी साहेबांना मानवेंद्र रॉय यांचा सहवास आठवला.

रशियाचे संरक्षणमंत्री मेलिनोव्हस्की हे अध्यक्ष क्रुश्चेव्ह यांच्या जवळचे आहेत याची साहेबांना कल्पना होती. लष्करी मदतीच्या बाबतीत भारतीय लष्करी अधिकारी आणि रशियन लष्करी अधिकाऱ्यांची बोलणी मदतीच्या दिशेने सकारात्मक होऊ लागली. साहेबांनी ज्या ज्या मागण्या रशियाच्या संरक्षणमंत्र्यांसमोर ठेवल्यात त्याची पूर्तता करण्याची तयारी रशियाने दर्शविली. मिग-२१ विमाने व त्याच्या उत्पादनासाठी कारखान्याला लागणारी संपूर्ण मशिनरी मिळणार होती. इतर साहित्य कुठलीही अट न घालता देण्याचं रशियानं मान्य केलं. अमेरिकेतील कामगिरी निराशाजनक ठरली. त्याची कसर साहेबांनी रशियातील भेटीत भरून काढली.

साहेबांची आणि रशियन राष्ट्रप्रमुख क्रुश्चेव्ह यांची भेट ९ सप्टेंबर

१९६४ ला झाली. या रशियनप्रमुखानं भारताचं लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठी मोलाची मदत केली. रशियन पानबुडी, युद्धनौका साहेबांना दाखविण्यात आली. साहेब जगातील पहिली व्यक्ती असावी की, ज्यांना हा सन्मान मिळाला.

शेवटी साहेबांकडे पाहून क्रुश्चेव्ह म्हणाले, "मला भारताला हितकर मदत करून इतर राष्ट्रांपेक्षा वेगळं स्थान द्यावयाचं आहे. आपण आमचे आवडते मित्र आहात. आपल्याला मदतीचे झुकते माप देताना कदाचित मला महाग पडेल याची कल्पना नाही. आपल्यासारखे सर्वोत्तम नेते याठिकाणी आहेत त्यांना उल्हसित ठेवावं लागले अन् तेही पडेल ती किंमत देऊन." क्रुश्चेव्ह मनमुराद हसले व साहेबही त्यांच्या हास्यात सामील झाले.

चेकॉव्ह, टॉलस्टॉय आणि मॅक्झिम गोर्की या आधुनिक महामानवाच्या स्मारकस्थळांना साहेबांसोबत आम्ही भेटी दिल्या. बोल्गाग्राडला भेट दिल्यानंतर युद्ध काय असतं याची कल्पना आली. बुखाटेक या कलावंतानं आपल्या कुंचल्यानं दुसरं महायुद्ध साकारलेलं आहे. हा कलाकार प्रथम सैनिक आहे व नंतर कलाकार. दुसऱ्या महायुद्धात प्रत्यक्ष रणभूमीवर शस्त्र चालवून तेथील रक्तामांसाचा चिखल तुडविलेला आहे त्यानं. युद्धात लढता लढता तो गंभीर जखमी झाला. पुढे त्याच्या हातून ही कलाकृती नियतीला निर्माण करावयाची होती म्हणून तो वाचला.

साहेबांना निरोप देताना हा उमदा बुखाटेक कलाकार म्हणाला, "युद्ध काय असतं हे कुणीही दुर्लक्षिता कामा नये. यथून पुढे तर नाहीच नाही."

रशियासोबत झालेल्या लष्करी कराराची माहिती साहेबांनी केंद्रीय मंत्रिमंडळासमोर ठेवली. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री नाविकदलासाठी रशियाकडून सहकार्य घेण्याच्या निर्णयाबद्दल ठाम नव्हते. त्यापूर्वी साहेबांनी ब्रिटिश सरकारसोबत सल्लामसलत करावी अशी इच्छा शास्त्रीजींनी व्यक्त केली.

नोव्हेंबर १९६४ ला साहेब ब्रिटनला रवाना झाले. ब्रिटनचे पंतप्रधान हेरॉल्ड विल्सन यांच्यासोबत लष्करी साहाय्य मिळविण्याच्या अनेक चर्चेच्या फेऱ्या झाल्या. या खलबतातून साहेबांना हे जाणवलं की, ब्रिटिश सरकारला भारताला लष्करी साहाय्य करण्यापेक्षा भारताची लष्करी गरज काय आहे

हे जाणून घेण्यातच जास्त रस आहे. हेरॉल्ड विल्सन आणि माऊंटबॅटन यांच्यासोबत अनेक चर्चेच्या बैठका झाल्या; पण हे सरकार निश्चित असा निर्णय घेऊन स्वत:ला बांधून घेण्याच्या मन:स्थितीत नव्हतं. क्लेमंट ॲटली यांनी साहेबांच्या सन्मानार्थ जेवण दिलं. तिथे ही प्रदीर्घ चर्चा झाली.

शेवटी साहेबांनी निर्वाणीचा इशारा दिला की, "भारतीय नाविक दलाच्या सक्षमतेसाठी ब्रिटन मदत करीत नसेल तर भारताला खुल्या बाजारातून शस्त्रास्त्रे मिळतील तेथून घेण्याशिवाय पर्याय नाही आणि ती आम्ही मिळविणार."

यानंतर हेरॉल्ड विल्सन यांनी मदतीचं आश्वासन साहेबांना दिलं. प्रत्यक्षात मात्र हे आश्वासन उतरलं नाही. साहेबांच्या हे लक्षात आलं की, अमेरिका आणि ब्रिटन पाकिस्तानच्या हिताचा विचार करूनच भारताला शस्त्रास्त्राचं साहाय्य करायचं किंवा नाही हे ठरवणार. ब्रिटनचे नौदलप्रमुख भारताला मदत करण्याच्या मन:स्थितीत नव्हते. जुन्या अडगळीत पडलेल्या युद्धनौका आणि पानबुड्या देण्याचं कबूल करून घेण्यात साहेबांना यश आलं.

पाकिस्तानचे अध्यक्ष अयुबखान यांनी मार्च १९६५ ला चीनला भेट दिली. चीनकडून मिळालेल्या आश्वासनाच्या जोरावर पाकिस्ताननं भारताच्या हद्दीत कुरापती सुरू केल्या. भारताला इतर राष्ट्रांपासून अलग पाडण्याचा बेत या दोन्ही राष्ट्रांनी २७ मार्चला रावळपिंडीत केला. ४ एप्रिल १९६५ ला अयुबखान आणि भुट्टो यांनी रशियाचा दौरा केला. रशियानं दळणवळणाच्या सुविधेसाठी आर्थिक मदत देण्याचं मान्य केलं.

२४ एप्रिलला पाकिस्ताननं आपल्या लष्करी सामर्थ्यानिशी कच्छवर हल्ला चढविला. भारताची काही ठाणी उद्ध्वस्त केली. भारतीय हद्दीत घुसखोरी केली. पाकिस्ताननं कच्छमध्ये अघोषित युद्ध सुरू केलं असं दिल्लीचं मत झालं. भारतीय लष्कराच्या हालचाली सुरू होताच पाकिस्ताननं कांगावा सुरू केला की, भारतानं युद्धआघाडी उघडली आहे. युद्धक्षेत्र वाढवू नये म्हणून ब्रिटन, अमेरिका यांनी भारतावर दबाव आणण्यास सुरुवात केली. हेरॉल्ड विल्सन यांनी तात्पुरती एक योजनाच दोन्ही देशांसमोर ठेवली. शास्त्रीजी तडजोड करून हा वाद मिटावा या मताचे होते; मात्र

तोडगा सन्माननीय असावा. ३० जूनला युद्धसमाप्तीचा करार होऊन प्रत्यक्ष १ जुलैला कराराची अंमलबजावणी झाली. यात भारताला आपला काही भूभाग गमवावा लागला.

विशाखापट्टणमच्या नौदल केंद्राची पाहणी करण्यास साहेब पोहोचतात न पोहोचतात तोच शास्त्रीजींचा 'तातडीने दिल्ली पोहोचा' असा संदेश साहेबांना मिळाला. घुसखोर काश्मीरमध्ये घुसवून आपली युद्धाची खुमखुमी पाकिस्तानने तेवत ठेवली. ३ हजार गनिमी भारताची सरहद्द ओलांडून भारताच्या भूमीवर पोहोचले. या गनिमांनी ८ ऑगस्टला शेख अब्दुल्लाला पंतप्रधानपदावरून हाकलून त्यांना अटक करण्याला एक वर्ष पूर्ण होतंय त्यानिमित्तानं जी निदर्शनं होणार आहेत त्यात या घुसखोरांनी भाग घ्यावा व काश्मीरमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण करावी. सर्व गनिमांना भारतीय पोलिसांनी पकडून त्यांचा हा डाव उधळून लावला. पाकिस्तानच्या या वृत्तीला ठेचून काढण्यासाठी तातडीनं कारवाई करावी लागेल या मताशी साहेब आणि लष्करी अधिकारी ठाम होते. कारगिल आणि उटी या सरहद्दीला साहेबांनी भेट दिली. या घुसखोरीला पायबंद घालण्यासाठी युद्धबंदी रेषा पार करून पाकिस्तानच्या भूमीवर हल्ला करावा लागणार अशी भूमिका साहेबांनी घेतली. तशा सूचना व अधिकार लष्करी अधिकाऱ्यांना दिले. १५ ऑगस्टलाच भारतीय सैन्यानं युद्धबंदी रेषा पार करून तीन ठाणी हस्तगत केली.

सरहद्दीवर युद्धजन्य परिस्थिती. साहेब रात्रंदिवस शत्रूपक्षाच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहेत. कुठल्या क्षणी युद्धाची ठिणगी पडेल याचा नेम नव्हता. पंजाबच्या विमानतळाला रात्री उशिरा भेट देऊन साहेब दिल्लीत आले. मध्यरात्री दूरध्वनी खणखणू लागला. दूरध्वनीवर निरोप होता - साहेब पोरके झाल्याचा. मातोश्री विठाई साहेबांना भारतमातेच्या रक्षणासाठी देशाच्या हवाली करून स्वत: नियतीच्या कुशीत विसावल्या. साहेबांनी मला आवाज दिला. साहेबांच्या आवाजात कंप होता. मी लगबगीनं साहेबांजवळ आले.

मी विचारण्यापूर्वीच साहेब सांगू लागले, "वेणू, पंढरपूर येथील विठ्ठलाच्या देवळात माझा हात धरून मला यशाच्या शिखरावर पोहोचवणारी माझी आई माझा हात सोडून गेली."

साहेब जे सांगताहेत त्यावर माझा विश्वास बसेना. मी भांबावून गेले.

काय करावं मला काही सुचेना. मी आणि साहेब एकमेकांकडे पाहून रडलो आणि दु:ख हलकं केलं. शेवटी एकमेकाला सावरून मुंबईला जाण्याच्या तयारीला लागलो. माझ्यावर आईचा अपार जीव होता. आम्हा सुनांना आमच्या आईची आठवण कधीच येऊ दिली नाही. आईच्या आठवणीनं मला घेरलं.

संरक्षणमंत्री म्हणून साहेब दिल्लीला जाण्यास निघाले तेव्हा आई मला म्हणाल्या, ''वेणू, यशवंतरावाचा सांभाळ आता तुला करायचा आहे. माझ्या जागी आता तूच त्याची पालनकर्ती आहेस.''

साहेब संरक्षणमंत्री झाले आणि नेहरूंजींची लोकसभेत पाठराखण केली तेव्हापासून नेहरू घराण्याशी आमचा घरोब्याचा धागा घट्ट झाला. नेहरू घराण्याचं एक वैशिष्ट्य होतं की, ज्याला आपलं म्हटलं त्या घरातील सुखदु:ख ते आपलं सुखदु:ख्र मानत. साहेबांच्या आईला भेटण्याची इच्छा नेहरूजींनी व्यक्त केली. एके दिवशी नेहरूजी आणि इंदिराजी आईच्या भेटीस आले. आईचा आशीर्वाद घेतला. याचा आईला मोठा आनंद झाला होता. या आठवणीत मी आणि साहेब मुंबईला येऊन पोहोचलो. ही तारीख होती १८ ऑगस्ट १९६५. साहेबांनी आईच्या पार्थिवाला अग्निडाग दिला आणि त्याक्षणी खाली बसले. भूतकाळ गळून पडल्याचा भास साहेबांना झाला. घरातला कर्ता झालो अशी भावना साहेबांची झाली. कर्तेपणाच्या कल्पनेनं साहेब गोंधळले. दुनियातले कर्तेपण चालते; पण घरातलं लहानपण फार मोठं असतं याची साहेबांना जाण होती.

'वंचिताचा पालनहार।
मातेविना निराधार ।
परस्वाधीन आहे पुत्र नियतीचा ।'

हे सत्य साहेबांना यक्षणी उमगलं.

काश्मीरच्या सीमेलगत पाक सैन्याचा घुसखोरीचा प्रयत्न चालूच होता. भारतीय सैन्य मात्र सावधगिरीनं शत्रूपक्षाच्या सैन्याला पिटाळून लावत होतं. जम्मूच्या भीमबार भागात शत्रूसैन्य प्रवेश मिळवीत आहे हे कळताच भारतीय लष्करानं टिथवाल भागात सामर्थ्यानिशी धडक मारून युद्धबंदी रेषेच्या वायव्य भागातील अतिमहत्त्वाची ठाणी हस्तगत केली.

त्यामुळे शत्रूसैन्याला घुसखोरीचा मार्गच बंद झाला. भारताच्या लष्करानं पाकिस्तानच्या भूमीवर पाच मैल आत चाल करून हाजी-पीर-पास हे कठीण ठाणं मोठ्या शौर्यानं जिंकून घेतलं. साहेबांनी हाजी-पीर-पास ठाण्याच्या धुमश्चक्रीची माहिती संसदेला दिली. भारतीय सैन्याचं मनोबल एका विशिष्ट उंचीला पोहोचलं आहे. भारतीय सैन्याने शत्रूपक्षाला दिलेला तडाखा जिव्हारी लागला. युद्धाची खुमखुमी मनात ठेवून पाकिस्ताननं एका संपूर्ण ब्रिगेडच्या ताकदीनिशी भारतावर चाल करण्याचं ठरविलं. या पाकिस्तानच्या चालीनं प्रत्यक्ष युद्धाला तोंड फुटलं. आंतरराष्ट्रीय सीमेवर भीमबार-छांब हद्दीत पाकिस्तान रणगाड्यानं तळ ठोकला. १ सप्टेंबर १९६५ ला हे रणगाडे तासभर भारतीय सैन्यावर आग ओकत राहिले. रणगाड्यासोबत पाकिस्तानी सैन्य युद्धबंदी रेषा ओलांडून भारतावर चाल करून आले. त्यांचा हल्ला प्रभावशाली होता. दोन ब्रिगेडस् सैन्य म्हणजे ६ हजार सैन्य १०० रणगाड्यांच्या सहाऱ्यानं भारतीय हद्दीत आगेकूच करीत आहे. या पहिल्या दिवशी १ हजार भारतीय सैन्य मुहतोड प्रतिकार करीत आहे. ७५ अमेरिकन रणगाडे पाकनं रणभूमीवर उतरवले. या अजस्त्र रणगाड्यांच्या माऱ्यानं भारतीय लष्कराला ६ मैल मागे रेटलं. छांब भाग हा भौगोलिकदृष्ट्या पाकिस्तानच्या सोयीचा. त्यानं जबरदस्त हल्ला करून आगेकूच सुरूच ठेवली. कमांडर हरबक्षसिंग यांनी जनरल चौधरी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून हवाई हल्ल्याची आवश्यकता असल्याचं निदर्शनास आणून दिलं. पाकिस्तानचे पॅटन रणगाडे आग ओकत जम्मूला गिळंकृत करण्याच्या बेतानं आगेकूच करीत आहेत. कमांडर हरबक्षसिंग आणि जनरल चौधरी यांची बोलणी ४ वाजेच्या सुमारास झाली. वेळ कमी होता. अंधार पडल्यानंतर रणगाडे अधिक जोमानं जम्मूच्या दिशेनं निघाले असते. काही मिनिटांच्या आतच जनरल चौधरीला निर्णय घ्यावयाचा आहे. हवाईदलप्रमुख व चौधरी संरक्षण मंत्रालयात साहेबांकडे पोहोचले. साहेबांना रणभूमीवरील परिस्थिती सांगितली व हवाई हल्ल्याची परवानगी मागितली. पंतप्रधानांशी विचारविनिमय करण्यास अवधी कमी आहे. सूर्यास्तापूर्वी हवाई हल्ला करणे ही योग्य वेळ आहे.

"यक्षणी आदेश देण्याची आवश्यकता आहे का?" साहेब.

"हवाई हल्ला करण्याची हीच अचूक वेळ आहे." सरसेनापती.

"काही हरकत नाही. आगे बढो, हल्ला करा." साहेब.

साहेबांचा आदेश मिळताच क्षणाचाही विलंब न करता भारताच्या हवाई दलानं काश्मीरच्या दिशेनं झेप घेतली. भारतीय लष्करी विमानांच्या हल्ल्यानं तोफखाने, रणगाडे उद्ध्वस्त केले. राक्षशी आगेकूच अर्ध्या तासाच्या आत धुळीस मिळविली. सरसेनापतीनं हवाई दलाच्या पराक्रमाची माहिती साहेबांच्या कानी घातली. साहेबांनी पंतप्रधानांना भेटून हवाई हल्ल्यासंबंधी सविस्तर माहिती त्यांना दिली. एकजीव झालेले हे दोन नेते एकमेकांना समजावून घेऊ लागले. साहेबांच्या या निर्णयाचं शास्त्रीजींनी लोकसभेत समर्थन केलं. छांबमधील लष्कराच्या शौर्याची, पराक्रमाची माहिती साहेबांनी लोकसभेत दिली. पाकिस्तानचे झुल्फिकार अली भुत्तो यांनी साहेबांना लक्ष्य करून तोंडसुख घेतलं.

साहेबांची हेटाळणी करताना भुत्तो म्हणाले, "भारताचे संरक्षणमंत्री पाकिस्तानवर लांडग्यासारखे तुटून पडले असले तरी पाकिस्तानला भारतीय संरक्षणमंत्र्यांनी शेळी, मेंढी समजू नये. याची त्यांना कल्पना यावी."

छांबमधील पाकिस्तानची झालेली दमछाक त्यांच्या जिव्हारी लागली. ३ व ४ सप्टेंबरला सेबरजेट विमानाच्या माऱ्यानं भारतीय हद्दीत मुसंडी मारली. भारतीय हवाई दलानं भारतीय बनावटीची आकारानं लहान असलेली 'नॅट' विमानं हल्ल्यात वापरून सेबरजेटसारख्या शक्तिशाली विमानाचा फडशा पाडला. अखनूरच्या दिशेनं पाक सैन्याची भारतीय हद्दीत आगेकूच चालूच होती. ५ सप्टेंबरला पाक सैन्य अखनूरच्या टप्प्यात पोहोचलं. पाकचे जनरल मुसा सैन्याला चिथावणीखोर भाषा वापरून प्रोत्साहन देत आहेत. 'अल्ला तुमच्या पाठीशी आहे... तुमचा विजय निश्चित आहे,' असे ते म्हणत आहेत.

पाकिस्ताननं आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून भारतीय भूमीचा काही मैलांचा भाग काबीज केला. काश्मीरचं स्वातंत्र्य धोक्यात सापडलं होतं. संरक्षण खात्यातील अधिकाऱ्यांची आणि लष्करी अधिकाऱ्यांची एकच झुंबड उडाली आहे. खलबतावर खलबतं चालू आहेत. पंतप्रधान, संरक्षणमंत्री, तीनही दलांचे प्रमुख यांच्या बैठकांवर बैठका चालू आहेत. देशाच्या अस्तित्वासाठी आणि इतिहासानं नोंद घ्यावी असा भारतानं घेतलेला निर्णय आहे तो स्वरक्षणार्थ कारवाई करण्याचा. ६ सप्टेंबरला निर्णयाची

अंमलबजावणी करताच पाकिस्तानचं संरक्षण खातं चक्रावून गेलं. त्यांना काय करावं हेच कळेना. भारतीय सैन्याने लाहोरच्या दिशेनं गुरुदासपूर, अमृतसर आणि फिरोजपूर अशा तीन आघाड्यांवरून चाल करून जाण्याचं ठरविलं. भारतीय सैन्य विद्युतवेगानं लाहोरच्या दिशेनं झेपावलं. संसदेत साहेबांनी हे स्वसंरक्षणाकरिता आक्रमण जाहीर करताच टाळ्यांच्या कडकडाटात या घोषणेचं संसदेनं स्वागत केलं. छांबमध्ये सियालकोटचा ताबा घेऊन पाकिस्तानचं कंबरडं मोडून काढण्याचं उद्दिष्ट भारतीय लष्कराला देण्यात आलं. भारतीय सैन्य पाकच्या भूप्रदेशाचा कब्जा करीत लाहोरच्या दिशेनं मुसंडी मारीत आहे. काश्मीरकडील पाकिस्तानच्या सैन्याला आपली मोहीम थांबवून लाहोरच्या संरक्षणाकरिता धाव घ्यावी लागत आहे.

लाहोरचं संरक्षण करणाऱ्या इचोगिल कालव्याला हस्तगत करणं हे भारतीय सैन्याचं लक्ष्य आहे. लाहोरची सुरक्षितता या कालव्यावर अवलंबून आहे. हा कालवा काबीज केला की लाहोरवर ताबा मिळविल्यातच जमा आहे. इचोगिल कालव्याच्या काठावर वसलेलं डोंगराई, खेमकरण आणि बर्की इथपर्यंत भारतीय सैन्याने धडक मारून लाहोरची कोंडी केली. २२५ पॅटन रणगाड्यांनी ३० चौरस मैलाचं क्षेत्र व्यापलेलं आहे. या रणगाड्याची ताकद पाकिस्तान सैन्याची पहिल्या प्रतीची आहे. भारतीय लष्कराकडे रणगाड्यांची कमतरता असूनही भारतीय लष्करानं शिवयुद्ध नीतीचा गनिमी कावा युद्धात वापरून या पाकिस्तानी राक्षशी रणगाड्यांचा फडशा पाडला. ९७ रणगाड्यांना ताब्यात घेऊन खेमकरण येथे पॅटन रणगाड्यांचं कब्रस्तान निर्माण केलं. लाहोरचा बचाव आपण करू शकत नाही या भीतीनं पाकिस्तानी सैन्याला आपला जीव वाचविण्यासाठी व लाहोरचा बचाव करण्याकरिता पूल उडवून देण्याचा निर्णय घ्यावा लागला. सियालकोट आघाडीवरही रणगाड्यांची धुमश्चक्री उडाली. पाक हवाई दलानं नागरी विमानावर हल्ला करून गुजरातचे मुख्यमंत्री बलवंतराय मेहता यांचा बळी घेतला. अमृतसरच्या बगलेतील चिराटा या नागरी भागावर बॉम्बवर्षाव करून तो भाग बेचिराख केला.

भारताच्या लष्करानं पाकिस्तानचा पराभव करताच युद्धसमाप्तीची भाषा सुरू झाली. १ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर १९६५ या कालावधीत हा युद्धसंग्राम घडला. अमेरिका, ब्रिटन आणि रशिया यांच्या मध्यस्थीनं

युद्धसमाप्तीची घोषणा झाली. युद्ध थांबलं त्या वेळी भारताच्या ताब्यात ७४० चौरस मैलांचा पाकिस्तानचा भूप्रदेश होता व पाकिस्तानच्या ताब्यात भारताचे २१० चौरस मैलांचे क्षेत्र होते. पाकिस्ताननं पराभवाला जबाबदार असणाऱ्या ११ जनरलच्या हुद्द्यावरील लष्करी अधिकाऱ्यांना व कर्नलच्या हुद्द्यावर असणाऱ्या ३० अधिकाऱ्यांना तडकाफडकी सेवानिवृत्त केलं. भारताच्या लष्करालाही मोठं नुकसान सोसावं लागलं. युद्धसमाप्ती पाकिस्तानच्या फायद्याची ठरली.

पाकिस्ताननं इचोगिल कालव्यावरील पूल जर उडवला नसता तर भारतीय सैन्य लाहोर काबीज करू शकत होतं. लाहोर परिसरात चिनाब नदी वाहते. यालगतच अटक आणि वजिराबाद शहरे आहेत. १७५८-५९ मध्ये छत्रपतींचे पेशवे रघुनाथराव यांनी मराठ्यांच्या फौजेचं नेतृत्व करून अटकेपार झेंडा फडकाविला होता. मराठ्यांचे वंशज साहेब भारताचे संरक्षणमंत्री म्हणून अटकेजवळ पोहोचले. महाराष्ट्रासाठी ही गौरवाची बाब आहे. 'मराठा गडी, यशाचा धनी' हे ब्रीद साहेबांनी खरं करून दाखविलं.

स्वातंत्र्यानंतर प्रथमच भारतानं युद्धात विजय मिळविला. भारतीय नागरिकांमध्ये वीरत्वाची भावना संचारली. प्रसिद्धीमाध्यमांनी साहेबांना डोक्यावर घेतलं. अनेक वर्तमानपत्रे संपादकीय लिहून साहेबांना 'रणधुरंधर' म्हणून गौरवू लागली. अनेक कवी साहेबांवर काव्य रचू लागले. पाक युद्धानं साहेबांची कीर्ती भारताच्या सीमा पार करून सातासमुद्रापलीकडे पोहोचविली. भारताचं भविष्य या रणवीराच्या हाती सुरक्षित आहे अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली. साहेब यशाच्या उत्तुंग शिखरावर पोह्होचले.

कविरत्न भगीरथ भास्कर (केथवा, जि. इटावा) लिहितात,

वही किल्ला, वही दिल्ली, वही वीर चौहान ।
वही चंद्रकवी आज भी, मारि शत्रू मैदान ।
यशवंतराव तूं सिंह है, हाथशक्ति तलवार ।
युगप्रहरी तू राष्ट्र का, करो देश उद्धार ।
वहाँ मान, गौरव, वही स्वर्ग का वास ।
वीरों का जाँ रक्त से, लिखा जाता इतिहास ।

मुजफ्फूरचे (बिहार) कवी मुखलाल सिंह लिहितात,

यह कौन? कहाँ का वीर? कौन रे गर्जन हमे सुनाया ।

शस्त्र नहीं कर मे फीर भी आतंक अजब है छाया ।
वंशवीर क्षत्रीय पुंगवका, वहि चतुर चौहान ।
एन मनमें है उमडू रहा रे देशभक्ति की शान ।

'नया जीवन' नावाच्या कवीनं तर शत्रूला इशाराच दिला. ते लिहितात,

ये मेनन नही है, ये चव्हाण है ।
यें स्पीकर नहीं है, ये एक आन है ।।
कोई जा के कह दो, ये अयुब से ।
अडेगा जो इससे, वो मिट जाएगा ।।

४ जानेवारी १९६६ ला अयुबखान आणि शास्त्रीजींना ताश्कंद येथे एकत्र आणण्यात कोसिजीनला यश आलं. युद्धसमाप्तीनंतर ताश्कंदला जाण्यापूर्वी साहेब व शास्त्रीजी एकत्र बसले. वाटाघाटीसंबंधी चर्चा केली. दोन राष्ट्रांत समेट घडवीत असताना राष्ट्रप्रमुखासोबत त्या देशाचे परराष्ट्रमंत्री असतात; परंतु शास्त्रीजींनी साहेबांना सोबत घेतलं. लष्करी कराराच्या संदर्भात साहेबांनी शास्त्रीजींना साहाय्य केलं. २५ फेब्रुवारी ६६ पूर्वी दोन्ही देशांनी आपापले सैन्य ५ ऑगस्ट १९६५ ला जिथे होतं त्या ठिकाणापर्यंत मागे घ्यावं, युद्धबंदीच्या अटींची दोन्ही देशांनी पूर्तता करावी तसेच राजनैतिक संबंध पूर्ववत करून सांस्कृतिक देवाणघेवाण सुरू करावी असं ठरलं.

लष्करी युद्धात भारत जिंकला, पण तहात हरला. शास्त्रीजींसारखा भारतमातेचा लाल आम्ही तहात गमावून बसलो. १० जानेवारी १९६६ ला करारावर सही केल्यानंतर मध्यरात्री काळानं या भारतरत्नावर झडप घालून त्यांना आपल्यातून हिरावून नेलं. ११ जानेवारीला शास्त्रीजींचं निधन झाल्याचं जाहीर झालं.

शास्त्रीजींच्या निधनानंतर हंगामी पंतप्रधान म्हणून गुलझारीलाल नंदा यांनी सूत्रं स्वीकारली. दोन वेळेस हंगामी पंतप्रधानपद भूषविल्यानंतर त्यांच्या अपेक्षा उंचावल्या. आपल्याशिवाय आता दुसरा कुणी पंतप्रधान होणार नाही, आपणच खरे पंतप्रधानपदाचे हक्कदार आहोत, असे त्यांना वाटू लागले. मागच्या वेळी पंतप्रधानपदानं हुलकावणी दिलेले मोरारजी देसाई या वेळी पंतप्रधानपदाचे प्रमुख दावेदार होते. कामराज यांनी वेगळीच चाल खेळली. इंदिरा गांधी, मोरारजी देसाई व साहेब यांच्यापैकी त्यांनी

इंदिरा गांधींना पसंती दिली. मोरारजी आपल्या ऐकण्याबाहेर चे आहेत. साहेबांची प्रतिमा कणखर बाण्याचा पुरुष म्हणून झालेली. बुद्धिचातुर्यात हा गडी भारी पडेल अशी समजूत कामराज यांची झाली. इंदिरा गांधींना आपण केव्हाही पंतप्रधानपदावरून दूर सारू शकतो ही भावना कामराज यांची होती. वसंतराव नाईक यांनी सारी शक्ती साहेबांच्या पाठीमागे उभी केली. महाराष्ट्रातील व देशातील तरुण खासदार साहेबांच्या पाठीमागे होते. इंदिरा गांधी उभ्या राहणार नसतील तर मी निवडणूक लढविण्याचा विचार करील, असं साहेबांनी पाठीराख्यांना सांगितलं. साहेबांनी इंदिराजींची भेट घेतली.

मनात कुठलाही आडपडदा न ठेवता इंदिराजींना विचारलं, "आपण जर पंतप्रधानपदासाठी इच्छुक असाल तर माझा पाठिंबा तुम्हाला; पण तुमची इच्छा नसेल तर मी पंतप्रधानपदासाठी निवडणूक लढवील. आपण मला पाठिंबा द्यावा."

यावर इंदिराजी चकार शब्दही बोलल्या नाहीत. साहेबांची भूमिका कळल्यानंतर इंदिराजींनी पंतप्रधानपदाची निवडणूक लढविण्याचं जाहीर केलं. मोरारजी आणि इंदिराजी यांच्यात नेतृत्वासाठी निवडणूक होणार हे निश्चित झालं. साहेबांनी आपली भूमिका मोरारजींना कळविली.

म्हणाले, "मी इंदिरा गांधींसोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे."

इंदिराजी निवडून आल्यावर त्यांनी मोरारजींना उपपंतप्रधानपद व अर्थ खातं दिलं. गृहमंत्रीपद गुलझारीलाल नंदांकडेच ठेवण्यात आलं. दोन वेळेस हंगामी पंतप्रधान राहूनही पंतप्रधानपदाची संधी आपल्याला दिली गेली नाही त्यामुळे नंदा दुखावले. त्यात उपपंतप्रधानपद काढून घेऊन केवळ गृहमंत्रीपद देऊन आपली बोळवण करण्यात आली अशी नंदांची भावना झाली.

साहेबांना भारतीय आत्मीयता काय असते याचं दर्शन संरक्षणमंत्रीपदाच्या कार्यकाळात झालं. भारतालाही साहेबांच्या रूपानं एका हिंमतवान, कर्तृत्ववान, राष्ट्रनिष्ठावान सुपुत्राची ओळख झाली. साहेब कोचीनला नाविक दलाची प्रात्यक्षिकं पाहण्याच्या कार्यक्रमास जात असताना वाटेत मुंबईत मुक्काम झाला. मुंबईत येताच त्यांची प्रकृती अचानक बिघडली. डॉक्टरच्या सल्ल्यानुसार साहेबांवर तत्काळ शस्त्रक्रिया करणं निकडीचं ठरलं. तज्ज्ञ डॉक्टरांच्या

निगराणीखाली साहेबांवर अल्सरसंबंधित शस्त्रक्रिया करण्यात आली. मुंबईत साहेब विश्रांतीसाठी थांबले असता मीही मुंबईला पोहोचले.

साहेबांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्याची बातमी वर्तमानपत्रांनी दिली. भारतभर या बातमीला प्रसिद्धी मिळाली. संगीताचार्य छोटेलाल 'मजहर' यांच्या वाचनात ही बातमी आली. साहेब या आजारातून बरे व्हावेत म्हणून त्यांनी देवाकडे याचना केली.

शुद्ध हृदय से आज आप से ।
विनती करता हूँ भगवान ॥
शीघ्र स्वस्थ हो चौहान ।
हो प्रसन्न यद दो वरदान ॥
यह है सच्चा भक्त देश का।
दीन जनों का प्यारा है ॥
ऐसे जन का संकट हरना ।
यह कर्तव्य तुम्हारा हैं॥

'रिव्हेरा' या निवासस्थानी साहेब विश्रांती घेत असतानाच महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे संभाव्य उमेदवार निवड करण्याचं काम साहेबांनी हातावेगळं केलं. दिल्लीहून साहेबांना संदेश मिळाला. संदेश इंदिराजींचा होता. गृहमंत्री म्हणून साहेबांची इंदिराजींनी निवड केली आहे.

७ नोव्हेंबर १९६६ रोजी गोवधबंदीसाठी देशातील हजारो साधू-संन्याशांनी संसदेवर हिंसक निदर्शने केली. या हिंसक साधूंना शंकराचार्यांचा पाठिंबा मिळाला. या निदर्शनकर्त्यांच्या उग्र अवतारानं दिल्लीचं दैनंदिन जीवन विस्कळीत करून टाकलं. दिल्लीवर या साधूंनी कब्जा मिळविला. गृहखातं या साधूंना आवर घालण्यात कमी पडू लागलं. हा प्रश्न गृहमंत्र्यांनी नीट हाताळला नाही, असा आरोप गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांच्यावर करण्यात संसद सदस्य सरसावले. संसद सदस्यांनी नंदांच्या राजीनाम्याची मागणी केली. संसदीय काँग्रेस पक्षाच्या बैठकीला इंदिराजी स्वत: हजर होत्या.

या बैठकीत पंतप्रधानांनी आपली बाजू घेतली नाही म्हणून नंदाजींनी रागाच्या भरात गृहमंत्रीपदाचा राजीनामा दिला. इंदिराजींनी तो स्वीकारला. गृहमंत्र्याचा कारभार स्वत:कडे घेतला. या साधूच्या आंदोलनापाठीमागे

नंदाजी असावेत असा संशय व्यक्त करण्यात येत आहे. ही घटना ७ नोव्हेंबरची आणि साहेबांना ८ नोव्हेंबरला मुंबईत इंदिराजींचा संदेश मिळाला.

गृहमंत्रीपदावर हक्क सांगणारे महाराष्ट्राचे स. का. पाटील बाशिंग बांधून साहेबांच्या विरोधात सरसावले. साहेबांना गृहमंत्रीपद दिल्यास हे महाशय राजीनाम्याची धमकी इंदिराजींना देऊ लागले. स. का. पाटील केंद्रात रेल्वेमंत्री म्हणून कारभार पाहत होते. कामराज यांना इंदिराजींनी स्पष्ट कल्पना दिली होती की, "मी गृहमंत्रीपदी यशवंतरावांची निवड केलेली आहे. हा माझा अधिकार मी वापरलेला आहे."

कामराज यांनी साहेबांच्या निवडीबद्दल खळखळ करून बघितली; पण इंदिराजींच्या आग्रहाखातर त्यांनी साहेबांच्या निवडीला मूकसंमती दिली.

१४ नोव्हेंबर १९६६ ला गृहमंत्रीपदाची सूत्रं साहेबांनी स्वीकारली. संरक्षणमंत्रीपदाची सूत्रं साहेबांनी नेहरूजींकडून स्वीकारली होती. आज इंदिराजींकडून गृहमंत्रीपदाची सूत्रं साहेब स्वीकारत आहेत. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांनी या निवडीचं स्वागत केलं. 'गृहमंत्रीपदासाठी योग्य अशा नेत्याची निवड' अशा आशयाच्या बातम्या वर्तमानपत्रात झळकल्या. संकटावर मात करणारा एकमेव नेता म्हणून साहेबांची देशाला ओळख झाली.

गृहकलहात भारतीय राजकारण पोखरलेलं. गोवधबंदी कायदा करावा याकरिता पुरीचे शंकराचार्य यांनी यमुनेच्या तीरावर उपोषण सुरू केलेलं. संत फत्तेसिंह व त्यांच्या भक्तांनी उपोषण सुरू करून अग्निकुंडात उडी टाकून आत्मदहनाची धमकी दिलेली. संयुक्त समाजवादी पक्षाच्या चिथावणीला बळी पडून विद्यार्थी देशभर धुमाकूळ घालीत आहेत. या ६६ च्या काळात देश संकटाच्या टोकावर उभा आहे. पक्षांतर्गत अविश्वासाचं वातावरण. या सर्व संकटांवर साहेबांना मात करावयाची आहे. भारतीय लोकशाहीचं कसोटीचं हे वर्ष.

भारतभरातील विद्यार्थ्यांनी दिल्लीत जमा होऊन मोर्चानं संसदेवर चालून जाण्याची १८ नोव्हेंबर ही तारीख निश्चित केली. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश विद्यार्थ्यांच्या आंदोलनात होरपळत आहे. पोलिसांच्या बळाच्या अतिरेकी बातम्या वर्तमानपत्रांतून झळकू लागल्या. दिल्लीत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून सरकारनं १४४ कलम

लागू केलं. सभा-मोर्चे यावर बंदी घातली. आंदोलनाला हिंसक वळण लागू नये याकरिता सावधगिरी बाळगून १७ नोव्हेंबरला डॉ. लोहियांना स्थानबद्ध करण्यात आलं. दिल्लीला येणाऱ्या सर्व रस्त्यांची पोलिसांनी कोंडी केली. दिल्लीच्या बाहेर विद्यार्थ्यांची नाकेबंदी केली. रेल्वेस्टेशन, बसस्थानकाला पोलिसांनी ताब्यात घेतलं. दिल्लीतील शाळा, महाविद्यालयांना सुटी जाहीर केली. दिल्लीतील विद्यापीठांना पोलिसांच्या छावणीचं रूप आलं. विद्यार्थ्यांना हाताशी धरून दिल्लीत अराजक निर्माण करण्याचे विरोधकांचे मनसुबे साहेबांनी पोलिसांच्या साहाय्यानं उधळून लावले.

कुठलंही वैचारिक आंदोलन बळाच्या जोरावर तात्पुरतं दाबता येतं; पण त्याचा कायमचा बंदोबस्त करण्याकरिता त्याच्या मुळाशी गेलं पाहिजे असं साहेबांचं मत होतं. त्याकरिता साहेबांनी एक समिती नेमली. या समितीचा अहवाल प्राप्त होताच साहेबांनी "देशाच्या विकासाच्या कार्यात विद्यार्थ्यांच्या विधायक शक्तीला सामावून घेणं, विद्यार्थीशक्तीला सत्तेत भाग घेण्यासाठी एखादी संघटना बांधून त्यांना मार्गदर्शन करणं, विद्यार्थी आणि राज्यकर्ते यांच्यात सतत संवाद राहील असं एखादं व्यासपीठ निर्माण करणं, तरुण पिढीमधील असंतोषाचं मुख्य कारण सामाजिक व आर्थिक धोरणात दडलेलं आहे. राष्ट्रीय संपत्तीचे फायदे तळागाळापर्यंत पोहोचायला पाहिजेत. हा विद्यार्थ्यांचा अंसतोषतेचा प्रश्न भारताचाच आहे असे नाही, तर तो जागतिक पातळीवर आहे. या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणं कुठल्याही देशाला परवडणारं नाही. तरुणवर्ग मध्यबिंदू ठरवून आम्ही सामाजिक व आर्थिक धोरण आखावयास पाहिजे" असं मतं मंत्रिमंडळाच्या बैठकीत व्यक्त केलं.

विद्यार्थ्यांचा प्रश्न हातावेगळा जरी झाला असला तरी त्याची आग धुमसत होती. हा निखारा केव्हा पेट घेईल याचा भरवसा नव्हता. इकडे गोवधबंदी कायद्याचं आंदोलन शंकराचार्यांच्या उपोषणामुळं उग्ररूप धारण करण्याच्या मार्गानं वाटचाल करीत आहे. साहेबांनी गृहखात्याच्या गुप्त विभागाची बैठक घेतली. या बैठकीत साहेबांनी शंकराचार्यांच्या उपोषणामागील शक्तीचा शोध घेण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले. त्यातून जी माहिती साहेबांसमोर आली ती धक्कादायक होती. देशाच्या धर्मनिरपेक्षतेच्या धोरणालाच शह देण्यास काही धार्मिक व जातीय शक्ती कार्यरत असल्याची माहिती

मिळाली. देशात जाती-जातीमध्ये वैमनस्य निर्माण करून राजकीय पोळी भाजण्याचा डाव धर्मवादी शक्तींनी आखला होता. उत्तर प्रदेशमध्ये या जातीवादी व धार्मिक शक्ती एका पक्षाच्या आश्रयाखाली संघटित झाल्या होत्या. शंकराचार्यांच्या उपोषणाच्या बाबतीत निर्णय घेताना देशात जातीय व धार्मिक असंतोष निर्माण होणार नाही याची काळजी साहेबांनी घेण्याचं ठरविलं. या आंदोलनाला देशातील काही मोठे भांडवलदार आर्थिक मदत करीत आहेत अशी माहितीही साहेबांना मिळाली.

अत्यंत गुप्त रीतीनं यमुनेच्या तीरावरील मंदिरातून शंकराचार्यांना हलविण्याचा निर्णय साहेबांनी घेतला. खुद्द शंकराचार्यांनादेखील या निर्णयाची कल्पना आली नाही. शंकराचार्यांना गुप्त रीतीनं विमानमार्गे पाँडिचेरीला पोहोचवण्यात आलं. तिथे काही दिवस ठेवल्यानंतर त्यांना पुरीला हलविण्यात आलं. तिथे गेल्यावर आपण आश्रमात राहून उपोषण चालूच ठेवणार असल्याचं शंकराचार्यांनी जाहीर केलं. आता हे उपोषण त्यांच्या आश्रमात चालू असल्यानं सरकारवरील जबाबदारी टळली. या प्रश्नाची कायदेशीररीत्या सोडवणूक करण्याच्या दृष्टीनं इंदिराजी आणि साहेबांनी बैठक घेऊन एक कमिशन नेमण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला मंत्रिमंडळासमोर ठेवून मंत्रिमंडळाची मान्यता घेतली व कमिशन नेमण्याचं जाहीर केलं.

संत फत्तेसिंग यांनी पंजाबी सुभ्यासाठी दोन वेळेस यापूर्वी शासनाला वेठीस धरलं होतं. केंद्रीय शासनानं लोकसभेचे सभापती सरदार हुकूमसिंग यांच्या नेतृत्वाखाली या प्रश्नाचा गुंता सोडविण्यासाठी एक समिती गठित केली. या समितीनं विनाविलंब आपला अहवाल शासनाला सादर केला. या समितीच्या शिफारशीनुसार सोपस्कार होऊन पंजाबी सुभा निर्माण करण्यात आला. संत फत्तेसिंग यांनी या निर्णयाबद्दल समाधानही व्यक्त केलं. पंजाबी सुभ्याच्या रचनेबद्दल मात्र त्यांचं समाधान झालं नव्हतं. राजकारणातून निवृत्ती स्वीकारून संपूर्ण वेळ धार्मिक कार्यास वाहून घेण्याचं त्यांनी जाहीर केलं.

संत फत्तेसिंग यांनी घेतलेला राजकारण संन्याशाचा निर्णय जास्त काळ टिकला नाही. अकाली दलाच्या दबावाला बळी पडून त्यांनी पुन्हा राजकारणात सक्रिय होण्याचं ठरविलं. १७ डिसेंबर १९६६ ला उपोषण सुरू केलं. २७ डिसेंबरला आत्मबलिदान करणार, अशी धमकी केंद्र

शासनाला दिली. अकाली दलाच्या ७ सदस्यांनी संत फत्तेसिंग यांना पाठिंबा म्हणून २४ तास अगोदर आत्मदहनाचा कार्यक्रम जाहीर केला. साथी जयप्रकाश नारायण यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांचा प्रयत्न सार्थकी लागला नाही.

संत फत्तेसिंग यांच्या साथीदारांच्या अग्निदहनाचा दिवस २६ डिसेंबर उगवला. या तारखेला ४ वाजता हे ७ साथीदार स्वत:ला अग्नीच्या हवाली करणार... संपूर्ण पंजाबमध्ये तणावाचं वातावरण निर्माण झालं. सुवर्णमंदिराच्या आवारात अग्निकुंडातील ज्वाला भडकलेल्या. अशा या गंभीर वातावरणात संत फत्तेसिंग यांच्या ७ शिलेदारांनी मंदिरातील तलावात स्नान केलं. अखेरच्या प्रार्थनेला सुरुवात झाली. घडीचा एक-एक ठोका पडत तसतसं मंदिरातलं वातावरण गंभीर स्वरूप घेऊ लागलं. घटनेची वेळ समीप येऊन ठेपलेली. घड्याळानं ३.३० चा ठोका दिला.

३.३०च्या ठोक्याला लोकसभेचे सभापती सरदार हुकूमसिंग ध्यानीमनी नसताना अकाली दलाच्या नेत्यांसोबत मंदिरात अवतरले. संत फत्तेसिंग यांच्याशी विचारविनिमय सुरू केला. इकडे अग्निकुंडातील ज्वालांनी उग्ररूप धारण केलेलं. घडीचा ठोका चारच्या आकड्यापर्यंत पोहोचण्याच्या काही क्षण अगोदर ७ शिलेदारांचं अग्निदहन आता होणार नाही, हे जाहीर झालं. मंदिराचा परिसर तणावमुक्त झाला. ५ वाजता अकाली दलाच्या नेत्यांनी जाहीर केलं की, सरदार हुकूमसिंग साहेबांकडून काही गोष्टींचा खुलासा व्हायचा आहे. तो झाला की आम्ही आमचा निर्णय जाहीर करू... थोड्याच वेळात अकाली दलानं त्यांचा निर्णय जनतेला सांगितला. संत फत्तेसिंग व त्यांच्या ७ साथीदारांनी आत्मदहनाचा निर्णय मागं घेतला.

अमृतसरला पोहोचण्यापूर्वी साहेब व सभापती हुकूमसिंग यांच्यात चर्चा झाली. आजचं हे संकट टळलं पाहिजे याबाबत दोघांचं एकमत झालं. हे संकट कसं टाळायचं हे हुकूमसिंग यांनी ठरवायचं. साहेबांनी मात्र कुठलंही आश्वासन न देता ही दु:खद घटना टळली पाहिजे असं मत व्यक्त केलं. सरदार हुकूमसिंग आणि संत फत्तेसिंग यांनी मुख्यमंत्री ग्यानी गुरुमुखसिंग मुसाफीर यांच्यासोबत चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी साहेबांशी दिल्लीला संपर्क साधला. या आत्मदहनाच्या परिस्थितीचा विचार करण्याकरिता केंद्र सरकारनं एक समिती नियुक्त करावी. याबाबतीत साहेबांनी ठाम असं

काही सांगितलं नाही. यावर विचार करता येईल असं मोघम मुख्यमंत्र्याला सांगितलं.

अवघ्या दहा मिनिटांत दिल्लीला बातमी येऊन धडकली. सरकारनं संत फत्तेसिंग यांची मागणी मान्य केली. संत फत्तेसिंग यांनी आत्मदहनाचा बेत रहित केला. ही पीटीआयची बातमी वाचून साहेब अस्वस्थ झाले. साहेबांनी लगेच मुख्यमंत्र्यांना फोन लावला. 'सत्य काय घडलं?' म्हणून विचारणा केली. मुख्यमंत्री मुसाफीर प्रत्यक्ष येऊन भेटतो व सविस्तर वृत्तांत तुम्हास देतो म्हणाले.

मुख्यमंत्री गुरुमुखसिंग मुसाफीर हे दिल्लीला साहेबांना भेटावयास आले.

साहेबांनी मुसाफीर यांना विचारलं, "मी फोनवर तुम्हाला काय सांगितलं ते तुम्हाला बरोबर ऐकू आलं ना?" साहेब.

"होय, मला स्पष्ट ऐकू आलं; पण त्यांना सांगताना मी वेगळंच सांगितलं." मुसाफीर.

"अहो, पण असं असत्य सांगून प्रकरण अधिक चिघळणार नाही का?" साहेब.

"आता तसं काहीही होणार नाही. आमच्यात जे राजकारण चालतं त्यात असंच वागावं लागतं." मुसाफीर.

"संत फत्तेसिंग पुन्हा काही कुरापत काढून प्रश्न निर्माण करणार नाहीत का?" साहेब.

"आता पुन्हा संत फत्तेसिंग या भानगडीत पडणार नाहीत याची मी तुम्हाला हमी देतो." मुसाफीर.

"आपण ज्या पदावर आहात त्या पदाकडून मला अशी अपेक्षा नव्हती." साहेब.

"पंजाब प्रांताला या संकटातून पार करण्याकरिता माझ्यासमोर याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. तुम्हाला माझं जे काही करायचं ते आता तुम्ही करू शकता." मुसाफीर.

या प्रकरणातून एकदाची पंजाबची आणि साहेबांची सुटका झाली.

नेहमी करते तसा यावर्षीचा साहेबांचा वाढदिवस मी साजरा केला. राजकीय धामधुमीतही साहेबांनी वेळ काढला. इंदिराजी '१, रेसकोर्स' या

बंगल्यावर येऊन साहेबांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा मोठ्या आत्मीयतेनं देऊन जात असत. या वाढदिवसाला मात्र त्यांनी त्यांच्या हस्ताक्षरात मला पत्र लिहून साहेबांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

त्या पत्रात इंदिराजी म्हणतात,

"प्रिय सौ. चव्हाण,

आपल्यातील जुन्या परंपरेनुसार पतीचा वाढदिवस पत्नी साजरा करीत असते म्हणून मी माझ्या शुभेच्छा तुम्हा उभयतांना पाठवीत आहे. आपणास दीर्घ आयुष्य व समृद्धी लाभो. मी पाठवीत असलेले पेढे आपल्या या प्रसंगाची गोडी वाढवतील." - इंदिरा गांधी.

१९६६ चा शेवटचा महिना डिसेंबर हा राजकीय ज्वालामुखीचा ठरला. देशाच्या राष्ट्रीय संघभावनेला तडा जातो की काय अशी चिंता राजकीय वर्तुळात वर्तविली जाऊ लागली. विद्यार्थ्यांचा दिल्लीतील मोर्चा, शंकराचार्यांचं उपोषण, संत फत्तेसिंग यांची आत्मदहनाची धमकी या सर्व संकटांवर मात करताना साहेबांनी आपली बुद्धी पणास लावली. राजकीय मुत्सद्देगिरीचा कळस गाठला. लोकसभेत आणि राज्यसभेत तर्कसंगतीचा वापर करून दोन्ही सभागृहांना जिंकलं. पक्ष आणि सरकारमध्ये संघर्षकालीन धुरंधर नेता म्हणून साहेबांची गणना होऊ लागली. देशातील जबाबदार वर्तमानपत्रांनी दखल घेऊन 'देश साहेबांकडून भविष्यकाळात मोठ्या अपेक्षा बाळगून आहे' अशा भावना व्यक्त केल्या.

फेब्रुवारी १९६७ ची भारताची चौथी सार्वत्रिक निवडणूक यशस्वीपणे पार पडली. साहेबांनी गृहखात्यामार्फत देशभर चोख बंदोबस्त ठेवला. मतदान यशस्वीरीत्या करून घेण्यात आलं. १९६७ च्या लोकसभेच्या निवडणुकीचे निकाल राजकीय वर्तुळाला धक्का देणारे लागले. कॉंग्रेस अध्यक्ष के. कामराज पराभूत झाले. कॉंग्रेसनं ७ राज्यांत आपलं स्थान टिकविलं. ९ राज्यांत विरोधी पक्ष विजयी झाले. हिंदुत्वानं डोकं वर काढलं. स्वतंत्र पक्ष, अकाली दल, द्रविड मुन्नेत्र कळघम यांनी प्रादेशिक पक्ष म्हणून आपली पकड घट्ट केली. डाव्या पक्षांनी पं. बंगाल, केरळमध्ये विरोधकांशी बोलणी करून सत्तास्थापनेचा दावा केला. विधानसभेत झालेली कॉंग्रेसची पीछेहाट पाहता लोकसभेत मात्र कॉंग्रेसनं ५२१ पैकी २७३ जागा जिंकून १३ जागांच्या फरकानं बहुमत मिळवलं. आंध्र प्रदेश, म्हैसूर

व महाराष्ट्रानं काँग्रेसची बूज राखली. साहेब दक्षिण सातारा मतदारसंघाचे प्रतिनिधी म्हणून निवडून आले. दिल्लीत दाखल झाले.

विविध विचारांच्या पक्षांची मोट बांधून विरोधी पक्षांनी ९ राज्यांत सत्ता काबीज केली. ही अभद्र युत्ती होती. यातून सत्तेच्या सिंहासनावर पोहोचण्याकरिता आमदारांमध्ये स्पर्धा सुरू झाली. राज्या-राज्यांत अस्थिरता निर्माण झाली. एकामागून एक राज्य सरकारे कोसळू लागली. या संपूर्ण घडामोडीत ५०० आमदारांनी पक्षांतर केलं. विरोधी पक्षासोबत काँग्रेस पक्षातील आमदारही सत्तेसाठी घरोबा करू लागले. या अस्थिरतेमुळं हिंदी भाषिक राज्यांत व पं. बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट सुरू करावी लागली. संपूर्ण उत्तर भारतात गृहमंत्री या नात्यानं साहेबांची राजवट सुरू झाली. सर्व प्रांतांना स्थिर सरकार मिळालं पाहिजे या विचारानं साहेबांना घेरलं. पक्षांतराचा कायदा करण्यासंबंधी विचार सुरू झाला. पक्षांतरावर बंदी घालणारा कायदा लोकसभेत मांडत असताना साहेबांनी पक्षांतर करणाऱ्या आमदारांना 'आयाराम-गयाराम' म्हणून संबोधलं. लोकसभेत साहेबांच्या या शब्दाला उचलून धरलं.

राज्यपालांच्या नेमणुका, घटनादुरुस्ती बिल, राज्यपाल सत्यानंद कानुनगो यांच्या नियुक्तीला बिहार सरकारचा विरोध इत्यादी प्रश्नांचा भडिमार विरोधक साहेबांवर करू लागले. लोकसभेत साहेब आणि विरोधक यांच्यात चकमकी झडू लागल्या. साहेब एकटे विरोधकांच्या आक्रमणाला नामोहरम करण्यात यशस्वी होऊ लागले. विरोधकांशी झुंज देऊनं साहेब देशापुढील प्रत्येक प्रश्न यशस्वीपणे सोडवू लागले. ६७-६८ची लोकसभेची अधिवेशनं 'चव्हाण अधिवेशनं' म्हणून गाजली. ६९ सालची नोंद जातीय दंगलीचं वर्ष म्हणून झाली. साहेबांनी अत्यंत खंबीरपणे रांचीतील दंगल, श्रीनगरमधील परमेश्वरीदेवी आणि प्रवीण अख्तर यांच्या विवाहाचा प्रश्न, महाराष्ट्रातील अहमदनगर, मालेगाव, सोलापूर येथील जातीय दंगली तसेच मिरत, करीमगाव, अलाहाबाद, केरळ आणि म्हैसूर येथील दंगलींना आवर घालून त्यात दोषींना कडक शिक्षा सुनावली. या दंगली गुंडप्रवृत्तीच्या लोकांनी जरी घडवून आणल्या असल्या तरी त्यांना राजकीय मंडळींचा आशीर्वाद होता असा साहेबांनी निष्कर्ष काढला.

जातीय दंगलींच्या धगधगणाऱ्या वणव्यातून देशाला साहेबांनी

सहीसलामत बाहेर काढलं. प. बंगाल नक्षलाईटच्या सशस्त्र बंडाच्या तडाख्यात होरपळत आहे. साहेबांनी नक्षलाईटच्या रूपानं देशावर आलेल्या संकटाचा मुकाबला करण्याचं धोरण आखलं.

"दबलेल्या वर्गाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रश्नाला सनदशीर मार्गाचा अवलंब करून सोडवणूक केली पाहिजे. कुणी या मार्गानं वंचितांच्या प्रश्नांची उकल करून त्यांना न्याय मिळवून देत असेल तर त्यांना दडपून टाकण्याचा प्रयत्न कुणी करणार नाही; पण दहशतीच्या मार्गानं जाऊन कोणी सशस्त्र क्रांतीची भाषा करीत असतील तर त्यांचा बंदोबस्त करण्यात येईल" अशी ठाम भूमिका साहेबांनी लोकसभेत मांडली.

या नक्षलवाद्यांनी चीनचं नेतृत्व मान्य केलेलं. गृहखात्यानं १७०० नक्षलवाद्यांना अटक केली. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ देणार नाही, असा शब्द साहेबांनी लोकसभेला दिलेला. नक्षलवाद मोडून काढण्याची कार्यवाही साहेबांनी युद्धपातळीवर सुरू केली. नक्षलवाद्यांनी साहेबांना लक्ष्य केलं. साहेबांवर टीकेची झोड उठविली. ६९ च्या फेब्रुवारीमध्ये रात्रीतून संपूर्ण दिल्ली तांबड्या रंगाच्या पोस्टर्सनी चिकटवून रंगविली. या पोस्टर्सवर दमदाटीची भाषा वापरलेली.

त्यात 'कनू सन्याल आणि जंगल संथाल यांची तत्काळ मुक्तता केली नाही तर साहेबांना जनरल ओडवायर यांच्या मार्गानं संपविणार' असा मजकूर या पोस्टरवर लिहिलेला... साहेबांनी लोकसभेतील विरोधी पक्षांच्या नेत्यांची बैठक बोलावली. नक्षलवादींच्या अमानवीय कार्यवाहीला आळा घालण्याच्या उपाययोजनेवर चर्चा करून निर्णय घेऊ हा बैठक बोलावण्यामागील साहेबांचा उद्देश होता. लोकसभेतील विरोधी पक्षाचा एकही नेता या बैठकीला हजर राहिला नाही. साहेबांनी एकट्यानं या संकटाचा सामना करण्याचं ठरविलं.

काँग्रेसमधील दोन गटांत सत्ता हस्तगत करण्याच्या प्रयत्नांत साहेबांची भूमिका पक्षाच्या भवितव्याच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाची आहे. सत्तेचा लगाम आपल्या हातात राहावा असं निजलिंगअप्पा, कामराज, मोरारजी, अतुल्य घोष, स. का. पाटील यांना वाटायचं. साहेब मात्र पक्षाच्या ध्येयधोरणाशी एकनिष्ठ म्हणून या मंडळींच्या संपर्कात होते. इंदिराजींना या मंडळींच्या बंधनात राहाणं अमान्य होतं. पक्षांतर्गत एकमेकांवर कुरघोडी

करण्याचा दुर्दैवी प्रसंग नियतीनं पक्षावर लादला. राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन ३ मे १९६९ ला अल्लाला प्यारे झाले. त्यांचं निधन झालं. उपराष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांचा हंगामी राष्ट्रपती म्हणून शपथविधी झाला.

साहेबांचं मन त्यांच्या विचारकार्याचा गाभा आहे. 'जिथे कुठे संगम होत असेल, मग तो दोन नद्यांचा संगम असेल, दोन विचारांचा संगम असेल... या संगमानं हजारोंचे जीवन सुसंपन्न होईल. माणसामाणसांमध्ये असा संगम निर्माण झाल्यास त्यांचं जीवन उजळून निघेल. राग, ईर्षा, स्पर्धा, शत्रुत्व, द्वेष या संगमात विरून जातील आणि जीवनात नितळ प्रवाह निर्माण होईल. हे प्रवाही जीवन राष्ट्रउभारणीचं कार्य करील.'

हा विचार साहेब सतत राजकारण करीत असताना करीत असत. मग यातून त्यांच्याविषयी अनेक गैरसमज निर्माण होत असत. राष्ट्रपतींच्या निवडणुकीत साहेबांनी जी भूमिका घेतली त्याबद्दल त्यांना अनेकांनी 'कुंपणावरचे' म्हणून संबोधिले; पण साहेबांची पक्षावरील निष्ठा कुणी लक्षात घेतली नाही. त्यांच्या मनातील संघर्षाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला नाही.

अप्पासाहेब लबडे या कवीची कविता एका कार्यक्रमात साहेबांनी वाचून दाखविली. कविता अशी -

"वाटांनी स्पर्धा खेळावी
वाटांनी वाटांना अडवू नये
थकल्या वाटेला आपल्यात सामावून घ्यावे
जुनीपानी भुतं मिरवणाऱ्या वाटांच्या वाटेस मुळी जाऊ नये
एकमेकांना घेऊन वाटांनी क्षितिज गिळून घ्यावे..."

माझ्या मनात राजकारणाविषयी जे काही होतं ते मी माझ्या परिभाषेत मांडण्याचा प्रयत्न करीत आलोय. या कवीनं माझ्या मनातील विचार कवितेच्या रूपानं मांडले आहेत. मी राजकारणात याला 'बेरजेचं राजकारण' म्हणतो. याच मार्गानं जाण्याचं साहेबांनी निश्चित केलं.

फरिदाबाद काँग्रेस अधिवेशनातील भाषण त्यांच्या मनातील राजकारणाचा आविष्कार मानावा लागेल.

साहेब या अधिवेशनात म्हणाले, "आपण फुटीरपणाच्या राजकारणाला थारा देता कामा नये. निंदानालस्ती या विचारापासून राजकारण दूर ठेवले

पाहिजे. वैयक्तिक टीकाटिप्पणी करण्याचं टाळावं. शीलावर शिंतोडे उडविण्याच्या विचाराला फारकत द्यावी. निश्चित असं धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्याचं वचन देऊन जनसेवा करूया. या मार्गानं गेल्यास देश व लोकशाही समाजवाद स्वत:चं संरक्षण स्वत: करू शकतील याबद्दल माझ्या मनात कुठलीच शंका नाही.''

काँग्रेसच्या मूलभूत ध्येयधोरणाच्या विचाराने भारावलेल्या कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण करावी. त्यांच्या माध्यमातून काँग्रेसची तत्त्वे व विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचले पाहिजेत असा विचार साहेब सतत करीत असत.

डॉ. झाकिर हुसेन यांच्या निधनानंतर इंदिराजी आणि साहेबांची भेट झाली. या भेटीत राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसंदर्भात दोघांत चर्चा झाली. या पदाकरिता योग्य असा उमेदवार निवडण्याबद्दल विचारविनिमय झाला. उमेदवार कोण असावा याबद्दल दोघांनीही मत बनवलेलं नव्हतं. १७ मे रोजी कामराज यांनी इंदिराजी व साहेब यांची भेट घेऊन संभाव्य राष्ट्रपतीच्या नावाची चाचपणी केली. या दोघांनीही ऐकून घेण्याची भूमिका पार पाडली. कामराज यांनी अध्यक्षपदासाठी नीलम संजीव रेड्डी यांची निवड योग्य राहील असं मत व्यक्त केलं. नीलम संजीव रेड्डी यांनी इंदिराजी व साहेबांची वेगवेगळी भेट घेतली. इंदिराजींच्या भेटीत रेड्डी यांनी उभं राहावं, असं मत इंदिराजींनी सूचित केल्याचं त्यांनीच साहेबांना सांगितलं.

इंदिराजींनी १८ जूनला सायंकाळी एक बैठक बोलावली. साहेबांना बैठकीला येण्याविषयीचं निमंत्रण इंदिराजींनी दिलं. ठरलेल्या वेळेला साहेब इंदिराजींच्या निवासस्थानी पोहोचले. तिथे जगजीवनराम, स्वर्णसिंग, फक्रुद्दीन अली अहमद हजर होते. नीलम संजीव रेड्डी यांची साहेबांसोबत झालेली चर्चा जगजीवनराम यांनी सांगितली. साहेब आणि कामराज यांच्यात झालेला संवाद जगजीवनराम यांनी इंदिराजींच्या कानावर घातला. इंदिराजींनी गिरी यांनाही अंधारात ठेवलं नाही. माझा कुणी उमेदवार नाही. विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्षाला चालेल असा उमेदवार निवडावा असं सर्वांचं म्हणणं होतं. इंदिराजी जपानच्या दौऱ्यावर गेल्या असताना इकडे सिंडिकेटवाल्यांनी नीलम संजीव रेड्डी यांना विरोधी पक्षाचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला.

उमेदवार निवडीच्या प्रक्रियेनं वेग घेतला. दिल्लीत सुरू झालेली उमेदवार निवडीची लढाई आता बंगलोरच्या काँग्रेस अधिवेशनात पोहोचली. १० जूनला काँग्रेस अधिवेशनाला सुरुवात झाली. काँग्रेस अध्यक्ष निजलिंगअप्पा हे नीलम संजीव रेड्डी यांची निवड निश्चित करण्याच्या प्रयत्नाला लागले. इंदिराजींनी पहिल्या दिवशी अधिवेशनाला हजेरी लावली नाही. त्यांनी पक्षाच्या राष्ट्रीय आर्थिक धोरणात बदल करण्यासंबंधात एक टिप्पणी फक्रुद्दीन आली अहमद यांच्यामार्फत चिटणीस सादिक अली यांच्या हवाली केली. या टिप्पणीतील धोरणाची चर्चा कार्यकारिणीत अग्रक्रमानं व्हावी असा आग्रह धरण्यात आला होता. काँग्रेस पक्षातील तरुण तुर्क म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खासदारांनी एक दहा कलमी आर्थिक धोरण ठरविणारा कार्यक्रम पक्षाकडे पाठवून पक्षाच्या आर्थिक धोरणात त्याचा समावेश करावा असा आग्रह धरला. यात चंद्रशेखर, मोहन धारिया, कृष्णकांत, आर. के. सिन्हा आणि चंद्रजित यादव यांचा समावेश होता. प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण, नफ्यामध्ये कामगारांचा हिस्सा, औद्योगिक परवाना पद्धती क्रांतिकारक बदल, निर्यातीचं राष्ट्रीयीकरण व जमीन सुधारणा इत्यादी.

इंदिराजींनी ही टिप्पणी अध्यक्षाच्या नावे न पाठविल्यानं त्या टिप्पणीचा विचार करता येणार नाही असा निर्णय निजलिंगअप्पांनी घेतला. काही सदस्यांनी ही टिप्पणी स्वीकारावी असा आग्रह धरला तर बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळं पक्षाला तडा जाईल असं मत स. का. पाटील यांनी व्यक्त केलं.

साहेबांनी इंदिराजी आणि सिंडिकेट यांच्यातील वादाला मुरड घालणारा एक मसुदा तयार केला. त्यात इंदिराजींनी दिलेल्या टिप्पणीतील मुद्द्याचा मोठ्या चातुर्यानं मसुद्यात समावेश केला व सिंडिकेटमधील व्यक्तींनी आर्थिक धोरणात जे दोष दाखवले होते त्याची दखल घेऊन एक स्वतंत्र असा आर्थिक धोरणाचा मसुदा तयार केला. इंदिराजी, मोरारजी व अन्य सदस्यांसोबत चर्चा केली. या मसुद्याला या मंडळींची संमती घेऊन तो कार्यकारिणीपुढे मांडला. ११ जुलैला या राष्ट्रीय आर्थिक धोरणाच्या मसुद्याला कार्यकारिणीनं मान्यता दिली. दोन्ही गटांचं समाधान झालं.

सायंकाळी कार्यकारिणीची बैठक संपवून साहेब बाहेर पडत असताना इंदिराजींनी साहेबांना विचारलं,

"जेवण झाल्यानंतर आपण भेटूया का?"

"काहीच हरकत नाही." साहेब.

ठरल्याप्रमाणे सायंकाळी साहेबांनी इंदिराजींची भेट घेतली. फक्रुद्दीन अली अहमद तिथं हजर होते. गिरी किंवा जगजीवनराम यांच्या उमेदवारीबद्दल त्यांनी साहेबांकडे विषय काढला. साहेबांनी कामराज आणि मोरारजी यांच्याशी चर्चा केल्यास बरे राहील, असं इंदिराजींना सुचवलं. १२ जुलैला पार्लमेंटरी बोर्डाची बैठक आयोजित केलेली. जगजीवनराम यांची उमेदवारी इंदिराजींनी निश्चित केलली आहे, असा निरोप जगजीवनराम यांच्यामार्फत नाईकांना मिळाला. नाईकांनी तो साहेबांना कळवावा असंही नाईकांना सांगण्यात आलं. नाईकांनी साहेबांच्या कानावर जगजीवनराम यांचा निरोप घातला. फक्रुद्दीन अली अहमद आणि साहेबांची भेट झाली. इंदिराजींची इच्छा त्यांनी साहेबांना सांगितली. साहेब, इंदिराजी आणि फक्रुद्दीन अली अहमद यांच्यात चर्चा झाली. फक्रुद्दीन अली अहमद यांनी जगजीवनराम यांचं नाव सुचवायचं आणि साहेबांनी त्या नावाला पाठिंबा द्यावयाचा.

साहेबांनी इंदिराजींना सांगितलं, "माझी कमिटमेंट झाली आहे."

"पॉलिटिक्स में बहुत सी कमिटमेंट करनी पडती है." इंदिराजी.

सेंट्रल पार्लमेंटरी बोर्डाची बैठक पुढे ढकलावी असा प्रयत्न इंदिराजींनी करावा म्हणजे आपणास जगजीवनराम यांच्या उमेदवारीबद्दल विचार करता येईल अशी साहेबांची इच्छा होती. फक्रुद्दीन अली अहमद यांनी इंदिराजींना सांगून बैठक पुढे लांबवावी असं साहेबांचं मत होतं. प्रत्यक्ष बैठक सुरू होण्यापूर्वी साहेब आणि इंदिराजी यांच्यात भेट झाली. साहेबांनी इंदिराजींकडं बैठक पुढं ढकलण्याचा आग्रह धरला. इकडे निजलिंगअप्पानं बैठकीला सुरुवात केली. इंदिराजींना बैठक पुढं ढकलण्याची संधीच निजलिंगअप्पानं दिली नाही. नीलम संजीव रेड्डी आणि जगजीवनराम यांची नावं पुढं आली. मतदान झालं. बहुमतानं नीलम संजीव रेड्डी यांची पार्लमेंटरी बोर्डानं निवड केली. या बैठकीतच इंदिराजींनी या निवडीबद्दल गंभीर प्रतिक्रिया उमटेल, असा गर्भित इशारा दिला. साहेबांनी नीलम संजीव रेड्डी यांच्या बाजूनं मतदान केलं.

साहेबांचं राजकारण नैतिकतेवर आधारलेलं. नीलम संजीव रेड्डी यांना शब्द दिल्यामुळं त्यांनी तो पाळला. जगजीवनराम यांचं नाव निश्चित

करताना साहेबांना इंदिराजींनी विश्वासात घेतलं नव्हतं. त्यांनी सुचविलेल्या नावाला पाठिंबा देण्याची नैतिक जबाबदारी साहेबांवर नव्हती. याबाबतीत साहेबांची भूमिका नैतिकदृष्ट्या रास्त होती. भारताच्या लोकशाही राजकारणात कौटिल्याच्या नीतीचा अवलंब करण्यास इंदिराजींनी सुरुवात केली. नैतिकता इंदिराजींना राजकारणात मुळीच अभिप्रेत नव्हती. या घटनेनंतर साहेब आणि इंदिराजी यांच्यात दुरावा निर्माण झाला. इंदिराजींना संशयानं घेरलं. दिल्लीत पोहोचल्यानंतर त्यांनी गिरी यांच्याशी चर्चा केली. १६ जुलैला मोरारजींना अर्थमंत्र्याच्या जबाबदारीतून इंदिराजींनी मुक्त केलं. त्यांच्याकडे उपपंतप्रधानपद ठेवण्यांत आलं. त्यांना दुसरं कुठलं खातं हवं असल्यास त्यांनी ते घ्यावं, असं सुचविण्यात आलं. कौटिल्य नीतीचा पहिला धक्का इंदिराजींनी मोरारजींना दिला. दिल्लीत तर अशी हवा होती की, साहेबांना इंदिराजी मंत्रीपदावरून हटविणार... लोकसभेत काँग्रेसला काठावर बहुमत होतं. साहेबांना जर हात लावला तर ४५ खासदार आपल्यापासून दूर जातील आणि सरकार कोसळेल. तूर्त तरी साहेबांना दुखवू नये असं इंदिराजींनी ठरविलं.

साहेबांची अवस्था दोलायमान झाली. वैचारिकदृष्ट्या इंदिराजी जवळच्या तर सेंट्रल पार्लमेंटरी बोर्डाचा निर्णय पक्षातील नेत्यांना बंधनकारक. इंदिराजी दुखावलेल्या असतानाही साहेबांनी काँग्रेस पक्षाच्या भवितव्याचा विचार करून इंदिराजींची भेट घेतली. मोरारजी यांच्याशी एकदा चर्चा करावी असं इंदिराजींना सुचविलं. इंदिराजींनी अर्थ खातं सोडून मी मोरारजींशी चर्चा करावयास तयार आहे. बंगलोर काँग्रेस अधिवेशनातील आर्थिक धोरण मला राबवायचं आहे. त्याकरिता अर्थ खातं मी माझ्याकडं घेतलेलं आहे. दोन्ही गटांत समझोता घडवून आणण्याच्या प्रयत्नात असताना साहेबांबद्दल राजकीय वर्तुळात अनेक गैरसमज पसरले.

१८ जुलैला इंदिराजींनी साहेबांना भेटीस बोलावलं. बंगलोर काँग्रेस अधिवेशनातील आर्थिक धोरणाची अंमलबजावणी करावयाची आहे. पहिलं पाऊल म्हणून आपण १४ बँकांचं राष्ट्रीयीकरण करू. माझ्या मनाची तयारी झाली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक एक तासाच्या आता बोलावली आहे. आपणास बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या बाबतीत जो वटहुकूम काढायचा आहे त्याचा मसुदा तयार आहे. त्या वटहुकुमाचा कच्चा ड्राफ्ट

इंदिराजींनी साहेबांच्या हाती दिला. साहेबांनी वटहुकुमाचा ड्राफ्ट नजरेखालून घातला. इंदिराजींसोबत त्या कच्च्या मसुद्यावर साहेबांनी चर्चा केली. केंद्रीय मंत्रिमंडळासमोर इंदिराजींनी या वटहुकुमाचा मसुदा सादर केला. साहेबांनी बँक राष्ट्रीयीकरणाच्या वटहुकुमाला मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाठिंबा दिला. ही बैठक संपल्यानंतर लगेच काँग्रेस अध्यक्ष निजलिंगअप्पानं काँग्रेस पक्षाच्या नेत्यांची बैठक बोलावली. साहेब मंत्रिमंडळाची बैठक संपवून पक्षाध्यक्षांनी बोलावलेल्या बैठकीस पोहोचले. या बैठकीत साहेबांनी बँकांच्या राष्ट्रीयीकरणास मंत्रिमंडळानं मंजुरी दिल्याचं सांगितलं. 'माझा बँक राष्ट्रीयीकरणास पाठिंबा आहे. मोरारजी यांना मंत्रिमंडळातून काढल्याबद्दल मला वाईट वाटतंय. या पेचातून पक्ष कसा दुभंगणार नाही यासाठी मी प्रयत्नशील आहे. याकरिता मला मंत्रिमंडळातून बाहेर पडता येणार नाही.' या बैठकीत साहेबांनी आपली भूमिका स्पष्ट केली. आजच्याच रात्री बँकांचं राष्ट्रीयीकरण झाल्याचा वटहुकूम इंदिराजींनी जाहीर केला.

२२ जुलैला काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाची बैठक झाली. या बैठकीत इंदिराजींनी सर्व सदस्यांसमक्ष नीलम संजीव रेड्डी यांच्या उमेदवारी अर्जावर सही केली. निजलिंगअप्पा काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचे सदस्य नसताना त्यांना या बैठकीस निमंत्रित करण्यात यावं. इंदिराजी आणि निजलिंगअप्पा यांनी संयुक्तरीत्या सभासदांना नीलम संजीव रेड्डी यांना मतदान करण्यासंबंधी आवाहन करावं असं ठरलं. दोन्ही गटांतील नेत्यांनी प्रयत्न करून संयुक्त बैठक बोलावण्यासाठी धावपळ करावी लागली. यापुढे सर्वकाही सुरळीत पार पडेल असं साहेबांना वाटलं; पण हा निर्णय क्षणभंगुर ठरला. मोरारजी यांच्या चाहत्या तारकेश्वरी सिन्हा यांनी मुंबईच्या 'करंट' साप्ताहिकात इंदिराजींवर टीकात्मक लेख लिहिला. निजलिंगअप्पा यांनी अटलबिहारी वाजपेयी व एम. आर. मसानी यांची घेतलेली भेट या सर्व घटनांचा अर्थ इंदिराजींनी वेगळा घेतला. काँग्रेस कार्यालयातील विश्वासू सहकाऱ्यांनी इंदिराजींना काँग्रेस पक्षाचा उमेदवार पडल्यास पक्षात फूट अटळ आहे. कदाचित सरकार पाडण्याचेही प्रयत्न होणार, अशी माहिती दिली. इंदिराजींनी ११ ऑगस्टला सिद्धार्थ शंकर रे, फक्रुद्दीन अली अहमद यांनी निजलिंगअप्पांना पत्र देऊन मतदानासाठी सर्वांना स्वातंत्र्य असावं अशी मागणी करावी, असं ठरविलं. ठरल्याप्रमाणं या दोघांनी अध्यक्षाला पत्र दिलं. जे पक्ष

पंतप्रधानांना हटविण्याची भाषा करतात त्यांना काँग्रेस अध्यक्ष कसे भेटतात अशी विचारणा या पत्रात शेवटी करण्यात आली.

१२ ऑगस्टला कामराज आणि साहेबांची भेट झाली. कामराज यांनी साहेबांना नीलम संजीव रेड्डी यांच्या बाजूनं मतदान करावं अशी विनंती केली. साहेबांनी नीलम संजीव रेड्डी यांना मतदान करण्याची हमी कामराज यांना दिली. त्याचबरोबर पक्षातील दुफळीला वाव न मिळता पक्ष एकसंध कसा राहील याची काळजी घ्यावी, असंही साहेबांनी कामराज यांना सुचविलं. याच दिवशी साहेबांनी इंदिराजींची भेट घेतली. मी नीलम संजीव रेड्डींसोबत राहणार यांची कल्पना दिली. पक्ष वाचविण्याच्या दृष्टीनं काही तडजोडीचा मार्ग शोधावा असं इंदिराजींना सुचविलं.

१६ ऑगस्टला राष्ट्रपतीपदासाठी मतदान झालं. सिंडिकेटची मंडळी आत्मविश्वासानं आपला विजय होणार म्हणून आनंद व्यक्त करू लागली. जगजीवनराम, फक्रुद्दीन अली अहमद आणि इंदिराजी यांच्यावर पक्षशिस्तीचा भंग केल्याबद्दल कारवाई करावी असा दबाव निजलिंगअप्पांवर आणण्यात मोरारजी, स. का. पाटील, अतुल्य घोष हे आघाडीवर होते. २० ऑगस्टला निवडणुकीचा निकाल लागला. व्ही. व्ही. गिरी कमी फरकाच्या मतांनी विजयी झाले.

काँग्रेस कार्यकारिणीची २५ ऑगस्टची बैठक वादळी होणार असं भाकीत करण्यात येत होतं. दोन्ही गट तयारीनिशी बैठकीला हजर झालेले. काँग्रेस अध्यक्ष निजलिंगअप्पा यांचं भाषण संपताच साहेबांनी सभासदांना उद्देशून भाषणास सुरुवात केली.

म्हणाले, "आपण एका मोठ्या संकटातून बाहेर पडलेलो आहोत. आतातरी पक्ष एकसंध कसा राहील याविषयी विचार करूया. काँग्रेस पक्षाच्या इतिहासामध्ये जेव्हा जेव्हा काँग्रेस पक्षावर संकटं आली त्या त्या वेळी पक्षाने एकसंध राहून संकटांवर मात केलेली आहे. पक्ष एकसंध ठेवणे ही काळाजी गरज आहे. पक्ष एकसंध राहिला पाहिजे या विचारांच्या तयारीत असलेल्यांना साहेबांनी सोबत घेऊन एक ठराव तयार केला व तो कार्यकारिणीसमोर वाचून दाखविला. स. का. पाटील 'ठराव ठीक आहे' म्हणाले; पण अध्यक्षावर जे दोषारोप करण्यात आले त्याचे काय? असा प्रश्न निर्माण केला. तडजोडीवादी मंडळींनी त्यावरही मार्ग काढला.

साहेबांच्या या ठरावाचं इंदिराजींनी स्वागत केलं व म्हणाल्या, "काँग्रेस पक्ष आपापसांत तडजोड करण्यास समर्थ आहे. जनतेच्या पक्षाकडून ज्या अपेक्षा आहेत त्या पक्षकार्यात दिसून येतील. आता सर्व संपलं."

पक्षात झालेल्या तडजोडींबद्दल साहेब समाधानी होते.

पक्षात केलेल्या तडजोडीचं समाधान साहेबांना जास्त काळ भोगता आलं नाही. सिंडिकेटमधील आक्रमकता व प्रांता-प्रांतातील नेत्यांमधील बेबनाव उफाळून आला. कामराज यांनी सरकार आणि काँग्रेस पक्षाच्या भवितव्याबद्दल साहेबांसोबत चर्चा केली. यापुढे सिंडिकेट परत एखादा वाद निर्माण करून पक्षात तेढ निर्माण करीत असेल तर मी त्याच्याशी सहमत राहणार नाही, असं स्पष्ट मत साहेबांनी कामराज यांच्याजवळ व्यक्त केलं. सिंडिकेटमधील मंडळी सत्ता म्हणजे सर्वकाही मानीत असेल तर पक्षाच्या ध्येयधोरण आणि सामाजिक बदलाचं काय? याचा विचार ही मंडळी करणार की नाही? त्यामुळं साहेबांचा विश्वास या मंडळींवर राहिला नव्हता.

इंदिराजींचा तामिळनाडू दौरा. या दौऱ्यात कामराज आणि सी. सुब्रमण्यम यांच्यातील बेबनाव उघड झाला. या दौऱ्याच्या वेळी सी. सुब्रमण्यम यांनी प्रदेश अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. इंदिराजींचा दौरा अयशस्वी करण्याचा प्रयत्न कामराज यानी केला, असा आरोप कामराज यांच्यावर होऊ लागला. इकडे उत्तर प्रदेशात मुख्यमंत्री सी. बी. गुप्ता आणि कमलापती त्रिपाठी यांच्यातील संघर्ष विकोपाला पोहोचला. सी. सुब्रमण्यम यांनी प्रदेश काँग्रेसचा राजीनामा दिल्यानंतर त्यांना काँग्रेस कार्यकारिणीतून कमी करण्याच्या हालचाली सिंडिकेटमध्ये सुरू झाल्या. सिंडिकेटच्या या निर्णयाच्या विरोधात इदिराजींनी हालचाली सुरू केल्या. स्वर्णसिंग, जगजीवनराम, फक्रुद्दीन अली अहमद हे विश्वासू सहकारी इंदिराजींसोबत होतेच.

९ ऑक्टोबरला इंदिराजी, साहेब, जगजीवनराम, फक्रुद्दीन अली अहमद, स्वर्णसिंग यांच्या स्वाक्षरीचं एक खरमरीत पत्र निजलिंगअप्पांना देण्यात आलं. सी. सुब्रमण्यम यांना कार्यकारिणीतून काढण्याचा एकतर्फी निर्णय व कमलापती त्रिपाठी आणि अन्य नेत्यांना त्यांच्या पदावरून हटविण्याचा घेण्यात आलेला निर्णय हे दोन्ही निर्णय कार्यकारिणीच्या ऐक्याच्या निर्णयाला बाधा आणणारे निर्णय आहेत. याकरिता १५ ऑक्टोबरला

कार्यकारिणीची बैठक घ्यावी व लगेच १५ नोव्हेंबरपूर्वी कॉंग्रेसचं खास अधिवेशन घेण्यात यावं.

१ नोव्हेंबरला निजलिंगअप्पांनी कॉंग्रेस कार्यकारिणीची बैठक बोलावली. कामराज यांच्या सल्ल्यानुसार सी. सुब्रमण्यम, साहेब, जगजीवनराम, फक्रुद्दीन अली अहमद यांना पक्षातून काढून टाकावं असं सिंडिकेटच्या मंडळींनी ठरविलं. इंदिराजींना पक्षात बेदिली माजवीत आहात याबद्दल एक आरोपपत्र देण्यात आलं. शंकरदयाळ शर्मा, फक्रुद्दीन अली अहमद आणि सी. सुब्रमण्यम यांना कार्यकारिणीतून काढल्याचा फतवा काढण्यात आला. अशा या बेजबाबदार कार्यवाहीमुळं इंदिराजी आणि साहेबांनी व त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी १ नोव्हेंबरच्या निजलिंगअप्पांनी बोलावलेल्या बैठकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. त्याच दिवशी म्हणजे १ नोव्हेंबरला इंदिराजींच्या निवासस्थानी बैठक घेऊन व अ. भा. कॉंग्रेसची बैठक बोलावून नवीन अध्यक्ष निवडण्याचा निर्णय घेण्यात आला. निजलिंगअप्पांच्या अध्यक्षतेखाली ठरलेली कार्यकारिणीची बैठक झाली. कॉंग्रेस पक्षाच्या दोन कार्यकारिणी अस्तित्वात येऊन पक्षाचे दोन तुकडे झाले. ही घटना १ नोव्हेंबर १९६९ ची.

कार्यकारिणीची दोन छकलं पडल्यानंतरही काही प्रांतांच्या मुख्यमंत्र्यांनी साहेबांची भेट घेतली. साहेबांनी आपल्या प्रामाणिक व चांगल्या सदिच्छेचा उपयोग करून दोन्ही गटांत समेट घडवून आणावा, पक्षाला या संकटातून वाचवावं अशी विनंती केली. साहेबांनी मुख्यमंत्र्यांच्या विनंतीचा मान ठेवून प्रयत्न करून बघितला. शंकरदयाळ शर्मा वगळता फक्रुद्दीन अली अहमद व सी. सुब्रमण्यम यांच्यावरील कार्यवाही मागे घेण्यास सिंडिकेट तयार झाली. शंकरदयाळ शर्मा यांच्यावरील कार्यवाही मागे घ्यावयाची असेल तर मोरारजी देसाई व अन्य मंत्र्यांना परत इंदिराजींनी मंत्रिमंडळात घ्यावं, अशी अट निजलिंगअप्पांनी घातली. निजलिंगअप्पा आणि इंदिराजी यांच्यात खलित्याची लढाई सुरू झाली. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या. निजलिंगअप्पा आणि इंदिराजींमध्ये वैयक्तिक कडवटपणा निर्माण झाला. निजलिंगअप्पांनी बोलावलेली १२ नोव्हेंबरची कार्यकारिणीची बैठक चालू असताना याचवेळी इंदिराजींच्या निवासस्थानी इंदिराजींनी बैठक बोलावली होती.

शेवटचा प्रयत्न म्हणून साहेब व वसंतराव नाईक यांनी इंदिराजींच्या घरून स. का. पाटील यांच्याशी संपर्क साधला. स. का. पाटील निजलिंगअप्पांनी बोलावलेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत व्यस्त होते. नाईकांनी जो निरोप स. का. पाटलांना दिला त्यावर स. का. पाटील यांनी त्यांच्या सहकाऱ्यांशी चर्चा केली व नाईकांना उलट निरोप दिला - 'पंतप्रधानाच्या गटाशी सहमत होण्याची वेळ निघून गेली आहे.' १२ नोव्हेंबर १९६९ रोजी दुपारी १ वाजता इंदिराजींना निजलिंगअप्पांच्या काँग्रेस कार्यकारिणीनं काँग्रेस पक्षातून काढून टाकण्याचा निर्णय घेतला. गांधी-नेहरूंची काँग्रेस दुभंगली. अखिल भारतीय काँग्रेसपासून प्रदेश काँग्रेस ते जिल्हा काँग्रेसपर्यंत काँग्रेसच्या चिरफाळ्या, ढिलप्या, किलच्या उडाल्या.

१३ नोव्हेंबरला इंदिराजींनी संसदीय काँग्रेस पक्षाची बैठक बोलावली. या बैठकीत साहेबांनी इंदिराजींच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करणारा ठराव मांडला. इंदिराजींना काँग्रेसमधून काढून टाकण्याच्या कृतीची 'बेइमानीचा निर्णय' म्हणून संभावना केली. इंदिराजींच्या नेतृत्वावर आमचा विश्वास असून आमचीच काँग्रेस खरी काँग्रेस असल्याची घोषणा केली. उपस्थितांनी साहेबांच्या या घोषणेचं स्वागत केलं. आपल्याला आलेल्या संकटांशी झुंज द्यावयाची आहे. पक्षांनी जो पुरोगामी व समाजवादी कार्यक्रम दिला आहे त्याच्याशी आणि नेत्याशी प्रामाणिक राहून कार्य करायचे आहे.

१६ नोव्हेंबर रोजी लोकसभेत निजलिंगअप्पांच्या ६० खासदारांनी वेगळा गट स्थापन करून डॉ. रामसुभगसिंग यांना आपला संसदीय नेता म्हणून निवडलं. त्यांनी विरोधी बाकड्यावर बसून विरोधकांच्या बाजूनं मतदान केलं. २२ नोव्हेंबरला अ. भा. काँग्रेसची खास बैठक इंदिराजींनी बोलावली. निवडून आलेल्या ७०५ सदस्यांपैकी ४०० आणि नियुक्त केलेल्या ९४ पैकी ५२ सदस्यांनी हजर राहून इंदिराजींना पाठिंबा दर्शविला. याच बैठकीत निजलिंगअप्पांना काँग्रेस अध्यक्षपदावरून हटवून त्यांच्या जागी सी. सुब्रमण्यम यांची हंगामी अध्यक्ष म्हणून निवड केली. पक्ष आणि संसदीय काँग्रेस पक्षात इंदिराजींनी बहुमत प्राप्त केलं.

निजलिंगअप्पा यांच्या पाठीशी राहिलेल्या काँग्रेसजनांमध्ये कामराज वगळता सर्व नेत्यांचा जनाधार तुटलेला होता. गुजरात आणि कर्नाटक सोडता कुठल्याही प्रांताचा एकमुखी पाठिंबा त्यांना मिळाला नाही. यादरम्यान

देशात ज्या काही पोटनिवडणुका झाल्या त्यात इंदिराजींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसला विजय मिळाला. जनतेच्या मनाचा कल यावरून दिसून आला.

यापुढील राजकारणात पक्षाला दुय्यम स्थान मिळून व्यक्तिस्तोमाचा प्रभाव वाढीस लागला. राजकारणात उपद्रवमूल्य असणाऱ्यांचा चंचूप्रवेश झाला. लोकशाहीच्या आणि सामान्य जनतेच्या दृष्टीनं हा बदल हानीकारक ठरणार. पक्ष आणि जनता यात दरी निर्माण झाल्याचं प्रतिबिंब ६७ च्या निवडणुकीत काँग्रेस श्रेष्ठीला पाहायला मिळालं. सामान्य जनतेच्या जीवनाशी संबंधित पुरोगामी व आर्थिक निर्णय घेऊन त्याची वचनपूर्ती करण्याचा आग्रह धरणारा काँग्रेसमधील एक गट आक्रमक झाला. दिल्लीतील काँग्रेस अधिवेशनात या गटानं आवाज उठविला. या अधिवेशनात १० कलमी आर्थिक कार्यक्रमाचा जन्म झाला. या १० कलमी कार्यक्रमाचं पुरोगामी कार्यक्रम म्हणून काँग्रेस पक्षात स्वागत झालं. भारतीय घटनेनं सर्व भारतीय नागरिक समान आहेत हे तत्त्व मान्य केलेलं. भारतातील राजेरजवाड्यांनी आपली संस्थानं भारतात विलीन केली होती. त्यांना काही खास अधिकार व सवलती देण्यात आलेल्या होत्या. हे अधिकार व सवलती काढून घ्याव्यात असा ठराव काँग्रेस पक्षानं केला. महाराष्ट्राचे खासदार मोहन धारिया यानी संस्थानिकांचे तनखे बंद करावेत, अशी एक दुरुस्ती सुचविली. १७ विरुद्ध ४ मतांनी ही दुरुस्ती स्वीकारण्यात आली. यास स. का. पाटील, मोरारजी देसाई यांनी कडाडून विरोध केला.

जनसंघाचे बलराज मधोक या विधेयकाच्या बाबतीत इंदिराजींवर हल्ला करताना म्हणाले, "नेहरूजींची कन्या याव्यतिरिक्त कुठलीही योग्यता इंदिराजींकडे नाही. संस्थानिकांचे वारसा हक्क, तनखे, सवलती काढून घेण्याचा प्रयत्न त्या करीत आहेत."

इंदिराजी आपल्यावर होत असलेली टीका शांतपणे ऐकून घेत आहेत. सत्ताधारी पक्षाकडून मधोक यांना प्रत्युत्तर देणं आवश्यक झालं.

मधोक यांना उत्तर देण्यासाठी साहेब उठले आणि म्हणाले, "इंदिराजींनी या सभागृहाचं नेतृत्व लोकशाही मार्गानं मिळवलेलं आहे, वारसा हक्कानं ते त्यांनी मिळवलेलं नाही. देशातल्या नागरिकांनी त्यांना ते दिलेलं आहे."

राज्यसभेच्या चर्चेत सहभागी विरोधकांची बोलतीच त्यांनी बंद केली.

राज्यसभेत तनखे बंदवर बोलताना साहेब म्हणाले, "कायद्यासमोर

सर्व नागरिक समान आहेत. १५० रु. पगार मिळविणारा एक कारकून आणि लक्षावधी करमुक्त रुपये मिळविणारे संस्थानिक या दोघांना समान मानावयाचे का?''

विलीन होताना संस्थानिकांना काही वचनं देण्यात आली होती त्याचं काय? असा प्रश्न विरोधकांनी विचारला असता या प्रश्नाला उत्तर देताना "लोकांना काम, शिक्षण, आरोग्य आणि चांगलं राहणीमान देण्याचं वचन दिलेलं आहे. या वचनाचं काय करावयाचं आहे? सरकारने जो निर्णय घेतलेला आहे तो योग्य आणि सामाजिक न्यायाला धरून आहे'' असे ते म्हणाले.

१८ मे १९७० ला हे विधेयक साहेबांनी लोकसभेला सादर केलं. लोकसभेनं या विधेयकावर ३३९ विरुद्ध १५४ मतांनी शिक्कामोर्तब केलं. राज्यसभेत मात्र हे विधेयक दोन तृतीयांश मतं मिळवू शकलं नाही. राष्ट्रपतींनी आपल्या अधिकाराचा वापर करून व एक आध्यादेश काढून संस्थानिकांचे तनखे, सवलती, अधिकार बंद केले. संस्थानिक सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रपतींच्या अध्यादेशाला मान्यता दिली नाही. शेवटी जनतेच्या दरबारात न्याय मागण्याचं पक्षानं ठरविलं.

राष्ट्रपतींची निवडणूक पार पडल्यानंतर राजधानीत अफवांचं पीक फोफावलं. साहेबांना सत्तेवरून पायउतार व्हावं लागणार अशी भाकितं वर्तविण्यात येऊ लागली. बँकांचे राष्ट्रीयीकरण, राजेरजवाड्यांचे तनखे बंदी विधेयक साहेबांनी गृहमंत्री म्हणून लोकसभेत मांडून पास करून घेतले. इंदिराजींनी १ वर्ष अर्थमंत्रीपद आपल्याकडे ठेवल्यानंतर अर्थ खात्याला गती देण्याबद्दल त्यांच्या मनात विचार घोळत होता. इंदिराजींनी आपल्या मंत्रिमंडळात बदल करण्याचा निर्णय घेतला. साहेबांकडील गृह खातं आपल्याकडे घेतलं व अर्थ खातं साहेबांकडं सोपविलं. हा बदल इंदिराजींनी २६ जून १९७० ला केला. साहेबांसोबत इतर मंत्र्यांच्या खात्यांमध्येही बदल करण्यात आला.

महागाईचा ब्रह्मराक्षस देशापुढे तोंड वासून उभा होता. समाजवादी अर्थकारणाचा धुरळा खाली बसण्यास सुरुवात झाली होती. 'गरिबी हटाव'चा नारा देण्यात आला होता. सामान्य माणसांच्या आशा उंचावल्या होत्या. अशा बिकट परिस्थितीत साहेबांना अर्थमंत्रीपद स्वीकारावं लागलं. साहेबांनी

अर्थकारणाचा विचार करताना जास्तीत जास्त लोकांना रोजगार मिळण्याची तरतूद, छोट्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणं, ग्रामीण भागातील अकुशल कामगारांना त्यांच्या पात्रतेनुसार उद्योगक्षेत्रात सामावून घेणं, बेकारांची संख्या कमी करण्याकरिता शिक्षणाची पुनर्मांडणी करणं इत्यादी बाबींचा विचार साहेबांनी अर्थकारण करताना केला.

शहरी भागात श्रीमंतांची शिखरं वैभवानं वाढताना दिसताहेत तर ग्रामीण भागात हरितक्रांतीमुळं मूठभर श्रीमंत शेतकरी आर्थिक सुबत्तेत वावरताहेत. अल्पभूधारक शेतकऱ्यापर्यंत शासनाच्या योजना पोहोचत नाहीत. त्याचा लाभ श्रीमंत शेतकरी घेऊ लागला. अशा प्रकारे देशभर आर्थिक दरी निर्माण झाली.

पी. एल. ४८० मधून निर्माण झालेल्या आर्थिक कोंडीला चालना देण्याचा प्रयत्न साहेबांनी केला. राष्ट्रीय संपत्तीचा विनियोग जास्तीत जास्त सामान्यांपर्यंत कसा पोहोचेल व संपत्तीचा संचय सहजासहजी श्रीमंतांना कसा करता येणार नाही याकडे लक्ष देणं साहेबांना आवश्यक वाटलं. १९७१च्या अर्थसंकल्पामध्ये या बाबीचा साहेबांनी विचार केला. नव्या आर्थिक वाटचालीला चालना दिली. सर्व जनता गरिबीविरुद्धच्या संघर्षात कशी सहभागी होईल याकडं साहेबांनी लक्ष केंद्रित केलं. हीच देशाची अर्थविषयक धोरणं असावी असं साहेबांचं मत होतं. उद्योगधंद्यांना चालना देऊन रोजगार निर्मिती व्हावी म्हणून व्याजाचा दर ८ टक्क्यांवरून ७ टक्क्यांवर आणला. उद्योगधंद्यातील मक्तेदारीला आळा घालण्यासाठी छोट्या व मध्यम उद्योगांना परवाने देण्याचा मार्ग अवलंबिला.

साहेब नेहमी म्हणत, "लोकशाहीत लोकांच्या गरजा अंतर्भूत असतातच. समाजातील दुर्लक्षित वर्गाच्या आशा-आकांक्षा भागविण्याकडं लक्ष देणं हे सरकारचं कर्तव्यच आहे. त्याकरिता राष्ट्रीय संपत्तीचा हिस्सा त्याच्यापर्यंत गेलाच पाहिजे."

आंतरराष्ट्रीय अर्थविषयक प्रश्नांच्या बाबतीत भारताचे अर्थमंत्री म्हणून साहेबांनी मोलाची कामगिरी पार पाडली. आंतरराष्ट्रीय चलनाच्या व्यवहारासंबंधीचा विचार करून त्यात बदल सुचविण्याकरिता स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय अर्थविषयक समितीच्या २० राष्ट्रांच्या समितीचे साहेब प्रतिनिधी झाले. भारत, बांगलादेश आणि श्रीलंका या तिघांच्या वतीनं साहेबांची

निवड या समितीवर झाली. या कमिटीचं कार्य सुरू असतानाच विकसनशील २४ राष्ट्रांनी एक गट स्थापन करून देशाची एकजूट निर्माण केली.

तरुण तुर्कांप्रमाणे साहेबांची काँग्रेस फोरम फॉर सोशॅलिटी ॲक्शनशीही जवळीक निर्माण झाली.

१९७० ला फोरमच्या चौथ्या अधिवेशनाचे उद्‌घाटन करताना साहेब म्हणाले, "आर्थिक सत्तेची केंद्रे बळकट झाली आहेत. पैशाचा विनियोग योग्य रीतीनं होताना दिसत नाही. पैशाची उधळपट्टी मोठ्या प्रमाणावर चालू आहे. याकडे आपल्याला कानाडोळा करून चालणार नाही. हाताच्या बोटावर मोजता येतील एवढी मंडळी ऐश्वर्यानं जीवन जगत आहे. पंचवार्षिक योजनेचा लाभ मागासवर्गीय व परंपरागत दारिद्र्याच्या खाईत जगणाऱ्यापर्यंत पोहोचला नाही. आपल्या देशाची आर्थिक व्यूहरचना आखताना समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला हातभार लागला पाहिजे."

बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळं सामान्य माणूस बँकेत प्रवेश करता झाला. त्याच्या आर्थिक गरजांची काहीअंशी पूर्तता होऊ लागली. संस्थानिकांचे तनखे बंद केल्यानं सामान्य माणसाची अशी भावना झाली की, हे सरकार पैसेवाल्यांचं नसून गरिबांचं आहे. 'गरिबी हटाव'चा नारा गरिबीत पिढ्यान्‌पिढ्या खितपत पडलेल्यांना प्रेरणास्रोत ठरला. इंदिराजींच्या या धाडसी निर्णयात भर घातली ती बांगलादेशाच्या निर्मितीनं. युद्धात पाकिस्तानचा केविलवाणा पराभव झाला.

देशात व परदेशात इंदिराजींच्या मुत्सद्देगिरीचं कौतुक होऊ लागलं. आंतरराष्ट्रीय राजकारणात एक प्रकारचा दबदबा निर्माण झाला. या सर्व परिस्थितीचा फायदा उचलण्याचं ठरवून इंदिराजींनी मार्च १९७१ मध्ये लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळालं. महाराष्ट्रात ४४ पैकी ४३ जागा काँग्रेसनं जिंकल्या. साहेब विरोधी उमेदवारापेक्षा १ लाख ७१ हजार मतं अधिक मिळवून निवडून आले.

इंदिराजींनी आपलं नवीन मंत्रिमंडळ जाहीर केलं. त्यात साहेबांकडं अर्थखातं ठेवण्यात आलं. अर्थमंत्रीपद स्वीकारल्यानंतर २४ राष्ट्रांनी स्थापन केलेल्या गटासमोर २४ सप्टेंबर ७२ ला साहेबांनी आपले विचार व्यक्त केले. २० प्रतिनिधींच्या चलनविषयक व्यवहाराच्या बदलासंदर्भात २३

मार्च १९७३ ला मार्गदर्शन केलं. लोकसभेसमोर ६ एप्रिल १९७३ ला विकसनशील राष्ट्रांचे आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी भारतानं जी भूमिका स्वीकारली तिचं विस्तृत विवेचन केलं.

इंदिराजी प्रसिद्धीच्या झोतानं झपाटलेल्या. कर्तृत्वाचा अहंकार जागा झालेला. व्यक्तिस्तोमाच्या तटबंदीत अडकलेल्या. दिव्य वलय लाभलेल्या नेत्या. 'ठरवील ती पूर्व दिशा' ही मनाची झालेली भावना. यातून निर्माण झालेली असुरक्षिततेची भीती. प्रस्थापित राजकारण्याच्या आधाराला धक्का पोहोचवून उपद्रव्यमूल्य असणाऱ्यांना पाठबळ देण्याच्या विचारानं कार्यरत झालेल्या. प्रांताप्रांतात जनाधार नसलेल्यांना राजसत्तेच्या पायघड्या घालून सत्तेत विराजमान करताहेत. दिल्लीत अनिश्चिततेचं वातावरण. वावड्यांना ऊत आलेला. १ वर्षापासून मंत्रिमंडळाच्या बदलाविषयीच्या कंड्या पिकविण्यात काही मंडळी मश्गुल झालेली. साहेबांनी आपला परदेशा दौरा आखलेला. साहेबांचा हा दौरा २५ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर ७४ असा ठरलेला. ओटावा आणि वॉशिंग्टनच्या दौऱ्यावर निघण्यापूर्वी साहेबांनी इंदिराजींची भेट घेतली. मंत्रिमंडळाच्या फेरबदलाची पुसटशी कल्पना साहेबांना आली. इंदिराजींना भेटून साहेब आपल्या पूर्वनियोजित दौऱ्यावर निघून गेले.

८ ऑक्टोबरला साहेब दिल्लीला पोहोचले. विमानतळावरच त्यांना आज मंत्रिमंडळाची बैठक असल्याचं कळलं. साहेबांनी थोडा वेळ आराम केला. ठरलेल्या वेळेला मंत्रिमंडळाच्या बैठकीला पोहोचले. इंदिराजींनी दौऱ्याविषयी विचारलं.

"कसा काय झाला दौरा?" इंदिराजी.

"चांगला झाला." साहेब.

"केव्हा आलात?" इंदिराजी.

"ठरल्याप्रमाणे आज सकाळी आलो." साहेब.

इंदिराजींनी साहेबांकडे पाहून स्मितहास्य केलं.

गंजूच्या दोन मुलींच्या लग्नाचं रिसेप्शन आजच त्यांनी ठेवलेलं. साहेबांना त्यांनी ७ वाजता येऊन जाण्याबद्दल विनवणी केलेली. इंदिराजी ७.३० वाजेनंतर येणार असल्याचं गंजूकडून साहेबांना कळलं. साहेब अगोदर येऊन जाण्यानं त्यांना सोयीस्कर होतं. साहेब ठीक ७ वाजता रिसेप्शनस्थळी पोहोचले. साहेबांपाठोपाठ ५ मिनिटांनी इंदिराजी तिथं पोहोचल्या.

साहेबांना पाहून इंदिराजी म्हणाल्या, "इथंच बाजूला. उभं राहून बोलूया का?"

"काही हरकत नाही." साहेब.

साहेब आणि इंदिराजींची दोन मिनिटांत चर्चा संपली. इंदिराजींनी साहेबांकडं परराष्ट्रमंत्रीपद देण्याचं ठरविलं. साहेब 'ठीक आहे' म्हणाले. इतरांना कुठली खाती दिली याबद्दल दोघांत चर्चा झाली. साहेब गंजूच्या लेकींना आणि जावयांना आशीर्वाद देऊन निवासस्थानी परतले.

परराष्ट्र खात्याची सूत्रं साहेबांनी ११ ऑक्टोबर १९७४ रोजी स्वीकारली. यावेळचा बदल सरळ झाला. यापूर्वीचे बदल त्या खात्यात संघर्ष निर्माण झाल्यानं करण्यात आलेले. संरक्षण, गृह, अर्थ या खात्यांचा कारभार प्रत्यक्ष पंतप्रधानांकडे असायचा. नंतर तो साहेबांकडे देण्यात यायचा. भारताचं परराष्ट्रधोरण नेहरूजींनी दूरदृष्टीनं आखलेलं. अलिप्ततावाद भारतीय परराष्ट्रनीतीचा कणा. नेहरूजींनी अलिप्ततावादाचा पुरस्कार केल्यानं जगातील अनेक राष्ट्रे या धोरणाकडे आकर्षित झाली. साहेबांनी अलिप्तता धोरण मर्यादित देशाची शक्ती न राहता ती चळवळ बनावी, परराष्ट्रीय धोरणाला बळकटी मिळावी यादृष्टीनं सातत्यानं प्रयत्न केला. परराष्ट्रधोरण केवळ राजकीय मुत्सद्देगिरीपुरतं संबंधित नसून आर्थिक धोरणाला चालना देण्याकरिता घ्यावयाच्या निर्णयाचा सतत पाठपुरावा करण्याची जबाबदारी परराष्ट्र खात्याला निभवावी लागते.

जागतिक शांतता हे भारताच्या परराष्ट्रनीतीचं मूलभूत तत्त्व आहे. साहेबांनी अमेरिका-भारत, भारत-रशिया, भारत-पाकिस्तान, भारत-बांगलादेश, भारती-चीन व भारत-मध्यपूर्वेतील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध वृद्धिंगत व्हावे व दीर्घकाळ ते टिकून राहावेत यादृष्टीनं आपल्या कार्याची आखणी केली. शेजारील राष्ट्रांशी सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करण्याकरिता साहेबांनी मुत्सद्देगिरीनं पावलं टाकली. साम्राज्यशाही व वसाहतवादी धोरणाविरुद्ध जो विचार असेल त्याला बळ पुरविणं हा भारतीय परराष्ट्रनीतीचा गाभा आहे. या सर्व सूत्रांना पूरक असं वातावरण निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न साहेबांनी केला.

नोव्हेंबर ७४ ला श्रीलंका व डिसेंबर ७४ ला बांगलादेशाला भेटी दिल्या. एकमेकांबद्दल विश्वासाचे संबंध निर्माण करण्यात यश मिळविलं.

युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो यांच्याशी राजनैतिक चर्चा करण्याकरिता १९ जानेवारी १९७५ ला युगोस्लाव्हियाला पोहोचले. टिटो हे पाश्चिमात्य देशांत प्रथम क्रमांकाचे राजनैतिक मुत्सद्दी म्हणून ओळखले जायचे. साहेबांच्या राजकीय मुत्सद्देपणाची, राजकीय डावपेचांची, राजनीतीज्ञ म्हणून जगाला ओळख होऊ लागली. परदेशात भारताची प्रतिमा उजळ करण्याच्या प्रयत्नात साहेब गुंतलेले; पण देशामधील राजकीय वातावरण अस्थिरतेच्या भोवऱ्यात सापडलेलं.

आणीबाणी लादण्यापूर्वी साहेब मे ७५ ला मॉंटेगोबे या जमेकामधील शहरात मुक्कामाला होते. त्या ठिकाणाहून ४ मे रोजी त्यांनी पत्र लिहिलं. एकंदरीत दिल्लीच्या राजकारणात त्यांच्या मनाची होणारी घुसमट त्यात व्यक्त केली. साहेब आपल्या पत्रात लिहितात,

४ मे १९७५

मॉंटेगोबे (जमेका)

....पुढल्या वर्षी ३० वर्षे होतील, मी पहिली निवडणूक जिंकून सरकारमध्ये आलो..... सत्तेची अनेक स्थानं पाहिली. राज्यात आणि केंद्रात सामान्य अर्थाने कुणालाही हेवा वाटावा अशी!..... मीही अशा स्थानाची महत्त्वाकांक्षा धरली होती हे म्हणणे खरे नाही किंवा त्यासाठी कुणाच्या पाठीमागे लाचारीने लागलो असेही नाही; परंतु जेव्हा जबाबदारी आली तेव्हा मागे फिरून पाहिले नाही... टीकाकार स्वाभाविकच सत्तेच्या पाठीमागे लागले आहेत वगैरे म्हणणार याची मला कल्पना आहे.... पण योजून एखादी सत्तेची जागा हस्तगत करायची असे मी कधीच केले नाही.... जाणीवपूर्वक सत्तेचा उपयोग समाजाच्या परिवर्तनासाठी करावयाचा माझा प्रयत्न राहिला. नव्या विचारांना सामोरा गेलो. मुख्यत: दलितांबद्दल कणव ठेवून सामाजिक न्याय प्रस्थापित केला पाहिजे ही माझी धारणा प्रथमपासूनच होती.... जे आपल्यासाठी कोणी केले नाही ते आपण इतरांसाठी करावे आणि सत्तेच्या केंद्रस्थानी असताना ते केले तर अधिक फलदायी होते. म्हणूनच अधिक मित्रभावाने, हळुवारपणे पण विचाराच्या दिशा कायम ठेवून मी माणसे वागविली आणि वाढविली.... पण आज मी जेव्हा राजकारणातले चित्र पाहतो तेव्हा माझे मन अस्वस्थ होते.... खरी जिव्हाळ्याची माणसे अवतीभोवती होती का? काही काही माणसांचे नमुने पाहिले

म्हणजे आश्चर्य वाटते... खरे म्हणजे दु:ख होते... मी काही राजकारण संन्यास घेण्याचा विचार करीत नाही. विचार येतो निवडणुकांचा आणि सत्तास्थानाचा.... जे आहेत ते तेथेच कसे राहता येईल यासाठी साधनशुचितेचा कसलाही विचार न करता अगदी क्रूरपणे कारस्थाने करताहेत. असल्या कारस्थानात अप्रत्यक्षपणे सामील न होता किंवा त्या कारस्थानाचे बळी होण्यापूर्वीच योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन बाजूला झाले तर बरे नाही का? असा प्रश्न मनात घोळतो आहे.... श्रीमतीजी अजून महत्त्वाच्या कामात सल्लामसलत घेतात; पण सत्तेच्या वर्तुळात बाहेर ठेवण्याचा समजेल असा प्रयत्न करतात असा अनुभव आहे... असे अपमानित राहण्याने ज्यांचा मी प्रतिनिधी आहे असे मानतो त्यांचा अपमान तर होत नाही ना, अशी बोचणी असते.... तडजोडीने वागले पाहिजे असा विचार करून मग काम चालू राहते...खऱ्या अर्थानं काम चालू आहे का? की एका व्यक्तीचा अहंकार सुखविण्यासाठी हे सर्व चालू आहे... काँग्रेस पक्ष हे मी माझे सर्व जीवन मानले. ती काँग्रेस कुठे आहे? काँग्रेसमध्ये लोकशाही राहिली आहे का? सत्ता मिळवून ते ताब्यात ठेवण्याचे यंत्र म्हणून आज काँग्रेस वापरली जात आहे.... १९६९ मध्ये मी त्यांच्याविरुद्ध मत दिले ते त्यांना सत्तेवरून काढण्यासाठी, हे माझ्याबाबतीत तरी खरे नाही. मी त्यांचे मत एकसारखे विचारले होते. त्यांचे मत बनत नव्हते. हे करू की ते करू अशी चंचलता होती. शेवटी मी जे ठरवीन ते इतरांनी मानावे अशी त्यांची रीत होती.... फेअर वागणे म्हणतात तसे गेली सहा वर्षे त्यांनी माझ्याशी व्यक्तिश: वर्तन केले... संसारातले प्रश्न कधीच संपत नाहीत. माझे मन पूर्वीही त्यात नव्हते, आजही नाही. प्रश्न आहे तुझा आणि माझा. तू धैर्यानं साथीला मनापासून असली म्हणजे मला कशाची पर्वा नाही. आयुष्याची शेवटची जी काही वर्षे आता राहिली आहेत ती तेजोभंग करून घेऊन काढण्यात अर्थ नाही.''

भारतीय राजकारणात ज्या घडामोडी सहा-सात वर्षांपासून घडताहेत त्याचा साहेबांच्या राजकीय जीवनावर होणारा परिणाम व राजकारणात त्यांची चोहोबाजूंनी केलेली कोंडी या पत्रात साहेबांनी व्यक्त केली.

इंदिराजींच्या दिव्य वलयांकित लोकप्रियतेला उतरती कळा लागली. बेगडी समाजवाद, फसवी 'गरिबी हटाव' वल्गना आणि प्रांताप्रांतांमध्ये

असामाजिक विचाराच्या व्यक्तींना राजाश्रय मिळाल्यानं बेभरवशाचं, गोंधळाचं, अविश्वासाचं वातावरण निर्माण झालं. संपूर्ण उत्तर भारतामध्ये बेदिलीचं वातावरण निर्माण झालं. राजकीय नेतृत्व करण्याची कुवत नसणाऱ्यांना नेतृत्व करण्याची संधी येऊ लागली. वलयांकित व्यक्तीला कुणी विरोध केलेला खपत नसतो. त्याची एकाधिकारशाहीकडे वाटचाल सुरू होते. तसंच काहीसं वातावरण काँग्रेस पक्षामध्ये निर्माण झालं. पक्षातील सामुदायिक नेतृत्वाच्या विचाराला गौण स्थान प्राप्त झालं.

अशा अनिश्चिततेच्या वातावरणात जयप्रकाशजींनी संपूर्ण परिवर्तनाचा नारा दिला. भ्रमनिराश झालेली जनता जयप्रकाशजींच्या आंदोलनाकडे आकर्षित झाली. राजकीय अस्थिरतेचा कडेलोट झाला. जयप्रकाशजींनी दिल्लीतील सत्ताधाऱ्यांसमोर एक आव्हान उभं केलं. आंदोलनाची परिसीमा काँग्रेसची सत्ता उलथून टाकण्यापर्यंत पोहोचली. सत्ता उलथून आपल्या हातातून जाते की काय या शंकेच्या भोवऱ्यात इंदिराजी अडकल्या. व्यक्तिस्तोमाच्या तटबंदीमध्ये इंदिराजींना सुरक्षितता वाटू लागली. याच विचारानं इंदिराजींच्या एकाधिकारशाहीला बळकटी मिळाली. त्यांनी लोकशाहीमध्ये घेऊ नये तो आणीबाणीचा निर्णय २६ जून १९७५ ला घेतला.

संपूर्ण परिवर्तनाचे आंदोलन चिरडून काढण्यासाठी आणीबाणीच्या कार्यवाहीला विरोध करणाऱ्यांची धरपकड सुरू केली. देशभरात जयप्रकाशजींसह अनेक नेत्यांना व कार्यकर्त्यांना कारावासात डांबण्यात आलं. ही धरपकड सुरू झाल्यानंतर देशांत आणीबाणी लागू झाल्याचं साहेबांना माहीत झालं. परदेशातून साहेबांना फोन येऊ लागले. विचारणा होऊ लागली,

"तुम्ही नजरकैदेत आहात का? इकडील वर्तमानपत्रात तशा बातम्या येत आहेत."

बीबीसी लंडनवरून प्रक्षेपित करण्यात आलेल्या बातमीत म्हटलं, "साहेब आणि जगजीवनरामजींना नजरकैद करण्यात आलं आहे."

ही बातमी ऐकून दिल्लीतील एक वरिष्ठ पत्रकार अनंत सात्त्विक साहेबांना भेटण्याकरिता आले.

त्यांना पाहताच साहेबांनी त्यांना विचारलं, "बातमीची शहानिशा

करायला आला का? आताच परदेशातून दूरध्वनी आले. ते विचारणा करताहेत, नजरकैदेत आहात का म्हणून....''

साहेबांनी अनंत सात्त्विकसोबत चहापान केलं. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समस्या या आणीबाणीच्या निर्णयानं निर्माण होतील. त्या समस्यांना आपल्याला तोंड द्यावं लागणार अशी चर्चा केली. एक-दोन दिवसांत परदेश दौऱ्यावर निघणार आहे असंही त्या पत्रकाराला सांगितलं. 'नजरकैद' साहेबांच्या बाबतीत अफवा होती.

आणीबाणीच्या काळात साहेबांनी गियाना, क्युबा, मेक्सिको, जमेका, इजिप्त, पेरू, अमेरिका, युरोप-अमेरिका या देशांना भेटी दिल्या. भारताच्या परराष्ट्र धोरणाला मान्यता मिळविण्याचा प्रयत्न केला. अफगाणिस्तान, कुवेत, इराक, फ्रान्स, बहरीन या देशांच्या दौऱ्यात तेथील नेत्यांशी व मुत्सद्यांशी चर्चा करून भारतीय परराष्ट्रनीतीबद्दल असलेल्या शंका-कुशंकांचं निरसन केलं.

इंदिराजींनी देशात आणीबाणी पुकारल्याने देशात व परदेशात एक अविश्वसनीय वातावरण निर्माण झालं. परदेशात राहणाऱ्या भारतीयांच्या तीव्र नाराजीला साहेबांना सामोरं जावं लागत असे. तडजोडीच्या राजकारणाचा पिंड असलेल्या साहेबांना आणीबाणी मानवणार नाही. केंद्रातील ज्येष्ठ मंत्र्यांना इंदिराजींचा हा निर्णय मनापासून आवडला नव्हता; पण विरोध दर्शविण्याचा मार्ग सापडत नव्हता. लाचारी ज्यांच्या राजकारणाचा पाया आहे असे दुय्यम दर्जाचे मंत्री आणीबाणीची तळी उचलून धरू लागले.

१९७७ च्या जानेवारीत साहेबांना विदेश दौऱ्यावर जावयाचं असल्यानं साहेबांनी इंदिराजींची भेट घेतली. भेटीत अनेक विषयांवर चर्चा झाली. त्यात आणीबाणीबद्दल पुनर्विचार करावयास पाहिजे, आणीबाणी मागे घेऊन जनतेच्या दरबारात जाऊन निवडून यावयास पाहिजे यावर चर्चा झाली; पण इंदिराजींनी मनाचा थांगपत्ता लागू दिला नाही.

साहेब १५ जानेवारीला फ्रँकफुर्टला पोहोचले. जर्मनीचे विदेशमंत्री गेनचर यांच्यासोबत दोन्ही देशांच्या संबंधात चर्चा केली. गेनचर यांनी भारताला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. साहेबांना गेनचर यांना भारतात येण्यासंबंधीचं निमंत्रण देता आलं नाही. इंदिराजींनी मार्चमध्ये निवडणुका घेतल्या तर... १८ जानेवारीला ते बुखारेस्टला पोहोचले. हा एक दिवसाचा

दौरा संपवून साहेब दिल्लीला परतणार होते. दिल्लीहून त्यांना एक खास संदेश मिळाला. त्या संदेशाबद्दल बुखारेस्टहून मला साहेबांनी पत्र लिहिलं.

१८ जानेवारी १९७७

बुखारेस्ट.

.....मी ॲम्बॅसडर कौल यांच्या घरी दुपारच्या जेवणासाठी गेलो होतो. येथील जेवण खाऊन उबगलो होतो. तेव्हा आपली डाळरोटी खावी म्हणून हा बेत आम्ही योजला होता... राजदूत कौल यांना बेलग्राडचा फोन आहे असे सांगितले. तो घेण्यासाठी ते गेले. मी तोपर्यंत माझे जेवण संपविले. निवांत हात धूत होतो. राजदूत घाईघाईनं माझ्याकडे आले आणि म्हणाले, "तो बेलग्रेडचा कौन्सल काही सांगत नाही. तुमच्याशीच प्रत्यक्ष बोलायचे म्हणतो. तुमच्यासाठी काही मेसेज आहे."

मी गेलो तेव्हा कौन्सलने आपले नाव सांगितले आणि पंतप्रधानांचा मेसेज आहे, १७ तारखेचा, तो मी वाचून दाखवतो, असे म्हणून हिंदीत असलेला संदेश वाचून दाखविला.

सारांश असा होता, "जो महत्त्वाचा निर्णय आपण घेणार होतो तो उद्या घेणार आहे. तुमच्याशी मी तुम्ही जाण्यापूर्वी बोलणार; पण तुम्ही व मीही कामाच्या घाईत असल्यामुळे राहून गेले. तुम्हाला निर्णय रेडिओवरून समजू नये, आधी माहीत व्हावा म्हणून कळवीत आहे. शक्य असेल तर (हो सके तो) कार्यक्रम संपण्यापूर्वी परत या."

राजदूताला मी विश्वासात घेतले आणि सांगितले, "पहिल्या परतीच्या प्लेनने मी दिल्लीस जाऊ इच्छितो. झेकोस्लाव्हाकियाचा कार्यक्रम रद्द. निर्णय प्रत्यक्ष जाहीर होईतो कारण कुणाला सांगू नका. परत जाण्याचा माझा निर्णय पक्का.... निर्णय संध्याकाळी ६ वाजता बीबीसी (येथील) वरून येथे सर्वांना समजला.... २० तारखेस पहाटे अडीच ते तीन वाजता येईन. तसा संदेश पंतप्रधानांना पाठवला आहे...."

साहेब दिल्लीत पोहोचले ते २१ जानेवारीच्या पहाटे तीन वाजता. दिल्लीला व देशाला आणीबाणीच्या धुक्यानं घेरलं होतं. ते धुकं आणीबाणी उठल्यानं विरू लागलं. स्वच्छ प्रकाश व हवा खेळती झाली. वातावरण पूर्वपदावर आलं. लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. आणीबाणीचा रोष व्यक्त करण्याच्या संधीची वाट जनता पाहत होती. जयप्रकाशजींच्या

नेतृत्वाखाली संपूर्ण भारतातील विरोधक एकत्र आले. जनता पक्षाची स्थापना झाली. आणीबाणीच्या काळात काँग्रेस पक्षातील राजकीयदृष्ट्या अपरिपक्व मंडळींनी जो हैदोस घातला त्याचा वचपा जनतेने मतपेटीद्वारा काढला. काँग्रेस पक्ष पराभूत झाला. आणीबाणीची देण म्हणून जनता पक्षाचा उदय झाला. जनता पक्षानं दिल्लीची सत्ता काबीज केली. काँग्रेसची धूळधाण उडाली. मोरारजी देशाचे पंतप्रधान झाले. काँग्रेस लोकसभेतील प्रमुख विरोधी पक्ष ठरला. साहेबांची काँग्रेस पक्षाच्या संसदीय नेतेपदी निवड झाली. मान्यताप्राप्त अशा विरोधी पक्षाचे लोकसभेतील स्वातंत्र्यानंतरच्या काळातील पहिले विरोधी पक्षनेते म्हणून साहेबांना संधी मिळाली. विरोधी पक्षनेता म्हणून साहेबांनी लोकसभेत आपली भूमिका पार पाडली.

साहेबांनी काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित अध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डी यांच्या सहकार्यानं पक्षाची पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न सुरू केला. इंदिराजींच्या काळात जो एकाधिकारशाहीचा उदय झाला होता त्याचा परिणाम पक्षाला भोगावा लागला. सामुदायिक नेतृत्वाची प्रथा निर्माण करावी या विचारानं साहेब आणि रेड्डी जाण्याचा विचार करू लागले. इंदिराजींनी मनाला वाटेल तेव्हा प्रांताप्रांतांच्या सुभेदारांच्या नेमणुका करावयाच्या व मनात येईल तेव्हा त्यांच्याकडून सुभेदारी काढून घ्यायची या अनिर्बंध अधिकाराला लगाम घालण्याचा विचार पक्षात होऊ लागला. पक्षांतर्गत लोकशाही व सामुदायिक नेतृत्वाची कास पक्षाला धरावी लागली.

साहेब आणि रेड्डी यांनी पक्षांतर्गत जी भूमिका घेतली त्याचा अर्थ इंदिराजींनी वेगळा लावला. त्यांच्या एकाधिकारशाही नेतृत्वाला दिलेले हे आव्हान आहे असे वाटले. सामुदायिक नेतृत्व त्यांच्या राजकीय विचारात बसणं शक्य नव्हतं. इंदिराजींनी परत एकदा निष्ठावानांना एकत्रित करण्यास सुरुवात केली. दरम्यानच्या काळात इंदिराद्वेषाने पेटलेल्या जनता पक्षाच्या राज्यकर्त्यांनी इंदिराजींना अटक केली. दुसऱ्या दिवशी लगेच सोडून दिलं. या दोन दिवसांत इंदिराभक्तांनी देशभर धुमाकूळ घातला. काँग्रेस महासमितीचं अधिवेशन बोलावून त्यात इंदिराजींची अध्यक्ष म्हणून निवड करावी अशी मागणी इंदिराजींच्या निष्ठावानांकडून होऊ लागली. ही मागणी काँग्रेस अध्यक्ष रेड्डी आणि साहेबांनी अमान्य केली. उलट ज्या यूथ काँग्रेसच्या अतिरेकी कार्यामुळं काँग्रेसची सत्ता गेली त्या यूथ काँग्रेसला बरखास्त

करण्याचा निर्णय घेतला. जनता पक्षातील राज्यकर्ते आपल्याला व आपल्या मुलाला अटक करतील त्या वेळी काँग्रेस पक्षानं रस्त्यावर उतरायला पाहिजे तसेच आणीबाणीत जी गैरकृत्ये करण्यात आली त्याबद्दल चौकशी झाल्यास पक्ष आपल्या पाठीशी एकसंध उभा राहावा ही अपेक्षा इंदिराजी बाळगून होत्या. साहेब आणि रेड्डी आणीबाणीतील गैरकृत्याला पाठिंबा देण्याच्या मन:स्थितीत नव्हते. उलट पाठिंबा दिल्यास पक्षाची प्रतिमा डागाळेल असं या दोघांचं मत होतं.

७८ मध्ये इंदिराजींच्या पाठिराख्यांनी एक परिषद बोलावली. या परिषदेवर काँग्रेजनांनी बहिष्कार टाकावा असं पत्रक साहेब आणि रेड्डी यांनी काढलं. पक्षांतर्गत लोकशाहीला फाटा देऊन पक्षाला आपल्या गुलामीच्या दावणीला बांधण्याच्या इंदिराजींच्या प्रयत्नाला कार्यकर्त्यांनी विरोध करावा असे आवाहन करण्यात आलं. परिषदेला जाणाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल असा इशाराही या पत्रकात देण्यात आला. देवराज अर्स यांनी ही परिषद भरविण्याकरिता पुढाकार घेतल्यानं त्यांना पक्षशिस्तीचा भंग केल्याबद्दल पक्षातून निलंबित करण्यात आलं. या परिषदेत काँग्रेसमधील बचावात्मक पवित्रा घेणाऱ्या नेत्याचा निषेध करण्यात आला व पक्षाला आक्रमक नेत्याची आवश्यकता आहे व ते नेतृत्व इंदिराजीच देऊ शकतात अशा प्रकारची भाषणे या परिषदेत झाली. इंदिराजींची पक्षाध्यक्षा म्हणून निवड करण्यात आली. पक्षाला 'इंदिरा काँग्रेस' हे नाव देण्यात आलं. साम्यवाद, समाजवाद, गांधीवाद, हिंदुत्ववाद व धर्मनिरपेक्षतावादाला कालबाह्य ठरवून इंदिराजींनी स्वकेंद्रित व्यवहारवादाला राजकारणात जन्मास घातलं आणि त्या यशस्वी झाल्या.

परत पक्ष ऐक्याचं गुऱ्हाळ सुरू झालं. साहेबांनी या ऐक्यवादी मंडळींपासून स्वत:ला अलिप्त ठेवलं. करणसिंग, प्रियरंजन दासमुन्शी, चंद्रजित यादव ऐक्याच्या प्रयत्नाविरोधात. ऐक्यवादी विचाराच्या गटात रेड्डी, सुब्रमण्यम, नाईक प्रभृती मंडळी. साहेबांनी ऐक्याच्या बोलणीमध्ये भाग घ्यावा असा इंदिराजींचा आग्रह. साहेबांनी ऐक्य-बोलण्याच्या वेळी काही अटी घातल्या. लोकसभेत पक्षाचे नेतेपद साहेबांकडे राहील आणि राज्यसभेत के. सी. पंत यांच्याकडे असावं. राज्यांमधील पक्ष शाखांवर कोणाची निवड करावयाची हे स्वर्णसिंग व इतर दोन सदस्यांवर सोपविण्यात

यावं. पक्षाचं एकीकरण त्रिसदस्य समितीच्या नेतृत्वाखाली व्हावं. त्या समितीत राष्ट्रीय काँग्रेसचे दोन सदस्य राहतील. या अटी इंदिराजींना मान्य असणं शक्यच नव्हतं. त्यांनी पुत्राच्या यूथ फोरमला ऐक्य-बोलणी मान्य नाही या कारणाकरिता बोलणी फेटाळली.

विशेष न्यायालयाच्या नियुक्तीसंबंधी, आपल्या पुत्राला नव्या एकत्र पक्षात मिळणारं स्थान याचा कुठेच उल्लेख पक्ष एकत्रीकरण करण्याच्या बोलणीत नाही. मायलेकांना अटक झाल्यास पक्ष रस्त्यावर उतरण्याच्या मन:स्थितीत नाही. शहा आयोगासंबंधी पक्ष 'ब्र' शब्दही काढण्यास तयार नाही. याबद्दल इंदिराजींनी आपली नापसंती व्यक्त केली. साहेबांनी मात्र आपली भूमिका स्पष्ट केली. जनता पक्षानं आपल्यावर व आपल्या मुलावर कारवाई केल्यास एकत्रित काँग्रेसला इंदिराजींना वापरून घ्यावयाचे आहे. आपण असे वापरलो गेल्यास जनतेत आपली नाचक्की होईल. आणीबाणीतील अतिरेकांचे समर्थन करणे म्हणजे पक्षाच्या इभ्रतीला धक्का पोहोचेल. पक्ष एकीकरणातून इंदिराजींच्या अपेक्षा पूर्ण होणार नाहीत याची त्यांना कल्पना आली. त्यांना ऐक्यात रस उरला नाही.

जानेवारी १९७९ मध्ये इंदिराजींच्या एकाधिकारशाहीला सुरुंग लावण्याचा निर्णय महाराष्ट्रात शरद पवार यांनी घेतला. काँग्रेस-इंदिरा काँग्रेस युतीच्या सरकारातून बाहेर पडून शरदरावांनी विरोधी पक्षाच्या मदतीनं महाराष्ट्रात सरकार स्थापन केलं व आपली आघाडी समांतर काँग्रेस हीच खरी काँग्रेस आहे असं ठणकावून सांगितलं. उलट देवराज अर्स काँग्रेस पक्षाला इंदिरा काँग्रेसच्या दावणीला बांधणार आहेत. त्यांना हवे असल्यास आम्हाला त्यांनी येऊन मिळावे. साहेबांची याबाबतची भूमिका 'नरोवा-कुंजरोवा'ची होती.

जनता पक्षाला फुटीची घरघर लागली. समाजवादी आणि जनसंघ यांच्यात दुहेरी सदस्यत्वावरून कुरबुरीला तोंड फुटलं. मोरारजी व चरणसिंग यांच्यात छत्तीसचा आकडा. इंदिराजी आणि जनसंघ वगळून सर्व पक्षांनी एकत्र येण्यासंबंधी चर्चा सुरू झाली. चरणसिंग जनता पक्षाच्या चौकटीचे उल्लंघन करण्याकरिता नव्या युतीच्या शोधार्थ निघाले.

साहेबांनी ७९ ला लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात पहिल्या दिवशी अविश्वासाचा ठराव मांडला. दोन दिवसांनंतर १०० खासदारांनी

जनता (एस) नावांनी वेगळी चूल मांडली. ग्रामीण व शेतकरी वर्गाशी बांधिलकीची नाळ असलेले खासदार चरणसिंगांच्या नेतृत्वाखाली बाहेर पडले. स्वर्णसिंग काँग्रेसचा ओढा चरणसिंगांकडे होता. मोरारजींनी स्वपक्षातील बंडाळीला जेरीस येऊन पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला.

राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांनी साहेबांना विरोधी पक्षनेते म्हणून मंत्रिमंडळ बनविण्याची प्रथम संधी दिली. साहेबांनी असमर्थता दर्शवल्यानंतर चरणसिंग यांनी मंत्रिमंडळ बनविण्याची तयारी दर्शविली. धूर्त इंदिराजींनी चरणसिंगांना सरकारबाहेर राहून पाठिंबा दिला. चरणसिंगांनी तो स्वीकारला. साहेबांनी चरणसिंगांना सहकार्य करण्याचा निर्णय घेतला. काँग्रेस (एस) आणि जनता (एस) या पक्षाचं केंद्रात संयुक्त सरकार स्थापन झालं. चरणसिंग पंतप्रधान आणि साहेब उपपंतप्रधान झाले. १८ ऑगस्ट ७९ ही तारीख बहुमत सिद्ध करण्याकरिता या पक्षांना देण्यात आली. चतुर इंदिराजींनी ऐनवेळी पाठिंबा काढून घेतला. २० ऑगस्टला चरणसिंगांना राजीनामा देणं भाग पडलं. जगजीवनराम यांनी मंत्रिमंडळ स्थापन करण्याचा दावा केला. तो राष्ट्रपतींनी फेटाळला. तीन-चार दिवस नेतृत्वाबद्दल लाजिरवाणा प्रकार दिल्लीत चालू होता. २५ ऑगस्ट ७९ ला राष्ट्रपतींनी लोकसभा विसर्जित केली. नव्या निवडणुकाचा आदेश काढला. निवडणुका पार पडून नवीन सरकार येईपर्यंत चरणसिंग यांच्या मंत्रिमंडळानं काळजीवाहू सरकार म्हणून देशाचा कारभार पाहावा अशी विनंती केली.

भारतीय लोकशाही अस्थिरतेच्या वावटळीत हेलकावे घेऊ लागली. ७९ मधील शेवटच्या सहा महिन्यांत दिल्लीत राजकारण्यांनी अक्षरश: शिमगा साजरा केला. या धामधुमीतून साहेबांनी वेळ काढला. घराण्यातील तिसऱ्या पिढीची प्रतिनिधी - आपला पुतण्या शिवाजीची कन्या कु. वर्षा चव्हाणचा विवाह म्हैसाळकर शिंदे सरकारच्या घराण्यातीलच श्री. दीपक शिंदे यांच्याबरोबर मोठ्या धूमधडाक्यात पार पडला. साहेबांनी दिल्लीतील ताणतणावाला या कार्यात थारा दिला नाही. आपली नात आबासाहेब शिंदे सरकारच्या घराण्यात सून म्हणून जातेय याचा साहेबांना अभिमान वाटला. साहेबांनी आल्या-गेल्याचं अत्यंत अगत्यानं स्वागत केलं. या विवाहात साहेब अत्यंत आनंदी दिसले.

जनता पक्षातील आपापसांतील लाथाळ्यांमुळं इंदिराजींचं राजकारणात

पुनर्वसन झालं. १९८० मधील लोकसभेच्या निवडणुकीत इंदिराजांना हुकमी बहुमत मिळालं. महाराष्ट्रातून रेड्डी काँग्रेसचे एकमेव खासदार म्हणून साहेब निवडून आले. तत्त्व, सच्चरित्र, नैतिकता या विचाराला इंदिराजींच्या राजकारणात गौण स्थान प्राप्त झालं. इंदिराजींच्या पुत्राच्या अनुयायांना स्वातंत्र्यलढ्यातील मूल्य व राष्ट्रीय भावनेबद्दल काडीचेही देणेघेणे नव्हते. देश आणि वंचितांना सन्मानानं जीवन जगता यावं हा आशावाद उरात बाळगून साहेबांनी आपल्या राजकारणाची वाटचाल आखली. या आशावादाचा पराभव साहेबांना स्वीकारावा लागला. बदलत्या राजकारणाची पावलं स्वार्थानं बरबटलेली. पक्षीय ध्येयधोरणाला तिलांजली देऊन व्यक्तिस्तोमाचा उदय राजकारणात स्थिरावला. खुशमस्कऱ्यांना राजदरबारी महत्त्व प्राप्त झालं आणि अशा लोकांना जनतेनं स्वीकारलं. आपल्या आशावादाचा पराभव स्वीकारून साहेब विषण्ण अवस्थेत दिवस काढीत होते. रेड्डी काँग्रेसला सर्व प्रांतांत जनतेनं नाकारलेलं. याही परिस्थितीत आपण वंचितांच्या सुखाचा जो विचार केलेला आहे तो कसा राबवणार अशा विचारात साहेब चिंतित असत. वंचितांच्या भविष्याच्या हितासाठी साहेबांनी इंदिराजींच्या काँग्रेसमध्ये प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला. इंदिराजींनी दीर्घकाळ साहेबांना ताटकळत ठेवून शेवटी पक्षात प्रवेश दिला. साहेबांनी या प्रवेशाला 'स्वगृही प्रवेश' असं संबोधलं. साहेबांना आठव्या वित्त आयोगाचं अध्यक्षपद देण्यात आलं. साहेबांच्या नेतृत्वाला पूर्वीची उंची गाठता आली नाही.

येणाऱ्या-जाणाऱ्यांचा राबता कमी झालेला. गतकाळातील आठवणीला उजाळा देण्यात आमचा वेळ जाऊ लागला. दु:खाचे पहाड साहेबांवर कोसळले; पण साहेब डगमगले नाहीत. सर्व संकटांचा मुकाबला धैर्यानं केला. मार्च ८३ उजाडला. १२ मार्च साहेबांचा वाढदिवस. तो मी दिल्लीतच साजरा करावयाचा ठरवलं. माझा डॉक्टर पुत्र - राजानं त्याच्या लग्नाची तारीख १२ मार्च ठरवून लग्न केलेलं. त्याच्या लग्नाचा वाढदिवस आणि साहेबांचा वाढदिवस मी हौसेनं साजरा करीत आले. माझी प्रकृती ठीक राहत नसल्यानं मला राजाकडं जाता येणार नव्हतं. त्यानंच दिल्लीला यावयाचं ठरविलं. ८ मार्चला सातारा रोडवरील कॅन्सर रोगनिदान शिबिर आटोपून तो कारने पुण्याकडे यावयास निघाला. घाट पार करून गाडीखाली उतरत असताना एका पुलाला जाऊन कार धडकली. तो गाडीसह खोल

दरीत फेकला गेला....रात्री फोन खणखणला. साहेबांनी तो घेतला. फोनवरून बातमी कळताच साहेब कोसळले. क्षणभरात स्वत:ला सावरीत मला ही दु:खद घटना कशी सांगावी या विचारात पडले. माझ्याजवळ आले. मला जवळ घेतलं आणि सावकाश म्हणाले,

"वेणू, आपला राजा आपल्याला सोडून गेला."

साहेबांचे हे बोल ऐकताच मी हंबरडा फोडला आणि अबोल झाले. वेणू, वेणू... म्हणून साहेब मला रडतं करण्याचा प्रयत्न करू लागले. एकदाचा हुंदका फुटला. मी टाहो फोडून रडू लागले. साहेब माझी समजूत घालू लागले. मी विचार करू लागले, 'आता जगायचं कशासाठी?' राजाच्या जाण्यानं माझ्या जगण्याची उमेदच खुंटली.

राजाच्या अकाली जाण्यानं मी खचून गेले. मला जगण्यात स्वारस्य राहिलं नाही. माझ्या दम्यानं उचल खाल्ली. मी अंथरुण धरलं. मी साहेबांना विनंती केली, "उन्हाळ्याच्या सुटीत सूनबाई मंगला, नात वीणा व नातू सिद्धार्थ यांना दिल्लीत बोलावून घ्या. मला त्यांच्या सहवासात राहण्याची इच्छा झाली."

साहेबांनी सूनबाई मंगला, सिद्धार्थ व वीणाला बोलावून घेतलं. एक महिना माझ्यासोबत राहिले. सुट्या संपण्याची तारीख जवळ येऊ लागली. मी मंगलला जवळ घेतलं. तिच्या कपाळाकडं पाहून मला रडू कोसळलं. मी तिला पोटाशी धरलं. तीही माझ्याकडं पाहून रडू लागली. आम्ही सासू-सुनानं एकमेकींकडं पाहून रडून घेतलं. मी तिला व तिनं मला सावरलं. साहेब बाहेर नातू व नातीला खेळवीत होते.

मी मंगलाला म्हणाले, "मंगला, साहेबांनी तुझ्याबद्दल माझ्या काय भावना व्यक्त कराव्यात?"

"काय म्हणाले साहेब?" मंगला.

"साहेब म्हणाले, मंगलामध्ये मला विठाई दिसतात. मी चार वर्षांचा असताना माझे वडील गेले. विठाईसमोर आम्हा भावंडांच्या भावी आयुष्याचा डोंगर उभा राहिला. विठाई डगमगली नाही. संकटांशी आणि अंधकाराशी झुंजली. गरिबीला जुमानलं नाही. आम्हाला घडविलं. मंगलाला गरिबीची झळ पोहोचलेली नाही. सिद्धार्थही चार-पाच वर्षांचा आहे. नियतीनं त्याच्या वडिलाला त्याच्यापासून हिरावून घेतलं. मंगलाने या संकटावर मात करावी.

सिद्धार्थ आणि वीणाची विठाई होऊन या चव्हाण कुटुंबाच्या वारसांना घडवावं...'' मी.

''आई, असं म्हणाले साहेब माझ्याविषयी!'' मंगला.

''होय! मंगला, साहेबांचा स्वभाव तुम्हाला माहीत नाही. साहेब कुटुंबातील कुणालाही प्रत्यक्ष काहीही बोलत नाहीत. ते भावनावश होऊन सर्वांबद्दल माझ्याजवळ काळजी व्यक्त करतात. त्याचा अर्थ मी असा लावते की, मी त्यांच्या या भावना यथावकाश तुमच्या कानावर घालाव्यात.'' मी.

''आई, मी सिद्धार्थ आणि वीणाची विठाई होईल. या दोघांचं भविष्य घडवील. चव्हाण आणि माझ्या माहेरच्या घराण्याचा नावलौकिक वाढवील.'' मंगला.

आम्हा दोघींचं हे बोलणं चालू असतानाच मला अस्वस्थ वाटू लागलं. मी साहेबांना आत बोलावून घेतलं. माझा जड झालेला आवाज ऐकून साहेब कावरेबावरे होऊन माझ्याकडं पाहू लागले. कदाचित माझा खोल गेलेला आवाज ऐकून त्यांना काही संकेत मिळाला असावा असा भाव साहेबांच्या चेहऱ्यावर मला दिसला.

मी साहेबांना म्हणाले, ''बाबासाहेब, शामराव, अशोक व दादाला इथं बोलावून घ्या. मला त्यांना डोळे भरून पाहायचंय.''

साहेबांनी सर्वांना बोलावून घेतलं. गोकुळावाणी भरलेलं घर मी पाहिलं. दम्यानं मला घेरलं. मला होत असलेल्या वेदना मी माझ्या चेहऱ्यावर येऊ नयेत म्हणून प्रयत्न करायचे. आता मला होणारा त्रास माझ्या सहन करण्याच्या पलीकडे गेला. सर्वजण माझ्या आजूबाजूला बसून आहेत. डॉ. कुरोली यांनी मला दवाखान्यात भरती करण्याचा सल्ला साहेबांना दिला.

साहेब माझ्याजवळ आले व म्हणाले, ''वेणू, डॉ. कुरोली याचं मत आहे, तुला दवाखान्यात भरती करावं लागेल.''

मी एकटक साहेबांकडं बघितलं.

क्षीण आवाजात म्हणाले, ''मला काही होणार नाही. तुम्ही तुमची काळजी घ्या. डॉक्टर साहेब, आपण साहेबांची काळजी घ्या.''

आज तारीख १ जून १९८३. माझा त्रास वाढला. सर्व घर माझ्याभोवती

फिरतंय. साहेबांना बोलावून घेतलं. साहेबांपाठोपाठ सर्व लहानथोर मंडळी माझ्या खोलीत आली. साहेबांनी माझं डोकं आपल्या मांडीवर घेतलं. मी साहेबांचा चेहरा न्याहाळू लागले... साहेबांच्या कर्तृत्वाची एक-एक आठवण मला आठवू लागली.... साहेबांनी मला अनेक पत्रे लिहिली; पण मी मात्र त्यांना एकही पत्र लिहिलं नाही. माझ्या मनात मी साहेबांना लिहिण्यासाठी जे साठवून ठेवलं ते मी आता मनातल्या मनात व्यक्त करू लागले...

"साहेब, आपण सह्याद्रीच्या कुशीत वाढलात. सह्याद्रीच्या वाऱ्याची दिशा आपण आपल्याला हवी तशी बदलविली. तिला आपलंसं केलं. सह्याद्रीच्या वाऱ्यांनं तुमच्या कलानं वाहण्याचं मान्य केलं. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या दिल्लीच्या वाऱ्याची दिशा बदलविता बदलविता तुमची दमछाक झाली. महाराष्ट्रातील अनुस्वरांच्या संस्कृतीला तुम्ही जिंकलं. त्या अनुभवाच्या शिदोरीवर तुम्ही दिल्लीतील अनुस्वरांच्या संस्कृतीला जिंकू शकला नाहीत. दिल्लीवर या संस्कृतीचा पगडा जबरदस्त तरीपण तुम्ही तुमच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचं मोहजाळ दिल्लीवर टाकलं. तुमच्या मोहजाळात दिल्ली थोडी घुटमळली. तुमच्या कर्तृत्वाचे गोडवे गाऊ लागली. येथेच दिल्लीचे वारे तुमच्या विरोधात घोंगावू लागले.

साहेब, आपण भारताचे संरक्षणकर्ते झालात. त्यात यशाचं शिखर गाठलं. दिल्लीची जनता आपल्या कर्तृत्वाला मानाचा मुजरा करण्यासाठी रामलीला मैदानावर सज्ज झाली. दिल्लीतील तथाकथित साहित्यिक मंडळी दरवर्षी गणतंत्र दिवशी दिल्ली प्रदेश हिंदी साहित्य संमेलन भरविते. या संमेलनाचे उद्‌घाटक होता आपण. दिल्लीत चर्चा होती - देशाचं संरक्षण करणाऱ्या या महाराष्ट्रपुत्रानं साहित्य संमेलनाचं उद्‌घाटन करण्याचं मान्य कसं केलं? साहित्यक्षेत्राशी यांचा काय संबंध? या उत्सुकतेपोटी आणि देशाचं संरक्षण करणाऱ्या तुम्हाला पाहण्यासाठी येणाऱ्या साहित्यिकांना आणि प्रेक्षकांना रामलीला मैदानावरील सभामंडप अपुरा पडू लागला. श्रोत्यांची तोबा गर्दी पाहून अटलबिहारीजींसारख्यांना प्रश्न पडला - या जनसागरातून तुमची नौका पार पडेल किंवा नाही? निर्धारित वेळेला तुम्ही पोहोचलात.

साहेब, आपण या संमेलनात म्हणाला, 'आपण हिंमत हरायला नको. कवींनी युद्धकाळात रचना केल्या. त्यामुळं जनतेचं व सैन्याचं

मनोबल वाढलं... त्याबद्दल मी कवीचे आभार मानतो.' आणि भाषणाचा शेवट तुम्ही जो केला तो असा - 'अगर चीन चीन है, तो भारत प्राचीन है!'

हे वाक्य ऐकून साऱ्या सभेत विजेचा कडकडाट झाल्याचा क्षणभर भास झाला. साहेब, तुम्ही सभा जिंकली. दिल्लीतील जनतेच्या व साहित्यिकांच्या मन:पटलावर तुम्ही विराजमान झालात.

स्वत: अटलजी स्तंभित झाले आणि त्यांनी तुमच्या बाबतीत म्हटलं, 'मला नंतर कळलं की, यशवंतराव एक रसज्ञ आहेत म्हणून! त्यांच्या देहामध्ये एक रसिक हृदय धडकत आहे. त्याचबरोबंर राष्ट्राच्या नाडीवर आपला हात आहे हे त्यांनी सिद्ध केलं.'

दिल्लीला शाहीर साबळे यांच्या कार्यक्रमाला आपण गेलात. 'दिल्लीचे तख्त राखितो महाराष्ट्र' या ओळी सुरू व्हायला आणि आपला प्रेक्षागृहात प्रवेश हा योगायोग घडला. टाळ्यांच्या कडकडाटात आपलं स्वागत झालं.

साहेब, आपण यशाचा एक-एक किल्ला काबीज करीत निघालात. या यशस्वी किल्ल्याच्या बुरुजाखाली सुरुंग पेरण्याचं काम दिल्ली पद्धतशीर करीत आहे याची चाहूल आपणास लागली नसावी. देशप्रेमानं भारावलेलं आपलं मन भविष्यकाळाच्या आकाशात उंच उंच भराऱ्या मारू लागलं; पण परिस्थितीचा बाण नुसता चाटून जरी गेला तरी क्षणात धरतीवर यावं लागतं याकडं आपलं दुर्लक्ष झालं. हा परिस्थितीचा बाण चोरपावलानं आपलं सावज जाळ्यात गाठण्याचा प्रयत्न करू लागला. देशाचं संरक्षण करून देशाची मान जगात उंचाविली तुम्ही...

साहेब, आपण जगाच्या पातळीवर चर्चिले जाऊ लागले. दिल्लीचे वारे आपल्याभोवती धुके निर्माण करू लागले. या धुक्यांना दूर करण्याचा प्रयत्न आपण आपल्या परीनं करीत होता. त्यात तुम्हाला यशही येताना दिसत होतं. जयप्रकाशजी खाजगीत बोलून गेले, 'हो सकता है यशवंतरावजी ॲटली जैसे अच्छे पंतप्रधान बने.'

आता दिल्लीच्या वाऱ्यांनी चक्रीवादळाचं रूप धारण केलं. साहेब, तुम्ही या चक्रीवादळात सापडलात. चक्रव्यूह छेदण्याचं कसब आपण वापरून त्यात यशस्वी झाला. पण हे चक्रीवादळ आपणासाठी नवखं होतं.

साहेब, या दिल्लीनं तुम्हालाच खेळवलं असं नाही तर तुम्ही ज्यांचे वारसदार आहात त्या सर्व सह्याद्रीपुत्रांना खेळवलं. याला इतिहास साक्षी आहे. ज्यानं दिल्लीश्वराच्या नाकीनऊ आणले त्या शिवाजी महाराजांना या दिल्लीनं कैद केलं. महाराजांच्या सैन्यानं अटकेपार झेंडे लावले; पण दिल्लीवर ते झेंडा फडकवू शकले नाहीत. महादजी बाबा शिंदेंनी दिल्ली काबीज केली; पण मोगलाच्या वंशाला मांडीवर घेऊन सिंहासनावर बसलेत. इथेही दिल्लीनं तुमच्या पूर्वजांना हुलकावणी दिली. हा इतिहास पाहता दिल्ली तुम्हाला न्याय देईल असं वाटत नव्हतं; पण तुम्ही लोकशाही राजकारणातले सर्व अंदाज खोटे ठरवून तुमच्या यशाचा सूर्य दिल्लीवर तळपत ठेवला.

या चक्रीवादळाचा एक-एक पाश तोडताना, तुम्हाला राजकीय डावपेच आखताना घ्यावे लागलेले निर्णय किती अचंब्यात टाकणारे होते.... इंदिराजी वसंतराव नाईक यांना पुन्हा मुख्यमंत्री करणार अशी कुणकुण तुम्हाला लागताच तुम्ही प्रतिडाव टाकला. औरंगाबाद मुक्कामी वसंतराव नाईक मुख्यमंत्रीपदी राहतील असं जाहीर केलं. मराठवाड्याची जनता नाराज झाली. त्यामागील डावपेचाचा उलगडा 'सत्तेचे मोहरे' हे जगन फडणीस लिखित पुस्तक वाचल्यानंतर होतो. या पुस्तकात आपण आपल्या सहकाऱ्यांना मराठवाड्याला न्याय द्यायचा आहे म्हणून प्रदेश काँग्रेसचे त्यावेळचे सचिव, गाडगीळ, शरद पवार, तुषार पवार यांना सूचना केल्या,

'शंकरराव चव्हाण यांनी खात्यात चांगले काम केले आहे; पण नेत्यासाठी लागणारे गुण त्यांच्यात नाहीत. ते कार्यक्षम आहेत. शंकररावांना मुख्यमंत्री करावयाचे आहे. तुम्ही त्यांची विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रात इमेज वाढवा.'

योगायोगाला तुमच्या राजकीय जीवनात अतिमहत्त्वाचं स्थान राहिलेलं. दिल्लीकरांनी महाराष्ट्रातून तुम्हाला मिळणारी राजकीय रसद तोडण्याचा डाव आखला. प्रथम बाळासाहेब देसाई, पी. के. सावंत, यशवंतराव मोहिते, वसंतदादा पाटील या तुमच्या मावळ्यांना दिल्लीने सुभेदारी देऊ केली; पण या मावळ्यांनी इतिहासाची पुनरावृत्ती आम्हाला होऊ द्यायची नाही. पुन्हा संताजी-धनाजी निर्माण होऊ द्यायचे नाही, असं दिल्लीला ठणकावून सांगितलं.

साहेब, आपण जर ध्येयवादाच्या यशस्वितेसाठी धोके पत्करण्याची तयारी दर्शविली असती तर तुम्ही अखिल भारतीय कीर्तीचे महान नेते, कदाचित पंतप्रधानही झाले असता, असं मत मोहन धारिया यांनी आपल्या बाबतीत व्यक्त केलं. (सफर; ११३)

साहेब, दिल्लीनं राजकारणात महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला जे डिवचलं ते सुसंस्कृत व राजकारणात साधनशुचितेला महत्त्व देऊन राजकारण करणाऱ्या मंडळींना आवडलं नाही. १९७९ मध्ये शरदरावांनी आपल्या कृतीनं दिल्लीला विरोध केला.

शेवटी दिल्ली यशस्वी झाली. मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्रातील काही राजकीय कमकुवत मासे दिल्लीच्या गळाला लागले. महाराष्ट्रातील तुमची रसद तोडण्यात दिल्ली यशस्वी झाली. मराठवाड्यातील फाटक्या लुगड्यातील एका मातेनं खाऊसाठी तुम्हाला एक रुपया दिला. त्या मराठवाड्यात आपण राजकारणातील आपल्या राजकीय वनवासाच्या वाटेवरून जात असताना विदर्भातील गायधनी नावाच्या कवीची कविता व्यक्त करून आपल्या राजकीय जीवनाचं सार सांगितलं....

'अंगावर चिंध्या पांघरुण
सोनं विकायला बसलो तर...
गिऱ्हाईक फिरकता फिरकेना...
सोनं अंगावर पांघरुण
चिंध्या विकायला बसलो तर...
गर्दी आवरता आवरेना...'

साहेब, मी तुम्हाला मागे सोडून जात असताना मला अतीव यातना होताहेत. भारतीय संस्कृतीत स्त्रीला आहेव मरण येणं हे सत्कर्म केल्याचं लक्षण समजलं जातं. आज मी आहेव मरणाच्या वाटेवर आहे. काही क्षणातच मी तुमची साथ सोडणार... तुमच्या भवितव्याची काळजी काळजात ठेवून घेत मी तुमची साथ सोडते.... ''

साहेबांनी माझ्या तोंडात पाण्याचा एक थेंब टाकला. तो मी गिळला. मी साहेबांकडे व माझ्याभोवती जमलेल्या माझ्या रक्तामांसाच्या माणसांकडे नजर फिरविली तोच माझा श्वास मला सोडून गेला.

समाप्त

## या ग्रंथाचा आधार


१) सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण यांच्या निवडक भाषणांचा संग्रह
२) कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण
३) ऋणानुबंध - यशवंतराव चव्हाण
४) शिवनेरीच्या नौबती (मा. यशवंतराव चव्हाण यांची मननीय भाषणे) - गोविंद तळवलकर, अ. ह. लिमये
५) यशोधन (यशवंतराव चव्हाण यांचे निवडक विचार) - विनायक पाटील
६) साधना (१९७४) (राजर्षी शाहू जन्मशताब्दी सामाजिक कृतज्ञता अंक) - प्रा. संभाजी भोसले
७) कृष्णाकाठचा माणूस - अरुण शेवते
८) यशवंतराव चव्हाण (राजकारण आणि साहित्य) - भास्कर लक्ष्मण भोळे
९) महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण - विठ्ठलराव पाटील
१०) वेणू - नारायण शिंदे
११) सह्याद्रीचे वारे : एक अभ्यास - केशव बा. वसेकर

१२) सह्याद्री : यशवंतराव चव्हाण चरित्रात्मक कादंबरी - आनंद पाटील
१३) भावलेली माणसं - रावसाहेब शिंदे
१४) मराठी मातीचे वैभव - प्रा. उत्तम सूर्यवंशी
१५) माझा पवाडा - शाहीर साबळे
१६) यशवंतराव : इतिहासाचे एक पान - रामभाऊ जोशी
१७) विरंगुळा - रामभाऊ जोशी
१८) वादळमाथा - राम प्रधान
१९) सत्तेचे मोहरे - जगन फडणीस
२०) लढा भूमिपुत्राचा - प्रा. य. रा. जिते
२१) युगंधर नेते : यशवंतराव चव्हाण - बा. ह. कल्याणकर
२२) युगप्रवर्तक यशवंतराव - संपा. रामनाथ वाघ



प्रिय सौ. वेणू,

माझ्यावर रागवली नसणार असं गृहित धरून माझ्या मनातील घुसमट या पत्रात लिहून मी माझं मन तुझ्यासमोर मोकळं करीत आहे. आपलं लग्न होऊन दोन महिने लोटले. नववधू अनेक स्वप्न मनात घेऊन या नव्या विश्वात रमण्यास येते. तरूणपणाच्या भावनेचा उन्मेष व्यक्त करण्याच्या उर्मी उरात बाळगून काही स्वप्न रंगवायची असतात; याची मला कल्पना आहे. या भावनांचा विचार न करता, तुला न सांगता-न बोलता मुंबईला निघून आलो. अपराधी मनानं मी हा निर्णय घेतला. हा निर्णय घेताना माझ्या मनाला काय यातना झाल्या असतील याची तुला कल्पनाही येणार नाही. तारूण्यातील भावनांनी जर बुद्धिचा ताबा घेतला तर मनुष्य ध्येयापासून दूर जाण्याचा धोका असतो. मला माझ्या ध्येयापासून दूर करण्यास तू कारणीभूत झालीस असा ठपका तुझ्यावर येऊ नये; असं मी ठरविलं आणि पुढेही मी प्रयत्न करीत राहीन. त्यातलाच हा तुला न सांगता मुंबईला निघून येण्याचा माझा निर्णय. तू माझं हृदय आहे तर स्वातंत्र्य चळवळ माझा श्वास आहे. श्वास आणि हृदय यांचा समन्वय माणसाला जिवंत ठेवतो. मला जिवंत राहण्यास श्वास आणि हृदय सारखेच महत्त्वाचे आहेत. मी दोघांपासून दूर जाऊ इच्छित नाही.



लेखकाच्या शालेय जीवनातील अविस्मरणीय प्रसंग-
कबड्डी स्पर्धेतील प्रथम पारितोषिक साहेबांच्या हस्ते स्वीकारताना (१४-११-१९६०)

या कादंबरीच्या सूत्रधार वेणुताई आहेत. वेणुताई १९४२ साली विवाहानंतर चव्हाण कुटुंबीयांत कऱ्हाडला दाखल झाल्या. वेणुताईंचा मृत्यू १९८३ साली दिल्ली येथे झाला. हा सर्व काळ त्या साहेबांची सावली बनून राहिल्या...थोरांच्या कौटुंबिक जीवनाविषयी सामान्यांना जिज्ञासा असते. महाराष्ट्राच्या या जाणत्या राजाच्या कौटुंबिक आयुष्याबद्दल ती आहेच. ती जिज्ञासा या लिखाणामुळे पूर्ण होते. 'थोरल्या साहेबां'च्या निमित्ताने वेणुताईंच्या नजरेतून महाराष्ट्राचा जो राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व पक्षीय राजकारणाचा इतिहास नजरेसमोर येतो तो सध्याच्या पिढीला उद्बोधक ठरेल.

इतिहासाच्या चौकटी न मोडता घटनांशी इमान राखून लिहिलेल्या या रसाळ कादंबरीबद्दल प्रा.डॉ. विजय पाथ्रीकरांचे उभा महाराष्ट्र अभिनंदन करेल.

**विनायक पाटील**
(माजी मंत्री-महाराष्ट्र राज्य) कदंबवन, नाशिक

'थोरले साहेब' हे पुस्तक लिहून शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. डॉ. विजय पाथ्रीकरांनी महाराष्ट्रातील साहित्यक्षेत्रात मोलाची भर घातली आहे. देवराष्ट्रे, कराड, मुंबई व दिल्ली हा स्व. यशवंतरावजींच्या जीवनाचा घटनाक्रम त्यांनी अतिशय परिणामकारक आणि इतिहासाशी प्रामाणिक राहून लिहिला आहे. 'कृष्णाकाठ' हे साहेबांचे आत्मचरित्र. 'सागरतट', 'यमुनातीर' लिहायचे राहून गेले. प्रा. डॉ. विजय पाथ्रीकरांनी ते काम पूर्ण केले आहे. स्व. यशवंतरावजींच्या जीवनातील सर्व घटनाक्रम सौ. वेणुताईंच्या मुखातून वदविताना लेखकांनी कमालीची सावधानता बाळगली आहे. यशवंतराव हे सौ. वेणुताईंना कधीही विसरू शकले नाहीत. एवढे मोठे प्रतिभासंपन्न, महाराष्ट्र भूषण, महाराष्ट्राचे शिल्पकार, राजकीय स्तरावरील मुत्सद्दी, परदेशातही आपली वेगळी प्रतिमा उमटविणारे स्व. यशवंतरावजी सौ. वेणुताईंच्या मृत्यूने खचले. ते सैरभैर झाले.

मराठी साहित्यसंपदेत मोलाची भर प्रा. डॉ. विजय पाथ्रीकरांनी घातली त्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद.

**श्रीनिवास पाटील**
आय.ए.एस.(निवृत्त), माजी खासदार, कराड


**कैलाश पब्लिकेशन्स**
**औरंगाबाद**